टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

"दै. 'तरूण भारत'(बेळगाव)चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान"
(१९१९ ते १९८०)

संशोधक
श्री मनोहर सुबराव कोळसेकर

मार्गदर्शक
प्रा.डॉ.एस.पी. शिंदे

ऑगस्ट,२०१४

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. मनोहर सुबराव कोळसेकर यांनी **"दै. 'तरूण भारत' (बेळगाव) चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान" (१९१९ ते १९८०)** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : सातारा
दिनांक :

मार्गदर्शक
प्रा. डॉ.एस.पी. शिंदे

प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **"दै. 'तरूण भारत' (बेळगाव) चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान"** (१९१९ ते १९८०) हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. एस. पी. शिंदे, छ. शिवाजी कॉलेज सातारा, यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा संशोधक

दिनांक :

(श्री. मनोहर सुबराव कोळसेकर)

ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील पीएच. डी. प्रबंध "दै. 'तरूण भारत' (बेळगाव) चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान" (१९१९ ते १९८०) या विषयावर विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी शोध प्रबंध सादर करीत आहे. सन १९१९ ते १९८० या काळातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थितीचा वेध या वृत्तपत्राच्या माध्यमातून अभ्यासता आला. समाजाच्या सर्वांगीण बदलासाठी एखादे वृत्तपत्र कशा पद्धतीने महान कामगिरी करू शकते. याची प्रचिती स्पष्ट झाली. या वृत्तपत्राची आक्रमकता, दूरदर्शीपणा व मराठी माणसाबाबत असणारी तळमळ इत्यादी गुणांमुळे वृत्तपत्राच्या संशोधनाकडे वळलो.

या शोधप्रबंधाला आकार देण्यासाठी व सैद्धांतिक विवेचन करण्यासाठी प्रा. डॉ. एस. पी. शिंदे इतिहास विभाग, छ. शिवाजी कॉलेज, सातारा यांनी मला बहुमोल मार्गदर्शन केले. माझ्यातील संशोधन गुणांचे संवर्धन करून संशोधनात्मक दृष्टी दिली. संशोधनाला आवश्यक असणारी शिस्त, कठोर परिश्रम व चिकाटी यासारखे गुण माझ्यात विकसित करून संशोधन क्षेत्रात आयुष्यभर पुरेल एवढी ज्ञानरूपी शिदोरी मला दिली. त्याबद्दल त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विभागाचे अधिष्ठाता डॉ. कार्लेकर सर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. संध्या पंडित मॅडम यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून माझ्या संशोधन कार्यास दिशा दिली. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

'तरूण भारत' चे संपादक श्री किरण ठाकूर, कार्यकारी संपादक, श्री दिपक प्रभू, सह संपादक जयवंत मंत्री, किरण ठाकुर यांचे सचिव जगदीश कुंठे तसेच फाईल विभागाचे व्यवस्थापक ज्यानी माझ्याबरोबर सतत राहून सन १९१९ ते १९८० या काळातील सर्व अंक अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले. ते श्री मिंगेल परेरा व सुधीर कारेकर या सर्वांचा व दै. 'तरूण भारत' परिवाराचा मी शतशः ऋणी आहे. तसेच 'राष्ट्रवीर' बेळगांव या वृत्तपत्राचे संपादक ॲड. राजाभाऊ पाटील यांनी 'राष्ट्रवीर' वृत्तपत्राच्या अंकाच्या फाईल उपलब्ध करून दिल्या. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

माझे प्रेरणास्थान कै. टी. के. कोलेकर (मा. आमदार, गडहिंग्लज) यांनी सुरूवातीला मोलाचे सहकार्य केले. संशोधन काळात ज्यांचे सहकार्य व प्रोत्साहन लाभले. यात शिक्षण समिती कसबा।। नेसरीचे चेअरमन ॲड. हेमंत कोलेकर, सौ. अर्चना कोलेकर, प्राचार्य डॉ. के. आर. पाटील, आमच्या शिक्षण संस्थेचे संचालक मंडळ, पदाधिकारी आणि माझे सर्व सहकारी प्राध्यापक मित्र, प्रशासकीय सेवक वर्ग व महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे मी हे काम पुर्ण करू शकलो, या सर्वांचा मी ऋणी आहे.

मला संशोधनाची ओळख करून दिली ते आदरणीय गुरूवर्य प्राचार्य डॉ.टी.एस.पाटील, माझे मित्र प्राचार्य डॉ. ए. एल. बेलवटकर, प्रा.सतीश चौगुले, प्रा.संजीव बोडखे, प्रा. डॉ. दत्तात्रय कोरडे, प्रा. विष्णू पाटील, प्रा. सुरेश चव्हाण, प्रा. मानाजी शिंदे, प्रा. बाळासाहेब वांजोळे, प्रा. आर. डी. कांबळे, माझे मित्र प्रा. महेंद्र चव्हाण, प्रा. कंचन बेल्लद, प्रा. एन. डी. केसरकर, प्रा. माधव भोसले, प्रा. गौतम कांबळे, प्रा. संगिता लोखंडे, प्रा. दिवेकर, एस. ई. पाटील या सर्वांचा आभारी आहे.

या शोधप्रबंधासाठी मुलाखतदात्यांनी आपला बहुमोल वेळ दिला व मन मोकळेपणाने माहिती देऊन ऐतिहासिक सत्य घटनांना प्रकाशमान केले. विशेषतः 'तरूण भारत' चे संपादक श्री किरण ठाकूर, श्री जगदिश कुंठे, कै.तुकाराम कोलेकर यांचा मी आभारी आहे.

माझे वडील श्री. सुबराव कोळसेकर व आई प्रेमा कोळसेकर, भाऊ चंद्रकांत यांचे आशीर्वाद तसेच माझ्या संशोधनासाठी जिने कष्ट घेतले ती माझी पत्नी सौ. विजया, चिरंजिव स्वराज, कन्या सृष्टी, सासरे श्री सटूप्पा पवार, मामी सौ. सुखनंदा व परिवार, माझे मामा श्री मारूती पाटील या सर्वांचे सहकार्य व प्रोत्साहन मोलाचे ठरले. या सर्वाचा मी अत्यंत कृतज्ञ आहे.

या प्रबंधाचे टंकलेखन अचूक व सुबक करून त्यास मोहक रूप देऊन या शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल 'समृद्धी टाईपरायटरच्या' प्रोप्रा.सौ.वैशाली कोरडे यांचे आभार मानतो.

श्री कोळसेकर मनोहर सुबराव

अभ्यासक

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्रं
●	**प्रमाणपत्र**	**I**
●	**प्रतिज्ञापत्र**	**II**
●	**प्रमाणपत्र**	**III**
●	**ऋणनिर्देश**	**IV**
१.	**दै. 'तरूण भारत' ची पार्श्वभूमी**	**१ ते ६३**
	विषय प्रवेश, संशोधन विषयाचे नांव, संशोधन विषयाची निवड	
	संशोधन विषयाचा कालखंड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती,	
	संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाची गृहितके, सिंद्धात कल्पना,	
	संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन,संशोधन पद्धती, संदर्भ साधने,	
	प्रस्तुत अभ्यासाचे महत्त्व व प्रस्तुत प्रंबधाचे प्रकरणानुसार स्वरूप	
	पत्राचा उदय, भारतीय वृत्तपत्रांच्या विकासाची वाटचाल,	
	मराठी वृत्तपत्रांचा विकास, सीमा भागातील वृत्तपत्रांचा उदय,विकास,	
	बेळगाव शहरातील मराठी वृत्तपत्रांचा इतिहास व वाटचाल,	
	'तरूण भारत' वृत्तपत्राची स्थापना, उद्देश, विकासाचे टप्पे	
	संस्थापक/संपा. बाबुराव ठाकुर पुर्वायुष्य व्यक्तिमत्त्वाची जडणघडण	
२.	**दै. 'तरूण भारत' चे सामाजिक कार्य**	**६४ ते १४३**
३.	**दै. 'तरूण भारत' चे राजकीय कार्य**	**१४४ ते २३२**
४.	**दै. 'तरूण भारत' चे शैक्षणिक कार्य**	**२३३ ते २७८**
५.	**दै. 'तरूण भारत' चे सांस्कृतिक कार्य**	**२७९ ते ३२५**
६.	**उपसंहार**	**३२६ ते ३५२**
	संदर्भ ग्रंथ सूची	**३५३ ते ३६१**
	परिशिष्टे	**३६२ ते ३७३**
	नकाशे	**३७४ ते ३७९**
	छायाचित्रे	**३८० ते ३८६**

प्रकरण पहिले

दै. 'तरुण भारत' ची पार्श्वभूमी

१.१ प्रस्तावना

आधुनिक सामाजिक जीवनाचे एक प्रभावी अंग म्हणून वृत्तपत्रांना महत्व प्राप्त झाले आहे. वृत्त म्हणजे वार्ता किंवा बातमी तिचा प्रसार करण्याचे हे प्रभावी साधन आहे. लोकशाहीमध्ये सार्वजनिक जीवनात वृत्तपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्रे लोकशाहीत समाजाचे परिवर्तन आणि लोकमताची जडण–घडण करतात.

'तरूण भारत' वृत्तपत्राचा उदय व विस्तार हा कर्नाटकातील बेळगाव या शहरामध्ये झाला. वृत्तपत्र हे समाजाचा आरसा असतो. प्रचलित सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय विषयांच्या संदर्भात उपयुक्त, बोधप्रद आणि विचार प्रवर्तक लेखन प्रकाशित करून सामाजिक प्रबोधन करणे, ज्ञानाचा प्रसार करणे व त्या द्वारा देश हिताचे विचार जागृत करणे हे वृत्तपत्रांचे महत्वूपर्ण कार्य आहे. वृत्तपत्रांमुळे सामाजिक जागृती होऊन महाराष्ट्र हा पुरोगामी विचाराकडे वळलेला आहे. वृत्तपत्रांच्या या कार्यामुळे स्वातंत्र्योतर काळात लोकशाही दृढ व बळकट करून ग्रामीण व शहरी भागातील लोकांना जागृत व कार्यरत ठेवले आहे. समाजाची सर्वांगीण प्रगती साधण्याचा प्रयत्न या वृत्तपत्राच्या कार्यातून झाल्याचे स्पष्ट होते.

दैनंदिन व्यवहारातील घटना दररोज बातम्यांच्या स्वरूपात प्रसिध्द करणाऱ्या पत्राला 'वर्तमानपत्र' किंवा 'बातमीपत्र' असे संबोधण्यात येते. या सर्व पत्र प्रकारांना उद्देशून 'दैनिक' हा शब्द प्रयोग रूढ झालेला आहे. बाबुराव ठाकुर यांच्या वृत्तपत्र कार्याचा आढावा घेण्यापूर्वी वृत्तपत्राचा उदय, भारतीय वृत्तपत्राच्या प्रगतीची वाटचाल, तसेच सीमा भागातील मराठी वृत्तपत्रांचा उदय, विकास बेळगाव शहरातील मराठी वृत्तपत्रे व 'तरूण भारत'या वृत्तपत्रांची स्थापना, संपादक बाबुराव ठाकुर यांचे पूर्वायुष्य व त्याच्या व्यक्तिमत्वाची जडण– घडण इत्यादी मुद्यांची चर्चा या प्रकरणात केली आहे.

१.२ विषय प्रवेश

सामाजिक जडणघडणीमध्ये वृत्तपत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. वृत्तपत्र हे समाजाचे दर्शन असते. समाजातील आंतरक्रियांचे यथार्थ प्रतिबिंब वृत्तपत्रामध्ये उमटते. जॉर्ज बर्नाड शॉ यांनी वृत्तपत्रांना 'गरिबांचे विद्यापीठ' म्हटले आहे. भारतीय सामाजिक सुधारणांची चळवळ,

स्वातंत्र्य आंदोलन व भारताची पुनर्रचना या तिन्ही पर्वात भारतीय वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय व्यवस्था यांच्यावर भारतातील वृत्तपत्रांनी नियंत्रण ठेवलेले आहे. अशा एखाद्या वृत्तपत्राच्या वाटचालीचा अभ्यास केल्याने तात्कालीन समाजातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घडामोडींचा परिचय होतो. वृत्तपत्र ही समाज जीवनाच्या वाटचालीतील घटना व घडामोडींचा साक्षीदार असते. किंबहुना समाजाला मार्गदर्शन करून दिशा देण्याचे काम वृत्तपत्र करत असते. त्या अनुषंगाने 'तरूण भारत' बेळगांव या वृत्तपत्राच्या कार्याचा मागोवा घ्यावा, या दृष्टिकोनातून हा अभ्यास केला आहे.

१.३ संशोधन विषयाचे नांव

"दै. 'तरूण भारत'(बेळगाव)चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान" (१९१९ ते १९८०)

१.४ विषयाची निवड

आधुनिक सामाजिक जीवनाचे एक प्रभावी अंग म्हणून वृत्तपत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्र हे रोजच्या बातम्या, लोकमत घडवणे, प्रबोधन करणे व समाजाचे नेतृत्त्व करणे. समाजाचे प्रबोधन करणे व शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे. अशी विविध प्रकारच्या भूमिका वृत्तपत्र सांभाळत असते. दै. 'तरूण भारत' हे सुरूवातीपासून जिल्हा पत्र होते. या वृत्तपत्राचे संस्थापक संपादक बाबुराव ठाकुर यांनी स्वातंत्र्य प्राप्तीच्या लढयात सहभागी होऊन ब्रिटिशांच्या विरोधात लढा दिला. त्यांना अनेक वेळा तुरूंगवास सहन करावा लागला. दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने बेळगाव भागात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. तसेच या वृत्तपत्राने काँग्रेस पक्षाचे मुखपत्र म्हणून सुरूवातीपासून कार्य केले आहे. सीमा भागात या वृत्तपत्रांने मराठी वृत्तपत्र सृष्टीच्या जडणघडणीत वेगळा आदर्श निर्माण केला आहे. संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढयांच्या चळवळीत या वृत्तपत्रांने फार मोठे योगदान दिले आहे. आजही हे वृत्तपत्र मराठी माणसाच्या व्यथा मोठया पोट तिडकीने मांडताना दिसत आहे. सीमा प्रश्न जीवंत ठेवण्याचे कार्य या वृत्तपत्राने केले आहे. दै.'तरूण भारत'ने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घडामोडींमध्ये सहभागी होऊन या विभागाच्या विकासाला दिशा देण्याचे कार्य केले. तसेच या वृत्तपत्राने महाराष्ट्र–कर्नाटक सीमेवर मराठी वृत्तपत्र सृष्टीची नवीन परंपरा निर्माण केली. येथील

मराठी जनतेचा विकास व वाटचालीमध्ये दै. 'तरूण भारत' चे महत्त्वपूर्ण योगदान आहे. याचा परिचय जनतेला व्हावी, या हेतूने या विषयाची निवड केली आहे.

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१. दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा व वाटचालीचा आढावा घेणे.

२. दै. 'तरूण भारत' चे संस्थापक, संपादक बाबुराव ठाकुर यांच्या पत्रकारितेचा व कार्याचा आढावा घेणे.

३. दै. 'तरूण भारत' चे कार्य समाजातील विविध घटकासाठी होते हे अभ्यासणे.

४. दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने स्वातंत्र्यपूर्व व स्वांतत्र्योत्तर चळवळीतील भूमिका अभ्यासणे.

५. दै. 'तरूण भारत' च्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेणे.

६. महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातील सीमा भागातील जनतेच्या विकासातील दै. 'तरूण भारत' चे योगदान अभ्यासणे.

१.६ संशोधनाची व्याप्ती–

सदर प्रबंध विषयाची व्याप्ती ही बेळगाव व जिल्हा (कर्नाटक) मर्यादीत आहे. या वृत्तपत्रांने सन १९१९ ते १९८० या कालावधीत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य केले आहे. त्याचा आढावा या प्रबंधातून घेतलेला आहे. हा आढावा घेत असताना वरील कालखंडातील दै. 'तरूण भारत' च्या अंकांचा चिकित्सक अभ्यास करून त्याच्या कार्याच्या विविध पैलूंवर व वाटचालीवर प्रकाश टाकणे, तसेच संपादक ठाकुर यांच्या जीवन कार्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

१.७ संशोधनाच्या मर्यादा

संशोधन विषय हा बेळगाव शहर व जिल्हयापुरता मर्यादित असला तरी संपूर्ण भारत देशात घडणाऱ्या घडामोडीचा परिणाम या वृत्तपत्रातून मांडलेला आहे. त्यामुळे या विषयाची मर्यादा केवळ बेळगाव पुरतीच मर्यादित असली, तरी त्याचा संबंध ज्या ज्या प्रदेशांशी तसेच जिल्हयाशी आलेला आहे. त्याचाही उल्लेख यामध्ये करणे गरजेचे आहे. राजकीय परिस्थिती पाहत असताना देशाच्या राजकारणाचा बेळगाव व परिसरावर काय परिणाम होत होता. याची

माहिती यामध्ये प्रामुख्याने घेतल्याशिवाय या वृत्तपत्राचे कार्य पूर्ण होणार नाही. त्याचप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टीने माहिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणूनच या विषयाची व्याप्ती जरी वाढत असली तरी जास्तीत जास्त बेळगाव परिसरावर होणाऱ्या घटनांचा तपशिल या विषयांतून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या वृत्तपत्राचे संस्थापक, संपादक बाबुराव ठाकुर यांच्या काळात(सन १९१९ ते १९७९) घडलेल्या घटनांचा दैनिक 'तरूण भारत' यामधून जो उहापोह केलेला आहे. त्या काळातील निवडक अंकाचा चिकित्सक वाचनातून संशोधकाला जो अर्थ समजला तो प्रमाण मानून दैनिक 'तरूण भारत' या वृत्तपत्रांचा अन्वयार्थ या प्रबंधात मांडलेला आहे.

१.८ संशोधनाची गृहितके

प्रा.गुड व हॅट यांनी म्हटले आहे की, गृहितकृत्य म्हणजे असे अनुमान की, जे तंत्र निरीक्षणावर आधारलेले असून त्यामुळे भावी संशोधनाला चालना मिळते.

१) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक परिवर्तनास निश्चित स्वरूपाचे योगदान दिले आहे.

२) शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी व सामान्य जनता ही वृत्तपत्राची केंद्रबिंदू होती.

३) दै. 'तरूण भारत'चे संस्थापक व संपादक बाबुराव ठाकुर हे लढवय्ये संपादक असून त्यांचे लिखाण तर्कशुद्ध स्वरूपाचे होते.

४) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश प्रशासनाच्या विरोधात प्रचार करून प्रबोधनाचे फार मोठे कार्य केले आहे.

५) सीमा भागातील मराठी भाषिकावरील अन्यायाविरूद्ध लढा देणारे हे महत्त्वाचे वृत्तपत्र आहे.

६) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने महाराष्ट्र व कर्नाटक सीमा प्रश्न जिवंत ठेवण्याचे कार्य केले.

७) दै. 'तरूण भारत' हे केवळ एक वृत्तपत्र म्हणून नव्हे, तर प्रबोधनाचे व लोकशिक्षणाचे एक साधन आहे.

८) महाराष्ट्र व कर्नाटक या सीमा भागात मराठी वृत्तपत्र सृष्टीची परंपरा उत्तम प्रकारे चालविण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.

१.९ सिंद्धात कल्पना

१) दैनिक 'तरूण भारत' वृत्तपत्रांने सीमा भागातील मराठा भाषिकांसाठी आणि बेळगाव जिल्हा व परिसरासाठी फार मोठे योगदान दिले होते.

२) दैनिक 'तरूण भारत' वृत्तपत्रांने स्वातंत्र्य चळवळ व सीमा लढा या राजकीय कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका मांडल्या होत्या.

३) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले.

४) दै. 'तरूण भारत' वृत्तपत्राच्या कार्यास जनतेने पाठिंबा दिलेला असल्यानेच सर्व क्षेत्रात त्यास यश मिळाले.

५) दै. 'तरूण भारत' वृत्तपत्र हे प्रबोधन व लोकशिक्षणाचे प्रभावी साधन होते. या वृत्तपत्राने सीमा प्रश्नाचे मोठे गांभिर्यं ओळखण्याचे कार्यं केले आहे.

१.१० संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन

'तरूण भारत' वृत्तपत्र या विषयावर संशोधकांनी मांडलेल्या भूमिका व झालेला अभ्यास त्यातून जाणवलेल्या त्रुटी व आवश्यकता पुढीलप्रमाणे सांगता येईल. बाबुराव ठाकुर यांची कन्या प्रिया प्रभु यांनी 'समरांगण हे जीवन ज्यांचे', प्रकाशन किरण ठाकुर, तरूण भारत प्रेस, समादेवी गल्ली, बेळगाव, प्रथमावृत्ती, १९७५, हे बाबुराव ठाकुर यांचे चरित्र असून विशेष म्हणजे ते बाबुराव ठाकुर यांच्या हयातीत लिहिले आहे. त्यामध्ये त्यांच्या जीवन चरित्रावर भर दिलेला आहे, त्याचबरोबर Dapake N. J "Baburao Thakur (1919-1980) Freedom Fighter And Journalist Of Belgaum (Karnataka)" हा प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सादर करून सन १९९० मध्ये इतिहास विषयातून एम. फिल. ची पदवी मिळविलेली आहे. या प्रबंधामध्ये बाबुराव ठाकुर यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यामुळे हे संशोधनाचे कार्य बाबुराव ठाकुर या व्यक्तीपुरतेच मर्यादित आहे, साळुंखे संजय गुंडाप्पा यांनी बाबुराव ठाकुर यांची पत्रकारिता या विषयावर संशोधन करून शिवाजी विद्यापीठाच्या मास्टर ऑफ जर्न्यालिझम अँड कम्युनिकेशन सायन्स (एम.जे.सी.)या पदवीसाठी लघुशोध प्रबंध सादर केलेला आहे. या प्रबंधात संशोधकाने पत्रकारितेच्या चौकटीत हा विषय हाताळलेला आहे. बाबुराव ठाकुर यांच्या पत्रकारितेचा अभ्यास करून त्यांनी मराठी वृत्तपत्र

सृष्टीस दिलेल्या योगदान व त्याची पत्रकारिता, नवीन पत्रकार व वृत्तपत्र व्यावसायिकाला मार्गदर्शक व आदर्श कशी ठरू शकेल. याची मांडणी केली आहे. काही मोजक्या अग्रलेखांचा ऊहापोह या प्रबंधात केलेला आहे. या प्रबंधामध्ये स्वातंत्र्य पूर्वकाळातील भूमिका व स्वातंत्र्य चळवळीतील निर्णायक भूमिका आणि वाटचालीचा वेध घेतलेला नाही. याशिवाय महात्मा गांधीजीची हत्या आणि उद्‌वलेली परिस्थीती, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वाद, गोवा मुक्ती आंदोलन, स्थानिक प्रशासन, नगरपालिका, लोकसभा, विधानसभा, सहकार जनआंदोलन, शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक चाली–रिती व प्रथा अशा अनेक प्रश्न या प्रबंधात मांडलेले नाहीत.

प्रा.पाटील विष्णू यांनी 'राष्ट्रवीर वृत्तपत्रांचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्य(सन १९२१ ते १९७७)' हा शोधप्रबंध पीएच.डी.साठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन २०११ मध्ये सादर केलेला आहे. या प्रबंधामध्ये 'राष्ट्रवीर' वृत्तपत्राने समाजाच्या हितासाठी केलेल्या कार्याची माहिती दिलेली आहे. कोल्हापूर जिल्हयाचे शेकाप खासदार भाई दाजीबा देसाई, व्यक्ती व कार्य या विषयावर संशोधकाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र, मुक्त विद्यापीठ नाशिक येथे सन २०११ मध्ये एम.फिल. पदवीसाठी सादर केला आहे. या विषयाच्या अनुषंगाने मला बेळगाव विभागातील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक घडामोडीचा बोध झाला आहे. डॉ.शिंदे एस.पी. यांनी, "Contribution of 'Pudhari' to the Socio-Political Movements In Southern Maharashtra up to 1972" हा विषय घेऊन इतिहास विषयातील एम.फिल पदवी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन १९९३ मध्ये संपादन केली आहे. यामध्ये 'पुढारी' वृत्तपत्राने केलेल्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. व माझ्या प्रबंधातून 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे कार्य सविस्तरपणे दिले गेले आहे. तसेच श्री.जाधव शिवाजी गजेंद्र, 'पद्मश्री, कै. डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता : एक विश्लेषणात्मक अभ्यास' इतिहास विषयातून शिवाजी विद्यापीठ, २००७, पीएच.डी.साठी सादर केलेला आहे. अशाप्रकारे वृत्तपत्रावर संशोधन झाले असले तरी, दै. 'तरूण भारत'(बेळगाव)चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान(१९१९ ते १९८०) या विषयातून या वृत्तपत्राच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे.

१.११ संशोधन पद्धती

इतिहास संशोधन पद्धतीनुसार सदर विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विषयाची निवड, कागदपत्राचे संघटन, वर्गीकरण, मूल्यमापन व स्पष्टीकरण या सर्व प्रक्रियेतून हे संशोधन पूर्ण झाले आहे. प्राथमिक साधनांचा पुरेपूर वापर करून संशोधन केले आहे. परंतु ज्या घटनांचा उलगडा करताना जेथे प्राथमिक साधने उपलब्ध नाहीत. तेथे दुय्यम साधनांचा आधार घेऊन संशोधनात सत्यता व वस्तूनिष्ठता राखण्याचा पुरेपुर प्रयत्न केला आहे.

दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदानाबाबत अभ्यास करताना सन १९१९ ते १९८० या काळातील दै. 'तरूण भारत' चे अंक अभ्यासून एकंदरीत या वृत्तपत्रांनी वेगवेगळया परिस्थितीत बजावलेल्या भूमिकेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यावरून स्वातंत्र्य चळवळीच्या काळात बेळगाव विभागातील नव्याने प्राप्त झालेली माहिती यांची सुसंगत मांडणी करून नवा आशय व अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. व्यावहारिक जीवना संबंधित विषय आणि समस्याबाबत यथार्थ ज्ञान मिळविण्यासाठी व्यावहारिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

१.१२ संदर्भ साधने

"दै. 'तरूण भारत'(बेळगाव) चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान(१९१९ ते १९८०)" या विषयावर संशोधन करण्यासाठी इतिहास संशोधन पद्धतीनुसार प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून संशोधनाचे कार्य पूर्ण केले आहे.

१) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या स्थापनेपासून ते संस्थापक संपादक बाबुराव ठाकुर यांच्या मृत्यूपर्यतचे दै. 'तरूण भारत' वृत्तपत्राचे अंक.

२) मासिक 'तरूण भारत' १९१९ ते १९२४,

३) साप्ताहिक 'तरूण भारत' १९२८ ते १९४४,

४) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' १९४४ ते १९६६,

५) ५ जुलै १९६६ पासूनचे दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे संपादित झालेले अंक

६) बेळगाव स्थानिक वृत्तपत्रे, मासिके, दैनदिनी, स्मरणिका,

७) विविध संस्थाचे वार्षिक अहवाल,

८) बाबुराव ठाकुर यांच्यावरील लेख व पुस्तके,

९) स्मरणिका

१०) गॅझेटियर(महाराष्ट्र, बेळगाव)

१.१३ प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व

वृत्तपत्रे ही मोठी सामाजिक शक्ती आहे. जनहित आणि जनतेचे स्वातंत्र्य यांची जणू ती रखवालदारच असतात. अशा या वृत्तपत्रात राजकारण, समाजकारण व अर्थकारण इत्यादी क्षेत्रात घडलेल्या घाटकांची नोंद असते. लोकमताचे नेतृत्त्व करणे, प्रबोधन करणे, शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टासाठी कार्यरत असणारी ही वृत्तपत्र संस्था असते. अशा विविध उद्देश्याने स्थापन झालेले जिल्हापत्र 'तरूण भारत' बेळगाव हे वृत्तपत्र होय. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या उभारणीमध्ये बाबुराव ठाकुर यांचे योगदान लक्षात घेण्यासाठी त्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबुराव ठाकुर यांनी दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक सीमा भागात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात पत्रकारितेच्या माध्यमातून प्रवेश केला. सर्व स्तरातील जनतेचे प्रश्न मांडले व सोडविण्याचा प्रयत्न केला. पत्रकारिता करत असताना कोणत्या भूमिकेतून त्यांनी वृत्तपत्र चालवले. संपादक म्हणून त्यांनी केलेले कार्य तपासून पहाणे महत्त्वाचे ठरले आहे. सीमा भागातील मराठी वृत्तपत्रामध्ये दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे आजचे स्थान महत्त्वाचे आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य या वृत्तपत्रांनी केले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढा, सीमा प्रश्न, गोवा मुक्ती चळवळ, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यासाठी दै. 'तरूण भारत' चा कुशलतेने वापर केला आहे. सीमा प्रश्न बाबुराव ठाकुर यांच्या व्यक्तिमत्त्वाची बाजू होती. ते धडाडीचे पत्रकार संपादक होते. सामाजिक उपक्रमामध्ये त्यांचा सहभाग होता. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना भिडणारे बातमीपत्र म्हणून वृत्तपत्र प्रसिद्धीस आणले.

दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या कार्यामुळे दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक सीमा भागात पत्रकारितेच्या क्षेत्रात या वृत्तपत्राचे योगदान आहे. आजच्या व्यावसायिक वृत्तपत्र युगात तरूण पत्रकारितेच्या क्षेत्रात या वृत्तपत्राचे स्थान आणि महत्त्व वेगळे आहे. नव्या पिढीला, वृत्तपत्र व्यावसायिकांना, शिक्षण सम्राटाना, राजकीय पक्ष नेतृत्त्वांना, सामाजिक कार्यकर्त्यांना दिशा निर्देशन ठरणारे आहे.

१.१४ प्रस्तुत प्रंबधाचे प्रकरणानुसार स्वरूप

"दै. 'तरूण भारत' (बेळगाव) चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान (१९१९ ते १९८०)" या विषयावरील संशोधन हे सहा प्रकरणात विभागलेले आहे.

प्रकरण पहिले

दै. 'तरूण भारत' ची पार्श्वभूमी

या प्रकरणात विषय प्रवेश, संशोधन विषयाचे नांव, विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाची गृहितके, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, सिंद्धात कल्पना, संशोधन पद्धती, संदर्भ साधने, प्रस्तुत अभ्यासाचे महत्त्व व प्रस्तुत प्रंबधाचे प्रकरणानुसार स्वरूप इत्यादी संशोधन वाटचालीचे मुद्दे दिलेले आहेत.

याशिवाय याच प्रकरणात बाबुराव ठाकुर यांच्या वृत्तपत्रीय कार्याचा आढावा घेण्यापूर्वी वृत्तपत्राचा उदय, भारतीय वृत्तपत्रांच्या विकासाची वाटचाल, मराठी वृत्तपत्रांचा विकास, सीमा भागातील वृत्तपत्रांचा उदय व विकास, बेळगाव शहरातील मराठी वृत्तपत्रांचा इतिहास व वाटचाल, बेळगाव येथे 'तरूण भारत' वृत्तपत्राची स्थापना, उद्देश, विकासाचे टप्पे तसेच संस्थापक संपादक बाबुराव ठाकुर यांचे पुर्वायुष्य व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण इत्यादी बाबीची चर्चा या प्रकरणात केली आहे.

प्रकरण दुसरे

दै. 'तरूण भारत' चे सामाजिक कार्य

दै. 'तरूण भारत' वृत्तपत्र हे सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी झगडणारे आहे. स्वातंत्र्य पूर्वकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य जनता व त्यांचे प्रश्न केंद्रबिंदू मानून त्याच्या उचित न्याय हक्कासाठी या वृत्तपत्रांने विपूल प्रमाणात लेखन केले आहे. वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून प्रशासनाच्या विरोधात मोर्चे बांधणी करुन सरकार, व प्रशासनाला ताळ्यावर आणले आहे. या वृत्तपत्राच्या सामाजिक कार्याचे अभ्यासाच्या सोयीसाठी दोन भाग पाडले आहेत. ते म्हणजे नागरी कार्य व सामाजिक कार्य हे होत. नागरी कार्यात आरोग्य, स्वच्छता, पाण्याचा प्रश्न, रस्ते, दिवाबत्ती, सांडपाणी व्यवस्थापन, शहर व ग्रामीण भागातील अंतर्गत सुधारणा, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ, शेतीपरिषदा व प्रदर्शने, पशुसवंर्धन, सामाजिक चळवळी, कामगार प्रश्न व चळवळी, संप हरताळ, सहकार, स्थानिक प्रशासन इत्यार्दींची माहिती घेतलेली आहे.

सामाजिक कार्यात अंधश्रद्धा, अस्पृश्यता निर्मूलन, जातीय सलोखा, मंदिर प्रवेश चळवळ, त्याचबरोबर यात्रा, सण व उत्सव यातील समाज विघातक चाली–रिती, स्त्री विषयक भूमिका, महागाई, भ्रष्टाचार, बेकारी, मद्यपान निषेध, कोर्ट कचेरी, पोलिस यंत्रणा इत्यादी सामाजिक प्रश्नाबाबत या वृत्तपत्राची भूमिका स्पष्ट केलेली आहे.

प्रकरण तिसरे

दै. 'तरूण भारत' चे राजकीय कार्य

या प्रकरणात दोन भाग पाडले आहेत. दै. 'तरूण भारत' वृत्तपत्राचे सन १९१९ ते १९४७ या काळातील राजकीय कार्य व दुसऱ्या विभागात सन १९४८ ते १९८० या काळातील कार्य.

पहिल्या विभागात सन १९१९ ते १९४७ या दरम्यानच्या काळातील कार्यामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळ तीव्र होत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिले महायुद्ध ओसरले होते. अशा वेळी जून १९१९ मध्ये बेळगाव शहरात मराठी भाषिकांचे 'तरूण भारत' मासिक सुरू झाले. विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करणे व देश विधायक कार्यात सहभागी करून घेणे. या मासिकाचा मुख्य उद्देश असले तरी महात्मा गांधीजींच्या विचार प्रेरणेचा प्रभाव बाबुराव ठाकुर यांच्यावर झाला. पुढील राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात हे मासिक काँग्रेसचे या भागातील प्रचार पत्रक म्हणून पुढे आले.

दुसऱ्या विभागात सन १९४८ ते १९८० या काळातील माहिती मिळते. महात्मा गांधीजींच्या हत्येमुळे निर्माण झालेला बेळगाव परिसरातील सामाजिक उद्रेक, यावेळी तरूण भारत वृत्तपत्राने निभावलेली महत्त्वपूर्ण भूमिका, राज्य पुनर्रचनेमुळे निर्माण झालेला महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद व त्या संदर्भात करावी लागणारी जन आंदोलने याबाबत घेतलेली भूमिका, सयुंक्त महाराष्ट्र एकीकरण चळवळ, गोवा मुक्ती लढा, सार्वजनिक निवडणूका, स्थानिक व नगरपालिका प्रशासन व निवडणूका, भारत देशाचे आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादी घटकांच्याबाबत 'तरूण भारत' वृत्तपत्रांने स्वीकारलेली भूमिका या प्रकरणात मांडलेली आहे.

प्रकरण चौथे

दै. 'तरूण भारत' चे शैक्षणिक कार्य

या प्रकरणात शैक्षणिक विकासाच्या दृष्टिकोनातून तरूण भारत या वृत्तपत्राचे बेळगाव विभागासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे. तरूण भारतचे संपादक बाबुराव ठाकुर यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून खेडया–पाडयातील बहुजन जनतेला शिक्षणाबाबत जागृत केले. या कामासाठी वृत्तपत्राचा उपयोग महत्त्वपूर्ण ठरला. प्रौढशिक्षण, प्राथमिक, माध्यमिक, उच्चशिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षण या शिक्षण व्यवस्थेसाठी बाबुराव ठाकुर यांनी सुरूवातीपासूनच हे कार्य सुरू केले होते. या त्यांच्या उल्लेखनिय कामगिरीमुळे या भागात शिक्षणाचा प्रसार झाला. अनेक अडचणीवर मात करून हे शिक्षण खेडोपाडी, डोंगर वस्त्यावर पोहचविणे शक्य झाले. बेळगाव परिसरातील बहुजन मराठा समाजाला शिक्षणविषयक योग्य दिशा देण्याचे काम 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून केला आहे. याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

प्रकरण पाचवे

दै. 'तरूण भारत' चे सांस्कृतिक कार्य

या प्रकरणात बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून या विभागातील लोकांची न्याय गाऱ्हाणी सर्वासमोर मांडली. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक अन्यायाविरूद्ध लढा दिला. समाजातील सांस्कृतिक देवाणघेवाण, त्याचबरोबर धर्म, रिती–रिवाज, आध्यात्मिक भाव, नीती, कायदा, विद्या, कला प्राविण्य, व्याख्याने, लेखन, वाङ्मय इत्यादी. मानवी सद्गुण विवेकी घटकांचा या विभागावर चांगला संस्कार व्हावा या विचाराने तरूण भारत वृत्तपत्राने प्रसिद्धी दिली आहे. अशा व्यक्तिच्या कार्याचा या प्रकरणात आढावा घेतलेला आहे.

प्रकरण पाचवे

उपसंहार

या प्रकरणात सर्व प्रकरणाचा निष्कर्ष मांडलेला आहे. यामध्ये भारतीय स्वातंत्र्य युद्धात भारतीय वृत्तपत्रांनी गौरवशाली भूमिका बजावली आहे. जनमत निर्माण करण्याचे अत्यंत प्रभावी अस्त्र, वृत्तपत्रांच्या रूपाने भारतीय नेत्यांच्या हाती मिळाले आहे. यामुळे राष्ट्रीय भावना तीव्र करण्यास उपयोग झाला. त्यामुळे दै. 'तरूण भारत' वृत्तपत्रांची स्थापना झाली. ती तरूण

वर्गाला मार्गदर्शन करणे, समाज सुधारणेच्या वाटचालीची दिशा दाखविणे हा हेतू सामाजिक जागृती व शिक्षण प्रसाराशिवाय देशाचा उद्धार होणार नाही, हे जाणून घेऊन बाबुराव ठाकुर यांनी समाजाच्या निकोप वाढीसाठी व राष्ट्राच्या उन्नतीसाठी 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून तरूण पिढीला प्रवृत्त केले. या आदर्शवादी ध्येयवादी विचारातून मासिकाने सुरूवातीच्या काळात तरूण विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन केले. देश विधायक कार्यात त्यांना सहभागी करून घेतले. देशातंर्गत घडामोडी, स्वातंत्र्य चळवळीची दिशा, राष्ट्रप्रेम (भक्ति) अशा प्रकारच्या वेगवेगळया वैचारिक लेखांच्या माध्यमातून 'तरूण भारत' या मासिकाने समाजात जागृती निर्माण केली. राज्य पुनर्रचनेमुळे निर्माण झालेल्या महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादाचा आणि त्या संदर्भात कराव्या लागलेल्या आंदोलनाचा, संस्थाने विलीनीकरण, गोवा मुक्तीचा लढा, सार्वजनिक निवडणूका, बेळगाव नगरपालिका कारभार इत्यादी प्रश्नासाठी हे वृत्तपत्र अग्रस्थानी होते. या विभागातील बहुजनांना स्वातंत्र्य लढयात सहभागी करून घेण्यासाठी म्हणून वेगवेगळया अग्रलेखातून देशभक्तीची व राष्ट्रप्रेमाचे संदेश दिले. काँग्रेस पक्ष व महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य लढयात या पत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महात्मा गांधीजींच्याबाबत असणारी आदरयुक्त भक्ती प्रत्येक लेखात जाणवते. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जाती व वर्गाला समतेच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची समाजासमोर चर्चा करून न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने 'तरूण भारत' ने लेखन अधिकार वापरले आहेत. शेतकरी परिषदा, व्यापारी लोकांची अधिवेशने, लमाणी समाजाचा मेळावा, मराठी समाजाची परिषद, धनगर लोकांचे प्रश्न, महिला मंडळांची स्थापना व संघटना अशा समाजातील विखुरलेल्या व असंघटीत घटकांची संघटना उभी करून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची चर्चा करून दाद मागण्यासाठी कायम प्रयत्न केले. त्यामुळे तळागाळाचा समाज 'तरूण भारत' या वृत्तपत्राकडे अत्यंत जिव्हाळयाने पाहत असे. 'तरूण भारत' चे संस्थापक व संपादक बाबुराव ठाकुर यांच्या समतोल राजकीय दृष्टिकोनामुळे या वृत्तपत्राचे लेख हे वास्तववादी म्हणूनच ऐतिहासिक दृष्टया अधिक उपयुक्त ठरले आहेत. या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबुराव ठाकुर यांनी सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून दिले व पत्रकारितेची ताकद दाखवून दिली.

व्यावसायिक शिक्षणाबाबतचे लेखही आपल्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करून तांत्रिक व औद्योगिक व व्यावसायिक शिक्षणाचे धडे देऊन तरूण पिढीला उत्साह व उमेद वाढविण्याचे मार्गदर्शन केले आहे. मराठा समाजातील तरूणांना व्यवसायाकडे वळविण्याचा सल्ला दिला आहे. वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम कसे असू शकते याचा उत्तम नमुना, बाबुरावांनी जनतेसमोर ठेवला आहे. एखाद्या कठीण प्रसंगी पत्रकार दिर्घकाळ जनतेचे नेतृत्त्व करू शकतो. ही भारतीय वृत्तपत्रांची परंपरा त्यांनी राखली आहे. पत्रकारितेबाबत आपले विचार व्यक्त करताना बाबुराव ठाकुर म्हणतात, 'लोकांची न्याय गाऱ्हाणी मांड्यासाठी, सामाजिक, आर्थिक व धार्मिक अन्यायाविरूद्ध झगडा देण्यासाठी व समाजातील चाली–रिती, रूढी, परंपरा त्याचबरोबर सांस्कृतिक दृष्टया समाजाला दक्ष ठेवण्यासाठी पत्रकारांनी निर्भयपणे पुढे यायला हवे, वृत्तपत्रांनी कंबर कसायला हवी आहे. सामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्कावर गदा आली तर यांच्या रक्षणासाठी पत्रकारांनी पुढे येऊन सत्य लेखन केले पाहिजे. व समाजावर चांगले संस्कार होतील याकडेही लक्ष दिले पाहिजे.' हे विचार त्यांनी सन १९५० च्या बेळगाव येथील मराठी पत्रकार परिषदेत स्वागताध्यक्ष या नात्याने मांडले होते. या त्यांच्या विचारातून पत्रकारितेबाबतची भूमिका व तळमळ स्पष्ट होते.

१.१५ बेळगावचा पूर्व इतिहास –

बेळगाव सर्वार्थाने प्रसिध्द असलेले शहर, प्राचीन काळापासून या शहराचा उज्ज्वल परंपरेचा वारसा अधिकाधिक वृध्दिंगत होत आलेला आहे. अखिल भारतीय स्वरूपाच्या अनेक सभा, संमेलनांचे हे उगमस्थान म्हणून प्रसिध्द आहे. सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादी विविध कार्यांचा वारसा या शहरास मिळाला आहे.

१.१६ बेळगावची भौगोलिक परिस्थिती –

बेळगाव शहर हे आज कर्नाटक राज्यातील जिल्हयाचे व प्रशासकीय विभागाचे प्रमुख ठिकाण आहे. हे शहर मार्कंडेय नदीच्या किनाऱ्यावर, समुद्र सपाटीपासून २५०० फुट (७६२ मीटर) उंचीवर पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर वसले आहे. या शहराचे जगाच्या नकाशावरील स्थान १५° ५२ उत्तर अंक्षास व ७४°३० पूर्व रेखांश असे आहे.[१] बेळगाव जिल्हयातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७८४.७ मिमी आहे. पावसाचे प्रमाण ६० ते ७० इंचापर्यंत असून येथील हवा समशीतोष्ण आहे.[२]

बेळगाव जिल्हयात १२७८ खेडी असून जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १३,४१५ चौरस कि. मी. आहे. २००१ च्या जनगणनेनुसार बेळगाव शहराची लोकसंख्या लष्कर छावणी (कॅटोन्मेंट बोर्ड)सह ४,२३,१७८ आहे.[३] या शहरातील प्रमुख भाषा मराठी असून महानगरपालिकेचे कामकाज व बाजारपेठांतील व्यवहार याच भाषेतून चालतात.[४] कन्नड व कोकणी भाषादेखील बोलल्या जातात. शहरात मराठी माध्यमाच्या शाळा बहुसंख्य असून महाराष्ट्रीय मंडळींनी आपली मराठी अस्मिता जपली आहे.[५] हे शहर मोठे व्यापारी केंद्र आहे. या शहरात अनेक महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. अनेक छोटे–मोठे उद्योग आहेत. शहरातील मुख्य बाजारपेठा कृषी उत्पन्नासाठी प्रसिध्द आहे. बेळगांवात भारतीय सैन्य दलाची अनेक सैनिकी शिक्षण केंद्रे व भारतीय हवाई दलाचे तळ व कमांडो स्कूल आहे. मराठी लाइट इंन्फट्री रेजिमेंटचे मुख्यालय येथेच आहे.[६]

१.१७ बेळगावची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

उपलब्ध कागद पत्रावरून अतिप्राचीन काळापासून बेळगावची ऐतिहासिक माहिती मिळू शकते. इ.स.पू. २२५ मध्ये जक्कादेवाचे या विभागात राज्य निर्माण झाले. या राजाने बेळगाव येथे मातीचा किल्ला बांधला. त्याचे माधवपूर वडगांव येथे अवशेष सापडतात.[७] बेळगांव हे प्राचीन काळापासून मराठयांच्या ताब्यात होते. चालुक्य, राष्ट्रकुट, कदंबाकडून महारट्टाकडे आले. इ.स. १२०४ मध्ये महारट्टानी बेळगावचा भक्कम किल्ला बांधला. त्यानंतर १२५० ते १३२० या काळात हे ठिकाण देवगिरीच्या यादवांच्याकडे आले. त्यांच्याकडून घेऊन कर्णराज याने १४५० ते १४९५ या काळामध्ये (स्वतंत्र मराठी राजे) राज्य केले.[८]

इ.स. १४७४ मध्ये बहामनी सेनापती महंमद गवान याने बेळगांव काबीज केले. त्यानंतर मराठी सत्ता प्रस्तापित झाली. पुढे ब्रिटिशांनी इ.स. १८१८ मध्ये या शहरासह आपल्या साम्राज्यात समाविष्ट केले.[९]

१.१८ नावाचा उगम–

बेळगावचे प्राचीन संस्कृत नाव वेलुग्राम किंवा वेणुग्राम असा शिलाहारकालीन साधनामध्ये उल्लेख सापडतो. वेणु म्हणजे बांबुचे जंगल, इंग्रजीत बेळगावांस Belgaum असे संबोधतात. कर्नाटक सरकारने बेळगावचे बेळगावी असे नामांतर केल्याचे जाहीर केले होते. परंतु केंद्र सरकारने या नामांतरास नकार दिला आहे.[१०]

१.१९ राजकीय इतिहास–

स्वातंत्र्य आंदोलनाबाबत बेळगावचा इतिहास प्रसिध्द आहे. १९०५ पासून लोकमान्य टिळकांचे अनुयायी या भागातून मोठया प्रमाणात होते. २६ नोव्हेंबर १९०७ रोजी टिळकांनी बेळगावला भेट देऊन क्रांतिकारकाना योग्य सल्ला दिला.[११] टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधीजींच्याकडे देशाचे राजकीय नेतृत्व आले. सन १९२४ ला भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसचे ३९ वे अधिवेशन महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली बेळगांव येथे भरल होते. तेंव्हा पासून बेळगाव भागातील जनता महात्मा गांधीजींच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या सर्व लढयात सक्रिय सहभागी होती. ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी बेळगांव भाग हा मुंबई इलाख्यात सहभागी केला होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर हा प्रांत सन १९५६ च्या राज्य पुननिर्मिती आयोगाने अन्यायकारकरीत्या म्हैसूर राज्याला (कर्नाटक) जोडला. तेंव्हापासून महाराष्ट्र व कर्नाटक राज्यामध्ये बेळगांव व मराठी भाषिक प्रदेशा बाबत वाद सुरू आहे. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोवा मुक्त करण्यासाठी बेळगाव वाशियानी मोठे असे सहकार्य केले. सत्याग्रही तुकडयाच्या तुकडया गोव्यात दाखल केल्या व पोर्तुगिजाना गोवा मुक्त करण्यात भाग पाडले.[१२]

१.२० दैनिक तरूण भारतची पार्श्वभूमी

वृत्तपत्रे लोकशाही समाजाचे परिवर्तन आणि लोकमत यांची जडण–घडण करतात. वृत्तपत्रे ही मोठी सामाजिक शक्ती आहे. पाश्चात्य देशात त्याचा उल्लेख fourth estate of the Kingdom असा केला आहे. समाज मनावर आपल्या विचारांचे संस्कार रूजविण्याचे व घडविण्याचे प्रयत्न करतात. हे त्यांचे मुख्य वैशिष्टये आहे.[१३] मराठीतील वृत्तपत्र किंवा बातमीपत्र हा शब्द प्रयोग इंग्रजीतील News Paper यापासून तयार झाला आहे. दैनंदिन व्यवहारातील घटना दररोज बातम्यांच्या स्वरूपात प्रसिध्द करणाऱ्या पत्राला 'वर्तमानपत्र' किंवा 'बातमीपत्र' असे संबोधण्यात येते. या सर्व पत्र प्रकारांना उद्देशून 'दैनिक' हा शब्द प्रयोग रूढ झालेला आहे. अशा या दैनिकात राजकारण, अर्थकारण व समाजकारण इत्यादी क्षेत्रात घडलेल्या घटनांची नोंद असते.[१४] त्यामुळे दैनंदिन व्यवहारात घडणाऱ्या ठळक घटना बातम्यांच्या स्वरूपात ज्यामधून दररोज प्रसिध्द होतात. त्यांना वृत्तपत्र असे म्हणतात.[१५]

मुख्यतः वार्ता, मते, जाहीराती रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले आणि ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे वृत्तपत्र होय.[१६] रोजच्या ताज्या घडामोडींच्या वार्ता देणे, लोकमत घडवणे व प्रभावित करणे तसेच लोकमताचे नेतृत्व करणे, प्रबोधन करणे, शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टांनी आधुनिक नागरी संस्कृतीत विकसित झालेली संस्था असे वृत्तपत्र माध्यमाचे वर्णन केले जाते. स्थानिक, देशांतर्गत आणि जागतिक स्वरूपाच्या विविध बातम्या ताबडतोब प्रसिध्द करणे, हा वृत्तपत्राचा मुख्य हेतू असतो.[१७] भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भारतीय वृत्तपत्रांनी गौरवास्पद भूमिका निभावली आहे. ब्रिटिशांच्या जोखंडातून भारताची सुटका करताना, सर्वसामान्य तळागाळापर्यंत स्वातंत्र्याची प्रखर भूमिका मांडून जनमत निर्माण करण्याचे प्रभावी अस्त्र वृत्तपत्रांच्या रूपात भारतीय नेत्यांच्या हाती मिळाले. त्यांचा पुरेपुर उपयोग करून घेऊन राष्ट्रीय पातळीवर देशाचे भीषण, तीव्र प्रश्न मांडण्याचे व सोडविण्यासाठी वृत्तपत्रांनी उल्लेखनीय अशी भूमिका बजावली उदा. लोकमान्य टिळक (१८५६–१९२०), गोपाळ गणेश आगरकर (१८५६–९५) महात्मा गांधी (१८६९–१९४८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९३–५७) इत्यादी थोर राष्ट्रीय नेत्यांनी आपापल्या कार्य क्षेत्रात वृत्तपत्रीय यश मिळवले.[१८]

१.२१ वृत्तपत्रांचा उदय–

वृत्तपत्रांच्या निर्मितीपूर्वी कित्येक वर्षे मुद्रणकला अस्तित्वात होती. इ. स. ७ व्या शतकापासून चीनमध्ये मुद्रणकला अवगत होवू लागली. शुंग घराण्याच्या पूर्वीही लाकडी अक्षरांचे टाईप पाडण्याची कला प्रचलित असावी, असे अनुमान उपलब्ध साधनावरून करता येते.[१९] मुद्रणकला अस्तित्वात आल्याने वृत्तपत्राची निर्मिती झाली. तरी या कलेमुळे मात्र वृत्तपत्राचा उदय व विस्तार होणे सुलभ बनले. मुद्रण कलेमुळे पत्राचा प्रसार झपाटयाने दुरवर करणे शक्य झाले. छापलेले शब्द संवादाचे महत्त्वाचे साधन बनले.[२०]

१५ व्या शतकात युरोपमध्ये मुद्रण कलेचा उगम झाला, तत्पूर्वी ज्युलियस सीझरच्या अधिपत्या खालील रोमन साम्राज्यात वर्तमानपत्राचा जन्म झालेला दिसतो. सीझर हा रोज हस्तलिखित घोषणा काढायचा. त्याला 'ॲक्टा डायराना' म्हणजे रोजच्या घटना म्हणत. ख्रिस्तपूर्व ५९ मध्ये 'ॲक्टा सिनटॉस' नावाचे हस्तलिखित येऊ लागली. त्यामध्ये सिनेटमधील चर्चेच्या वृत्तांताची हस्तलिखिते लोकांना वाचायला सोयीचे होईल. अशा जागी भिंतीवर

चिकटवली जात.[२१]

युरोपातील मुद्रण कलेच्या विकासामध्ये जॉन गटेनबर्ग यांचा वाटा महत्त्वाचा आहे. त्यांनी काजळी व तेल यांचा शाईसारखा उपयोग करून पितळी साच्याच्या सहाय्याने अक्षरे तयार केली. त्यामुळे वृत्तपत्रांचा संपर्क माध्यमांना चालना मिळाली. हस्तलिखित बातमी पत्राची जागा लवकरच छापलेल्या पत्रांनी घेतली. दुमडलेली चौकोनी हॅन्डबिल असे त्यांचे स्वरूप होते व कारणपरत्वे ते प्रसिध्द केले जात असे. १६ व्या शतकात फ्युगर (Fugger) कुटुंबाने प्रकाशित केलेले बातमीपत्र हे वृत्तपत्र विकासातील महत्वाचा टप्पा मानला जातो.[२२] फ्युगर कुटुंबाचे 'दलाल' हे जगातील बहुतेक भागातील व्यावसायिक व्यापारी हे इतर घटनांचे तपशील एकत्र करून फ्युगर कुटूंबीयांकडे पाठवीत असत. जमा झालेले तपशील एकत्र करून त्यांचे बातमीपत्र तयार केले जाई. हे बातमीपत्र फ्युगर संघटनेच्या सर्व विभागांना माहिती देण्याकरिता वितरित केले जात असे. फ्युगर संघटनेच्या या संकल्पनेचा युरोप व इंग्लडमध्ये प्रसार होऊन इटली, जर्मनी, हंगेरी, स्पेन आणि फ्रान्स या देशांनी आठवडयातून एकदा बातमीपत्र प्रसिध्द करण्यास सुरूवात केली. तत्पुर्वी 'दी टू एन्काऊंटर ऑफ दी बॅटल प्लॉडन फिल्ड' या नावाने इ.स.१५१३ मध्ये वृत्तांत पुस्तिकेच्या रूपात पहिली युध्दकथा प्रसिध्द झाली.[२३] या पुस्तिकेत केवळ व्यापारी व राजकीय बातम्याच नव्हे, तर वर्तमानकालीन घटनांवरील टीका–टिपणीची सुरूवात यामध्ये आढळतात. 'मेक्सिको शहरात छापील स्वरूपात पहिली बातमी १५४१ मध्ये प्रसिध्द झाल्याची नोंद आहे.[२४]

१.२२ वृत्तपत्राच्या निर्मितीपूर्वी भारतातील स्थिती –

वृत्तपत्राची गरज भासावी अशी स्थिती हिंदुस्थानात ब्रिटीश पुर्व काळात नव्हती. वृत्तपत्रांचा उदय होण्यास जे सार्वजनिक जीवन हवे होते, यांचाच येथे अभाव दिसतो. इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानात सुस्थिर होऊ लागल्यावर शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान–विज्ञानाशी परिचय होऊ लागला. त्याच वेळी नव्या राजवटीने जुन्या कल्पना, विचार आचार व समाजरचना बदलण्यास सुरूवात झाली. इंग्रज राजवट स्थिर होण्यापुर्वी या भारतात कुळाची प्रतिष्ठा, जातीची शुध्दता आणि वतनाचा अभिमान अशा मध्ययुगीन कल्पना समाजात मूळ धरून होत्या. समाजसंस्था शाश्वत व ईश्वर निर्मित आहे. अशी हिंदू धर्माची शिकवण असल्याने पूर्ण समाज निष्क्रिय व विकलांग होता. समाज व मानव जात समृध्द करण्यासाठी व्यक्तिगत व्यक्तीवर

जबाबदारी असते. याचा जाणीवपूर्वक विसर होता. एकीकडे सामाजिक समतेचा अभाव व दुसरीकडे धार्मिक प्राबल्य या विचाराच्या, व्यवहाराच्या गरजेत भारतीय समाज अडकून चाचपडत होता. त्यामुळे अशा या अराजकतेच्या वेळी वृत्तपत्रांसारख्या प्रसार माध्यमाचा सार्वजनिक जीवनात उदय होणे अशक्य होते.[२५] किंबहुना वृत्तपत्रांची गरज भासावी, अशी स्थिती भारतात नव्हती, एकसंघ राष्ट्रीयतेचा अभाव, भारतातील अस्थिर राजकारण व कमकुवत आर्थिक परिस्थितीची त्यामध्ये भर होती. त्यामुळे भारतात मुद्रण कलेचा उदय होऊनही वृत्तपत्रासारखी साधने तत्काळ अस्तित्त्वात आली नाहीत.[२६]

भारतात मुद्रणकला अस्तित्वात येण्यापूर्वी प्रभावीपणे संदेशाची देवाण–घेवाण सुरू होती. मोहर किंवा शिलालेख, ताम्रपटवर कोरेलेली अशोकाची आज्ञापत्रे ही संदेशवहनासाठी स्विकारलेला शब्दापलीकडचा मार्ग होता. महाभारतातील कौरव–पांडव युध्दाची प्रत्यक्ष हकिगत, अंध धृतराष्ट्राला कथन करणारा संजय तसेच सर्वत्र संचार करणारा, पुराणकथेतील कळीचा नारद, कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नमुद केलेले समाहर्ता किंवा गुप्तचर, मध्ययुगातील छत्रपती शिवाजी महाराजांचे सराईत गुप्तहेर, नाना फडवीसांचे प्रसिध्द हेर, व्यापाऱ्यांना बातम्या पुरविणारे खबरे, आपले काम करताना गावातील लोकांना चटकदार बातम्या सांगणारे नाभिक (नापित)[२७] अशा वेगवेगळ्या माध्यमातून प्राचीन मध्ययुगात संदेशवहन होत असे. म्हणजेच 'मुद्रणकलेच्या पुर्वी' भारतात प्रसार माध्यमांचे स्वरूप मर्यादित व काहीसे व्यक्तिगत असे होते.[२८]

१५ व्या शतकात युरोपमध्ये व त्यापुर्वी चीनमध्ये मुद्रण कलेचा शोध लागला होता. मात्र भारतात ही कला शंभर वर्षानंतर आली. पोर्तुगीज धर्मप्रसारकांनी सन १५५० मध्ये भारतात पहिले मुद्रणयंत्र आणले.[२९] पोर्तुगाज धर्मप्रसारकांनी या यंत्रावर धर्मग्रंथ आणि पत्रक छापण्यास सुरूवात केली. त्यामुळे त्याचे ख्रिश्चन धर्मप्रसारांचे काम सुलभ झाले. मात्र वृत्तपत्राच्या निर्मितीसाठी प्रत्यक्षपणे या धर्मप्रसारकांचा तसेच मुद्रणयंत्राचा तितकासा उपयोग झाला नाही. भारतातील वार्तापत्र छापून तयार व्हायला बराच काळ जावा लागला. पुढे भारतात ब्रिटिश राजवट स्थिर झाल्यानंतर तेथील जनतेला एकछत्री अंमल, दळणवळणाच्या साधनांची वृध्दी, कायदा व सुव्यवस्था, शांतता आणि भौतिक संस्कृतीचा परियच, तसेच समाजातील सर्व स्तराला सामावून घेण्याची संधी इत्यादी अनेक गोष्टी उपलब्ध करून दिल्या या बदलामुळे

चालत आलेल्या जुनाट व्यवस्थेला धक्का पोहचला व नवे सार्वजनिक जीवन सुरू झाले.[३०] त्यातुनच वृत्तपत्र निर्मितीला पोषक वातावरण निर्माण होऊन भारतात वृत्तपत्रांची वाढ व विकास झाला.

१.२३ भारतात वृत्तपत्रांचा उदय–

प्लासीच्या लढाई नंतर 'ईस्ट इंडिया' कंपनीचा कारभार व वसाहती उत्तरोत्तर वाढत गेल्या. परवाना नसला तरी संपत्तीच्या लोभाने हिंदुस्थानात येणाऱ्यां युरोपियनांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. त्यामुळे पुढील काळात वसाहतीमध्ये एकसंघपणा राहिला नाही. कंपनीच्या हातात सत्ता असल्याने सत्तेत सहभागी होणारे व इतर अशी वाटणी होऊन काहींच्या मनात असंतोष निर्माण झाला. अशा या कंपनी सताधाऱ्या विरूध्द गाऱ्हाणी इतरत्र पोहचविण्यासाठी वृत्तपत्रांसारखी साधने जवळ करण्यात आली.

ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये जिज्ञासुवृत्ती अधिक होती. त्याचबरोबर पत्र व्यवसायाची ओळख व महत्त्व पूर्वीपासून माहित असल्याने भारतात वार्तापत्र सुरू करण्याचे इंग्रज अधिकाऱ्यांकडून प्रथम प्रयत्न झाले.[३१] भारतात पहिले वृत्तपत्र सुरू करण्याचा पहिला प्रयत्न कलकत्ता येथे सन १७७६ मध्ये कंपनीचा नोकर 'विल्यम बोल्टस' यांनी केला होता. मात्र कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या रोष ओढवल्याने त्यास हद्दपार करण्यात आले.[३२]

भारतात ईस्ट इंडिया कंपनीची पावले राजकीय सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने पडू लागल्यावर कंपनी सरकारचा कारभार भ्रष्ट व वाम मार्गाने वाटचाल करू लागला. याबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांना ताळ्यावर आणण्यासाठी व त्यांच्या कारभाराबाबत जाब विचारण्या–साठी २९ जानेवारी १७८० रोजी 'जेम्स ऑगस्टस् हिकी' यांनी 'बेंगाल गॅझेट' (Bengal Gazette) किंवा कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर (Calcutta General Advertiser) या नावाचे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. आपल्या वृत्तपत्राचे उद्दिष्टे कथन करताना त्यांनी म्हटले आहे, ''A Weekly Political and commercial Paper open to all parties, but influenced by none,''[३३] हिकी हा ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीला होता. त्याच्या या वार्तापत्रातून कंपनीच्या कारभाराबरोबर वैयक्तिक स्वरूपाची टिका–टीपण्या होत असल्याने त्यावेळचे गव्हर्नर 'वॉरन हेस्टिंग्ज' यांच्या रोषाला बळी पडून हिकीला मार्च १७८२ मध्ये आपले वृत्तपत्र बंद करावे लागले.

हिकीचे वर्तमानपत्र फार काळ चालले नसले तरी भारतात मात्र पत्रकारितेची खरी सुरूवात होऊन, खऱ्या अर्थाने वृत्तपत्र वाटचालीला चालना मिळाली हे नजरे आड करून चालणार नाही.

१.२३.१ भारतीय भाषिक वृत्तपत्रांची सुरूवात–

इंग्रजांच्या राजवटीत निघालेल्या वृत्तपत्रांमुळे भारतीयांना पत्रकारितेची जवळून ओळख झाली. प्रांरभी भारतात चालणारी वृत्तपत्रे इंग्रजी भाषेत असली, तरी भारतीयांना इंग्रजी भाषा व पाश्चात्य ज्ञानाची थोडीफार ओळख असल्याने इंग्रजी भाषेत असणारी वृत्तपत्रे त्यांचे महत्व, उद्देश लोक संवादाचे व प्रबोधनाचे जवळचे प्रभावी साधन आहे. यांची ओळख पटली पुढे या विचारातून १५ मे १८१६ रोजी बंगालमध्ये भारतीयांचे पहिले वृत्तपत्र उदयाला आले. त्यांचे नाव 'बेगॉल गॅझेट' हे इंग्रजी भाषेत वृत्तपत्र प्रसिध्द करून गंगाधर भट्टाचार्य' यांनी भारतीय वृत्तपत्र माध्यमात पहिले पाऊल टाकले.[३४] त्यानंतर 'श्री रामपूरच्या विल्यम कॅरे यांनी एप्रिल १८१८ मध्ये 'दिग्दर्शन'हे बंगाली भाषेतील मासिक सुरू केले. तसेच २३ मे १८१८ रोजी 'समाचार दर्पण' हे बंगाली भाषेतील साप्ताहिक सुरू केले. देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र होय.[३५] भारतातील अन्य काही भाषेतील वृत्तपत्रांची सुरूवातही बंगालमध्ये बंगाली भाषेत झाली. हे भारतीय पत्रकारितेचे प्रमुख वैशिष्टय मानावे लागेल.

राजा राममोहन रॉय यांचे 'संवाद कौमुदी' हे पत्र ४ डिसेंबर १८२१ रोजी सुरू झाले. त्यानंतर 'मिरात–उल–अखबार' हे फारसी भाषेचे वृत्तपत्र सुरू केले. भारतीय भाषेतील वृत्तपत्रे ही साधारणपणे या काळापासून निघू लागली.

१.२३.२ मराठी वृत्तपत्रांचा उदय–

इंग्रजी राजवटीमुळे नाविन्याचा शोध घेणे शक्य झाले होते. देशाच्या इतर भागाप्रमाणे महाराष्ट्रात ही सांस्कृतिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली. प्रबोधनाचे साधन म्हणून हळूहळू वृत्तपत्रे व नियतकालिके पुढे येऊ लागली. मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र 'मुंबापूर' हे होय. हे मराठी पत्र २० जुलै १८२८ पासून सुरू झाल्याचे स्पष्ट होते. परंतु या पत्राचा चालक व संपादक कोण? हे पत्र किती काळ चालले? याचा संदर्भ मिळत नाही. तसेच हे पत्र साप्ताहिक, पाक्षिक की मासिक होते, हेही स्पष्ट होत नाही.[३६] 'मुंबापूर' हे वर्तमानपत्र' मराठीतील पहिले पत्र असले तरी 'दर्पण' या वृत्तपत्रापासून मराठी वृत्तपत्रास एक निश्चित अशी

दिशा प्राप्त झाली, असे म्हणता येईल. दर्पण या पत्राचा पहिला अंक, शुक्रवार ६ जानेवारी १८३२ रोजी मुंबईतून बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रसिध्द केला. हा अंक सुरूवातीला इंग्रजी व मराठी या दोन भाषात पाक्षिक रूपांत प्रसिध्द होत होता. पुढे ४ मे १८३२ पासून पाक्षिकाचे रूपांतर साप्ताहिकात झाले.[३७]

या वृत्तपत्राचे प्रयोजन बाळशास्त्री जांभेकरांनी १२ नोव्हेंबर १८३२ च्या अंकामध्ये स्पष्ट केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या वृत्तपत्राची उद्दिष्टे कथन केली आहेत. त्यानुसार नव्या ज्ञानाचा, पाश्चात्य विद्यांचा, कला व कौशल्य यांचा परियच व्हावा, त्याद्वारे देशाची समृध्दी आणि लोकांचे कल्याण साधावे शिवाय मनोरंजन करणे, चालू काळाची वर्तमान कळविणे असे त्यांनी वृत्तपत्रांबाबत प्रयोजन असल्याचे म्हटले आहे.[३८] दर्पण पत्राचे प्रथम पाऊल हे अल्पकाळात लोकप्रियता मिळवून देणारे ठरले. परंतु हे वृत्तपत्र काही कारणास्तव सन. १८४० मध्ये बंद करावे लागले. यानंतर संपूर्ण मराठी वृत्तपत्र हे सूर्याजी कृष्णाजी यांनी ४ जुलै १८४० मध्ये सुरू केले. त्यांच्या या 'मुंबई अखबार' वृत्तपत्रांचा उल्लेख करावा लागेल.[३९]

दर्पणनंतर मुंबई अखबार, प्रभाकर, ज्ञानोदय, ज्ञानसिंधू, ज्ञानप्रकाश, केसरी, नवाकाळ, तरूण भारत (नागपूर), प्रभात 'सुधाकर' धुमकेतू व विचार लहरी इत्यादी वृत्तपत्रे मराठी भाषेत कालानुक्रमे प्रसिध्द होत गेली. परंतु वाचकवर्ग मर्यादित विशेषतः शहरी असे. त्याकाळी पुण्या–मुंबईची वृत्तपत्रे राष्ट्रीय प्रश्नांचा खल करण्यात गुंतली होती. अशावेळी प्रादेशिक अस्मिता घेऊन त्या त्या भागातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विविध स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी विभागीय वृत्तपत्रांच्या कार्यास प्रारंभ झाला. नागपूर, औरंगाबाद, धुळे, नाशिक, सोलापुर, कोल्हापूर व बेळगाव इत्यादी केंद्रातून अनेक नियतकालिके उदयास आली १९१९ ते १९३७ या काळात महाराष्ट्रात १३७ नियतकालिके प्रकाशित होत असत.[४०]

मराठी वृत्तपत्राची परंपरा उज्वल आहे. 'दर्पण', प्रभाकर व ज्ञानप्रकाश सारखी वृत्तपत्रे प्रबोधन घडवू लागली 'दिनबंधू' च्या रूपाने समाजसुधारणेच्या चळवळीस वृत्तपत्रांनी गती दिली. 'केसरी' ने प्रखर राष्ट्रवादी भूमिका घेतली. 'सुधारक' ने पुन्हा सुधारणेचा प्रवाह गतीमान केला 'काळ व संदेश', लोकमान्य नवाकाळ या वृत्तपत्राच्या रूपाने राष्ट्रवादाची तीव्रता वाढवली मूकनायक, बहिष्कृत भारत या वृत्तपत्रांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली 'मराठा',

'सकाळ', 'पुढारी', 'लोकमत', 'तरूण भारत' या वृत्तपत्रांनी शास्त्रीय पत्रकारितेचा पाया घातला. 'राष्ट्रवीर', पुढारी इत्यादीनी बहुजनाच्या कल्याणाचा मार्ग धरला. बेळगावच्या 'तरूण भारत' या विभागीय वृत्तपत्रांनी महाराष्ट्राच्या समतोल विकासाचा मार्ग खुला केला. सीमा प्रश्न व ग्रामीण भागातील प्रश्न त्यांच्या गरजा लक्षात घेता, अशा पत्राची वाढ व उपयुक्तता महत्त्वाची ठरणारी आहे.

१.२३.३ सीमा भागातील कन्नड वृत्तपत्रे –

'तरूण भारत' या वृत्तपत्राचा उदय व विस्तार हा कर्नाटक राज्यातील बेळगाव या शहरातून झाला. या पत्राच्या अगोदर व नंतर कन्नड भाषिक वृत्तपत्रांचा उल्लेख करणे गरजेचे आहे. १८५२ साली जर्मन मिशनरीच्या लोकांनी 'कन्नड समाचार' नावाचे पहिले वृत्तपत्र बेल्लारी येथून प्रसिध्द केले. तसेच सन १८६५ मध्ये 'कर्नाटक प्रसारिका' नावाचे पहिले कन्नड साप्ताहिक प्रसिध्द झाले. सन १८६६ मध्ये म्हैसूर सरकारचे गॅझेट इंग्रजी व कन्नड भाषेतून प्रसिध्द होत. या पत्रात फक्त सरकारी बातम्या प्रसिध्द
केल्या जात.[४१]

सन १८८० ते १९१९ या काळात म्हैसूर संस्थानात इंग्रजी व कन्नड वृत्तपत्रे प्रसिध्द होत होती. 'मेल' 'हिरो' 'म्हैसूर टाइम्स', 'कर्नाटक केसरी','वक्कलिगार पत्रिका' 'अर्थसारिका पत्रिका', 'सुर्योदय प्रसारिका' 'ताईनाडू' 'जनवाणी', 'प्रजामत' व 'विश्व कर्नाटक' अशा नावांची वर्तमानपत्रे कार्यरत होती. सन १८८० नंतर मात्र काही साप्ताहिक प्रकाशित झाली. त्यांचा मुख्य उद्देश` सीमा भागातील कानडी लोकांवरील मराठी भाषेचा प्रभाव रोखणे होय. यामध्ये आघाडीवर असणारी कन्नड वृत्तपत्रे म्हणजे, 'कन्नड केसरी', 'सचित्र भारत', 'कर्नाटक वैभव', 'संयुक्त कर्नाटक', 'दर्शन', 'संदेश' व 'कन्नडम्मा' इत्यादी वृत्तपत्रे कन्नड भाषेतून निघत असत. त्यातील काही वृत्तपत्रे आजही कार्यरत आहेत.[४२]

१.२३.४ सीमा भागातील मराठी वृत्तपत्रे–

बेळगाव शहरातील पहिले मराठी भाषेतील वृत्तपत्र 'बेळगाव समाचार' हे भिकाजीपंत सामंत यांनी ४ जुलै १८६३ रोजी सुरू केले. तसेच धारवाड येथून 'धारवाड वृत्त' नावाचे साप्ताहिक अंताजी रामचंद्र जोगळेकर यांनी सप्टेंबर १८७३ मध्ये प्रसिध्द केले. महाराष्ट्र सीमेवरील मुधोळ संस्थानातून १८७६ साली 'सन्मार्ग दर्शक व मुधोळ समाचार' नावाचे पत्र

निघत असे. यासारखी बेळगावातून विविध मराठी भाषिक वृत्तपत्रे वेगवेगळया भागातून प्रसिध्द होत होती.[४३]

१.२४ बेळगावची मराठी वृत्तपत्र परंपरा–

१.२४.१ बेळगाव समाचार–

सन १८६३ साली 'बेळगांव समाचार' या साप्ताहिकाचा जन्म झाला. भिकाजी हरिपंत सामंत यानी हे साप्ताहिक चालू केले. स्थानिक बातम्या व इतर घडामोडीवर लक्ष केंद्रित करून बातम्या दिल्या जात होत्या. हे पत्र पुढे १३५ वर्षे कार्यरत होते.[४४]

१.२४.२ चिकित्सक –

बेळगांवातील मुद्रण व्यवसायाचे आद्य प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे आबाजीराव रामचंद्र सावंत यानी १८७६ च्या सुमारास 'चिकित्सक' या नावाचे साप्ताहिक सुरू केले. हे वृत्तपत्र बेळगांव परिसरात महत्वाचे मानले जात होते.[४५]

१.२४.३ धुरीण–

बेळगांवातील लोकमान्य टिळकांचे अनुयायी आणि त्यावेळचे सुप्रसिध्द कॉग्रेस नेते. दे. भ. गंगाधरराव देशपांडे यांनी १८९८ मध्ये 'धुरीण' नावाचे साप्ताहिक सुरू केले. या पत्रातून त्यांनी खरा हिंदू धर्म स्पष्ट करणारे लेख धर्माच्या नावावर बहुजन समाजाला नडवल्या जाणाऱ्या धर्म मार्तंडाच्यावर विदारक स्वरूपाच्या टिका करून धर्माचे खरे स्वरूप समाजासमोर मांडले. स्थानिक बातम्या छापून आपलेपण जपले व हे वृत्तपत्र २६ वर्षे चालले.[४६]

१.२४.४ लोकमित्र –

दत्तोपंत सडेकर यांनी 'लोकमित्र हे साप्ताहिक १८९३ सुरू केले. हे वृत्तपत्र ब्राम्हणेत्तरांचे नेतृत्त्व करत होते. हे वृत्तपत्र जवळ–जवळ ४० वर्षे चालले.

१.२४.५ राष्ट्रवीर –

छत्रपती शाहू महाराज (कोल्हापूर) यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात जी काही वृत्तपत्रे चालू झाली त्यापैकी बेळगांव येथील 'राष्ट्रवीर' हे साप्ताहिक होय. शामराव संताजीराव भोसले यांच्या संपादकत्वाखाली ९ मे १९२१ पहिला अंक प्रसिध्द झाला. सत्यशोधक समाजाच्या विचाराने चालणारे 'ब्राह्मणेतर पक्षाची सांगड घालून या वृत्तपत्रांनी वाटचाल केली. 'बहुजन सुखाय, बहुजन हिताय' हा दृष्टिकोन समोर ठेवून अल्पावधीतच हे वृत्तपत्र लोकप्रिय झाले. शामराव

गोविंदराव देसाई यानी १९६० पर्यंत 'राष्ट्रवीर' ची धुरा सांभाळली. त्यांच्यानंतर भाई दाजीबा बळवंतराव देसाई शेकापचे कोल्हापूरचे खासदार आणि बहुजन समाजाचे खंदे नेते यांनी 'राष्ट्रवीर' ची जबाबदारी सांभाळली. आज या साप्ताहिकाची सर्वस्वी जबाबदारी ॲड. राजाभाऊ व्ही. पाटील हे सांभाळतात.[४७]

१.२४.६ दै.'तरूण भारत' –

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक भागात नाव लौकिक मिळविणारे आणि बेळगावसह गोवा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, मुंबई, सांगली, व सातारा अशा आठ आवृत्या प्रसिध्द करून जवळपास दीड लाखाच्या खपाकडे झेप घेणारे वृत्तपत्र 'दै. तरूण भारत' बेळगांव हे होय. बाबुराव ठाकुर यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा किरण ठाकुर यानी वडीलांचीच सामाजिक आणि रचनात्मक कार्याची परंपरा पुढे चालविली आहे. आपल्या वृत्तपत्राची दर्जेदार वाटचाल सुरू केली आहे.[४८]

१.२५ अल्पकाळ चाललेली वृत्तपत्रे–

बेळगावात अनेक नियतकालिके अल्पकाळात चमकून गेली. त्यामध्ये उल्लेख करण्यासारखी वृत्तपत्र म्हणजे, डी. एस. जाधव हे कोल्हापूरच्या न्यायदान खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी त्यानी 'आघाडी' हे साप्ताहिक सुरू केले, यशवंतराव विश्वनाथ लिमये यांचे १९४१–४२ चे 'स्वतंत्र' साप्ताहिक, जयदेवराव कुलकर्णी यांनी १९४९ साली सुरू केलेले 'सर्वोदय', त्याचबरोबर सेवादलाचे कार्यकर्ते आणि बॅ. नाथ पै यांचे सहकारी बलवंत दीक्षित यांनी १९५० ते १९५२ या कालावधीत चालविलेले 'प्रेरणा' साप्ताहिक, जयंतराव भोसले यांचे 'कल्पना' लक्ष्मणराव आजगावकर यांचे 'जनता', राणी पार्वती देवी कॉलेजचे प्राध्यापक आर. एस. रेगे यांनी सुरू केलेले 'सत्याग्रही', कानविंदे 'जयभारत', कृष्णा मेणसे यांचे 'हेमंत', 'साम्यवादी' जनार्दन नाथा पोवार 'कैफियत', देवरत्न रूकडीकर यांनी प्रसिध्द केलेले 'सावली' त्रैमासिक, पत्रकार ह. वि. देसाई यांचे 'जयहिंद', रामभाऊ पाटील यांनी प्रकाशित केलेले 'दौलत' अशी कितीतरी नियतकालिके त्यावेळी चालू झाली आणि कालानुक्रमे अस्ताला गेली. तरीही ही वृत्तपत्रे सामाजिक दृष्टीने महत्त्वाची समजली जातात.[४९]

१.२६ दिर्घकाळ चाललेली वृत्तपत्रे –

१६ मार्च १९५३ रोजी वामनराव सावंत यांचे 'लोकमत' हे पत्र कोणत्याही राजकीय पक्षाचा पुरस्कार करणारे नव्हते त्यामध्ये फक्त राष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाणारे विचार मांडले होते. आजही हे वृत्तपत्र कार्यरत आहे. 'विशाल महाराष्ट्र' हे वृत्तपत्र चंदगड तालुक्याचे माजी आमदार व्ही. के. चव्हाण पाटील यांनी १९६७ साली सहकारी तत्वावर चालविले. त्यानंतर हे वृत्तपत्र माजी आमदार नरसिंगराव गुरूनाथ पाटील यांनी चालण्यासाठी घेतले. पुढे ते बंद पडले. 'रणझुंजार' जयशंकर कालकुंद्रीकर यांनी प्रसिध्द केलेले वृत्तपत्र होते. अल्प काळात दैनिकात रूपांतरीत झालेले कन्नड व मराठी भाषिकांचे आवडते दैनिक म्हणून नावारूपाला आलले वृत्तपत्र होते. त्यानंतर बेळगावातून प्रसिध्द होणारे वीरवाणी, बेळगांव वार्ता, ज्वाला वाय. बी. नावगेकर यांचे कृषि–मित्र, नेताजीराव जाधव यांचे 'बेळगांव गर्जना', श्री शिवाजी पाटील यांनी चालवलेले 'बेळगांव एक्सप्रेस'[५०] अशी अनेक मराठी भाषेतील वृत्तपत्रे मराठा भाषिक समाजासाठी, त्याच्या हक्कासाठी कर्नाटक सरकारशी झटताना दिसतात.

वरील विवेचनावरून बेळगांव भागातील मराठी वृत्तपत्र सृष्टीची परंपरा ही स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रगती पथावर होती. मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' वृत्तपत्राने घातला. त्यानंतर अवघ्या ३१ वर्षानी म्हणजे १८६३ साली 'बेळगाव समाचार' हे साप्तहिक बेळगांवात उदयास आले. आज 'दै. तरूण भारताने' बेळगांवची वृत्तपत्र सृष्टी शिखरावर नेली आहे. सीमा भागातील मराठी माणसांचे आश्रयस्थान म्हणून हे अग्रस्थानी आहे.

१.२७ महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची संख्या–

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागातून निरनिराळ्या भाषेत निघणारी वृत्तपत्रे पुढीलप्रमाणे होती.

१.२७.१ दैनिक–

इंग्रजी दैनिकांची संख्या १४, हिंदी दैनिकांची संख्या ०७, गुजराती दैनिकांची संख्या ०५, मराठी दैनिकांची संख्या ५२, पंजाबी दैनिकांची संख्या ०१, सिंधी दैनिकांची संख्या ०१ उर्दू दैनिकांची संख्या ६९,

१.२७.२ साप्ताहिक –

इंग्रजी ४९, हिंदी २२, गुजराती १७, मल्याळी ०२, मराठी २०१, पंजाबी ०३, संस्कृत ०१, सिंधी ०७, तमिळी ०१, उर्दु १३५, द्विभाषिक साप्ताहिक ६१ यामध्ये मराठी इंग्लीश, मराठी व हिंदी, कोकणी ०४ अशाप्रकारे वेगवेगळ्या भाषेतील दैनिक व साप्ताहिक कार्यरत होती.[५१]

महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची संख्या ही इतर प्रांत तुलनेत निश्चितच अधिक होती. हे स्पष्ट होते. भारत सरकारच्या सूचना व प्रसारण मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या 'इंडिया २०००' या संदर्भ ग्रंथातील आकडेवारीनुसार १९९८ साली भारतातील वृत्तपत्रे व नियतकालिकांची एकूण संख्या ४३,८२८ इतकी होती, त्यापैकी २,०४६ इतकी मराठी वृत्तपत्रे व नियतकालिके प्रसिध्द होतात, ३०२ दैनिके, ८७० साप्ताहिके, ४५१ मासिके, ३९ द्विमासिके व अर्धवार्षिक, १०० त्रैमासिके, १०३ वार्षिके आणि १६१ पाक्षिके यांचा समावेश होतो. यावरून भारतीय वृत्तपत्र सृष्टीत मराठी वृत्तपत्र सृष्टीची व्याप्ती वाढली होती, याची कल्पना येते.

१.२८ सीमा भागातील मराठी वृत्तपत्रे–

अ.नं	स्थापना वर्ष	वृत्तपत्र	संस्थापक संपादक
१	४ जुलै १८६३	बेळगांव समाचार	भिकाजी पंत सामंत
२	सप्टेंबर १८७३	धारवाड वृत्त	अंताजी रामचंद्र जोगळेकर
३	१९७६	सन्मार्ग दर्शक (मुधोळ)	कृष्णाजी रावजी वेंगुर्लेकर
४	१८७९	मुधोळ समाचार	
५	१८८१	कर्नाटक मित्र (बेळगांव)	
६	१८८२	छावा (धारवाड)	
७	१८८२	माधवी (धारवाड)	
८	१८८४	चिकित्सक (बेळगांव)	आबाजी रामचंद्र सावंत
९	१८८५	दक्षिण मित्र (बेळगांव)	
१०	१८८६	सत्यसुधा (कारवार)	
११	१८८७	कारवार समाचार (कारवार)	
१२	१८८७	स्वदेश बंधु (चिकोडी)	
१३	१८९०	वनप्रजा (चिकोडी)	
१४	१८९०	रत्नाकर (कलकुटकी)	
१५	१८९०	सुमंत आणि सन्यसुधा(कारवार)	
१६	१८९०	विजय (बेळगांव)	
१७	१८९१	कुमठावृत्त	
१८	१८९२	रामदास (विजापूर)	

१९	१८९३	चंद्रकांत (चिकोडी)	
२०	१८९४	शिक्षक (चिकोडी)	
२१	१८९५	संस्थानिक (चिकोडी)	
२२	१८९५	वतनदार (विजापूर)	
२३	१८९५	वृत्तसिंधू (कारवार)	
२४	१८९६	विचारी (कारवार)	
२५	१८९७	धुरीण (बेळगांव)	तेलंग व गंगाधरराव देशपांडे
२६	१८९८	मधुमाक्षिक (बेळगांव)	
२७	१८९९	चिंतामणी (निपाणी)	
२९	१९००	प्रकाश (विजापूर)	
३०	फेब्रुवारी १९०४	परिक्षक (बेळगांव)	वामनराव कानविंदे
३१	१९०५	मधूकर (बेळगांव)	
३२	१९०६	हिंदू विजय (कोचरा)	
३३	१९०८	प्रगती (बेळगांव)	
३४	१९०८	खबरदार (बेळगांव)	
३५	१९१२	पंचम जॉर्ज विजय (बेळगांव)	बळवंत रामचंद्र सोहोनी
३६	जुलै १९१९	तरूण भारत (बेळगांव)	बाबुराव ठाकूर
३७	१९२१	लोकनायक (बेळगांव)	डॉ. वा.भी नाईक व डॉ. सौ. इंदूमती नाईक
३८	१९२१	राष्ट्रवीर (बेळगांव)	शामराव भोसले
३९	१९२४	लोकपक्ष (बेळगांव)	
४०	१९२७	गोसेवक (बेळगांव)	हणमंतराव परांजपे
४१	१९३०	प्रार्थना (बेळगांव)	व्यंकटराव पंडित
४२	१९३१	आदर्श (खानापूर)	
४३	१९३६	तरूण मराठा (बेळगांव)	
४४	१९३६	आघाडी (बेळगांव)	डी. एस. जाधव
४५	१९३८	समाज (बेळगांव)	
४६	१९३६	वार्ता (बेळगांव)	डॉ. ए.जी.तेंडूलकर
४७	१९३९	सुविचार (चिकोडी)	
४८	१९३९	वीरभारत (बेळगांव)	
४९	१९४१	स्वतंत्र (बेळगावं)	यशवंत विश्वनाथ लिमये
५०	१९४२	सर्वोदय (बेळगांव)	डॉ. जयदेवराव कुलकर्णी
५१	१९५०	प्रेरणा (बेळगांव)	बळवंतराव दीक्षीत
५२	१९५०	जनता (बेळगांव)	
५३	१९५०	नवजीवन (बेळगांव)	आर. एल. टोपाजींचे
५४	१६मार्च १९५३	लोकमत (बेळगांव)	वामनराव सावंत
५५	१९५४	वार्ता– विहार (बेळगांव)	जी.एम. कानिटकर
५६	१९५६	सत्याग्रही (बेळगांव)	आर.एस. रेंगे

५७	१९५८	जयभारत (बेळगांव)	सदाशिव कानविंदे
५८	१९६६	कैफियत (बेळगांव)	नाथा जनार्दन पवार
५९	१९६८	युगवार्ता (बेळगांव)	नारायण भोसले
६०	१९६८	कलारंजन (बेळगांव)	मधुकर भोसले
६१	१९६९	जयहिंद (बेळगांव)	ह. वि. देसाई
६२	१९६९	साम्यवादी	कॉ. कृष्णा मेणसे
६३	१९७०	रणझुंझार (बेळगावं)	मनोहर कालकुंद्रीकर
६४	१९७१	प्रजादुत (बेळगांव)	यशवंत पालेकर
६५	१९७३	रंगविलास (बेळगांव)	अशोक याळगी
६६	१९७७	वीरवाणी (बेळगांव)	वसंतराव गाडगीळ
६७	१९७७	सत्यजीन (बेळगांव)	नाथा जनार्दन पवार
६८		बेळगांव वार्ता (बेळगांव)	कृष्णा मुंचडी
६९		लोकदूत (बेळगांव)	श्री. कांगले
७०		बेळगांव गर्जना (बेळगांव)	नेताजी जाधव
७१		बेळगांव एक्सप्रेस (बेळगांव)	शिवराज पाटील
७२	१९६७	विशाल महाराष्ट्र	व्ही. के. चव्हाण पाटील
७३	१९७४	ज्वाला (बेळगांव)	कृष्णा मुंचडी
७४		कृषि–मित्र	वाय. बी. नावगेकर[५२]

वरील तक्त्यावरून बेळगाव शहर व परिसरात मराठी भाषिक वृत्तपत्रांची परंपराही मोठी होती. इतर मोठया शहरांच्या मानाने बेळगांव मध्ये जनजागृतीचे प्रभावी साधन म्हणून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योतर काळात वृत्तपत्रांना आश्रय दिला होता.

१.२९ वृत्तपत्रीय महत्त्व व कार्य –

वृत्तपत्रे ही सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना त्यांना अनेक प्रश्नांना भिडावे लागते. अशा वेळी वृत्तपत्रांना सामाजिक जबाबदारीचे भान असावे लागते. समाजाचे कोणतेही काम एखादे वृत्तपत्र किती प्रभावीपणे मांडते व त्यांचे प्रश्न कसे सोडवते. यावरून त्या वृत्तपत्राची सामाजिक शक्ती किती प्रभावी आहे, हे लक्षात येते. वृत्तपत्र हे समाजाचे दर्पण असते. समाजातील सर्व घटनांचे यथार्थ प्रतिबिंब त्यामध्ये उमटत असते. मार्क पिटर गेराल्ड यांच्या मतानुसार 'वृत्तपत्रांचा शिक्षण प्रक्रियेत उपयोग केल्यास शासन व विविध लोकशाही संस्थांच्या कार्यपध्दतीबद्दल ज्ञान होते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मूल्य ही तेवढेच प्रभावीपणे जोपासता येते.[५३] यावरून समाजाला योग्य ते वळण लावण्याचे काम वृत्तपत्रे समर्थपणे करू शकतात. मात्र यासाठी त्या वृत्तपत्रात काम करणारे पत्रकार, वृत्तपत्राचे संपादक व अन्य घटक समाजाचे भान

असणारे तसेच मानवी मूल्यांचा आदर करणारे असावे लागतात. पत्रकारांच्या दृष्टिकोनावरच वृत्तपत्राची लोकाभिमुखता तसेच लोकप्रियता अवलंबून असते. भारतामध्ये समाज सुधारणेची चळवळ, स्वातंत्र्य आंदोलनातील लोकसंग्राम, नवभारताची पुनर्रचना या तीनही पर्वात भारतीय वृत्तपत्रांनी बजावलेली भूमिका ही महत्त्वाची आहे.[५४] कोणतीही सामाजिक समस्या समाजापर्यंत पोहोचविण्याचे समर्थ कार्य वृत्तपत्राने आजपर्यंत केले आहे. एखादा नवा विचार, तत्वज्ञान, कायदा किंवा आदेश समाज मनावर प्रथमत: बातमीच्या रूपाने रूजवावा लागतो. हे काम नियतकालिके पार पाडतात. मराठी वृत्तपत्र जन्माला आली ते प्रबोधनाच्या हेतूने पुढे त्यात टीका, प्रक्षोभ, निंदा नालस्ती, स्तुती अशा विविध घटनांना प्राधान्य दिले.[५५] बाबुराव ठाकुर वृत्तपत्रांचे महत्त्व स्पष्ट करताना म्हणतात, "लष्करी शक्तीपेक्षा वृत्तपत्रे ही मोठी शक्ती असून जनतेच्या हक्काचे ते राखणदार आहेत."[५६] लोकमताला वाचा फोडणे आणि लोकमताला वळण लावणे. या दुहेरी कर्तव्यामुळे राष्ट्रीय जीवनात वृत्तपत्रांना अग्रस्थान प्राप्त झाले. वृत्तपत्रांचे हे शस्त्र कसे वापरावे याचा पहिलाच धडा सरकारी युरोपियन अधिकाऱ्यांनी आणि मिशनऱ्यांनी हिंदी लोकांना दिला.[५७] सर्वसामान्य लोकांची न्याय गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी व सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अन्यायाविरूध्द झगडा देण्यासाठी पत्रकारांनी निर्भयपणे पुढे यायला हवे. वृत्तपत्रानी कंबर कसायला हवी., सामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्कावर गदा आली तर त्यांच्या रक्षणासाठी पत्रकारांनी आपली लेखणी वापरायला हवी, असे विचार बाबुरावांनी १९५० च्या बेळगांव येथे मराठी पत्रकार परिषदेचे स्वागतध्यक्ष या नात्याने मांडले आहेत. ते पुढे म्हणतात, 'वृत्तपत्रे म्हणजे देशातील सर्व लोकांचे वकील, त्यामुळे कोणाची भीड न धरता खरे व हितकारक असेल ते बोलले पाहिजे. तत्त्वनिष्ठा, स्पष्टवक्तेपणा व निर्भिडवृत्ती इत्यादी गुणांमुळेच वृत्तपत्राला सामर्थ्य प्राप्त होते'. अशा प्रकारचे परखड विचार त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाबाबत मांडले आहेत.[५८]

१.३० वृत्तपत्रविषयक ब्रिटिश शासनाचे धोरण–

भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनी काळात प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्राबाबत सरकारचे स्पष्ट असे धोरण नव्हते. कधी वृत्तपत्राना प्रोत्साहन तर कधी विरोधी भूमिका होती.[५९] पण लॉर्ड वेलस्लीच्या काळात वृत्तपत्रावर प्रथमच अनेक बंधने लादण्यात आली. त्याने वृत्तपत्रांना सरकारची परवानगी घेणे बंधनकारक केले. संपादक व मालकाचे नाव आणि पत्ता सरकारला

कळविणे तसेच रविवारी पत्र बंद ठेवणे. त्याशिवाय प्रसिध्दीपूर्व तपासणी सक्तीची करून सेन्सॉरशिप लादण्यात आली. इत्यादी नियम लादण्यात आले.[६०] त्यानंतर लॉर्ड हेस्टिंग्जने वृत्तपत्रांबाबत उदारमतवादी धोरण स्वीकारले. त्याने वृत्तपत्रविषयक सेन्सॉरशिप उठविली. त्यांच्या या धोरणामुळे वृत्तपत्र व्यवसायाला एक नवी दिशा मिळाली. परिणामी भारतात वेगवेगळ्या विभागातून विविध भाषेत वृत्तपत्र निघू लागली.[६१]

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा मुंबईचा पहिला गव्हर्नर याने वृत्तपत्राबाबत ताठर धोरण ठेवले. जे सरकारने वृत्तपत्रासाठी घालून दिलेले नियम आहेत. ते सर्व संपादकानी पाळले पाहिजे असा त्यांचा दंडक होता. ईस्ट इंडिया कंपनी काळात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य द्यावे याबद्दल अनुकूलता नव्हती. या बाबतची कारणे पुढीलप्रमाणे

१) शिक्षणाच्या प्रसाराचा अभाव होता.

२) राजकीय जागृतीचा अभाव होता.

३.)ब्रिटिश सत्तेला स्थैर्य लाभले नव्हते

४) ब्रिटिशांचा राज्यकारभार हा इंग्रजी भाषेत चालत असलेमुळे अनेक वृत्तपत्रे इंग्रजी भाषेतच चालत असत.

५) जर प्रादेशिक भाषेत वृत्तपत्रे प्रसिध्द झाली तर एकसंघ भारतावर राज्य करणे अवघड होईल म्हणून प्रादेशिक भाषेत वृत्तपत्रावर जाणीवपूर्वक बंधने आणण्याचा प्रयत्न केला.[६२]

वरीलप्रमाणे वृत्तपत्राबाबत इंग्रजी अधिकाऱ्यांची मानसिकता असली तरी जॉन मेटकाफ या अधिकाऱ्यांचे मत विरोधी होते. 'भारतीय लोकांना अज्ञानात ठेवण्यातच अधिक धोका आहे. उलट ज्ञानाच्या प्रसारामुळे आमच्या साम्राज्याची बळकटी अधिक वाढेल.' हे त्यांनी पटवून दिले. या सर्व स्पष्टीकरणानंतर मेकॉलेने तयार केलेला कायदा ३ ऑगस्ट १८३५ रोजी संमत करून वृत्तपत्राच्यांवर लादलेली बंधने रद्द केली. मात्र काही तरतूदी तयार करण्यात आल्या. कंपनीच्या राज्यात वृत्तपत्र प्रसिध्द करण्यापूर्वी, मॅजिस्ट्रेट पुढे मुद्रक व प्रकाशन यांना डिक्लेरेशन करणे बंधनकारक करण्यात आले. मुद्रण स्थळ किंवा प्रकाशन स्थळाचा स्पष्ट उल्लेख यावा व ते बदलल्यास पुन्हा डिक्लेरेशन करणे. या ठरलेल्या नियमाच्या भंगाबद्दल जास्तीत जास्त ५०० रू दंड व २ वर्षे कैदेची शिक्षा तरतूद केली.[६३] या नियमात बदल न करता सन १८५७ पर्यंत हा कायदा चालत आलेला होता. यानुसार भारतामध्ये प्रादेशिक भाषेत

अनेक वृत्तपत्रे निर्माण झाली. त्यांनी खऱ्या अर्थाने सन १८५७ च्या उठावाला हातभार लावला. याची जाणिव ब्रिटिशांना झाल्यानंतर मात्र वेगवेगळ्या कायद्याच्या नावाखाली भारत स्वातंत्र होईपर्यंत वृत्तपत्रांबाबत शासकीय धोरण अनुकूल राहिले नाही.

१.३१ 'तरूण भारत' वृत्तपत्र कार्याची सुरूवात –

धोंडो उर्फ बाबुराव राजाराम ठाकुर यांना विद्यार्थी दशेपासूनच देश स्वातंत्र्याचे प्रेमाचे वेड होते. आपण या देशासाठी, समाजासाठी काही तरी केले पाहिजे. या हेतूने आपल्या तरूण सहकाऱ्यांच्या मदतीने सामाजिक, शैक्षणिक व वृत्तपत्रिय कार्य करण्यासाठी बेळगांव येथे २५ ऑक्टोंबर १९१८ रोजी 'भारत वैभव समाज' नावाची संस्था स्थापन केली.[६४] या संस्थेमार्फत 'तरूण भारत' हे मासिक मे–जून १९१९ पासून बेळगाव या मराठी भाषिक शहरात मराठीतून सुरू करण्यात आले.[६५] या मासिकाच्या प्रकाशनाची संपूर्ण जबाबदारी धोंडो उर्फ बाबुराव राजाराम ठाकुर व श्री. मंगेश हरी पेडणेकर यांच्यावर सोपविण्यात आली होती.[६६]

'तरूण भारत' मासिक हे खास करून तरूण लेखकांच्यासाठी वाचकांच्यासाठी, तरूण विद्यार्थ्यांनी चालवलेले भारतातील पहिले मासिक होते.[६७] आपला उद्याचा देश हा तरूण पिढीवर अवलंबून आहे. तरूण पिढी शिकून शहाणी झाली, तरच या भारत वर्षाचे भाग्य अवलंबून आहे. अशा प्रकारचे विचार समोर ठेवून या तरूण व होतकरू वर्गाने कार्याला सुरूवात केली. या मासिकाचे संपादक, प्रकाशन, लेखन व वाचन हे तरूण विद्यार्थी असल्यामुळे 'तरूण भारत' हे नाव मासिकाचे ठेवण्यात आले.[६८]

१.३१.१ 'तरूण भारत' मासिकाचा उद्देश –

तरूण भारत हे मासिक तरूण वर्गासाठी सुरू करण्यामागे बाबुराव ठाकुर यांची भूमिका व उद्देश खालील प्रमाणे होते.

१. महाराष्ट्रातील विद्यार्थी वर्गात परस्परात सहानभुती व प्रेम निर्माण करणे.

२. तरूण विद्यार्थी वर्गात सुप्तावस्थेत असलेल्या लेखन कलेस उत्तेजन देणे.

३. राष्ट्रीय प्रश्न, देशी–विदेशी घडामोडी बाबत जाणीव करून देऊन त्यांना प्रत्यक्षात सहभागी करून घेणे.

४. शिक्षण घेत असताना व देत असताना विद्यार्थी व शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी येतात त्या सर्वासमोर मांडण्यासाठी व सोडविण्यासाठी हे मासिक सुरू करण्यात आले.[६९]

वरील उद्देश डोळ्यासमोर ठेवून बाबुराव ठाकुर व त्यांच्या मित्र परिवारानी 'तरूण भारत' हे मासिक सुरू केले. त्याला वाचक, लेखक व विद्यार्थ्यांकडून भरघोस पाठिंबा मिळाला.[७०]

१.३१.२ तरूण भारत मासिकाचे धोरण –

हे मासिक सुरू झाल्यानंतर या मासिकाचा आराखडा तयार करताना नेमके धोरण सुरूवातीच्या काळात ठरवण्यात आले ते खालीलप्रमाणे–

१. विद्यार्थ्यांचा जो पक्ष असेल तोच मासिकाचा राहील.

२. शक्य तेवढी जास्त 'तरूण भारत' विद्यार्थ्यांची बाजू राखण्याचा प्रयत्न करील.

३. 'तरूण भारत' मासिकात केवळ विद्यार्थी वर्गाचेच लेख छापून त्यांच्या लेखन कलेस उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला जाईल. पण विद्यार्थ्यांकडून अपेक्षेप्रमाणे लेख आले नाही तर इतरांचे लेख छापले जातील. तेव्हा लेख हे शिक्षण विषयक असले पाहिजे.

४. वादग्रस्त राजकीय बाबी खेरीज इतर सर्व बाबतीतील विशेषतः शिक्षण व सामाजिक विषयावर 'तरूण भारत' मासिकात लेख प्रसिध्द होतील.

५. विद्यार्थी वर्गात वाचनाची अभिरूची वाढविण्यासाठी व लेखन कलेत प्राविण्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

६. इंग्लिश शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लेखन कलेस वाव देण्यासाठी खास करून इंग्लीश लेखनासाठी काही पृष्ठे राखून ठेवली जातील.

७. जातीय व धार्मिक संबंधात बिघाड होईल असे लिखाण छापले जाणार नाही.

अशा प्रकारे या वृत्तपत्राची धोरण निश्चित ठेऊन दिशा ठरवली व प्रगतीच्या बाजूने वाटचाल सुरू केली.[७१]

१.३१.३ लेखकाना सूचना–

१. मासिकाचा प्रसार विद्यार्थी वर्गात असल्यामुळे राजकारणावर चर्चात्मक लेख असू नयेत.

२. लेखाचे धोरण उच्च मनोवृत्तींना पोषक असावे, त्याची पृष्ठ मर्यादा कमीत कमी ३ पृष्ठ व जास्तीत जास्त ८–१० पृष्ठे असावी. यापेक्षा मोठे असल्यास लेखाचे भाग करून पाठवावेत.

३. विद्यार्थ्यांनी लेख पाठविताना आपला पूर्ण पत्ता आपल्या शाळेचा, कॉलेजचा उल्लेख करावा.

४. उत्तम लेखास बक्षिसे दिली जातील.

५. प्रकाशन योग्य लेख सवडीनुसार प्रसिध्द केले जातील, योग्य नसलेले लेख सोबत एक आण्याचे तिकीट पाठविल्याशिवाय परत केले जाणार नाहीत.

६. लेखांचा निकाल पंधरा दिवसाच्या आत कळविला जाईल.[७२]

अशा प्रकारच्या सूचना लेखक वर्गाला देण्यात आल्या होत्या.

१.३१.४ तरूण भारतच्या प्रगतीची वाटचाल –

बेळगाव शहरात 'भारत वैभव' समाजाची स्थापना करून त्या संस्थेमार्फत वाचनालय, पुस्तकालय (ग्रंथालय) स्वदेशी वस्तू भांडार, कामगार वर्गासाठी रात्रशाळा, प्रौढशाळा, साक्षरता प्रसार व स्वयंसेवक संघटना अशा प्रकारच्या स्वार्थ त्यागाच्या समाज उन्नतीच्या व राष्ट्रप्रेमाच्या पायावर उभा राहून या संस्थेने आपले कार्य उल्लेखनीय असे सुरू केले. पुढे या भारत वैभव समाजामार्फत खास तरूण विद्यार्थी वर्गासाठी एक मासिक हस्तलिखित असावे असा विचार करणारा हा ग्रुप बेळगांव मध्ये कार्यरत होता. हा तरूणांचा ग्रुप भारत देशात पहिला होता. याच विचाराच्या पार्श्वभूमीतून तरूणांच्यासाठी असणारे मासिक 'तरूण भारत' बेळगाव उदयाला आले.[७३]

या मासिकाचे नाव व निर्मितीबाबत बाबुराव ठाकुर स्पष्ट करताना म्हणतात, "मासिकाचे नाव 'तरूण भारत' हे तरूण पिढीचे द्योतक असल्यामुळे हे नाव नामकरण केले. सांप्रतची तरूण पिढी जिच्यावर भारत वर्षाचे भाग्य अवलंबून आहे. ती पिढी म्हणजे विद्यार्थी वर्ग होय. त्याशिवाय मासिकाचे संपादक व लेखक, वाचक हे सुध्दा विद्यार्थीच आहेत. म्हणूनच 'तरूण भारत' हे नाव सर्वार्थाने योग्य ठरले."[७४].

मासिकाच्या संपादक व प्रकाशनाची जबाबदारी तरूण विद्यार्थी श्री. मंगेश हरी पेडणेकर व धोंडी राजाराम ठाकुर यांच्यावर सोपविण्यात आली. अशाप्रकारे मे, जून १९१९ मध्ये ३६ पानी 'तरूण भारत' या मासिकाचा जन्म झाला.[७५] या मासिकाचे मुखपृष्ठ महावीर या छापखान्यात व बाकीची सर्व पाने सिटी प्रिंटींग प्रेस बेळगाव येथे छापून घेण्यात आली. हे मासिक बेळगांव समादेवी गल्ली, घर नं. ३४४७ येथे प्रसिध्द करण्यात आले.[७६] दर महिन्याच्या २५ तारखेला 'तरूण भारत' हे मासिक प्रकाशित होत असे. हे मासिक जरी तरूण वर्गासाठी असले, तरी या मासिकाला अल्पकाळात भरघोस प्रतिसाद मिळाला. यामध्ये ठराविक विषयाचे लेख, विनोदी लेख, ऐतिहासिक लेख व गोष्टी, पुराण कथा कविता, ललित लेख, इंग्रजी लेख,

विविध खेळ संबंधी माहिती तसेच वाचक वर्गातील मासिक संबंधी अभिप्राय व सुचना इत्यादी तसेच विद्यार्थी वर्गात राष्ट्रप्रेम, स्वराज्याभिमान, स्वदेश–भक्ती निर्माण होतील. धार्मिक विचारांचे लेख लोकमान्यांची आकाशवाणी विवेकानंद वाणी, सत्याग्रही लेख इत्यादी विविधांगी सदरांचा समावेश होतो.[७७] त्याबरोबर महान व्यक्तिचे कार्य, चरित्र लेखन, संपादकीय लेख लिहून तरूण वर्गात जागृती, प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.[७८] हे मासिक अनेक रंगात, सुंदर चित्रांनी भरलेले असे. मासिकातील विविध मजकुरामुळे व त्यांच्या आकर्षक मांडणीमुळे अक्षर टाईप मोठा (१४पांईट) वापरल्यामुळे त्या बरोबर लेखकाचे नाव चौकटीत किंवा वेलबुट्टीच्या नक्षी चितारून ठळक आकर्षणाकरीता देण्यात येत असे. त्यामुळे थोडया कालावधीत 'तरूण भारत' हे मासिक मुंबई, गोवा, पुणे, कोल्हापूर व सांगली येथे पोहचले.[७९]

१.३१.५ छपाई यंत्रातील बदल –

सुरूवातीच्या काळात बाबुरावांना वृत्तपत्र चालवण्याची मुख्य अडचण म्हणजे त्यांच्याकडे स्वतःचा छापखाना नव्हता. त्यामुळे त्यांना दुसऱ्यावर विसंबुन राहवे लागे. सन १९१९ ते १९२२ या कालावधीतील बहुतेक अंक बेळगांव येथील धनंजय छापखान्यात छापण्यात आले होते. त्यामुळे दर महिन्याच्या २५ तारखेला अंक प्रसिध्द होईल असे जाहीर करून सुध्दा वेळेत पूर्ण होत नव्हते. अनेक वेळा दोन–दोन महिन्याचा जोड अंक काढावा लागे. परिणामतः वाचकांची गैरसोय होत असे. तेव्हा ही गैरसोय टाळण्यासाठी बाबुरावांनी Hand Press Machine घेतले. मे १९२२ चा अंक त्या यंत्रावर छापून प्रसिध्द केला. तेव्हापासून मासिक नियमित व वेळेत निघू लागले.[८०] दिवसेंदिवस मासिकाच्या अंकाची मागणी वाढली. त्यामुळे कमी वेळेत अधिक अंक काढण्याची आवश्यकता भासू लागली. तेव्हा दाब यंत्राऐवजी आधुनिक छपाई यंत्र बसवण्याची गरज भासली. जुलै १९२३ मध्ये बाबुराव ठाकुरनी आपल्या मित्रांच्या मदतीने आधुनिक 'ट्रेडल यंत्र' छापखाण्यात बसविले.[८१] या यंत्रावर मात्र प्रथम हातानी अक्षर जुळणी करून ते आयताकृती चौकटीत बसवावी लागत असे. त्यानंतर ती चौकट यंत्रावर बसवून छपाई करता येत असे. या छपाई यंत्रावर १८'' × १२'' ची छपाई होत असे.[८२] या यंत्रानंतर जून १९२४ मध्ये सिलेंडर छपाई यंत्र बसविले. या यंत्रावर छपाईसाठी कागद ठेवणे व छपाई झालेला कागद काढणे. हे आपोआप होत असे. या यंत्रावर १८''× १२'' पेक्षा मोठया आकाराचा कागद छपाई करण्यासाठी वापरता येत असे. त्यामुळे छपाई कामात क्रांतिकारक

अशी गती मिळाली.[८३]

हे मासिक चालविण्यासाठी बाबुरावांना पैशाची मोठी अडचण होती. तसेच त्यावेळी गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले होते. त्यात बाबुरावांनीही स्वातंत्र्य चळवळीत स्वतः पुर्णवेळ सहभाग घेतला होता. त्यामुळे या भागात त्यांची बीनीचे नेते म्हणून ओळख होऊ लागली. अशा प्रसंगी इंग्रज प्रशासनाने बाबुरावावर लक्ष केंद्रीत केले. त्यामुळे त्यांना भूमिगत व्हावे लागले. तुरूंगवास सहन करावा लागला. त्या घटनांचा परिणाम होऊन 'तरूण भारत' मासिक १९२४ पासून बंद करावे लागले.[८४]

पुढील काळात स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबर, सामाजिक आणि शैक्षणिक हे काम करत असताना त्या कार्याच्या प्रचारासाठी व जनजागृतीसाठी वृत्तपत्राची उणिव भासू लागली. म्हणून बाबुराव ठाकुर यांनी १ ऑगस्ट १९२८ रोजी लोकमांन्य टिळक पुण्यतिथीच्या मुहूर्तावर 'तरूण भारत' या मासिकाचे साप्ताहिक स्वरूपात पुनर्जिवित करण्यात आले.[८५]

साप्ताहिक 'तरूण भारत' हा पहिला अंक १५'' × १०'' आकाराचा १२ पानी अंक सुरू करून मुखपृष्ठावर विविध रंगाच्या शाईचा वापर करून मोठया अक्षरात साप्ताहिकांचे नाव आकर्षकरित्या छापलेले होते.[८६]

'तरूण भारत' वृत्तपत्राच्या अक्षर टाईपमध्ये कालानुरूप बदल करण्यात आले. सुरूवातीला १४ चा टाईप अक्षराचा वापर करण्यात आला. पण १९२२ मध्ये मात्र आकाराने लहान असा १२ पॉंईट टाईपचा वापर करण्यात आला. हा आकार सन १९२४ पर्यंत वापरात आला.[८७] 'तरूण भारत'ची सजावट खुलविण्यासाठी व आकर्षित करण्यासाठी बाबुरावांनी वेगवेगळ्या अक्षरांचा टाईप वापरलेला आहे. ठळक बातम्यांच्या शीर्षकाकरिता ७२ पॉंईट अक्षराचा वापर केला आहे. तर त्या खालील महत्त्वाच्या मजकुरासाठी ४८ किंवा १४ पॉंईटच्या टाईपमध्ये छपाई केली.[८८] जनतेचा वाढता पाठिंबा व मागणीनुसार साप्ताहिकाचे रूपांतर १९४४ मध्ये अर्धसाप्ताहिकात रूपांतर करण्यात आले. त्यानंतर ५ जुलै १९६६ रोजी दैनिकात रूपांतर केले.

बाबुरावांनी विविध टाईपच्या अक्षरांचा 'तरूण भारत' सजवण्यासाठी जसा वापर केला तसाच विविध रंगाच्या शाईचा सुध्दा वापर केला. एखादी बातमी महत्त्वाची असेल, तर त्याकरिता ते वाचकांना आकर्षित करण्याकरीता वेगळ्या शाईचा वापर करत असत. त्यामुळे

अंकाचा उठावदारपणा व आकर्षपणा वाढत असे. वेगवेगळ्या ठळक व गडद अक्षर टाईप रंगीत बातम्याबरोबर रंगीबेरंगी फोटो सुध्दा छापण्यात येत असे. त्यामुळे वाचक वर्गाचा वृत्तपत्र वाचनातील आनंद द्विगुणीत होत असे.[८९]

वृत्तपत्रातील जाहिरात देण्यामागे विविधता होती. विविध आकाराचे अक्षर टाईप वापरून जाहिरातीचा आकर्षकपणा वाढविण्यात येत होता. या अंकातील जाहिरात ही ४८ पाँईटमध्ये मुक्त जाहिरात दिली जात असे. संबंधित जाहिरातीचा मजकुर १८ किंवा १४ पॉईंट अक्षराचा असे. या जाहिरातीला वेगवेगळ्या रंगसंगती व आकर्षित छापल्या जात असत.[९०]

बाबुरावांनी आपल्या वृत्तपत्राला वाचक वर्ग वाढवण्याच्या दृष्टिने वृत्तपत्रात वेगवेगळ्या सदरांची निर्मिती केली. उदा. त्यावेळी समाजात करमणुकीचे महत्त्वाचे साधन म्हणजे सिनेमा, या सिनेमाबाबत समाजात आकर्षण होते. समाजाचा कल लक्षात घेवून सन १९३६ पासून सिनेमा जगत हे सदर सुरू केले. सिनेमाची जाहिरात फोटो विशिष्ट चौकटीत ठळक अक्षरात सुंदर मांडणी करून छापण्यात येत असे. १९७० नंतर वृत्तपत्राचे ठराविक पान हे या सिनेमा जगतासाठी वापरण्यात येत असे.[९१]

सन १९३९ नंतर दुसऱ्या महायुध्दाबाबतच्या घडामोडीचा वृत्तांत देण्यासाठी 'युध्दवार्ता' हे सदर सुरू केले होते. या सदरातून युध्द वार्ता व वाटचाल आंतरराष्ट्रीय जाणकार व्यक्तीची प्रतिक्रिया देण्यात येत असे. त्याचबरोबर ठराविक दिवशी स्थानिक बाजार भाव, आरोग्याबाबत सल्ले, कृषिविषयक आधुनिक माहितीचे सदर, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाची माहिती, शिक्षण विषयक लेख, जाणत्या व्यक्तीचे लेख, चरित्रे व श्रध्दाजंली लेख अशा विविध बातम्या देण्यात येत असत.

बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' हे वृत्तपत्र स्पर्धेत टिकले पाहिजे तसेच वृत्तपत्राचा खप वाढला पाहिजे. म्हणून कोणत्याही प्रकारची वाचक वर्गाला अभिलाषा न दाखवता किंवा जाहिरात बाजी न करता वाचक वर्गाला काय पाहिजे? काय आवडते? त्यांना काय पुरवले पाहिजे. याबाबत त्यांची कायम धडपड होती. प्रसंगानुसार व काळानुरूप खास पुरवण्या, विशेष अंकाची निर्मिती करून ठराविक दिवशी वाचक वर्गाला सदरची माहिती पुरविली.

'तरूण भारत' हे मासिक १९२८ साप्ताहिक झाले. १९४४ ला अर्धसाप्ताहिक व ५ जुलै १९६६ रोजी दैनिकात रूपांतरित केले तर १९७९ मध्ये या व्यवस्थेत क्रांती करून वेब

ऑफसेट छपाई यंत्रणा राबवून मोठया दैनिकांच्या स्पर्धेत यशस्वी पाऊल टाकले. सिंधुदुर्ग, गोवा, कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी अशा आवृत्त्या सुरू करून प्रचंड व्याप वाढविला आहे. संगणकावरील टाईप सेटींग, मराठी टाईप सेटिंगमध्ये लेजर प्रिंटर, सॉफ्टवेअरचा विकास, हॅट लाईन मोडेम व फॅक्स अत्याधुनिक दळणवळण यंत्रणा, चार रंगी वेब ऑफसेट मशीन व स्कॅनर, वाईड एरिया नेटवर्कवर या प्रणालीवर सर्व केंद्राना एकत्र जोडले.[९२] अशा आधुनिक यंत्रणेचा गरजेनुसार वापर करून आपला छापखाना सुसज्ज केला. पुढे बाबुराव ठाकुर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने 'तरूण भारत' ने इंटरनेटवरही प्रवेश केला.[९३] हलकल्लोळ 'खुमासदार आणि रेशमी चिमटे' या दैनंदिन सदरांबरोबरच बुधवारी 'खजाना', शुक्रवारी 'मस्त मस्त', रविवारी 'अक्षरयात्रा' आणि सोमवारी 'नजराणा', घरकुल इत्यादी रंगीत पुरवण्या वाचकांना देऊन 'तरूण भारत' ने आपली लोकप्रियता वाढविली. बाबुराव ठाकुरनंतर त्यांचे चिरंजीव श्री. किरण ठाकुर यांनी वडिलांची सामाजिक आणि रचनात्मक कार्याची परंपरा पुढे चालविली आहे. अशाप्रकारे हे वृत्तपत्र अत्यंत आधुनिकतेने सुसज्ज होऊन स्थानिक जिल्हा पातळीवरून, प्रांतिय स्तरावर मोठया दैनिकाच्या बरोबरीने आघाडी घेतली आहे.[९४]

१.३१.६ 'तरूण भारत'ची आर्थिक बाजू :–

कोणताही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी आर्थिक बाजू मजबुत असली पाहिजे. तशाच प्रकारे वृत्तपत्र व्यवसाय व्यवस्थित चालविण्यासाठी आर्थिक पाया मजबुत असावा लागतो. अनेक वृत्तपत्रे ही आर्थिक अडचणीमुळे बंद पडल्याची उदाहरणे आहेत. तशाच प्रकारचा प्रसंग बाबुराव ठाकुर यांच्यावर १९२४ मध्ये आला होता. नाईलाजाने हे वृत्तपत्र बंद करावे लागले. सन १९२८ मध्ये त्यांनी त्याचे पुनर्मुद्रण सुरू केले.[९५] तेव्हापासून आजपर्यंत अखंडपणे ते प्रसिध्द होत आहे. या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या साधनांचे मुख्यतः तीन भागात विभागणी करता येते. १. देणगी, २. वर्गणी, ३. जाहिरात –

१.३१.६.१ देणगी :–

'तरूण भारत' मासिक सुरू केले, तेव्हा आर्थिक परिस्थितीही कमकुवत होती. हे अनेक मासिकांच्या अंकात बाबुराव ठाकुर यांनी वारंवार आर्थिक बाबतीत विनंती केली आहे, यावरुन स्पष्ट होते.[९६] ज्या देणगीदारांनी मासिकाला आर्थिक मदत केली. अशा व्यक्तींची नावासहीत मथळे वरचेवर छापलेले आहेत व त्यांचे आभार व्यक्त केले. सुरूवातीच्या काळात ५ ते १०१

रूपयांपर्यंत देणग्या दिल्याचे संदर्भ सापडतात.[९७] याशिवाय इतर मार्गाने पैसा उभा करताना बाबुरावांनी जून १९२२ या अंकात खालील मार्गाचा अवलंब केल्याचे दिसते.

अ) सभासद :–

संस्थेचा सभासद होण्यासाठी कमीत कमी ३ रूपये दर महिन्यास कमीत कमी चार आणे सभासद वर्गणी देऊन संस्थेचे सभासद होता येत असे.

ब) आश्रयदाते :–

संस्थेस स्वच्छेने १०० रूपये किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्यास आश्रयदाते म्हणून सभासद करून घेता येत असे.

क) कायम सभासद–

संस्थेस एकरक्कमी ५० रूपये पासून १०० रूपयापर्यंत देणगी देणाऱ्यास संस्थेचे कायम सभासद म्हणून घेण्यात येत असे.

ड) फंडपेटी :–

संस्थेची फंडपेटी दर शनिवारी शहरात व खेडेगावात फिरविण्यात येत असे. तेव्हा त्या पेटीत अनेकजण देणगी दाखल पैसा टाकत असत.[९८] सन १९२८ मध्ये तरूण भारतचे पुनरूज्जीवन करण्यात आले. तेव्हा नागरिकांच्या कडून देणग्या जमा झाल्याचे उल्लेख सापडतात. १९२९ नंतर मात्र असे उल्लेख सापडत नाहीत.

१.३१.६.२ वर्गणी –

'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या वर्गणीच्या उत्पन्नाचे दोन विभागात विभाजन करता येते. १. इतरांसाठी, २. विद्यार्थ्यांसाठी या दोन घटकांची मासिक वर्गणी पुढीलप्रमाणे–

अ.क्र	अंक	इतरांसाठी	विद्यार्थ्यांसाठी
१	वार्षिक वर्गणी	२–००–०	१–१२–०
२	सहामाही वर्गणी	१–०४–०	१–००–०
३	किरकोळ अंकास	०–०४–०	०–०३–०[९९]

वरील प्रकारे 'तरूण भारत' अंकाची वर्गणी आकारण्यात येत असे. या वर्गणीत सुरूवातीपासून ते डिसेंबर १९२० पर्यंत बदल केला नाही. जानेवारी १९२१ पासून मात्र पुढील

तक्त्याप्रमाणे बदल केला.

अ.क्र	अंक	इतरांसाठी	विद्यार्थ्यांसाठी
१	वार्षिक वर्गणी	२–२–०	१–१३–०
२	सहामाही वर्गणी	१–०८–०	१–०४–०
३	किरकोळ अंकास	०–०४–०	०–०३–०[१००]

या वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, किरकोळ विक्री अंकात वाढ केलेली नाही. ही वर्गणी १९२४ पर्यंत स्थिर ठेवली फक्त इतरांसाठीच्या वार्षिक वर्गणीत केवळ दोन आणे वाढ केल्याचे दिसते. सन १९२८ साली 'तरूण भारतचा' पुनर्जन्म झाला. तेंव्हापासून ते १९७९ पर्यंत वर्गणीच्या स्वरूपात उत्पन्न मिळत होते. सन १९२८ मध्ये 'तरूण भारत'ची अंक वर्गणी खालीलप्रमाणे. वार्षिक आगाऊ वर्गणी स्थानिक २ रूपये, एम.ओ. बाहेर गावी २ रू १२ आणे, व्ही. पी. ने ३ रू होती तर किरकोळ अंकास १ आणा होता. विद्यार्थ्यांसाठी बाहेरगावी २ रूपये १२ आणे वर्गणी होती. हीच वर्गणी १९३५ पर्यंत स्थिर होती.[१०१]

सन १९३५ ते १९४० पर्यंत किरकोळ अंकाची किंमत ३ आणे पर्यंत वाढवण्यात आली. पण १९४१ ते १९४८ पर्यंत किरकोळ अंकाची किंमत कमी करून २ आणे निश्चित करण्यात आली. तर वार्षिक स्थानिक किंमत ३ रूपये, बाहेरगावी ३ रू. १२ आणे निश्चित करण्यात आली. सन १९४९ ते १९५३ पर्यंत 'तरूण भारत' वृत्तपत्राची वर्गणी साधारणपणे खालीलप्रमाणे होती.

अ.क्र	अंक	वर्गणी
१	वार्षिक वर्गणी स्थानिक साठी	४–००–० रू
२	वार्षिक वर्गणी बाहेरगावी	५–१०–० रू
३	किरकोळ विक्री	०–१–० रू[१०२]

सन १९५४ मध्ये या वर्गणी दरात वाढ करण्यात आली. या बाबतच्या सुचना, १ जानेवारी १९५४ च्या अंकात दिल्या आहेत.[१०३]

तरूण भारतच्या वर्गणीदारांचा वर्षारंभ जानेवारीपासून सुरू होत आहे. वर्गणीदारांना या वर्षाची आगाऊ वर्गणी ठरल्याप्रमाणे १५ जाने १९५४ पर्यंत पाठवणे आवश्यक होते. वाढीव

वर्गणी १९५४ ची पुढीलप्रमाणे

अ.क्र	अंक	वर्गणी
१	वार्षिक वर्गणी स्थानिक साठी	४–८–०
२	वार्षिक वर्गणी बाहेरगावी	६–०–०
३	किरकोळ अंकाची विक्री	०–१–०[१०४]

पुढील तक्त्यावरून आपल्याला दरवर्षीच्या वर्गणीचे चढ–उतार स्पष्ट होतात. सन १९५४ ते १९७९ पर्यंत.

अ.क्र	वर्षे	वार्षिक वर्गणी		किरकोळ अंक किरकोळ अंकाची किंमत
		स्थानिक	परगावी/बाहेरगावी	
१	१९५४	रू. ४–८–०	६–०–०	०–१–०
२	१९५५	रू. ५–०–०	६–०–०	०–१–०
३	१९५६	रू. ५–०–०	६–०–०	०–१–०
४	१९५७	रू. ५–५०–० पैसे	६–५०–०	०–७–०
५	१९५८	रू. ५–५०–०	७–०–०	०–७–०
६	१९५८	रू. ५–५०–०	७–०–०	०–७–०
७	१९५९	रू. ५–५०–०	७–०–०	०–७–०
८	१९६०	रू. ५–५०–०	७–०–०	०–७–०
९	१९६१	रू. ५–५०–०	७–०–०	०–७–०
१०	१९६२	रू. ५–५०–०	७–०–०	०–७–०
११	१९६३	रू. ६–०–०	७–०–०	०–७–०
१२	१९६४	रू. ६–०–०	७–०–०	०–७–०
१३	१९६५	रू. ६–०–०	७–५०–०	०–७–०[१०५]

माहे जुलै १९६६ पासून 'तरूण भारत' हा साप्ताहिक अंक दैनिकात रूपांतरित झाला. अंकाच्या खर्चाचा ताळमेळ बसवून त्या प्रमाणात अंकाच्या किंमतीत वाढ करण्यात आली.

वरील तक्त्यावरून या वृत्तपत्रांचा वाढता आलेख दिसतो. वाचक वर्गाचा वाढता पाठिंबा व दैनिकाचा पसारा लक्षात घेवून या वृत्तपत्राने शहरातील दैनिकाच्या स्पर्धेत जुलै १९६६ पासून खंबीर पाऊल टाकले. सुरूवातीस या दैनिकांचे वार्षिक, सहामाही, तिमाही व किरकोळ अंकाचे दर निश्चित करण्यात आले.[१०६]

सन १९६६ ते १९७९ अंकाचे दर

अ. क्र	वर्षे	स्थानिक			परगावी/बाहेरगावी			किरकोळ अंक विक्री
		वार्षिक	सहामाही	तिमाही	वार्षिक	सहामाही	तिमाही	
१	१९६७	रू.१५	रू.८	रू. ४	रू. २२	रू.११	रू.५.५०	५ पैसे
२	१९६८	रू.१६	रू.८–५०	रू. ४.२५	रू.२२	रू.११	रू. ५.५०	६ पैसे
३	१९६९	रू.२२	रू.११	रू.५.५०	रू.२२	रू.१६	रू.८.००	६ पैसे
४	१९७०	रू.२२	रू.११	रू. ५.५०	रू.२२	रू.१६	रू.८.००	७ पैसे
५	१९७१	रू.२३	रू.१२	रू.६	रू.२४	रू.१६	रू.८	७ पैसे[१०७]

वरील दैनिकाच्या दरावरून असे दिसून येते की, हा अंक दिवसें दिवस वाचक वर्गाला शक्य तेवढया कमी दरात उपलब्ध करून देऊन गावोगावी वृत्तपत्राचा पसारा वाढविला. त्यांचबरोबर दैनिक किरकोळ अंकाचे दर कमी ठेऊन वृत्तपत्र स्पर्धेत टिकण्याचा प्रयत्न केला.

१.३१.६.३ जाहिरात :–

'तरूण भारत' मासिकाच्या सुरूवातीचा मुख्य हेतू तरूण विद्यार्थ्यांचे हक्काचे व्यासपीठ म्हणून पण काही वर्षानंतर या वृत्तपत्राने जाहिराती वेगवेगळ्या विषयानुरूप देण्यास सुरूवात केल्याचे दिसते. परंतु 'तरूण भारत'चे जाहिरातीचे दर सप्टेंबर १९२४ पर्यंत निश्चित ठरले असल्याचा लेखी उल्लेख सापडत नाहीत.[१०८] १ वर्ष, सहा महिने, तीन महिने, एक महिना, पंधरा दिवस व आठ दिवसाठी करार करून दर ठरवून बिल आकारले जात होते. उदा. औषधाची जाहिरात किंवा सिनेमाच्या जाहिरातीसाठी वर्षाला १०० रूपये घेण्यात यावेत. तरूण भारतचे सन १९२८ ते ३३ पर्यंत जाहिराती दर इंग्रजी किंवा मराठी दर हे ओळीस चार आणे व पुढील ओळींना ३ आणे आकारण्यात येत होते. शीर्षकाचा आकार वेगळया किंमतीत आकारला जाई.[१०९] सन १९४५ पर्यंत हे जाहिरातीचे दर कायम राहिले होते. [११०]

मुदतीच्या जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे होते. मुदतीच्या जाहिरातीस दर खेपेस सिंगल कॉलमास दर इंचास दर खालील प्रमाणे ठरवण्यात आले होते.

अ.क्र.	सिंगल कॉलम दर वेळेस	वेगवेगळ्या वेळा	दर प्रत्येक वेळचे
१	सिंगल कॉलम दरवेळेस	लागोपाठ चार वेळा दिल्यास	१२ आणे
२	सिंगल कॉलम दरवेळेस	लागोपाठ बारा वेळा दिल्यास	१० आणे
३	सिंगल कॉलम दरवेळेस	लागोपाठ चोविस वेळा दिल्यास	८ आणे
४	सिंगल कॉलम दरवेळेस	लागोपाठ अठ्ठेचाळीस वेळा दिल्यास	६ आणे

जानेवारी १९४६ ते १९५५ पर्यंत जाहिरातीचे दोन विभागात विभागणी केले जात होते.

अ) सरकारी जाहिरात दर :–

सरकारी जाहिरातीसाठी सिंगल कॉलम इंचास २ रूपये ८ आणे इतका दर होता.

ब) खाजगी जाहिरात दर :–

खाजगी जाहिराती बाबत निश्चित असे धोरण ठरले नसल्याचे दिसते. कारण पेपरमध्ये किंवा दप्तरी अशा प्रकारच्या नोंदी मिळत नाहीत.[१११]

सन १९५५ ते १९७९ या काळात जाहिरातीचे दर हे रकान्यावर व शब्दावर अवलंबून होते. या काळात वृत्तपत्राचे पृष्ठ, रंगसंगती, आकार, वेगवेगळ्या चित्रांचा समावेश वेलबुटया यानुसार जाहिरात ही आकर्षित व सुंदर केली जात असे. वर नमुद केलेल्या वेगवेगळ्या उत्पादन साधनाद्वारे 'तरूण भारत' या वृत्तपत्राला आर्थिक बाबतीत हातभार लागत असे. 'तरूण भारत' या वृत्तपत्राला प्रत्येक दिवशी वर्गणी, जाहिरातीद्वारे किती उत्पन्न मिळत असे याची ठोस माहिती उपलब्ध होत नाही.[११२]

१.३१.७ 'तरूण भारत' संबंधी सरकारचे धोरण–

ज्या विचारातून या वृत्तपत्राचा जन्म झाला. त्या विचाराशी एकनिष्ठ राहून तरूण विद्यार्थी वर्गाच्या विविध प्रश्नाबाबत 'तरूण भारत' हे वृत्तपत्र सुरूवातीचे काही वर्षे कार्यरत होते. या काळात सरकार बाबतची भूमिका ही मवाळ होती. पण १९२८ च्या पुनरागमणाने या वृत्तपत्राने आपल्या धोरणात व स्वरूपात बदल केला. स्वतः संपादक बाबुराव ठाकुर हे स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रिय असल्याने साहजिक 'तरूण भारत' हे वृत्तपत्रही या चळवळीच्या विचाराकडे झुकल्याचे स्पष्ट होते. विद्यार्थी वर्गाला देशप्रेम, स्वदेश व स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्यासाठी म्हणून या वृत्तपत्राचा उपयोग होत होता. या सुमाराला सरकारच्या अन्यायी व दडपशाही धोरणाविरूध्द 'तरूण भारत'ने मोर्चे बांधणी सुरू केली. स्थानिक बातम्या भडक स्वरूपात तळमळीने मांडून समाजात जागृती निर्माण करत असत. त्यामुळे कळत न कळत सरकारची वक्रदृष्टी 'तरूण भारत'कडे वळली. महात्मा गांधीच्या नेतृत्त्वाखाली बाबुराव ठाकुर स्वातंत्र्य चळवळीचे कार्य करीत होते.[११३]

१ ऑगस्ट १९२८ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या मुहूर्तावर 'तरूण भारत' साप्ताहिक स्वरूपात सुरू झाले. त्यामुळे काँग्रेसच्या प्रचार कार्यांचे ते एक प्रभावी शस्त्र बनले.

सन १९३०–३२ च्या काळातील कायदेभंग आंदोलनाचे प्रचारकार्य 'तरूण भारत'ने अत्यंत प्रभावीपणे केले होते. प्रभात फेऱ्या, सायकल फेऱ्या, सभा व मिरवणुका बाबुरावांच्या सहकार्याने गाजल्या. या काळात बेळगांव जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी म्हणून ते कार्यरत होते. यावेळी या विभागातील काँग्रेस कमिटीची व चळवळीच्या कार्याची सुत्र 'तरूण भारत'च्या कार्यालयातून हालत असत. त्यामुळे या कार्यालयावर पोलिस यंत्रणेची करडी नजर होती. त्या सुमारास निरनिराळ्या कारणाखाली 'तरूण भारत' छापखान्याची तीन–चार वेळा पोलीसांकडून झडती घेण्यात आली होती. सरकार विरोधी कार्य व हालचालीबाबत पुरावे हाती लागले नसल्याने शेवटी चांगल्या वर्तणुकीचा रूपये दोन हजाराचा जामीन बाबुरावांच्याकडून भरून घेण्यात आला.[११४]

सन १९२१ पासून ते १९४७ पर्यंत सर्व कानडी–मराठी कार्यकर्त्यांच्या तोंडी 'काँग्रेस आमची संस्था व बाबुराव ठाकुर आमचा पुढारी' अशी परिस्थिती होती. त्यामुळे ब्रिटिश सरकारच्या काळात बाबुराव ठाकुर यांच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्राने बजावलेल्या कामगिरीला काही आगळेच स्थान आहे. बेळगांवातील सर्व प्रकारच्या राष्ट्रीय चळवळींचे धागे–दोरे बाबुराव ठाकुर व त्यांचे 'तरूण भारत' पत्र या भोवती विणले गेले होते. आणि त्या चळवळीची सर्व सूत्रे 'तरूण भारत' कार्यालयातूनच हालविली जात होती..[११५]

१.३१.८ दै. 'तरूण भारत'चे इतर कार्य

बाबुरावांनी अन्याविरूध्द वाचा फोडण्यासाठी 'तरूण भारत' हे वृत्तपत्र राबविले. त्याकरिता सरकारशी दोन हात करण्यास मागे पुढे पाहिले नाही. जिथे जिथे अन्याय घडला तिथे तिथे बाबुरावांनी 'तरूण भारत' सर्वप्रथम पोहचवला. संबंधित व्यक्तिला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तरूण भारतने हाताळलेल्या अनेक प्रकरणांनी बेळगाव परिसर हादरून सोडला होता. स्वातंत्र्याची चळवळ, पांगीरे प्रकरण, राजगिरे प्रकरण, गोवा मुक्ती, महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्न, अशा विविध प्रश्नाबाबत बाबुराव ठाकुर सरकारशी भिडले व अन्याय अंत्याचाराबाबत दाद मागण्याचा सरकारकडे प्रयत्न केला. सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून वृत्तपत्राने अनेक लोकोपयोगी उपक्रम यशस्वी केले. बेळगाव परिसरातील ग्रामीण भागात मोफत दिवाळी अंक वाटप योजना, जनावरांना लस टोचणे बेळगाव, कोल्हापूर, सांगली भागात रक्तदान शिबिरे, शिक्षकांचा गौरव व पारितोषिक वितरण, क्रिकेट, फुटबॉल स्पर्धा, चित्रकला,

पेंटिंग स्पर्धा व स्केटिंग स्पर्धा व स्केटिंग प्रशिक्षण असे विविध उपक्रम राबविण्यात येत.[११६]

बाबुरावांच्या 'तरूण भारत' ने स्थानिक संस्थांच्या बाबतील महत्वाचे कार्य केले आहे. बेळगाव नगरपालिका, जिल्हा लोकल बोर्ड, जिल्हा स्कुल बोर्ड, सहकारी बँका यांच्या कारभारावर 'तरूण भारत' चा सतत अंकुश असे. नागरी कारभाराच्या बाबतीत ते कायम दक्ष असत.[११७]

१.३२ संपादक बाबुराव ठाकुर

१.३२.१ पुर्वायुष्य

बाबुराव ठाकुर हे दैनिक 'तरूण भारत' बेळगावचे शिल्पकार त्यांच्या अखंड परिश्रमातून 'तरूण भारतला' दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक व गोवा विशेषतः सीमा भागातील मराठी जनतेचे मुखपत्र असा लौकिक प्राप्त झाला आहे. या वृत्तपत्राचे संपादक बाबुराव ठाकुर यांचे बालपण, शिक्षण, व्यक्तिमत्वाची जडण–घडण पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदान सामाजिक व राजकीय कार्य इत्यादी घटकांची येथे चर्चा केली आहे.

१.३२.१.१ कौटुंबिक पार्श्वभूमी –

बाबुराव ठाकुर यांच्या घराण्याची 'गौढ सारस्वत ब्राम्हण' कुटुंबात गणना होते. हे घराणे मुळचे कोकणातील रत्नागिरी जवळील म्हापण या गावचे होते. या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने हे घराणे मोल मजूरी करून आपली उपजिवीका करत असे. परिस्थितीला कंटाळून बाबुराव ठाकुर यांचे पणजोबा आपल्या कुटूंबाचे नाशिब अजमावण्यासाठी मुळ गावातून स्थलांतर करून कोल्हापूर जिल्हयातील सध्याच्या आजरा तालुक्यातील 'कोरीवडे' या गावी येऊन स्थायिक झाले.[११८] कालांतराने बाबुरावांचे वडील राजाराम हे शिक्षणानिमित्त बेळगाव या शहरात आले. त्या ठिकाणी स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. बेळगाव येथील बेनन् –स्मिथ मिशन हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. बेळगाव येथेच कायमचे स्थायिक झाले. काही वर्षानंतर शिक्षकाची नोकरी सोडून ते पोलिस खात्यात हवालदार म्हणून रूजू झाले. पुढे ते आपल्या कर्तबगारीवर फौजदार या हुद्दयावर पोहचले. त्यांची स्वभाव वृत्तीही स्वाभिमानी असल्याने वरिष्ठांची गैरमर्जी होऊन फौजदारकीची नोकरी सोडावी लागली. तरी पण आपल्या कुटुंबाचा व्यवस्थितपणे सांभाळ केला. आपल्या सर्व अपत्याना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यांना चांगल्या संस्कारात वाढविले. तीन जेष्ठ कन्या अनुक्रमे

चिमाक्का, शांती आणि सुभद्रा या मुलींना इयत्ता सातवी पर्यंतचे मुलकी शिक्षण दिले व आपल्या तोला–मोलाच्या घराण्यातील मुलांशी विवाह लावून दिले. मोठा मुलगा धोंडू उर्फ बाबुराव व लहान मुलगा यशवंतराव यांनी एल.एल. बी. पर्यंत शिक्षण यशस्वीरीत्या घेऊन ते बेळगाव येथेच वकिलीचा व्यवसाय करु लागले. २ जानेवारी १९४७ रोजी बाबुराव ठाकुर यांच्या वडीलांचा मृत्यू झाला. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी बाबुरावांच्यावर आली.[११९]

१.३२.१.२ बाबुरावाचे बालपण व शिक्षण –

धोंडू उर्फ बाबुरावाचा जन्म दिनाक २६ डिसेंबर १८९९ रोजी चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) श्रीपादवाडी येथे त्यांच्या आजोळी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव राजाराम व आईचे नाव रमाबाई असे होते. या दांपत्याच्या पोटी अनेक अपत्य जन्माला आली. त्यातील काही जगली नाहीत. ज्यावेळी बाबुरावाचा जन्म झाला तेव्हा त्याचे नाव धोंड असे ठेवले. त्यावेळच्या समजुतीप्रमाणे आपला मुलगा धोंडया गुंडयाप्रमाणे धडधाकट राहो. पण प्रौढपणी धोंडू या नावातील विचित्रपणा त्यांना जाणवू लागला. त्यास बाबू या नावाने सर्वजण त्यांना ओळखू लागले. हेच पुढे बाबुराव या नावाने परिचयाचे झाले. बाबुरावाचे वडील हे पोलिस खात्यात नोकरीला असल्याने त्यांच्या बदलीचा प्रसंग या कुटुंबावर वारंवार येत असे. अशा वेळी मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होऊ नये, म्हणून त्यांचे वडील पूर्ण दक्ष होते.[१२०]

बाबुरावांचे प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण बेळगावांत पुर्ण झाले. ते १९१९ मध्ये एच.एच.सी परीक्षा उत्तीर्ण झाले.[१२१] महाविद्यालयीन शिक्षणासाठी बाबुराव सांगली येथील विलिंग्टन महाविद्यालयान दाखल झाले. या अगोदर ते समाज कार्याकडे वळले होते. उच्चशिक्षणात ते फार काळ रमले नाहीत. त्यांना हॉकी, क्रिकेट, फुटबॉल या खेळांची अधिक आवड तसेच विविध देशातील राजकीय विचारवंताची पुस्तके वाचने यामध्ये नेपोलियन बोनापार्ट, मॅझिनी, गॅरिबाल्डी, रूसो, कार्ल मार्क्स या विचारवंताच्या विचाराचा दिवसेंदिवस पगडा पडत गेला. त्याचबरोबर शिक्षण घेत असताना जो मित्रपरिवार त्यांना लाभला तोही देशप्रेम व समाजातील जडण–घडणीकडे खेचून नेणारा असाच होता. या सर्व गोष्टीचा परिणाम होऊन बाबुरावाच्या या तरूण वयात सामाजिक व देश हिताच्या गोष्टी बळावल्या होत्या. त्यातच देश स्वातंत्र्याच्या प्रेमाचे बाबुरावाना विद्यार्थी दशेपासून वेड होते. तसेच आपण समाजासाठी काही तरी करावे, या हेतूने आपल्या सहकार्याच्या मदतीने बेळगाव येथे सन

१८१८ मध्ये 'भारत वैभव' समाजाची स्थापना केली.[१२२] या संस्थेने अल्पकाळात वाचनालय सुरू केले. शिवाय साक्षरता प्रसारासाठी त्यांनी कामगार वर्गात रात्रीच्या शाळा काढल्या. बेळगाव शहरात फिरून शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटवून दिले. शिक्षणाबाबत जागृत झालेल्या लोकांच्यासाठी प्रौढ शाळा काढल्या.[१२३]

१.३२.२ राजकीय कार्यः–

तरूण विद्यार्थ्यांना देशकार्याकडे वळवण्यासाठी, त्यांच्या विचारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची माहिती करून देण्याच्या उद्देशाने 'भारत वैभव' या संस्थेमार्फत सन १९१९ ला 'तरूण भारत' हे मासिक बेळगावात सुरू करण्यात आले. संपादक, लेखक व वाचकही तरूण असतील त्यासाठीच खास करून 'तरूण भारत' या मासिकाची निर्मिती झाली.[१२४]

महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी बाबुराव हे वडीलांच्या सांगण्यावरुन सांगलीतील विलिंग्टन कॉलेज मध्ये दाखल झाले होते. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर, महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली देशातील स्वातंत्र्याची चळवळ हाती घेण्यात आली. ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्याची चळवळ मोडून काढण्यासाठी रौलट कायद्याचा प्रस्ताव मंजूर केला. या जुलमी कायद्याला गांधीजींसह सर्व भारतीय नेत्यानी विरोध केला. सर्व देशभर हरताळ पुकारण्यात आले. त्यावेळी कायद्याचा भंग केला म्हणून गांधीजींना अटक करण्यात आली. या सर्व घडामोडीचा परिणाम तरूण बाबुराव ठाकुर यांच्यावर होऊन ते राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित झाले. जालियनवाला बाग हत्याकांडने (१९१९) सर्व देश हादरून गेला. इंग्रजांच्या न्याय बुध्दीवरील गांधीर्जीचा विश्वास उडाला व ब्रिटिशांच्या विरूध्द असहकाराचा कार्यक्रम सर्वाच्या समोर ठेवला.[१२५] त्यावेळी कोर्ट–कचेऱ्या, शाळा कॉलेज यावर बहिष्कार घालून या असहकारितेच्या चळवळीत उडी घेणाऱ्या तरूणांची देशभर लाट उसळली. बाबुरावांनी देश कार्यासाठी इतर विद्यार्थ्यांच्या सारखेच शिक्षणास रामराम ठोकून गांधीच्या असहकारितेच्या आंदोलनात भाग घेतला.[१२६] बाबुरावांचे हे वागणे मात्र त्यांच्या वडीलांना आवडले नाही. शेवटी वडीलांचा रोष पत्करून बाबुरावांनी देश स्वातंत्र्य संग्रामात स्वतःला झोकून घेतले. या असहकार चळवळीच्या माध्यातून बाबुरावांच्या राजकीय जीवनात श्रीगणेशा झाला. भारतास स्वातंत्र्य मिळेपर्यंत गांधीचे नेतृत्त्व काँग्रेस विचाराशी व चळवळीशी एकनिष्ठ राहिले. भारत स्वातंत्र्य चळवळीच्या

सुमारास त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी नियोजनबंध्द पध्दतीने पूर्ण केल्या.

असहकार कार्यक्रमात 'दारू गुत्यासमोर' पिकेटींग केल्यामुळे त्यांना सर्वप्रथम १९२१ मध्ये कारावासाची तीन महिन्याकरीता शिक्षा ठोठावण्यात आली.[१२७] तसेच सविनय कायदे भंगाच्या चळवळीत हिंडलगा जेलसमोर प्रक्षोभक भाषण केल्यामुळे त्यांना सहा महिने हिंडलगा जेलमध्ये ठेवण्यात आले.[११६] शिक्षा पूर्ण करून आल्यानंतर त्यांना बेळगाव सिटी पोलिस कचेरीवर दररोज हजेरी देण्याचे काम लावण्यात आले. या कामाला त्यांनी विरोध दर्शविल्याने परत त्यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यावेळी त्यांना नाशिक जेलमध्ये ठेवण्यात आले. सन १९४२ च्या चले जाव आंदोलनात बाबुरावांना पुन्हा दीड वर्ष मुदतीचा कारावास ठोठावण्यात आला. त्यावेळी त्यांची रवानगी नाशिक जेलमध्ये करण्यात आली.[१२८]

बाबुरावांना झालेल्या कारावासाबाबत त्यांच्या राजकीय जीवनांची व देशकार्याची खरी ओळख होते. या त्यांच्या कार्याच्या प्रेरणेतून बेळगाव विभागातून देशकार्यासाठी फार मोठी व भक्कम तरूण कार्यकर्त्यांची फळी उभा राहिली. त्यांनी रस्त्यावर उतरून चळवळी केल्या तर कधी 'तरूण भारत' या साप्ताहिकातून प्रकट लेखन करून ब्रिटिशांना ताळ्यावर आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

सन १९२३ मध्ये काकीनाडा (आंधप्रदेश) या ठिकाणी काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या ठिकाणी बेळगावचे प्रतिनिधीत्व बाबुराव ठाकुर यांनी केले. याच अनुभवाच्या जोरावर १९२४ साली महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली बेळगावं येथील ठळकवाडी येथे राष्ट्रीय काँग्रेसचे ३९ अधिवेशन भरले होते.[१२९] अखिल भारतातील बहुतेक सारे नामवंत पुढारी या अधिवेशनाच्या निमित्ताने बेळगावात आले होते. हे अधिवेशन नियोजनबध्द पध्दतीने पार पाडण्यासाठी डॉ. एन. एस. हर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली बाबुरावांनी बेळगांव जिल्हा स्वयंसेवक संघटना स्थापून अधिवेशनाची व्यवस्था पहाणेसाठी बरेच परिश्रम घेतले. अधिवेशनावेळी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्यवस्थित व्हावा म्हणून बाबुरावांच्या मार्गदर्शनाखाली एक विहिर खोदण्यात आली होती. आज ती 'काँग्रेस विहिर' म्हणून प्रसिध्द आहे. त्यावेळचे काँग्रेसचे एकमेव स्मारक म्हणून विहिर ओळखली जाते.[१३०]

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात बेळगाव परिसरातील सर्व आंदोलनात बाबुराव नेहमी अग्रभागी राहिले. महात्मा गांधींजीची असहकाराची चळवळ, सविनय कायदेभंगाची

चळवळ, व 'भारत छोडो' आंदोलन या कालानुक्रमे घडलेल्या सर्व आंदोलनाशी बाबुरावांची पत्रकारिता जशी निगडीत होती तसेच त्यांचे नेतृत्वही निगडित होते.[१३१] भारत स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्न निर्माण झाला. त्या सीमा लढ्याचे झुंजार सेनानी म्हणून बाबुरावांचा उल्लेख केला जातो. खरोखर त्यांचे अवघे अस्तित्वच जणू सीमा प्रश्नाने व्यापलेले होते. सीमा प्रश्न हे त्यांच नुसते ध्येय नव्हते, तर तो त्यांचा एकमेव ध्यास होता. त्यांच्या सतत संभाषणाचा चिंतनाचा लिखाणाचा तो विषय होता. मराठी भाषिकाना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी खूप कष्ट घेतले, पण त्यांच्या हयातीत या प्रश्नाबाबत यश मिळाले नाही. ही फार मोठी खंत होती. आजही या प्रश्नाने गंभिर स्वरूप धारण केले आहे. दिवसें दिवस कर्नाटक सरकार या मराठी भाषिक लोकांच्यावर वेगवेगळया प्रकारची बंधने लादत आहे. अशावेळी बाबुराव ठाकुर यांचे स्मरण झाल्याशिवाय मराठी भाषिक लोकांना राहवत नाही. एक स्वातंत्र्य सेनानी, म्हणून काँग्रेस प्रणीत राजकीय कार्यक्रम बेळगाव भागात नियोजनबध्द राबवून तरूण कार्यकर्त्यांची काँग्रेसच्या बाजूने खंबीर फळी उभी केली. त्यांच्या राजकीय कार्यावरून त्यांच्यामधील असणारे देशप्रेम, राष्ट्र बांधणी व समाजकारण या बाबी स्पष्ट होतात.

१.३२.३ शैक्षणिक कार्यः–

खेडयातील शेतकरी व कामगारांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या जनतेला अज्ञान व अंधःकारातून बाहेर पडावयाचे असेल किंवा स्वातंत्र्याचा लढा अधिक तीव्र करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, म्हणून शिक्षण या समाजाला अनिवार्य आहे त्यासाठी त्यांनी बेळगाव परिसरात शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले.[१३२]

सुरूवातीच्या काळात 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजात शिक्षणाची गोडी व प्रसार करण्याबाबत बरेचसे लेखन केले. त्या बरोबर प्रत्यक्षात या शिक्षण प्रसारासाठी ते उतरले तेव्हा चंदगड सारख्या दुर्गम भागात खेडोपाडी आणि धनगर वस्तिवर जाऊन शिक्षणाबाबत माहिती पटवून दिली. या शिक्षणाच्या मागासलेपणामुळे आपण कसे मागास झालो. पाश्चात्यांना या शिक्षणाचे महत्व का पटले? या बरोबरचे सर्व खुलासे प्रत्यक्षात भेटून त्या लोकांच्यात शिक्षणविषयक जागृती निर्माण केली. त्यांच्या या प्रयत्नामुळे सीमा भागात शिक्षणाचा प्रसार झाला.

आण्णासाहेब लठ्ठे व मित्र मंडळीच्या सहकार्याने बाबुरावांनी ऑक्टोंबर १९३७ मध्ये 'बेळगांव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची' स्थापना केली.[१३३] व शिक्षणप्रसार कार्याची सुरूवात म्हणून चंदगड तालुक्यातील नांदवडे या गावी १० डिसेंबर १९३७ रोजी पहिली प्राथमिक शाळा स्थापन केली. पुढील दहा वर्षाच्या कालावधीत या समितीमार्फत बेळगाव परिसर व चंदगड आजरा या भागात मराठी, उर्दू व कानडी अशा एकूण १८० शाळा काढल्या. अशा प्रकारचा क्रांतिकारक प्रयत्न बेळगाव परिसरात बाबुरावांनी केला. या कार्यात यशही मिळाले. हे बाबुरावांचे कार्य प्राथमिक शिक्षणापुरते मर्यादित न रहाता उच्च शिक्षणापर्यंत पोहचले.

बेळगाव भागात उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेवून बाबूरावांनी राणी पार्वतीदेवी महाविद्यालयाची स्थापना केली. या त्यांच्या प्रयत्नामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय झाली. शिक्षण हे दर्जेदार व आधुनिक विचारांची सांगड घालणारे असावे. या बाबत ते कायम जागृत असत.

बाबुरावांच्या प्रयत्नातून खेडोपाडी ग्रामीण भागात शिक्षण पोहचले. पण शिक्षण देण्यासाठी जो शिक्षक वर्ग लागतो, त्यासाठी बेळगाव येथे सन १९३८, १९४१, १९४२ मध्ये बेळगाव जिल्हा शिक्षकांची प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील जवळीकता साधण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर शिक्षकांची शारीरिक व बौध्दिक गुणवत्ता वाढविण्यासाठी नामवंत व्यक्तिची व्याख्याने आयोजित करत.[१३४] परंतू त्यामुळे प्रशिक्षित शिक्षणाची गरज पूर्ण होणार नव्हती. म्हणून त्यांनी बेळगावात पुढे १७ जून १९४२ साली बेळगाव येथे अध्यापक महाविद्यालयाची स्थापना करून सर्व सामान्य घटकातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन शिक्षक म्हणून उभा केले. त्याच बरोबर बेळगाव परिसरातील बहुजन वर्गातील विद्यार्थ्याला शिक्षक होण्याची संधी निर्माण करून दिली. शिक्षक व शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टिने बाबुरावांनी केलेले हे कार्य फार महत्त्वाचे आहे.

बेळगाव परिसरातील शोषित व दरिद्री, अज्ञानी कामगार वर्गावर सातत्याने होणाऱ्या अन्यायाची जाणिव करून देण्यासाठी व हक्कासाठी या कामगार वर्गाला शिक्षण महत्त्वाचे आहे. या विचारातून बाबुराव ठाकुर यांनी रात्रीच्या प्रौढशाळा सुरू केल्या. अल्पकालावधीत बेळगाव शहरात वेगवेगळया ठिकाणी ७ शाळा चालू केल्या.[१३५]

स्वातंत्र्य पूर्वकाळात बाबुरावांनी रात्रशाळा, प्रौढशाळा, प्राथमिक शाळा, उच्चशिक्षण देणारी महाविद्यालय, अध्यापन महाविद्यालये खास कामगार वर्गासाठी शाळा स्थापन करून बेळगाव व परिसरात शैक्षणिक दृष्टया फार मोठी क्रांती केल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या या कार्यामुळे स्वातंत्र्य पूर्वकाळात उच्चवर्गीय श्रीमंत, धनिक या वर्गाची शिक्षणातील मक्तेदारी संपुष्टात आणून बहुजन वर्गाला शिक्षणाच्या प्रवाहात आणून ज्ञानाचे दरवाजे उघडून दिले. या त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे बेळगाव परिसराला शिक्षणाची मोठी परंपरा लाभली. त्याच बरोबर मराठी भाषिक समाज उच्चशिक्षित बनण्यात मदत झाली.

१.३२.४ बाबुरावांचे वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य

बाबुरावांचे वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य 'तरूण भारता'पुरते मर्यादित नव्हते. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या स्थापनेत (२२ जून १९४१) व अधिवेशनात बाबुरावांचा कायमच सक्रीय सहभाग होता. हा संघ वाढीस लागावा म्हणून त्यांनी जाणिवतेने प्रयत्न केले होते. या संघाचे १० वे अधिवेशन बेळगाव येथे भरले होते. त्यावेळी अधिवेशनाचे स्वागताध्यक्षपद बाबुरावांनी भुषविले होते.[१३६]

बाबुराव ठाकुर एक वृत्तपत्रकार म्हणून जनतेत लोकप्रिय होते. त्यांच्या या कार्याबाबत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील प्रसिध्द व्यक्तीनी गुणगौरव केला आहे. ८ जानेवारी १९५४ रोजी झालेल्या 'तरूण भारत' रौप्य महोत्सव समारंभाच्या वेळी माजी केंद्रिय मंत्री काकासाहेब गाडगीळ यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले होते. या कार्यक्रम प्रसंगी देशातील मान्यवर व्यक्तीनी त्यांना शुभसंदेश पाठवून शुभेच्छा दिल्या होत्या. त्या शुभसंदेशातील मजकूरावरून बाबुरावांची व्यक्तीगत प्रसिध्दी सर्वांसमोर येते.[१३७]

'तरूण भारत' हे बेळगावातील एक प्रमुख दैनिक होय. या दैनिकाची प्रगती झाली आहे. तिचे संपूर्ण श्रेय बाबुराव ठाकुर यांच्या कर्तृत्वाला दिले पाहिजे. 'तरूण भारत' या वृत्तपत्राची जहाल, धडाडीचे निर्भिड पत्र अशी किर्ती आज दिसते. त्या पाठीमागे प्रेरणाही बाबुरावांची आहे. कर्नाटक सरकारशी मराठी भाषिक लोकांची गाऱ्हाणी व्यक्त करणारे हे वृत्तपत्र आजही कर्नाटक सरकारला दखल पात्र ठरणारे व धडकी भरवणारे आहे. मराठी माणसांच्या अग्रस्थानी असणारे व सीमा प्रश्न कायम जाज्वल व जिवंत ठेवणारे निर्भिड वृत्तपत्र म्हणून महाराष्ट्र व कर्नाटक राज्याला परिचयाचे आहे.[१३८]

महाराष्ट्राच्या प्रबोधनातील 'तरूण भारत' आणि बाबुराव ठाकुर यांचे स्थान अनन्य साधारण आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनाशी समरस होऊन, कर्नाटक राज्यात अडकलेल्या मराठी भाषिकांच्या बाजूने कायम वसा घेऊन जाज्वल असा संघर्ष ठेवला. त्याचबरोबर मराठी वृत्तपत्र सृष्टीमध्ये स्वतःची अशी एक वैशिष्टयपूर्ण मुद्रा 'तरूण भारत'ने उमटविली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सहकार, शेती उद्योग, व्यापार, कला, क्रिडा, धर्म आणि संस्कृती अशा अनेक विविध क्षेत्रात सन १९१९ ते १९७९ या ६० वर्षातील 'तरूण भारत'ने केलेले विधायक कार्य अत्यंत मोलाचे आहे.

१.३२.५ सामाजिक कार्य :–

बाबुराव ठाकुर हे समाजाच्या उन्नतीसाठी सतत धडपडत असत. अंधश्रध्दा, जातीयता, उच्चनिच्च भेद, शिक्षणाची उदासिनता व अडाणीपणा इत्यादी कारणाने आपला भारतीय समाज अधोगतीच्या गर्तेत अडकलेला आहे. या समाजाची प्रगती साधावयाची असेल तर शिक्षणाबरोबर समाजातील अनिष्ठ चाली–रिती परंपरा, अंधश्रध्दा यांचा कायमचा नायनाट झाला पाहिजे. वर्षानुवर्षे याच विषमतेच्या गर्तेत हा समाज नाडलेला आहे. या परिणामाची खातर जमा करून बाबुरावांनी समाज सुधारणेचे कार्यं हाती घेतले. सुरूवातीच्या काळात 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजकारण सावरण्याचा प्रयत्न केला. जनजागृतीच्या माध्यमातून समाजातील परंपरेवर परखड हल्ले चढवले. याबाबत पूरक असे लेखन केले व समाज जागृती घडवण्याचा प्रयत्न केला. या लेखनात त्यांनी समाजातील ज्या जुन्या चाली–रिती आहेत उदा. यात्रा, सण, सोवळे–ओवळे व पाप–पुण्य यांच्या विरोधात आपल्या वृत्तपत्रात गांभिर्याने लेखन केले. त्यांचे परिणाम स्पष्ट करून या ग्रामीण भागातील समाजात जागृती निर्माण केली. त्याचबरोबर होळीच्या सणातील बिभत्स प्रकार, जत्रेत होणारी प्राण्यांची हत्या इत्यादी बाबत परखड लेखन करून समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. धर्माच्या नावाखाली समाजाची ठरावीक वर्गाकडून कशाप्रकारे पिळवणूक केली जाते. याची उदाहरणे सांगून लोकांना जागृत केले.[१३९]

मानवी प्रगतीच्या मार्गातील अस्पृश्यता हा अडथळा असल्यामुळे तो नाहीसा करण्यासाठी सर्व स्तरातील लोकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. जाती व्यवस्थेच्या अस्पृश्यतेचा त्याग करावा इतरांनाही मनुष्य म्हणून जगू द्या. असे प्रखर लेखन संपादकीय

लिहून अस्पृश्यते विरूध्द जागृती केली. खेडोपाडी फिरून सभा घेऊन सामाजिक, न्याय व समतेचा पुरस्कार केला. चंदगड, बेळगाव या विभागातील मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळवून देऊन सामाजिक समतेची क्रांती घडवून आणली.[१४०]

खेडयागावंच्या अडचणी लक्षात घेवून या ग्रामीण भागातील लोकांना बाबुरावांनी प्रथमतः स्वतःच्या आरोग्याबाबत जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. चंदगड तालुक्यातील ग्रामीण भाग हा अधंःश्रध्देच्या आहारी गेलेला, डॉक्टर बाबत उदासिन असणारा अशा या विभागात डॉक्टरांच्या समवेत बाबुराव हे उपस्थित राहून सभा घेत व आरोग्याबाबत जाणीव करून देत. समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.[१४१] त्याच बरोबर चंदगड व आजरा तालुक्यातील लहान मोठी १२५ खेडी गावकऱ्यांच्या श्रमदानातून कच्च्या रस्त्यांनी शहराला येणाऱ्या मुख्य रस्त्याला जोडली. त्यांचे हे कार्य मानवतेच्या दृष्टिने कौतुकास्पद होते. अशाप्रकारे ग्रामीण भागातील दुरवरची खेडी शहरी भागाला जोडून ग्रामीण जीवनाचा संबंध शहरी जीवनाशी आणला. त्यामुळे खेडयातील जनता नंतरच्या काळात स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाली. खेडयातील शेतकरी वर्ग जुन्या चालत आलेल्या शेती पध्दतीत अवलंबून न रहाता आधुनिक शेती पध्दतीकडे वळू लागला. यासाठी बाबुरावांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. खते, बी–बियाणे, नवी अवजारे कशी वापरावीत. याबाबत खेडोपाडी माहिती देण्यासाठी त्यांनी शेती गटांची स्थापना केली व शेतकरी वर्गात शेती विषय जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[१४२]

भारताची भाषावार प्रांतरचना करण्यासाठी नेमलेल्या राज्य पुर्नरचना समितीने आपला अहवाल १० ऑक्टोंबर १९५५ रोजी प्रसिध्द केला. बेळगाव–कारवार–निपाणीसह मराठी भागाचा समावेश कर्नाटक राज्यात झाल्याचे जाहीर केले. तेव्हापासून मराठी माणसांच्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात बाबुराव ठाकुर यांनी आपल्या मृत्यूपर्यंत सातत्याने संघर्ष केला. एक झुंझार नेता या नात्याने सीमा चळवळीच्या प्रत्येक टप्प्यात त्यांनी भाग घेतलेला आहे. या आंदोलनाच्या संदर्भात 'तरूण भारत'या वृत्रपत्राच्या माध्यमातून सीमा प्रश्न सतत जिवंत ठेवण्याचे अवघड असे कार्य केले आहे. सीमा प्रश्नाकरिता बाबुरावांच्या हयातीत ज्या सभा व परिषदा झाल्या, जे सत्याग्रह घडून आले, मोर्चे निघाले, जी शिष्टमंडळे दिल्लीला गेली, ज्या निवडणूका झाल्या त्या सर्वामध्ये बाबुराव नेहमीच अग्रस्थानी राहिले.[१४३]

१.३२.६ शेवटचे दिवस

श्री. बाबुराव ठाकुर हे आजारी पडल्याने डॉ. याळगीं यांच्या सल्ल्याने मुंबईतील डॉ. बावडेकर यांच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले. आजाराचे गांभिर्य ओळखून डॉ. बावडेकरांनी मुंबईतील प्रसिध्द टाटा मेमोरियल रूग्णालयात त्याना ॲडमिंट केले. त्यांचा आजार डॉक्टरांच्या अथक प्रयत्नानी सुध्दा बरा होत नव्हता. त्यावेळी बाबुरावांनी आपल्या कुटुंबाला डॉक्टरांच्यासमोर 'आता मला इथे राहायचे नाही मला बेळगावला घेवून चला' असा तगादा लावला. मात्र अशावेळी बाळासाहेब ठाकरे यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. बेळगावला यायच्या दिवशी सकाळी शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे भेटायला आले. बाबुरावांना म्हणाले, "बाबुराव तुम्ही लवकर बरे व्हा. तुमचा सीमेचा प्रश्न लवकर सुटेल व त्याकरिता शिवसेना जोरदार प्रयत्न करील. तुमच्या हातात झेंडा देवून आम्ही तुम्हाला पुढे करणार ! तेव्हा लवकर बरं व्हा. मी तुम्हाला तसे वचन देतो." असे बाळासाहेबांनी म्हणताच बाबुरावांनी अशा परिस्थितीतही आपला उजवा हात वचनासाठी पुढे केला आणि तो बाळासाहेबांनी हातात घेतला.[१४४]

बाबुराव ठाकुर हे मृत्यूच्या शेवटच्या घटकेपर्यंत सीमा प्रश्नासाठी व मराठी माणसासाठी घुसमटत होते. शरीरातील यातना पेक्षा ही विवेचना मोठी सतावत होती. १९५६ नंतर सीमा प्रश्नासाठी अहोरात्र झटतच राहिले. पण त्यांच्या कार्याला त्यांच्या हयातीत नाहीतर आजपर्यंत यश आले नाही.[१४५]

मुंबईतुन बेळगावला जाण्यासाठी भाई वैद्य यांनी महाराष्ट्र शासन विमानाची व्यवस्था करून दिली. बेळगावला आल्यानंतर बाबुरावाना डॉ. कित्तूर यांच्या दवाखान्यात ठेवण्यात आले. २३ एप्रिल १९७९ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी दुपारी २ वाजून १० मिनिटांनी दवाखान्यातच प्राणज्योत मालवली दुर्धर कॅन्सर अशा आजाराने त्यांचा मृत्यू झाला.[१४६]

१.३२.७ बाबुराव ठाकुर यांच्याबद्दल विद्वानांची मते

"बाबुराव ठाकुर यांच्या निधनाने सीमा लढयातील बिनीचा सेनानी पडला. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न पाटसकर सूत्र मान्य करून निश्चित तत्त्वावर सोडवावा. त्यासाठी अखेरपर्यंत ते झगडले त्यासाठीच दोन महिन्यापूर्वी त्यांनी दिल्लीची वारी केली होती. त्यांच्या निधनाने एक तत्त्वनिष्ठ पत्रकार तर गमावलाच पण सीमा-लढयाचे मोठे नुकसान झाले आहे."

अशी प्रतिक्रिया सीमा लढयातील पहिले सत्याग्रही खासदार श्री. जयंतराव टिळक (पुणे) यांनी व्यक्त केली आहे.[१४७]

महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष श्री. बाबुराव ठाकुर यांच्या निधनाबद्दल त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवारसाहेब यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. ते म्हणतात, 'श्री. ठाकुर यांच्या निधनामुळे एक सिध्द हस्त पत्रकार आणि सचोटीचे कार्यकर्ते हरपले'.[१४८]

महाराष्ट्राचे त्यावेळचे माहिती व ग्रामीण विकासमंत्री श्री. राजाराम बाबू पाटील हे दुःख व्यक्त करताना म्हणतात, "त्यांनी निष्ठेने 'तरूण भारत' चालवून स्वातंत्र्य व लोकशाहीचा पुरस्कार केला. स्वातंत्र्य लढयात आघाडीवर राहून व स्वातंत्र्योत्तर काळात जनतेचे प्रश्न पोट तिडकीने मांडून मोठी कामगिरी बजावली आहे. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी केलेले कार्य, घेतलेले कष्ट व सोसलेला त्याग महाराष्ट्राच्या सदैव स्मरणात राहील."

'सीमा प्रश्नासाठी आयुष्यभर झुंज देणारा लढवय्या पत्रकार हरपला.' अशा शब्दात अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस श्री. यशवंत माने यानी आपली भावना व्यक्त केली आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ केळकर म्हणतात की 'आपल्या ६० वर्षाच्या सार्वजनिक खडतर कार्याला एक प्रकारची प्रतिष्ठा मिळवून दिली.'

१.३३ समारोप–

'तरूण भारत' या वृत्तपत्राचा उदय व विस्तार हा कर्नाटक राज्यातील बेळगाव या शहरातून झाला. वृत्तपत्रे ही सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना त्यांना अनेक प्रश्नांना भिडावे लागते. अशा वेळी वृत्तपत्रांना सामाजिक जबाबदारीचे भान असावे लागते. समाजाच कोणतेही काम एखादे वृत्तपत्र किती प्रभावीपणे मांडते व त्यांचे प्रश्न कसे सोडवतो. यावरून त्या वृत्तपत्राची सामाजिक शक्ती किती प्रभावी आहे, हे लक्षात येते. वृत्तपत्र हे समाजाचे दर्पण असते. प्रचलित सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय विषयांच्या संदर्भात उपयुक्त, बोधप्रद आणि विचारप्रवर्तक लेखन प्रकाशित करून समाजाला बोध करणे, ज्ञान प्रसार करणे व त्याद्वारा देश हिताचे विचार जागृती करणे हे वृत्तपत्रांचे विशेष आणि महत्वूपर्ण कार्य होय. वृत्तपत्रांच्या या कार्यामुळे समाजात जागृती होऊन महाराष्ट्र हा पुरोगामी विचाराकडे वळलेला दिसतो. वृत्तपत्रांच्या या कार्यामुळेच स्वातंत्र्योतर काळात लोकशाही दृढ व बळकट

करून ग्रामीण व शहरी भागातील लोकांना जागृत व कार्यरत ठेवले आहे. या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार केला तर या वृत्तपत्राने लोकजीवनाला उपयोगी ठरणाऱ्या कार्याकडे समाजाला खेचून आणले आहे. समाजाची सर्वांगिण प्रगती साधण्याचा प्रयत्न या वृत्तपत्राच्या कार्यातून झाल्याचे स्पष्ट होते.

बाबुराव ठाकुर हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत नेते होते. संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढा चळवळीचा झुंजार सेनानी सीमा भागातील १०० गावात कर्नाटक सरकारच्या विरोधात शेतसारा बंदी चळवळ पुकारून सरकारला ताळ्यावर आणले होते. समाजाचे हित हृदयाशी कुरवाळणारा लाखो गोरगरिबांचा कुटुंबकर्ता, गोवा मुक्तीसाठी झटणारा, आधुनिक शैक्षणिक दृष्टी शिक्षण संस्थात उतरविणारा, तसेच शेतकऱ्यांची, शेतमजूरांची, कामकऱ्यांची दीन–दलितांची दुःखे स्वतःच्या खांद्यावर वाहून 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून गोरगरीबाचे अश्रु पुसणारा व त्यांना न्याय मिळवून देणारा मराठी भाषिकांचा आधारस्तंभ होता. बाबुराव ठाकुर यांचे कार्य त्यांचे चिरंजीव किरण ठाकुर हे पुढे चालवत आहेत.

संदर्भ सूची –

१) फॉलिंगरेन, कॉम बेळगाव, फॉलिगरेन कॉम, २८ एप्रिल २०१२ (इंग्रजी भाषेत)

२) गोगटे भा. वि., बेळगाव दर्शन, बेळगांव ललित प्रेस १९७०, पृ. १

३) भारतीय जनगणनेची साठवलेली माहिती, – वेब अर्काईन कॉम, भारतीय जनगणना आयोग / वेबअर्काईन .कॉम ०३ मार्च २०१२ (इंग्रजी भाषेत)

४) 'दैनिक पुढारी' कोल्हापूर आवृत्ती, १ नोव्हेंबर १९८२, पृ.३

५) मुचंडी कृष्णा, बेळगावातील मराठी समाज, मराठी युवकसंघ स्मरणिका, १९७६, पृ. ५

६) बेळगाव विकिपीडिया. कॉम २ ऑगस्ट २०१२ (मराठी भाषेत)

७) कामत सुर्यनाथ, संपादक बेळगाव गॅझिटिअर्स, पृ. ५०

८) मुचंडी कृष्णा, बेळगावातील मराठी समाज, उपरोक्त, १९७६ पृ.१

९) इन्टरनेट विकिपीडिया. कॉम बेळगाव, ८ सप्टेंबर २०१२ (सेंट्रन एक्साईज बेळगांव)

१०) दैनिक 'तरूण भारत' बेळगाव, बेळगावच्या नामांतरास केंद्र सरकारचा नकार, २१ ऑगस्ट २००७, पृ. १

११) देशपांडे बा.य., बेळगावातील स्वातंत्र संग्राम, बेळगाव जिल्हा खादी ग्रामोद्योग संघ, जे कॉय प्रिर्टींग प्रेस, बेळगाव, १९७२, पृ. ४

१२) कित्ता, पृ. ३५

१३) जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश खंड १७, पृ. ६८

१४) केळकर न. चि; वृत्तपत्रमीमासा, निलकंठ प्रकाशन पुणे, १९६५ पृ. ३

१५) देशपांडे अ.वा., आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास भाग – १, १९७४, पृ. ४३७

१६) जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), उपरोक्त, पृ. ६८

१७) कित्ता – पृ. ६८

१८) देसाई दाजीबा, (संपा) 'राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, सुवर्ण महोत्सवी विशेषांक १९२१ – १९७१, पृ. ८

१९) गुप्ते आर एस., द हिस्ट्री ऑफ मॉडर्न चायना, नॅशनॅलिज ॲन्ड कम्युनिझम इन इंडिया स्टिर्लिंग, प्रकाशन १९७४, पृ.२

२०) कानडे रा. गो., मराठी नियतकालिकाचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई १९३८, पृ.११

२१) सरकार चंचल, कहानी वर्तमानपत्राची, (अनु.दिनकर मांगल) नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली, १९८९, पृ. ४

२२) सुतार, पटवर्धन, वर्तमानपत्राचा इतिहास, शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळ, जुलै २००३, पृ. ७

२३) सरकार चंचल, उपरोक्त, पृ.७

२४) सुतार, पटवर्धन, उपरोक्त, पृ. ६

२५) निर्मळे हरिचंद्र सिद्राम, दलितांची मराठीतील नियतकालिके एक विवेचन अभ्यास (इ.स. १८८७ ते १९५०), पीएच. डी पदवीसाठी (मराठी) शिवाजी विद्यापीठास सादर केलेला प्रबंध, १९८१ पृ. ८१

२६) लेले. रा. के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, तृतीया आवृत्ती, २००९, पृ. १९,२०

२७) गोखले किरण, 'पत्रकारिता विद्या, वृत्तसंकलन (लेख) भट. गो. आ, मॅजिस्टेक प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००३, पृ. ४७

२८) कित्ता, पृ. ४७, ४८

२९) सरकार चंचल, उपरोक्त, पृ. ८

३०) कित्ता, पृ. ८,९

३१) लेले रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेट्ल प्रकाशन, विजयनगर पुणे, तृतीयावृत्ती, २००९,पृ.२२

३२) कित्ता, पृ. २२–२३

३३) लेले. रा. के. उपरोक्त, पृ. २४

३४) कित्ता, पृ. ४०

३५) कित्ता, पृ. ४०

३६) कित्ता, पृ. ५६

३७) कित्ता, पृ. ५८

३८) अकलुजकर प्रसन्नकुमार, मराठी वृत्तपत्र सृष्टीचे अंतरंग, श्री विद्या प्रकाशन, सप्टेंबर २०००, पृ.२

३९) राव चलपती, उपरोक्त, पृ. १०७

४०) कानडे रा. गो,. मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस पुणे. १९३८, पृ.५०

४१) साप्ताहिक 'लोकमत' रोप्य महोत्सवी अंक, १५ ऑगस्ट १९७८, पृ. १२

४२) कित्ता, पृ. ११,१२

४३) साळुंखे संजय, बाबुराव ठाकुर यांची पत्रकारिता, शिवाजी विद्यापीठाच्या मास्टर ऑफ जर्न्यालिझम अॅड कम्युनिकेशन सायन्स, (एम.जे.सी) या पदवीसाठी सादर केलेला लघुप्रबंध, एप्रिल २०००, पृ. ५,६

४४) कित्ता, पृ. ८

४५) वेणुनाद, ७३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, २००० पृ. ७७

४६) कित्ता, पृ. ७८

४७) देसाई दाजीबा, (संपा) 'राष्ट्रवीर' सुवर्ण– महोत्सवी विशेषांक १९२१ ते १९७१, पृ. ८३ ते ८७

४८) 'वेणुनाद,' उपरोक्त, पृ. ७८

४९) कित्ता, पृ. ८३

५०) कित्ता, पृ. ८२, ८३

५१) पाटील वि.रा,. 'राष्ट्रवीर' वृत्तपत्राचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्य, (सन १९२१ ते १९७७) पीएच.डी (इतिहास) अप्रकाशित शोधप्रंबध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०११, पृ. ६

५२) वेणुनाद, ७३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,२०००, पृ. ७८, ७९

५३) पंत एन.सी., पत्रकारिता का इतिहास तक्षशिला प्रकाशन दिल्ली, प्रथम आवृत्ती, २००२, पृ. ८३

५४) कानडे रा. गो. मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, पुणे १९३८, पृ. ०५

५५) लेले. रा. के, उपरोक्त, पृ. ५

५६) ठाकुर बाबुराव, जळगाव पत्रकार परिषदेतील छापील अध्यक्षीय भाषणे, १३ जून १९६५, पृ. १५

५७) कानडे रा. गो, उपरोक्त, पृ. २

५८) पाटील अनंतराव, तरूण भारतचे बाबुराव ठाकुर, लेख 'विशाल सहयाद्री' २९ एप्रिल १९७७, पृ.१७

५९) लेले रा. के, उपरोक्त, पृ. २१

६०) Barns, Margarita ; The India Press George Allen and Unwin, London, 1940 (Internet www. Barns)

६१) लोहार र.म, आधुनिक भारताचा इतिहास, पुणे विद्यापीठ गृह प्रकाशन पुणे,१९९१, पृ. ९१

६२) पंत एन सी, पत्रकारिता का इतिहास, तक्षशिला प्रकाशन दिल्ली, २००२, पृ. ३२

६३) लेले रा. के, उपरोक्त, पृ. ३७

६४) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, जुलै १९१९, पृ. २०

६५) वेणुनाद, उपरोक्त, पृ. ७९

६६) मासिक, 'तरूण भारत' जुलै १९१९ पृ. २३

६७) कित्ता, पृ. २१

६८) कित्ता, पृ. २३

६९) कित्ता, पृ. २४.

७०) मासिक 'तरूण भारत' बेळगाव जुलै १९१९ पृ. २.

७१) कित्ता, पृ. ३.

७२) मासिक 'तरुण भारत' बेळगाव मे, जून १९१९ वर्ष १ ले अंक १ ला, पृ. १.

७३) कित्ता, पृ. ३.

७४) मासिक 'तरुण भारत', बेळगाव, २८ फेब्रुवारी १९२१, पृ. ३

७५) मासिक 'तरुण भारत' बेळगाव मे, जून १९१९, पृ. ९

७६) प्रभु प्रिया, समरांगण हे जीवन ज्यांचे, प्रकाशन, किरण ठाकुर, 'तरुण भारत, प्रेस समादेवी गल्ली, बेळगाव. प्रथमावृत्ती, १९७५,पृ. ५, ६.

७७) साळुंखे संजय गुंडाप्पा, बाबुराव ठाकुर यांची पत्रकारिता, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर, मास्टर ऑफ जर्न्यालिझय ॲड कम्युनिकेशन सायन्स, (एम.जे.सी.) या पदवीसाठी सादर केलेला लघुप्रबंध, मे २०००, पृ. २०.

७८) मासिक 'तरुण भारत' बेळगाव, फाईल १९१९ ते १९२४.

७९) 'दै. तरुण भारत' एक गौरवशाली परंपरा – तरुण भारतला ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल, ३० मार्च १९९९ रोजी तयार करण्यात आलेला माहितीपट, संकल्पना कथा, दिग्दर्शक, जगदीश कुंटे.

८०) मासिक 'तरुण भारत', मे १९२२, पृ.२

८१) मासिक 'तरुण भारत' जुलै १९२३, पृ. ४

८२) कुंटे जगदीश, सहा. संपादक (दै. तरुण भारत) बेळगांव, २२ मे २०१२ दै. तरुण भारत मुख्य कार्यालय, बेळगाव, मुलाखत, दु. १२ वाजता.

८३) मासिक 'तरुण भारत' जून १९२४, पृ. २ व ५

८४) प्रभु प्रिया 'उपरोक्त', पृ. ५, ६

८५) 'वेणूनाद,' 'उपरोक्त', पृ. ७९.

८६) साप्ताहिक, 'तरुण भारत' बेळगाव, दि. १ ऑगस्ट १९२८, पृ. १

८७) मासिक 'तरुण भारत' बेळगाव फाईल १९१९ ते १९२४

८८) साप्ताहिक, व अर्ध साप्ताहिक 'तरुण भारत' बेळगांव फाईल्स १९२४ ते १९५५.

८९) मासिक 'साप्ताहिक, अर्ध साप्ताहिक' व दैनिक 'तरुण भारत' बेळगाव फाईल १९१९ ते १९७९.

९०) कित्ता, फाईल १९१९ ते १९७९

९१) कित्ता, फाईल १९१९ ते १९७९

९२) वेणुनाद, उपरोक्त, पृ. ७९

९३) कुंटे जगदीश,(सहा. संपादक) 'तरुण भारत' बेळगाव मुलाखत,२२ मे १२ दुपारी १२ वा.

९४) वेणुनाद, 'उपरोक्त', पृ. ८०.

९५) राज्याध्यक्ष ग. गो,. बाबुराव ठाकुरांची पत्रकारिता, लेख अक्षर यात्रा' पुरवणी दै. 'तरुण भारत' बेळगाव, २६ डिसेंबर १९९९.

९६) 'तरुण भारत' फाईल १९१९ ते १९६५ पर्यंत.

९७) मासिक 'तरुण भारत' फाईल १९१९ ते १९२४ पर्यंत.

९८) मासिक, 'तरुण भारत' फाईल १९१९ ते १९२८ पर्यंत.

९९) मासिक, 'तरुण भारत' फाईल १९१९ ते १९२० पर्यंत.

१००) मासिक, 'तरुण भारत' फाईल १९२१ ते १९२४ पर्यंत.

१०१) मासिक, 'तरुण भारत' फाईल १९२८ ते १९३५ पर्यंत.

१०२) मासिक, साप्ताहिक, अर्ध साप्ताहिक फाईल १९३५ ते १९४८ पर्यंत.

१०३) अर्धसाप्ताहिक, फाईल १९४९ ते १९५३ पर्यंत.

१०४) अर्धसाप्ताहिक, 'तरुण भारत' १ जानेवारी १९५४, पृ.१

१०५) दै.'तरुण भारत' फाईल, जुलै १९६६.

१०६) दै. 'तरुण भारत' दि. ५ जुलै १९६६, पृ. १

१०७) दै. 'तरुण भारत' फाईल, १९६६ ते १९७९ पर्यंत.

१०८) मासिक, 'तरुण भारत' फाईल, सन १९२८ ते १९३३

१०९) साप्ताहिक, 'तरुण भारत' फाईल सन १९२८ ते १९३३

११०) साप्ताहिक, 'तरुण भारत' फाईल सन १९३४ ते १९४५

१११) साप्ताहिक, 'तरुण भारत' बेळगाव फाईल १९४५

११२) साप्ताहिक 'अर्धसाप्ताहीक' तरुण भारत, बेळगाव, फाईल १९४६.

११३) मासिक 'साप्ताहिक' तरुण भारत, बेळगाव फाईल १९१९ ते १९२४

११४) प्रभु प्रिया, समरांगण हे जीवन ज्यांचे, उपरोक्त, पृ. २५.

११५) कित्ता, पृ. १७३

११६) दैनिक 'तरुण भारत' बेळगाव 'एक गौरवशाली परंपरा, अनुबोधपट संकल्पना व कथा, जगदीश कुंटे ३० मार्च १९९९.

११७) दैनिक 'तरुण भारत' बेळगाव, ९ जून १९७९, पृ. ६

११८) प्रभु प्रिया, समरांगण हे जीवन ज्यांचे, उपरोक्त, पृ.२

११९) कित्ता , पृ. ३

१२०) कित्ता, पृ. ४

१२१) मासिक, 'तरुण भारत' बेळगाव, जुलै १९१९ पृ. २०

१२२) कित्ता, पृ. १८

१२३) मासिक, 'तरुण भारत' बेळगाव, मे–जून १९१९, पृ. ४

१२४) शुक्ल आर. एल,. (संपादक) आधुनिक भारत का इतिहास, दिल्ली विश्वविद्यालय, पुनर्मुद्रण – १९९८, पृ. ५७३,५७४

१२५) दैनिक, 'तरुण भारत' बेळगाव, २३ एप्रिल १९८०, पृ. ४

१२६) साप्ताहिक, 'तरुण भारत' बेळगाव, १९ फेब्रुवारी १९३५, पृ. ५

१२७) कित्ता, पृ. ४, ५

१२८) देशपांडे बा. अ., बेळगाव जिल्हातील स्वातंत्र्य संग्राम, प्रकाशन बेळगाव, १९७८, पृ. १०९

१२९) राजाध्यक्ष ग.गो., 'बाबुराव ठाकुरांची पत्रकारिता, लेख अक्षरयात्रा पुरवणी, दै. तरुण भारत, बेळगाव, २६ डिसेंबर १९९९.

१३०) प्रभु प्रिया, उपरोक्त, पृ. २२

१३१) दै. 'तरुण भारत' बेळगाव, २३ एप्रिल १९८२, पृ. ४

१३२) साप्ताहिक, 'तरुण भारत' बेळगाव, २९ ऑक्टोबर ३७, पृ. ५

१३३) कित्ता, पृ. ६

१३४) शानभाग आर. डी., मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९३७ ते ८८, पृ. १४

१३५) कित्ता, पृ. ६–७

१३६) सृतिदिन विशेषांक, बाबुराव ठाकुर प्रथम २४ एप्रिल १९८०, पृ. ६

१३७) स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकुर तृतीय स्मृतिदिन विशेषांक, २३ एप्रिल १९८२, पृ.५

१३८) कुंटे जगदीश, सहा. संपादक (दै. तरुण भारत) बेळगांव, २२ मे २०१२ दै. तरुण भारत मुख्य कार्यालय, बेळगाव, मुलाखत, दु. १२ वाजता.

१३९) शानभाग आर. डी., मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९३७ ते ८८ ८ जानेवारी १९८९, पृ. ६–७

१४०) कित्ता, पृ. ५९

१४१) मासिक, 'तरुण भारत' फेब्रुवारी, मार्च १९२२, पृ. ३२

१४२) साप्ताहिक, अर्धसाप्ताहिक, दैनिक 'तरुण भारत' बेळगाव. फाईल १९३३ ते १९५९

१४३) दै. 'तरुण भारत' फाईल, १९५६ ते १९७९ पर्यंत.

१४४) ठाकुर माई बाबुराव ,ते अखेरचे दिवस, सृतिसुगंध बाबुराव ठाकुर, तृतीय स्मृतिदिन विशेषांक, बेळगाव, २३ एप्रिल १९८२ पृ.२४

१४५) याळगी विठ्ठल, शिरावरी टाकीचे घाव सोसले, उपरोक्त, पृ.३४

१४६) दै. केसरी, पुणे, २४ एप्रिल १९७९, वर्ष ९९, अंक ११३, पृ. १

१४७) दै. केसरी, पुणे २४ एप्रिल १९७९, पृ. १

१४८) कित्ता, पृ. २.

प्रकरण दुसरे

दै. 'तरूण भारत' चे सामाजिक कार्य

२.१ प्रास्ताविक–

भारत हा खंडप्राय देश असून येथे अनेक जाती–धर्माचे लोक राहतात. भारतीय समाज जीवनावर जुन्या चालीरिती, परंपरा व रूढी यांचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. ब्रिटिशांचे आगमन होईपर्यंत भारतीय समाजात बालविवाह, केशवपन, सतीप्रथा व उच्च–निच भेदभाव इत्यादी अनिष्ट चालीरिती सुरू होत्या. समाजात स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. अज्ञान, विषमता, दारिद्र्य व पिळवणूक इत्यादी प्रकाराने जनता त्रस्त झाली होती. माणसाची जात त्यांच्या गुण कर्मावरून न ठरता जन्मावरून ठरविली जात होती. अस्पृश्य समजलेल्या जनतेला वर्षानुवर्षे अन्याय अत्याचारांना तोंड द्यावे लागत होते.

ब्रिटिशांचा भारतात प्रवेश झाल्यानंतर समाज जीवनात महत्त्वाचे बदल झाले. इंग्रजांच्या प्रोत्साहनाने पाश्चात्य शिक्षणाचा समाजात प्रसार होऊ लागला. सामान्य जनतेला शिक्षण घेण्याची संधी मिळू लागली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पुरोगामी विचारांच्या भारतीय तरूणांना समाज सुधारणांची गरज भासू लागली. शिक्षण घेऊन सुशिक्षित असणाऱ्या तरूणांनी समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी काही संघटनांची स्थापना केली.

सामाजिक सुधारणासाठी मराठी वृत्तपत्रांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. म. जोतिराव फुले, राजर्षि शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी समाज सुधारकांच्या चळवळी जोर धरु लागल्या. समाज सुधारणेचे विचार सामान्य जनतेत फैलावून समाज सुधारणेच्या कार्याला गती देण्याचे काम बेळगाव विभागात 'तरूण भारत' ने केले आहे.

'तरूण भारत' हे सामान्य लोकांच्या प्रश्नासाठी झगडणारे वृत्तपत्र होते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात सामाजिक प्रश्नांची उकल केली. सामाजिक मागासलेपणामुळे भारतावर परकियांचे राज्य प्रस्थापित झाले. अशा प्रकारचा विचार या वृत्तपत्रात आढळतो. प्रांरभीच्या काळात या वृत्तपत्राने सामाजिक प्रश्नाकडे अधिक लक्ष पुरविले होते. किंबहुना सामाजिक प्रश्न हा केंद्रबिंदू मानून विपूल प्रमाणात लेखन केले आहे.

२.२ दै. 'तरूण भारत' च्या सामाजिक सुधारणा–

दै. 'तरूण भारत' च्या सामाजिक सुधारणेचे दोन भाग पडतात.

२.२.१ नागरी कार्य –

यामध्ये ग्राम, आरोग्य, शेतकऱ्यांच्या विषयी सुधारणा, सार्वजनिक कामे, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, विहीरी व तलाव खोदणे इत्यादी कार्याचा समावेश केला आहे.

२.२.२ सामाजिक कार्य –

अंधश्रध्दा, अस्पृश्यता निर्मूलन, मंदिर प्रवेश चळवळ, जातीय सलोखा, स्त्री विषयक, महागाई, भ्रष्टाचार, मद्यपान निषेध व कोर्ट कचेरी इत्यादीचा समावेश या घटकामध्ये केलेला आहे.

२.२.१ नागरी कार्य –

नागरी सुखसोयीबाबत 'तरूण भारत' हे वृत्तपत्र सुरूवातीपासून जागृत होते. मात्र या वृत्तपत्राने सन १९४० पासून सार्वजनिक कार्याची फार मोठी प्रसिध्दी देऊन हा उपक्रम हाती घेतला केवळ बातम्या देऊन ते स्वस्थ न बसता प्रत्यक्षात या कार्यात पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील नागरिकांना सहभागी करून सार्वजनिक उपक्रम राबविले. कार्याची प्रसिध्दी व्हावी आणि ग्रामीण समाजाचे राहणीमान सुधारावे, या हेतूने वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द केल्या होत्या.

बेळगावपासून जवळच चंदगड महालात २ जून १९४० रोजी सार्वजनिक कार्यासाठी 'तरूण भारत'च्या पुढाकाराने ७० खेडे गावातील नागरिकांची एक सभा आयोजित केली.[१] महालातील ग्रामीण भागाच्या लोकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी रचनात्मक सामाजिक कार्य हाती घेण्याचा संकल्प मांडला. या सभेत संपादक बाबुराव ठाकुर यानी शिक्षण समितीच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांच्या सहकार्याने सार्वजनिक कार्य पार पाडण्याची रूपरेषा प्रसिध्द केली. तत्पूर्वी २५ मार्च १९४० रोजी चंदगड येथे हा उपक्रम राबविण्यासाठी म्हणून महालातील शिक्षकांचे एक दिवसाचे प्रशिक्षण शिबीर आयोजीत केले.[२] या शिबिरात तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन ठेवून रस्ते तयार करणे, गटारे खोदणे, राहणीमान व आरोग्य, शेती विषयी नवीन ज्ञान तसेच शेती उत्पादन वाढवण्यासाठी कंपोष्ट खते तयार करण्याची पध्दत इत्यादी बाबींचे प्रशिक्षण देऊन ते वृत्तपत्रात प्रसिध्द केले.

प्रशिक्षित झालेल्या शिक्षकांच्या पुढाकाराने १० जानेवारी ते १७ जानेवारी १९४१ हा सप्ताह 'ग्राम सुधारणा सप्ताह' म्हणून सर्वांच्या सहकार्याने साजरा करण्यात आला.[३] त्यासाठी सर्वोतोपरी गावकऱ्यांनी मदत करावी, असे आवाहन केले होते. या सप्ताहामध्ये घेतलेले कार्यक्रम, शेतकरी मेळावे व ग्रामीण भागातील जनतेकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद जाहीरपणे मांडण्यासाठी 'तरूण भारत' चे फार मोठया प्रमाणात सहकार्य झाले आहे.

२.२.१.१ ग्राम सुधारणा सप्ताहातील केलेली कामे व 'तरूण भारत' ने घेतलेली नोंद–

१. खेडेगावात रस्ते तयार करणे व हे रस्ते शहरांना जोडणे.

२. रस्त्याच्या दुतर्फा गटारे काढणे.

३. खेडेगावातील नागरिकांच्या आरोग्याकडे लक्ष देणे.

४. शेतकऱ्यांना शेणखत (कंपोस्ट खत) तयार करण्याचे प्रशिक्षण देणे.

५. दुष्काळ ग्रस्ताना मदत करणे. इत्यादी कामे हाती घेण्यात आली होती.

१. कच्चे रस्ते –

रस्ते तयार करत असताना पुढील गोष्टींचे काटेकोरपणे पालन करूनच रस्ते तयार करण्यात यावेत अशा प्रकारच्या सूचना २१ जानेवारीच्या अंकात प्रसिध्द केल्या आहे.

खेडयातील रस्ते बी. ई. इंजिनियर, जि. लो. बोर्ड बेळगाव यांनी प्रसिध्द केलेले पत्र.[४]

१. रस्त्याची रूंदी किमान २५ फूट ठेवावी.

२. रस्त्यावर प्रथम दगड व मुरूम घालून रूळाने दाबावे व रस्ता मध्यभागी उंच करावा.

३. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटार काढून त्याला उतार ठेवण्यात यावा

४. घराचे पाणी गटारात पडावे किंवा अंगणातून गटारात वाहत यावे.

५. नाल्याचे पात्र मुरूम व दगड घालून घट्ट करावे व दोन्ही बाजूला उतार ठेवावा.

अशा प्रकारच्या सुचना देऊन गावातील नागरिकांना या कामासाठी मदत करावी व कोणत्याही प्रकारचा विरोध करू नये, अशी विनंती केली आहे.

'तरूण भारत' च्या या कार्यामुळे संपादक बाबुराव ठाकुर यांनी सामूहिक श्रमशक्तीच्या जोरावर चंदगड महालातील जवळ जवळ ७० गावातील रस्ते व गटारे पूर्ण केली. हे करत असताना गावकऱ्यानी कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता हे कार्य केले आहे. या'तरूण भारत' च्या कार्यामुळेच खेडयापाडयातील जनतेचे ऋणानुबंध कायम जोडले गेले.[५]

श्रमदानातून तयार केलेले रस्ते

गट क्रं. अ.क्रं	गाव. क्रं.	गटाचे व गावचे नाव	गट प्रमुखाचे नाव	गावातील रस्ते		गावापासून मोठ्या रस्त्याला जोडलेले रस्ते		श्रमदान लोकांची संख्या	गावचे कोड नंबर
				लांबी फूट	रूंदी फूट	लांबी	रूंदी		
१		**अडकूर गट**	**अडकुरकर इनामदार**						
	१	विंझणे	श्री. शंकरराव विंझणेकर (इनामदार)	२२१०	९	३९०	११	२४०	१२
	२	मुगळी	शांताराम मंगेश तेरगांवकर	२६००	९	३९०	१३	२००	२१
	३	सोनारवाडी	लक्ष्मण हरी देशपांडे	१२००	८	३९०	१३	१५०	२२
	४	शिरोळी	वामन दत्तात्रय शिरोळकर	८२५	८	३९०	१३	६०	१७
	५	पोरेवाडी	लक्ष्मण देशपांडे	२३००	९	३९०	१३	२७५	२०
	६	सातवणे	मष्णु बाळा तलवेकर	१४५५	१०	१२१०	१४	४००	४८
	७	आसगोळी	संताजीराव गोपाळराव देसाई	८८५	११	१२१०	१४	१७५	४७
	८	उत्साळी	दौलतराव देसाई	१३४४	१०	१२१०	१४	१०५	४९
	९	आमरोळी	बाबुराव मंडलीक	१८१०	९	१२१०	१४	२००	१९
	१०	आलबादेवी	भागोजी गंगाजी कोले	१३५०	९	१२१०	१४	१८०	११
	११	बोजुर्डी	यशवंतराव निंगोजी पाटील	९४०	८	१२१०	१४	१००	१४
	१२	मोरेवाडी	सावबा गणु पोवार	३७५	९	१२१०	१४	१५०	१३
२		**तांबूळवाडी गट**							७५
	१	डुक्करवाडी	श्री कलाप्पा भरमाणा गावडा	३७८८	१२	१२१०	१४	२२५	७३
	२	दाटे	बाळस लक्ष्मण गुरव	२३३८	९	१२१०	१४	२००	६९
	३	नरेवाडी	गावडू लक्ष्मण गावडा	७७६	१०	२९४	१४	२१०	९२
	४	गुडेवाडी	भागाना विठोबा गावडा	२०२२	११	२९४	१४	१३५	७१
	५	जट्टेवाडी	जैनू खळोजी गावडा	१०२०	१०	२९४	१४	१२०	७२
	६	मलगड	रोग्या विठोबा जाधव	५००	१०	२९४	१४	१२०	४३
	७	लाकूरवाडी	मसाणा बाळू निटूरकर	६५०	१०	२९४	१४	१५०	४१
	८	शिवनगे	मराप्पा पाटील	७७५	११	२९४	१४	२००	२३
	९	लकीकट्टे	कृष्णराव रेडेकर	८६४	११	२९४	१४	२००	२४
३		**हलकर्णी गट**	**भिकाजी श्रीपाद नाडगोंडा**						११६
	१	माडवळे	अच्यूत सदाशिव देशपांडे	१८२५	१२	१०२०	१०	६६२	१३४
	२	जगमहट्टी	भावकू भिंकू गावडा	११९२	१२	१३००	२२	५६०	१३३
	३	आंबेवाडी	अण्णा रामाण्णा गोरल	८८५	९	१३००	२२	३००	१३६
	४	कलिवडे	लक्ष्मण यल्लापा गावडा	९०२	११	१३००	२२	१००	१३२
	५	तुर्केवाडी	विष्णु यशवंत सबनीस	५००	११	५००	२२	४००	३६
४		**कानुर गट**							
	१	कानुर खुर्द	केशव गणशे तेली	३८५५	१२	५००	२२	४००	२
	२	गुढवळे	गंगाराम सोम गावडा	२३७८	९	५००	२२	१८८	७
	३	कुर्णी	सतबा गावडा	१२७१	९	३७०	१५	२८३	५
	४	भोगोली	हरी कृष्णा गावडा	१२६७	११	३७०	१५	१४८	५७
	५	धामापूर	भाऊराव दळवी	१६१४	९	७३६	२३	३६०	६
	६	पिळणी	बाबु विठोबा गावडा	१२२१	१२	७३६	२३	१५०	५८
	७	बिजुर	माधवराव यशवंतराव भोसले	११००	१०	५३५	१४	२००	५६
५		**हिंडगाव गट**							
	१	हिंडगाव	श्री. पांडूरंग रवळनाथ चिटणीस	२४५८	१३	१९००	१४	४५०	५३
	२	गवसे	आप्पाण्णा झेलू गावडा	१२५६	९	२४६	१३	१८७ऽ	८
	३	इब्राहिमपुर	बाळोजीराव खंडोजीराव देसाई	१२९३	९	२४६	१३	२४०	९
	४	कानडी	यशवंतराव देसाई	१९५६	१२	२४६	१३	१५७	५१
	५	इनामसावड	सावबा आप्पा गडदे	७२७	९	२४६	१३	७७	५६

	६	कार्जिर्णे	हरी रामचंद्र मंगळवेढेकर	४९४	१२	२४६	१३	८७	८३
	७	म्हाळुंगे	जयवंत गणेश शिरोडकर	३४५	१०	३७५	१२	९०२०	१४४
	८	पोवाचीवाड	गुंडू भागोजी गावडा	५००	१०	३७५	१२	१३७	५०
६		**नागनवाडी गट**							
		नागनवाडी गट	सोमाणा लाडोबा दळवी	१२०२	९	४००	१२	२०५	६६
		कोरज	यशवंत बाळकृष्ण पाटील	८५४	२१			१३५	६८
		कुर्तनवाडी	भागोजी चंद्रु माडखोलकर	४८०	११			४०	६४
		कोनेवाडी	सतबा लक्ष्मण शिंदे	६००	९			४०	९५
		शिरगांवमौजे	धोंडी रूक्माणा मुळीक	१४५५	१०	४५०	१३	४५०	६५
७		**चंदगड गट**							
	१	कोकरे	दत्तोबा देशपांडे पाटील	२१६०	१०	४५०	१३	२००	६२
	२	उमगाव	धाका बाळ गावडा	१६५०	९			१५०	६०
	३	नागवे	मंगेश रामचंद्र नाडगौंडा	९६२	१२	१०२९	११	२५०	१००
	४	इ.कोळींद्रे	गणेश नारायण देशपांडे	१३२०	९	१०२९	११	१२५	१०१
	५	आसगाव	गणू पावणोजी गावडा	७९०	९			१८०	१०२
	६	जांबरे	धोंडी मोनगावडा	५९८	९			८०	१०३
	७	न्हावेली	भगवंत लक्ष्मण फडणीस	१२५५	९			१००	८९
	८	हंबिरे	सटू नाना गावडा	४९४	८			४५	८८
	९	अडूरे	रामा वैजू पेडणेकर	२२५	९			४७	७८
८		**हेरे गट**							
		खामदळे	देवबा रामचंद्र गावडा	५९४	९	५००	१२	१६५	१०४
		खा. गुडवळे	गंगारात सोम गावडा	१८३७	१०			१८७	२०२
		खा. सावर्डे	जानकू आप्पा गावड	५००	१२			७५	१०९
		कोळींद्रे	दत्तात्रय विष्णु देशपांडे	१३७५	१२	४७५	१३	१९०	११०
		शिप्पूर	भरमाणा विठोबा गावडा	३०८	१२			४०	१११
९		**पाटणे गट**							
		पाटणे	अनंत जयवंत फडणीस	७१५	१०			१००	१२७
		कोदाळी	गोविंद गणेश गावडा	१२००	०९			१२०	१४२
		नांदवडे	सोमा झेलू गावडा	९३०	१२			१४०	११२
		पार्ले	बाळा तांबडा गुरव	६२५	१२	५५०	१४	२००	१३७
		मोटणवाडी	गुंड नागोजी रेडेकर	५००	१२	५५०	१४	५०	१२९
		शेवाळे	मारूतीराव बागल	५००	१२	५५०	१४	५०	१३८
		जैलुगडे	कृष्णा नागोजी गावडा						१३९
		कळंसगादे	गोविंद म्हातारा दळवी						१४१
		रांदेवाडी	सोमाना ईराप्पा गावडा	५००	१२	५५०	१४	५०	१२८
१०		**पारगड गट**	बळवंत अर्जुन झेंडे	८४०	५	४००	१३	१८०	१०६
		इसापूर	हरी कृष्णा गवस	८४०	५	४००	१३	१८०	१०२
		मिरवेल	बुंधा खेमा मणेरकर	८००	४			७०	१०३
		मोर्ती	गुंडो रामकृष्ण मणेरकर	१२७५	४	६००	१३	२००	१०२
		घोडगेवाडी	येस इळवी नागदळवी	३६००	४			२००	१०५

वरील तक्त्यावरून चंदगड महालातील गाववार रस्त्याचे अंतर व गट प्रमुखाचे नाव स्पष्ट नोंद केली आहे. सर्वांच्या श्रमदानातून आपल्या बरोबर राष्ट्राचाही विकास साधता येतो. हा संदेश स्वातंत्र्यपूर्व काळात समाजाला दिला आहे. 'तरूण भारत' च्या १५ एप्रिल १९४१ च्या अग्रलेखात राष्ट्रीय सप्ताहाचा संदेश 'हिंदुस्थान स्वावलंबी करा ! या शीर्षकाखाली आपण

केलेल्या कार्याचा मागोवा घेऊन स्वदेश व श्रमत्यागाचे महत्त्व देऊन ग्रामोद्योगावर भर दिलेला आहे व लोकात स्वदेशाभिमान जागृत केला आहे.

२.२.१.२ 'तरूण भारत' आणि शेतकऱ्यांचे प्रश्न–

राष्ट्राच्या उन्नतीत सर्वात महत्त्वाचा वाटा शेतकऱ्याचा आहे. शिवाय अनेकांना रोजगार प्राप्त करून देण्यात शेती व्यवसाय महत्वाचा ठरतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात मोठया प्रमाणात औद्योगिक क्षेत्रात प्रगती झाली असली, तरी शेतीच्या क्षेत्रात होणारे उत्पादन निश्चितच महत्त्वाचे आहे. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सीमा भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न कायमच पोटतिडकीने मांडले आहेत. त्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी, म्हणून सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. आधुनिक शेती पध्दतीतील वेगवेगळे प्रयोग, देशी विदेशी शेती पध्दतीबद्दल माहिती, शेती मालाच्या बाजारी किंमती, वेगवेगळया विचारवंताचे व संशोधकांचे शेतीविषयक खास सदरे तसेच पशुपालन महत्त्व व संगोपन इत्यादी बाबत लेखन करून शेतकरी वर्गाला दिलासा देणारे व त्या वर्गाचा विकासाचा आधार बनलेले वृत्तपत्र म्हणून या सीमा भागात या वृत्तपत्राकडे पाहिले जाते.

२.२.१.३ बेळगाव जिल्हा शेतकरी परिषद –

११ फेब्रुवारी १९३४ रोजी बेळगाव येथे शेतकरी परिषद भरवण्यात आली. या परिषदेचे उद्देश स्पष्ट करून शेतकऱ्यांच्या अडीअडचणी मांडलेल्या आहेत. या परिषदेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सहमतानी काही ठराव समंत करण्यात आले.

१. शेतसारा कमी करून शेतकऱ्यांना ताबडतोब आर्थिक मदत मिळाली पाहिजे.

२. शेतकऱ्यांच्या मुला–मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळाले पाहिजे.

३. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी कायद्यामध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

४. ही परिषद प्रचलीत करांचा निषेध करते.

५. शेतकऱ्यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी संघटीत झाले पाहिजे.

अशा प्रकारे ठराव समंत करण्यात आले. जंगल खात्याचे कडक व जाचक कायदे ताबडतोब शिथिल करण्यात आले पाहिजेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांना सरपणाकरीता लाकूड फाटा मिळाला पाहिजे. सार्वजनिक कुरणे मिळाली पाहिजे व शेती संशोधनावर सरकारने व्यापक

झाले पाहिजे. तसेच शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा सीमित करण्यासाठी उपाययोजना आखल्या पाहिजेत ' शेतकरी वर्गाची संघटना हीच आमची शक्ती होय' या रयत परिषदेची सर्व माहिती शेतकरी वर्गाला समजेल अशा भाषेत मांडले आहे, या परिषदेसाठी 'तरूण भारत' ने स्वतंत्र पुरवणी काढून माहिती पुरवली आहे.[७]

२.२.१.४ शेती प्रदर्शन –

हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावयाची असेल, तर त्याला नवनवीन तंत्रज्ञान, अवजारे बी–बियाणे याची अद्ययावत माहिती मिळणे गरजेचे आहे. आजपर्यंत शेतीमध्ये ज्या सुधारणा झाल्या आहेत. त्या शेतकऱ्यांच्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. या उद्देशाने बेळगाव परिसरात शेती प्रदर्शने भरवली जात. त्या प्रदर्शनातील नवनवीन ज्ञानाची, तंत्राची माहिती मराठा भाषिक शेतकरी वर्गापर्यंत पोहचवण्यासाठी दैनिक तरूण भारत ने सातत्याने प्रयत्न केले आहेत.

अ) चिक्कोडीचे शेती प्रदर्शन –

कमिशनर मि. मॅके यांचे हस्ते चिक्कोडी येथे शेती प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी मि. मॅके बोलताना म्हणतात 'अशा प्रकारची शेतीविषयक प्रदर्शने वरचेवर भरवली पाहिजेत. या भागात लिंगायतांचा बहुजन समाज आहे. लिंगायत म्हणजे हिंदुस्थानातील स्कॉच आहे. अशा शब्दात गौरविले.'[८] या चिक्कोडीच्या शेतकरी प्रदर्शनाबाबत 'तरूण भारत' ने दुसऱ्या दिवशी आपली प्रतिक्रिया देताना म्हटले की, हे प्रदर्शन जरी भव्य दिव्य झाले असले तरी, या प्रदर्शनात शेतकरी वर्गाचा सहभाग जास्त नव्हता. त्याचबरोबर शेतकरी प्रतिनिधी या मंडळात घेतला गेला नाही. प्रदर्शनाची सुत्रे लिंगायत, शेठ व सावकारांच्या हातात आहेत. त्यामुळे बेळगाव जिल्हा शेती प्रदर्शनाचा लाभ शेतकरी वर्गाला म्हणावा तसा झाला नाही. शेतकऱ्यांना सहभागी करून घेऊन शेतकरी वर्गाला याचा फायदा झाला पाहिजे. याबाबत मंडळानी भुमिका स्वीकारली पाहिजेत. तर प्रदर्शना मागील उद्देश व हेतू साध्य होईल. अशा प्रकारची भूमिका तरूण भारत ने व्यक्त केली आहे.[९]

आ) अंमणगीचे शेती प्रदर्शन (१५ जानेवारी १९३५)–

१५ जानेवारी १९३५ रोजी अंमणगी येथे शेतकऱ्यांची परिषद भरली होती. या सभेचे अध्यक्ष दि. ब. लट्ठे हे होते. ते शेतकरी वर्गाला मार्गदर्शन करताना म्हणतात, 'शेतकरी वर्गाने

प्रथमतः स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शिकले पाहिजे' शेतकरी वर्गाची स्थिती अधिक कष्टाची, त्यात चार पाच वर्षापासून भयंकर मंदीमुळे तर असहय झाली आहे. आजच्या काळात शेतकरी हा संकटात चिरडून चालला असतानाही सरकार मात्र डोळे झाक करत आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. लोकांच्या कर्ज बाजारीपणाबद्दल सरकारचा विचार अद्याप संपत नाही. आजपर्यत या प्रश्नावर सरकारच्या कमिटया व कमिशने कितीतरी झाली. त्या रिपोर्टवर निर्णय होत नाही. या सर्व अडचणी सरकारसमोर मांडण्यासाठी या परिषदांचा उपयोग मोठा आहे. आपल्या मागण्यासाठी शेतकरी वर्गाचा मोठा रेटा पाहिजे, तरच या सुस्त सरकाला जाग येईल.' २२ जानेवारी १९३५ च्या अंकात हा लेख प्रसिध्द करून सरकारला जागे करण्याचा उद्देश आहे.[१०]

इ) कुन्नुरचे शेती प्रदर्शन–

कुन्नुरच्या शेती प्रदर्शनामध्ये या परिषदेत खादीच्या वस्तूंचे व कपडयांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. 'अर्ज व विनंत्याची भाषा सोडून द्या, भिकाऱ्यांच्या पदरी उष्टे खरकटेच पडणार, मी मालक आहे, हा मंत्र जपा! म्हणजे आपले कल्याण होईल. शेतीमध्ये वेगवेगळया पिकांचे व उत्पादनाचे प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना नवीन आधुनिक ज्ञानाची व शेती पध्दतीची माहिती पुरवण्याचा व सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला.[११] या परिषदेत शेतसारा व खंड यात कपात करणे, कर्ज मुक्ति प्रश्न व व्याजाच्या दरावर नियंत्रण, वनचराईची सोय व जंगलाच्या इतर सवलती, न्याय व निःपक्षपाती आणेवारी आणि लोकांच्या व गुंराच्या औषधपाण्याच्या व्यवस्था इत्यादी ठराव समंत झाले. खेडयापाडयातील वाहतुकीचे रस्ते व सोयी याबाबत या परिषदेत गाऱ्हाणी मांडण्यात आली.[१२]

ई) कुणकुंबीचे शेती प्रदर्शन–

१५ मे १९३८ रोजी कुणकुंबी येथे २० गावातील शेतकऱ्यांची परिषद भरवण्यात आली होती. या परिषदेला बाबुराव ठाकुर यांनी मार्गदर्शन केले. 'शेतकऱ्यानी कष्टाने आपल्या मुलां–मुलीना शिक्षण दिले पाहिजे. शेतकरी वर्ग दुभागलेला आहे तो संघटीत झाला पाहिजे. आज काल सरकार शेतकरी हिताच्या योजना राबवते आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यानी करून घ्यावा.' या परिषदेत संमत झालेले ठराव पुढील प्रमाणे.

१. वनविभागाक्डून हंगामी लागणीस दिलेल्या कुमरी जमिनी मुलकी खात्याच्या ताब्यात देण्यात याव्यात.

२. पशुधनांकरीता लागणारे जंगली गवत मोफत मिळण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

३. गावा भोवतालचे जंगल साफ करून गावठाण करण्याकरीता जागा देण्यात यावी.

४. प्रत्येक गावात कमीत कमी ५ बंदुकीचे परवाने असावेत.

५. चालू वर्षी धान्याला दर नसल्याने साऱ्यात २ आणे सूट मिळावी.

६. आरोग्यासाठी डॉक्टरांची व्यवस्था करण्यात यावीत.

या परिषदेत शेतकऱ्यांच्या अडी-अडचणी सांगितल्या. मागण्या सरकारकडे पाठविण्यात आल्या. या मागण्या मान्य करून घेण्यासाठी जनशक्तीचा मोठा दबाव असला पाहिजे मगच सरकारवर याचा परिणाम होईल. असा विचार 'तरूण भारत' या वृत्तपत्रात नोंदवला आहे.[१३]

उ) राधानगरी पेठयाचे शेती प्रदर्शन-

करवीर इलाख्यात राधानगरी पेठयाचे शेती प्रदर्शन सरवडे येथे पार पडले. श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांचे चिफ सेक्रेटरी राघव दत्ताजीराव भोसले व सदरहू समारंभाचे स्वागताध्यक्ष रावसाहेब फातरफेकर यांनी शेतकऱ्यांना उपदेश करताना म्हटले की, 'नांगराच्या हाती तराजू पण आला पाहिजे. आज शेतकरी हा व्यापारीपण बनला पाहिजे' १८ जानेवारी १९३८ च्या अंकात शेतकी प्रदर्शन विषयी माहिती दिली आहे.[१४]

ऊ) कोवाडची शेतकरी परिषद (२४ मे १९४८)-

शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेनंतर २४ मे १९४८ रोजी बेळगाव जिल्हयातील चंदगड महालाचे कोवाड या गावी पहिली शेतकरी परिषद भरविण्यात आली. ही परिषद यशस्वी करण्यासाठी श्री दाजीबा देसाई, श्री गणपतराव देसाई, नरसिंगराव भुजंग पाटील व गुरूनाथ पाटील या मंडळीनी सहभाग घेतला.

लोकनेते शंकरराव मोरे व केशवराव जेधे यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली.[१५] या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केशवराव जेधे म्हणतात 'शेतकरी जागृत झाला आहे. हे इंग्रजांनी जाणले म्हणून त्यांनी स्वातंत्र्य दिले. पण आज त्या स्वातंत्र्याचा फायदा कोणाला मिळाला आहे ? महात्मा गांधीजींचा वारसा सांगणारे काँग्रेसवाले महात्माजींच्या सत्य व अहिंसा या तत्वाचा खून करीत आहेत. पांढऱ्या गांधी टोप्या घालणाऱ्या या काँग्रेस वाल्यांच्या डोक्यात

काळे विचार आहेत. ते आम्हाला कम्युनिष्ट आहोत. दहशतवादी आहोत. म्हणून खोटा प्रचार करीत आहेत. गांधीजीच्या कल्पनेप्रमाणे आम्ही जनतेचे राज्य प्रस्थापित करूच करू, असा निर्धार व्यक्त केला. या संपूर्ण परिषदेचा आढावा जरी 'तरूण भारत' ने घेतला असला तरी काँग्रेसनिष्ट असणाऱ्या 'तरूण भारतला' ही भाषणे झोंबल्याची दिसतात. या परिषदेची जास्त दखल न घेता फक्त टिका टिपणे देऊन झालेल्या ठरावाची चर्चा केली आहे.

या परिषदेत गांधी खुनाबद्दल दुःखवटा, लोकनेते केशवराव जेधे व शंकरराव मोरे यांना व त्यांच्या पक्षास पाठिंबा, सरकारी दडपशाहीचा तीव्र निषेध, पुर्नरचना करताना बेळगाव जिल्ह्यातील मराठी भाषिकांचा स्वतंत्र जिल्हा करावा. गांधी वधानंतर बागिलगे गावाजवळ गोपाळ राजगोळकर हे बंदुकीच्या गोळीने मृत्यू पावले. त्याची निःपक्षपाती चौकशी करावी, मुंबई सरकारने नियोजीत केलेल्या दड्डी धरणाला विरोध इत्यादी ठराव संमत करण्यात आले. या परिषदेमध्ये कसेल त्याची जमिन ही मागणी प्रकर्षाने मांडली गेली.[१६]

२.२.१.५ शेतकरी संघ–

शेतकऱ्यांचे प्रश्न सरकार दरबारी मार्गी लावण्यासाठी शेतकरी संघाची उभारणी होऊ लागली. अशा प्रकारचा प्रयत्न बेळगाव विभागातही झाला परंतु या संघाला चांगले कार्य करता न आल्यामुळे या वृत्तपत्रात नाराजी व्यक्त केली आहे. शेती संघाची मुख्य कचेरी बार्डोली (गुजरात) येथे होती. या संघाचे अध्यक्ष सरदार वल्लभाई पटेल होते. उपाध्यक्ष दादुभाई देसाई व गंगाधर देशपांडे होते. सेक्रेटरी पदी नारायणदास बेचर आणि महादेवभाई देसाई यांची नियुक्ती केलेली होती. शेतसारा, मद्यपान जंगलविषयक कायदे, पाटबंधारे योजना या संबंधातील शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करणे हा शेती संघाचा उद्देश होता.[१७]

२.२.१.६ चंदगड महाल–

१ मे १९३४ च्या अंकात चंदगड तालुक्याची स्थिती वर्णन केली आहे. चंदगड महालाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे वर्णन करणारा व सरकारची सक्तिची कर वसुलीला बळी पडणाऱ्या या महालातील शेतकरी वर्गाची बाजू मांडणारा संबंधीत लेख आहे.

चंदगड महाल हा मुळात बेळगाव जिल्ह्यातील निकृष्ठ, नापिक, दरिद्री असणारा आहे. येथील जमीन डोंगराळ, तांबडी रेताड आहे. पर्जन्यमान ८० ते २५० इंच इतके प्रमाण आहे. मुख्य पिके भात, नागली, सावा, जव व काळे तीळ व कांही विभागात कडधान्य घेतली

जातात. जंगल विभागातून हिरडे व काही वस्तू गोळा केल्या जातात. तेथे अल्प प्रमाणात ऊस आहे. या ठिकाणची माणसे कशीबसी उपजिविका भागवून जीवन जगत असतात. परंतु हाच प्रदेश आपण सरकारी चष्म्यातून कागदपत्राच्या आधारे पाहिल्यास सर्व उलट आहे. हा प्रदेश सधन सुपीक संपन्न आहे असे भासते. म्हणून १९१७–१८ साली रिव्हीजन सेटलमेंटमुळे या रयतेवर सरकारने जास्त शेतसारा बसवलेला आहे. अशा कष्टकरी रयतेची सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कशी पिळवणूक होते. हे स्पष्ट करणारा समग्र लेख आहे.[१८]

बेळगांव जिल्हयातील इतर तालुक्यांच्या तुलनेने चंदगड महालाची सारा वाढ दुप्पट केली आहे. तेव्हा बऱ्याच वर्षापासून या महालावर सरकारने जुलूम केलेला आहे. या पुढे सरकारने या गंभीर गोष्टीकडे लक्ष घालून या शेतसाऱ्याच्या त्रासातून रयतेला दिलासा मिळवून दयावा, अशी मागणी केली आहे.

२.२.१.७ कारवारच्या शेतकऱ्यांची करूण कहाणी –

१४ ऑगस्ट १९३४ च्या अंकात 'शेतकरी संकट निवारक मंडळाने' प्रसिध्द केलेले पत्र छापलेले आहे. अंकोला आणि सिद्दापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या करूण कहाणीचे चित्र रेखाटले असून जनतेला सहाय्यार्थ कळकळीची विनंती केली आहे.

अंकोला तालुक्यातील ८८ गावात ३८ हजार लोकसंख्या आहे. या गावांची अर्धी जमीन शेतकरी तर अर्धी शासकीय मालकीची आहे. शेतकऱ्यापैकी नादवर आणि वक्कल या दोन जातींनी कर बंदीच्या चळवळीत भाग घेतला, म्हणून त्यांच्या जमिनी जप्त केल्या. तसेच गुरेढोरे व घरेदारे जप्त करून सरकारने शेतसारा वसूल केला. तरीही लोक आनंदाने या प्रसंगाला तोंड देत आहेत. सन १९३२ च्या करबंदीच्या चळवळीत भाग घेतला. म्हणून सिद्दापूर तालुक्यातील काही कुटुंबाच्या जमिनी व इतर मालमत्ता जप्त केली. कुटुंब प्रमुखांना तुरूगात डांबले. त्यातील कांही कुटुंबे स्थलांतरीत झाली. अशा समस्याग्रस्त कुटुंबाना समाजातील इतर घटकानी सर्वोतोपरी मदत करून त्याना पूर्व पदावर आणण्यासाठी सर्वानी प्रयत्न करावेत, अशी विनंती केली आहे.[१९]

२.२.१.८ कुळ कायद्याचे स्वरूप–

कुळांना व जमीन मालकांना विश्वासात घेऊन कुळ कायदा विधेयक पुढे आले. पण यावेळी जमिनदार व इनामदारांचे धाबे दणाणले. त्याचबरोबर सामान्य जनतेतही या बिलाबाबत

अनेक अंदाज केले जात असत. पण पुढील बिलाबाबत जे पूर्वग्रह निर्माण झाले होते, त्याचे निराकारण आपोआप होण्याजोगे आहे.

या लेखात कांही मुद्दे मांडले आहेत. या बिलाच्या आधारे काँग्रेस हे जमिनदार वर्गाचे सर्व हक्क कुळाना देणार आहे. अशी भीती जमिनदार वर्गाने बाळगली होती. पण काँग्रेस धोरण हे वर्ग संघर्ष तीव्र करणे हे नसून वर्ग सलोखा राखणे आहे. या मसुद्यातील कलमांकडे सुक्ष्म दृष्टीने पाहिल्यास जमिनदार व कुळे या दोन्ही वर्गाच्या न्याय हक्काना अबाधीत ठेवले होते. मात्र कुळाना सरंक्षण देण्यात आले आहे. पुढे म्हणतात 'जमिनदार वर्गांनी आता झाले तितके पुरे आहे ! आपली सरंजामी वृत्ती टाकून देणे गरजेचे आहे' वास्तविक काँग्रेसच्या ठिकाणी अन्य कोणती तरी वृत्ती असती आणि तिने केवळ शेतकऱ्यांच्या कल्याणाची योजना अंगीकारली असती. पण काँग्रेस या भावनेने जमिनदारांच्याकडे पाहत नाही, ही गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे. अशा प्रकारे कुळ कायद्याबाबत समज गैरसमज दूर करण्याबाबत हा अग्रलेख महत्त्वाचा आहे.[२०]

पुढील अंकात कुळ संरक्षण कायद्याचा मसुदा प्रसिध्द केला असून त्यातील सर्व तरतुदीचा उहापोह केला आहे. या तरतूदी सर्वसामान्य जनतेला वाचून ऐकून समजतील अशा भाषेत स्पष्ट केल्या आहेत. शेवटी ६ वर्षाच्या कुळांना कायम कुळ कायदयाचा हक्क या सदरात कुळांच्या बाबत संरक्षण विषयक माहिती अंदाजाने दिली आहे.

१० ऑक्टोंबर १९३९ च्या अग्रलेखात या कुळ कायद्यावर चर्चा होऊन शेवटी २० लाख कुळांच्या हिताचा कुळ कायदा पास झाला व कुळांना दिलासा मिळाला. या कुळ कायद्याच्या नावाखाली समाजात गैर कुळांना लाभ मिळू नये. जो राबणारा तोच मालक, मालक तो फकीर या नजरेतून लेखाचा सूर स्पष्ट होता. असे जरी असले तरी 'तरूण भारत' वृत्तपत्र कष्टकरी शेतकऱ्यांच्या बाजूने आपली भूमिका कायम मांडत आले आहे.[२१]

२.२.१.९ शेतकऱ्यासाठी कायदा –

शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावी, कर्जबाजारीपणात जन्मलेला शेतकरी शेवटी कर्जाच्या खाईतच त्याचा मृत्यु होतो. अशा या शेतकऱ्याची सावकारी जाचातून मुक्तता करण्यासंबंधीचे कायद्याचे विधेयक पारित झाले. याबाबतचा श्री. ना. त्रि. पंडित यांचा 'शेतकऱ्यासाठी कायदा' हा लेख प्रसिध्द केला आहे.

मारवाडी व गुजर या जातीतील सावकारांनी या भागात सर्वत्र जाळे पसरविले होते. शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन भरमसाठ व्याजाने कर्ज देणे, शेवटी अज्ञानी भोळा व नडलेला शेतकरी हा धूर्त सावकारांच्या जाळयात सापडला याच लबाड सावकारांनी ब्रिटिश कोर्टकचेऱ्यांचा आश्रय घेऊन शेतकऱ्यांच्या पुष्कळ जमिनी लाटल्या. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी व सावकारांच्याकडून होणारी लूट थांबवण्यासाठी मुंबई सरकारने कायदा आमलात आणला. या कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या कर्जाची चौकशी झाली व काही कर्ज माफ करण्यात आले. पण कर्जाची व पैसाची गरज भागवण्यासाठी मात्र सरकारने कोणतीच उपाययोजना आखली नव्हती. त्यामळे शेतकऱ्यांना पुन्हा सावकारांचे पाय धरावे लागणार, 'खरोखरच सरकारला शेतकऱ्यांचे हित जपायचे असेल तर फक्त कायद्याच्या खाली एखादी घटना आणून चालणार नाही तर त्या घटनेवर चिरकाळ उपाययोजना आमलात येतील या गोष्टीकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे. वरवरची मलमपट्टी उपाय नाही' असे मत व्यक्त केले आहे.[२२]

२.२.१.१० शेतकरी आणि सरकारचे धोरण–

१९ ऑक्टोंबर १९४३ च्या अंकात चालू वर्षाच्या एकूण पिकापैकी २५ टक्के तांदूळ व १० टक्के इतर धान्य सरकार खरेदी करणार असल्याची बातमी प्रसिध्द करण्यात आली होती. नफेबाजीला आळा घालण्याच्या हेतूने सरकारने ही योजना आखली आहे, असे स्पष्टीकरण दिले आहे. त्यानुसार जिल्हयातील जरूरीपेक्षा अधिक असलेले धान्य सरकार खरेदी करील असे आश्वासन देण्यात आले. त्याचबरोबर बेळगावातील कलेक्टरानी अन्नधान्य एका तालुक्यातून, दुसऱ्या तालुक्यात निर्यातीस बंदी केली व कलेक्टरानी शेतकऱ्यांचे हित सांभाळण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

सरकारच्या योजनेला या लेखात कांही त्रुटी दाखवून सरकारचे निष्क्रिय धोरण स्पष्ट केले आहे. 'सरकारला शेतकऱ्यांचे हित करायचे असेल, धान्य खरेदी करण्याच्या अगोदर धान्य खरेदीबाबत तपशीलवार योजनाचा उलगडा करावा. उदा. कुटुंबातील सदस्य संख्या व त्यांना लागणारे वार्षिक धान्य व खर्चाचा विचार करून धान्य खरेदी करावे. तसेच त्या धान्याची बाजारी किंमत किती राहणार, हे अगोदर जाहीर करावे. तरच शेतकरी स्वतः होऊन आपले

कडील धान्य बाजारात घेऊन येतील. नाहीतर सरकारच्या हिताच्या नावाखाली शेतकऱ्याला नागवले असा प्रकार होईल.[२३]

पुढच्या एका अंकात ६४ शेरापर्यंत धान्य एका तालुक्यातून, दुसऱ्या तालुक्यात नेण्यास सरकारचा प्रतिबंध नाही! असे असून सुध्दा शेतकऱ्यांना धान्य घेऊन येत असताना सरकारी नोकरांची अरेरावी सहन करावी लागते. त्या गरीब शेतकऱ्यांच्याकडून हे नोकर चिरीमिरीची अपेक्षा करत असत. हे प्रकार ताबडतोब थांबले पाहिजे, नाहीतर बेळगाव शहरात अन्नधान्य विकत घेऊन खाणाऱ्या व खेडयातून घेऊन विकणाऱ्या या घटकांच्यावर उपासमारीची वेळ येईल. तेंव्हा सरकारने ठरलेल्या नियमानुसार आयात–निर्यात कायम ठेवावी व बेकायदेशीर व्यवहाराला वेळीच आळा घालावा. ही बातमी प्रसिध्द करून सर्वसामान्याना दिलासा दिला आहे.[२४] या बातम्यांचा परिणाम व सर्वसामान्यानांच्या मागणीनुसार सरकारने आपल्या धोरणात बदल करून एक धोरण निश्चित केले. बेळगाव कलेक्टर हुकूमाप्रमाणे १ जानेवारी १९४४ पासून अमलात येणाऱ्या ठोक व किरकोळ विक्रीच्या कमाल दराबाबतीत एक आराखडा 'तरूण भारत'च्या अंकास प्रसिध्द केला आहे. तो धान्य दराचा तक्ता पुढीलप्रमाणे.

अ.न	ठिकाण	तांदूळ		जोंधळे		बाजरी	
		१२८ शे.पो	१रु.स.कि.	पोत्यास	१ रु.स	पोत्यास	१ रु.स
		रु.आ.पै	शे.छ	रु.आ.पै	शे.छ	रु.आ.पै	शे.छ
१	बेळगाव	४०–२–०	३–२	२६–०–०	४–१२	२३–६–०	५–४
२	खानापूर	३८–६–०	३–४	२६–०–०	४–१२	२३–६–०	५–४
३	चंदगड	३६–१५–०	३–६	२६–०–०	४–१२	२३–६–०	५–४
४	बैलहोंगल	३८–६–०	३–४	२३–१०–०	५–३	२१–२–०	५–१०
५	सौदंती	४०–२–०	३–२	२३–१०–०	५–३	२१–२–०	५–१०
६	चिक्कोडी	४०–२–०	३–२	२५–०–०	४।१४	२२–८–०	५–७
७	गोकाक	४०–२–०	३–२	२३–१०–०	५–३	२१–२–०	५–१२
८	हुक्केरी	४०–२–०	३–२	२३–१०–०	५–३	२१–२–०	५–१२
९	अथनी	४०–१२–०	३–१	२३–१०–०	५–३	२१–२–०	५–१२[२५]

हे दर फलक देऊन खाली टीप दिली आहे. व्यापाऱ्यांनी आपल्याजवळ असलेले धान्य वरील दराने विकले पाहिजे. धान्य विक्रीबाबतीत लायसेन्स नसणाऱ्या इसमास ८ पोत्यापेक्षा जास्त धान्य विकता येणार नाही. ठरवलेला ठोक दर शेत मालकास किवा जमिनदारास शेतकऱ्यांच्याकडून केलेल्या खरेदीस लागू राहील. अशा सूचना देऊन शेतकऱ्यांमध्ये असणारा धान्य विक्रीबाबतचा गोंधळ थांबवण्याचे काम बातमीने केले आहे.

२.२.१.११ पुणे येथे वृत्तपत्र संपादक परिषद–

पुणे येथे वृत्तपत्र संपादक परिषद भरवण्यात आली होती. या परिषदेला 'तरूण भारत' चे प्रतिनिधी श्री. द. ल. अध्यापक हजर होते. विषय होता वृत्तपत्रावरील अडचणी व जनतेचे प्रश्न यावर विचार विनिमय करण्यासाठी पुणे येथील 'सकाळ' कचेरीत संयुक्त कर्नाटकचे संपादक श्री. मोहिरे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र–कर्नाटक वृत्तपत्राच्या संपादकांची बैठक बोलविण्यात आली. यावेळी बेळगांव विभागातील प्रश्नावर चर्चा करण्यात आली. जनता व सरकारासमोर अन्नधान्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. सक्तीची सरकारी खरेदी व धान्याच्या आयात निर्यातीवर सरकारने घातलेले जाचक निर्बंध, यामुळे शेतकरी व सर्वसामान्य लोक मेटाकुटीला आलेले आहेत. अडाणी व अशिक्षित शेतकऱ्याला नडवून सरकार आजही बळजबरीने धान्य खरेदी करत आहे. या शेतकरी वर्गाचे हाल चव्हाटयावर मांडण्याचे काम फक्त वृत्तपत्रेच करू शकतात. पण आपली अशी एक संघटना नसल्याने आपल्या सारख्या वैयक्तिक वर्तमानपत्राचा सरकारवर परिणाम होत नाही. पुढची अडचण स्पष्ट करताना म्हणतात. 'मोठमोठया शहरात प्रमुख वृत्तपत्रे प्रसिध्द होतात पण ग्रामीण भागात कोणत्या अडचणी आहेत याची त्यांनी माहिती नसते. तेव्हा आपण संघटित राहून हे प्रश्न हाताळले पाहिजे व बहुसंख्य असणाऱ्या शेतकरी वर्गाच्या पाठीशी राहून त्यांना दिलासा दिला पाहिजे.

या परिषदेत कांही ठराव संमत करण्यात आले. निरनिराळ्या जिल्हयातील परिस्थितीशी वर्तमानपत्राचा संबंध अधिक येत असल्यामुळे मुंबई सरकारने धान्य प्रश्नाचा विचार करताना, वर्तमानपत्रांच्या मताकडे महत्त्व पूर्वकतेने विश्वासात घेऊन अन्य धान्यांच्या खरेदीवर विचार व्हावा असे सुचवण्यात आले. या लेखावरून शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत 'तरूण भारत' जागृतपणे बातम्या देऊन हे वृत्तपत्रे बहुजनांचे नेतृत्व करते, हे स्पष्ट दिसुन येते.[२६]

२.२.१.१२ रताळा पीकांवरील बंदी उठविण्याबाबतची मागणी–

'रताळ्यावरील बंदी उठवा शेतकऱ्यांचे नुकसान करू नका' चंदगड महालात रताळ्याचे पिक मोठया प्रमाणात घेतले जाते. रताळ्याच्या लागवडीमुळे शेतकऱ्यांच्या हाती चार पैसे येतात पण या चालू हंगामात सरकारने रताळ्याच्या निर्यातीवर बंदी घातल्याने रताळ्याला दर मिळाला नाही. तेंव्हा या शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेवून सरकारने ताबडतोब रताळ्याला जिल्हयाबाहेर पाठवण्यास परवानगी दयावी. अशी मागणी करण्यात आली.[२७]

२.२.१.१३ पेंडीबाबतचा प्रश्न–

बेळगावच्या कलेक्टरानी ३ फेब्रुवारी १९४५ रोजी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत मार्ग काढण्यासाठी सभा बोलविली. त्यास स्वतः बाबुराव ठाकुर उपस्थित होते. त्यावेळी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडून कलेक्टरांच्याबरोबर सरकारचे लक्ष वेधून घेतले. 'गुरांना घालावयाची पेंड जिल्हयातील सर्व लोकांना बेळगावातून परमिट घेवून न्यावी लागते. त्यामुळे त्यांची अत्यंत गैरसोय होते. तरी पेंडही सर्व ठिकाणी खेडोपाडी मिळण्याची व्यवस्था व्हावी. तसेच हजारो लोकाना लोखंडी सामानाची औजारांची जरूर असून, हे साहित्य कित्येक महिने मिळत नाही. हे साहित्य मागणीप्रमाणे उपलब्ध करून देण्यात यावे'.[२८]

२.२.१.१४ गुळ व्यापाराबाबतचा प्रश्न–

'तरूण भारत' संपादकानी पत्रकार परिषदेसमोर शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. या वेळी कलेक्टर साहेबांच्यासमोर सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे हे दाखवून दिले. पुढच्या एका लेखात 'गूळ नियंत्रणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. बाजारात शेतकऱ्याच्या गुळ सौदा होत नसल्याने गुळ पडून आहेत. गुळाचा भाव हा प्रति क्विंटल २० रुपयेपर्यंत घसरलेला आहे. याला सरकार जबाबदार आहे. या संकटातून शेतकऱ्यांची सोडवणूक करण्यासाठी सरकारने ताबडतोब व्यापाऱ्यांना हा माल बाहेर पाठवण्यास परवानगी दयावी.[२९]

२.२.१.१५ धान्याविषयीचा प्रश्न–

शेतकरी व जमीन मालकाना सुगीच्या दिवसात आपल्या शेतात पिकलेले सर्व धान्य घरी घेऊन जाण्यास सरकारने परवानगी दिली होती. त्यानुसार शेतकऱ्यांनी जमीन मालकाचा खंड तसेच मजुरांचा व इतरांचा धान्यातील हिस्सा देऊन वर्षभरासाठी लागणारे धान्य ठेवले व काही विकून काढले. पण पाच, सहा महिन्यानंतर याच सरकारने शेतकऱ्याला धान्य देण्याचा तगादा लावला. या सरकाच्या धरसोड वृत्तीमुळे शेतकरी भयभीत झाला आहे. याबाबत जाब विचारण्यासाठी 'तरूण भारत' ने अग्रलेख दिला आहे. हा शेतकऱ्यावर धडधडीत जुलूम नव्हे काय? अशाने तो अधिक धान्य कसा पिकवील ? तांत्रिक अडचणी उपस्थित करून शेतकऱ्यांना सतावू नका ! अशा कडक शब्दात सरकारला फटकारण्याचे धाडस, या लेखात केले आहे.[३०]

२.२.१.१६ सरकारच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य–

मुंबई सरकारने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी 'कर्जनिवारण कायदा पास केला, या कायद्याप्रमाणे शेतकरी वर्गाला कोणेते हक्क प्राप्त झाले आहेत. तरतुद कोणकोणत्या आहेत. वगैरेचे विवेचन करणारा समग्र लेख दिला आहे.[३१]

नडलेला अशिक्षित शेतकरी ज्या शेतकऱ्यांची जमीन गहाण हक्काने सावकाराकडे ३० जानेवारी १९१० नंतर केव्हांही दिली असेल, तर अशा शेतकऱ्यांनी लवादाकडे अर्ज करावा व आपली जमीन आपल्या ताब्यात घ्यावी. असा जरी कायदा झाला असला, तरी हया शेतकरी वर्गात ही बातमी पोहचली नव्हती. सरकारने मागितलेल्या कागदपत्राच्या पुर्ततेबाबत हा शेतकरी पूर्ण हैराण झाला होता. एका कागदासाठी बेळगांवच्या कचेरीवर येरझाऱ्या मारून थकला आहे. कुलकर्णीकडून कामे वेळेत होत नाहीत. तेव्हा अशा कायदयाच्या योजनेसाठी शेतकऱ्यांना ठराविक मुदत दिली आहे. या मुदतीत शेतकऱ्यांची कामे पूर्ण होणार नाहीत. यासाठी आणखी दोन महिन्याची मुदत वाढवून दयावी. याच बरोबर कुलकर्णीला सरकारने ताळयावर आणले पाहिजे. पुढच्या एका लेखात 'अशा योजनांचा प्रसार खेडोपाडी झाला पाहिजे. या उद्देशानी जनजागृतीची मोहिमेची गरज आहे. तरच या योजना गरजू लोकांच्यापर्यंत जाऊन पोहचतील अशा योजना फक्त जाहीर करून चालणार नाही. कारण या वर्गात सर्वच अज्ञान–अंधःकार आहे. तेथे कसलेही कायदे केले, तरी गरीब जनतेची पिळवणूक होणारच' हा प्रश्न केला आहे.

२.२.१.१७ चंदगड महालातील भात पिकाविषयीचा प्रश्न–

'चंदगड महालातील गंभीर परिस्थिती' महालातील भात बाहेर नेऊ नका! कलेक्टर लक्ष देतील काय'? सरकारने महालकरी यांच्या मदतीने दडपशाही करून चंदगड महालातील भात स्वस्त दराने खरेदी केले. हे खरेदी केलेले भात महालातील लोकांच्या उपयोगासाठी खरेदी करत आहोत. असे भासवून भात ताब्यात घेतले. भात पेरणीच्या वेळी बियाणे शिल्लक नाही. तेव्हा शेती पड पडेल अशी भीती शेतकऱ्यांना वाटू लागली आहे. जमा असणारे काही भात पोलिसामार्फत बाहेर नेण्यात आले आहे. शिल्लक असणारे भात तरी महालाबाहेर जाऊ नयेत. यासाठी महालकऱ्यांनी प्रयत्न करावे, शेतकऱ्यांना दिलासा दयावा. ही विनंती केली आहे.[३२]

२.२.१.१८ शेतकरी परिषद (१५ जानेवारी १९७९)–

बेळगांव येथील ज्योती महाविद्यालयात १५ जानेवारी १९७९ रोजी ६००० शेतकऱ्यांची परिषद भरण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्ष बापूसाहेब लाड हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये कोल्हापूरचे खासदार भाई दाजीबा देसाई हे होते. साठेबाजी करणाऱ्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. शेतमालाला भाव दयावा. त्याच बरोबर कोको कोला ७०० मि.ली. सारख्या निकृष्ठ पेयात कोको कोलाचा थोडासा अर्क असताना आम्ही त्याला १.२५ रु. देतो. दूध मात्र लिटरला १.७० रु. विकले जाते. हा कोणता न्याय शेतकऱ्यांच्या वस्तूला किंमत मिळाली पाहिजे. शेतकरी जगला तरच देश जगेल याच भावनेने सरकारने या शेतकरी वर्गाकडे पाहिले पाहिजे. शेतकरी वर्गाची संघटना बांधून फक्त मतदानापुरतीच वापरून चालणार नाही. तर त्यांना नवनवीन ज्ञान स्वीकारण्यास भाग पाडले पाहिजे. तर शेतकऱ्यांच्या कष्टाचे दिवस मागे पडतील असे मत मांडले आहे.[३३]

२.२.१.१९ आजरे तालुक्यातील रयतेला केलेली विनंती–

'आजरे तालुक्यातील रयतेला जाहीर विनंती' या बातमीच्या शीर्षकाखाली 'तरूण भारत' कारानी रयतेला मार्गदर्शन केले आहे. 'आजरे तालुक्यात ९५ टक्के लोक शेतकरी आहेत. या शेतकऱ्यांना वर्षभर राबूनही पोटभर अन्न व अंगभर कापड मिळत नाही. याचे कारण काय? आजरे तालुक्यातील सध्याचा शेतसारा हा जमिनीचे उत्पन्नाचे मानाने असाहय आहे. त्यात आणखीन शेतसारा वाढवण्याचा शासनांचा प्रयत्न आहे. या सरकारच्या धोरणाला विरोध करण्यासाठी सर्व शेतकरी वर्गानी एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे. या निवेदनावरून गरीब जनता सरकारला घाबरते. अशा शेतकऱ्यांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द उभे करण्याचे व त्याना साथ देणारे निवेदन प्रसिद्ध कले.[३४]

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी ५ नोव्हेंबर १९३३ रोजी बाबुराव ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. 'सारा कमी करा! शेतकऱ्याला वाचवा, कर्ज व्याजाचा दर ६ टक्के करा' या मागण्या करण्यात आल्या. त्या सरकारला पटवून देणारा हा लेख आहे.[३५]

२.२.१.२० विनोबाजीची भूदान व ग्रामदान चळवळ–

विनोबा भावे यांच्या भूदान यज्ञापासून ते ग्रामदाना पर्यंतच्या कार्याची दखल तरूण भारतने घेतलेली आहे. बेळगाव जिल्हा व महाराष्ट्रात ठिकठिकाणी विनोबांची व्याख्याने

झाली, त्यांना प्रसिध्दी देण्याचे महत्वपूर्ण कार्य या वृत्तपत्राने केले आहे.

अ. भा. संघाचे चिटणीस श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुध्दे हे भूदान यज्ञाच्या प्रचार दौऱ्यावर बेळगाव येथे आले असता, १५ जानेवारी १९५४ रोजी जाहीर सभा घेऊन भाषण केले. 'आचार्य विनोबा भावे हे तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्यासारखेच एक संत आहेत. त्यांच्या मतानुसार एकाच्याच मालकीची जास्त जमीन असू नये; ती भूमिहीनांना थोडी वाटून द्यावी. या हेतूने त्यांनी भूदान यंज्ञ आंरभिंला आहे. भूदानाचा उगम तेलंगणात एप्रिल १९५१ मध्ये पोचमपल्ली येथे झाला. हिंदुस्थानात एकूण पाच कोटी भूमिहीन आहेत. प्रत्येकाला निदान एक एकर तरी जमिन मिळाली पाहिजे. या हिशोबाने पाच कोटी एकरांचा संकल्प सोडता, भारताच्या घटनेप्रमाणे सर्वाना समान संधीचा व सुखाने जगण्याचा हक्क निर्माण होईल. या दृष्टीने जमिनीची वाटणी समान हक्काने झाली पाहिजे. तेव्हा हा जमीन वाटणीचा प्रश्न भूदान यज्ञाद्वारे शांततेने सोडविण्याचा निश्चय विनोबानी केला आहे. 'यांत्रिक पध्दतीने शेती करून अधिक उत्पन्न वाढवण्याचा उद्देश सफल होणार नाही. तर सर्वाना समान संधी देऊन सुखी जीवन निर्माण केले पाहिजे. या विनोबाच्या विचारांचा प्रचार करण्यासाठी आलो आहे.' त्यांच्या व्याख्यानाचा सारांश या लेखात दिला आहे.[३६]

अ) विनोबाजींचा बेळगाव जिल्हयात प्रवेश–

विनोबा भावे यांनी बेळगाव जिल्हयातील आपला कार्यक्रम जाहीर केला होता. हा पूर्ण कार्यक्रम 'तरूण भारत' ने प्रसिद्ध करून लोकांच्या प्रतिक्रिया नोंदवलेल्या आहेत.

बेळगाव जिल्हयातील अळणावर गावापासून ते म्हैसूर राज्यातील शेवटचे गाव निपाणी तेथे म्हैसूर राज्यातील सर्व भूदान कार्यकर्त्यांचा मेळावा घ्यायचा व निपाणी नजीकच्या खडकेवाडा या गावातून महाराष्ट्रात प्रवेश करायचा, असा हा कार्यक्रम होता. विनोबाजींना बेळगाव म्हैसूरचे आहे, हे मान्य होते असा अर्थ मराठी जनतेने घेतला व जनता नाराज झाली होती. पण १० मार्च १९५८ रोजी विनोबाजींनी अळवणावरमध्ये सभा घेतली तेव्हा त्यांनी असे उद्गार काढले की 'आता मला महाराष्ट्राच्या अंगणात आल्यासारखे वाटते' ही बातमी 'तरूण भारत' ने दुसऱ्या दिवशी ठळक अक्षरात मथळाच छापला. मराठी माणसांनी विनोबाजीच्या या म्हणण्याचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. सीमा भागातील वातावरण चटकन बदलले. दि १२ मार्च या दिवशी सायं. ५ वा खानापूर येथील प्रवचनाच्यावेळी विनोबाजीनी जनसमुदायाला उद्देशून

"खेडयाच्या योजना दिल्लीत बसून ठरवतात. खेडयाच्या योजना ज्या ठरवावयाच्या त्या खेडयात बसून खेडयातील लोकांनी स्वत:ला पाहिजे तशा ठरविल्या पाहिजे. दिल्लीत बसून योजना ठरवून ती खेडयातील जनतेवर लादली तर कसे होईल?"[३७]

समाज विकासासंबंधी लोकांना उत्साह वाटत नाही. हे सांगताना विनोबाजी म्हणतात, "खेडयातील जनतेला जे पाहिजे ती योजना द्या, तुमची योजना त्यांच्यावर लादू नका," ग्रामदानाच्या कल्पनेकडे वळून विनोबाजी पुढे म्हणतात ''ग्रमदान म्हणजे सर्वांनी भोगावयाचा भोग, ग्रामदान म्हणजे सहस्त्रभोजन आहे. ग्रामदानाने तुम्हाला प्रेम मिळेल, रात्री चांगली झोप येईल खेडयात सरकार स्थापन होईल."[३८]

आ) विनोबाजींचा ग्रामदान कार्यक्रम–

भूदान–ग्रामदानाच्या चळवळीसंबंधी विनोबा भावे यांनी बेळगाव विभागातून जी पदयात्रा काढली व जे प्रबोधन केले त्यांच्या विचारांचा परिणाम विभागात सर्वत्र स्पष्ट होते. ग्रामाचे दारिद्रय घालवण्यासाठी गावपातळीवर ज्या ग्रामदानाच्या चळवळी झाल्या. त्याचा परिणाम बेळगांव पासून ३० कि.मी. अंतरावर असणाऱ्या चंदगड तालुक्यातील लहान 'बिजूर' या गावी झाला. ग्रामदानातून साधलेला गावाचा विकास याबाबतची सविस्तर माहिती 'तरूण भारत' च्या अंकात प्रसिध्द झालेली आहे. त्याचा चिकित्सक पध्दतीने अभ्यास करून वर्णन केले आहे.

आचार्य विनोबा भावेची ग्रामदानाची कल्पना भूदानातून विकास पावली असली, तरी भूदान आणि ग्रामदान यात स्पष्ट भेद केल्याशिवाय ग्रामदानाचे महत्त्व लक्षात येत नाही. जमीन मिळण्याऐवजी सारे गावच कार्यकर्त्यांना 'दान' मिळू लागले. गावच्या सर्व लोकांनी आपल्या साऱ्या जमिनीची दानपत्रे सादर करून कार्यकर्त्यांनाही संभ्रमात टाकले १२ सप्टेंबर १९५३ रोजी ओरिसा राज्याचा कोरापूर रायघडा विभागत गोबरपल्ली हे पहिले ग्रामदान गाव म्हणून जाहीर झाले.[३९]

ग्रामदानामुळे खेडयातील आर्थिक सत्ता विकेंद्रीत होते, त्यामुळे कोणीही भूमिहीन राहत नाही. समाजातील उच्चनीच, गरीब व श्रीमंत हे भेद नाहीसे होण्यास मदत होते. गावालाच जमिनीचा मालक मानले जाते. गावातल्या सर्व मुलां–मुलीना समान शिक्षण मिळेल. गावातील कोणीच उपाशी पोटी झोपणार नाही. हे सर्व आपल्याला ग्रामदानातून साधता येईल, असे विचार २८ मार्च १९५८ च्या आजरा येथील व्याख्यानात विनोबा भावे यांनी मांडले.[४०] त्याचा परिणाम

म्हणून 'बिजूर' या गावचे ग्रामस्थ पुढे येऊन गावचा विकास केला. त्याचा वृत्तांत पुढील प्रमाणे बिजूर या गावची त्यावेळी लोकसंख्या तीनशे होती. गावचे क्षेत्रफळ १००३ एकर होते. त्यापैकी १०० एकर घटप्रभा नदीची गाळाची जमीन होती. तरीही दारिद्रय, ते घालवण्यासाठी गावातील ग्रामस्थांनी स्वतःच्या मालकीची जमीन एकत्रित करून सर्वानी सहकार्याने व एकजूटीने एकत्रित येऊन ग्रामदानाचा संकल्प केला.[४१]

इ) ग्रामदानानंतरच्या सुधारणा–

श्री. रवळनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाने ग्रामदानाचा संकल्प झाला. गावाची सर्व जमीन एकत्रित करून सहकारी शेतीचा एक नमूना उभा केला. ग्रामदानानंतर गावाने एक जोड रस्ता श्रमदानाने तयार केला. ग्राम स्वराज्य सोसायटी रजिस्टर नोंद करण्यात आली. गावाची सगळी जमीन ग्रामसभेच्या नावावर सरकारी दप्तरात नोंदवली गेली. भात शेती जपानी पध्दतीने करण्यात आली. घरोघरी कंपोस्ट खताचे खड्डे तयार करणेत आले. गावात संपूर्ण दारूबंदी करण्यात आली.[४२]

ई) आर्थिक विकासाची योजना–

गावांचा अर्थिक विकास साधण्यासाठी पुढीलप्रमाणे योजना आखण्यात आली.

१. बागायती व खरीप पिकांसाठी पाण्याची सोय उपलब्ध करून देणे.
२. भाजीपाल्याची लागवड करणे.
३. डोंगर माळांवर काजूची झाडे लावणे.
४. पडि क जमीन लागवडीखाली आणणे.
५. जमिनीच्या मालकी हक्काचा अडथळा नसल्याने शास्त्रीय पध्दतीने बांधबंदस्ती करणे.
६. कोंबडया व जनावरे अधिक उत्पादक बनविण्याचा प्रयत्न करणे.
७. कंपोस्ट खताच्या खड्डयांत वाढ करून शेंद्रीय खताचा वापर करणे.
८. नदीच्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून बागायतीचे क्षेत्र वाढविणे
९. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे.

उ) सामूहिक शेतीचा प्रयत्न –

बिजूरच्या गावकऱ्यांनी नदी काठची २५ एकर पडीक जमीन सामूदायिकरित्या कसून जपानी भात शेतीची लागवड केली. सुमारे २५० मण भात पिकविले, त्याचबरोबर ३५ एकर

नदीकाठच्या जागेत ऊस लागवड व ३ एकर जमिनीत मिरची लागवड करण्यात आली. पाणी पुरवठयाच्या सोयीसाठी निर्माण समितीने १० हॉर्स पॉवरचे इंजीन घेण्यासाठी कर्ज पुरवठा केला. मिळणारे उत्पन्न हे सामूहिक उत्पन्न म्हणून ठेवले.

ऊ)सोसायटी व धान्यकोठी–

अडचणीच्यावेळी ग्रामस्थांना सुलभरित्या आर्थिक मदत होण्यासाठी सर्वांच्या संगनमताने ग्राम स्वराज्य सोसायटीची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून गावच्या आर्थिक आवक जावकेचे सर्व व्यवहार ही सोसायटी पाहत असे. धान्याशिवाय उपासमारीची वेळ येऊ नये, म्हणून सर्व कुटुंबाचे स्वत:कडे असणारे ठराविक धान्य हे सामुदायिक कोठडीत जमा करून घेतले जात असे. कारण पावसाळयाच्या हंगामात धान्य संपते अशा वेळी त्याचा उपयोग होता.[४३]

आचार्य विनोबाजींच्या स्वप्नातील ग्रामदान ही संकल्पना बिजूर सारख्या छोटयाशा मागास गावात कांही वर्षे राबवून विकास साधण्याचा प्रयत्न केला. सर्वांच्या सहभागातून कामे शक्य झाली या गावाने आसपासच्या गावात एक आदर्श घालून दिला. पण हा विकास आकडेवारीवरून बघताना असे जाणवते की, म्हणावा तसा विकास सामुदायिक पध्दतीने साध्य झाला नाही. पहिली दोन वर्षे ओला दुष्काळ पडला त्यामुळे अपेक्षेप्रमाणे अन्नधान्य मिळाले नाही. तसेच रवळनाथ शिंदे सारखी माणसे सर्वांना घेऊन कार्यरत होती, तोपर्यंत एकी एकवटलेली होती. पण ज्यावेळी वेगवेगळ्या कारणाने एकी दुभंगली व सामुदायिक ग्रामदानाचा प्रयोग थांबला. असे असले तरी, आजही त्यावेळचा सामुदायिक शेतीचा प्रयोग ग्रामस्थाच्या चर्चेचा विषय बनतो. बांध विरहीत शेती, गाव, रस्ते, काजूची लागवड व झाडे त्यावेळच्या आठवणी ताज्या करताना दिसतात.[४४]

२.२.१.२१ पिकांचे व वनस्पतींचे महत्व –

अ) काजूचे महत्व –

'महारोगावर काजूचे औषध' या शीर्षकाखाली लेख प्रसिध्द करून काजूच्या झाडाचे महत्त्व सांगितले आहे. समाजातील खेडोपाडयातील लोकांनी आपल्या भागात मिळणारी वेगवेगळी फळे ऋतुमानानुसार मिळतात. ती आपल्या आहारात वापरली पाहिजे. त्यामुळे आपल्या शरीरात रोगप्रतिबंध शक्ती वाढण्यास मदत होते.[४५]

आ) काजूची लागवड किफायतशीर –

काजू या पिकांकडे विशेषतः चंदगड तालुक्यातील लोकानी लक्ष दयावे, कारण या विभागात काजूला पोषक असे वातावरण व जमीन आहे. तेव्हा काजूची शास्त्रोक्त पध्दतीने लागवड कशी करावी. ही माहिती या लेखात प्रसिध्द केली आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांने डोंगर उताराला पडीक जमिन व बांधावर लागवड करावी. असे स्पष्ट केले आहे.[४६]

अधिक धान्य पिकविण्याची माहिती कागदी घोडे नाचविल्याने यशस्वी होणार नाही! उद्देश चांगले असून भागत नाहीत, कारभारात कार्यक्षमता हवी. असा जाब विचारणारा अग्रलेख २३ मार्च १९४९ ला दिला आहे. त्यानंतरच्या २५ मार्च १९४९ अग्रलेखात 'अधिक धान्योत्पादनाचा प्रश्न राष्ट्रव्यापी आंदोलनाने सुटेल. इतर सर्व प्रश्न गौण मानून या एकाच प्रश्नात राष्ट्राची शक्ती केंद्रीत करा!' पंडित नेहरू हेच प्रेरणा देऊ शकतील, असा विश्वास देणारा लेख आहे.[४७]

२.२.१.२२ मसाल्याचे पदार्थ–

अ) पांढरी व काळी मिरी –

भारतात मिळणाऱ्या पांढऱ्या व काळी मिरीचे महत्त्व व उपयुक्तता स्पष्ट करणारा लेख आहे. जगात ३० टक्के मिरीची निर्यात आपला देश करतो. अशा उत्पादनाकडे सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी सहकारी संस्थांची स्थापना करून प्रक्रिया करणारा कारखाना उभा केला पाहिजे, तरच इतर देशातील येणाऱ्या मिरीच्या तुलनेने आपली मिरी बाजारात टिकाव धरील. मिरीची निर्यात वाढवून विदेशी चलन भारतात मोठया प्रमाणात यावे. याकडे सरकारचे, उत्पादकांचे व व्यापाऱ्यांचे लक्ष असणे या स्पर्धेच्या युगात गरजेचे आहे.[४८]

२.२.१.२३ जंगली वनस्पती महत्व–

अ) हिरडा बहु उपयोगी –

हिरडा या फळझाडाचे महत्त्व स्पष्ट करणारा लेख 'हिरडयाची झाडे तोडून जंगल संपत्तीचे कोळसे करू नका' सरकारने या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. 'झाडांची होणारी तोड थांबवली पाहिजे.' हा संपादकीय लेख दिला आहे. सहकारी तत्त्वावर हिरडा फॅक्टरी सुरू करण्याचे नियोजन झाले आहे. हिरडयावर प्रक्रिया करणारे कारखाने निघणार पण त्या अगोदर जंगलात हिरडा शिल्लक पाहिजे. त्यासाठी वेळीच सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे, असे मत

मांडले.[४९]

ब) मधमाशा पालन –

चंदगड येथे अखिल भारतीय मधमाशा पालकांची ११ वी परिषद दि. २ ते ४ डिसेंबर १९४९ रोजी भरली होती. हया परिषदेच्या अगोदरच्या अंकात 'मधमाशा पालन एक शेतकऱ्यांची जीवन संजिवनी' या लेखात परिषदेचा सर्वसामान्य शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. या परिषदेला वेगवेगळया ठिकाणावरून ४ हजार प्रतिनिधी जमले होते. अशा ग्रामोद्योगाकडे जनतेचे लक्ष वेधण्यासाठी 'तरूण भारत' ने प्रसिध्दी दिली आहे.[५०]

२.२.१.२४ कापसाचे पीक–

कर्नाटकातील धान्योत्पादक पिकापैकी कापसाचे पीक महत्वाचे आहे. हे पीक मुख्यतः धारवाड, विजापूर व बेळगाव या तीन जिल्हयात मोठया प्रमाणात घेतले जाते. म्हणूनच या पिकाबाबत लोकजागृतीची गरज लक्षात घेऊन लेख दिला आहे. या लेखात बियाणाचे महत्त्व, जमिनीचा प्रकार व मशागत याची माहिती पुरवण्यात आली आहे. आपल्या शेतकरी वर्गातून बाजार कमिटीची निवड केली जाते. तेव्हा कोणतीही तक्रार निवारण करता येते. कापसाची विक्री करताना शेतकऱ्यांनी बाजार कमिटयाच्या माध्यमातून थेट विक्री करावी. दलालांच्या मार्फत करू नये.[५१]

२.२.१.२५ रेशीम पैदास –

रेशीम उत्पादनाचा धंदा नव्याने सुरू करण्यासाठी प्रथमतः शेतकऱ्यांनी आपल्या शेतात तुतीची लागवड करावी. शेतकऱ्याला प्रोत्साहीत करण्यासाठी सरकारने रु. १००० पर्यंत शेतकरी कुटुंबाना प्रत्येकी १५० रु. तगाई देण्याचे ठरवले आहे. त्याच बरोबर तीन एकर तुतीची लागवड करणाऱ्यास त्यात ही ५० रु. सूट देण्यात येणार आहे. शिवाय दोन वर्षाची सारामाफी देणार आहे. तसेच या संशोधनासाठी व प्रचारासाठी १ लक्ष ३३ हजार रुपये मंजुर केले आहेत. तेव्हा शेतकरी वर्गाने या योजनांचा लाभ घ्यावा. आधुनिक शेती पध्दतीला सामोरे जावे, असे आवाहन केले आहे.[५२]

पीक भरपूर व उत्तम येण्यास मुख्यतः तीन गोष्टींची जरूर असते, बियाणे, मशागत व खते या तिन्ही गोष्टीचे नियोजनबध्द प्रमाण ठरवून वेळेवर पिकांना पाणी, मशागत व खते दिली तर उत्पादन जादा येणे शक्य आहे. त्याचबरोबर माती प्रकार व परीक्षण, मुलद्रव्याची

कमतरतेचा अभ्यास, बियाणांची वाणे, शेणखते, यांचा ताळमेळ साधल्यास उत्पादन दुप्पट मिळते. यासाठी जमिनमाती परीक्षण करून घ्यावे व त्यानुसार जमिनीत कोणते पीक घेता येईल याचा अभ्यास करावा. इत्यादी अभ्यास पूर्ण लेख दिले आहे.[५३]

२.२.१.२६ गुळावरील संकट –

बा. रं. सुंटणकर यांचा लेख आहे. जगातील इतर देशाच्या मानाने प्राचीन काळापासून मध्ययुगात भारत हा देश गूळ आणि साखरेच्या उत्पादनाबाबत अग्रेसर होता. परंतु आज जर्मनीसारख्या देशात बीटपासून साखर तयार करण्याचा मोठा धंदा सुरू आहे. त्यामुळे आपल्या साखर निर्यातीला आव्हान आहे. इंडियन शुगर कमिटीने, कृषी विभागाने वेगवेगळया ऊसाच्या जातीचे बियाणे पैदास करून हा शेती व्यवसाय पूर्व पदावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. अशा उद्योगाला लागणारे तंत्रज्ञान, संशोधन यासाठी सरकारने स्वंतत्र व्यवस्था करावी अशा प्रकारचा अभ्यास पूरक लेख देऊन सरकाराला काही सूचना केल्या आहेत.[५४]

"शेती मालाला किफायतशीर दर मिळावेत ही देशातील सर्व शेतकऱ्याची मागणी आहे. राष्ट्रपातळीवर यावर तोडगा निघेल!" ना. शंकरराव चव्हाण यांचे आश्वासन १५ जानेवारी १९७८ रोजी चंदगड तालुक्यातील यशवंतनगर येथील शेतकऱ्यांच्या मेळाव्यात महाराष्ट्राचे त्यावेळचे वित्त नियोजन व उर्जामंत्री श्री शंकरराव चव्हाण हे बोलत होते. 'चंदगड तालुका हा मागासलेला असून कित्येक वर्षे अविकसित राहिला आहे. चंदगड तालुक्यातील रस्ते दुरूस्तीसाठी व शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न करू' असे आश्वासन त्यांनी दिले. पुढे याच बातमीत संपादक म्हणतात 'किती वेळा उडवे आश्वासन देणार? काय याच आशेवर या मागास समजल्या जाणाऱ्या तालुक्याला कायम ठेवणार, थोडा विचार होवू दे' असा प्रतिटोला लगावलेला आहे.[५५]

२.२.१.२७ कुळ कायद्याची कुळकथा –

'कुळ कायद्याची कुळकथा' या १७ जून १९७६ च्या मुरलीधर घाटे यांच्या लेखाला प्रसिध्दी देऊन या कुळ कायदयातील दुरूस्ती व वाटचालीबाबत विचार मांडलेले आहेत. "कुळ कायद्याच्या प्रचारामुळे लालक्रांति लांबणीवर पडली." या कायद्याने 'कसेल त्याची जमीन' या स्वराज्या पूर्वीच्या घोषणेला प्रत्यक्षात स्थान मिळाले. कुळे मालक झाल्याने शेती आपुलकीने होऊ लागली. स्वराज्यातील लोकशाही सरकारने कुळ कायद्याचा अवलंब केल्याने सामान्य

जनतेचा लोकशाहीवरील विश्वास दृढ झाला. असे अनेक फायदे या कुळ कायद्याने झाले, तरी कुळ कायदयाने काही मुलभूत मूल्य बदलावयास हवी होती. ती वेळीच बदललेली नाहीत. उदा. 'कसेल त्याची जमीन अशी घोषणा देण्याऐवजी कसेल त्याचे पीक' अशी घोषणा दयावयास हवी होती. कुळ कायदा ज्या व्यक्तींनी केला, त्यांनी पुढे यातून पळवाट काढली. हल्लीच्या कुळ कायद्यामुळे व जमिन वाटपाच्या मोहिमेमुळे अनेक भूमिहिनांना जमिनी मिळाल्या. खंडकरी कुळे मालक झाले हे सत्य आहे. त्याने जमिनीच्या प्रश्नाची तीव्रता कमी झाली, असंतोष मावळला पण ज्यांच्या हातून जमिनी गेल्या, ते मात्र नाराज झाले. त्याचबरोबर शहरातील जमिनदारांनी या कायद्यानंतर पुन्हा खेडयात जावून आपल्या जमिनी परत घेण्याचा प्रयत्न केला. काहीना त्या जमिनी कायद्याने मिळाल्या, मग कसेल त्याची जमिन याला काय अर्थ आहे. असा प्रश्न विचारताना पुढे लेखक म्हणतात 'भारतातील सर्व अस्तित्त्वात असणारे कुळ कायदे एकत्रीत करून अभ्यास केला, तर असे दिसून येईल, की अनेक ठिकाणी कुंपणाने शेत खाल्ले आहे.' आजचा गरीब शेतकरी जागृत नाही. उलट सावकार, जमिनदार हे मात्र सावध आहेत. त्यामुळे हा कायदा जमिनदारानाच धार्जिण आहे. असा निष्कर्ष लेखकाने काढला आहे.[५६]

२.२.१.२८ पारगडच्या शेतकऱ्यांची गाऱ्हाणी –

पारगड किल्लयावरील रहिवाशांची स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर जी उपेक्षा झाली. त्यांच्यावर जी संकटे आली. त्याबाबत 'तरूण भारत'च्या अंकात ज्या बातम्या प्रसिध्द झाल्या यावरून पारगडावरील शेतकऱ्यांची परिस्थिती समोर येते ती पुढील प्रमाणे आहे.

'चंद्र, सूर्य गगनी तळपताहेत तोवर गड जागता ठेवा' अशी राजांची आज्ञा होती. शिवरायांच्या मृत्युनंतर सुमारे तीनशे चाळीस वर्षे त्या शूर मावळयांच्या वारसांनी आजही किल्ला जागता ठेवला. पारगडचे बांधकाम पूर्ण झाल्यापासून १८१ वर्षे हा गड अजिंक्य राहिला.[५७]

या किल्याचे मुख्य मानकरी चव्हाण त्यानंतर उमरठ जि. सातारा वरून आलेली घराणे म्हणजे मालुसरे, शेलार, झेंडे, कदम, नांगरे, डांगे, नाईक, कळंबे, जगताप, सुर्यंवंशी, चव्हाण, माळवे, कुंडले, कुबल, चिरमुले, बेरडे, झांबळे, थोरात व जाधव इत्यादी. तसेच कारखानीस, फडणीस, सबनीस, मणेरकर, गडकरी अशी ब्राह्मण घराणे सन १९५० पर्यंत आपला कार्यभार सांभाळत होती. १९५२ पर्यंत या गडावर १५०० लोकवस्ती व २०० घरे आणि १०० पेन्शनर मंडळी असल्याचा उल्लेख सापडतो.[५८]

२.२.१.२९ स्वातंत्र्यानंतर किल्ले पारगडची व्यथा –

सन १७८४ साली पारगडवर इंग्रजांची सत्ता आली. पारगडची एकनिष्ठ लढावू जमात म्हणून तेथील सैन्याचा इंग्रजांनी आदर केला. पेशवेकाळापासून चालत आलेली ३० गावांची इनामे जप्त केली. पण प्रत्येक सैनिकाला त्यांच्या हुद्दयाप्रमाणे मानधन ठरवून दिले. हे मानधन सन १९४० पर्यंत बेळगावच्या तहसिलदार कार्यालयातून मिळत असे. बेळगावचे कलेक्टर पारगडला भेटी देवून लोकांच्या अडी–अडचणी सोडवत असत. सन १९४० मध्ये कलेक्टर मि. ट्रेक्प यांनी शेवटची भेट दिली होती.[५९]

पारगडच्या लोकांचे उपजिवीकेचे साधन म्हणजे कुमरी जमीन डोंगर उतारावरील नाचणी, सावा व वरी इत्यादी पिके पिकणारी जमीन वाढत्या लोकसंख्येला अपुरी आहे. त्यामुळे आम्हास अर्धपोटी जीवन कंठावे लागते. तेव्हा मिरवेल या गावच्या सर्वे नं. २० चे जंगल कुमरी शेतीकरीता देवून आमचा पोटाचा प्रश्न सोडवावा. असा विनंती अर्ज कलेक्टर जि. बेळगांव यांचेकडे केला आहे. त्याबाबतची बातमी प्रसिध्द करून 'पारगडच्या एकनिष्ठ मावळयांची पोटासाठी भटकंती' असा लेख देऊन या परिस्थितीचे वर्णन केले आहे.[६०] अनेक वर्षे अर्ज विनंत्या करून सुध्दा पाठपुरावा झाला नाही. आजही या लोकांना स्वतःच्या मालकीची जमीन नाही. हे आश्चर्य या लेखात व्यक्त केले आहे.

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळयांची स्वातंत्र्यानंतर उपेक्षा होत आहे. स्वाभिमानी बाणा असणाऱ्या या पारगड वाशीयांची होरपळ संवेदनशील व्यक्तिच्या हृदयात कालवाकालव करणारी आहे. स्वतंत्र भारतामध्ये हे भोग यांच्या वाटयाला येऊ नयेत. यासाठी ठोस उपायांची आवश्यकता आहे. प्रशासकीय अडसर बाजूला करून हक्काच्या व मालकीच्या जमिनी त्यांना कायम स्वरूपी देणेचे धोरण ठरवणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या भावना 'तरूण भारत' ने वेगवेगळया लेखातून पोट तिडकीने व्यक्त केल्या आहेत.[६१]

२.२.१.३० गुलामगिरीची पध्दत :–

'ब्रिटिश हे हिंदुस्थानात गुलामगिरीची पध्दत बंद केल्याचे जगाला ओरडून सांगतात. पण आजही कित्येक संस्थानातून ही विकृत व माणुसकीला काळिमा लावणारी चाल आहे. त्याबद्दल राष्ट्रसंघाच्या बैठकीत वाद–विवाद झाला ही भारताच्या दृष्टीने खेदाची बाब आहे.'

असे मत 'तरूण भारत' ने २७ ऑगस्ट १९२९ च्या अंकात व्यक्त केले आहे.[६२]

मध्य हिंदूस्थानातील संस्थानात १,६०,७३५ गुलाम (१९२१ ची खानेसुमारी) आहेत. या गुलामामध्ये दरोगा, हुजरीस, रावण, रजपूत, चेल, गोळ इत्यादी निरनिराळ्या जातीचा भरणा आहे. या गुलामांच्या शरिरावर व मनावर संस्थानिकांचे संपूर्ण स्वामित्व आहे. आजही हे संस्थानिक गुलामांच्या बायका व मुलांच्यावर मालकी गाजवित आहेत. ते पळून जावू नये म्हणून कायदे कानून तयार केले आहेत. त्यांच्याकडून सोळा, अठरा तास काम करून घेतले जाते. अशा प्रकारे अंधाधुंदीचे प्रकार संस्थानात चालू होते. 'बोलाची कढी बोलाचाच भात' या म्हणीप्रमाणे बिकानेरचे महाराज राष्ट्रसंघाच्या बैठकीस हिंदुस्थानाचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. त्यांनी व्हर्सेलिस तहावर सही केली, पण त्या तहातील आचार–विचारांचा विचार केला तर महाराजांचे धाडसाचे आश्चर्य वाटते, कारण याच महाराजांच्या संस्थानात १०,८८४ गुलाम आहेत. या संस्थानातील परिस्थितीची बादशाही मजूर कमिशनकडून चौकशी व्हावी व गुलामाची मुक्तता करावी. अशा प्रकारच्या मागणीचा लेख 'गुलामगिरीचे उच्चाटन व मुक्तता व्हावी' म्हणून प्रसिध्द केला आहे.[६३]

२.२.१.३१ हडलगे धरण –

महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्न तापलेला असतानाच कर्नाटक राज्याच्या सीमा भागात महाराष्ट्राच्या हद्दीत कोल्हापूर जिल्हयातील हडलगे गावी घटप्रभा नदी ठिकाणी धरण बांधण्याचा घाट मुंबई सरकारने धरला. या धरणामुळे महाराष्ट्राच्या हद्दीतील २० गावे पूर्ण पाण्याखाली जाणार होती. २९ गावाना पाण्याचा फटका बसणार होता. हे पाणी मात्र कर्नाटकातील भागाला फायदेशीर ठरणार होते. धरण क्षेत्रातील जनतेला विश्वासात न घेता सरकारी पातळीवर जोराच्या हालचाली सुरू झाल्या व कामाला गती मिळाली. अशा अवस्थेत 'तरूण भारत' वृत्तपत्राने जनतेच्या बाजूने जी भूमिका घेतली. ती उल्लेखनीय आहे.

२२ एप्रिल १९५६ रोजी मुंबई राज्याचे सहकार मंत्री ना. एम. पी. पाटील यांच्या हस्ते घटप्रभा नदीवरील हडलगे या ठिकाणी धरणाचा भूमिपूजन समारंभ साजरा झाला. या कार्यक्रमासाठी मुख्य संयोजक व नियोजक हे सर्व कर्नाटक प्रांतातील होते. या कार्यक्रमाच्यावेळी निदर्शने करून मंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी नेसरी गावचे सामाजिक कार्यकर्ते श्री. तुकाराम कोलेकर हे धरणग्रस्त लोकांचे नेतृत्व करत होते.[६४]

दुसऱ्या दिवसापासून गतीने कामाला सुरूवात झाली. ४२ खेडयातील जनतेवर ओढवलेले हे संकट लक्षात घेऊन 'तरूण भारत' ने जनजागृतीचे कार्य हाती घेतले. जन आंदोलनाच्या रेठयाने हे धरणाचे काम बंद पाडून, मराठी भाषिक लोकाना न्याय मिळेल. ही धारणा पुढे ठेवून स्वतः संपादक खेडोपाडी फिरून सभा, बैठकी घेऊन जनजागृती केली. या धरणाबाबतचा दररोजचा वृत्तांत 'तरूण भारत'च्या अंकात प्रसिध्द करून हा प्रश्न जिवंत ठेवला.

धरणाच्या निर्मितीला ४२ गावचा विरोध आहे. हे दर्शविण्यासाठी बाबुराव ठाकुर व तुकाराम कोलेकर यांच्या नेतृत्वाखाली हडलगे, घटप्रभा धरण संकट निवारण समितीची स्थापना करण्यात आली.[६५] या समितीची पहिली सभा २५ नोव्हेंबर १९५६ रोजी अडकूर ता. चंदगड येथे धरणग्रस्त गावकऱ्यांसह सभा भरली. या सभेसाठी बेळगाव महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री बाबासाहेब देसाई हे होते. नरसिंगराव भुजंगराव पाटील यांनी सभेचा उद्देश स्पष्ट केला. भाई तुकाराम कोलेकर यांनी या धरणामुळे महाराष्ट्राचे नुकसान व कर्नाटकाचा पूर्ण फायदा तसेच सरकारचे घातकी धोरण बाबत मत मांडले. या सभेला 'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर, बा. र सुंटणकर, भाई दाजीबा देसाई, कॅा. कृष्णा मेणसे यांची भाषणे झाली. या सभेत धरणाला विरोध करणारा सर्वानुमते ठराव पास झाला. सरकारचा हा डाव हाणून पाडण्यासाठी सर्व स्तरावर प्रचार व प्रसार होवून धरणाचे काम बंद पडले पाहिजे. यासाठी एक मंडळ नियुक्त केले. या कार्यकारी मंडळात, श्री बाबासाहेब देसाई कुपेकर (अध्यक्ष) श्री तुकाराम कोलेकर (चिटणीस) श्री. सखाराम पांडूरंग जोशी, श्री कृष्णाजी नीळकंठ, शिरोडकर श्री. बाळू आण्णा पाटील (कानूर) श्री भरम सटूप्पा पाटील (नेसरी) श्री नरसू रामा पाटील (हडलगे) यांचा समावेश होता.

'तरूण भारत' ने ३ डिसेंबर १९४६ ला या धरणाबाबत अग्रलेख प्रसिध्द करून लोक भावना जाहीर केल्या होत्या. "घटप्रभा धरणाची योजना लोकांना हितावह नाही." या धरणाचे फायदे तोटे स्पष्ट करणारा लेख दिला आहे. या लेखात धरणाचे इंजिनिअर प्रो. आर. एस. देशपांडे यांची मुलाखत प्रसिध्द केली आहे.[६६]

तोटे : –

१. सहयाद्रीच्या डोंगर रांगाच्या सान्निध्यातील जमीन जोराच्या पावसात पाण्याबरोबर दगड माती वाहून तलाव लवकर भरणार.

२. नद्याना उतार जास्त त्यामुळे धरणांची उंची घालावी लागते.

३. धरणाचा पाया रूंद व लांब ठेवावा लागतो (खर्चिक आहे)

४. नदिवर उंच पूल बांधावे लागते.

हे धरण बांधताना स्थानिक पुढाऱ्यांना व गावकऱ्यांना विश्वासात घेऊन हे काम केले पाहिजे. या धरणग्रस्तांचे प्रथम पुनर्वसन केले पाहिजे. त्यांना पूर्ण नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. जमिनीच्या बदल्यात जमीन मिळाली पाहिजे. असे उपाय सुचविले. या धरण्याच्या बाबत मात्र बाबुराव ठाकुर यांनी धरणग्रस्तांच्या बाजूने राहून लढा दिला. या प्रसंगी मात्र बेळगाव व परिसरातील कर्नाटकी धार्जिणांनी ठाकुर यांच्यावर टीकेचे लक्ष करून सातत्याने रोष पत्करावा लागला.[६७]

शेवटी अनेक वर्षाच्या जनआंदोलनामुळे धरणाचे बांधकाम रेंगाळले. 'हडलगा धरणाबाबत म्हैसूर सरकारची माघार!' घटप्रभेवर कर्नाटक हद्दीत हिडकल येथे धरण बाधण्याचा निर्णय होऊन हडलगे धरणाचे काम थांबले.[६८] या प्रकरणात तरूण भारत या वृत्तपत्राने शेवटपर्यत महाराष्ट्र जनतेच्या बाजूने राहून पाठपुरावा केला.

२.२.१.३२ आरोग्य विषयक लेख –

आरोग्यविषयक सदरावर 'तरूण भारत'ने सुरूवातीपासून भर दिला आहे. प्रसिध्द विचार तज्ञ मानसतज्ञ व डॉक्टर यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शनपर लेख प्रसिध्द केले आहेत. 'सार्वजनिक आरोग्य' हा आप्पासाहेब पटवर्धन यांचा लेख छापला आहे.[६९] सार्वजनिक आरोग्याची माहिती देताना सांघिक स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट करून हवा, जलाशय, नद्या आणि जमीन सामुहिक घटक पूर्ण स्वच्छ ठेवले पाहिजे. शाळा, जत्रा, बाजार अशा ठिकाणी स्वच्छतेच्या दृष्टीने जनजागृती करून तळागाळापर्यंत स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. तरच आपल्या भारतीय लोकांना आरोग्याचे महत्त्व कळेल. यासाठी सामाजिक संघटनांनी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच सरकारने ही लक्ष दिले पाहिजे. अशा प्रकारची जनजागृती करून सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व जाणून देणारा लेख दिला आहे. 'संरक्षक व पोषक आहार'

भाजीपाला व फळे यांची आवश्यकता हा डॉ. जयदेव कुलकर्णी यांचा लेख प्रसिध्द केला आहे. यावरून बाबुराव ठाकुर यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो. त्यांनी त्या काळात अशा विषयाला आपल्या वृत्तपत्रात अग्रस्थान देऊन समाजातील सर्व स्तरातील कुटुंबानी आरोग्य पुर्ण सदृढतेसाठी आपल्या आहारात फळे, भाजीपाला व दूध याचा वापर केला पाहिजे. शाकाहार जेवणाचे आपल्या आहारात किती महत्त्व आहे. सात्विक आहार कोणता याची माहिती दिली आहे.[७०] आरोग्य विषयक सदरात. २३ एप्रिल १९३५ च्या अंकात 'अकाली मृत्यू का घडतात' त्याची कारणे परिणाम व उपाय या विषयक हा लेख 'आरोग्य प्रेमी' या टोपण नावाने प्रसिध्द केला आहे. 'बध्दकोष्ट' या लेखातून प्रेमानंद यांनी बध्दकोष्ट या रोगाविषयीची संपूर्ण माहिती दिली आहे. या रोगाची सावधपणे उपचार पध्दत करावी व आहारावर नियंत्रण ठेवावे.[७१]

अ) मलेरिया –

२ जानेवारी १९४५ च्या संपादकीय लेखात 'मलेरियाने उडविलेला कहर! रोगाने खंगले शेतकरी' हेल्थ डिपार्टमेंटने इकडे लक्ष द्यावयास नको काय? हा प्रश्न करून बेळगाव जिल्हयामध्ये मलेरिया आजाराबाबत शासनाबरोबर समाजामध्ये जागृती निर्माण करून या आजारावरील उपाय योजना व उपचाराबाबत माहिती दिली आहे.

प्रतिबंधक उपचार –

डासांची उत्पत्ती होऊ न देणे, त्यासाठी पाण्याची डबकी साचू देऊ नये, फिनाईल, घासलेट टाकून जंतूनाशकाची फवारणी करावी, झोपताना मच्छरदाणी वापरावी. करंज्या व कडू लिंबाचे तेल झोपताना शरीराला लावावे, म्हणजे डास चावणार नाहीत. हिवतापावर क्लिनिकला भेट दयावी व औषधे वेळेवर घ्यावीत.[७२] असे मार्गदर्शनपर लेख दिले होते.

आ) डोके दुखी –

डोके दुखी हा आजार शरीर व्यवस्थेमध्ये कोठेतरी बिघाड झाल्याचे निदर्शन आहे. डोके दुखीचे मुळ कारण म्हणजे पचनक्रियेतील बिघाड होय. डोके दुखीच्या कारणाचे मूळ शोधून डोकेदुखी बरी करता येते. डोकेदुखी बाबत असणारे समज गैरसमज बाजूला करणारा महत्वपूर्ण लेख आहे.[७३]

इ) प्लेग –

'प्लेगपासून सावध रहा!' या शीर्षकाखाली समग्र लेख देऊन महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.[७४] बेळगावात प्लेगचे रूग्ण आढळून आल्याने सावधानतेचा इशारा दिला आहे. प्लेग हा रोग एका सूक्ष्म जंतूपासून होतो. तो पहिल्या प्रथम उंदराना होतो. उंदीर मेल्यानंतर त्याच्या अंगावरील पिसवा मनुष्याला चावतात व प्लेग माणसाला होतो. 'प्लेगचा प्रतिबंध कसा करावा?' डॉ. जयदेव कुलकर्णी याचा लेख छापला आहे.[७५]

प्लेग पसरण्याची कारणे –

१. प्रत्यक्ष रोग्याकडून विशेषतः श्वासावाटे संसर्ग होतो.

२. गाठीचा प्लेग प्रथम उंदराला होतो व पिसूच्याद्वारे माणसात येतो.

३. अस्वच्छतेमुळे पिसवा उंदरांची संख्या वाढते व रोग बळावतो.

प्लेग प्रतिबंधक उपाय–

१) स्थलांतर, २) उंदीर व पिसवांचा नाश करणे, ३) लस टोचून, ४) स्वच्छता राखणे हे उपाय आहेत. ही माहिती या लेखात देऊन जनमाणसात प्लेग या रोगाबाबतची भीती व गैरसमज बाजूला करून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. तसेच उपाय योजना सुचवलेल्या आहेत.

ई) दातांची निगा कशी राखावी –

त्याकाळी दातांबाबत म्हणावी तसी काळजी घेतली जात नसे. परंतु या लेखाद्वारे शहराबरोबर ग्रामीण भागातील लोकाना दातांच्या आरोग्याची माहिती पुरवलेली आहे. दात हे माणसांच्या आरोग्याचा महत्वाचा घटक आहे. दातांची निगा राखल्याने माणसाच्या दाताबरोबर शारीरिक आरोग्य सुदृढ राहते हे पटवून दिले आहे.[७६]

उ) लहान कुटुंब सुखी कुटुंब –

'तरूण भारतने' कुटुंब नियोजन यासाठी स्वतंत्र पुरवणी २० डिसेंबर १९६८ रोजी प्रसिध्द केली. या अंकात 'उज्ज्वल भवितव्यासाठी कुटुंब नियोजनाचे आव्हान स्वीकारा' तत्कालीन राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे आकाशवाणीवरील भाषण प्रसिध्द केले. तसेच वाढती लोकसंख्या देशापुढील मोठी समस्या! 'मर्यादित कुटुंब हाच सुखी जीवनाचा पाया' हा अग्रलेख लिहून कुटूंब नियोजनाचे महत्त्व विशद केले. कुटुंब नियोजनासारखा विषय

अग्रलेखातून हाताळून 'तरूण भारत' ने आपली वृत्तपत्र संपदा सर्वांगिण करण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या आरोग्य विषयक लेखातून सर्वसामान्य जनतेविषयी असणारी आरोग्य बाबतची तळमळ दिसते. मोठया प्रमाणात आरोग्य विषयक लेखन करून समाजाला जागृत व आरोग्यदायी जीवन शैलीचे महत्त्व पटवून दिले आहे.[७७]

२.२.१.३३ कामगार विषयक :–

'तरूण भारत' हे वृत्तपत्र कामगार वर्गावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात बंड करून उठणारे प्रखर व स्पष्ट विचार मांडणारे आहे. कामगाराचे कर्तव्य त्यांची परिस्थिती त्यांचे अधिकार व हक्क याबाबत कामगार वर्गात जागृती निर्माण करून त्यांची भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक सर्वाच्या समोर मांडली. कामगार वर्गाला सन्मानपूर्वक न्याय मिळून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. म्हणूनच या विभागातील कामगारांचे प्रश्न मांडणारे व कारखानदार, भांडवलदारांच्यामध्ये धडकी निर्माण करणारे, हे मुखपत्र म्हणून ओळखले जाते. या वृत्तपत्राने कामगारांच्याबाबत जे विचार मंथन केले व कारखानदारांच्यात समेट करून कामगारांचे प्रश्न ऐरणीवर ठेवणारे हे वृत्तपत्र होते.

अ) गिरणी कामगार व मालक :–

मुंबईच्या गिरणी कामगारांच्या संपाचा विचार करण्यासाठी वेगवेगळया समितीची नियुक्ती करण्यात आली. या संपाला कारणीभूत झालेल्या मालक व मजूर यांच्या वादाची चौकशी करून कांही मुद्दे कोर्टासमोर आले. त्यानुसार गिरणी कामगार यांचे कार्यकारी मंडळ व अधिकारी वर्ग यांच्या अडमुठया धोरणामुळे हा संप लावला गेला आहे. असा युक्तीवाद पुढे करू कोर्टाने कामगार वर्गाला फटकारले. या बातमीचा समाचार घेऊन, "सरकार व कारखानदार यांच्या युतीमुळे कामगार वर्गाचे दिवाळे" हा लेख प्रसिध्द करून कामगारांचे हित हेच देशाचे व समाजाचे हित आहे. हे भांडवलशाही सरकारने व कारखानदारांनी लक्षात घ्यावे, असा सल्ला या लेखात दिला आहे.[७८] 'पोटासाठी भयंकर दिव्य' या अग्रलेखात मुंबई व इतर विभागातील गिरणी कामगारांचे प्रश्न मांडलेले होते. १९३४ मध्ये मुंबईतील ४८ गिरण्यातील ८० हजार कामगार संपात सहभागी होऊन बऱ्याच वर्षापासूनच्या मागण्यासाठी व हक्कासाठी रस्त्यावर उतरले. परंतु सरकार व कारखानदार यांच्या संयुक्त विद्यमाने हा संप मोडून काढण्याचा सर्वतोपरी प्रयत्न सुरू झाले. कामगार व त्यांच्या नेते मंडळीच्यावर कायदयाचा बडगा उभा करून

वेगवेगळ्या कलमाखाली जेरबंद करण्यात आली. दहशतीच्या बळावर पोटासाठी कष्ट करणाऱ्या कामगारांचा विचार न करता त्यांच्यावर उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा या आडमुठ्या सरकार धोरणांचा व कारखानदारांचा कमजोरीपणामुळे कामगारांची फरफट सुरू आहे. याला जबाबदार कोण आहेत. हे सर्वांनी ओळखले पाहिजे व कामगारांच्या बाजूने जनतेने सहानुभूतीपूर्वक उभा राहिला पाहिजे, तरच कष्टकऱ्यांची पिळवणूक थांबेल. श्रमाला प्रतिष्ठा मिळेल, असा विश्वास निर्माण करणारा व दुरदृष्टी जाणणारा लेख आहे.[७९]

गोकाक येथील गिरणी कामगारांचा संप गेल्या ८ महिन्यापासून शांत व संयमाने चालू होता. शेवटी ४ ऑगस्ट १९३७ रोजी या संपावर तोडगा निघाल्याने संप मागे घेण्यात आला. 'जय सत्याचा झाला' या शीर्षकाखाली 'तरूण भारत' ने या संपाबाबत आपले विचार मांडले. गेल्या आठ महिन्यात संप सुरू आहे. दोन्ही घटकाकडून तटस्थ भूमिका अशा प्रसंगी या विभागात कार्यरत असणारा कॉग्रेसपक्ष व गट नेत्यानींही या संपाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे कामगार वर्ग हा स्थानिक राजकारण्याच्या प्रवृत्तीला नाराज आहेत. शेवटी संप मोडावा कामगारांच्यामध्ये गट पडून फाटाफुट व्हावी यासाठी प्रयत्न झाले, पण यश मिळाले नाही. शेवटी या संपात कामगार वर्गाचा विजय होऊन न्याय मिळाला.[८०]

कामगार दिनानिमित्त बेळगावातील कामगार वर्गानी सकाळी मोठी मिरवणूक काढून टिळक चौकात जाहीर सभा घेतली. यावेळी महाराष्ट्रातील कामगार नेते नानासाहेब गोरे उपस्थित होते. "हा दिवस जगातील कामगार वर्गाचा मोठया उत्सवाचा असून त्या दिवसाची प्रेरणा घेऊन असंघटीत असणाऱ्या कामगार वर्गांनी आपल्या हक्कासाठी व कर्तव्यासाठी एकत्र आले पाहिजे. कामगार, शेतकरी व शेतमजूर हे संघटित होऊन देशाच्या राजकारणाची सूत्र आपल्या विचाराने चालवली पाहिजेत तरच बहुजनांचे सुख समाधानाने या देशात नांदायला लागेल. आपल्या सर्वांची एक संघटना करून संघटनेच्या जोरावर सरकारवर दबाव निर्माण केला पाहिजे. आपल्या शक्तीने या देशात प्रचंड क्रांती घडवून आणू शकतो. यासाठी आपल्यात एकी महत्वाची आहे."[८१]

केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्याप्रमाणे राज्य कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी मिळावी. या मागणीला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रातील २ लाख सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर गेले. यावेळी मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांनी एक जाहीर पत्रक काढून संपकरी कर्मचाऱ्याना सुचना करतात

'लोकशाही राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना संपावर जाण्याचा हक्क नाही.' या पत्राचा समाचार घेऊन 'तरूण भारत' ने कामगारांच्या हक्क व अधिकाराबाबत जाणीवेचा लेख सादर केला व संपकऱ्यांची शासनाबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे.[८२] या संपानंतर सन१९७५ मध्ये ३७ दिवसाचा महाराष्ट्र सरकारच्या आणि जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा संप २६ मे १९७५ रोजी सरकारच्या घोषणेने मिटला. महाराष्ट्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना केंद्रीय कर्मचाऱ्यांच्याबरोबर महागाई भत्ता देण्याचे तत्त्वतः मान्य केल्याने उभयपक्षात समझोता होऊन संप मागे घेण्यात आला.[८३]

आ) भंग्याचा बैठा संप –

५ मे १९४९ रोजी बेळगाव येथील म्यु.पालटीच्या नोकरीत असणाऱ्या भंगी व झाडू काम करणाऱ्या २५० नोकरानी प्रशासनाला पुर्व सुचना देऊन आपल्या आग्रही मागणीसाठी बैठा संप पुकारला होता. या संपाबाबत 'तरूण भारत' ने सुचविलेले महत्त्वाचे बोधक विचार व सूचना या लेखात प्रसिध्द केले आहेत.[८४]

२.२.१.३४ सहकार –

सहकारी चळवळीला बळकटी देण्याच्या दृष्टीने 'तरूण भारत' ने सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. सहकारात काही अनिष्ठ व स्वार्थ परायण प्रवृत्ती शिरकाव करून सहकाराला धोका पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी 'तरूण भारत' वृत्तपत्राने आवाज उठवलेला आहे.

१ ऑक्टोंबर १९४६ च्या अंकात 'सहकारी संस्थातील वतनदारी कधी नष्ट होणार' हा सवाल विचारून पुढे म्हणतात, सहकारातील प्रत्येक संस्था ठराविक लोकांची वतनदारी होऊन बसलेली आहे! याचप्रमाणे त्याना पोषक अशी बँकेचे मॅनेजर अकौंटंट वगैरे वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक नोकरशाही निर्माण झाली आहे. अशा नोकरशाहीला चांगली शिस्त रूजणे गरजेचे आहे. जुन्या पुराण्या चाकरीतून चाललेला हा सहकारी संस्थांचा गाढा आता नव्या मार्गावर येऊन राष्ट्र संवर्धनाच्या कार्यास त्याचा उपयोग होईल. तरच सहकार ग्रामीण भागातही रूजायला जास्त वेळ लागणार नाही. असा विश्वास निर्माण करणारा हा लेख होता.[८५]

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सहकार हिंदुस्थानात रूजला पाहिजे व वाढला पाहिजे परंतू सहकारी संस्थातून अमुलाग्र शुध्दीकरणाची गरज आहे. गटबाजी आणि व्यक्तीगत मिरासदारी नष्ट करून परस्पर सहकारीवृत्ती जोपासली पाहिजे. हल्लीच्या सहकारी संस्था

सहकार शब्दाचे विडंबन करीत आहेत. सहकारातील तत्कालीन परिस्थितीवर प्रकाश टाकून टीका टिपणे दिली आहेत.[८६]

चंदगड तालुका मागासलेला असल्याचा उल्लेख करून या भागात सहकाराच्या मदतीने सर्वांचा विकास साधला पाहिजे. खेडोपाडी सोसायटी स्थापन करून कमी व्याज दरात शेतकऱ्याला आर्थिक मदत केली पहिजे. त्यासाठी या संस्थावर जाणकारांचे लक्ष असले पहिजे तरच हा सहकार रूजेल. असा विश्वास व्यक्त करणारा समग्र लेख दिला आहे.[८७] या सहकारात लाचलुचपत, अफरातफर उघड झाल्यानंतर कोणाचीही भीड न राखता 'तरूण भारत' ने आसूड उडवले आहेत. पाच्छापूर येथील सहकारी सोसायटीमधील झालेला भ्रष्टाचार, 'आमदार शेख व सेक्रेटरी देशपांडे यांना अटक केव्हा?' असा प्रश्न सरकारला विचारून सहकाराला सावध केले आहे. 'सहकारी क्षेत्रात बोकाळलेली खाऊगिरी! गोर गरीबांच्या नावावर चाललेली कायदेशीर उचलेगिरी!'[८८] या अग्रलेखात सहकार क्षेत्रात चालू असलेल्या धुमाकुळावर प्रकाश टाकला आहे.

अशा प्रकारचे विविध लेख व बातम्या देऊन 'सहकार' चळवळीचे शुध्द विचार रूजवून या समाजाला विकासाची दिशा दाखवणारे मार्गदर्शन व सल्ला दिला आहे. याच विचारातून या विभागात सहकारी तत्वासह चालवणारे व विकास करणारे साखर कारखाने सुतगिरणी इत्यादी विकास साधू शकल्याचे दिसते. जागृतपणे या घटकांच्याकडे अभ्यासपूर्ण लक्ष पुरवल्याचे दिसते.

२.२.१.३५ भेसळ–

'सरकारी दूधात भेसळ–अधिकाऱ्यांची अक्षम्य गुन्हेगारी निर्भेळ दूध पुरवठा होत नसेल तर डेअरी बंद करा! फुड इन्स्पेक्टरचे खाते हे भेसळ प्रतिबंधक खाते की त्यावर पांघरूण घालणारे? यात अनेकांचे हात बरबटलेले आहेत!' बेळगाव शहरातील नागरिकांना निर्भेळ दुधाचा पुरवठा व्हावा, यासाठी सरकारी डेअरिची स्थापना करण्यात आली आहे. पण शासकीय यंत्रणेच्या गलथानपणामुळे डेअरीकडून मिळणारे दूध अधिक भेसळ युक्त मिळते, असा ग्राहकांचा आरोप आहे. तेव्हा या प्रकरणाकडे शासनाने लक्ष दयावे.[८९] 'लाचलुचपत व काळाबाजार यामध्ये भरडली जाणारी जनता'[९०] या अग्रलेखात पोलिसांकडून घेतली जाणारी लाचलुचपत व व्यापाऱ्याकडून होणाऱ्या काळया बाजारावर प्रकाश टाकला आहे. त्या दोघांच्या खिंडीत गरीब जनता कशी भरडली जाते आहे. त्यासाठीचा पाठपुरावा केला आहे.

२.२.१.३६ रेल्वे प्रशासन –

'दक्षिण रेल्वेच्या कारभाराचा अजब नमुना! बेंगलुर–मिरज पॅसेंजर गाडी बेळगांव स्टेशनवर दररोज दोन तास उशीरा येते. जनता गाडीला होणाऱ्या गर्दीमुळे दुर्लक्ष–डबे जोडले जात नाहीत. ज. मॅनेजरचा हुकूम धुडकावला जातो! गोवेकरांची जरूर सोय करा परंतू बेळगांवकरांवर अन्याय नको! रेल्वे अधिकारी आणि सल्लागार सभासद यांची लोकांच्या गाऱ्हाण्या विषयी अक्षम्य बेपर्वाई!'[९१] प्रवाशाच्या सोयीकडे रेल्वे अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, पुणे–बेळगांव मार्गावर प्रवाशांचे हाल कमी झाले नाही तर रेल्वे प्रशासनाच्या विरूध्द सत्याग्रही संघटन करण्याचा इशारा ![९२]

२.२.१.३७ टेलिफोन खाते –

'ग्राहकां विषयी टेलिफोन खात्याची कमालीची बेपर्वाही! क्षुल्लक चुकीसाठी ग्राहकांना जबरदंड हा कुठला न्याय! सौजन्य तरी दाखवा!'[९३] 'नगररचना नव्हे, त्या नावाखाली चाललेला स्वेच्छाचार' आज बांधकाम खात्याच्या जोडीला नवे शोषण खाते![९४] या अग्रलेखातून सरकारी खात्यातील लोकहित दिरंगाईवर हल्ला केला आहे.

२.२.१.३८ सायकलवरील निर्बंध

'सायकलवर दोघांना बसण्यास बंदी का? कायद्यात दुरूस्तीची आवश्यकता' या अग्रलेखातून डबल सीटवर बंदी घालणाऱ्या कायद्यावर बोट ठेवले आहे. सर्वसामान्यांच्या जीवनातील अत्यावश्यक सेवेतील 'सायकल' या वाहनाचे फायदे सांगून हा कायदा किती चुकीचा आहे, ते सांगितले आहे. पुढे म्हणतात दिल्लीत हा कायदा अस्तित्वात नसून फक्त मुंबई राज्यातच हा कायदा सुरू आहे ही विसंगती देखील विशद केली आहे.[९५] 'सायकलवरून कोणत्या वस्तू व किती प्रमाणात नेहता येतील याबद्दल कलेक्टरनी बेळगांव परिसरासाठी एक हुकूम काढला व अनेक बंधने घालून सायकल स्वाराला निर्बंध घातले. अशा या जाचक निर्बधांच्या विरोधात 'तरूण भारत' ने सरकारी धोरणांच्या विरोधात आवाज उठवलेला आहे. जनतेने या कायद्याविरूध्द वेळीच सावध व्हावे! असे अहवाल केले आहे 'गरीब लोकांचे सायकल हे वाहतुकीचे अत्यंत उपयुक्त साधन आहे. त्यावर निर्बध घालताना त्यांच्या पोटाला चिमटा न बसेल व या कायद्याची अंमलबजावणीही गरिबांना जाचक होणार नाही याची खबरदारी सरकारने घेतली पाहिजे.[९६] अशा विषयाचे अग्रलेख लांबलचक शीर्षकातून देऊन जनतेचे लक्ष

या विषयाकडे ओढवून घेण्याचे प्रयत्न केले आहे. 'सायकलना कुलूप नाही, सायकल वर डबलसीट' अशा स्वरूपाचे कायदे रद्द झाले पाहिजे. या कायद्यामुळे मुख्य हेतूनाच ते बाधा आणतात. वरिष्ठानी समाजाचा विचार करावा, नाहीतर समाजाच्या रोषाला सामोरे जावे. असा इशारा दिला आहे.

२.२.१.३९ पशुपालन व संवर्धन –

ग्रामीण भागात शेतीबरोबर पशुपालनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दुभत्या जनावरांच्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक हातभार लागण्यास मदत होत आहे. संकरीत व दुध जास्त देणाऱ्या गायी व म्हैस चांगल्या वाणाची पैदास होण्यासाठी प्रसाराची व प्रचाराची गरज आहे. त्यांची निगा संगोपन याबाबत नवीन दृष्टीकोन शेतकऱ्यांच्यामध्ये रूजवला पाहिजे. उत्पादन खर्च कमी करून उत्पादन जास्त वाढवण्यात आपण यशस्वी होऊ. किफायतशीर शेतीबरोबर पशुधन महत्त्वाचे आहे. अशा जागृतीचे लेख देऊन शेतकरी वर्गात नवनवीन चैतन्य निर्माण करणारी व प्रेरणा देण्याचा प्रयत्न असे.[९७]

'उपयुक्त जनावरांची कत्तल थांबवा'

उपयुक्त जनावरांची कत्तल कशी केली जाते! 'कसाई खान्यात लोटण्यासाठी जनावरावर केले जाणारे अनन्वित अत्याचार! मुक्या जनावरांची पीळ पाडणारी करूण कहाणी!' १ जानेवारी १९५० चा लेखातील घटना. बेळगाव लष्कर हद्दीतील डेअरी जवळील कसाई खान्यात गाभण गाय कापण्यात आली, असून तिच्या पोठात आठ महिन्याचे वासरू असल्याचे आढळून आले. या प्रकरणाची सरकारी पातळीवर चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

कसाई लोक फक्त गाभण गायानाच कापतात असे नाही. तर धष्टपुष्ट वासरे, बैल यांचीही ते कत्तल डॉक्टरांचे सर्टिफिकेट मिळवून करतात, हे सर्टिफिकेट मिळवण्यासाठी कसाई क्रूर मार्गाचा अवलंब करतात. याकडे डॉक्टरांचे लक्ष असू देत. याबाबत स्पष्टीकरण देताना म्हणतात 'कत्तलखान्यात मांसासाठी म्हणून जी जनावरे आणली जातात त्याना एका जागेमध्ये दोनशे/तीनशे जनावरे कोंडली जातात. त्यांना चारा दिला जात नाही, त्यांना पाणीही दिले जात नाही. जेणे करून ही जनावरे कत्तलीस योग्य व्हावीत, हाच उद्देश असतो.'

१. जनावराच्या पायांच्या खुरांत राफ्टरचे खिळे ठोकण्यात येतात.

२. कत्तलीसाठी डॉक्टरचे सर्टिफिकेट मिळावे, म्हणून जनावरांचे दात उपटून काढण्यात येतात.

३. जनावराच्या पायाच्या शिरा कापण्यात येतात

४. पोटातच वासरे ठार मारण्यात येतात.

५. जनावराच्या पिण्याच्या पाण्यात चुन्याची निवळी व अन्नात काचेचे तुकडे आणि केस मिसळण्यात येतात.

६. जनावराच्या अन्नपाण्यापासून उपाशी ठेवण्यात येते.[९८]

वरील प्रकाराबाबत सरकारने संपूर्ण चौकशी करून संबधित गुन्हेगारांस कडक शासन करावे. तसेच शेतीसाठी उपयुक्त जनावरे शिल्लक राहतील याची शासनाने दखल घ्यावी, ही जनतेची मागणी आहे.

२.२.१.४० दुष्काळ –

बेळगांव जिल्हयातील सौदंती तालुक्यातील विदारक दुष्काळ परिस्थितीचे वर्णन केले आहे. 'गवत पाण्याच्या अभावी गुरे पटापट मरू लागली आहेत.'[९९] या अग्रलेखातून सरकारी अधिकाऱ्यांचे लोकपक्षीय पुढारी व प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आहे. शासनाच्या कार्यपध्दतीवर टिका करून त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

पुढच्या अंकात 'दुष्काळ पिडितांना मदत करा!' असे आवाहन सरकारला केले. दुष्काळामुळे हजारो देशबांधव अन्नाअभावी तडफडून मरत आहेत. भारत मातेचा विनाश तुमची अंतःकरणे हादरून सोडत नाही काय? तर मग त्यांच्या दुःखाशी समरस व्हा! असे भावनिक आवाहन केले होते.[१००] बेळगांव परिसरात १९६८ च्या दुष्काळाचे चटके बसले त्यावेळी दुष्काळ ग्रस्ताना या संकटातून बाहेर काढण्यासाठी मार्गदर्शनपर लेख प्रसिध्द केला आहे.

दुष्काळ निवारण उपाय

लेव्ही वसुल करू नये, सरकारी तगाई रक्कमेची वसुली थांबवावी. बँका व सोसायटया यांच्या कर्जाची वसुली स्थगित करावी, दुष्काळी कामे सुरू करून या जनतेला रोजगार निर्माण करून दयावा. अशा प्रकारच्या मागण्याचे पत्रक प्रसिध्द करून सरकारचे या परिस्थितीकडे लक्ष वेधले होते.[१०१]

२.२.१.४१ ग्रामपंचायत –

खेडी स्वावलंबी व स्वायत्त: बनविण्याच्या दृष्टीने जुन्या ग्रामपंचायत कायद्यांत अनेक सुधारणा करणारा ग्रामपंचायतीचा नवीन कायदा मुंबई इलाख्याला लागू करण्यात आला. या

संबधित कायद्यात सर्वसामान्य व्यक्तीचाही सहभाग व्हावा, या हेतूने हा लेख देऊन 'ग्रामपंचायत स्तरावरील निवडणूका या सर्व जाती धर्म समावेशक स्वरूपाने लढवण्यात याव्यात व ग्रामीण भागाने आपला उत्कर्ष साधावा' असा लेख दिला आहे. ग्रामपंचायतीत लोकनियुक्त सभासद, कर भरणाऱ्या व वयात आलेल्या स्त्री पुरूषास, मतदानाचा अधिकार देण्यात आला. अल्पसंख्याकांचे हित व स्त्रियांसाठी राखीव जागा देण्याची तरतूद याबाबत आनंद व्यक्त केला आहे. ग्रामपंचायतीमध्ये सरपंच उपसरपंच यांची कामे व कर्तव्य, त्यांच्या मदतीला कांही मंडळाची नियुक्ती करणे, न्यायदान मंडळात २५ रुपयेपर्यंत किंमतीचे खटले चालविण्याचे अधिकार देण्यात आले. ग्रामपंचायतीचा हिशेब ठेवण्याचे काम सेक्रेटरी यांचे असले तरी सर्व परिस्थितीवर सरकार लक्ष ठेवून असेल. अशा विचाराचा ग्रामस्वराज्य जनतेत रूजवणारा लेख आहे.[१०२]

'स्वावलंबन हाच ग्रामपंचायतीचा खरा पाया आहे.'[१०३] गावच्या लोकांनी आपल्यासाठी गावातील रस्ते, आरोग्य, पाणी पुरवठयाच्या सोयी आपण कराव्यात याकरिता त्यागाची, प्रेमाची व सेवाभावाची वृत्ती खेडयातील जनतेत प्रथम निर्माण केली पाहिजे. गावातील पुढाऱ्यांनी व ग्रामपंचायत सभासदांनी योग्य मार्गदर्शन केल्यास प्रचंड प्रमाणात कार्याची निर्मिती होते. हे प्रत्यक्ष 'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर यानी चंदगड तालुक्यातील ८४ गावामध्ये श्रमदानातून विकासाचा संदेश दिला होता. रस्ते व पाण्याच्या सोयी करून घेतल्या होत्या. स्वावलंबन हे ग्रामाचे स्वःप्रगतीचे बळ होय. सरकारवर अवलंबून न राहता श्रमदानातून व एकीने सार्वजनिक हित साधता येते. हे या लेखातून दाखवून दिले आहे.

२.२.२ सामाजिक कार्य –

२.२.२.१ धर्मविषयक दृष्टीकोन –

बेळगाव व आसपासच्या ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात धर्माच्या नावाखाली अंधश्रध्दा, चालीरिती, प्रथा व परंपरा यांना महत्त्व होते. तसेच तंत्र–मंत्र, जादूटोणा, भूतपिशाच्च यांना विशेष महत्त्व होते. या विचारातून प्रत्येक गावातील ग्रामदैवतांना महत्त्व प्राप्त झाले होते. याबाबत लोकहितवादीनी असे म्हटले आहे, "हिंदु लोकांत सांप्रत अनाचार फार माजला आहे. निरर्थक कामे व ढोंग फार होऊन त्यातील बीजरूपी जी नीती तीच भ्रष्ट झाली आहे. आता जो धर्म चालला आहे तो धर्म नव्हे हा बेबंद गोंधळ आहे. त्यामुळे सुशिक्षित

लोकांच्याबरोबर अज्ञानी लोकांना तंत्र–मंत्र, भूतबाधा, चेटूक, जारण, मारण–तारण, यात्रा, नवस व उपवास इत्यादी विश्वास दृढ झाला आहे. अशा या समाजाच्या धारणेमुळे प्रामुख्याने यात्रा, भोंदूगिरीला व अंधश्रध्देला महत्व प्राप्त झाले म्हणून समाज अनिष्ठ प्रथांच्या आहारी गेला. त्यामुळे समाजाचे अतोनात नुकसान झाले आहे.'' असे विचार 'तरूण भारत' च्या १९, २८ ऑक्टोंबर १९३० अंकात मांडले आहेत.[१०४] या समाजमान्य प्रवृत्तीच्या विरोधात जनजागृतीची नितांत गरज ओळखून 'तरूण भारत' घडणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात आवाज उठवलेला आहे.

२.२.२.२ जादूटोणा –

जादूटोण्याने संकटे दूर होतात, अरिष्ट टळते अशी समजूत होती. या अघोरी जादूटोणा प्रवृत्तीचा दाखला देणारा संदर्भ लेख दिला आहे. 'पराशक्तीचा मृतास जीवंत करण्याचा अदभूत चमत्कार''[१०५] या लेखाला अनुसरुन एका साधूचे भिंग फोडणारा लेख 'पराशक्ती बुवा नावाच्या एका साधूने बेळगाव भागात अंधश्रध्देने थैमान घातले आहे. याच्या या खोटया भूलथापावर अशिक्षिताप्रमाणे काही सुशिक्षित ही बळी पडत आहेत. तेव्हा ताबडतोब प्रशासनाने या गोष्टीकडे लक्ष घालून या व्यक्तीला धाक दयावा.' अशा प्रकारचे निवेदन बातमीपत्र प्रसिद्ध केले आहे. श्री निरोडकर यांच्या घरी नुकत्याच जन्मलेल्या एका अर्भकाचा मृत्यू झाला. डॉ. हेरेकर यांनी या बालकाला तपासून मृत्यू घोषित केला होता. तरीही पराशक्ती बुवाना त्या अर्भकाला दाखवले असता ते अर्भक जीवंत आहे. २४ तासात जीवंत होईल तेव्हा वाट पहा, असे सांगितले. २४ तासानंतर कांही मंडळीनी डॉ. गोखले यांना बोलावून आणले त्यांनी ही हे अर्भक जीवंत नसल्याचे सांगितले. तेव्हा लोकांची खात्री पटल्यानंतर शेवटी पुढील कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला. अशा भोंदू साधू व बुवाना प्रशासनातील अधिकाऱ्यांनी समाजातून हाकलावे. त्यांच्यावर कडक शासन करावे, अशा प्रकारची जनहिताची मागणी या लेखात मांडली आहे.[१०६]

२.२.२.३ अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य –

समाजात धर्माच्या नावाखाली चाललेल्या प्रथा खोटया ठरवण्यासाठी व समाजाला खरा धर्म समजावून सांगण्यासाठी 'तरूण भारत' ने सुरूवातीपासून लेखणी वापरलेली आहे. विशेष बेळगाव (कर्नाटक) परिसरात अशा समाज विरोधी प्रथांना विरोध करून समाजाला विज्ञान युगाकडे व पाश्चात्य ज्ञानाकडे ओढण्याचा प्रयत्न केला आहे.

अ) हेरे येथील माटेकराची यात्रा–

"हेरे येथील 'माटेकराच्या' जत्रेत बकऱ्या कोंबडयांची झुंज करून मारण्याचा रानटी प्रकार ! कलेक्टरांच्या मनाई हुकूमाची बजावणी. "[१०७]

हेरे येथील माटेकराच्या जत्रेमध्ये हजारो कोंबडया बकऱ्यांची निर्दयपणाने जमिनीवर आपटून व टोण्याने मारून उघडयावर बळी दिले जात असत. अशा क्रूर अघोरी प्रथेविरूध्द १ एप्रिल १९४१ च्या 'तरूण भारत' अंकात आवाज उठवलेला होता. सरकारने पुढाकार घेऊन या अशा प्रकारावर कायमचा आळा घालण्याचे आवाहन केले आहे. परंतु सरकारकडून या प्रकरणाची वेळीच दखल घेतली गेली नाही. उलट या प्रथेविरूध्द आवाज उठवणारे 'तरूण भारतचे' संपादक बाबुराव ठाकुर यांना मात्र समाजाचा रोष पत्करावा लागला.

'देवस्थानचे मानकरी हेरे जहागिरदार असे म्हणतात "आमचा हा धर्म आहे. आमच्या धर्मात कोणाची ढवळाढवळ चालू देणार नाही." अशा अघोरी जहागिरदाराच्या धार्मिक समजूतीला आवाहन देण्यासाठी शेवटी जत्रेच्या अगोदर दोन दिवस बाबुराव ठाकुर यांनी ही प्रथा बंद करण्याबाबत बेळगाव जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केला.[१०८] परिणामी जिल्हाधिकाऱ्यानी ताबडतोब मनाई आदेश काढला. दुर्दैवाने दप्तरी दिरंगाईमुळे हा मनाई आदेश वेळेत येऊन पोहचला नाही. शेवटी बाबुरावांनी या जत्रेच्या दिवशी जत्रेच्या ठिकाणी जाऊन प्रथे विरोधात भाषण केले. तसेच काही भिंतीपत्रके काढून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या या कार्याचा म्हणावा तसा परिणाम झाला नाही. गावातील मानकरी लोकानी मात्र बाबुरावांच्या विरोधात रान उठवले.

"जादूटोणा गंडे–दोरे, भूते–खेते आणि बुवाबाजी : तरूणाना आवाहन" जादुटोणा करणारे भगत, चमत्कार करणारे तांत्रिक आणि चमत्काराने भरलेल्या पोथ्या, पुराणे याविरूध्द विज्ञाननिष्ठ व युवाशक्ती असा लढा आपल्याला द्यावा लागेल. अंगात येणे हा प्रकार मोठया प्रमाणात ढोंग असते. काही प्रमाणात मानसिक विकृती असते. आपल्या हिंदू धर्माचा घात चमत्कारवाद व कर्मकांडांनी केला आहे. हे सर्व थांबवण्यासाठी ताकद फक्त तरूण पिढीत आहे. तेव्हा या तरूण पिढीने डोळस पध्दतीने वागून अशा प्रवृत्तीला थारा देऊ नये. तरच समाजाचे उज्ज्वल भविष्य निर्माण होईल, असा अशावाद या लेखात निर्माण केला आहे.[१०९]

आ) लक्ष्मीची यात्रा–

बेळगाव व बेळगांव परिसरात खेडोपाडी लक्ष्मी देवीची यात्रा मोठया थाटात साजरी केली जाते. या यात्रेत श्रीमंताबरोबर गरीब ही अफाट खर्च करतो. यासाठी शेतीवाडी, घरदार सावकार लोकांच्या हवाली करून कर्ज काढून हा सण साजरा करण्यासाठी सर्व जाती जमाती पुढे येतात. पुढे कर्ज फेडू न शकणारे असंख्य शेतकरी कायमचे नडतात व विकलांग होतात. या यात्रांच्यामुळे समाजाचे होणारे नुकसान पोटतिडकीने मांडण्याचे कार्य 'तरूण भारत' या अंकाने केले आहे. मा. आमदार तुकाराम कोलेकर हे या लक्ष्मीच्या यात्रेबाबत म्हणतात. "गावाला मस्ती आली, की लक्ष्मीची यात्रा भरवायची म्हणजे गाव आत येते." या यात्रेबाबत दैनिकाने घेतलेली दखल, या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे

२ जाने १९३४ च्या अंकात 'देवी लक्ष्मीचे काही भगत' या मथळ्याखाली बेळगाव शहरात या वर्षामध्ये लक्ष्मीची यात्रा भरवली जाण्याची शक्यता आहे. या चर्चेचा एक सूर म्हणून 'तरूण भारत' ने ही जत्रा होऊ नये म्हणून आवाज उठविला व सर्वसामान्य समाजाला सावध होण्याचा इशारा दिला आहे. व्यापारी, सावकार, दुकानदार व श्रीमंत मानकरी या वर्गाला लक्ष्मीची यात्रा पाहिजे, असा रोख आहे. या पाठीमागे या वर्गाचा स्वार्थी उद्देश, या लेखात स्पष्ट केला आहे. कलेक्टर साहेबानी कायदयाचा बडगा दाखवून व गावात प्लेगची साथ आहे. याचा विचार करून जत्रा होऊ देऊ नये, असे स्पष्ट मत 'तरूण भारत' ने नोंदविले आहे.[११०]

लक्ष्मी यात्रामध्ये 'रेडा' बळी देण्याची एक निर्दयी प्रथा आहे. या बाबतचा मान हा हरिजन समाजातील व्यक्तीना देण्यात येतो. या यात्रेसाठी या समाजाचा महत्त्वाचा सहभाग असतो. हरिजन समाजाला या रूढीत कायमचा अडकवून उच्च समजल्या जाणाऱ्या समाजाचा कशा प्रकारे मिंधे बनवले आहे. याची या लेखात माहिती दिली आहे.

इ) सण उत्सव –

११ मार्च १९४७ च्या अंकात शिमग्यातील वाईट प्रथांना आळा बसावा व या सणाला आलेली विकृती थांबवावी यासाठीचा लेख 'सर्वांच्या समोर होळीच्या होळकरानी गाजवलेले पराक्रम'[१११] या लेखाच्या माध्यमातून सणाबाबतचे आपले मत व्यक्त आहे.

पुढच्या एका 'लेखात विचार करा, बोंब मारणे, शिव्या देणे, दारू पिणे व लाकडे चोरणे हे केल्यापासून कसले फळ पदरात पडते ? या चारही गोष्टीना कायद्याने शिक्षाच सांगितलेल्या

आहेत. म्हणजे या गोष्टी वाईटच आहेत. मग त्यावर धर्माचा मुलामा दिला असला तरी त्या गोष्टी चांगल्या ठरतील काय'? असा प्रश्न करून या सणातील विकृत प्रकाराबाबत जनजागृती घडविण्यास हा लेख प्रसिध्द केला आहे.

शिमग्याच्या सणात आनंद निर्माण होईल, माणसांतील खिलाडू वृत्ती वाढीस लागेल व आपल्या सामुदायिक जीवनात ती पोषक ठरेल, असे प्रयत्न गावोगांवी झाले पाहिजे. तसेच केवळ घटकाभराच्या करमणुकीसाठी दुसऱ्याच्या मालमत्तेची हानी करण्याच्या वृत्तीला आळा बसला पाहिजे. तर हा सण सर्वाच्या आनंदासाठी म्हणून साजरा होईल.[११२] अशा प्रकारच्या उपाययोजना सुचवून या सणातील किळसवाणा व बीभत्सपणा नष्ट व्हावा म्हणून सूचना केल्या होत्या.

बेळगाव जिल्हयातील सौंदत्ती येथील यल्लमा देवीच्या डोंगरावर नवसाला वाहिलेल्या हजारो मुली दरवर्षी देवदासी होतात. या गंभीर विकृत चालीरितीकडे समाजकर्त्यांचे लक्ष केंव्हा जाणार आणि सरकार कोणत्या हालचाली करणार, या समस्येकडे समाज जाणकारांचे व पिढीत कुटुंबाचे लक्ष लागून राहिले आहे. ही चालरीत सीमा भागातील इतर गावात देवीच्या नावाखाली मुली वाहण्याची पध्दत आहे. या मुली वयात आल्या की, गावातील श्रीमंतांच्या जीवावर जगतात आणि बहुतेक वेश्या व्यवसाय पत्करून दलालांच्या भक्ष्याला बळी पडतात. समाजाची नीतिमत्ता यामुळे बिघडते. त्याबरोबर अशा देवदासींची उतार वयात फार परवड होते. समाजात स्त्रीला गलिच्छ वागणूक व स्थान दिले जाते. या अघोरी प्रथेबाबत 'तरूण भारत' ने आवाज उठवून महाराष्ट्र व कर्नाटक सरकारला आवाहन केले होते.[११३]

२४ सप्टेंबर १९३५ च्या अंकात गणेश चतुर्थीबाबत लेख दिला आहे. गणेश चतुर्थीची सुरूवात, सार्वजनिक गणेश चतुर्थीबाबतचे लोकमान्य टिळकांचे विचार व उद्देश स्पष्ट केले आहेत. त्याचबरोबर बेळगाव या शहरातील सार्वजनिक गणपतीची स्थापना व परंपरेचा उलगडा केलेला आहे. परंतु आजच्या काळात गणपती पुजन व त्यातील आलेली विकृती स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर गणेश चतुर्थी झाल्यानंतर गणपती विसर्जनाच्या वेळी गणपती दुखावेल या खुळ्या समजूती नुसार जास्त पाण्यात जाऊन गणेशाचे विसर्जन करण्याचा प्रयत्न करतात. व खोल पाण्यात गेल्याने तरूण बुडून मरतात. तेव्हा विसर्जनाच्या वेळी गणेश भक्तानी दक्षता घेऊन जिवावर बेतेल अशा श्रध्देत न बुडता सावधतेने व भक्ती भावाने विसर्जन करावे. असा

समाजाला व भक्तजनाना उद्देशून लेख दिला आहे.[११४]

नागपंचमीचा सण बेळगाव जिल्हयात मोठया भक्ती भावाने केला जातो. नागाची प्रतिमा चिखलाच्या सहाय्याने तयार करून पूजेला मांडली जाते. या दिवशी सापाबाबतचे समज गैरसमज दूर करण्यासाठी चंदगड तालुक्यातील ढोलगरवाडी येथील बाबुराव टक्केकर या शिक्षकाने वेगळा उपक्रम राबवून वेगवेगळया जातीचे विषारी व बिनविषारी जीवंत साप संग्रहित करून, त्या सपांबाबतची माहिती समाजाला देण्याचे प्रयत्न केले होते. साप चावल्यानंतरचे प्राथमिक उपचार पध्दती व डॉक्टर उपायबाबत माहिती दिली आहे. या त्यांच्या प्रयत्नामुळे सापाबाबतचे गैरसमज बाजूला होऊन, साप हा शेतकऱ्यांचा जवळचा मित्र आहे, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सापाचा वावर राहिला पाहिजे, सापाला न मारता सोडून दिले पाहिजे अशा प्रकारची माहिती या लेखात देऊन सणाचे व सापाचे महत्व व गरज स्पष्ट केली आहे.[११५]

ई) रवळनाथ ट्रस्ट हिशेब पत्रक–

रवळनाथ हे देवस्थान चंदगड तालुक्याचे ग्राम दैवत म्हणून पाहिले जाते. या ठिकाणी फेब्रुवारी महिन्यामध्ये सात दिवसाची यात्रा भरते. महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या राज्यातून भाविक मोठ्या प्रमाणावर येतात. या मंदिराच्या जमा–खर्चाचा पूर्ण हिशेब पंचक्रोशितील जनतेला समजावा म्हणून सन १९२९ या सालापासून ट्रस्टच्या वतीने सादर केला जातो. ते पत्र 'तरूण भारत'च्या अंकात दरवर्षी प्रसिध्द केली जात असे. या त्याच्या कार्यपध्दतीवरून ट्रस्टचा हिशोब पारदर्शक व विश्वासार्हता असणारा असल्याचे जाणवते. सन १९३३–३४ या वर्षात बाबुराव ठाकुर हे ट्रस्टचे सेक्रेटरी होते. त्या वर्षी ३३३६ रु. खर्च करुन मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला होता.

२.२.२.४ मद्यपान विषयक जनजागृती –

'तरूण भारत' च्या मे १९२१ च्या अंकात मद्यपान विरोधात भूमिका घेऊन बहुजन समाजातील पुढाऱ्यांनी मद्यपान बंदीच्या चळवळीस पाठिंबा दिला पाहिजे, अशी भूमिका घेतली आहे. महात्मा गांधीजीनी स्वातंत्र्य लढा उभा केल्यानंतर मद्यपान बंदीची चळवळ सुरू केली. या चळवळीचा प्रसार खेडोपाडी पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य या वृत्तपत्राने केले आहे. ही चळवळ शांततेच्या मार्गाने झाली पाहिजे त्याचबरोबर आपल्या विभागातील दारूची दुकाने कशी बंद होतील यासाठी बाबुराव ठाकुर यानी प्रयत्न केले आहेत. याबाबतचे 'तरूण भारत' च्या अनेक

अंकात संदर्भ येतात. व्यसनाधिनतेमुळे समाजाची फार मोठी हानी झाली आहे. अशा व्यसनापासून व मद्यपानापासून समाज लांब राहावा, म्हणून देशातील विविध संप्रदायानी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. तरच समाज सुधारणेच्या चळवळीला खरी सुरूवात होईल व समाजात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होईल. असा सल्ला या लेखात दिला आहे.[११६]

मद्यपान व दारू हे व्यसन समाजाच्या प्रगतीमधील मोठा अडथळा आहे. हे ओळखून महात्मा गांधीजीनी स्वातंत्र्याचा लढा उभा केल्यानंतर मद्यपान बंदीची चळवळ सुरू केली. या देशातील संपूर्ण दारू बंदी कशी करावी ही महात्मा गांधीर्जीची योजना स्पष्ट करणारा लेख 'तरूण भारत' ने प्रसिद्ध करून या चळवळीला चालना दिली आहे.

१. परवान्यांची मुदत संपताच दारू दुकाने बंद करण्यात यावीत.

२. मद्यविक्री बंद केल्यानंतर त्या दुकानात उपहाराची व मनोरंजनाची सोय करण्यात यावी.

३. गैरफायदा मद्यनिर्मिती व मद्यप्राशन हे गुन्हे शोधून काढण्यासाठी सरकारी नोकरदारांचा उपयोग करावा.

४. शाळा शिक्षक व विद्यार्थी यांना मद्यनिर्बध कार्यासाठी काही वेळ खर्च करण्याची परवानगी देण्यात यावी.

५. व्यसनी लोकाना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी स्त्रियांनी सहकार्य करावे.

६. दारूबंदी करण्याविषयी संस्थानाबरोबर ब्रिटिश प्रांतानीही सहकार्य करावे.

७. ताडीवाल्याना गोड ताडी विकण्यास परवानगी द्यावी ? [११७]

अशा प्रकारच्या सुचना दिल्या आहेत. दारूबंदी बाबत मत व्यक्त करताना ११ एप्रिल १९५८ च्या अंकात स्पष्ट केले. 'सरकारी कायद्याने दारूबंदी यशस्वी होणारी नाही. तर लोकांच्या कायद्याने होईल ! सरकारचा दारूबंदीचा प्रयोग फसलेला आहे. आज गांधीजी असते तर त्यांनी आपली चूक प्रांजलपणे कबूल केली असती पण सरकार कधी चुकत नाही ही तर आमच्या राज्यकर्त्यांची धारणा ! मग दारूबंदी यशस्वी झालेली नाही हे ते कसे मान्य करतील? अशी बोचरी टीका केली आहे.[११८]

२.२.२.५ अस्पृश्यता निवारण –

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजावरील घटकावर, होणारा अन्याय समाजासमोर मांडण्याचे महत्वपूर्ण कार्य तरूण भारत हिरीरिने करत असे. त्या अन्यायाला वाचा फोडून न्याय

मिळेपर्यत पाठपुरावा केला जात असे. त्या संबंधीतील एक घटना म्हणजे,' माणकापूर या गावामध्ये गाव पाटलानी चालवलेली गुंडगिरी' १७ ऑक्टोंबर १९३३ च्या खास पुरवणीमधून प्रसिद्ध केली आहे. या गावातील कृष्णा वराळे या दलित हरिजनाकडून तंटयाचा बहाणा करून गाव पाटलानी २०० रू. ची मागणी केली. दोनशे रुपये देण्यास विरोध करताच कृष्णाला मारझोड करण्यात आली. अशा अन्यायग्रस्त दलित व्यक्तीला न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने 'तरूण भारत' ने या प्रकरणाचे सत्य स्वरूप जनतेसमोर आणले. शेवटी बेळगावच्या डी.एस.पी. यांच्यासमोर न्याय मिळवून दिला. शिरजोर व माजोरी पाटलाला शासन भोगण्यास भाग पाडले.[११९]

अ) अस्पृश्यता उध्दाराचे कार्य –

अस्पृश्यांसाठी देवालये व विहिरी मोकळ्या करण्याची शाळा उघडण्याची एकच मोहीम निघाली. यासाठी अखिल भारतीय 'हरिजन सेवक संघ' स्थापण्यात आला. या संघाच्यामार्फत देशात वेगवेगळ्या ठिकाणी अस्पृश्य उध्दाराची चळवळ सुरू झाली त्याचा महत्त्वाचा परिणाम बेळगाव परिसरात मोठया प्रमाणात झाला. 'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर, सोमण कुलकर्णी व गंगाधर देशपांडे इत्यादी मंडळीनी बेळगाव विभागात हरिजन सेवकाचा दौरा काढून गावोगाव सभा, भेटी देण्यात आल्या. यावेळी 'तरूण भारत' ने प्रसिद्ध केलेले लेख अस्पृश्यांच्या उध्दारासाठी केलेल्या कार्याची माहिती देतात. महात्मा गांधीजींच्या आदेशाप्रमाणे अस्पृश्य समाजाची शिक्षणाची गरज ओळखून निपाणी येथे 'शिका फ्री बोर्डिंग' या योजनेखाली १२ हरिजन मुलाना मोफत प्रवेश देण्यात आला. या कार्यक्रमाच्यावेळी श्री. कर्मवीर भाऊराव पाटील हे उपस्थित होते. फ्री बोर्डिंगमध्ये काही दिवस विद्यार्थ्यीनीना प्रवेश देऊन अस्पृश्य उध्दाराच्या कार्यास हातभार लावला. हरिजन सेवकांच्या कार्याची दखल अंकामध्ये घेतली आहे.[१२०]

सौदंत्ती तालुक्यातील हरिजन सेवकांचा दौरा हुली येथील 'सार्वजनिक तलाव हरिजनांना खुला व्हावा. या प्रचारासाठी तरूण भारतने स्वतः लक्ष घालून या दौऱ्याचा वृत्तांत दिला आहे. यावेळी जिल्हा दौरा करून हरिजन जनजागृती केली 'शिका, संघटित व्हा कार्याला लागा' हा नारा दिला. अस्पृश्यता निवारणाच्या म.गांधीच्या घोषणेला अग्रस्थान देऊन वेगवेगळ्या समाज सुधारकांचे, विचारवंताचे व संताचे वैचारिक लेख देऊन समाज जागृती

करून पददलीत समाजाची सुटका करण्यासाठी परिश्रम घेतले. २३ मे १९३३ च्या अग्रलेखात 'देव सोवळा की मन ओवळे, देवाचे लाडे चोखामेळा' या लेखातून अस्पृश्य समाजाच्या उध्दारासाठी उपाययोजना सुचविल्या आहेत.[१२१] अस्पृश्यता निवारणास अडथळा' या शिर्षकाखाली 'अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला खिळ घालणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात लेख प्रसिध्द केला. 'अस्पृश्यता निवारणाची चळवळ ही पूर्णपणे सविनय कायदेभंगाच्या राजकारणापासून आलेली आहे. अर्थात या चळवळीच्या कार्यास सरकारी अधिकाऱ्यांनी अडथळे आणण्यांचे मुळीच कारण नाही. परंतु कलेक्टर साहेबांच्या व पोलीस सुपरिडेंट यांच्या हुकूमाचा भंग करून हरिजन उध्दाराच्या कार्यात अडथळ्याचे डोंगर उभारण्याचे प्रयत्न जिल्हयातील पाटील व कुलकर्णी हे वतनदार करत आहेत ही लाजीरवाणी गोष्ट आहे. हुन्नरगी या गावच्या पोलीस पाटलाने कलेक्टराचा हुकूम मानत नाही अस्पृश्यांच्याबाबत गावात कोणतीही सभा होऊ देणार नाही. असे आव्हान दिले. या घटनेची निंदा करून समाज विघातक कृतीला मुळासकट नष्ट करा. असे आव्हान २८ मे १९३३ च्या अंकात केले आहे.[१२२] तर १३ जूनच्या अंकात 'अस्पृश्यता नष्ट होणार' या मथळ्याखाली, "अस्पृश्यता ही दुर्दैवाची जननी आहे. या अस्पृश्यतेच्या रोगाने भारत वर्षाला जर्जर करून सोडले आहे. अशा या रोगावर आता धन्वंतरी शोधून कायमाचा इलाज केला पाहिजे." या अस्पृश्यतेला धर्माचा कोणताही आधार नाही. आपल्या धर्माची खरी शिकवण आपण विसरलो आहे. अज्ञानाच्या गर्तेत गिरक्या घेत आपण आजही बुडतच आहोत. हे युग अंधश्रदेचे स्वार्थाचे व रूढीचे आहे. यातून आपण सर्वजण बाहेर पडून अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीना सन्मानाने व अधिकाराने जगण्यास भाग पाडले पाहिजे' या सर्व यातनेतून फक्त म. गांधीर्जीचे विचार समाजाला तारू शकतील असा विश्वास निर्माण करणारा लेख प्रसिद्ध केला आहे.[१२३] अस्पृश्यता निवारण या विषयावर पं. मुकूंद मालवीय यांनी ६ मार्च रोजी मांडलेले विचार 'तरूण भारत' ने अग्रस्थानी प्रसिद्ध केले आहेत. "आपल्या देशाच्या लोकसंख्येचा तिसरा हिस्सा हा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाचा आहे. यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. हे अस्पृश्य आमचे बंधू आहेत, आमच्या देशाचे भागीदार आहेत."[१२४]

अस्पृश्यता निवारण व मंदिर प्रवेश या बिलास व्हाइसराय यांनी संमती देऊ नये. अशी विनंती करण्यासाठी बेळगावातील श्री मारूतीच्या देवालयात २६ फेब्रुवारी रोजी एका कंपु गटाने

जाहीर सभा घेतली. या सभेसमोरील विषयाना प्रसिद्धी देऊन 'तरूण भारत' ने या समाजातील पाखंडी वृत्तीला विरोध केला. या सभेसाठी अध्यक्ष म्हणून श्री. शंकराचार्य (शिष्य स्वामी) हे होते. श्रीधरपंत नगरकर यांनी 'वर्णाश्रम' स्वराज्य संघाकडून आलेला महात्मा गांधीचा निषेध करणारा व व्हॉइसरायानी या बिलास समंती देऊ नये, अशी विनंती करणारा इंग्रजी ठराव वाचून दाखविण्यात आला' व ते पुढे म्हणतात 'अस्पृश्याना मंदिर प्रवेश देणे, हे आमच्या धर्माविरूध्द आहे. त्यांनी दूरूनच कळसाचे दर्शन घ्यावे, यात वाईट काय, देशाच्या पुढाऱ्यानी राजकारण करावे धर्मात हात घालण्याचा त्यांना अधिकार नाही.' अशा समाज विघातक बांडगुळाच्या प्रवृत्तीला वेळीच आळा घालण्यासाठी 'तरूण भारत' ने प्रखर लेख दिला व धर्माच्या नावावर चाललेल्या पूर्वापार रूढीला उघडे पाडण्याचा व धर्म जानकार समजल्या जाणाऱ्या शंकराचार्य व त्यांच्या शिष्यांना झोंबणारा लेख ७ मार्च या अंकात प्रसिद्ध केला. पुढे शंकराचार्याचे प्रकरण महाराष्ट्रात फार गाजले.

महात्मा गांधीजींनी येरवडयाच्या स्वराज्याश्रमात बसून चालविलेली प्रस्तुतची हरिजन मंदिर प्रवेशाची चळवळ म्हणजे एक राजकीय डाव आहे. अशी विचारसरणी करणारा वर्ग कार्यरत होता. यामध्ये या काळातील आय. सी. एस. अधिकारी श्री. पु. म. लाड यांनी अहमदनगर येथील सोमवंशीय बोर्डिंगमध्ये केलेल्या भाषणात वरील बाबींचा उल्लेख केलेला होता. त्याची सविस्तर माहिती १२ डिसेंबर १९३३ च्या 'राष्ट्रवीर' बेळगाव मध्ये आली आहे. या लेखाला दुजोरा देण्यासाठी म्हणून ३१ जानेवारी १९३४ च्या लेखात 'तरूण भारत' ने महात्मा गांधीजीचा अस्पृश्यांच्या बाबत असणारे संबंध व विचार मांडले आहेत. 'महात्मा गांधीजीच्या कार्यामुळेच हरिजनांचा भविष्यकाळ उज्ज्वल असा दिसत आहे.' तेव्हा महात्माजींच्या विचारानेच अस्पृश्यांचे कल्याण साधावे व सर्व स्तरातून मदत करावी असे 'तरूण भारत'च्या अंकात सूचित केले आहे.[१२५]

अस्पृश्यता निवारणासाठी हुबळी येथील 'कर्नाटक हरिजन बालिकाश्रम' या आश्रमाने केलेले कार्य १५ मुले व १२ मुली एकूण २७ मुलांच्या पालन पोषण व शिक्षणाची जबाबदारी आश्रमाने घेतली. या आश्रमाची स्थापना वीरनगौडा पाटील यांनी केली. या लोकोपयोगी अभियानाला जनतेने सहकार्य करावे अशा प्रकारचे आव्हान 'तरूण भारत' ने केले आहे. यातून समाजातील गोरगरीब पद्दलीत जनतेबाबतची तळमळ समजून येते.[१२६]

श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींनी कनिष्ठ अस्पृश्य जातीवर निर्बंध लादले. माणुसकीचा हक्क हिरावून घेतला. अस्पृश्य आर्थिक दास्यातून जोपर्यंत मुक्त होत नाहीत, तोपर्यंत त्यांना कोणतेही भविष्य नाही. येथील हिंदू समाज व्यवस्थेमुळे त्यांचे जीवन परावलंबी करून टाकले आहे. अस्पृश्यांच्या वाट्याला येथील समाज व धर्मव्यवस्थेमुळे दारिद्र्य व कर्ज–बाजारीपणा आला आहे. अशी मीमांसा ४ मार्च १९३३ च्या अंकात 'तरूण भारत' ने केली आहे.[१२७]

'जि. लो. बोर्डातील जातीयतेचा बुजबुजाट ! ही जुलूमशाही नव्हे काय' २८ ऑक्टोबरच्या अग्रलेखात जि. लो. बोर्डातील कारभार हा पूर्ण लिंगायत जातीवर आधारलेला आहे. अल्पसंख्याकांच्या हक्काचे काय? पददलीत समाजाच्या उध्दाराच्या कार्याचा विचार करताना एकाच जातीनेच जातीचे राजकारण न करता सर्वजाती समावेशक कारभार करावा यातच सर्वाचे भले आहे. अशी सूचना केली आहे.[१२८]

ब) हरिजन कार्याचा विस्तार –

महात्मा गांधी. यांनी ३० सप्टेंबर १९३२ मध्ये मदन मोहन मालवीयच्या अध्यक्षतेखाली या संघाची स्थापना केली. या संघाने केलेले कार्य स्पष्ट करणारा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यामध्ये ऑक्टोंबर १९३३ ते सप्टेंबर १९३४ च्या अहवालानुसार संघाने निरनिराळ्या क्षेत्रामध्ये केलेल्या कार्याची माहिती २ एप्रिलच्या अंकात दिली आहे. हरिजनाची उन्नती हरिजन व्यक्तीकडून व्हावी म्हणून प्रथम वर्षात संघाने हरिजनांना उच्च शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती देण्यास सुरूवात केली. सरासरी महिना १० रूपये प्रमाणे ४५ शिष्यवृंत्या हरिजन विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. संघाने ४९७ शाळा चालू केल्या व द्वितीय वर्षी तोच आकडा ९०९ वर गेला. सघाने चालविलेल्या शाळातून पहिल्याच वर्षी २४,८२४ हरिजन विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले. १९३३ ते ३४ या वर्षी संघाने हरिजनांच्या शिक्षण व्यवस्थेसाठी १,६२,९४५ रुपये खर्च केले. याच लेखात पुढे म्हणतात, "हरिजन वर्गाला इतर वर्गाप्रमाणे सर्व सवलती अधिकार प्राप्त करून देण्यात यावेत. अस्पृश्यांच्यामध्ये आत्मियता व स्वाभिमानाची भावना जागृत करण्यातच संघाने बहुमोल सेवा केल्यासारखे आहे. याच आधाराची व जवळीकतेची त्यांना गरज आहे. तेव्हा समाजातील सर्व स्तरातून या अस्पृश्यांच्या उध्दारासाठी हात पुढे आले पाहिजेत, तर अस्पृश्यतेचे उच्चाटन या देशातून होण्यास मदत होईल."[१२९]

क)मंदिर प्रवेश चळवळ –

अस्पृश्यांना समाजात कोणतेही अधिकार व हक्क दिले जात नसत. या संबधीचा प्रश्न मंदिर प्रवेशाबाबत होता. त्यासाठी समाज सुधारकांनी लढा देऊन अस्पृश्यांना कायद्याने हक्क मिळवून दिले. या कार्यात 'तरूण भारत' चा जनजागृतीचा महत्वाचा वाटा होता.

१) श्री. रंगा अय्यर यांचे मंदिर प्रवेश बिल –

लेजिस्लेटिव्ह असेब्लीत श्री. रंगा अय्यर यांनी मंदिर प्रवेशाचे बिल मांडले. ते बिल अटी तरतुदीसह 'तरूण भारत' ने २ जानेवारी १९३४ च्या अंकात प्रसिद्ध करून आपल्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. हा कायदा पारित होऊ नये, म्हणून सनातनी लोकांचा मोठा गट विरोध करत आहे. त्या गटाला संबोधून पुढच्या अंकात 'धर्मात घातलेला हात काढा' प्रस्तुत लेखात मंदिर प्रवेश अपात्रता बिलाला विरोध करणे. सनातनी लोकांचे कसे निष्कारण आहे, हे स्पष्ट केले आहे. तेव्हा श्रीरंगा अय्यर यांच्या मसुद्याला कायद्याने महत्त्व प्राप्त होणे आवश्यक आहे. असे अभिप्रेत धरून लेख दिला आहे.[१३०]

२) पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना खुले –

१९४६ सालातील कार्तिकी एकादशीस साने गुरूजींनी पंढरपुरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्या साठी खुले करावे. या मागणीसाठी बोर्डी येथे उपोषण सुरू केले. तेथील मंदिरात सनातनी वृत्तीच्या लोकांची सत्ता असल्याने त्या लोकांचे वर्चस्व कमी व्हावे व अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा, हा उद्देश होता. काही जाणकार लोकांच्या मध्यस्थीने साने गुरूजीनी मंदिर प्रवेशासाठी बडव्याची तसेच वारकऱ्यांची संमती मिळवण्यासाठी सहा महिने दौरा करून प्रचार करावा, असे ठरल्याने उपोषण मागे घेतले. ७ जानेवारी १९४७ रोजी मुंबईत जाहीर सभा घेऊन साने गुरूजी व सेनापती बापट यांनी प्रचार मोहिमेचा शुभारंभ केला. तसेच पुणे येथे महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली 'अस्पृश्यता निवारण' कार्याच्या दौऱ्याची सुरूवात करण्यासाठी जाहीर सभा घेण्यात आली. या सभेसमोर बोलताना साने गुरूजी म्हणतात "पांडुरंग विश्वाची माऊली आहे. त्या माऊलीला भेटण्यास हरिजनांना मज्जाव का? दर वारीला हजारो हरिजन पंढरपूरला येतात व कळसाचे दर्शन घेऊन जातात! हा कोणता धर्म? माणुसकीच्या कायद्याप्रमाणे हरिजनांना मंदिर प्रवेश मिळालाच पाहिजे, पंढरपुरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्याच्यासाठी खुले झाले म्हणजे महाराष्ट्रातील सर्व मंदिरे खुली झाल्याशिवाय राहाणार नाहीत."[१३१]

१० मे १९४७ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभापती दादासाहेब मावळणकर यांनी मंदिर व्यवस्थापन कमिटीच्या पंचाचा ठराव घेऊन श्री विठ्ठलाचे मंदिर हरिजनांनाही खुले करण्याची घोषणा केली. "पंढरपुरचे विठ्ठल–मंदिर अस्पृश्यांना खुले झाले. साने गुरूजींच्या उपवासाचा यशस्वी शेवट"[१३२] या मथळ्याच्या बातमीत 'तरूण भारत' कार म्हणतात' "पंढरपुरचे मंदिर अस्पृश्यांना खुले झाले, म्हणून अस्पृश्यता नाहीशी झाली असे नाही, पण हजारो वर्षे अस्पृश्यांना बंद केलेली मंदिराची दारे खुली झाली. यामुळे हिंदू समाजाला लागलेले अस्पृश्यतेचे ग्रहण सुटण्यास सुरूवात झाली."

३) मारूती मंदिर सर्वासाठी खुले –

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीना हिंदुच्या मंदिरात प्रवेश मिळवून देऊन सामाजिक समतेची क्रांती बेळगाव परिसरात सुरू झाली. सन १९३३ मध्ये बाबुराव ठाकुर, सहदेव कुलकर्णी, केशवराव गोखले इत्यादीच्या मदतीने बेळगांव शहरातील मारूतीच्या प्रसिध्द मंदिरात ५० हरिजना समवेत प्रवेश केला. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवटे, शहरातील हॉटेल खुले करण्यासाठी 'तरूण भारत' ग्रुप अग्रेसर होता. या बाबत जनजागृतीचे महत्वाचे कार्य केले म्हणूनच या कामाला यश मिळाले.[१३३]

मंदिर प्रवेशाचा कायदा –

'तरूण भारत' ने २९ एप्रिल १९४७ च्या आपल्या अग्रेलखात मंदिर प्रवेश बिलाच्या मर्यादा स्पष्ट करून त्यावर प्रकट भाष्य केले आहे. या बिलामुळे हरिजनांना देवदर्शनाचा हक्क प्राप्त होणार आहे. त्यांना कोणत्याही कारणाखाली प्रतिबंध करता येणार नाही. प्रतिबंध केल्यास ६ महिने पर्यंत कैद किंवा दंड अशी शिक्षा ठेवली आहे. 'अस्पृश्यता ही उच्चनीचतेच्या भावने पोटी जन्माला आलेली आहे. आणि ती भावना या मंदिर प्रवेश बिलाने नष्ट होईल.' असा निर्धार व्यक्त केला आहे.[१३४]

२.२.२.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी–

'तरूण भारत' ने बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक वैचारिक लेखात व त्यांच्या कार्याला प्रसिध्दी दिली आहे. तसेच दलित समाजाने केलेल्या लहान मोठया चळवळीनाही आवर्जून अग्रस्थान देण्यात येत असे. त्या पाठीमागचे कारण म्हणजे सामाजिक समता प्रस्थापित झाल्या शिवाय समाजाची उन्नती होणार नाही. याबाबत 'तरूण भारत' ची धारणा होती डॉ. आंबेडकर

यांनी केलेले हिंदू कोड बिलाचे समर्थन केले आहे. जुन्या शास्त्रांना धरूनच हा कायदा आहे' विरोधकांनी केवळ धर्मांवर संकट आले अशी ओरड न करता आपले धर्मग्रंथ नीट वाचावेत, अर्थ समजून घ्यावा, म्हणजे या हिंदू कोड बिलाचा नीट अर्थ समजेल.[१३५]

१५ एप्रिल १९५१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्ली येथील भाषणाचा वृत्तांत 'अ. भा. दलित फेडरेशनच्या 'जनता' या साप्ताहिकांत प्रसिध्द झाला. त्यांची माहिती २७ एप्रिल च्या 'तरूण भारत' च्या अंकात दिला आहे. 'ब्रिटिश राजवटीत दलित वर्गाला जेवढे संरक्षण होते, तेवढे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय सरकाच्या कारकिर्दित नाही. ब्रिटिश राजवटीत नोकऱ्यात दलित वर्गाला १२ टक्के प्रतिनिधीत्व देण्याच्या ठरावाची पूर्ण अंमलबजावणी होत होती. पण आता त्या ठरावाला कागदाच्या साध्या कपटया एवढी किंमत उरली आहे. लोक म्हणतात आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, पण दलित वर्गाला स्वातंत्र्य मिळाल्याचे मानायला मी तयार नाही. पंजाबमध्ये आमच्या लोकावर जुलूम होत आहेत. मी सरकारात नव्हतो. तेव्हा जुलमाविरूध्द जबरदस्ती विरूध्द आवाज उठवीत असे आता माझ्या तोडाला कुलूप बसले आहे. आणि जे सभासद दलितांबाबत बोलून दाखवण्याची अपेक्षा करावी. ते सुध्दा गप्प बसतात' अशा प्रकारे या लेखात त्याच्या भाषणाचा वृत्तांत देऊन डॉ. बाबासाहेबांना स्वतंत्र भारतातील लोकशाहीबद्दल वाटणाऱ्या भावना व अपेक्षा समोर येतात प्रशासनात काम करताना कुंचबना व दलितांच्या बाबतची तळमळ स्पष्ट होते.[१३६]

पुढच्या एका लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र संपूर्ण आत्मकथन करणारा आहे. त्यांचा हीरक महोत्सव मुंबई येथे मोठया थाटात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांच्या अनुयायांनी त्यांना एक लक्ष अठरा हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात केली. या कार्यक्रमाच्या प्रसंगी आलोट जन समुदायासमोर भाषण केले. त्या भाषणाचा मागोवा 'तरूण भारत' च्या अंकात घेतलेल्या आहे. 'लोक म्हणतात ही रक्कम मी माझ्या खाजगी जीवनासाठी स्वीकारावी, पण हा पैसा अस्पृश्य समाजासाठी सार्वजनिक हॉल बांधण्याच्या कार्यासाठी खर्च होईल' या वेळच्या भाषणात बालपणाचे प्रसंग तीन गुरू बाबतचा आदरभाव, वडिलांचे विद्याव्यासंगी स्नेही दादा केळूसकर यांनी लिहिलेले बुध्दाचे चरित्र भेट दिली. तेव्हापासून मी बौध्द धर्माचा उपासक बनलो, आणि म्हणून गौतम बुध्द, कबीर, ज्योतिबा फुले हे गुरू स्थानी राहिले [१३७]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गुरूवार ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले त्यांच्या निधन समयी 'तरूण भारत' ने श्रध्दांजली पर लेख दिला असून त्यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेऊन त्यांचा गौरव केला आहे. अस्पृश्यता निवारण हे डॉ. बाबासाहेबानी आपले जीवित कार्य मानले, त्याना शिक्षण देणे, त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे, आपल्या न्याय, सामाजिक व आर्थिक समतेच्या हक्कासाठी अहिंसक मार्गाने संघटितपणे लढा देणे हे त्यानी आपले प्रमुख कार्य स्वीकारले. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कोणत्याही वैयक्तिक स्वार्थाची तमा न बाळगता त्यांनी अस्पृश्योध्दाराच्या कार्याला आपले तन, मन व धन समर्पित केले. या महामानवाला श्रध्दांजली वाहिली आहे.[१३८]

२.२.२.७ हिंदूचे धर्मांतर –

सन १९३१ सालची गोष्ट पारतंत्र्याच्या जोखडाखाली जखडलेला भारत आणखी एका बाजूने पोखरला जात होता. समाजाला धर्मांतंराची कीड लागली होती व ती मोठया वेगाने फैलावली जात होती. मनुष्य धर्मांतंराला प्रवृत्त का होतो व त्याला जबाबदार कोण हा शोध घेण्याचा संपादकांचा प्रयत्न होता.

२९ सप्टेंबर १९३१ च्या प्रस्तुत अग्रलेखात दिलेली घटना जेव्हा घडली त्यावेळी धर्म व रूढीच्या ग्लानीत निष्क्रीय व सुस्त बनलेल्या आपल्या समाजाला कोणीतरी हे विचार ठणकावून सांगण्याची गरज होती. एक जबाबदार संपादक या नात्याने बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' च्या अग्रलेखात ही कामगिरी पार पाडली आहे. 'हिंदूनो! जागे आहात काय?'[१३९]

"चिक्कोडी तालुक्यापैकी कारदगे या गावी सुमारे १५० अस्पृश्यांनी धर्मांतर करून मुसलमान धर्म स्वीकारला, ही खेदजनक वार्ता बेळगांव जिल्हयातील हिंदू समाजाचा त्यावर विश्वास बसला नाही. हिंदु धर्मिय लोक हो ! वार्ता सत्य आहे, त्रिवार सत्य आहे ! आपल्याच हाडा मांसाच्या व रक्ताच्या हिंदूना अस्पृश्य म्हणून दूर ठेवल्याचे, देवालयात देवदर्शनास प्रतिबंध करण्याचे फळ आज त्यांच्या धर्मांतराच्या रूपाने दृष्टीस पडत आहे." पुढे म्हणतात 'जे लोक कालपर्यंत गोपाळ कृष्णाची पूजा करत होते तेच आज मुर्तिभंजक म्हणून त्यात आनंद मानणारे झाले. जे काल गोपुजक होते ते आज गोमांस भक्षक झाले. आमच्या समाजात रूढ झालेली स्पृश्या–स्पृश्यतेची कल्पना, उच्चनीच भावना त्याना वेळी अवेळी तुच्छतेने वागविण्याची तऱ्हा यामुळे आमचा सर्व समाज दिवसेंदिवस घसरत चालला आहे. पुढे म्हणतात 'खिश्चन

आणि मुसलमानांच्या जबरदस्तीने शेकडो लोक बाटले असतील पण त्याहून कित्येक हजारो पटीने अधिक लोक अस्पृश्यतेच्या दृष्ट चालीस कंटाळून आपल्या धर्माला पारखे झाले. हे लोक जातिवंत परधर्मियापेक्षा बाटलेले लोक अत्यंत खुनशी, कपटी व घातकी ठरतात. आज देशात अस्पृश्यतेच्या जाचास कंटाळून जे कोणी अस्पृश्य आज दुसऱ्या धर्मास जाऊन मिळाले असतील त्यांना समजूतीच्या गोष्टी सांगून व त्यांच्या वरील अन्याय दूर करण्याचे आश्वासन देऊन त्यांना आपल्यात परत घेणे आपले सध्याचे अत्यंत निकडीचे कर्तव्य नाही काय'? असा प्रश्न करतात व पुढे सावधानतेचा इशारा देताना म्हणतात 'हिंदू लोक हो ! रूढीप्रिय हिंदु लोक हो ! अद्याप आपल्यावर कोणती भयंकर आपत्ती कोसळावी म्हणून तिची वाट पहात आहात? की आपण अद्यापि अस्पृश्यता झुगारून देण्यास तयार नाही ? आम्हाला देवालयात प्रवेश करू द्या. सार्वजनिक स्थळी आम्हास समतेने वागवा, विहिरीवर पाणी भरू द्या, या नम्रतेच्या मागणीचा धिक्कार करून आपण त्यांच्याकडून प्रतिक्रियेत रूपांतर होणाऱ्या निष्ठूरतेच्या हक्काची अंमलबजावणी आपल्यावर करू देणार काय?धिक्कार असो, आपल्या रूढीप्रियतेचा'!

या विस्तृत लेखातून अस्पृश्य समाजाविषयीचा असणारा अंतरीचा किनारा स्पष्ट होतो. तसेच 'तरूण भारत' हे वृत्तपत्र ब्राम्हण विचाराचे प्रवृत्तीचे आहे. अशी ओरड करणाऱ्या विरोधी गटाला हा लेख म्हणजे फार जोराचा फटकारा आहे.

२.२.२.८ जातीय दंगली –

महात्मा गांधीजींचा खून ही मानवतेला कलंक लावणारी घटना होती. ज्या अहिंसेच्या पालनासाठी या महात्म्याने आपले आयुष्य वेचले, खुद्द त्याचाच शेवट अशा हिंसक प्रवृत्तीतून व्हावा ही केवढी लाजिरवाणी घटना ! राष्ट्र पुरूषाची हत्या झाल्यामुळे जनतेत प्रक्षोभाची लाट उसळली आणि हिंसक वळण लागले त्या कृत्यात निरपराध कुटुंबे बेचिराख झाली, ही लाट वेळीच थोपवली गेली नसती, तर सर्व भारतभर जातीयवाद्याच्या आगीचा डोंब उसळला असता. यातून होणाऱ्या भयंकर परिणामाची जाणीव झाल्यामुळेच १७ फेब्रवारी १९४८ रोजी 'तरूण भारतात' अग्रलेख प्रसिध्द झाला ''या लुट–जाळपोळीमागे पध्दतशीर कट आहे. नीतीचा निर्बध सुटला तर अनर्थ होईल''[१४०] या शीर्षकाखाली लेख प्रसिध्द झाला. "ब्राह्मणांचा निःपात करण्याचा एक पध्दतशीर कट झाला असला पाहिजे आणि तो ही महात्मा गांधीजींच्या नावावर करावयाचा! उभ्या आयुष्यात ज्यांचा महात्मा गांधीजींच्या तत्त्वाशी अगर चळवळीशी थोडाही

संपर्क आला नाही. अशा लोकांचे गांधीप्रेम यावेळी उफाळून आलेले दिसते. ब्राम्हणांची लूट व जाळपोळ करा, असा सरकारचाच हुकूम आहे. असा प्रचार अडाणी जनतेत त्यांनी केला"

पुढच्या लेखात 'क्षात्रतेजाने जगा ! तरच हिंदू–मुसलमानांचे ऐक्य होईल' असे म्हटले आहे. हिंदू–मुसलमान यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण होण्यामागे महत्वाचे कारण म्हणजे 'हिंदू आणि मुसलमानांचा धर्मवेडेपणा हा या संघर्षाचे मूळ कारण आहे. या विषयावर दोन्हीही धर्माचा खरपूस समाचार घेतला आहे.[१४१]

२.२.२.९ मुसलमान धर्माची दिक्षा –

'एक करूण कहाणी' २६ फेब्रुवारी १९३५ च्या अग्रलेखात ताई नावाच्या डोंबारणी मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन बाटली आहे.[१४२] अगोदरच्या एका अंकात 'बायजा' नावाची एक डोंबारीण बेळगांव येथील खंजरगलीत भिक्षा मागण्यासाठी गेली असता मुसलमानांनी तिला पकडून कसे बाटविले याची करूण कहाणी मांडली होती. त्यानंतर हे प्रकरण घडले या दोघीही स्त्रीया विवाहीत असून नवरे जीवंत होते, एकादी व्यक्ती एकदा बाटली की ती कायमची धर्मास मुकली! या भावनेपोटी दिवसेंदिवस हिंदू धर्माचा ऱ्हास होत चाललेला आहे. पतिताना पावन करणारा हिंदु धर्म आज पतितांस शासन करणारा म्हणून जगात पुढे यंत आहे.' या धर्मात अस्पृश्यांना पायाखाली तुडवून कुत्र्या–मांजराप्रमाणे वागवले जाते. त्यामुळेच हिंदु धर्माची अधोगती होत आहे. 'जसे करावे तसे भरावे' हा निसर्गाचा नियम आहे. म्हणूनच जगाच्या पाठीवर हिंदु धर्मियांना अस्पृश्यांपेक्षा अधिक मान नाही. आज या धर्मातील कांही समाज डोंबारीप्रमाणे इतर धर्माचा आसरा पहात आहे. या सर्व परिस्थितीवर हिंदू समाज कांही विचार करील काय ? याबाबत निर्भिड पणे 'तरूण भारतने आपले कडक शब्दात बोल सुनावले आहेत या सर्व परिस्थितीला हिंदु धर्मातील चालीरिती, रूढी याच जबाबदार आहेत. अशी त्यांनी खात्रीलायक धारणा करून घेतली आहे.

२.२.२.१० स्त्रीयांच्या विषयी –

१९ वे शतक हे समाज सुधारणेचे व स्त्रीयांच्या विकासाचे शतक मानले जाते. राजा राममोहन रॉय, महात्मा जोतीराव फुले, महर्षि कर्वे व विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी समाज सुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा झाल्या. त्यांनी पुरूषी वर्गाच्या दास्यातून स्त्रियांना मुक्त करण्याचा प्रयत्न केला. सतीप्रथा,

विधवा पुनर्विवाह, बालविवाह, जरठकुमार विवाह, या रूढी प्रथांच्या विरोधात आवाज उठविला. या समाजातील सनातनी मंडळी स्त्री उध्दाराच्या कार्याला विरोध करतच होती. या काळात समाजाच्या स्त्रीयांबाबतच्या अपेक्षा, अन्यायी व पक्षपातीपणा होता. अशा या स्त्री वर्गावरील अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्याचे काम या महाराष्ट्रातील काही मासिकानी व वृत्तपत्रांनी केले. त्यामध्ये बेळगांव विभागात 'तरूण भारत' या वृत्तपत्राने प्रारंभापासून स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी त्यांनी समाजातील इतर घटकांच्या विरोधात जाऊन स्त्रीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्त्रीयांना आपले हक्क मिळावेत, त्यांच्यावरील अन्याय दूर व्हावा. त्यांना सन्मानाने समाजात जगता यावे, त्यांच्यात संघटना निर्माण होऊन एकी वाढावी याबाबत 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सातत्याने लेखन केल्याचे आढळते.

अ)महिला संमेलन –

समाजातील महिलांच्यात जागृती करण्यासाठी व त्यांच्यात एकसंघटीत महिला शक्ती उभी करण्यासाठी कांही संघटना व संस्थांच्या मार्फत महिला संमेलने आयोजित केली जात होती. यामध्ये सन १९३४ च्या सप्टेंबर महिन्यात इंदोर येथे भरलेल्या महिला संमेलनाची सविस्तर माहिती साप्ताहिकात आलेली आहे. 'अहिल्या महिला संमेलन' या संमेलनाच्या अध्यक्षा सावित्रीबाई बनसोडे या होत्या, आपल्या मुख्य भाषणात त्यांनी महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेतला त्याच बरोबर त्यांनी या समस्यांची उकल करण्यासाठी काही मार्ग ही सुचविले होते.[१४३]

ब) अखिल भारतीय महिला परिषद –

या संघटनेमार्फत स्त्री–उध्दाराच्या कार्याला खरी सुरूवात झाली. या परिषदेची स्थापना १९२६ मध्ये करण्यात आली. सार्वजनिक कार्याची व कर्तव्याची माहिती देणे व आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची चर्चा करून उपाय योजना आखणे, महिला वर्गाच्यासाठी संघटना करणे व वर्षातून एकदा हिंदुस्थानातील मोठया शहरात या परिषदेचे अधिवेशन भरवते. स्त्री वर्गाचे एकीकरण ही चळवळ अर्थातच राजकीय प्रांतभेद, जातीभेद व वर्गभेद यापासून अलिप्त आहे. तेव्हा बेळगाव विभागात या संघटनेच्या शाखा स्थापन करून स्त्री वर्गाने आपली उन्नती साधावी, असे आवाहन केले आहे. बेळगाव शाखेच्या सौ. कावेरीबाई शिवेश्वरकर व शांताबाई भालेराव याच्या मार्गदर्शनाखाली बेळगांव शाखेचे उद्घाटन झाले. तेव्हा अनेक

स्त्रियानी आपले नाव नोंदवून सभासदत्व स्वीकारले. त्याच बरोबर स्त्री वर्गाला आवाहान करून सखी मंच उभा करण्याच्या कार्याला 'तरूण भारत' ने पुढाकार घेतला.[१४४]

बेंगलोर येथे २८ मे १९५१ रोजी अखिल भारतीय महिला परिषद संमेलन भरले होते. या परिषदेच्या अध्यक्षा सौ. शांताबाई दौंडकर यांनी. आपल्या भाषणात स्त्रियांच्या उन्नतीसाठी कोणत्या मार्गाचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे, अशी मांडणी केली होती. स्त्रियांना शिक्षण द्यावे की देऊ नये, हा प्रश्न समाजापुढे राहिला नसून त्यांना कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे, हा प्रश्न महत्वाचा आहे. भावी पिढीला शिक्षण देण्याचे कार्य स्त्रिया प्रभावी रीतीने करू शकतील असा विश्वास त्यानी व्यक्त केला. या साप्ताहिकाने मांडलेल्या या विचाराचे कौतुक करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.[१४५]

क) कर्नाटक महिला परिषद, बेळगांव –

बेळगांव येथे कर्नाटक महिला परिषदेचे दुसरे अधिवेशन सन १९३८ रोजी सौ. श्रीमती अनुसयाबाई काळे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. मार्गदर्शन करताना त्या म्हणतात 'आपल्याकडे अनेक प्रश्न आहेत. काँग्रेसच्या सहकार्याने आपल्याला अधिकार मिळत आहेत. उदा. १९३५ च्या कायद्यान्वये आपल्याला मताधिकार मिळाला आहे. याचा पूर्ण फायदा घेऊन आपण कर्तबगार स्त्रियांना कायदे मंडळात पाठवले पाहिजे व त्यामार्फत आपले प्रश्न सोडवले पाहिजे. या आगोदर महिला परिषदेच्या अधिवेशनात स्त्री मुक्ती, स्त्री शिक्षण या गोष्टीचा विचार केला जात होता. पण आता राजकारण, समाज, अर्थकारण धर्मकारण या विषयक गोष्टीचा विचार केला पाहिजे.'[१४६] या परिषदेच्या कार्याचा वृत्तांत या लेखात देऊन 'स्त्री शक्ती जागृत होत आहे' असा शेरा लावलेला आहे.

२.२.२.११ पिडीत तरूणीचे आत्मबलिदान :–

'उषा भार्गव हिचे आत्मबलिदान ही सामान्य घटना नाही' ११ जानेवारी १९६३ च्या अग्रलेखात संपादकानी समाजातील विकृत कलंकित प्रवृत्तीवर कडाडून प्रहार केले आहेत त्याची पूर्ण प्रचिती या लेखातून स्पष्ट होते.[१४७]

उषा भार्गव सारखी कोवळी पोर या विकृत प्रवृत्तीला बळी पडते आणि कलंकित झालेल्या या शरिराने जगात वावरण्यापेक्षा मृत्यूला कवटाळणे तिला अधिक सोईचे वाटते. या घटनेचे तात्कालिक पडसाद दंगलीच्या रुपाने मध्यप्रदेशमध्ये ठिकठिकाणी उमटले. त्यावेळच्या

पंडित नेहरू सरकारने मात्र या घटनेचा उल्लेख 'एक सामान्य घटना' या शब्दात निंदा करतात अशा बेजबाबदार सरकारवर या लेखात नाराजी व्यक्त केली आहे. 'एकंदरीत समाजाचे आरोग्य बिघडले आहे.' असे म्हणून सरकार या प्रकरणाची निरवानिरव करतात. अशा या निष्क्रीय सरकारला म्हणतात, 'समाजाचे आरोग्य बिघडले नाही, तर प्रशासन चालवणाऱ्यांचे आरोग्य बिघडले आहे.' देशाच्या व्यापक राजकारणापुढे 'सामान्य माणसाचे जीवन ते काय? असे राज्यकर्ते समजत असतील तर देशाचेच आरोग्य विना उपाय संपले असे समजावे काय. आपल्या देशांत अशा घटना घडत असताना तुम्ही मूग गिळून स्वस्थ बसता ! दोन अश्रूही ढाळीत नाही, याला काय म्हणावे ? असा प्रश्न सरकारला केला आहे.

वरील लेखातून हिंदुस्थानच्या सरकारला कर्तव्याची जाणीव करून देऊन सर्वसामान्य जनतेला सुध्दा भावना व अस्मिता इज्जत असते. या घटनेची जळजळीत प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. ब्रिटिश सरकारने महिलांच्या हक्काचे संरक्षण व्हावे म्हणून विविध प्रकारचे कायदे केले आहेत. परंतु अशा कायद्यांचे उल्लंघन झाल्यास त्यांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली होती. काही वेळा कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यावर केवळ दंडात्मक कारवाई करण्यात येत असे. परंतु दंडाबरोबर शिक्षा देखील करण्यात यावी असेही स्पष्ट केले होते. समाजात महिलाना मानाचे व सन्मानाचे स्थान मिळवून द्यावे. अशी विनंती केली आहे.[१४८]

समाजातील दुष्कृत्यांना आळा घालण्यासाठी अशा घटना जनतेच्या दरबारासमोर मांडून समाज विघातक प्रवृत्तीला ठेचण्याचे काम 'तरूण भारत' या वृत्तपत्राने केले. उदा. 'तरूण स्त्रियांना पळविणाऱ्या बदमाशाचे प्रचंड जाळे बेळगाव जिल्हयात उघडकीस आले. मुंबईच्या कुंटणखात्यातील शहारे आणणारे प्रकार अंकात प्रसिध्द करून झाकलेले प्रकरण उघडकीला आणले.[१४९]

२.२.२.१२ एका अभागी स्त्रिची कहानी –

बेळगाव जिल्हयातील हल्याळ तालुक्यातील चिखलगेरी या गावातील यंल्लवा नावाच्या स्त्रीचा खटला खानापूर फर्स्ट क्लास न्या. मि. रानडे यांचे कोर्टात चालू होता. सदरच्या खटल्याची हकिकत १६ एप्रिल १९४० च्या 'तरूण भारत' च्या अंकात प्रसिध्द केली आहे. व एका अभागी स्त्रीच्या जीवनाची कहाणी सर्वाच्या समोर आणून अशा अन्यायग्रस्त स्त्रियांच्या दुःखाला वाट करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

न्यायालयीन खटल्यात 'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर यांनी प्रत्यक्षात या स्त्रीची मुलाखत घेऊन खरी व दुर्दैवी हकीकत सर्वाच्या समोर मांडून समाज विघातक प्रकाराला थोपवण्याचे काम त्यांनी करण्याचा प्रयत्न केला. अशा घटनांकडे अधिक जागरुकतेने लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.[१५०]

ना. मंत्री मुरारजी देसाई यांनी बेळगाव लेडीज क्लबला भेट दिली. त्यावेळी उपस्थित असणाऱ्या महिला मंडळांच्यासमोर बोलताना म्हणतात की, "स्त्री शक्तीच राष्ट्राचा उध्दार करील ! मात्र स्त्रीसुध्दा स्त्रीवर अन्याय करते" पुत्रापेक्षा कन्येवर तिची अधिक गैरमर्जी असते. दोघानाही समसमान वागवण्यात येत नाही. नवप्रजेवर चांगले संस्कार करावेत नवा जमाना, नवा संसार करावा तरच समाज सुधारेल, स्त्रीवर्गाने कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करता कामा नये, सरकारने तुमच्या बाजूने बरेचसे कायदे करून तुम्हाला पाठबळ दिले आहे. पण हुशारीने समोर येऊन आपल्या हक्कासाठी झगडले पाहिजे. त्यासाठी समाजात जागृती निर्माण झाली पाहिजे अशा प्रकारची भूमिका मांडली.[१५१]

२.२.२.१३ महात्मा गांधीजीचे स्त्री–पुरूष समानतेविषयीचे विचार–

महात्मा गांधीजीचे स्त्री–पुरूष समानतेविषयी मांडलेले विचार 'तरूण भारत' ने प्रसिध्द करून स्त्री वर्गाचा सन्मान केला आहे. स्त्री ही पुरूषाची सहचरिणी आहे. तिला पण पुरूषा इतकीच बुध्दीमत्तेची नैसर्गिक देणगी आहे. स्त्री व पुरूष प्रतिष्ठेच्या दृष्टीने सारखेच असतात. मुलगा आणि मुलीला सारखेच वागवले पाहिजे. पुरूषाप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. दोघांच्या शिक्षणपध्दती सारख्याच असल्या पाहिजे. हुंडयाबाबत म्हणतात 'लग्नासाठी हुंडयाची अट घालणारे तरूण आपल्या शिक्षणाला काळिमा लावतात व स्त्रियांचाच अनादर करतात, ही पध्दत जातीयवादाशी संलग्न आहे. जोपर्यंत वधू–वरांना जातीतल्या जातीतच आपल्या सहकाऱ्याची निवड करावी लागते. तोपर्यत ही पध्दत देशात चालतच राहणार असे स्पष्ट करतात. पुनर्विवाह पध्दतीबाबत पति निधनामुळे वैधव्य प्राप्त झाल्यावर त्याच्यावरील प्रीतीमुळेच वैधव्यावस्थेत राहणाऱ्या स्त्रिया देशाची प्रतिष्ठा आणि आपला धर्म त्यांना उच्च स्थान प्राप्त करून देतात. परंतु सामजिक बंधनामुळे या धार्मिक दुहीमुळे लादलेले वैधव्य म्हणजे असहाय्य जोखडच होय. त्यामुळे गुप्त पापाचा फैलाव होऊन धर्माला तर लांच्छन लागतेच, पण घराचे पावित्र्य पण नष्ट होते. सामाजिक प्रश्नांच्यावर प्रकाश टाकणारा महात्मा

गांधीजींच्या विचारातून प्रकट झालेला लेख प्रसिध्द करून समाजातील अनैतिक घटनांच्यावर प्रकाश टाकला आहे.[१५२]

स्त्री हा भारताचा मानबिंदू आहे कारण पावित्र्य व मातृत्व हे स्त्रीचे दोन गुण महत्वाचे आहेत. आणि पवित्र शील ही भारतीय स्त्रीची अत्यंत मोठी ठेव आहे, स्त्रीकडे पहाण्याचा महात्मा गांधीजींचा दृष्टीकोनही 'जगत जननी' असा होता. कारण स्त्री ही क्षणाची पत्नी असली तरी अनंत काळाची माता आहे.[१५३]

२.२.२.१३ विवाह सोहळ्यातील अनावश्यक खर्च टाळा –

कमी खर्चात विवाह सोहळा होणे आवश्यक आहे. या संदर्भात 'तरूण भारत' ने नेहमीच पुढाकार घेतला आहे. आर्थिक कुवत नसतानाही लग्नासाठी भरमसाठ कर्जे काढून लग्न केली जातात आणि हे कर्ज फेडण्यासाठी अनेक वेळा जमिनी विकाव्या लागतात परिणामी नंतरचे आयुष्य संकटात सापडते. समाजाला कमी खर्चात लग्ने करणे हाच तरणोपाय असे नमूद केले आहे.[१५४] तसेच समाजात रूढ असणारी हुंडा पध्दत ही चाल वधुच्या पित्याला कर्जाच्या खाईत लोटणारी व मानव जातीला शाप ठरलेली कशी आहे. हे समाजाला समजावून सांगणारा प्रा. किसन हन्नुरकर याचा वैचारिक लेख प्रसिध्द करून हुंडा प्रथे विरोधात आवाज उठवलेला आहे. हुंडा विरोध ही सामाजिक चळवळ आहे. या प्रथेचे निर्मूलन होण्यासाठी वैचारिक क्रांतिबरोबर खुल्या धर्म कल्पना व रूढीना फाटा दिला पाहिजे, हुंडा घेणाऱ्याबरोबर देणाराही जबाबदार आहे. या प्रथेविरोधी स्त्री वर्ग जागृत होऊन विरोधात उठला पाहिजे. तरच हा प्रश्न कायमचा संपेल. अशा प्रकारचा आशावाद सदरच्या लेखात व्यक्त केला आहे.

हिंदू विवाह कायद्यात झालेल्या दुरूस्ती सुचविणारे विधेयक वृत्तपत्रात प्रसिध्द करून सन १९५४ खास कायदा १९५५ यामध्ये दुरूस्ती सुचविणारे विधेयक राज्यसभेत हरिभाऊ गोखले यांनी मांडले. त्याला मंजूरी मिळाली. हा विवाह कायदा दुरूस्ती (१९७६) विधेयकांत घटस्फोटाबाबत सवलती शिथिल केल्या. मूळ कायद्यातील अडचणी दूर करण्यात आल्या. दोघांच्या परस्पर संमतीने घटस्फोटासाठी कोर्टात जाणाऱ्या जोडप्याना वाट पाहण्याचा एक वर्षांचा काल होता. तो ६ महिने करण्यात येऊन निर्णय सोड लवकर मिळण्याची तरतूद करण्यात आली.[१५५]

२.२.२.१४ मुसलमान स्त्रियांची स्थिती –

'मुसलमान स्त्रियानी शिक्षंण घ्यावे व गोशा दुर करावा !' हा सामाजिक बांधिलकी व स्त्री उध्दाराचा विचार करावयास भाग पाडणारा आयूब यांचा लेख 'तरूण भारत' ने प्रसिध्द करून मुसलमान धर्मातील चालत आलेल्या रूढी व प्रथा याना महत्त्व देऊन स्त्रीला गुलाम म्हणून पुरूष अहंकाराने वर्षानुवर्षे तिला दोषातच ठेवले आहे. अशाच प्रकारची हिंदू समाजातील स्त्रियांची परिस्थिती होती. धर्माच्या नावाखाली पुरूष जातीने स्वार्थासाठी या स्त्री जातिची दैना केली. यावर उपाय म्हणून या लेखात लेखक म्हणतो 'मुसलमान स्त्रियांनी शिक्षण घेतले तरच तिची सुटका शक्य आहे. स्त्री सुशिक्षित असली म्हणजे, ती आपल्या प्रेमळ, सुमधुर भाषणाने व वर्तनांने पुरूषांच्या मनोवृत्तीना आळा घालून त्यांच्या सर्व अन्याय हाणून पाडील, तेव्हा भगिनीनो आतातरी जागे व्हा ! आणि आपल्या पतिराजाच्या निष्ठूर वृत्तीस आळा घालण्याकरीता शिक्षण घ्या. त्याच लेखात गोशा (पडदा पध्दत) बाबत म्हणतात 'गोशा पध्दतीमुळे स्त्रियांच्या पावित्र्याचे आणि शीलाचे संरक्षण होते, ही खुळी कल्पना आहे. तर या स्त्रियांच्या पावित्र्याचे आणि शीलाचे संरक्षण त्यांना कृत्रिम पडद्यात कोंडून ठेवून कधीही होत नाही. तर त्याला खरा मनाचा अभेद्य पडदाच लागत असतो ! इतर पाश्चिमात्य देशात या पध्दतीने पुर्ण उच्चाटन केले आहे. तशाच पध्दतीने आपल्या देशातील स्त्रियाना काळ्याकुट कैदखान्यातून मुक्त केले पाहिजे. तरच स्त्री उध्दाराचे व सन्मानाचे कार्य होईल' असे नमूद केले आहे.[१५६]

२.२.२.१५ अन्याया विरूध्द लढणारी पत्रकारिता –

बाबुराव ठाकुर हे सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते होते. ही चळवळ त्यानी पत्रकारितेतून उभी केली. अन्याय करणारी व्यक्ती कोण आहे. तिची ताकद किती आहे, याचा कोणताही मुलाहिजा न ठेवता अन्यायाविरूध्द वाचा फोडण्यासाठी 'तरूण भारत' ला कसोसीने राबविले. त्याकरीता सरकारशी दोन हात करण्यात मागे पुढे पाहिले नाही. जिथे जिथे अन्याय घडला तिथे तिथे 'तरूण भारत' सर्वप्रथम पोहचवला. संबंधित व्यक्तिवरील अन्याय दूर करून त्या व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. 'तरूण भारत' ने हाताळलेल्या अनेक प्रकरणापैकी महाराष्ट्रभर गाजलेले काशीबाई हणबर प्रकरण होय.

१)काशीबाई हणबर प्रकरण–

कोल्हापूर संस्थानातील पांगीरे या गावातील काशीबाई हणबर हिचा मुलगा १९४२ च्या 'चले जाव चळवळीत भूमिगत झाला होता. तो सापडत नसल्याने काशीबाईवर पोलिसांनी अत्याचार केला. तिची व्यथा मांडण्यासाठी 'तरूण भारत' ने खास अंक प्रसिध्द करून अन्यायाविरूध्द प्रक्षोभ व्यक्त केला. त्यामुळे अन्याय करणाऱ्या इंगवले नावाच्या फौजदाराची चौकशी होऊन त्याला शिक्षा झाली.[१५७]

२)ज्योती रामा राजगिरे प्रकरण –

ज्योती रामा राजगिरे हा मराठा, मध्यमवर्गीय शेतकरी कुटूंबातील पट्टणकुडी ता. निपाणी चा रहिवासी होता. त्याच गावच्या श्री. विट्ठल भोसले यांच्या घरी २६ ऑगस्ट १९५२ रोजी झालेल्या चोरीच्या प्रकरणी हवालदार श्री कामते आणि सनदी यांनी २८ ऑगस्ट १९५२ रोजी ज्योतीस चोरीच्या आरोपाखाली रात्री १२ वाजता अटक केली. निपाणीतील पोलिस लॉकअपमध्ये डांबले.[१५८] तेथील भयानक मारामुळे तो मरण पावला व पोलीस हवालदार श्री कामतेने त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावली. ज्योतिरामाची पत्नी जनाबाई हीने आपल्या नवऱ्याची आठ दिवस सतत चौकशी करूनही पत्ता लागत नाही. असे दिसताच मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री, मा.ना.मुरारजी देसाई व बेळगावच्या जिल्हा अधिकाऱ्यांना तार करून चौकशीची विनंती केली. दोन महिने झाले, तरी ज्योती प्रकरणाबाबत सरकारकडून काही हालचाली झाल्या नाहीत. म्हणून निपाणीचे श्री. बाळकृष्ण पटवर्धन (मास्तर)यानी बाबुरावांना पत्र पाठवून ज्योती बेपत्ता असल्याची माहिती देऊन पोलीस माराहणीत त्याचा मृत्यु झाला, असल्याची शंका व्यक्त केली. या प्रकरणात जातीने लक्ष घालून न्याय मिळवून देण्याची विनंती केली.[१५९]

पटणकुडीच्या ज्योती राजगिरेची दुर्दैवी कहानी, या घटनेचा उलगडा झालाच पाहिजे, 'हे काय लोकशाही राज्य आहे काय' ? राजगिरेची चौकशी करून खरा प्रकार जाहीर करा.'[१६०] या शीर्षकाखाली जळजळीत लेखन केले. सरकारला जागे केले. त्याच बरोबर पोलिसांकडून दडपल्या जाणाऱ्या प्रकरणाला वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन एक वेगळे वळण लावले. या प्रकरणाबाबत समाजातून चौकशीच्या मागणीसाठी रेटा सुरू झाला. शेवटी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सी. आय. डी. इन्स्पेक्टर श्री. एल. जी. मुजुमदार याची खास नेमणूक करण्यात आली. या प्रकरणासंबंधी असलेले पोलीस अंमलदार कमते याना सस्पेंड

करण्यात आले. शिवाय सरकारच्या खास हुकूमानुसार श्री. वाली यांची ॲडिशनल मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक करण्यात आली. या प्रकरणी कोर्टात अनेक साक्षीदार तपासण्यात आले.[१६१]

मुंबई सरकाच्या आदेशानुसार वरील आरोपीना श्री. वाली एस. एस. यांनी सस्पेंड करून ३० जानेवारी १९५३ रोजी चिकोडी येथील मॅजिस्ट्रेट श्री. हेगडे यांच्या कोर्टात फिर्याद दाखल केली.[१६२]

'तरूण भारत' ने या प्रकरणी अनेक लेख लिहून समाज जागृती करून, या प्रकरणाकडे सरकारचे लक्ष वेधले. त्यामुळेच दडपलेले प्रकरण उघडकीस आले. श्री बाळकृष्ण पटवर्धन व श्री बाबुराव ठाकुर यांच्या प्रयत्नामुळे राजगिरे कुटूंबाला न्याय मिळाला असे म्हटलेस वावगे ठरणार नाही. या प्रकरणामुळे 'तरूण भारत' चे नाव सर्वतोमुखी झाले व गरीबांचा आश्रयदाता, न्यायदाता म्हणून बेळगाव परिसरातील सर्वसामान्य जनता बाबुराव ठाकुर यांच्याकडे पाहत होती. म्हणून जनता त्यांना 'काका म्हणू लागली.[१६३]

३) शामराव देशमुख प्रकरण–

१ सप्टेंबर १९६१ रोजी रात्री निपाणी येथील पोलिस कोठडीत शामराव देशमुख यांनी गळफास लावला. तो निपाणी येथील भांडयाचे व्यापारी श्री रावजी मेहता यांच्याकडे कामास होता. एके दिवशी शेठजीकडून ५ हजार रुपये रक्कम घेऊन शामराव मुंबईला निघून गेला. तो परत आला नाही. म्हणून शेठजीनी इं. पि. कोडच्या ४२० कलमाखाली फसवणुकीच्या आरोपाखाली त्याच्या विरूद्ध पोलिसांच्याकडे फिर्याद नोंदवली. त्यानंतर शामरावला पुण्यातून पकडून आणून पोलीस कस्टडीत ठेवले होते. या घटनेनंतर १९ सप्टेंबर १९६१ च्या 'तरूण भारत' च्या अंकात, 'निपाणी पोलीस कस्टडीत घडलेली एक भीषण घटना खून की आत्महत्या ! पोलीस चौकशीत बाहेर आलेली हकीकत!' या मथळ्याखाली प्रसिध्द करून या प्रकरणात हात घातला.[१६४]

ठाकुर यांनी निपाणीतील प्रतिष्ठित लोकांची व पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन पोलीस कस्टडीत आरोपीचा मृत्यू झाला की आत्महत्या केली, याबद्दल लोकांना शंका आहे. त्यामुळे या प्रकरणाची कसून चौकशी झाली पाहिजे. वृत्तपत्रात मागणी केली. दुसऱ्या एका लेखात 'पोलीस अधिकाऱ्यांना ताबडतोब सस्पेंड करुन या मृत्यूची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे ! निपाणीच्या जाहीर सभेतील नागरिकांची मागणी 'सामान्य माणसाचे जीवित येथे

सुरक्षित नाही ! ही पोलीस चौकी आहे की सैतान चौकी आहे ? निपाणीचे डी. एस. पी लुईस यांनी निपाणीचे आमदार श्री. बी. डी. नाईक यांना देशमुखाने आत्महत्याच केली आहे हे पटवून दिले.

जाहीर सभेत न्यायालयीन चौकशीची मागणी –

१२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता, निपाणी येथे तानाजी चौकात डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक जाहीर सभा घेण्यात आली. या सभेमध्ये श्री उमराणीकर गुरूजी, मारूती देसाई व बाबुराव ठाकुर यांची भाषणे झाली. 'शामरावांचा मृत्यू पोलिसांच्या कैदेत झाला असून तो संशयास्पद आहे. या प्रकरणाची चौकशी न्यायालयामार्फत व्हावी अशा मागणीचा ठराव समत केला.[१६५] एवढयावरच 'तरूण भारत' कार थांबले नाहीत तर यावेळचे मुंबईचे राज्यपाल श्री श्रीप्रकाश यांनी श्री. एस. एम. जोशी यांच्यासह भेट घेतली. त्यावेळचे म्हैसुर राज्याचे गृहमंत्री श्री. चन्नबसप्पा यांनाही ते भेटले. बॅ. नाथ पै. यांनी लोकसभेत ना. शास्त्री यांचे लक्ष वेधले पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, एवढे प्रयत्न होऊनही या प्रकरणी काहीही झाले नाही. संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर खटले भरण्याचे तर दूरच पण अन्य संबंधित लोकांना सस्पेंड करून त्यांची चौकशी करण्याचा साधा प्रयत्न ही केला गेला नाही.

२२ एप्रिल १९६० च्या अंकात म्हणतात एखाद्या कुत्र्या–मांजराचा मृत्यू घडावा तशीच देशमुखाच्या मृत्यूच्या घटनेची घोर उपेक्षा झाली. आपल्या लोकशाही राजवटीला हा मोठा कलंक होय.[१६६]

४) पाटणेकर खटला :–

बेळगावचे व्यापारी श्री. पाटणेकर यांच्यावर पोलिसानी चालवलेला छळवादचा 'तरूण भारत' ने समाचार घेऊन पोलीस यंत्रणेला ताळ्यावर आणले होते. सन १९४२ च्या आंदोलन काळात बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणेला जादा अधिकार दिले होते. या अधिकाराचा गैरवापर करून श्री पाटणेकर या निरपराधी व्यापाऱ्याचा छळवाद मांडला होता. याची हकीकत पुढील प्रमाणे बैलहोंगलच्या श्री. आवटगी या व्यापाऱ्याने २८ पोती जोंधळे व २० पोती गहू सरकारी परवानगीने बैलगाडयातून आणून बेळगावच्या पाटणेकर या व्यापाऱ्याला विकले. त्या पाच गाडया शाहपुरीत आल्या असता, इनेस्पेक्टर मि. बुरजी यांनी तो माल जप्त करून बेळगावचे इन्स्पेक्टर मि. इनामदार यांच्या ताब्यात दिला. ज्यावेळी मि. बुरजी यांनी या प्रकरणाची पूर्ण चौकशी

करून हा माल पाटणेकर यांच्याकडे परत करावा असा रिपोर्ट दिला. परंतु हा माल पाटणेकर यांच्या ताब्यात न देता तो माल नाशवंत आहे म्हणून इनामदार यांनी लिलावात काढला त्यामुळे या व्यापाऱ्याचे आर्थिक नुकसान झाले. ही सर्व हकीकत बेळगाव समाचार' या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. हा राग धरून इनामदार या इनेस्पेक्टरनी संपादक श्री. शंकरराव परूळकर यांना १२९ कलमाखाली अटक केली. व १२ मे १९४३ रोजी जामिनावर सुटका करण्यात आली तथापि श्री पाटणेकर व पाच गाडीवान यांच्यावर ती ३१ मे १९४३ रोजी मा. स. कलम ८१/४ खाली (माल परहद्दीत नेल्याबद्दल) खटला घालण्यात येऊन अटक केली. व १४ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांची मुक्तता झाली. परंतु या सर्व प्रकरणात नाहक त्रास व आर्थिक नुकसान झालेल्या पाटणेकर यानी क्रि. प्रा. कलम २५० खाली नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. बेळगावच्या सर्व वृत्तपत्रानी ही मागणी उचलून धरली पण ही मागणी कोर्टाने अमान्य केली. शेवटी सेशन कोर्टाकडे हे अपीलपत्र दाखल करून दाद मागितली' या प्रकरणात झालेल्या अन्यायाविरूध्द 'तरूण भारत' ने प्रशासनाला व पोलीस यंत्रणेला दोष दिला आहे. 'सरकारने फेरविचार करावा ! गुन्हा ठरण्यापूर्वीच शिक्षा ! न्याय की सुलतानशाही, झालेली सर्व नुकसान भरपाई बेपर्वाई पोलीस अधिकाऱ्यानी भरून दयावी. अशा शब्दात फटकावरून अन्यायाविरूध्द दाद मागण्याचे धाडस दाखविले आहे.[१६७]

५)गर्लगुंजी खुन खटला :–

गर्लगुंजी ता. खानापूर येथे झालेल्या विठ्ठल खेतरी यल्लारी या तरूणाचा मृत्यु सर्पदंशाने झालेला नसून तो घडवून आणलेला खून आहे. 'तरूण भारत' च्या या बातमीने खळबळ उडाली व त्या दिशेने चक्र फिरू लागली.[१६८]

मयत विठ्ठल याचा खून २८ फेब्रुवारी १९५४ रोजी त्याचा भाऊ हणमंता व मयत विठ्ठलची बायको रूक्मिणी यानी घडवून आणला असा जबाब सदर हणमंत याची बायको रामाक्का हिने मॅजिस्ट्रेट कोर्टास शपथेवर दिली. साक्षिपुराव्याची सर्व हकीकत 'तरूण भारत' ने १६ मार्चच्या अंकात देऊन या खून खटलातील आरोपीना शिक्षा झाली पाहिजे. याबाबत झोड उठवली या खुनामागे खुनी आणि पोलीस यंत्रणा यांच्यात साटे–लोटे आहे हे स्पष्ट केले. प्रेताच्या अंगावरील जखमा पाहिलेले लोक आहेत असे असताना पोलिसाना या गुन्हयाचा पुरावा मिळत नाही म्हणून गुन्हेगारास अटक नाही, आणि गुन्हेगारास अटक नाही म्हणून साक्षीदार पुढे

येत नाहीत, असे हे दृष्टचक्र आहे हे संपले पाहिजे. या प्रकरणातून पोलीस व्यवस्था जबाबदार असल्याचे पुढे येते. पण 'तरूण भारत' च्या रेठयामुळे आरोपी अटक होऊन खटला चालू झाला. साक्षीपुरावे तपासून शेवटी ओरीपीना संशयाचा फायदा देऊन सोडून दिले.[१६९]

६) बिनबुडाचे खटले–

'बिनबुडाचे व भोंगळ स्वरूपाचे खटले घालण्यात सार्वजनिक वेळेचा व सरकारी पैशांचा होणारा अपव्यय ! सरकारने याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे' या संपादकीय लेखात बेळगाव येथील सराफ रेवणकर यांच्यावर मुंबई सावकार नियंत्रण कायद्याखाली भरण्यात आलेला खटला ३६ दिवस चालून निकाल लागला. या खटल्यातील आरोपी निर्दोष मुक्त झाला. म्हणून या खटल्याबाबत 'तरूण भारतकार म्हणतात' 'ज्यांनी या गुन्हाची चौकशी कित्येक महिने करून सावकारी नियंत्रण कायद्याखाली खटला घातला ते सी. आय. डी. इन्स्पेक्टर श्री. बी. आर. होसमनी यांनी गुन्हेगाराची चौकशी करून खटला दाखल केला आहे.' 'या तरे चे अर्धे–कच्चे व सबळ पुरावा नसलेले खटले भरण्यात सार्वजनिक वेळेचा अपव्यथ होत आहे. याचा सरकारने गंभीरपणे विचार केला पाहिजे आणि वरील प्रकारचे बिनबुडाचे` खटले घालण्यास अधिकारी जबाबदार आहेत. त्यांना जाब विचारला पाहिजे.'[१७०]

७)बेळगाव जिल्हयातील सन १९५१ ते ५५ या काळातील गुन्हयांची नोंद –

अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' ६ सप्टेंबर १९५५ च्या अंकात बेळगाव जिल्हयातील खुनाच्या चार वर्षाच्या काळातील नोंदी देऊन गुन्हयाचा तपास किती प्रयत्नात झाला याची माहिती दिली आहे. सन १९५१ ते ५५ गुन्हयांची नोंद व तपास पुढीलप्रमाणे

	तालुका	१९५१		१९५२		१९५३		१९५४		१९५५	
		गुन्हयाची नोंद	गुन्हयाचा तपास	गुन्हयाची नोंद	गुन्हयाचा तपास	नोंद	तपास	नोंद	तपास	नोंद	तपास
१	बेळगांव	१४	९	१९	१७	१८	९	५	१	७	७
२	खानापूर	७	४	१०	८	१०	५	८	५	५	३
३	चंदगड	१	१	--	४	४	३	५	४	२	१
४	बैलहोंगल	२६	१८	२१	२९	२९	२५	२७	२२	१७	९
५	सौदंत्ती	१२	९	८	२०	२०	१७	१३	१२	११	८
६	रामदुर्ग	१०	७	७	८	८	६	१७	१४	१	१
७	अथनी	१६	१४	१५	१४	१४	१३	१५	१४	५	४
८	गोकाक	२४	२१	१७	२२	२२	१९	२४	२०	१२	१०
९	चिकोडी	८	४	१९	८	८	६	११	९	१०	८
१०	हुक्केरी	८	७	५	९	९	९	९	८	५	८
११	रायबाग	२	२	२	८	८	७	९	७	३	३
	११	१२८	९६	१३७	११९	१५०	११९	१४२	११६	७८	५८

या तक्त्यावरून दरवर्षी गुन्हयाच्या स्वरूपात भरपडून वाढतच आहेत, त्याच बरोबर संपादक मत नोंदवताना म्हणतात 'पोलीस स्टेशन पर्यंत आलेले सर्वच गुन्हे नोंद होत नाहीत. पोलीसांच्याकडून दिरंगाई होत असते. त्यामुळे बऱ्याच गुन्हयात गुन्हेगाराना आश्रय मिळतो व त्या गुन्हेगाराचे फावते यामुळे सर्व सामान्य लोकांना हे नको असतात शेवटी कांही लोक हे निमूटपणे अन्यायने अत्याचार सहन करत जगत असतात.'[१७१]

२.२.२.१६ भ्रष्टाचार –

भ्रष्टाचार हा प्रत्येक क्षेत्रात भिडलेला आहे. हया भ्रष्टाचाराच्या घटनेत सारा हिंदुस्थान झाकाळला जाण्याची शक्यता आहे. या भ्रष्टाचारावर लक्ष ठेवण्यासाठी लोकजागृतीची चळवळ व वृत्तपत्राची भूमिका महत्वाची आहे. हे जाणून 'तरूण भारत' कायम जागृततेने समाजातील घडणाऱ्या घटनांच्या बरोबरीने भ्रष्ट आचार विचार यांना थारा न देता प्रखरपणे विरोधी लेखन केले. भ्रष्टाचाराला समाजमान्यता न देता मुळातून विरोधच दर्शविला. असे प्रकार ज्यावेळी समाज व प्रशासनात घडत असतात त्यावेळी वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर घटनेची सविस्तर प्रसिद्धी देत. अशा प्रकारे कोणत्याही व्यक्तीची किंवा खात्याची भिड न राखता वाभाडे काढले आहेत.

पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराचा वेगळा प्रकार बनावट आरोपीस पुढे करून कोर्टाच्या डोळयात धूळ फेकण्याची पोलिसांची अक्षम्य गुन्हेगारी १९ जानेवारी रोजी कॅन्टोन्मेंट ज्युडि. मॅजिस्ट्रेट यांच्या कोर्टात एक अत्यंत खळबळजनक घटना समोर आली. आरोपी ओमाणा बिर्जे यांना दारूबंदी कायद्याच्या खाली फौजदारी खटला सुनावण्यासाठी कोर्टापुढे हजर करण्यात आले. या खटल्याखाली तो मुळात हजर नव्हताच. दुसऱ्याच इसमाला पोलीसानी हजर करून त्यांने ओमाना हे नाव सांगून गुन्हा कबूल केला होता. त्याला ७५ रुपयाच्या दंडाची शिक्षा झाली. झालेला प्रकार ओमानाच्या लक्षात आला. पोलीसानी कोर्टाच्या डोळयात धुळ फेकून आर्थिक बाबतीत आपल्याला लुटल्याचे समजले. ही बातमी तरूण भारतने पुराव्यानिशी इसमाचे उघड नाव घेऊन प्रसिध्द केली. पोलीस यंत्रणेतील लाजीरवाणे प्रकार सर्वांच्या लक्षात आणून दिले. त्याच बरोबर न्याय व्यवस्थेतील त्रुटी समाजासमोर आणल्या. हे धाडस फक्त 'तरूण भारत' करू शकत होते याची प्रचिती येते.[१७२]

सि. हॉस्पिटलमध्ये सब चार्ज डॉक्टर श्री. टी. पी. श्रावणे यास दारू गुन्हयाच्या एका खटल्याच्या साक्षीबाबत १० रु. ची लाच स्विकारण्याच्या आरोपाखाली ॲन्टी करप्संन खात्याचे सब इन्स्पेक्टर श्री. एन. जी. नाईक यानी रंगेहाथ पकडले. या घटनेमुळे बेळगावात खळबळ माजली. अशा आशयाची बातमी देऊन पकडणाऱ्या अधिकाऱ्याचे कौतूक करून लाचखोर अधिकाऱ्याचे धिंडवडे काढले आहेत.[१७३]

२५ जून १९३७ च्या अंकात म्यु. पालटी कारभारातील गैर कारभाराकडे बोट दाखवून टीका केली 'लबाडीच्या व लुटमारीच्या कारभारावर 'तरूण भारत'ने पाडलेला झगझगीत प्रकाश!' सिध्द साधक सग्यासोयरांची गटबाजी व म्यु. पालटीतील अंतर्गत व्यापार ६०० रु ची जागा म्यु. पालटीने १४०० रुपयात खरेदी केली, आणि ८०० रु मधल्यामध्ये गडप झाले. 'तरूण भारताने' हे प्रकरण धसास लावले. आणि म्यु. पल सभासदाना पैसे भरावे लागले! पुढे अध्यक्षाना संबोधून म्हणतात, 'बोला गजाननराव भातकांडे अखेर विजय कोणाचा झाला आणि खूर्ची कोणाची गेली'[१७४] अशा मथळयाच्या बातम्या देत. स्थानिक राज्यकारणात बारकाईने लक्ष ठेऊन भ्रष्टाचारी व्यक्तीच्या नावानिशी त्यांच्या कर्तृत्त्वाचा पंचनामा सर्वांच्यासमोर मांडत असत. त्यामुळे राजकारणी लोकांच्या मनात एक प्रकारची धडकी निर्माण होत असे. या प्रकरणानंतर बेळगांव म्यु. पालटीच्या सभेत 'तरूण भारत' विरोधी निषेधाचा ठराव मंजुर करण्यात आला. या ठरावाबाबत १७ जुलै ५८ च्या अंकात 'निषेधाचे असले छपन्न ठराव झाले, तरी तरूण भारत आपला बाणेदारपणा सोडणार नाही! म्यु. पालटीत शिमगा केला हे मान्य पण शिमग्याचा वृत्तांत तुम्ही का छापलात ? 'ज्यांनी ठराव आणला त्यांनी 'तरूण भारत' चा नाही स्वतःचा निषेध करून घेतला आहे. म्यु. पालटीत संधी साधूपणा ही धर्म आणि चारित्र्य हा दोष ? लाचार माणसा यापेक्षा तुझे अधिक अंधःपतन ते कोणते. असे कितीही ठराव मंजूर करा 'तरूण भारत' फिकीर बाळगणार नाही आणि जे सत्य असेल ते निर्भिडपणे सांगण्यासाठी कचरणार नाही.'' अशा बाणेदार पध्दतीने विरोधकाना, भ्रष्ट प्रवृत्तीना न डगमगता प्रतित्तोर दिले आहे.[१७५]

२.२.२.१७ महागाई विरोधात मांडलेली भूमिका –

'सरकारच्या बेफिकीर वृत्तीमुळे शेतकऱ्यांच्यावर महागाई कोसळती' अशा प्रकारचा आरोप करून सरकारच्या निष्क्रिय वृत्तीची जाणीव दाखवून दिली आहे. ग्रामोद्योगाच्या सुधारणा

मोहिमेमुळे शेतकरी वर्ग जागा झाला आहे. कष्ट करून आधुनिक पिके घेऊ लागला आहे. पण त्यांच्या मालाला म्हणावा तसा उठाव नाही. कारण वाहतुकीची साधने अपुरे आहेत. त्याच बरोबर रेल्वे व्यवस्था ही युध्द साहित्य ने आण करण्यात गुंतली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा माल अडकून पडला आहे आणि त्यात भर आहे महागाईची तेव्हा या सरकारच्या धोरणाला सर्वसामान्य जनतेकडून विरोध होत आहे. या सर्व परिस्थितीला सरकारच जबाबदार आहे. अशा शब्दात सरकारला जाब विचारलेला आहे.[१७६] पुढील एका लेखात 'देशात जे थोडे भांडवलवाले श्रीमंत लोक आहेत त्यांच्याच दृष्टीने सरकार अद्याप विचार करत आहे. गरिबांची दुःखासह परिस्थिती सरकारास मुळीच आकलन करता येत नाही. बहुजन समाजाला नित्याच्या गरजेच्या वस्तू योग्य भावात कशा मिळतील याची तजवीज करणे, सरकारचे आद्य कर्तव्य आहे ! या कर्तव्यास सरकार चुकेल तर त्याचे अनर्थ केव्हाही टळणार नाही !' असा इशारा या लेखात दिला आहे.[१७७]

कापड धंदयातील नफेबाजीचा कडेलोट ! गिरणी–मालक, मॅनेजिंग एजंट ठोक व्यापारी व अधिकारी यांच्या संगनमताने चाललेली जनतेची भयाने लूट! हे थाबवण्यासाठी सरकारने गिरण्या आपल्या मालकीच्या कराव्यात ! अशा आशयाचा लेख देऊन सर्वाच्या संगनमताने प्रजेची लूट होत आहे हे मांडले आहे. जनतेसाठी राष्ट्राने आपल्या मालकीचे उद्योगधंदे उभा करावेत असा सल्ला दिला आहे.[१७८]

वीज बोर्डाने चालविली ग्राहकांची राजरोज लूट ! अकार्यक्षम कारभार आणि खंडित वीजपुरवठयामुळे लोक हैराण झाले आहेत. वीजपुरवठयाच्या काळयाबाजारात सरकारच जबाबदार आहे ! याला संघटितपणे उठाव केल्या खेरीज विजबोर्ड ताळयावर येणार नाही ! वाढीव बिजबिले आकारणीला आळा बसणार नाही.[१७९]

बेळगाव नगरपालिकेने वाढविलेल्या घरपट्टीच्या ओझ्याखाली दबलेला नागरिक या महागाईत जगणे मुश्कील! त्याच्यावर शिक्षण, लायब्ररी, आरोग्य विषय लादलेले नवे कर हे अन्यायाकारक व बेकायदेशीर आहेत. ! म्हणून हे कर नाकारण्याचा नागरिकांना हक्क आहे ! या नव्या कराच्याविरूध्द संघटितपणे झगडा करावा लागणार! या महागाईच्या प्रसंगी वाढवलेली बेकायदेशीर करवाढ अन्यायकारक असून नागरिकांना न परवडणारी आहे ती मागे घेण्यात यावी, अशा प्रकारची विनंती केली आहे.

'भाववाढीने गती घेतल्यास देशापूढे कठीण प्रसंग उद्‌भवेल' सार्वजनिक कारभारात काटकसर व उत्पादनासाठी झंझावाती चळवळ, हा महागाईला आळा घालण्याचा एकमेव मार्ग आहे. जनतेनेच या कार्याचा उठाव केला पाहिजे. असे त्यांचे मत होते.[१८०]

'महागाई भ्रष्टाचार, लाचलुचपत थांबली नाही, तर देशात क्रांती होईल! वाढती महागाई आणि सरकारी करवाढ याखाली लोक चिरडले जात आहेत. अधिकाऱ्यांनी लोकांच्या सहनशीलतेच्या मर्यादा ओळखल्या पाहिजे. तरच समाजात सुव्यवस्थेचे व लोकशाहीचे वातावरण तयार होईल' असा सरकाला गंभीर इशारा दिला आहे.[१८१] वीज कंपनीच्या बेदरकारपणावर प्रकाश टाकताना 'नागरिकांच्या लुबाडणूकीला वीज कंपनीचा आणि सरकारची निष्क्रियताच जबाबदार आहे. 'केवळ कायदे करून लोककल्याण साधता येणार नाही. त्यासाठी सदभावनापूर्वक कायद्याचे पालन व अंमलबजावणी झाली पाहिजे.'[१८२]

स्वस्त धान्य दराच्या दुकानात आवश्यक त्या प्रमाणात सरकार अन्नधान्य उपलब्ध करून देत नाही. त्यामुळे गोरगरिंबांना कमी किंमतीत अन्नधान्य मिळणे केवळ स्वप्न असल्याचे म्हटले आहे. यासाठी कठोर धोरण स्वीकारून अन्नधान्याच्या किंमती कमी झाल्या पाहिजे. तसे न झाल्यास जनतेत असंतोष पसरेल असे स्पष्ट केले आहे.[१८३]

सततच्या वाढत असणाऱ्या भाववाढीला रोखण्यासाठी जनतेनेही पुढाकार घेणे महत्त्वाचे असल्याचे 'तरूण भारत' च्या अंकात नमूद केले आहे. यासाठी 'सहकारी ग्राहक वस्तू भांडारची' उभारणी ग्रामीण भागात तसेच नागरी भागात अधिक प्रमाणात होणे महत्त्वाचे आहे. यासाठी या वृत्तपत्राने जनजागृती घडवून आणली होती.[१८४]

शेतकऱ्याच्या पिकांना व अन्नधान्यांना खर्चाच्या प्रमाणात योग्य तो भाव दिला पाहिजे. नाही दिल्यास शेतकरी वर्ग कर्जबाजारी होईल. धान्य कमी पिकल्यास धान्याची टंचाई होईल व दर आणखी वाढतील शिवाय काळ्या बाजाराचे संकट निर्माण होईल. न्याय अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल म्हणून शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनाच्या खर्चावर भाव उपलब्ध करून देण्याचे सरकारचे कर्तव्य आहे, असे म्हटले आहे.[१८५]

२.३ समारोप

'तरूण भारत' वृत्तपत्राच्या सामाजिक कार्यात ग्राम, आरोग्य, शेतकऱ्यांच्या विषयीच्या सुधारणा, सार्वजनिक सुधारणा, पाण्याच्या सोयी, विहीरी व तलाव खोदणे इत्यादी कार्याचा

समावेश झालेला असून ही कामे यशस्वीपणे पार पाडलेली आहेत. त्याच बरोबर अंधश्रध्दा, अस्पृश्यता निर्मूलन, मंदिर प्रवेश चळवळ, जातीय सलोखा, स्त्री विषयक, महागाई, भ्रष्टाचार, मद्यपान निषेध व कोर्ट कचेरी इत्यादीचा समावेश या घटकामध्ये केलेला आहे.

'तरूण भारत' वृत्तपत्राने नागरिकांची दैनंदिन गाऱ्हाणी चव्हाटयावर मांडून ती दूर करण्यासाठी प्रयत्न केले. जनतेवर होणार जुलूम तो कोणत्याही स्वरूपाचा व प्रकाराचा असो त्याविरूध्द सडेतोड मत मांडण्यात व पाठपुरावा करण्यात 'तरूण भारत' कायम आघाडीवर असे. म्यु. पालिटी, लोकलबोर्ड, ग्रामपंचायती, सहकार वगैरे स्थानिक संस्थातील भ्रष्टाचार जनतेवरील होणारे अन्याय व पक्षपातीपणा याबाबत प्रसंग पडेल तेव्हा लेखणी उचलेली आहे. तसेच या विभागात व देशात लोकशाही शुध्द स्वरूपाची राहावी म्हणून जागृतेने विचार मांडले आहेत.

या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबुराव ठाकुर यानी सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याची ताकद दाखवून दिली. निपाणी जवळील पांगिरे येथील काशिबाई हणबंर अत्याचार प्रकरण उचलून धरून अन्यायाला वाचा फोडली. या प्रकरणावर खास अंक देखील प्रकाशित केला. परिणामी गुन्हेगाराला शिक्षा झाली, ज्योती रामा राजगीरे व शामराव देशमुख अशी प्रकरणे बाबुराव ठाकुर यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून गाजवली. सर्वसामान्यांना लहान कुटुंबाचे महत्व पटवून देण्यासाठी कुटुंब नियोजन या विषयावरील स्वतंत्र पुरवणी काढली. त्यांनी वेगवेगळ्या तत्कालिन घटनांवर व विषयावर अग्रलेख लिहिले या त्यांच्या कार्यातून एक उत्तम आदर्श पत्रकार संपादक कसा असावा हा आदर्श तरूण पत्रकाराना व संपादकांना घालून दिला आहे.

'तरूण भारत' ने सर्वसामान्य माणसाच्या प्रतिक्रियांना वाचकांची पत्रे व बातमीपत्रे इत्यादी सदराद्वारे स्थान प्राप्त करून दिले. वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या अंगाने केलेली पत्रकारिता व त्यातून दिसणारा अष्टपैलू व सत्याची कास धरणारा पत्रकार होता. अग्रलेख असो किंवा वाचकांची पत्रे, लेख, बातमीपत्रे यातून बाबुरावाची पत्रकाराची दृष्टी दिसून येते. उत्कृष्ट संपादक ते उत्कृष्ठ कार्यकर्ता, पत्रकार, राजकारणी, समाजकर्ता व शिक्षणसम्राट इत्यादी भूमिका त्यांनी बजावली पत्रकाराकडे आवश्यक असणाऱ्या सर्व गुणांचा त्याच्या ठायी समावेश होता हा त्यांचा एक समाजाच्या दृष्टीने आदर्श गुण होता, असे म्हणावे लागेल.

संदर्भ सूची

१) साप्ताहिक 'तरूण भारत', २८ मे १९४०, पृ. ४

२) साप्ताहिक 'तरूण भारत', २५ एप्रिल १९४०, पृ. ४

३) साप्ताहिक 'तरूण भारत', २१ जोनवारी १९४१, पृ. ३

४) किता, पृ. ९

५) साप्ताहिक 'तरूण भारत', २८ जानेवारी १९४१, पृ. ७

६) साप्ताहिक 'तरूण भारत', १५ एप्रिल १९४१, पृ. ४,५

७) साप्ताहिक 'तरूण भारत', १३ फेब्रुवारी १९३४,पृ. ३,५

८) साप्ताहिक 'तरूण भारत', २७ मार्च १९३४, पृ. ८

९) साप्ताहिक 'तरूण भारत', २० फेब्रुवारी १९३४, पृ. ४

१०) साप्ताहिक 'तरूण भारत', २२ जानेवारी १९३५, पृ. २

११) साप्ताहिक 'तरूण भारत', ५ फेब्रुवारी १९३५, पृ. ८

१२) साप्ताहिक 'तरूण भारत', १५ जुन १९३७, पृ. ४

१३) साप्ताहिक 'तरूण भारत', १७ मे १९३८, पृ. ५

१४) साप्ताहिक 'तरूण भारत', १८ जानेवारी १९३८, पृ. ५

१५) दै. 'पुढारी कोल्हापूर', २५ मे १९४८,पृ. १

१६) साप्ताहिक 'तरूण भारत', १ जुन १९४८ ,पृ. २

१७) साप्ताहिक 'तरूण भारत', ३० जुलै १९२९, पृ. ६

१८) साप्ताहिक 'तरूण भारत', १ मे १९३४, पृ. १

१९) साप्ताहिक 'तरूण भारत', १४ ऑगस्ट १९३४, पृ. ४

२०) साप्ताहिक 'तरूण भारत', १६ ऑगस्ट १९३८, पृ. ४

२१) साप्ताहिक 'तरूण भारत', १० ऑक्टांबर १९३९, पृ. ४

२२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २५ जुलै १९३९, पृ. १०

२३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, १९ ऑक्टोंबर १९४३, पृ. २

२४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ३० नोव्हेंबर १९४३, पृ. १

२५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ४ जानेवारी १९४४, पृ. १

२६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ११ एप्रिल १९४४, पृ. २

२७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २१ नोव्हेंबर १९४४, पृ. १

२८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ५ फेब्रुवारी १९४५, पृ. २

२९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ६ मार्च १९४५, पृ. २

३०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ८ मे १९४५, पृ. ४

३१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २२ जुलै १९४७, पृ. ४

३२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, १८ मे १९४६, पृ. २

३३) दै. 'तरूण भारत', १६ जानेवारी १९७०, पृ. २

३४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २९ ऑक्टोंबर १९२९, पृ. १३

३५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ७ नोव्हेंबर १९३३, पृ. ११

३६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव , २२जानेवारी १९५८, पृ. ३

३७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ११ मार्च १९५८, पृ. २

३८) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव , १४ मार्च १९५८, पृ.२

३९) माजगावकर ग., ग्रामदानाची प्रयोगभूमी, ब. ओ. पुरंदरे प्रकाशन, पुणे' १९५८,पृ.३७

४०) भाऊ पानसे, महाराष्ट्रात विनोबा, ग्राम सेवा मंडळ परधाम विद्यापीठ, पो. पवनार, जि. वर्धा,१९५८,पृ. ८७

४१) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' २३ ऑगस्ट १९६०, पृ.३

४२) श्री. रानाप्पा गुंडू शिंदे, मु. बिजूर, मुलाखत, वय वर्षे ७५, २२ ऑगस्ट २०१३, दुपारी ३ वाजता.

४३) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', २३ ऑगस्ट १९६०, पृ.३

४४) श्री. धनाजी रागोबा पाटील, बिजूर ग्रामस्थ, वय वर्षे ७८, मुलाखत, ६ मे २०१३, दुपारी ३ वाजता.

४५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २६ नोव्हेंबर १९४९, पृ. २

४६) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', ९ ऑगस्ट १९६०, पृ. २

४७) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', २३ सप्टेंबर १९४९, पृ. २

४८) दै. 'तरूण भारत', २७ जुन १९७३, पु. २

४९) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' १३ सप्टेंबर १९६०, पृ. २

५०) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' ६ डिसेंबर १९४९, पृ. १

५१) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' ४ फेब्रुवारी १९३६, पृ. २

५२) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' ४ जुलै १९४४, पृ. २

५३) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत' १८जुलै १९४४, पृ. २

५४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ३ जुन १९३०, पृ. २

५५) दै. तरूण भारत', १५ जानेवारी १९७८, पु. ३

५६) दै. तरूण भारत', १७ जुन १९७६,पु. २

५७) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', ८ एप्रिल १९४१, पृ. ९

५८) दै.'तरूण भारत' बेळगांव, गडहिंग्लज कार्यालय वर्धापनदीन विशेशांक, २१ जाने. २००९

५९) साप्ताहिक 'तरूण भारत', ८ एप्रिल १९४१, पृ. ४

६०) किता, पृ. ५

६१) साप्ताहिक 'तरुण भारत', २३ नोव्हेंबर १९६४, पृ. ४

६२) साप्ताहिक 'तरूण भारत', २७ ऑगस्ट १९२९, पृ. ४

६३) साप्ताहिक 'तरूण भारत', २६ नोव्हेंबर १९२९, पृ. २

६४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २७ एप्रिल १९५६, पृ. ६

६५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २७ नोव्हेंबर १९५६, पृ. ६

६६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', ३ डिसेंबर १९४६, पृ. ४

६७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', १७ डिसेंबर १९४६, पृ. ४

६८) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २१ जुलै १९५९, पृ. १

६९) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', ४ मार्च १९४१, पृ. ३

७०) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २२ ऑगस्ट १९४४, पृ. ४

७१) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', ३ मार्च १९३६, पृ. ८

७२) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २ जानेवारी १९४५, पृ. ३

७३) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', ५ नोव्हेंबर १९३५, पृ. ५

७४) किता, पृ. ४

७५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २१ ऑगस्ट १९४५, पृ. २

७६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २२ ऑगस्ट १९५०, पृ. २

७७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २० डिसेंबर १९६८, पृ. १

७८) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', १ ऑक्टोंबर १९४९, पृ. २

७९) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', १ मे १९३४, पृ. ४

८०) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', १० ऑगस्ट १९३७, पृ. ९

८१) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', ४ मे १९४८, पृ. २

८२) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', ६ मे १९४९, पृ. ३

८३) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', १६ जुन १९५०, पृ. २

८४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', २२ मार्च १९५५, पृ. २

८५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव १ ऑक्टोंबर १९४६ पु. ४

८६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव,३ ऑगस्ट १९४८, पृ. ४

८७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २८ डिसेंबर १९५४, पृ. ३

८८) दै 'तरूण भारत', ७ ऑगस्ट १९६८, पृ.२

८९) दै 'तरूण भारत', २० जुन १९७३, पृ.२

९०) दै 'तरूण भारत', ७ ऑगस्ट १९६८, पृ.२

९१) दै 'तरूण भारत', ६ डिसेंबर १९६६, पृ.४

९२) दै 'तरूण भारत', २१ मे १९६३ ,पृ.१

९३) दै 'तरूण भारत', १८ नोव्हेंबर १९६६, पृ.२

९४) दै 'तरूण भारत', २६ नोवहेंबर १९६६, पृ.२

९५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, १८ सप्टेंबर १९५६, पृ.. २

९६) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १८ मार्च १९४१, पृ.. १

९७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, ३० नोव्हेंबर १९५४, पृ.. २

९८) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, ९ जानेवारी १९५१, पृ.. १

९९) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २० ऑगस्ट १९३५ ,पृ.. ४

१००) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २१ डिसेंबर १९४६, पृ..२

१०१) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १७ सप्टेंबर १९६८, पृ. २

१०२) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १८ फेब्रुवारी १९४१, पृ. १०

१०३) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २६ मे १९४२ पृ. ४

१०४) साप्ताहिक 'तरूण भारत', २९ ऑक्टोंबर १९३०,पृ. १२

१०५) साप्ताहिक 'तरूण भारत', ३ सप्टेंबर १९२९, पृ. १

१०६) साप्ताहिक 'तरूण भारत', १७ ऑक्टोंबर १९३३, पृ. ५

१०७) साप्ताहिक 'तरूण भारत', १ एप्रिल १९४१, पृ. ३

१०८) शानबाग आर. डी., उपरोक्त, पृ. ७२

१०९) दै.'तरूण भारत' १५ डिसेंबर १९७६, पृ. ६

११०) साप्ताहिक 'तरूण भारत', २ जानेवारी १९३४, पृ. २

१११) साप्ताहिक 'तरूण भारत', ११ मार्च १९४७, पृ. २

११२) साप्ताहिक 'तरूण भारत', १६ मार्च १९५४, पृ. २

११३) दै.तरूण भारत' बेळगाव, ८ ऑक्टोबर १९७५, पृ. ८

११४) साप्ताहिक 'तरूण भारत', २४ सप्टेंबर १९३५, पृ. ५

११५) दै. 'तरूण भारत', ५ ऑगस्ट १९७८, पृ. ६

११६) साप्ताहिक 'तरूण भारत', ३ ऑक्टांबर १९३३, पृ. ४

११७) साप्ताहिक 'तरूण भारत', ७ सप्टेंबर १९३७, पृ. ७

११८) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', ११ एप्रिल १९५८, पृ. १

११९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १७ ऑक्टोंबर १९३३, पृ. २

१२०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, १३ जून १९३३, पृ. २

१२१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २३ मे १९३३, पृ. २

१२२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २८ मे १९३३, पृ. २

१२३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २८ मार्च १९३३, पृ. ३

१२४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ७ मार्च १९३३, पृ. ४

१२५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ३१ जानेवारी १९३४, पृ. ४

१२६) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १८ सप्टेंबर १९३४, पृ. ७

१२७) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, ४ मार्च १९४४, पृ. ३

१२८) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २८ सप्टेंबर १९४३, पृ. २

१२९) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २ एप्रिल १९३५, पृ. ४

१३०) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, ९ जानेवारी १९३४, पृ. ४

१३१) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १९ जून १९३३, पृ. २

१३२) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १३ मे १९४७, पृ. २

१३३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ९ जून १९३३, पृ. २

१३४) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २९ एप्रिल १९४७, पृ. २

१३५) किता पृ. १

१३६) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २७ एप्रिल १९५१, पृ. ६

१३७) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, १९ नोव्हेंबर १९५४, पृ. २

१३८) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', ११ डिसेंबर १९५६, पृ. १,३

१३९) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', २९ सप्टेंबर १९३१, पृ. २

१४०) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', १७ फेब्रुवारी १९४८, पृ. २

१४१) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', २३ एप्रिल १९३५,

१४२) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', २६ फेब्रुवारी १९३५, पृ. ४

१४३) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', १८ सप्टेंबर १९३४, पृ. ४

१४४) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', ७ सप्टेंबर १९३७, पृ. ५

१४५) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', १५ जून १९५१, पृ. २

१४६) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, दि. १ नोव्हेंबर १९३८, पृ. १३

१४७) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', ११ जानेवारी १९६३, पृ. ४

१४८) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', बेळगांव, २५ जुन १९३५, पृ. २

१४९) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', १६ एप्रिल १९४०, पृ. २

१५०) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', १६ एप्रिल १९४०, पृ. २

१५१) अर्धसाप्ताहिक 'तरूण भारत', १३ मे १९४९, पृ. १

१५२) दै. 'तरूण भारत', बेळगाव, १५ नोव्हेंबर १९६८, पृ.३

१५३) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ३ एप्रिल १९७५, पृ.२

१५४) दै. 'तरूण भारत', बेळगाव, २४ मार्च १९७६, पृ. ४

१५५) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ३० मार्च १९६८, पृ. २

१५६) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, १९ सप्टंबर १९३९, पृ.४

१५७) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, फाईल १९४४ ते १९४८

१५८) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, ३० सप्टेंबर १९५२, पृ. १

१५९) सुंठणकर बा. र, स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकुर, तृतीय स्मृतिदीन विशेषांक, २३ एप्रिल १९८२, पृ.२

१६०) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, ३ ऑक्टोंबर १९५२, पृ. १

१६१) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, ७ ऑक्टोंबर १९५२, पृ. १

१६२) साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, ४ फेब्रुवारी १९५३, पृ. २

१६३) प्रभू प्रिया, समरांगण हे जीवन त्यांचे, उपरोक्त, पृ. ४५

१६४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, १९ सप्टेंबर १९६१, पृ. ५

१६५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, २२ सप्टेंबर १९६१, पृ. १

१६६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, २२ एप्रिल १९६२, पृ. १

१६७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, २८ मार्च १९४३, पृ. ४

१६८) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, १६ मार्च १९५४, पृ. १

१६९) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, १ मार्च १९५५, पृ. १

१७०) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, १० डिसेंबर १९५४, पृ. २

१७१) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, ६ सप्टेंबर १९५५,पृ.२

१७२) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, २३ जानेवारी १९५४, पृ. २

१७३) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, २२ जानेवारी १९५४, पृ. २

१७४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, १७ जुलै १९५८, पृ. ३

१७५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत', बेळगाव, २२ जुलै १९५८, पृ. ५

१७६) साप्ताहिक 'तरूण भारत', २१ फेब्रुवारी १९४१, पृ. ३

१७७) साप्ताहिक 'तरूण भारत', २० जानेवारी १९४७, पृ. २

१७८) साप्ताहिक 'तरूण भारत', २८ जानेवारी १९४७, पृ. २

१७९) साप्ताहिक 'तरूण भारत', ६ फेब्रुवारी १९७२, पृ. २

१८०) साप्ताहिक 'तरूण भारत', २६ ऑगस्ट १९६७, पृ. २

१८१) अर्ध साप्ताहिक, २ एप्रिल १९६३, पृ. २

१८२) अर्ध साप्ताहिक, १२ फेब्रुवारी १९६३, पृ. १

१८३) अर्ध साप्ताहिक, १४ ऑक्टोंबर १९६२, पृ. २

१८४) अर्ध साप्ताहिक, ३१ ऑगस्ट १९६६, पृ. ३

१८५) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ६ जानेवारी १९७७, पृ. ४

प्रकरण तिसरे
दै. 'तरूण भारत' चे राजकीय कार्य

३.१ प्रास्ताविक –

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली २० व्या शतकातील पुर्वाधात भारतीय स्वातंत्र्य चळवळ देशव्यापी झाली. हिंदुस्थानच्या विविध प्रांतातून स्थानिक नेतृत्त्व उदयास आले. त्यांनी काँग्रेसचे राजकीय, सामाजिक कार्यक्रम यशस्वीपणे राबविले. स्वातंत्र्य आंदोलनाबाबत बेळगावचा इतिहास प्रसिध्द आहे. दे. भ. गंगाधरराव देशपांडे आणि त्यांचे सहकाऱ्यांनी कर्नाटकात सन १९०५ पासून स्वातंत्र्य संग्रामाची मुहूर्तमेढ रोवली होती. बेळगाव येथे लोकमान्य टिळकांचे अनुयायी तयार झाले होते. २६ नोव्हेंबर १९०७ रोजी लोकमान्य टिळकांनी बेळगावला भेट देऊन क्रांतिकारकांना योग्य सल्ला दिला होता. देशात स्वातंत्र्य लढा तीव्र होत असताना, राष्ट्रीय चळवळी आक्रमक बनल्या होत्या. या सुमाराला आंतराष्ट्रीय स्तरावर पहिले महायुध्द ओसरले होते. अशा वेळी मे, जून १९१९ पासून बेळगाव शहरात 'तरूण भारत' या मराठी भाषिक मासिकाची सुरूवात झाली. या मासिकाने सुरूवातीच्या काळात तरूण विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करणे, देश विधायक कार्यात सहभागी करून घेणे, इत्यादी उद्देश समोर ठेवले होते. त्याचबरोबर देशांतर्गत घडामोडी, स्वातंत्र्य चळवळीची दिशा, राष्ट्रप्रेम अशा प्रकारच्या वेगवेगळ्या वैचारिक लेखांच्या माध्यमातून या मासिकाने समाजात जागृती केली होती. या वृत्तपत्राचा राजकीय घडामोडीचा अभ्यास करताना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ असे दोन भाग पडतात. पहिल्या कालखंडात केवळ स्वातंत्र्य चळवळी व स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः संस्थानच्या विलिनीकरणानंतर देशात, त्याबरोबर बेळगाव विभागात अनेक छोटे–मोठे राजकीय लढे झाले. भारत स्वातंत्र्यानंतर लगेचच महात्मा गांधीजींची हत्या त्यानंतर निर्माण झालेले जाळपोळीचे सत्र, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्न, गोवा मुक्ती संग्राम, चीन युध्दाचे राष्ट्रीय संकट, काश्मिर प्रश्न, भारत देशाचे आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादी प्रस्तुत घटका बाबत दै. 'तरूण भारत' ने स्वीकारलेली भूमिका या प्रकरणात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केली आहे.

३.२ दै. 'तरूण भारत' चे राजकीय कार्य (१९१९ ते १९४८)–

३.२.१ लोकमान्य टिळक व बेळगाव–

लोकमान्य टिळकांच्या कार्याचा वृत्तांत देणारा खास अंक त्यांच्या मृत्यूनंतर नोव्हेंबर १९२० मध्ये प्रकाशित करण्यात आला. या अंकात महाराष्ट्रातील नामवंत लेखकांचे व पुढाऱ्यांचे तरूण पिढींच्या दृष्टीने लोकमान्यांच्या संबंधी लिहिलेले लेख प्रसिध्द केले आहेत. या लेखातून टिळकांचा जीवनक्रम उलगडलेला आहे. हे सर्व लेख अभ्यासपूर्ण आहेत.[१]

लोकमान्य टिळकांचे १ ऑगस्ट १९२० रोजी निधन झाले. सप्टेंबरच्या 'तरूण भारत' अंकात स्वतंत्र पुरवणी काढण्यात आली आहे. या पुरवणीच्या मलपृष्ठावर लोकमान्य टिळकांचा मृतदेहाचे छायाचित्र देऊन देवमान्य बाळ गंगाधर टिळक असे शीर्षक दिले आहे. अखेरचे दर्शन असे म्हटले आहे. त्याखाली 'स्वराज्य' आहे जन्मसिध्द, हा हक्कचि माझा खरा' ! जो नरा केवळ जीवन झरा'! श्री किरात यांच्या ओळी दिलेल्या आहेत. या पुरवणीत लोकमान्य टिळकांची राष्ट्रप्रेमाची संकल्पना व स्वदेश अभिमानाचे मजकूर दिले आहे.[२]

२० जुलै १९०५ रोजी लॉर्ड कर्झनने जनमनाची कदर न करता बंगाल प्रांताची फाळणी केली. परिणामतः या फाळणीमुळे देशभर असंतोषाची लाट निर्माण झाली व यातून वंगभंग आंदोलनाचा जन्म झाला. या आंदोलनाला गती देण्यासाठी लोकमान्य टिळकांनी (१८५६–१९२०) चतुःसुत्री कार्यक्रम स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य जाहीर करताच स्वातंत्र्य चळवळीला उधाण आले.[३] यावेळी बेळगाव भागात गंगाधरराव देशपांडे (१८७१–१९६०) गोविंदराव याळगी (१८८४–१९२३) यांनी संपूर्ण बेळगाव जिल्हयात दौरे काढून व्याख्याने देऊन लोकमान्यांचा कार्यक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहचविला या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून त्यांनी स्वदेशी कापडाचे दुकान (१९०५) स्वदेशी किराणा दुकान (१९०५) व राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रचारासाठी बेळगाव शहरात गणेश विद्यालय (१९०५) सुरू केले.[४] सन १९१६ साली कै. दे. भ दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली बेळगाव येथे एक राजकीय प्रांतिक परिषद भरविण्यात आली. या अधिवेशनाला लोकमान्य टिळक उपस्थित होते. त्यावेळी होमरूल लीगची स्थापना बेळगांव येथे झाली. ही घटना भारतीय स्वातंत्र्य इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.[५] लोकमान्य टिळकांच्या विचार प्रभावाने हा बेळगाव परिसर त्यांच्या कार्याकडे आकर्षित झाला. पुढे या 'तरूण भारत' वृत्तपत्रात लोकमान्य टिळकांच्या

पुण्यतिथी व जयंती निमित्त वेगवेगळ्या विषयावर लोकमान्य टिळकांची प्रेरणा व कार्याची आठवण समाजात बिंबवण्याचा सातत्याने प्रयत्न झाल्याचा दिसतो.[६]

३.२.२ महात्मा गांधी व स्वातंत्र्याची चळवळ –

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर देशाच्या राज्यकारणाची व राष्ट्रीय चळवळीची सर्व सुत्रे महात्मा गांधीजींच्याकडे आली व गांधी युगाची सुरूवात झाली.

३.२.२.१ असहकार चळवळ –

सन १९१८ साली पहिले जागतिक महायुध्द थांबले आणि या काळात भारतीय स्वातंत्र्याच्या आकांक्षाना उधाण आले होते. यावेळी ब्रिटिश सरकारने व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा 'रौलेट ॲक्ट' पास केला (फेब्रुवारी १९१९) आणि पाठोपाठ जालियनवाला बागेतील भीषण हत्याकांड घडवून आणले. (१३ एप्रिल १९१९) खिलाफत चळवळ, सायमन कमिशनचा अहवाल इत्यादी अनेक कारणामुळे सारा हिंदुस्थान हादरला.[७] देशात प्रक्षोभ निर्माण झाला. अशावेळी महात्मा गांधीनी ब्रिटिश सत्तेला असहकार करण्याच्या उद्देशाने सप्टेंबर १९२० च्या कलकत्ता राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींनी असहकाराचा ऐतिहासिक ठराव मंजूर करून घेतला व डिसेंबर १९२० मध्ये नागपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात असहकाराचा निर्णय घेण्यात आला.[८]

त्यामध्ये सरकारी शाळा–कॉलेजवर बहिष्कार टाकावा, सरकारी कोर्ट–कचेरीवर बहिष्कार टाकावा, सरकारने दिलेल्या पदव्यांचा त्याग करावा, सर्व सरकारी समारंभ व कायदे मंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालावा, ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा, हिंदू–मुस्लीम यांच्यात ऐक्य रहावे, स्वदेशी वस्तू व उद्योगधंद्याना उत्तेजन द्यावे, दारूबंदी प्रचार करणे इत्यादी ठराव मांडण्यात आले.[९]

'राष्ट्रीय सप्ताह साजरा करा![१०] या अग्रलेखात' ६ एप्रिल १९१९ रोजी सर्व देशभर स्वयंस्फूर्तीने सत्यागृहानिमित्त उपोषण झाले होते. १३ रोजी 'जालीयनवाला बाग' प्रकरणाने कळस झाला. त्या भीषण प्रसंगाची व त्या वेळेला झालेले प्रचंड राष्ट्र जागृतीची आठवण म्हणून दरवर्षी ६ ते १६ एप्रिल हा आठवडा राष्ट्रीय सप्ताह म्हणून साजरा होत असतो. अशी राष्ट्रीय सप्ताहाची पार्श्वभूमी सांगून महात्मा गांधीजींच्या कुशल नेतृत्त्वाची माहिती दिली आहे. या सप्ताहाचा हेतू व हा सप्ताह लोकांनी कसा आचरणात आणावा याचे मार्गदर्शन केले आहे.

यावरून 'तरूण भारत' स्वातंत्र्य लढयास किती मोठा हातभार लावत होते. याची कल्पना येते.

काँग्रेसच्या नागपूर येथील भरलेल्या अधिवेशनात महात्मा गांधी यांनी अहिंसेवर आधारित असहकारीतेचे आदेश दिले. विद्यार्थ्यानी सरकारी शाळा–महाविद्यालयावर बहिष्कार घालावा. यावेळी भारतातील हजारो विद्यार्थी शाळा–कॉलेज सोडून स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी झाले.[११] याचवेळी 'तरूण भारतचे' संपादक बाबुराव ठाकुर हे ही सांगलीच्या विलिंग्टन महाविद्यालयातील आपला शिक्षणक्रम सोडून स्वातंत्र्य चळवळीत उतरले.[१२] बेळगावात या चळवळीने चांगलाच जोर धरलेला होता. गंगाधरराव देशपांडे व गोविंदराव याळगी इ. मंडळीनी काँग्रेस स्वंयसेवक संघटना उभी करून स्वदेश, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व मद्यपान निषेध इत्यादी कार्यक्रम राबवले होते. याच संघटनेचे सदस्यत्व बाबुराव ठाकुर यांनी स्वीकारले. मद्यपान निषेधाच्या चळवळी तीव्र होत असताना एका प्रकरणातून बाबुरावासह पाच लोकांना तीन महिन्याची शिक्षा झाली.[१३] तारूण्यात राष्ट्रवादी भावनेने प्रेरित झालेले बाबुराव ठाकुर यांनी हे सर्व काम राष्ट्रासाठी आनंदाने स्वीकारले.

'तरूण भारत' मासिकातील नोव्हेंबरच्या अंकात 'भारत वैभव समाज' या संस्थेच्या मार्फत असहकार चळवळी बाबतचा खुलासा केलेला आहे. 'लोकमान्य स्वदेशी वस्तू भांडाराचे कार्य हाती घेतल्यामुळे व महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीचे आदेशाचे पालन करून देशकार्य केल्यामुळे 'तरूण भारत' मासिकाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत व्यक्त केली आहे. याच अंकात स्वदेशीच्या प्रसारात बेळगाव पहिल्या नंबरने पुढे असेल, अशी तीव्र इच्छा व्यक्त केली होती.[१४] तरूण वर्गाला मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने सुरू झालेले 'तरूण भारत' हे मासिक १९२० पासून भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या राजकारणात सक्रिय सहभागी होऊन समाजाला राष्ट्रीय चळवळीकडे ओढण्याचा प्रयत्न करीत होते. डिसेंबर १९२० चा पूर्ण अंक महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारा प्रकाशित केला आहे.[१५] या स्वतंत्र अंकात नामवंत लेखकाचे लेख देऊन 'इंग्रजांची गुलामगिरी व त्यांचे अत्याचार' देशाची लूट, राष्ट्रप्रेम, समता, स्वातंत्र्य व स्वदेश या बाबतची निष्ठा या विषयावर लेख आहेत.[१६]

तरूण शक्तीला आवाहन करताना 'हे तरूण हिंदुस्थाना' या मथळयाखाली तरूण हो, स्वदेश भूमिवर प्रेम करा ! 'तरूण पिढीच्या आत्मिक बलावर महात्मार्जीची सर्वस्वी भिस्त आहे. सर्वांनी अंतःकरणाने त्यांना सहाय्य करून एका वर्षात स्वातंत्र्याचा आमचा जन्मसिध्द हक्क

आम्ही मिळवू, असा विश्वास निर्माण करणारा लेख दिला आहे. पुढच्या एका लेखात असहकार चळवळीत तरूणांना सहभागी करून घेताना 'तरूणांनो ! तुम्हाला स्वदेशाची चाड असेल स्वराज्याची उत्कट भावना जागृत झाली असेल तर राष्ट्राला जागून सरकारी व सरकारशी संबंधित असणाऱ्या शाळा आणि कॉलेज ओस पाडून केवळ स्वराज्यासाठी अनात्याचारी असहकारिता स्वीकारावी. अशा प्रकारचे आवाहन करून तरूण वर्गाच्या अंत:करणात हात घातला आहे.[१७]

असहकार चळवळीच्या पार्श्वभूमीवरून बेळगाव व बेळगावच्या परिसरावर या चळवळीचा झालेला परिणाम स्पष्ट करणारा लेख दिला आहे. यामध्ये मद्यपान बंदीची चळवळ हिंदूपेक्षा विशेषतः मुसलमानांनी जोरात चालविलेली होती. तसेच टिळक स्वराज्य फंडाला चांगला प्रतिसाद लाभला होता. बेळगावात खिलाफत कमिटीने आपली चळवळ जोराने चालविली होती. मुसलमान पुढारी मौलवी कुतुबुद्दीनसाहेब हे हिंदु–मुसलमानांच्या एकीसाठी झटत होते. या चळवळीला समाधानकारक प्रतिसाद लाभला होता.[१८]

ऑक्टोंबर १९२० मध्ये महात्मा गांधी व शौकत अली हे बेळगावात आले होते. त्यावेळी किल्ला मैदानावर झालेल्या सभेचे नियोजन व व्यवस्था 'तरूण भारत' ग्रुपने केली होती. या सभेच्या वेळी 'लोकमान्य टिळक स्वराज्य फंड' नावाने जमा केलेली 'सव्वा पाच हजार' रूपयांची थैली महात्मा गांधी यांच्याकडे देण्यात आली. यावेळी जनसमुदायाला उद्देशून केलेल्या भाषणात महात्मा गांधी म्हणतात, 'दलितांच्यासाठी देवळे, शाळा खुल्या केल्या पाहिजे, धर्माच्या नावाखाली कोंबडया व बकऱ्यांची कत्तल करू नये, दारू पिऊ नये.' असे गांधीजींनी कळकळीने सांगितले. स्वातंत्र्याच्या चळवळीत सर्वांनी सहभागी व्हा ! असे आवाहन केले.[१९] असहकार चळवळीत बेळगाव व बेळगाव परिसरातील स्त्रीयांनी सुध्दा भाग घेतला. यामध्ये 'शांताबाई शिवराम कोप्पल' या आघाडीवरच्या महिला होत्या. यांच्या नेतृत्वाखाली सहभागी स्त्रियांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत खादी साडी वापरण्याचा निश्चिय करून शेवटपर्यंत एकनिष्ट राहिल्या.[२०] असहकार आंदोलनात बेळगावातील अनेकांनी भाग घेतला. त्यातील अनेकांना शिक्षा झाल्या त्याचा तक्ता खालीलप्रमाणे

अ क्र.	नाव	शिक्षेचा कालावधी
१.	श्री. गंगाधरराव देशपांडे	६ महिने
२.	श्री. दत्तोपंत बेळवी	१ वर्षे ६ महिने
३.	श्री. केशवराव भोसले	१ वर्षे
४.	श्री. धोंडो राजाराम ठाकुर	३ महिने
५.	श्री. शिवराम कोप्पल	३ महिने
६.	डॉ. रामचंद्र जोशी (पाच्छापूर)	१ वर्षे
७.	श्री. विश्वेश्वर रामचंद्र देशपांडे	१ वर्षे[२१]

३.२.२.३ २६ जानेवारी १९३० पहिला स्वातंत्र्य दिन –

लाहोरच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून काँग्रेसजनांनी नव्या वर्षाचे स्वागत केले असले, तरी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सविनय कायदेभंग करावयाचा म्हणजे काहीतरी निश्चित कार्यक्रम देणे आवश्यक होते.[२२] त्याचा पहिला भाग म्हणून २६ जानेवारी १९३० हा दिवस 'पहिला स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करावा असे आवाहन करणारे पत्रक. पं. जवाहरलाल यांचे पूर्ण स्वराज्य दिनाचा ठराव या शीर्षकाखाली 'तरूण भारत'च्या अंकात छापण्यात आले.[२३] ब्रिटिशांची राजवट हिंदी जनतेच्या शोषणावर आधारलेली आहे. त्यामुळे सर्व बाबतीत देशाची फार मोठी हानी झाली आहे. आमचे दररोज सरासरी उत्पन्न सात पैसे असून आमच्यावर लादलेल्या जबर करापासून सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नापैकी २० टक्के उत्पन्न शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येते. त्यामुळे स्व–खुशीने ब्रिटिश सरकारबरोबरच संबंध तोडून आम्ही सविनय कायदेभंगासाठी सज्ज होत आहोत. असे या पत्रात जाहीर केले आहे.[२४]

जि. कॉ. क. बेळगांवच्या वतीने 'तरूण भारत' या साप्ताहिकात २६ जानेवारी १९३० चा 'स्वातंत्र्य दिन साजरा करा ! मथळयाखाली लेख देऊन जनतेपुढील कार्यक्रम आखून देण्यात आला.[२५] 'स्वातंत्र्य–दिनाची' बेळगावात प्रचंड मिरवणूक काढून तरूणांचा अपूर्व उत्साह स्वातंत्र्याचा जयजयकार केला. सकाळी बेळगावाच्या रस्त्यावर रांगोळया व प्रत्येकानी गुढी उभी करून दिन साजरा केला. मार्केटमध्ये सभा घेऊन गंगाधरराव देशपांडे यांनी जाहिरनामा वाचून दाखविला, बेळगावच्या आसपासच्या खेडयांच्यामध्ये साजरा झालेल्या दिनाच्या बातम्या तरूण भारतने अग्रस्थानी दिल्या होत्या.[२६]

३.२.२.४ महात्मा गांधीजींचा अकरा कलमी कार्यक्रम –

गांधीजींनी केलेल्या अकरा मागण्याही सरकारने धुडकाहून लावल्या. शेवटी १४, १५ व १६ फेब्रुवारी १९३० रोजी साबरमती आश्रमात काँग्रेस कार्यकारिणीची बैठक घेऊन सविनय कायदेभंग सुरू करण्याचे सर्वाधिकार गांधीजींना देण्यात आले. या बैठकीचा वृत्तांत "देव भेटेना, नवस सुटेना" शीर्षकाखाली दिला आहे. तर पुढच्या लेखात पं. मोतीलाल यांचे पत्रक देऊन 'महात्मा गांधीजींच्या निशाणाखाली एकत्र व्हा, असे आवाहन केले आहे'.[२७]

३.२.२.५ खादीचे महत्त्व व उपयोग –

'तरूण भारत' ने महात्मा गांधीजीनी पुकारलेल्या स्वदेशी वापराबाबत खादीचे महत्त्व व उपयोग या सदरच्या लेखात खादीचे वैशिष्टय दिलेली आहेत. त्यामध्ये खादी खरोखरच महाग असते काय ? खादी टिकत नाही काय? खादीच का वापरावी ? याचे स्पष्टीकरण दिले आहे. शेवटी या लेखात म्हणतात 'खादी' हे भुकेल्यास अन्न देणारी, जीवास कंटाळलेल्यास जीवन देणारी, अज्ञानास सज्ञान करणारी, मुक्यास बोलके करणारी व लंगडयास चालविणारी त्याच प्रमाणे राजकारणपटूस राजनीतीचे मार्ग दर्शविणारी कामधेनू आहे. या कामधेनूची अनन्यभावे सेवा करून तिला संतुष्ट करा व आमरण सुख भोगा.[२८] अशा प्रकारचा लेख देवून देश बांधवांच्यात स्वदेश खादी रूजावी व खादीला महत्व प्राप्त व्हावे, हा उद्देश स्पष्ट होतो.

३.२.२.६ वल्लभभाईचा असहकाराचा संदेश –

तामिळनाडू प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या भाषणात सर्व शेतकरी वर्गाला उद्देशून असहकाराचा संदेश दिला. 'जोपर्यंत बहुजन समाजाला (शेतकरी) या जन आंदोलनात सहभागी करून घेतले जात नाही तोपर्यंत या स्वातंत्र्याच्या चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त होणार नाही. या वर्गाच्या विधायक कार्यासाठी सर्व नेते मंडळीनी झटले पाहिजे. तेंव्हाच हा शेतकरी वर्ग स्वतः होऊन चळवळीत सहभागी होईल'. त्याचबरोबर अस्पृश्यता निवारण, खादी प्रसार, मद्यपान बंदी वगैरेचा पुरस्कार केला पाहिजे. अशा प्रकारचा असहकाराचा संदेश देवून सर्व काँग्रेसप्रेमी राष्ट्रीय पुरूषांना महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली एकत्र आले पाहिजे. अशा प्रकारचे देशवाशियांना आवाहन करणारा लेख 'तरूण भारत' ने प्रसिद्ध केला आहे.[२९]

१४ सप्टेंबर १९२९ रोजी असहकाराचा संदेश घेऊन सरदार वल्लभभाई पटेल बेळगावला आले. त्यावेळी श्री गंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेला आठ हजार जनसमुदाय जमला होता. या लोकांना संबोधून भाषण करताना पटेल म्हणतात, "आपण काँग्रेसच्या विचाराने एक झालो तर या गरीब रयत लोकांना कष्ट सोसावे लागणार नाहीत. या शेतकरी रयतेच्या एकजूटीचा वापर करून ब्रिटिश सरकारला हादरा देता येतो हे आम्ही बार्डोली लढयातून सिध्द केले आहे." या व्याख्यानात बार्डोलीचा लढा कशा प्रकारे सरकारच्या विरोधात देण्यात आला व त्याचे यश काय साध्य झाले. या बाबतच्या इतिवृत्तांत या लेखात 'तरूण भारत' ने घेतलेला आहे.

३.२.२.७ महात्मा गांधीचे व्हाइसरॉयंना पत्र –

'गुडघे वाकवून मी भाकरी मागितली, पण त्या ऐवजी माझ्या पदरात धोंडाच पडला. मी तुमचा कायदा मानीत नाही आणि तो मोडणे हे मी माझे कर्तव्य समजतो. कारण दुःखदायक कंटाळवाण्या अशा लादलेल्या शांततेमुळे राष्ट्रांच्या हृदयाला स्वतंत्रपणे श्वासही घेता येत नाही'. याच पत्रात म. गाधी यांनी आपल्या अकरा मागण्या मांडल्या. त्या मागण्या मान्य झाल्या नाही, तर कायदेभंगाचा लढा चालू केला जाईल.[३०] दि. ११ मार्चच्या अंकात "ब्रिटिश राज्य हा एक हिंदुस्थानाला शाप का आहे ? हिंदुस्थानचे शोषण व ब्रिटिशांची पगार वाढ, ही जुलमी पध्दत बंद करा."[३१]

३.२.२.८ दांडी यात्रा–

महात्मा गांधीजीनी साबरमती आश्रमातून मिठाचा कायदा मोडण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे देशभर खळबळ उडाली. साध्या मिठाच्या प्रश्नावर राष्ट्रीय लढा सुरू करण्याच्या या निर्णयामुळे बरेच काँग्रेसचे नेते बुचकळ्यात पडले, या बाबतचा खुलासा करणारा लेख.[३२] मिठाचा कायदा मोडण्यासाठी गांधीजींनी आपल्या आश्रमातील ७९ अनुयायांची पहिली तुकडी सत्याग्रहासाठी निवडली १२ मार्च १९३० रोजी दांडी यात्रेला सुरूवात झाली.[३३] तर २५ मार्चच्या अंकात २१ मार्चला अहमदाबादेत अ.भा काँ. समितीच्या बैठकीचा वृत्तांत देवून प्रांतीय काँग्रेस समित्यांना योग्य वाटेल अशा पध्दतीने शांततेच्या मार्गाने सविनय कायदेभंगाची मोहीम चालवावी, असा आदेश देण्यात आला.[३४] 'तरूण भारत' वृत्तपत्रात 'सत्याग्रह वार्ता' हया मथळ्याखाली स्वतंत्र बातम्या दिल्या व सत्याग्रहींना मार्गदर्शन केले आहे.

२५ मार्चच्या तरूण भारतच्या अंकात बेळगाव जिल्हा कायदेभंगाकरीता 'तरूण भारत' पथक या शीर्षकाखाली सत्याग्रहीची कमिटी तयार करून त्याची कार्यक्षेत्र व कामे वाटून दिली आहेत.

प्रचाराचे क्षेत्र	गटनायकांचे नाव
बेळगाव शहर	१) बाबुराव ठाकुर २) शिवराम कोपल ३) डॉ. कोवाडकर
बेळगाव – नेसरी – नरगट्टी	१) श्री. रामचंद्र मडवी (मास्तर)
बेळगाव – निपाणी भाग	१) श्री. वामनराव बिद्री
बेळगाव –बैलहैंगल – सौदत्ती	१) श्री. बा. न. देशपांडे
बेळगाव – चंदगड मार्ग	१) श्री. कृष्णराव वैद्य[३५]

बेळगावच्या मार्केटयार्ड चौकात दे. भ. गंगाधरराव देशपांडे श्री. नारायणराव जोशी, श्री जीवनराव याळगी व श्री अनंतराव दाभडे यांनी ६ एप्रिलच्या सभेत जाहीर पध्दतीने मिठाचा कायदा मोडून सरकारला कर न देता आणलेले मीठ विकल्याबद्दल व विकत घेतल्याबद्दल त्यांना पकडण्यात येऊन खटले भरले.[३६]

कायदेभंगाच्या चळवळीत बेळगाव परिसरात फार मोठी प्रचार मोहिम राबवून 'तरूण भारत' ने मोठी जनसमुदायाची व कार्यकर्त्यांची फळी उभी केली. या प्रेरणेतून बेळगाव जिल्हयातील सत्याग्रहींची संख्या ७२५ झाली होती. बाबुराव ठाकुर व शिवराम कोप्पल डॉ. कोवाडकर यांनी हिंडलगा जेलसमोर . १८ एप्रिल १९३० रोजी सभा घेऊन प्रक्षोभक भाषण केल्याने अटक करून २२ एप्रिल १९३० रोजी कोर्टापुढे हजर करण्यात आले व सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली.[३७]

१२ मार्चला सुरू झालेली दांडीयात्रा, ५ एप्रिल १९३० रोजी महात्मा गांधीजी दांडी येथे पोहचल्यावर पूर्ण झाली. महात्मा गांधीजींची वयाची ६० वर्ष उलटलेली असताना साबरमती ते दांडी २४० मैलाचे अंतर पायी चालून जाताना वाटेत ठिकठिकाणी छोटया–मोठया सभामध्ये केलेल्या भाषणांचा वृत्तांत 'तरूण भारत' ने सविस्तर प्रकाशित केला आहे. सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील १२ मार्चपासून ते १३ मे १९३० पर्यंत, बेळगाव जिल्हयात मिठाचा कायदा मोडणाऱ्या सत्याग्रहींना शिक्षा झाल्या आहेत. त्यांच्या नावाची यादी 'तरूण भारत' वृत्तपत्रानी १३ मे च्या अंकात प्रसिध्द करून सत्यागृहीना प्रसिध्दी मिळवून दिली आहे.

मिठाचा सत्याग्रह सर्व देशभर चालू असताना ५ मे १९३० रोजी बेळगावमध्ये गांधीजींच्या अटकेची बातमी समजताच हरताळ, मिरवणूका आणि जाहीर सभा आयोजित करून सरकारचा निषेध करण्याची लाट उसळली. १३ मे १९३० च्या 'तरूण भारत'च्या अंकात 'महात्मा गांधींना अटक' या मथळ्याखाली मोठा लेख छापून आला. त्या लेखात 'सरकारचा निषेध करून इशारा दिला' गांधीजींना अटक केल्याने खवळलेला जनसागर शांत होणार नाही, उलट त्याची प्रखरता वाढेल, पण कमी होणार नाही. या सागराला शांत करण्याची शक्ती फक्त महात्मा गांधीमध्ये आहे. हया शक्तीमुळेच हजारो लोक रस्त्यावर उतरले आहेत. हे दिव्य तेज जगाला त्यांनी दाखवले आहे.[३८]

३.२.२.९ सायमन कमिशन –

हिंदुस्थानाच्या जनतेचे लक्ष बरीच वर्षे लागून राहिलेला सायमन कमिशनचा रिपोर्ट १० जून रोजी प्रसिध्द झाला. त्या रिपोर्टातील मजकूर 'तरूण भारत' ने दोन भागात मुद्रित केला.[३९] हा रिपोर्ट फसवा आहे. जनतेच्या डोळयात धूळ फेकणारा आहे. असा निष्कर्ष काढला. या कमिशन बाबत मत नोंदवताना 'तरूण भारत' कार म्हणतात 'नंदी बैलाचा निवाडा नको ' 'आधी कळस मग पाया रे'[४०] अशा तऱ्हेचे सायमन कमिशन हे विपरीत प्रकरण आहे. प्रतिक्रिया हिदुंस्थानने सायमन साहेबांची 'प्रांतिक स्वायत्तता' भोगावी अन्यथा कमिशनच्या विरोधात धमक धरली पाहिजे, 'साम्राज्य सरकारच्या सैन्याचा हा सायमनी सवाई सोटा मात्र कायमचा हिंदी राष्ट्राच्या कपाळी बसण्यात सज्ज असणारच! सायमन कमिशनचा रिपोर्ट म्हणजे 'डोंगर पोखरून उंदीर बाहेर काढण्यासारखा प्रकार आहे.' सायमन कमिशनवर तीव्र शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.[४१]

'वटहुकूमाचे राज्य' सरकारने कायदेभंगाच्या विरूध्द वटहुकूम काढून दहशतीचा अंमल चालू केला. त्यातील वटहुकूमांचा भंग केल्यानंतर व कायदा मोडणाऱ्याला कोणती शिक्षा होऊ शकते? या बाबतची माहिती देणारा सविस्तर लेख दिला आहे.[४२]

१. बंगाल वटहुकूम – १९ एप्रिल १९३० २. लोहार कटाचा खटला,– १ मे १९३० ३. वर्तमानपत्रासंबंधी वटहुकूम,– १९३० या संबंधीच्या कायद्यावर व कलमांच्यावर चर्चा केली आहे. 'तरूण भारत' साप्ताहिकात कायदेभंग चळवळीच्या काळात कर्नाटकातील देशसेवकांची चरित्रे' या सदराखाली काही जाणत्या व्यक्तिची माहिती लेखांच्या माध्यमातून दिली आहे.

३.२.२.१० कर्नाटकाचा सिंह, दे भ. गंगाधरराव देशपांडे–

टिळकांना गुरूस्थानी मानले व त्यांच्याच पायावर पाऊल ठेवून महात्मा गांधी राजकारणात आले. म्हणून महात्मा गांधीजींच्या जवळचे, कर्नाटकातील राष्ट्रीय चळवळीचे जनक व तरूणांचे मार्गदर्शक म्हणजे गंगाधरराव देशपांडे [४३] तसेच वामन मल्हार जोशी यांच्या चरित्र ग्रंथाची चर्चा करणारा लेख पुस्तक परिचय प्रा. धर्मानंद कोसंबी यांचे भाषण 'इंग्रजांचा भारतात प्रवेश ते सविनय कायदेभंग चळवळ' दोन भागात लेख प्रकाशित करून इंग्रजांची स्वार्थी राजनीती कशी सर्वांना मारक ठरली, हे स्पष्ट केले आहे.[४४]

३.२.२.११ गोलमेज परिषद –

कायदेभंगाची चळवळ चालू असताना सायमन कमिशनचा अहवाल जाहीर झाला व त्या अहवालावर विचार करण्यासाठी नोव्हेंबर १९३० मध्ये लंडन येथे 'पहिली गोलमेज परिषद' भरली. या गोलमेज परिषदेत एका कायद्याने संपूर्ण स्वराज्य देण्यात येईल, असे आश्वासन देण्यास लॉर्ड आयर्विन किंवा ब्रिटिश प्रधान मंडळ तयार नसल्यामुळे महात्मा गांधी व राष्ट्रसभेने या परिषदेवर बहिष्कार घातला. या गोलमेज परिषदेच्या संदर्भातील माहिती 'तरूण भारत'मध्ये पहावयास मिळते.[४५]

'पहिली गोलमेज परिषद' ही महात्मा गांधी शिवाय भरविली म्हणजे हॅम्लेटच्या पात्राखेरीज हॅम्लेट नाटक व्हावे तशी त्या परिषदेची स्थिती झाली.[४६] पण दुसऱ्या परिषदेला जाण्यास म. गांधी तयार झाले. विरोधक मात्र गांधीजींनी परिषदेला जाऊ नये म्हणून हट्ट धरायला लागले होते.[४७]

राजपुताना बोटीने महात्मा गांधी, पं. मदनमोहन मालवीय, सरोजनी नायडू, देविदास गांधी, महादेवभाई देसाई व मिराबाई ही मंडळी विलायतेत सुखरूप पोहचली.[४८] या परिषदेमध्ये हिंदी लोकांबरोबर ब्रिटिश सरकारच्या मंत्री मंडळाचे प्रतिनिधी बसले, तरच ही परिषद यशस्वी होऊ शकेल. अशा प्रकारची भीती व्यक्त करून ही परिषद यशस्वी व्हावी म्हणून चिंतन पर लेख दिला आहे.

महात्मा गांधींचे गोलमेज परिषदेला जाणे, या बाबत पुण्याच्या 'केसरी' वृत्तपत्रातून १ ऑगस्टच्या अंकात म. गांधीच्या कार्यप्रणालीवर टीका केली आहे. 'महात्मा गांधीची चळवळ म्हणजे इंग्रजांना एखाद्या लहान पोरांने बापाच्या मिशा उपटाव्या त्याप्रमाणे हे वाटते' असे म्हणून

गांधीजींची टवाळी केली आहे. या लेखाचा समाचार घेण्यासाठी म्हणून बेळगाव येथील मारूती मंदिरात सभा घेऊन निषेध नोंदवला व दुसऱ्या दिवशीच्या 'तरूण भारत' च्या अंकातून केसरीला सडेतोड उत्तर दिले. महात्मा गांधीजींची भूमिका कशी बरोबर आहे. हे दाखवणारा दीर्घ लेख दिला आहे.[४९]

२२ ते २४ डिसेंबर १९३१ रोजी युथ लीगच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात परिषद आयोजित केली होती. या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात सुभाषचंद्र बोस यांनी लंडन येथे भरलेली गोलमेज परिषद म्हणजे साम्राज्यवाद्यानी रचलेला सापळा आहे. या परिषदेला महात्मा गांधी गेले व फशी पडले. पुढे म्हणतात, "या काँग्रेसच्या नेते मंडळीच्या असमर्थ कृतीमुळे काँग्रेसचा प्रभाव क्षीण होत चालला असल्याबद्दल त्यांनी इशारा दिला." या त्यांच्या केसरीतील भाषणाला 'तरूण भारत' ने समाचार घेऊन देशाचे हित फक्त महात्मा गांधीजींना माहीत आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखालीच आपण यश मिळवू हा विश्वास व्यक्त करणारा लेख दिला आहे.[५०]

महात्मा गांधी हिंदुस्थानात परतल्यावर सरकारला अंतिम इशारा देण्यासाठी 'बॉम्बे क्रॉनिकल' वृत्तपत्राच्या प्रतिनिधीस मुलाखत देऊन लढा पुन्हा सुरू करण्याचे आवाहन केले. ४ जानेवारी पहाटे म. गांधी, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस वगैरे नेत्यांना पकडून स्थानबद्ध केले. व काँग्रेस विरूध्द लढाईच्या दुसऱ्या फेरीला सुरूवात केली. ५ जानेवारीला 'तरूण भारत' ने देशाच्या अब्रुसाठी व स्वातंत्र्यासाठी ! या मथळ्याखाली लेख देऊन पुढील आंदोलनाची कृती स्पष्ट केली आहे.[५१]

३.२.२.१२ सविनय कायदेभंगाची दुसरी फेरी –

अ) जातीय निवाडा –

दि. १७ ऑगस्ट १९३२ रोजी पंतप्रधान रॅम्से मॅकडोनल्ड यांनी जातीय निवाडा घोषित केला. या निवाडयानुसार प्रांतिक विधानमंडळाच्या कनिष्ठ सभागृहात बारा प्रकारचे वेगळे मतदार संघ अस्तित्त्वात येतील असे जाहीर करण्यात आले. ताबडतोब महात्मा गांधीनी पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्डना पत्र लिहून जातीय निवाडयाच्या निषधार्थ प्राणांतिक उपोषण सुरू करण्याचे कळवले. या कालखंडातील महात्मा गांधीजींचे दै. कार्य व उपवासाच्या या दररोजच्या घडामोडी 'तरूण भारत'ने अचूक वेध घेऊन बातम्याच्या माध्यमातून दिल्या आहेत.

ब) पुणे करार –

पुणे करारावर महात्मा गांधीनी स्वाक्षरी केली नाही. मालवीय, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या स्वाक्षऱ्या करारावर आहेत. २८/१०/१९३२ रोजी दै. केसरीचा लेख 'लोकशाही स्वराज्य पक्ष' स्थापन करण्यासाठी मुंबई येथे केसरीचे संपादक व उपसंपादक यांच्या नेतृत्त्वाखाली बैठक झाली. 'महाराष्ट्र पक्षाच्या झेंड्याखाली सैनिक!' अशा प्रकारचा लेख देऊन प्रसिध्द केला होता. अंकातील बातमीचा समाचार घेत 'तरूण भारत' ने ३१ ऑक्टोबरच्या लेखात दै. 'कसरी' या वृत्तपत्रावर सडकून टिका केल्या आहेत. "ज्या वृक्षाच्या (काँग्रेसच्या) शीतल छायेखाली वाढलो. तोच वृक्ष वटत चाललेला दिसताच त्याच्या मुळावर घाव घालण्याचा विचार ज्या गटाचा होतो ती व्यक्ती व गट कृतघ्न व स्वार्थीच असला पाहिजे." असा सवाल करून केसरीला जाब विचारला आहे.[५२]

महात्मा गांधीनी येरवड्याच्या तुरूंगात बसून चालविलेली हरिजन मंदिर प्रवेशाची चळवळ म्हणजे एक राजकीय डाव आहे. अशा विचारसरणीचे मत व्यक्त करणाऱ्या लोकांना 'तरूण भारत' ने चांगलीच चपराक दिली आहे.[५३] अस्पृश्यता–निवारण व मंदिर प्रवेश याबाबत असेंब्लि पुढे आलेल्या बिलास व्हॉइसरायनी संमती देऊ नये. अशी विनंती करणारे पत्रक काढण्यासाठी बेळगाव मारूती मंदिरात दि. २९ जानेवारी रोजी एक सभा घेण्यात आली. या सभेला श्री शंकराचार्य हे अध्यक्षस्थानी होते. तसेच बाबुराव ठाकुर, केशवराव गोखले ही मंडळी उपस्थित होती.

या सभेत महात्मा गांधीचा निषेध करण्यात आला. "महात्माजी हे पिशाच्च आहेत ! श्रीमंत शंकराचार्य सनातन्यांच्या सभेचा बोजवारा" या शीर्षकाखाली लेख देऊन संकेश्वर शंकराचार्यांच्या विचारांचे धिंडवडे काढून शंकराचार्याच्या भाषणाचा इतिवृत्तांत दिला आहे.

आम्ही पुढाऱ्यासारखे देशभिमानी आहोत. प्रथम धर्माभिमान नंतर देशाभिमान धर्माचा प्रश्न बहुमताने सोडवणे शहाणपणाचे नाही. या निर्णयाला अधिकारी लोकच लागतात. "आमचा धर्म आम्हास कळत नाही मग परधर्मी राजकर्त्यांना तो कसा कळणार ? तेव्हा सरकारच्या मदतीने धर्मावर अत्याचार होईल. धार्मिक भावना दुखवतील म्हणून या बिलास मान्यता देऊ नये." शेवटी बाबुराव ठाकुर व गोखले यांनी विचार मांडले गोखले म्हणतात, 'देशातील ७ कोटी

अस्पृश्य समाजाला किती दिवस पशुहीन वागवणार ? आता त्यांचा आंबेडकर हा नेता रक्षणासाठी पुढे आहे. तसेच महात्मा गांधी हेच खरे धर्मरक्षक आहेत. सर्व धर्माचे ऐक्य करणारे महात्मा गांधी हेच खरे जगद्गुरू आहेत, हे ऐकताच तेथील धर्ममार्तंडानी विरोध केला व सभा बरखास्त केली.[५४]

दुसऱ्या दिवशी 'तरूण भारत' च्या अंकात सर्व सभेचा इतिवृत्तांत देऊन जगतगुरू शंकराचार्य यांचे विपरीत विचार समाजाला घातक कसे आहेत, हे स्पष्ट करणारा लेख दिला.[५५] पुढील अंकात जगतगुरू शंकाराचार्य याचे अनावृत्त पत्र रा. रा. 'तरूण भारत' कर्ते यास या शीर्षकाखाली लेख छापले.[५६] पुढील अंकात या पत्राला प्रत्युत्तर देऊन 'तरूण भारत' कर्त्यांनी काही प्रश्नांचा खुलासा मागितला तो पुढील प्रमाणे.

१) शंकराचार्य आपणाला 'जगद्गुरू म्हणवितात काय ? किंवा लोकांनी जगद्गुरू ही पदवी दिली आहे.

२) जगद्गुरू या शब्दातील 'जगद' या शब्दाचा अर्थ काय?

३) खरोखरच जगातील विचारी लोकांनी महात्माजींना गुरू मानले व त्यामुळे त्यांच्याविषयी योग्य आदर वाटणाराने त्यांना जगद्गुरू म्हटले, तर चिमुकल्या जगाच्या चिमण्या गुरूना हादरल्यासारखे वाटण्याचे कारण काय ? असे प्रतिदृश्य करून जातीच्या भिंती व चालत आलेल्या रूढी–परंपरेच्या विरोधात तरूण भारताची हाक होती. पं. मुकुद मालवी यांच्या भाषणाचा वृत्तांत देऊन बेळगाव व परिसरातील लोकांनी अस्पृश्यता निवारणासाठी अस्पृश्य समाजाच्या बाजूने उभे राहीले पाहिजे; हे स्पष्ट करून अस्पृश्य हे आपल्या देशाचे महत्त्वाचे भागीदार आहेत. तेव्हा त्यांची उन्नती करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजे.[५७]

२ जानेवारी १९३४ च्या अंकात बेळगावातील सनातनी श्री. नगरकर यांनी वर्णाश्रम स्वराज्य संघाच्या वतीने महात्मा गांधीना पत्र पाठवून बेळगावला येण्याचा मज्जाव केला. या बातमीचा समाचार तरूण भारतने घेऊन उलट महात्मा गांधी यांना या भागात सर्वोतोपरी मदत करण्याचे अभिवचन दिले.[५८]

महात्मा गांधीना कर्नाटक दौऱ्यात हरिजन वृध्दीसाठी ४५ हजार रक्कम जमा करून दिली. या बाबतचा पूर्ण वृत्तांत तरूण भारतने देऊन देणगीदारांची नावे व रक्कम अंकात दिली आहे.[५९] दक्षिण भारतातील अस्पृश्यता निवारण्याचा दौरा अर्ध्यावर सोडून महात्मा गांधी ११

मार्चला पाटण्याला गेले. अ.भा. कॉ. समितीचे अधिवेशन दि. १८ ते २० मे १९३४ भरले. या अधिवेशनाच्यावेळी महात्मा गांधीनी आपल्या भाषणात सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेऊन कायदे मंडळात प्रवेश करण्याच्या धोरणावर शिक्कामोर्तब केला.[६०] कायदेमंडळाची निवडणूक लढविण्यासाठी डॉ. अन्सारीच्या अध्यक्षतेखाली २५ सदस्यांचे मंडळ नेमण्यात आले व जातीचा निवाड्याबाबत श्वेतपत्रिका काढून धोरणात्मक आखणी करण्याचे ठरले या बाबतचा वृत्तांत दिला आहे.

३.२.२.१३ १९३५ चा सुधारणा कायदा –

३० ऑगस्ट १९३६ रोजी बेळगाव येथील मारूतीच्या देवळांत डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांचे 'हिंदुस्थान सरकारचा १९३५ चा सुधारणा कायदा' या विषयावर व्याख्यान झाले. सबंधित कायद्यातील तरतुदी व जनतेसाठी कायद्याचा वापर, हे मुद्दे स्पष्ट केले. याच सभेत मराठी व कन्नड भाषेबाबत म्हणतात. 'सीमा प्रश्न म्हणजे माती व वाळू ही जशी एकदम मिसळत नसून क्रमाक्रमाने मिसळतात. तशी या भाषेची स्थिती आहे.'[६१] काही वर्षाने या दोन्ही वेगवेगळ्या भाषिक संस्कृती एकत्र नांदताना दिसतील. असा विश्वास व्यक्त केला.

३.२.२.१४ काँग्रेस रोडची सभा –

सन १९३८ पर्यंत बेळगावं जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर सरकारधार्जिणा गटाचा ताबा होता. सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी राखणे, काँग्रेसला विरोध करणे या त्याच्या मतलबी कृत्यांना मात्र 'तरूण भारत' या साप्ताहिकातून काय विरोध दर्शविला आहे. या संदर्भात बेळगाव शहरातील बेळगाव ते ठळकवाडी याना जोडणारा रेल्वे लाईनशी समांतर जाणारा जो काँग्रेस रोड म्हणून ओळखला जाणारा रस्ता आहे. याची कथा 'तरूण भारत'ने दखल पात्र घेतली आहे.[६२]

२६ ऑक्टोबर १९३४ रोजी नामदार ब्रॅबोर्न राज्यपाल मुंबई, हे बेळगाव भेटीला येणार होते. तेव्हा बेळगाव ते ठळकवाडी या रस्त्याचे उद्घाटन ब्रॅबोर्न यांच्या हस्ते करण्याचे व त्या रस्त्याला ब्रॅबोर्न नाव देण्याचा ठराव मुनिसिपालिटीच्या सभेत १८ ऑगस्ट १९३४ बहुमतानी पास झाला होता. त्या दिवशी मारूतीच्या मंदिरात नागरिकांची सभा श्री. मंडगी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या रस्त्यास ब्रॅबोर्न नाव देण्यात येऊ नये असे ठरविले. २२ ऑक्टोबर १९३४ रोजी काँग्रेस गटातील बाबुराव ठाकुर, शिवराम याळगी व जुवेकर यांनी आपल्या

सह्याानिशी एक जाहिरात प्रसिध्द केली.[६३] त्या जाहिरातीत नव्या रस्त्यास काँग्रेस रोड नाव देण्यासाठी २२ ऑक्टोबर १९३४ रोजी सायंकाळी ६ वाजता काँग्रेस विहीरीच्या जवळील रेल्वे फाटकासमोरील मैदानात जाहीर सभा होणार आहे. तरी सर्वांनी अगत्याने हजर रहावे. असा मजकूर छापून बेळगावातील घरांच्या भिंतीवर पोष्टर लावण्यात आली. शेवटी मुंबई पोलीस ॲक्टच्या ४८ (ए) व ६१ (बी) या कलमाखाली मिरवणूकी व सभा होण्यास बंदी घातली.[६४] तरीही २३ ऑक्टोबर १९३४ रोजी संध्याकाळी पोलिसांना चुकवून बाबुराव ठाकुर, शिवराम कोफल व जुवेकर यांनी फक्त २७ लोकांसमोर सभेस सुरूवात केली. इतक्यात पोलिस सब इन्स्पेक्टर श्री. पै, श्री. मुधोळकर यांनी सभेस हरकत घेतली. यावेळी झालेल्या लाठी हल्ल्यात बाबुराव ठाकुर यांच्या नाकावर जबर मार लागून रक्तस्त्राव झाला. शेवटी त्यांना अटक करून खटला भरला.

३.२.२.१५ श्री. सुभाषचंद्र बोस यांचा कर्नाटक दौरा –

सुभाषचंद्र बोस हे १३ जुलै १९३९ रोजी सुभाष बाबू बेळगाव येथे आले ते कर्नाटक दौऱ्यावर आल्यापासून वेगवेगळया ठिकाणी एकच व्याख्यान देत आहेत. अशी टिपणी 'तरूण भारत' ने केली आहे.[६५]

त्या दिवशी तरूण भारत तर्फे त्यांना एक पत्र देण्यात आले. या पत्राच्या मजकुरावरून काँग्रेस विषयाची भक्ती व महात्मा गांधी यांच्या वरचे प्रेम स्पष्ट होते. 'तरूण भारत' ने सुभाष बाबू यांच्याबाबतची कटुतेची भूमिका मांडून सुभाषचंद्र बोस यांच्या विषयी लोकांच्यात तिरस्काराची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

३.२.२.१६ गांधीजीचे भारतमंत्री ॲमेरींना उत्तर –

२९ एप्रिल १९४१ रोजीच्या तरूण भारतच्या मुख्य पृष्ठावर महात्मा गांधीजींचे ॲमेरीला झणझणीत उत्तर अशा आशयाचा दीर्घ लेख छापलेला आहे.

२२ एप्रिल १९४१ रोजी ब्रिटनच्या संसदेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना भारतमंत्री ॲमेरीने वैयक्तिक सत्यागृहाबाबत तुच्छतेचे उद्‌गार काढले, गांधीजींची मोहीम खेदजनक आणि अविवेकी असल्याचा अभिप्राय दिला होता. भारतमंत्री ॲमेरिच्या पाखंडी विकृत विचार प्रवृत्तिला उत्तर देताना तरूण भारतमध्ये लेख छापून समाचार घेतला आहे.[६६] या सुमाराला देशात ढाका, अहमदाबाद व मुंबई येथे जातीय दंगली उसळल्या होत्या. यावेळी मि. ॲमेरीने

जातीयतेचे तेढ वाढवणारे भाषण केले. हे हिंदु–मुसलमान यांच्यामध्ये कलागती लावण्यास पोषक ठरले. जोपर्यंत इंग्रंजाचे भेदनितीचे राज्य येथे चालू आहे. तोपर्यंत हे दंगे असेच चालणार. गांधीजींनी आपल्या पत्रकात ॲमेरिच्या नितिचा खरपूस समाचार घेतला होता. तोच लेख 'तरूण भारत'ने मुद्रित केला आहे.

३.२.२.१७ गांधी जयंती –

गांधी जयंती साजरी करा, खादी व ग्रामसुधारणा सप्ताह; महात्मा गांधीजीच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त बेळगाव येथील काँग्रेसजनानी 'तरूण भारत' च्या २३ सप्टेंबरच्या अंकातून बेळगाव जिल्हयात २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत खादी सप्ताह साजरा केला जाणार असल्याचे प्रसिध्द केले. त्यासाठीचे कार्यक्रम आखून दिले गेले.

ग्रामसफाई, सूत कताई, खादीची विक्री महात्मा गांधीना अर्पण करण्यासाठी सुताची अगर द्रव्याची वर्गणी गोळा करणे, महात्मा गांधीचे चरित्र–निवेदन सायंकाळी ६ वाजता फोटोची मिरवणूक व जाहीर सभा, रात्री भजन व पोवाडे व अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न वगैरे विषयाचा विचार करून सप्ताह साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले.[६७] या सप्ताहाच्या काळात तरूण भारत या वृत्तपत्रातून वेगवेगळ्या अभ्यासक विचारवंताचे महात्मा गांधीजींच्या संबंधी लेख देऊन महात्मा गांधीच्या संपूर्ण कार्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये 'नवजातीच्या कल्याणाकरिता झटणारी लोकोत्तर विभूति, जूलमाचा वैरी व दलितांचा कैवारी ! सत्य अहिंसा व खादी यानेच हिंदुस्थानचे कल्याण होईल ! "माझ्या हातातील मीठ काढून घेण्याची शक्ती–ब्रिटिश साम्राज्यात नाही, दारिद्रय नारायणाची सेवा, हीच परमेश्वर सेवा होय ! सत्याग्रहाच्या अभिनव मार्गाचा प्रणेता." असे विविध अंगी लेख देऊन 'तरूण भारत' ने स्वतंत्र अंक काढला आहे.[६८]

३.२.२.१८ क्रिप्स मिशन –

युध्द संपल्यानंतर हिंदुस्थानला ब्रिटनच्या बरोबरीचे स्वराज्य मिळेल. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी घटना परिषद बोलवली जाईल. युध्द काळात मात्र भारताच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी ब्रिटनचे सरकार घेईल. या योजनेबाबतचा सुरूवातीपासून सविस्तर खुलासा 'तरूण भारत'ने देऊन शेवटच्या लेखात 'क्रिप्स योजनेचा गंभीर विचार झाला पाहिजे. असा इशारा दिला आहे.[६९] १४ मार्चच्या अंकास क्रिप्स योजना फेटाळण्यात आली. असा

अग्रलेख देऊन कॉ. वर्किंग कमिटीचा ठराव मांडला आहे. 'क्रिप्स योजना म्हणजे बुडत्या बँकेचा दिलेला चेक आहे'. अशी प्रतिक्रिया नोंदवली आहे.[७०]

३.२.२.१९ करेंगे या मरेंगे –

१४ जुलैच्या 'तरूण भारत'च्या अंकात 'महात्मा गांधीचे निर्वाणीचे उद्‌गार !' या लेखात स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्याचे अंतिम ध्येय ठरविताना महात्मा गांधी म्हणतात 'मी निर्माण केलेल्या लढ्याच्या ज्वाला मला विझविता आल्या नाहीत किंवा त्यावर मला नियंत्रण ठेवता आले नाही, तर येथे सेवाग्राममध्ये स्वस्थ बसण्यापेक्षा त्या ज्वालात मी स्वतःला जाळून घेईल.'[७१]

मुंबई येथील ऑ. इ. कॉ. कमिटीची बैठक दि. ७ ऑगस्ट १९४२ रोजी गवालिया टँक मैदानावर भरलेली होती. यावेळी जवाहरलाल नेहरूनी 'चले जाव' चा ठराव मांडला. त्या अधिवेशनात महात्मा गांधीनी भाषण करून ईश्वराने आपल्याला लढ्याची अखेरची संधी दिली असल्याचे सांगितले व 'करेंगे या मरेंगे' असा मंत्र ८ ऑगस्टच्या समारोपच्या वेळी उच्चारला व १९४२ च्या क्रांतीला सुरूवात झाली.[७२]

९ ऑगस्ट १९४२ रोजी पहाटे पाच वाजून दोन मिनिटांनी मुंबईचे पोलिस आयुक्त बटलर यांनी बिर्ला भवनातून गांधीजी व महादेवभाई देसाई यांना अटक केली. तेव्हापासून देशातील काँग्रेस कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. बेळगांवातील प्रमुख अकरा काँग्रेस पुढाऱ्यांची धरपकड झाली. त्यामध्ये व्यंकटरेड्डी, आण्णासाहेब लठ्ठे, भिमराव पोतदार, शांतिनाथ इंगळे, जीवनराव याळगी, अनंतराव मंडगी, कृष्णराव याळगी, एस.एन.अंगडी, के.एस. पाटील व शंकरराव कामत यांना सकाळी हिंडलगा जेलमध्ये नेण्यात आले. बेळगावातील विद्यार्थ्यांनी तिरंगी झेंडे हाती घेऊन मिरवणूका काढल्या. काही ठिकाणी लाठी हल्ले झाले काही विद्यार्थ्यांना अटक झाली.[७३]

या लढयामध्ये बेळगावच्या काँग्रेस आघाडीच्या पुढाऱ्यांना बंदी बनवले. या सुमाराला पक्षाच्या वर्किंग कमिटीच्या बैठकीला गंगाधर देशपांडे यांच्या बरोबर तरूण भारतचे संपादक बाबुराव ठाकुर हे मुंबईला गेले होते. २१ सप्टेंबर १९४२ रोजी बेळगावला आल्यानंतर त्याना त्याच्या निवासस्थानी अटक करून हिंडलगा जेलमध्ये नेण्यात आले.[७४]

३.२.२.२० गांधीजी – व्हाइसरॉय लिनलिथगो पत्रव्यवहार–

१६ फेब्रुवारी १९४३ 'तरूण भारत'च्या अंकात महात्मा गांधी व व्हाइसरॉय यांच्यातील झालेला पत्रव्यवहार महात्मा गांधीजींच्या संमतीने हिंदुस्थान सरकारने प्रसिध्द केला. त्याचा विस्तृत गोषवारा 'तरूण भारत' मध्ये दिला आहे.

१) महात्माजींचे पहिले पत्र १४ ऑगस्ट १९४२ रोजी. व्हाइसरॉय यांना पाठविण्यात आले. या पत्रात सरकारने आपल्या पत्राची वाट न पाहता उतावळेपणाने काँग्रेस नेत्यांची धरपकड केल्याबद्दल सरकारला दोष दिला आहे.[७५]

२) दुसरे महायुध्द संपल्यावर हिंदुस्थानला स्वयं निर्णयाने संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचा वायदा करण्यात आला होता. त्या घटनेवरील गांधीजींची टीका सरकारला मान्य नाही. असे कळवून, हिंदुस्थान सरकार आपल्या धोरणाचा फेरविचार करणार नाही. असे लॉर्ड लिनलिथगोने २२ ऑगस्टला पत्र पाठवून गांधीजींना निक्षून सांगितले आहे.

३) २३ सप्टेंबर १९४२ रोजी गांधीजींनी व्हाइसरॉयला आणखी एक पत्र पाठवून काँग्रेसचे धोरण निर्भेळ अहिंसेचे असल्याची ग्वाही दिली. सरकारने या पत्राची फक्त पोहोच दिली.

४) ३१ डिसेंबरला व्हाइसरॉय यांना पत्र लिहून सरकार आपल्याला मित्र समजत नसून आपल्या शुध्द हेतू विषयी शंका घेत असल्याची गांधीजीनी खेदपूर्वक नोंद घेतली. गांधीजीचे आणि काँग्रेसचे नाव घेऊन व्हाइसरॉय यांनी १३ जाने १९४३ रोजी 'देशात हिंसाचाराचा ऊत आलेला असता गांधी व काँग्रेस नेत्यांनी निषेधाचा एक शब्द उच्चारला नाही. असा आरोप केला आहे.

५) १३ जानेवारी १९४३ रोजी लिनलिथगोच्या पत्राला १९ जानेवारीस उत्तर पाठविताना गांधीजीनी ९ ऑगस्ट नंतर जे घडले त्याचा निषेध केला खरा, पण त्याबद्दल त्यांनी सर्वस्वी हिंदुस्थान सरकारला जबाबदार धरले. २५ जानेवारीला या पत्राला उत्तर म्हणून कळवतात. ९ ऑगस्टचा ठराव मागे घेतल्यास आणि भविष्यकाळा संबंधी योग्य आश्वासने दिल्यास आपण विचार करू असे म्हटले.

६) सरकारने भरभक्कम पुरावा सादर करून आपल्या कृतीचे समर्थन करावे, काँग्रेसजनांनी खुनासारखे गुन्हे केले असल्यास सरकारने तो वेडेपणा करण्यास भाग पाडले असले पाहिजे, असे महात्माजीनी २९ जानेवारी व्हाइसरॉय याना पत्र लिहून कळवले. याच पत्रात

आपण ९ फेब्रुवारीपासून २ मार्चपर्यंत २१ दिवसांचे उपोषण करणार आहोत. अशी त्यांनी व्हॉइसरॉय यांना पूर्वसूचना दिली.[७६]

७) उपोषणाचा राजकीय कारणासाठी उपयोग करणे, म्हणजे दमदाटी करून आपल्याला हवे ते देण्यात प्रतिपक्षाला भाग पाडण्यासारखे कृत्य असून नैतिकदृष्ट्या त्याचे समर्थन करणे शक्य नाही. असे लिनलिथगोने ५ फेब्रुवारीच्या पत्रात स्पष्ट केले आहे. ७ फेब्रुवारीस गांधीजींनी लिनलिथगोस अखेरचे पत्र लिहिले. जे दोषी ठरतील त्यांना शिक्षा करावी, असे कळवले.

या पत्रांवरून असे स्पष्ट होते, की लिनलिथगोच्या म्हणण्यात काहीच तथ्य नव्हते, असे म्हणता येणार नाही. हिंसाचारास गांधीजींनी स्वतः कधीच उत्तेजन दिले नसले, तरी क्रांतिकारकानी हिंसेला जवळ केल्याचे दिसते.[७७]

१९४२ च्या आंदोलनात बेळगावातील बरेचसे काँग्रेस नेते तुरूंगात गेल्यानंतर विद्यार्थी वर्गानी चळवळीचा ताबा घेतला. यामध्ये श्री. नाथ पै., गजाननराव याळगी, बाबासाहेब देशपांडे, गोविंदराव कारेकर व गोविंद जोशी आदी विद्यार्थ्यानी दि. १० मार्च रोजी ठळकवाडी पोलिस स्टेशन जाळले. या सर्वाच्यावर खटले भरण्यात आले. पण डिस्ट्रीक्ट जज्ज श्री. लाड यांनी पुराव्या अभावी त्यांची निर्दोष मुक्तता केली.[७८]

या चळवळीत जिल्ह्यातील विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी टेलिफोन तारा तोडणे, रेल्वेचे रूळ उखडणे, पोलिस स्टेशन, पोस्ट ऑफिस जाळणे, टपाल लुटणे, सरकारी कचेरीतील कागदपत्रे नाहीशी करणे, पोलिसांच्या बंदुका काढून घेणे व खजिना लुटणे इ. गोष्टी या भागात केल्या. परिणामी बेळगाव व बेळगाव परिसर त्यावेळी तरूण भारतचे कार्यालय हे चळवळीचा मुख्य अड्डा आहे. अशी समजूत करून पोलिसांनी कार्यालयाकडे लक्ष केंद्रित केले असे दिसते.[७९]

बेळगाव भागातील विद्यार्थ्यांच्यावर वेगवेगळ्या आरोपाखाली चालवले जाणारे खटले, या बाबतची माहिती देऊन चळवळीशी संबंधीत व्यक्तीची नावे देऊन कार्याची दखल घेतली आहे. शहापूर येथील अल्पवयीन विद्यार्थ्यावरील खटले चालवून त्यांना ८–९ महिने सांगली सेंट्रल जेलमध्ये कच्चे कैदी म्हणून खितपत ठेवले होते. यांच्यावरील आरोप खालीलप्रमाणे

३.२.२.२१ आरोप नंबर –

१. शहापूर येथील मुलींच्या शाळेतील फर्निचर ता ५/१०/४२ रोजी जाळण्याचा प्रयत्न

२. सदर शाळेतील रेकॉर्ड ता १/३/१९४३ रोजी जाळण्याचा प्रयत्न

३. गोवावेशीतील सरकारी बंगला ता. ३०/१/४३ रोजी जाळण्याचा प्रयत्न

अ.क्र	नावे	आरोप नं.
१	विष्णू व्यंकसा पोवार	१
२	केशव उर्फ गुराप्पा शंकर बेळवाड	१,३
३	जोती धोंडी पाटील	१,३
४	रामचंद्र वासुदेव परब	२,३
५	मनोहर गोविंद मंडोळकर	२
६	प्रभाकर दामोदर जोशी	२
७	रामचंद्र विठ्ठल होनगेकर	३
८	महादेव हणमंत कोकरू	३
९	हरी गोविंद जोशी	३
१०	हसन खनालसाहेब भाई	३[८०]

हे कज्ञे शहापूर मॅजिस्ट्रेटकडे २८ एप्रिल ४३ रोजी दाखल झाले आहेत. तेव्हा या मुलाना बिनशर्त सोडून द्यावे. अशी विनंती केली होती.

३.२.२.२२ स्वतंत्र हिंदुस्थानाची घटना –

हिंदुस्थानच्या घटना परिषदेची बैठक दिल्ली येथे सुरू झाली. हिंदुस्थानातून सुमारे २०५ प्रतिनिधी उपस्थित होते. या घटना परिषदेचे काम सुरू झाले की कोणत्याही परकीय सत्तेचा हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही. असे पं. जवाहरलाल नेहरू यांनी जाहीर केले. घटना तयार करण्याच्या कामापासून ते पूर्ण होईपर्यंत 'तरूण भारत' ने सातत्याने लेख देऊन सर्वसामान्यापर्यंत घटनेच्या तरतूदी, कलमे व वाटचालीबाबत मार्गदर्शन केले आहे.[८१]

३.२.२.२३ क्रांतिवीर नाना पाटील 'लढा अटळ आहे, पुढील लढयाची तयारी करा !'

१५ डिसेंबर १९४६ रोजी बेळगाव येथील टिळक चौकातील सभेसमोर बोलताना क्रांतिवीर नाना पाटील म्हणतात, 'बेळगावकरानी केलेला हा सन्मान काँग्रेसचा समजतो माझा नव्हे, मला काही लोक बंडखोर म्हणतात, मी जर बंडखोरी केली असेल तर ती इंग्रज सरकारच्या विरोधात. मला लोक दरोडेखोर म्हणतात; होय ! मी दरोडेखोर आहे, हे दरोडे सावकार व जमीनदारावर घातले नाहीत. तर मी सातारा जिल्हयात रेल्वेवरील खजिना लुटला,

दुसरा दरोडा नंदुरबार येथील सरकारी खजिन्यावर घातला. पण मिळालेला सारा पैसा चळवळीसाठी उपयोगी केला. आमच्या ग्रामराज्यात ५००० तंटे मिटवले, सर्वसामान्यांच्यावर अन्याय होणार नाही याची आम्ही खबरदारी घेतो. सध्या हिंदु मुसलमान जमातीत यादवी आहे. तसेच ब्राह्मण ब्राह्मणेत्तर यांच्यात अंतर्गत संघर्ष आहे. हे सर्व इंग्रजांच्यामुळे सुरू आहे. तेव्हा सर्वांनी शेवटच्या टप्प्यात सावध राहिले पाहिजे. अशा प्रकारचे प्रकट व बोधक विचार क्रांतिसिंह नाना पाटलांनी मांडले आहेत.[८२]

३.२.२.२४ स्वातंत्र्य दिन–

रविवार २६ जाने १९४७ रोजी देशात सर्वत्र स्वातंत्र्याची सुप्रभात साजरी होणार आहे. प्रभातिपूर्वी ज्याप्रमाणे अंधःकार जास्तच निबीड होतो तशी या राष्ट्राची स्थिती आज झाली आहे. हिंदु–मुस्लिम झगडे देशात ठिकठिकाणी चालले आहेत. संप सुरू आहेत. महागाई बरोबर जातीय तेढ वाढले आहे. अशा आपत्तीतून चाललो आहे. अशा प्रकारची खंत व्यक्त करून 'स्वातंत्र्य दिनाचा आनंद– उत्सव कसा साजरा कारायचा' असा प्रतिप्रश्न 'तरूण भारत'ने केला आहे.[८३]

२५ मार्चच्या अग्रलेखात 'हिंदु–मुसलमान या दोन जमातितील दंग्याचे प्रकार हे देशाला लाजिरवाणी बाब झाली आहे. २३ मार्च रोजी पाकिस्तान दिन साजरा करण्याचा आदेश देताना बॅ. जिना म्हणतात. "हिंदुस्थान एक राष्ट्र कधीही होणार नाही ! पाकिस्तानचे तत्त्व मान्य करूनच हिंदु मुसलमानांची तडजोड होईल' देशाचे नवे व्हॉइसरास लॉर्ड मॉउटबॅटन यांच्या मते देशातील जातीय तंटे थांबले पाहिजे. हिंदु मुसलमानांचे प्रश्न कशा पध्दतीने हाताळायचे ते आम्ही पाहतो !"[८४]

'भारतीय काँग्रेस आता विसर्जित करा ! इंग्रज गेल्यावर आपण येथे समाजवादी सरकार स्थापन करू !' असे भाई जयप्रकाश नारायण यांचे बेळगावातील सभेत भाषण झाले.[८५]

३.२.२.२५ बेळगावातील स्वातंत्र्य उत्सव–

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला या दिवशी 'तरूण भारत' ने विशेषांक काढून बेळगाव व परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचे स्वतंत्र लेख दिले आहेत. यामध्ये कै. गोविंदराव याळगी, दे. भ गंगाधरराव देशपांडे, पुंडलीकजी कातगडे इ. व्यक्तिच्या कार्याचा

गौरव करून नवीन पिढी समोर यांच्या कार्याचा आदर्श ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.[८६] १४ ऑगस्टच्या मध्यरात्री स्वातंत्र्याचा उत्सव वेगवेगळ्या ठिकाणी कशा पद्धतीने साजरा केला. याबाबत स्थानिक बातम्या या सदराखाली गाववार माहिती दिली आहे. अनेक वर्षे अविरत चाललेल्या स्वातंत्र्य समराला यश आले. तो पहिला स्वातंत्र्य दिन भारतीय जनतेने आनंदाने, उत्साहाने साजरा केला. राष्ट्रभक्तांच्या अनेक पिढयांच्या त्यागाचे देशासाठी सुळावर गेलेल्या क्रांतिवीरांच्या आत्मसमर्पणाचे, लढयात बलिदान केलेल्या शेकडो राष्ट्रवीरांच्या हौतात्म्याचे हे स्वातंत्र्य फलित होते. राष्ट्रीय नेत्याप्रमाणेच भारतीय जनतेने अपूर्व उत्साहाने त्या स्वातंत्र्याचे स्वागत केले. स्वातंत्र्योत्तर काळातील शासकीय धोरण इतर घडामोडींच्या विषयी साप्ताहिक 'तरूण भारत' मध्ये भरपूर लिखाण झाले आहे.

स्वातंत्र्य दिनी बेळगाव कमिशनर व कलेक्टर कचेरीवर राष्ट्रध्वज उभा राहिलेला पाहण्यास लोकांची अलोट गर्दी, पोलिस व मिलिटरी दलांची राष्ट्रध्वजाला संयुक्त सलामी. या संपूर्ण दिवसाच्या कार्याचा आढावा देऊन इतर ठिकाणी कोणत्या पध्दतीने स्वातंत्र्य दिन साजरा झाला. याबाबत सखोल माहिती पुरवली आहे.

३.२.२.२६ पाकिस्तान निर्मिती –

भारत व पाकिस्तान ही दोन नवोदित राष्ट्रे ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटिश साम्राज्याच्या दास्यातून मुक्त होऊन उदयास आली. भारताचे धार्मिक आधारावर विभाजन करून स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती झाली.[८७]

पाकिस्तानातून लाखो हिंदू निर्वासित म्हणून भारतात आले. कमी जास्त प्रमाणात हिंदुस्थानातून मुसलमान पाकिस्तानात गेले. मोठया प्रमाणात दंगे धोपे झाले. म. गाधीजी यांनी दिल्ली येथून सायंकाळच्या प्रार्थनेच्यावेळी भाषणात म्हणाले. 'पाकिस्तानातून वातावरण शांत आणि सलोख्याचे होणार नसेल तर ! न्यायासाठी हिंदुस्थानाला युध्द पुकारावे लागेल.' असा गंभीर इशारा! पाकिस्तानी पुढाऱ्यांना दिला. या भाषणाला प्रत्युत्तर म्हणून गझनफरअल्ली खान म्हणतात 'आम्हाला युध्द नको आहे. पण युध्द करावेच लागले तर त्याला आमची तयारी आहे.! या बातमीचा समाचार घऊन 'पाकिस्तानची खुमखुमी हिंदुस्थानाला अडचणीची'?[८८] या मथळयाखाली पाकिस्तानचा ढोंगीपणा समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

३.२.३ काँग्रेसची अधिवेशने –

३.२.३.१ काकीनाडा काँग्रेस अधिवेशन–

महमंद अल्ली यांच्या नेतृत्वाखाली २८ डिसेंबर १९२३ मध्ये काकीनाडा (आंध्रप्रदेश) येथे भरलेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाला बेळगाव परिसरातील एक स्वंयसेवकाचे पथक गेले होते. त्या पथकाचे नेतृत्व 'तरूण भारत' संपादक बाबुराव ठाकुर यांच्याकडे होते. हे पथक बेळगावला परत आल्यानंतर एक सभा घेण्यात आली. यावेळी या अधिवेशनाचा इतिवृत्तांतचा खुलासा केला आहे. अधिवेशनातील काही मनोरंजक प्रसंग व अनुभव स्पष्ट करणारा लेख दिला आहे.[८९]

३.२.३.२ बेळगांव काँग्रेसचे अधिवेशन–

बेळगावातील ठळकवाडी येथे २६, २७ डिसेंबर १९२४ रोजी काँग्रेसचे ३९ वे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाला पंतप्रधान मोतीलाल नेहरू, चितरंजन दास, लाला लजपतराय, पं. मदनमोहन मालवीय व सरोजिनी नायडू राष्ट्रीय चळवळीच्या अग्रणी ॲनी बेझंट, स्वामी श्रध्दानंद, पं. जवाहरलाल नेहरू असे नामवंत नेते मंडळी बेळगावात आली होती.[९०] या अधिवेशनासाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून एक विहीर खोदण्यात आली. त्या विहिरीला काँग्रेस विहीर म्हणून ओळखली जाते. त्यावेळच्या काँग्रेस अधिवेशनाचे एकमेव स्मारक अशी ती विहीर आज ही प्रसिध्द आहे.[९१] त्या विहिरीचे उद्घाटन महात्मा गांधीच्या हस्ते करण्यात आले.[९२] या अधिवेशनाचे अध्यक्ष महात्मा गांधी व स्वागताध्यक्ष कर्नाटक सिंह गंगाधरराव देशपांडे होते. या अधिवेशनास एकूण १८४४ प्रतिनीधी हजर होते.[९३]

काँग्रेसच्या कार्यक्रमाचा 'जाज्ज्वल प्रचार केल्याने' तरूण भारत' हेच बेळगाव परिसरातील 'मुखपत्र' व राजकारणाचे मुख्य ऑफिसचे ठिकाण बनले. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात चिथावणी देणाऱ्या लेखांच्याबाबत ब्रिटिश सरकारला 'तरूण भारत' वृत्तपत्राला २००० रूपये जामीन भरावा लागला.[९४]

३.२.३.३ लाहोर काँग्रेस अधिवेशन –

'महात्मा गांधी' यांनी 'यंग इंडिया' च्या अंकात दिलेला लेख 'तरूण भारत' ने पुन्हा मुद्रित केला आहे. लेखात महात्मा गांधींनी आपली दुर्बलता मान्य करून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या गुणांचे कौतुक केले आहे. सर्वांनी निष्ठेने सहाय्य करण्याचा उपदेश दिला आहे.[९५]

२९ डिसेंबर १९२९ लाहोर येथे राष्ट्रीय सभेचे ४४ वे अधिवेशन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यांच्या भाषणाचा भाग 'तरूण भारत' च्या अंकात दिला आहे. 'हिंदुस्थानातील चळवळी या जगातल्या चळवळीचा एक भाग आहे. ब्रिटिश सरकार हे निर्दयी झाले आहे. त्यांना जर देशातून घालवायचे असेल तर सर्व हिंदुस्थानात सार्वत्रिक संप व कर बंदी खेरीज तरणोपाय नाही. या अधिवेशनात त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येय धोरणावर भर दिलेला आहे. 'राष्ट्रीय सभा स्वातंत्र्योन्मुख झाली. !'[९६]

स्टेट सेक्रेटरी मि. बेन यांनी पार्लमेंटच्या बैठकीत अत्यंत मधुर भाषण करून हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य मिळेल. असेच भाषण केले या भाषणाचा समाचार 'अस्ते कदम' व 'वसाहतीचे स्वराज्य' या लेखात घेतला आहे.[९७]

३.२.३.४ फैजपूरचे पन्नासावे काँग्रेसचे अधिवेशन –

२७ व २८ डिसेंबर १९३६ रोजी खानदेशात फैजपूर येथे पहिले ग्रामीण भागातील अधिवेशन झाले. शंकरराव देव, रावसाहेब अच्युतराव पटवर्धन, काकासाहेब गाडगीळ, एस.एम. जोशी व जेधे या मंडळीनी फार मोठे कष्ट घेऊन ग्रामीण भागात अधिवेशन यशस्वी पार पाडून हिंदुस्थानातील जाणकाराचा सर्व अंदाज कसा चुकीचा ठरला व या अधिवेशनाची फलश्रृती काय होती ? या बाबतचा लेख तरूण भारत च्या ५ जाने १९३७ च्या अंकात देऊन काँग्रेसची पुढची वाटचाल याबाबत चर्चा केली आहे. शेतकरी आणि कामगार यांच्या वर्गीय संघटनांना सामुदायिक सदस्यत्व देण्याचा ठराव याच अधिवेशनात पास झाला. त्याच प्रमाणे श्रमिकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून शेतीव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी काँग्रेस कटिबद्ध झाली आहे. असा विश्वास निर्माण करणारा हा लेख आहे.

महात्मा गांधी यांचे अधिवेशन काळातील भाषण ''व्हाइसरॉय स्वतः आमच्याकडे येतील, चरखाच आपल्याला स्वराज्य मिळवून देईल, अस्पृश्यता निवारणाबाबत विनंती करून भंगीकाम करणाऱ्या स्वयंसेवकांना उद्देशून भाषण केले. दक्षिण आफ्रिकेत मी असताना स्वतः भंगी काम केले आहे. या अधिवेशनाचा इतिवृत्त 'तरूण भारत' ते दिलेला आहे.[९८]

३.२.३.५ हरिपूरा काँग्रेस अधिवेशन –

१८ व १९ फेब्रुवारी रोजी गुजरातमधील हरिपुरा या ठिकाणी काँग्रेसचे ५१ वे वार्षिक अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून सुभाषचंद्र बोस हे होते. या अधिवेशनाला

बेळगाव विभागाचे काँग्रेस प्रतिनिधी म्हणून 'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर उपस्थित होते.[९९] ३५ कोटी लोकसंख्येचा हा देश ! प्रचंड क्षेत्र विस्तार आहे. पण प्रचंड लोकसंख्या हेच आमच्या दुर्बलतेचे आजवरचे कारण आहे. या स्वातंत्र्य देशात 'अल्प संख्याकांना समान वागणूक दिली जाईल' असे घोषित केले.[१००]

३.२.३.६ त्रिपुरी काँग्रेस अधिवेशन –

या अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी बाबुराव ठाकुर व जी. वे. याळगी यांची निवड झाली.[१०१] या अधिवेशनाचे अध्यक्षपद सुभाषबाबू यांच्याकडे होते. ते आजारी असल्याने त्यांचे भाषण वाचून दाखवण्यात आले. या अधिवेशनातील काही सदस्यांचा सुभाषबाबू आजारी असल्याचे सोंग करीत आहेत, असा सूर होता. या अधिवेशनाची माहिती १४ मार्चच्या अंकात दिलेली आहे.[१०२]

३.२.४ अन्याया विरोधात 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे कार्य–

३.२.४.१ रेल्वे प्रशासन –

सर्वसामान्य वर्गाचे जिव्हाळ्याचे प्रश्न मांडताना 'तरूण भारत'ने रेल्वे प्रशासनाबाबत सातत्यांने आवाज उठवून रेल्वे प्रशासनाला जागे करण्याचे प्रयत्न केले. 'तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल ! रेल्वे अधिकाऱ्यांची अक्षम्य बेफिकिरी ! मिलीटरीच्या राखीव डब्यातून निम्म्याहून अधिक जागा रिकाम्या ! सर्वसामान्यासाठी प्रवाशांची सुलभ सोय व्हावी, तिकीट ऑफिस हे संबंध दिवस उघडे ठेवून प्रवाशांची सोय करावी. तसेच रेल्वे स्टेशनवरील पोलिस व हमाल यांच्या संगनमतानी प्रवाशांना मारहाण, लुटमार होत असते, याकडे लक्ष द्यावे. अशा प्रकारच्या सुचना देऊन मागण्या केल्या आहेत.[१०३]

३.२.४.२ इंग्रज व राजकीय कैदी आणि न्यायालयीन कामकाज –

लाहोरच्या तरूंगात दत्त–भगतसिंग सह वीस बावीस राजकीय कैद्यांनी आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी अन्न त्याग सुरू केला होता. या राजकीय कैद्यांच्या मागण्या म्हणजे प्रकृतीस मानवेल असे अन्न, सोसवेल असे काम, वाचावयास पुस्तके अशा प्रकारच्या किरकोळ मागण्या घेऊन २० दिवस अन्नत्याग केल्यामुळे प्रकृती गंभीर झाली होती. या लेखात 'तरूण भारत'ने 'उदार व न्यायी म्हणून मिरविणाऱ्या इंग्रजांच्या वृत्तीवर टीका केली. 'इंग्रज हा बिन काळजाचा कोणी प्राणी आहे की काय ? अशी मनात शंका डोकावू लागते.' असे

चित्र रेखाटून राजकीय कैद्यांच्या हालाचे वर्णन केले आहे.[१०४]

"वीर जतीन्द्र ! आम्ही शूर मर्द क्षत्री नाही भिणार मरणाला !" या संपादकीय लेखात लाहोरच्या कटातील आरोपीना तुरूंगातील वाईट वागणुकीबद्दल निषेध दर्शविण्यासाठी अन्नत्याग केला. त्यापैकी एक आरोपी जतीन्द्रनाथ दास हा ६२ दिवसाच्या उपोषणानंतर तो १३ ऑक्टोंबर १०२९ रोजी मृत्यू पावला. या घटनेने सर्व देशभरात खळबळ उडाली. 'मातृभूमीसाठी सैतानी राज्यशासन पध्दतीच्या विरूध्द दैवी आत्मिक बलाने टक्कर देऊन जगाच्या इतिहासात आपले नाव अजरामर करून ठेवणारा पहिला अन्नत्यागी वीर' म्हणून या लेखात प्रशंसा केली आहे.[१०५]

३.२.४.३ ब्रिटिश न्याय पद्धत–

स्वातंत्र्यपूर्व काळात न्यायालयीन कामकाज कशा प्रकारे चालत होते. त्या संदर्भातही 'तरूण भारत' साप्ताहिकाने दखल घेतली आहे. त्या संदर्भात अनेक बातम्या या साप्ताहिकात पहावयास मिळतात. ट्रेझरीवर हल्ला करणे, बॉम्ब तयार करणे, सरकारी अधिकाऱ्यांचा खून करणे, आगगाडया उलथून पाडणे, हिंदुस्थानात बंड उभारणे, बनारसचे सी. आय. डी. इन्स्पेक्टर मि. बॅनर्जी यांचा खून, लाहोरचे पोलीस सुपारिटेंडेटचा खून इ. आरोपावरून खालील प्रमाणे शिक्षा झाल्या.

फाशी – भगतसिंग, राजगुरू, सुखदेव

जन्मठेप – (काळेपाणी) विजयकुमार सिंह, शिववर्मा, जयदेव, गंगाप्रसाद, महावीर सिंग, किशोरीबल, कमलनाथ तिवारी

सक्तमजूरी – कुंदनलाल ७ वर्षे ६ महिने अंधार कोठडी

निर्दोष – देशराज, अजयकुमार घोष, जतिद्रनाथ सन्यास

माफीचे साक्षीदार – हंसराज, जयगोपाल घोष, मनमोहन बॅनर्जी, ललीत कुमार मुखर्जी

फरारी आरोपी – चंद्रशेखर आझाद, कालीचरण भगवती, यशपाल, सदगुरू दयाळ

अशी लाहोर खटल्याच्या बाबतीत माहिती सदर साप्ताहिकाने छापली आहे.[१०६]

३.२.४.४ पांगिरे प्रकरण (काशीबाई हणबर प्रकरण)–

१९४४ च्या पांगिरे प्रकरणामुळे (काशीबाई हणबर) 'तरूण भारत' बेळगावचे नाव सार्वत्रिक परिचित झाले. कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीतील पांगीरे (तालुका – गडहिंग्लज)

गावच्या सौ. काशीबाई हणबर हीचा मुलगा मलाप्पा आप्पाजी हणबर हा १९४२ च्या चले जाव आंदोलनात भाग घेऊन भूमिगत झाला होता.[१०७] मुलाचा ठावठिकाणा सांगत नाही. म्हणून काशीबाईला फौजदार हरी तातोबा इंगवले याने दिनांक १९–१०–१९४४ रोजी काशीबाई हणबरला नग्न करून कातडी पट्ट्याने रक्तबंबाळ होईपर्यंत मारून काढले. ती तीन महिन्याची गरोदर आहे. ते तीन सांगून सुध्दा त्याने ता. २०–१०–१९४४ रोजी काशीबाईच्या जननेंद्रियात तिखट वापरून मानवतेला काळीमा फासणारा प्रकार केला.[१०८] फौजदार इंगवलेच्या अत्याचारामुळे सौ. काशीबाईला रक्तस्त्राव होऊन गर्भपात झाला.[१०९] या अन्याया विरूध्द न्याय मिळावा म्हणून तिने कोल्हापूर संस्थान पंतप्रधान मा. ना. मिचेल व पोलिस प्रमुख मि. साद्री यांच्याकडे अर्ज केला.[११०] पण संस्थानी सरकारचे धोरण फौजदार श्री. इंगवले यास पाठीशी घालणारे होते. तिची एलबर्ट हॉस्पिटल कोल्हापूर मध्ये वैद्यकीय तपासणी करून तिला काहीच होत नाही. असे सांगून त्यांनी तिची बोळवण केली.[१११]

या पोलिसी अत्याचारास सर्व प्रथम वाचा फोडण्याचे कार्य निर्भिडपणे, कोणत्याही दबावास बळी न पडता 'तरूण भारत' या वृत्तपत्राने दि. २४ ऑक्टोंबर १९४४ रोजीच्या अंकात पहिल्याच पानावर "राणीच्या राज्यात स्त्रीच्या अब्रुचे धिंडवडे ! एका अबलेची करूण कहाणी !" या मथळ्याखाली प्रथमच वाचा फोडली.[११२] स्वतः राणी सरकारने लक्ष घालून संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना शासन करावे अशी मागणी केली. तरूण भारत फक्त बातम्या देऊन थांबला नाही. तर तिला न्याय मिळवून देण्यासाठी कायम तिच्या पाठीशी उभे राहीला.

३.२.४.५ राजकीय कैद्यांचे हाल–

'हिंडलगा तुरूंगातील राजकीय कैद्यांचे हाल.' या शिर्षकाखाली तुरूंग प्रशासनाचा सावळा गोंधळ उजेडात आणणारा लेख दिला आहे. श्री. दत्तात्रय रामचंद्र गोखले हे ११ जून १९३० रोजी राजकीय कैदी म्हणून सुटून आले. तेव्हा त्याने 'तरूण भारत' या वृत्तपत्रात स्वतःच्या जबाबीने हिंडलगा जेल मधील जेलरचा कारभार सर्वांच्या समोर उघड केला. या तुरूंगात मर्यादेपेक्षा दुय्यम कैदी कोंबले आहेत. शौचालयाची गैरसोय, पाणी नाही. पोटभर कधी अन्न नाही. झाडाच्या पानाची भाजी बेचव, कैद्यांच्याकडून कष्टाची कामे करून घेतली जातात. हे थांबवून राजकीय कैद्यांना सन्मानपूर्वक वागवावे.[११३] नाहीतर जनआंदोलन उभे करू अशी धमकी देणारी बातमी प्रसिध्द केली. याबाबतची बातमी उजेडात आणून जेल प्रशासनाला

ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न 'तरूण भारत'ने केला. व राजकीय कैद्यांना न्याय मिळवून दिला.[११४]

३.२.४.६ लखनौ जेलमधील अत्याचाराची उघड व निःपक्षपाती चौकशी करा–

१८ ऑगस्टमध्ये लखनौ जेलमधील १७०० राजकीय कैद्यांच्यावर लाठी हल्ला झाला. याबाबत निषेध नोंदवणारी बातमी तरूण भारतने दिली. प्रशासनाच्या धिक्काराची बातमी व बेळगावमध्ये निषेध सभा घेऊन सरकारचा धिक्कार केला. 'सरकारने राजकीय कैद्यांच्यावर मनगटाचा जोर न दाखवता हिटलर विरूध्द काय दाखवायचा तो दाखवा' असा जाब विचारला आहे.[११५]

३.२.४.७ करवीरचे (कोल्हापूर) संस्थान –

कोल्हापूर संस्थानाचे पंतप्रधान (रिजंट) दादासाहेब सुर्वे हे सेवानिवृत्त होणार तेव्हा त्यांच्या जागेवर मराठा येणार की मराठेत्तर बसणार हा मराठी समाजाचा चिंतेचा विषय होता. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानी प्रजेच्या चळवळीचे प्रमुख नेते बाळकृष्ण शिखरे यांच्या निमंत्रणावरून प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बेळगावमधून आण्णासाहेब लठ्ठे व बाबुराव ठाकूर हे दि. ९ जानेवारी १९४१ रोजी कोल्हापूरात आले. काही ठराविक निमत्रितांची खाजगी बैठक श्री. राधाकृष्ण मंदिरात घेण्याचे ठरले. याच सुमारास एक हजार लोकांचा मोर्चा आला आणि या मोर्चेकऱ्यांनी लठ्ठेचा धिक्कार ! शिखरे यांच्यावर बहिष्कार, अशा घोषणा देत मंदिरात प्रवेश करून बैठक उधळून लावली. त्यावेळी मराठा लीग लोकांनी रा. बा. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा घेतली. शिखरे व लठ्ठे हे मराठा बहुजन समाजात दुही माजवत आहेत. यांचा हा स्वार्थी डाव हाणून पाडला पाहिजे असे ठरवून हेच मोर्चेकरी बागलांच्या घरी चालून गेले त्यावेळी लठ्ठे व ठाकूर हे बागलांच्या घरी होते. या व्यक्तिना पाहून मोर्चेकऱ्यानी धिक्काराच्या मोठ–मोठयानी घोषणा दिल्या व यांची बैठक उधळून लावली. हा झाला प्रकार 'तरूण भारत' च्या अंकात सविस्तर वर्णन करून मराठा जातीच्या लोकानी प्रजापरिषदेला कसा विरोध केला व लठ्ठे कसे बेळगावला परत आले, हे वर्णन केले आहे.

या मोर्चात कोल्हापूरातील मराठा कार्यकर्त्यापेक्षा बेळगावच्या आसपासच्या ब्राह्मणेत्तरानीच सहभाग अधिक घेतला होता. असा आक्षेप 'तरूण भारत'ने घेऊन गाववार कार्यकर्त्यांची नावे व सहभाग सर्वांच्या नजरेला आणून देण्याचा प्रयत्न केला. या सर्व

कारस्थानाच्या मागे बेळगावचा 'राष्ट्रवीर' ग्रुप होता हे स्पष्ट केले आहे.[११६]

आण्णासाहेब लठ्ठे यांनी कोल्हापूरच्या रेसिडेंटला पत्र पाठवून झालेला प्रकार कळविला. "मी मराठ्यांना बाजूला सारून कोल्हापूरातील संस्थानमध्ये वरचे पद मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. असा संशय आल्यामुळे तो प्रकार घडला. या लठ्ठेंच्या पत्राचाच परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानात सुर्वे नंतर पंतप्रधान इ. डब्ल्यू पेरी, मग मिचेल आणि नंतर सर थॉमस ऑस्टिन अशा तीन गोऱ्या साहेबांची नेमणूक केल्याने मराठा समाजाला सहा वर्षे पंतप्रधानपद गमवावे लागले." या एकूण प्रकरणातून ब्राह्मण – ब्राह्मणेतर वादाचा परिणाम स्पष्ट होतो.[११७]

'तरूण भारत' ने कोल्हापूर प्रजापरिषदेवरील दोन वर्षे आठ महिन्यांनी बंदी उठवण्यात आल्याची बातमी देऊन ब्राह्मणेत्तर गटाला व राष्ट्रवीरकराना खिजवण्याचा प्रयत्न दिसतो. या बातमीत 'राष्ट्रवीरकारांचा मराठा समाज कोणता व त्याचा आक्रोश कोणासाठी' तर दुसऱ्या एका मथळ्यात म्हणतात. 'कोल्हापूर प्रजेच्या हिताविषयी अविरतपणे ढोल वाजविणारे राष्ट्रवीर कार आता मूग गिळून गप्प का बसलेत, प्रजा परिषदेवरील बंदी उठली ही गोष्ट त्यांना पसंत नाही. असा अर्थ समाजावा काय? असा जाब विचारला आहे.'[११८]

३.२.४.८ रामदुर्ग संस्थानात भयंकर अत्याचार –

दि. ६ एप्रिल रोजी रामदुर्ग येथील ध्वजस्तंभ रामदुर्ग संस्थानाने काढून टाकल्यामुळे संस्थानी प्रजेत असंतोषाचा भडका उडाला याच सुमारला प्रजा परिषदेच्या अध्यक्षांना श्री. मुनबळी यांना अटक झाली म्हणून ७ एप्रिल रोजी रामदुर्ग जनतेने तुरूंगाकडे धाव घेतली व या लोकांना थोपवण्याचा प्रयत्न होताच मोर्चेकऱ्यांच्या दंग्यात ८ पोलिस ठार झाले व मोर्चेकरीही जखमी झाले. यावेळी 'तरूण भारत'ने संस्थानिकांची बाजू उचलून धरून या प्रकरणात निःपक्षपातीपणे चौकशी व्हावी, हा आग्रह धरला ब्राह्मण– ब्रह्मणेतर वादाचा पदर जोडून संस्थानिकांच्या बाजूने सातत्याने पाठपुरावा केल्याचे दिसते. उलट अर्थाने कोल्हापूर संस्थांनिकाच्या विरोधात भूमिका घेवून प्रजा परिषदेच्या बाजूने उभा असणारा 'तरूण भारत' दिसतो.[११९] १/१०/१९४६ च्या अग्रलेखात सहभागी संस्थानातील वतनदारी कधी नष्ट होणार? असेच राहिले तर सहकार नेस्तनाबूत होईल सरकारने वेळीच सावध रहावे ! असा इशाराचा अभ्यासपूर्वक लेख दिला आहे.[१२०]

३.२.४.९ 'तरूण भारत' कचेरीची झडती ! –

दि. ४ जाने १९४१ रोजी 'तरूण भारत' कचेरीची झडती अचानक घेण्यात आली. ब्रिटिशांच्या कृतीच्या विरोधात कोणत्याही प्रकारचे लिखाण होणार नाही. याबाबत बेळगाव पोलिसांनी 'तरूण भारत' कचेरीची झडती घेऊन 'आक्षेपार्ह लिखाण होणार नाही याची खात्री करून घेतली.'[१२१]

३.२.५ दुसऱ्या महायुध्दाच्या घडामोडी –

१ सप्टेंबर,१९३९ रोजी हिटलरच्या नाझी फौजांनी पोलंडवर आक्रमण केले आणि दुसऱ्या जागतिक महायुदधाला तोंड फुटले. हे युध्द अर्थातच अनपेक्षित नव्हते. जवाहरलाल नेहरू अगोदरपासून असे युद्ध होणार असल्याचा इशारा कॉग्रेसच्या व्यासपीठावरून देत होते. १९३६ च्या फैजपूर कॉग्रेसमध्ये युद्धविषयक ठरावही मांडण्यात आला होता. असे जुने संदर्भ देऊन युद्धविषयक घडामोडीकडे हिताच्या दृष्टीने अर्थ लावण्याचा प्रयत्न दिसतो.

शुक्रवार ता. ३ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मन सैन्यानी पोलंडच्या तिन्ही सरहद्दीवर एकदम हल्ला करून सुरूवात केली. या युध्दात काही प्रसंगी स्वच्छेने वा आगतिकतेने प्रत्येक राष्ट्रास युध्दाच्या खाईत उडी घ्यावी लागली. शेवटी १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या शरणागतीने महायुध्द थांबले. सन १९३९ ते १९४५ या दीर्घकाळात चाललेले हे युध्द अनेक दृष्टीनी परिणामकारक व वैशिष्टपूर्ण होते युध्दाची सुरूवात, स्वरूप, व्याप्ती व वाटचाल या विषयक घडामोडींचा तपशील 'तरूण भारत' या साप्ताहिकाने स्वतंत्र रकाने छापून युध्दविषयक बातम्या या सदराखाली युध्दाची माहिती दिली आहे. जर्मनीने इंग्रज–फ्रेंचचा निर्वाणीचा खलिता फेटाळून लावला म्हणून इंग्लंड व फ्रान्सने जर्मनीविरूध्द युध्द पुकारले. 'ब्रिटिशांच्या शस्त्रास्त्रांच्या चढाईस शस्त्रानेच प्रतित्त्यूर देऊ' अशी जर्मनीने घोषणा दिली.[१२२]

अमेरिका, बल्गेरिया आणि जपान तटस्थ, ॲथेनिया बोट बुडाली १००० उतारूना जलसमाधी, पोलंडच्या सरहद्दीवर युध्दाची धुमचक्री ! डॅझिंग व कॉरिडर काबीज, रशियाने पोलंडवर चढाई करून पोलंडचे विभाजन केले.[१२३] रशिया जर्मनीच्या बाजूने पडल्याने हिंदुस्थानला धोका ! वारसा पडले; पण शौर्याने लढले पश्चिम सरहद्दीवर वादळापूर्वीची शांतता–सिजफ्रीड तटबंदीवर फ्रेंच तोफांचा भडीमार रशिया–जर्मनीची पुढील धोरणाविषयीची वाटाघाटी–बाल्कन राष्ट्रांची पाचावर धारण जर्मनीची कोंडी करण्याचा ब्रिटनचा डाव हुकला.[१२४]

हॉलंड–बेल्जियम खलास ! जर्मनीची भयानक मुसंडी – पॅरिस पडले ! फ्रेंच मंत्रिमंडळाने राजीनामा दिला.[१२५] शेवटी हिटलरने फ्रान्सवर पिस्तूल रोखले ! फ्रान्सने तहनाम्यावर सह्या केल्या ! तरीही फ्रेंचांच्या स्वातंत्र्याकरिता ब्रिटिश हे अखेरपर्यंत लढणार निर्वाळा[१२६] हिटलरची इंग्लडला धमकी ! समेट करा नाहीतर नाशास तयार व्हा ! युगोस्लाव्हियातील रक्तहीन क्रांती! हिटलरचे बेत फसले ! इटलीची जहाजे बुडविली, तुर्कस्थान–रशियाचा अनाक्रमणाचा करार.[१२७] जर्मनीकडून रशियाचा विश्वासघात, जपानच्या पर्ल–हर्बरवर आकस्मिक हल्ल्यात अमेरिकेच्या आरमाराचे प्रचंड नुकसान झाले. अमेरिकेने चिडून जपानविरूध्द युध्द पुकारले.[१२८] जपान भारताच्या सीमेवर येऊन ठेपला ! सावधान

दोस्त राष्ट्रांची इटली–जर्मनी–जपान प्रतिकारार्थ उपाययोजना कांबेक (कॅनडा) येथे चर्चिल व रूझवेल्ट यांची युध्द परिषद झाली. या परिषदेत जागतिक युध्द कार्याचा आढावा घेण्यात आला तथापि या परिषदेतील चर्चेचा भर जपानविरोधी मोहिमेवर होता. असे मत 'तरूण भारत'कार स्पष्ट करतात.[१२९]

३.२.५.१ अखेर जर्मनी शरण आला ! युरोपातील युध्द संपले !–

मुसोलिनी याला इटालीयन देश बांधवानी ठार मारले, तर जर्मनीचा हिटलर बर्लिनमध्ये दि. ७ मे १९४५ रोजी मरण (आत्महत्या) पावला, त्यामुळे युरोपातील युध्द संपले असा निर्वाळा देणारी बातमी तरूण भारत ने दिली आहे.[१३०]

३.२.५.२ जपानची शरण !–

जर्मनी व इटली यांनी शरणागती पत्करली असली, तरी महायुध्दाची अद्याप इतिश्री झाली नव्हती. जपान इंग्लंडबरोबर लढतच होता. जपानच्या विजयाची घोडदौड ब्रह्मदेशापर्यंत येऊन धडकली आहे. भारतीय सीमेला धोका दिसत होता. जपानने शरणागती पत्करण्यास नकार दिला. अमेरिकेने तात्काळ दोन अणुबॉम्ब हिरोशिमा (६ ऑगस्ट) व नागासाकी (९ ऑगस्ट) या शहरांवर टाकले. दोन्ही शहरे जळून बेचिराख झाली. जपानला यापुढे युध्द चालविणे अशक्य होते. म्हणून १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपान शरण आला. भारताचा धोका टळला. असा संपूर्ण युध्दाचा वृत्तांत देऊन जपानच्या शरणागती ने युध्द थांबले. 'तरूण भारत' ने बातमी दिली आहे.[१३१]

३.२.५.३ आंतरराष्ट्रीय बातमी –

इंग्लडमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मजूर पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले त्यामुळे हिंदुस्थानच्या जनतेच्या आकांक्षा अधिक वृध्दावल्या आहेत. इतिहासाची पुनरावृत्ती होणार काय ? असा सवाल केला आहे.[१३२]

३.३ दै. 'तरूण भारत' चे राजकीय कार्य (१९४८ ते १९७९)–

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः संस्थानच्या विलीनीकरणानंतर देशात, त्याच बरोबर बेळगाव विभागात अनेक छोटे–मोठे राजकीय लढे झाले. भारत स्वातंत्र्यानंतर लगेचच मं. गांधीजींची हत्या त्यानंतर निर्माण झालेले जाळपोळीचे सत्र, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, महाराष्ट्र –कर्नाटक सीमा प्रश्न, गोवा मुक्ती संग्राम, चीन युध्दाचे राष्ट्रीय संकट, काश्मिर प्रश्न, भारत देशाचे आंतरराष्ट्रीय संबंध इ. प्रस्तुत घटकाबाबत दै. 'तरूण भारत' ने स्वीकारलेली भूमिका या प्रकरणात स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणार आहे.

३.३.१ महात्मा गांधीजींची हत्या आणि जाळपोळ –

स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद उत्सव देशात साजरा होत असताना अवघ्या सहा महिन्यातच ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधीजीची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली.[१३३] राजकीय मतभेदातून निर्माण झालेल्या वैराला असे हे हत्येचे स्वरूप प्राप्त व्हावे; ही अत्यंत दुर्दैवी व अत्यंत तिरस्कारणीय गोष्ट होती. केवळ म. गांधी या एका व्यक्तीची ही हत्या नव्हती; तर लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या एका महान प्रणालीवर केलेला तो हल्ला होता. अशा प्रखर शब्दात श्रध्दाजंली अर्पण करून झालेल्या घटनेचा निषेध नोंदवत म. गांधी यांच्या विषयीचा सद्भावना प्रेम व्यक्त करणारा लेख, दि. ३ फेब्रुवारीला 'तरूण भारत' मध्ये दिला आहे.[१३४] दुसऱ्या लेखात दुःखाच्या महासागरात बुडालेला हिंदुस्थान ! 'नथुराम गोडसेच्या गोळ्याना महात्माजी बळी पडले ! म. गांधीजीच्या खुनानंतर थोडयाच अवधीत मारेकऱ्यांचे नाव जाहीर झाले; हे समजताच महाराष्ट्रात एकच हलकल्लोळ माजला. स्वातंत्र्य संग्रामात मोठया मनाने जगलेल्या महाराष्ट्राला हा मोठा कलंक होता.[१३५] अशा प्रकारचा खेद व्यक्त करणारा लेख दिला आहे.

३.३.२ बेळगांव शहरातील परिस्थिती –

शनिवार रात्री भरलेल्या जाहीर सभेत म. गांधीचा खून करणारी व्यक्ती ही नथूराम विनायक गोडसे जातीने ब्राह्मण आहे. हे समजल्यानंतर लोकांच्यात क्रोधाग्नी भडकला होता. रविवारी सकाळी मुंबई व पुण्यातील ताजी वर्तमानपत्र लोकांच्या हातात पडताच अधिकच भडका उडाला. 'एका बामणाने महात्मा गांधीला मारले, तेव्हा सगळ्या बामणांनाच नाहीसे करा ! अशा प्रकारचा अपप्रचार होवू लागला. त्यामुळे उभ्या महाराष्ट्रभर जाळपोळ, लुटालुट याचे सत्र सुरू झाले. सुरूवातीपासूनच बेळगांव व बेळगांव परिसरात ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर वादामुळे खोलवर रूजली होती. या प्रसंगाने चांगलेच खतपाणी मिळाले. आणि त्यातून सर्वत्र लोकप्रक्षोमाने पेट घेतला.[१३६] बेळगांव शहरात गांधी हत्येसंबधीची प्रतिक्रिया संबधित दिलेल्या लेखातील माहिती वरून स्पष्ट होते. सुरूवातीलाच बेळगाव शहरात संचारबंदी व १४४ कलमांचा अंमल केल्याने मोठा अनर्थ टळला. याबाबत प्रशासनाचे कौतुक केले आहे.[१३७] मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू महासभा यांच्या पुरस्कर्त्यांवर हल्ले चढवण्याचे प्रयत्न झाले. यामध्ये डॉ. साठे यांच्या दवाखान्यावर हल्ला करून मोडतोड केली. नरगुंदकर के. सी व पारणकर यांच्या घराव जमावांचे हल्ले झाले. रा. स्व. संघाचे प्रमुख श्री जिगजिन्नी वकील यांच्या घरावर जमावाचा हल्ला झाला त्यावेळी प्रक्षुब्ध जमावाला रोखण्यासाठी श्री बाबुराव ठाकुर, माळगी व मंडगी यांनी पोलिसांची मदत घेऊन, जिगजिन्नीची सुटका करून घेतली. परंतु रा. स्व संघ शाखा बेळगावचे सचिव श्री काकडे यांना मात्र रक्तबंबाळ होईपर्यंत जमावाने मारले. दाणे गल्लीतील केशकामत यांचे धान्याचे दुकान फोडून लूट केली. मोडकबाई यांच्या घरी घुसून नासधूस केली. या बाई हिंदुसभेच्या कार्यकर्त्या होत्या. दुपारी बेळवी यांच्या घरावर हल्ला करून त्यांना घराबाहेर काढले या वेळी जमावासमोर बेळवी यांनी गांधीजींच्या दुर्दैवी खूनाबाबत खेद व्यक्त केला "मी गांधीच्या निधनाने अतिशय दुःखी झालेलो आहे." तेव्हा जमावाने त्यांना सोडले. पुढे डॉ. बैलुर यांच्या दवाखान्यात शिरून मोडतोड करून मोठे नुकसान केले. अशा प्रकारच्या बातम्या तरूण भारतने प्रकाशित केल्याने पोलिसांना हल्लेखोर शोधणे सुलभ झाले. डि. मॅजिस्ट्रेट श्री जाधव यानी १४४ कलमाचा अंमल ताबडतोब जारी करून जाळपोळ व लुटालूट आटोक्यात आणली. हा संचारबंदी बेळगाव शहरात पुढे आठ दिवस ठेवण्यात आला.[१३८] त्यामुळे मोठा अनर्थ टाळणे शक्य झाले. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने 'या लूट–

जाळपोळीमागे पध्दतशीर कट आहे' या मथळ्याचा अग्रलेख लिहिला होता. "कोल्हापूर हद्दीतून मोटार ट्रॅक्समधून रॉकेलचे डबे घेऊन गुंड हुपरीमार्गे कारदग्यात गेले. तेथून त्यानी जाळपोळीला सुरूवात केली. नेसरी–नूल वगैरे भागातून दड्डीकडे व चंदगड महालात गुंड आले. कागलकडून सौदलग्यास आले. शिपूरहून निपाणी भागात आले. मिरज–मालगावहून अथणी भागात उतरले. या सर्व टोळ्यांनी इकडील गुंडांच्या साह्याने लूट व जाळपोळ करण्यास सुरूवात केली."[१३९] तेरदाळ येथे सहा ब्राह्मणांना जाळून ठार मारण्यात आले. त्यांची नावानिशी यादी 'तरूण भारत' ने प्रसिद्ध केली.

३.३.३ चंदगड मधील लुट व जाळपोळ–

अडकूर – १. नारायण यशवंतराव पाटणेकर, घर लुटले व जाळले.

२. नीळकंठ कृष्णा सोहोनी, दुकान व घर लुटले.

३. सखाराम पांडूरंग जोशी, घर लटले.

विझणे – १. गोविंद रामचंद्र विझणेकर, वाडा लुटला व जाळला.

मुगळी – १. लक्ष्मीबाई भ्र. नरसिंह देशपांडे, घर लुटले

२. धोंडी व्यकोजी देशपाडे; घर लुटले

कानडी– १. नारायण हरी नागगौंडा – घर लुटले

इब्राहिमपूर– १. कृष्णाजी नीळकंठ शिरोळकर, घर लुटले व जाळले.

२. अनंत नारायण शिरोळकर, घर लुटले व जाळले.

३. वासुदेव नारायण शिरोळकर, घर लुटले व जाळले.

गवसे – १. जयवंत गणेश शिरोळकर, घर लुटले व जाळले.

पुंदरे – १. गुंडू शंकर उसपकर, घर लुटले

हिंडगाव – १.चिटणीस यांच्या घरावर जमावाचा हल्ला होत असताना त्या ठिकाणी पोलिसपथक दाखल झाल्याने जमाव पांगला व त्यातील ६६ हल्लेखोरानी जेरबंद करण्यात आले.

डुक्करवाडी– १. श्रीपाद रामचंद्र देशपांडे

२. धोंडी गोविंद देशपांडे (वकील)

३. निळकंठ लाडोबा हवालदार – मास्तर

४. शंकर रामचंद्र देशपांडे

५. शंकर वामन कामत

६. काशीबाई हरी कृष्णा देशपांडे

या सर्वाच्या घरातील धान्य व चीज वस्तूची लूट करून जाळपोळ केली.

बागिलगे – १. रामचंद्र नीळकंठ देशपांडे यांचे घर लुटले व जाळले यावेळी पोलिसांनी आठ हल्लेखोर इसमाना पकडले.

तडशीनहाळ – १. बळवंतराव रेघे, घर लुटल व जाळले

कारवे – १. जनार्दन मांजरेकर, घर व दुकान लुटले

किणी – १. काशिनाथपंत कुलकर्णी यांचे घर लुटले व जाळले

कालकुंद्री – कालकुंद्रीकर यांच्या घरातील सर्व चीजवस्तू फर्निचर, भांडी, धान्य वगैरे सर्व लुटून नंतर आग घराला लावण्यात आली.

कागणी – येथील एकाच ब्राम्हणाचे घर लुटून जाळले.

कुदनूर – कुदनूर गावामध्ये एकूण ६ कुलकर्णीची घरे होती पण गावकऱ्यांच्यात एकी असल्याने हल्लेखोराना गावात घेतले नाही. त्यांना पिठाळून लावले म्हणून त्या घरांचे संरक्षण झाले.

कुमरी – ब्राहमणाची चार घरे लुटून जाळण्यात आली. त्या घरातील मंडळीना बायका मुलाना अंगावरच्या कपडयानिशी गावाबाहेर काढले.

दड्डी – (ता. हुक्केरी) – २२ घरे लुटून जाळण्यात आली.

गडहिंग्लज पेटा –

डॉ. गुणे, डॉ. आपटे, गिझवणेकर वकील व श्रीनिवासराव कुलकर्णी वगैरेंची ६ घरे लुटली व जाळली.

मुत्नाळ :– अण्णासाहेब देशपांडे इनामदारांचा वाडा लुटला व जाळला. त्यांच्या घरच्या मंडळीनां फक्त असणाऱ्या अंगावरच्या कपडयावर घर सोडावे लागले. या खेरीज घरे जाळली.

बिद्रेवाडी :– (हेळेवाडी) इनामदार श्रीपाद घनःश्याम सरदेशपांडे यांचा वाडा, सर्व धान्य व संसार उपयोगी साहित्य लुटले.

महागाव – कुलकर्णी यांचा वाडा दोन घरे व गिरणी जाळल्या

हलकर्णी – ब्राम्हणांची ११ घरे लुटून कांही घरे जाळली.[१४०]

आजरा महाल –

आजरा महालातील गंभीर परिस्थिती ! जनतेचा कोल्हापूर संस्थानावरील पूर्ण विश्वास उडाला ! या मथळ्याखाली 'तरूण भारत'ने खास प्रतिनिधीकडून बातमी घेऊन छापली आहे. "गांधीजीच्या नावाखाली चाललेले अत्याचार थांबवा !"

आजऱ्या विभागातील ब्राह्मण कुटूंब निर्वासित होऊन भितीग्रस्त झालेले काही लोक आपल्या करूण कहाण्या सांगण्यासाठी बेळगावातील 'तरूण भारत'कडे आले, 'या संकटग्रस्त लोकांच्या विमोचनासाठी चला' या शिर्षकाखाली आवाहन १० फेब्रुवारीच्या अंकात केले आहे. बाबुराव ठाकुर, दावर टी. पी व राघुआण्णा मंडगी तसेच स्वयंसेवकांचे एक पथक व पोलिसांची तुकडी या सर्वांना घेऊन जाण्यासाठी तीन ट्रक्स, तीन मोटारी व एक जीप असा मोठा ताफाच बरोबर होता. रात्रौ ८ च्या सुमारास ही सर्व मंडळी आजरे गावी जाऊन पोहोचली. तत्पुर्वी तेथील कारभारी श्री. कर्णिक व मिलिटरी प्रमुख श्री. पारसनीस यांनी गावात पूर्ण बंदोबस्त ठेवला होता.[१४१] आजरे गावापासून जवळच खेडे गाव आहे. या गावावर हल्ला करण्यासाठी आसपासच्या खेडयापाडयातील भरपूर लोक जमले होते. ही बातमी समजल्यावर पोलिसांच्यासह बेळगावची पथक खेडे येथे पोहचली. तत्पुर्वी हल्लेखोर पसार झाले. त्यानंतर बाबुराव ठाकुर यांच्या नेतृत्वाखाली खेडे या गावी सभा झाली. 'गांधीच्या नावावर चाललेले हे अत्याचार यापुढे तरी थांबविण्याच्या कामी आम्हाला सहकार्य द्या' अशी गावकऱ्यांना विनंती केली. त्यावेळी गावकऱ्यांनी सुमारे ४० बायका–मुले एका अज्ञान स्थळी लपवून ठेवण्यात आली होती. त्यांना तुकडीच्या स्वाधीन केले. शेवटी या मंडळीना आजऱ्यात आणण्यात आले.[१४२]

आजरा या गावचे मोठया संकटातून संरक्षण झाले. खरे पण आजरा महालातील ४० खेडयापैकी एक आजरे गाव सोडून इतर कोणत्याही खेडयातील एकाही ब्राम्हणाचे घर शिल्लक राहिले नव्हते.[१४३] किमान १२५ घरे जळली. घरे जाळण्यापूर्वी धान्याची, दागदागिने, रोकड, भांडीकुंडी लुटायची, शेतीचे दस्तऐवज व कागदपत्र मुद्दाम शोधून काढून जाळून टाकावयाचे व नंतर घराला आग लावायची हा क्रम असे. लुटीत स्त्रीयांचा सुध्दा मोठा सहभाग होता. पुढे कोणत्या प्रकारचा तपास नाही. कोणाला अटक केली नाही. लूट बेपत्ता! असा आरोप कोल्हापूर संस्थानच्या कार्यपध्दतीवर 'तरूण भारत'ने करून अत्याचारी कुटुंबाला न्याय

मिळवून देण्याचा प्रयत्न केला.[१४४]

३.३.४ बेळगावच्या आसपासची परिस्थिती–

कर्नाटक राज्याच्या विजापूर, हुबळी, धारवाड व बेळगांव या चार जिल्हयात विशेषतः मराठी भाषिक ज्या भागात बहुसंख्य होते. तेथे दंगली झाल्या. पण कन्नड मातृभाषा असलेल्या ब्राह्मण घराण्यांना या दंगलीची झळ बसली नाही. असे कर्नाटक प्रां. काँ. समितीने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात म्हटले आहे.[१४५]

तरूण भारतातील अग्रलेखात असे म्हटले आहे की, "ही लुटालुटीची व जाळपोळीची अधर्म नीती ब्राम्हणाविरूध्द वापरताना आज जरी काही लोकांना ती बरी वाटत असली तरी, जर का ती एकदा समाजात रूढ झाली, तर ती मर्यादित राहील असे समजणे चुकीचे आहे. आमच्या देशात ज्या अनेक अल्पसंख्याक जातीजमाती आहेत, त्यांच्या विरूध्द ती उपयोगात आणली जाणार नाही, अशी ग्वाही कोण देऊ शकेल ? आपल्या पुंजीवाल्या भाई–बंदाविरूध्द उद्या ती नीती अंवलबली जाणार नाही, याची तरी काय खात्री ? एकदा का समाजाचा धरबंध सुटला की एकंदर समाज व्यवस्थेवरच महान आपत्ती कोसळेल."[१४६]

निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी 'तरूण भारत' ने खास प्रयत्न करून अल्पसंख्याक ब्राम्हण जातीला सबुरीचा सल्ला देण्याचा व संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. त्यातील एक भाग म्हणजे. ३ फेब्रुवारी १९४८ च्या अंकात मोठया आकारात अधोरेखीत अक्षर छापून जनतेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

३.३.५ प.नेहरू व सरदार वल्लभभाई यांचा जनतेला आदेश–

म.गांधीजींच्या खुनामूळे लोकांची मने किती ही प्रक्षुब्ध झाली असली तरी–

१. कोणीही आपल्या हातात कायदा घेऊ नये!

२. या खुनामागे असलेल्या कटाची पाळेमुळे खणून काढून सरकार गुन्हेगारांना कडक शासन करील असे आम्ही आश्वासन देतो!

३. गांधीजीच्या नावावर लुटालूट, जाळपोळ व अत्याचार करणे अत्यंत वाईटपणाचे आहे, व त्यामुळे त्यांच्या आत्म्याला अत्यंत क्लेश होतील !

असा आदेश दिल्लीहून देण्यात आला आहे. तरी सर्व कॉग्रेसप्रेमी जनतेने गावोगावी संघटीत होऊन वरील प्रकारच्या सर्व अत्याचारांना आळा घालण्यासाठी शिकस्त करावी.[१४७]

अशा प्रकारचे आवाहन करण्यात आले. यानंतर या दंगलीत होरपळलेले गावोगावचे लोक सहाय्यार्थ तरूण भारताकडे धाव घेऊ लागले. तरूण भारतात प्रसिध्द झालेल्या जाळपोळीच्या वार्तानी व त्यावर लिहिलेल्या लेखांनी मुंबई सरकारचे व केंद्र सरकारचे लक्ष या प्रकरणाकडे वेधण्याच्या कामी सहाय्य झाले.

३.३.६ संस्थानांचे विलीनीकरण–

मुंबई प्रांतात दख्खन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात १८ संस्थाने होती. यामध्ये कोल्हापूर, अक्कलकोट, जत, मुधोळ, फलटण आणि सावंतवाडी या संस्थानचे राजे महाराजे मराठा जातीचे होते. पटवर्धनांची संस्थाने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थानांमध्ये सांगली, वाडी, जमखंडी, रामदुर्ग, मिरज (थोरली पाती) मिरज (धाकटी पाती), कुरूंदवाड (थोरली पाती), कुरूंदवाड (धाकटी पाती) यांचा समावेश होता. हे सर्व संस्थानिक कोकणस्थ ब्राह्मण या पोटजातीचे होते. औंधचे पंतप्रतिनिधी आाणि भोरचे पंतसचिव हे देशस्थ ब्राह्मण होते. तर जंजिरा व सावनूर येंथील नबाब मुसलमान होते. १९४८ च्या मार्चमध्ये दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांचा संघ विसर्जित करण्यात येऊन संस्थानांच्या अधिपतींनी विलिनीकरण्याच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. 'आता संस्थानाचा दरारा संपला'. संस्थान प्रजेत लोकशाही अवतरली या शब्दात 'तरूण भारत'ने आपल्या भावना वेक्त केल्या आहेत.

१९ फेब्रुवारी १९४८ रोजी दक्षिण महाराष्ट्रातील १४ संस्थानिकांची मुंबई मुख्यमंत्री बाळासाहेब खेरांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. शेवटी करार होऊन ८ मार्च ही विलीनीकरणाची तारीख मान्य केली. कोल्हापूर संस्थानचे राजे शहाजी छत्रपती हे मात्र संस्थान वाचवण्याचा प्रयत्न करत होते. प्रजापरिषदेचे अध्यक्ष माधवराव बागल यांचा गट शहाजी छत्रपतींची बाजू घेत होता. तर रत्नाप्पा कुंभार, शंकरराव वारके वगैरे प्रजापरिषदेचे नेते कोल्हापूर संस्थानचे विलीनीकरण झाले पाहिजे, असे म्हणत होते. अशा या दोन गटात पुढे एक वर्ष संघर्ष चालत राहिला. शेवटी ८ जानेवारी १९४९ रोजी शहाजी छत्रपतींनी दिल्लीत वल्लभभाईंची भेट घेऊन वाटाघाटी केल्या. १ मार्च १९४९ या तारखेला कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाले. १० लाख रूपये इतकी रक्कम तनखा म्हणून निश्चित करण्यात आली. कोल्हापूर संस्थान विलीनीकरणाच्या प्रक्रियेवर व एकूण हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून 'तरूण भारत'ने सर्वसामान्य वाचक वर्गाला बातम्या पुरवलेल्या आहेत.[१४८]

३.३.७ महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्न आणि 'तरूण भारत'–

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यावर ते १ मे १९६० रोजी व्दिभाषिक मुंबई राज्य मोडून महाराष्ट्र व गुजरात ही दोन घटकराज्ये येईपर्यंतच्या जवळ–जवळ १३ वर्षांच्या काळात जुन्या मुंबई प्रांताच्या सीमा बदलल्या. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय प्रजासत्ताक निर्माण होऊन त्याची घटना अंमलात येताच प्रांत म्हणण्याऐवजी राज्य म्हणण्यात येऊ लागले. त्याआधी ८ मार्च १९४८ ते १ मे १९४९ या काळात बडोद्यासह १७६ संस्थाने विलीन झाल्यामुळे मुंबई राज्याच्या सीमा बदलल्या. काठेवाडातील २०२ संस्थानांचा संघ सौराष्ट्र नावाने अस्तित्त्वात आला. तर कच्छचा कारभार १९४८ च्या जूनमध्ये भारत सरकारने आपल्या हाती घेतला. नव्याने सीमा निश्चित केल्या गेल्यामुळे १९४१ च्या शिरगणतीनुसार ८४,६१८ इतकी लोकवस्ती असलेले प्रदेश राजस्थान, सौराष्ट्र आणि हैदराबादमधून मुंबई राज्याला जोडण्यात आले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी करण्यात आलेल्या राज्य पुनर्रचनेमुळे मुंबई राज्यातील विजापूर, हुबळी, धारवाड व कारवार हे चार कन्नड भाषिकांचे जिल्हे नव्याने अस्तित्वात आलेल्या कर्नाटक राज्याचे भाग बनले. नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद आणि औरंगाबाद हे मराठवाडयाचे पाच जिल्हे तसेच बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती, नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा हे मध्य प्रदेशातील आठ जिल्हे तसेच सौराष्ट्र कच्छसह गुजरात राज्य अलग करण्यात आल्यानंतर मराठी भाषिकांचे जे एकभाषी राज्य राहिले ते मुंबई या नावाने ओळखले न जाता महाराष्ट्र या नावाने ओळखले जाऊ लागले.[१४९] असे जरी असले तरी १७ लाख मराठा भाषिक प्रदेश नवीन कर्नाटक राज्यात अडकला. हा प्रश्न सुटावा म्हणून गेली ५५ वर्षाहून अधिक काळ महाराष्ट्र–कर्नाटक सीमेचा प्रश्न गाजत आहे. या प्रश्नावर जिद्दीने आंदोलन चालविणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना १९४६ साली झाली. या सुरूवातीच्या काळात 'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर म.ए.समितीचे सदस्य नव्हते आणि या संस्थेचा पुरस्कारही त्यानी त्यावेळी केला नव्हता. कारण बाबुराव ठाकुर हे भाषावर प्रांतरचना करण्याच्या मुळातच विरोधी होते. कारण देशात फुटीरतेच्या प्रवृत्ती निर्माण होतील व पर्यायाने देशाचे नुकसान होईल. अशी त्यांना भीतीची भावना होती.[१५०] म्हणून ' तरूण भारत' या वृत्तपत्रात सुरूवातीच्या काळात भाषावार राज्यरचनेच्या विरोधी लेखन केले आहे.[१५१] परंतु

पुढे श्रीरामलुयांच्या बलिदानामुळे भाषावार राज्यरचना ही मान्यता पावली आणि त्या दिशेने देशात वारे वाहू लागले. भाषावर प्रांतरचना एकदा अपरिहार्य ठरल्यानंतर, तिचा पाया शुध्द व तात्विक भूमिकेवर आधारलेली असावी. असा आग्रह धरून 'तरूण भारत' ने तेव्हापासून महाराष्ट्र एकीकरण समितीचे कट्टर पुरस्कर्ते बनले व सीमा भागातील मराठी वाचकांचे मुखपत्र बनले.

३.३.८ सीमा प्रश्नातील वाटचालीचे टप्पे –

३.३.८.१. बेळगावचे साहित्य संमेलन –

१२ मे. १९४६ साली तिसावे मराठी साहित्य संमेलन नागपूरचे सुप्रसिध्द पत्रकार गजानन त्र्यंबक माडखोलकर ('तरूण भारत'चे संपादक, नागपूर) हे या संमेलनाच्या 'ललित साहित्य' विभागाचे अध्यक्षतेखाली बेळगावात भरले. या साहित्य संमेलनात त्यांनी लालित्य व साहित्य यांच्या विवेचनाच्या पारंपारिक चाकोरीला फाटा देऊन आणि 'काळाचे औचित्य' लक्षात घेऊन महाराष्ट्र एकीकरणावर भर दिला व आपले सबंध भाषण संयुक्त महाराष्ट्रावर केले. याच बैठकीवर संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा प्रस्ताव मंजूर झाला.[१५२] याच संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' ची स्थापना करण्यात आली. या ठरावासंबंधीचे वृत्त दि.१४ मे १९४६ च्या 'तरूण भारत' मध्ये प्रसिद्ध झाले आहे. श्री. माडखोलकर यांनी संमेलनापुढे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे दोन महत्वाचे ठराव मांडण्यात आले.

१. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होईपर्यंत भाषिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती व विकास होण्यासाठी मराठवाडा व गोमंतक या प्रदेशांना प्रादेशिक स्वायत्तता असावी.

२. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रांतरचनेचा विचार करताना त्याच्या सीमेवरील बेळगाव, कारवार, गुलबर्गा, बिदर, छिंदवाडा, बालाघाट, बैतुल व निमाड इ. जिल्हयांत मिश्र वस्ती आहे. तेथील प्रत्येक खेडयातील स्थानिक जनतेचा कौल प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने घेऊन ते भाग कोणत्या प्रांतात घालावयाचे हे ठरवावे. या ठरावानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस सुरूवात झाली.[१५३]

३.३.८.२. संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना–

२८ जुलै १९४६ रोजी मुंबई येथे श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समितीची परिषद भरवण्यात आली. या परिषदेत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. तो

म्हणजे संयुक्त महाराष्ट्र समितीचे घटनात्मक नाते मराठी साहित्य संमेलनाशी आहे. ते तोडून मराठी भाषिक प्रांताची निर्मिती करण्यासाठी म्हणजेच संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करणारी स्वतंत्र संस्था स्थापन करणे. त्यानुसार संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना या परिषदेत करण्यात आली. आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे विसर्जन करण्यात आले. पुढे या परिषदेने १९४६ ते १९५५ पर्यंत मराठी भाषिकांचे प्रतिनिधित्व करून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेतृत्व केले. संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा करण्याच्या निमित्ताने १६ ऑक्टोबर १९४९ रोजी बेळगांव येथे श्री. हिरे अध्यक्षस्थानी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची पहिली सभा भरवण्यात आली. 'वाटेल ते दिव्य पत्करू पण आमची भूमी कर्नाटकात जाऊ देणार नाही; मरू तर मराठी मायभूमीतच' हा निर्धार परिषदेतील संतप्त भाषणांत व्यक्त झाला. श्री. बा. र. सुंटणकर, निवृत्त डि. जज्ज श्री. दळवी, श्री. मिसाळ यांनी आपले विचार व्यक्त केले.[१५४]

३.३.८.३. कारवार परिषद –

कर्नाटकाने बेळगाव–कारवार भागावर आपला हक्क सांगणारे निवेदन प्रसिध्द केले, तेव्हापासून त्या भागातील मराठी समाजाची मने अस्वस्थ झाली होती. हे भाग मराठी प्रदेशापासून तोडले जाऊ नयेत यासाठी चळवळ करण्याकरिता डॉ. कोवाडकर यांच्या परिश्रमाने 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' या नावाची संघटना एक वर्षापासून कार्यरत होती. तिचे कार्यक्षेत्र बेळगाव शहरापुरते मर्यादित होते. या मराठी विभागाला एकत्र बांधण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषद (दक्षिण विभाग) चे ५ वे अधिवेशन कारवार येथे १९५० ला भरविण्यात आले. तिचे अध्यक्ष व उद्घाटक अनुक्रमे श्री. हिरे व पाटसकर हे होते. बेळगांव शहर, शहापूर, खानापूर, सुपे, कारवार व हल्ल्याळ यांचा समावेश संयुक्त महाराष्ट्रात व्हावा अशी मागणी या परिषदेत करण्यात आली.[१५५] ही परिषद भरण्याच्या आधीचे कांही दिवस डॉ. कोवाडकर, सेनापती बापट व लालजी पेंडसे यांचा मिरजेपासून कारवारपर्यंतच्या भागात खेड्या–पाडयांतून दौरा केल्याने हे अधिवेशन उत्साहात यशस्वी झाले. या बाबतच्या दैनिक बातम्या 'तरूण भारत' ने आपल्या अर्ध साप्ताहिकात दिल्या आहेत.

३.३.८.४. दार कमिशन (१७ जून, १९४७)–

भारतीय स्वातंत्र्य नजरेच्या टप्प्यात आले असता डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सुचनेनुसार न्यायमुर्ती एस. के. दार यांच्या अध्यक्षते खाली आयोग नेमण्यात आला.[१५६] या आयोगाने

अभ्यासाअंती १३ डिसेंबर १९४८ रोजी आपला अहवाल सादर केला.[१५७] त्यावर दार कमिशनने भाषावार प्रांत रचनेची मागणी धुडकावून लावली. त्याचा परिणाम म्हणून तेलगू(आंध्र) भाषिकांचे वेगळे राज्य निर्माण करण्याच्या मागणीसाठी श्रीरामल्लू यांनी केलेल्या उपोषणात त्यांचा बळी गेला. (१९ डिसेंबर १९५२) त्यानंतर तेलगू भागात दंगली उसळल्या. शेवटी अस्तित्त्वात नसलेल्या आंध्र प्रांताला पं.पंडित नेहरूना मान्यता द्यावी लागली.[१५८] (१९ डिसेंबर १९५२) यानंतर देशाच्या विविध प्रांतातून भाषिक राज्यांच्या निर्मितीचा रेटा वाढू लागला. याच सुमारास दि. २८ एप्रिल १९५३ रोजी प.नेहरू बेळगाव भेटीला आले. त्यावेळी म्हणाले "राज्याच्या पुर्नरचनेच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक आयोग नेमला जाईल."[१५९] अशा प्रकारची आशा व्यक्त केली.

३.३.८.५. फझल अली कमिशन –

आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश आणि ओरिसाचे राज्यपाल सय्यद फझल अली हे होते. आयोग देशाच्या वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देत. दि. २० जून १९५४ रोजी बेळगाव येथे पोहचले. त्या अगोदर 'तरूण भारतच्या' १५ जूनच्या अंकात 'राज्यपुर्नरचना मंडळाचे बेळगांवात होणार आगमन' बेळगाव हा महाराष्ट्राचाच अविभाज्य भाग आहे. हे त्यांना पटवून देण्याची जरूरी आहे' यासाठी सर्वानी दक्ष राहावे अशा प्रकारची बातमी देऊन मराठी भाषिकांच्यात जागृती निर्माण करण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला.[१६०] यावेळी बेळगाव नगरपालिकेचे नगरसेवक श्री. वैजनाथ शिंदे यांनी बेळगांव शहर हे महाराष्ट्रात घालण्याबाबतचा ठराव मांडला. नगरपालिकेत हा ठराव २८ विरूध्द ८ बहुमतानी पास झाला.[१६१] या आयोगाच्या समोर जाऊन बेळगावातील लोकनेत्यानी आपल्या साक्ष नोंदवल्या शेवटी बेळगावचे दोन वयोवृध्द नेते गंगाधरराव देशपांडे व दत्तोपंत बेळवी आयोगापुढे जाऊ शकले नव्हते. म्हणून आयोगाच्या सदस्यांनी २२ जून रोजी त्यांच्या घरी जाऊन चर्चा केली. दोघांनीही बेळगाव शहरासह बेळगाव जिल्हा कर्नाटकात राहावे असे सांगितले.[१६२]

आपली कैफियत आपण समर्थपणे मांडलेली आहे. त्या अर्थी राज्यपुनर्रचना समिती आपल्याला न्याय देईल असे या विभागातील प्रत्येक मराठी भाषिकाला वाटत होते. पण त्यांची ही अपेक्षा फोल ठरल्या. १० ऑक्टोंबर १९५५ रोजी रा. पू. समितीचा अधिकृत अहवाल प्रसिध्द झाला. महाराष्ट्राला या आयोगाचा मोठा फटका बसला. बेळगाव जिल्हयातील अकरा

तालुक्यापैकी फक्त चंदगड तालुका मुंबई राज्याला जोडला.[१६३] राज्य पुर्नरचना समितीने भाषावार प्रांत रचना करताना बेळगाव, निपाणी, कारवार या बहुभाषिक मराठी प्रदेशाचा अंतर्भाव कानडी भाषिक कर्नाटक राज्यात केला. परिणामी बेळगांव शहरातील वातावरण कमालीचे प्रक्षुब्ध झाले. पूर्वी कधीही नव्हता असा स्वयंफूर्त कडकडीत हरताळ त्या दिवशी पडला. सांयकाळी सुप्रसिध्द नागरिक भुंजगराव दळवी यांच्या अध्यक्षतेखाली युनियन जिमखान्यावर निषेधाची प्रचंड सभा झाली.[१६४] त्यावेळी मराठी जनतेने १००० तारा व २५ हजार सहयांचा अर्ज पंतप्रधानांकडे पाठवून आपला निषेध नोंदविला. २१ ऑक्टोंबर रोजी पुणे येथे महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीची बैठक भरली होती. या बैठकीस बेळगावहून बाबुराव ठाकुर, निपाणीहून देवचंद शहा इत्यादी पंधरा कार्यकर्ते उपस्थित राहिले व त्यांनी बेळगाव, कारवारची कैफियत सभेपुढे मांडली.[१६५] यावेळी बेळगाव–निपाणीकरांना महाराष्ट्र नेत्यांचा व जनतेचा पूर्ण पाठिंबा मिळेल याची शास्वती मिळाली. याच सुमाराला महाराष्ट्र एकीकरण समितीच्या एका शिष्टमंडळाने दिल्ली येथे काँग्रेस श्रेष्ठींची भेट घेऊन त्यांच्यापुढे सीमा भागाची बाजू मांडली. त्यानंतर श्री. शंकरराव देव, श्री. काकासाहेब गाडगीळ, एस.एम.जोशी, आचार्य अत्रे, उध्दवराव पाटील, दाजीबा देसाई आदी नामांकित पुढाऱ्यांनी सीमा भागात दौरे काढून, विराट सभा गाजवल्या, त्यामुळे सीमा भागातील मराठी जनतेच्या महाराष्ट्रात सामील होण्याच्या आकांक्षा अधिक प्रज्वलित झाल्या. २९ ऑक्टोबरला युनियन जिमखान्यावरील विराट सभेत श्री. शंकरराव देव म्हणतात "बेळगाव –कारवारचा प्रश्न जिव्हाळ्याचा म्हणून इकडे प्रथम आलो ! महाराष्ट्राची मागणी मान्य झाली की बेळगाव–कारवारचीही होणारच"[१६६] हा विश्वास दिला असला तरी शेवटी महाराष्ट्र एकीकरण समिती आणि संयुक्त महाराष्ट्र समिती यानी केलेली शिष्टाई, सभा, अर्ज विनंत्या सर्व प्रयत्न फेाल ठरले. दि. १६ जानेवारी १९५६ रोजी तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरूनी मराठी भाषिकांच्या जनमताविरूध्द सीमा भागाला कर्नाटकात डांबल्याचे अप्रत्यक्षरित्या आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात स्पष्ट करताच 'तरूण भारतात', अन्यायाची परिसीमा झाली. आता शांततामय लढयास सिध्द व्हा,"[१६७] या नावांचा अग्रलेख लिहून मराठी भाषिकांना सावध होण्याचा इशारा दिला. सीमा भागातील जनतेवर झालेल्या अन्यायाचा उहापोह केला आणि निर्धाराने व निश्चयाने आपण लढा चालविला तर आपला जय ठरलेला आहे, असा विश्वास त्यानी व्यक्त केला आहे.

३.३.८.६. १७ जानेवारी १९५६ हा रक्तलांच्छित दिवस –

पंडित नेहरू यांची घोषणा होताच मराठी भाषिकांच्या भावना भडकल्या परिणामी १७ जानेवारी हा दिवस सीमा भागाच्या इतिहासातील 'रक्तलांच्छित दिवस ठरला, या दिवशी सकाळपासून लोक गटागटाने रस्त्यावरून फिरू लागले होते. 'नाही नाही, कधी ही नाही कर्नाटकात जाणार नाही' अशा घोषणा देत, शहरात ठिकठिकाणी निदर्शने करून लोक आपली चीड व असंतोष व्यक्त करीत होते. या सत्याग्रही लोकाना पांगवण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्या गोळीबारात पैलवान मारूती बेन्नाळकर ठार झाला. महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्नातील पहिला बळी ठरला. पाठोपाठ मधु बापू बांदेकर, महादेव रामा बारीगडी, लक्ष्मण गोविंद गावडे तर निपाणीतील कमळाबाई मोहिते ठार झाल्या व २५ हजार जखमी झाले.[१६८] 'सीमा ठरविताना कोणते तरी तत्व मान्य करा'[१६९] या लेखातून सीमाभागावर झालेल्या अन्यायाचा व त्यातून झालेल्या प्रक्षोभ व दंगलीचा पुर्नरूच्चार केला आहे. पुढे "भाषिक राज्य रचनेची यशस्विता, सीमाभागातील उभय भाषिकांच्या कटकटी समाधानकार रीतीने व न्याय मार्गाने मिटवण्यावरच अवलंबून आहे." हे स्पष्ट करून भारतीय पुढाऱ्यांनी सरहद्दीचे तंटे मिटवण्याच्या बाबतीत कोणत्याही एका तत्त्वाचा अवलंब केला नाही. हेच साऱ्या दुःखाचे मूळ आहे. अशी टिका केली आहे.

३.३.८.७. सत्याग्रहाचे पहिले आंदोलन (९ मार्च १९५६)–

दि. २९ फेब्रुवारी श्री. एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे सर्व पक्षीय सं. महाराष्ट्र समितीची बैठक झाली. मुंबई, विदर्भ, मराठवाडा आणि बेळगाव–निपाणी– कारवारसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे. या मागणीसाठी समितीने आंदोलन उभे केले. ठरल्या प्रमाणे बेळगावपासून सत्याग्रहाला सुरूवात झाली. संयुक्त महाराष्ट्र समितीचा सत्याग्रह संग्राम श्री जयवंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या तुकडीने सत्याग्रह करण्याचे ठरले.[१७०] या अगोदर दि. ८ मार्चला संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष श्री. एस्. एम्. जोशी हे बेळगांवात आले व आंदोलनाची माहिती देऊन शांततेची अपेक्षा केली. तसेच अनावृत्तपत्र पंडित जवाहरलाल नेहरू याना पाठवून सत्यागृहाची पूर्ण माहिती दिली.

मराठी लोकांची बाजू सत्याची व न्यायाची आहे हे पटवून देण्याकरीता ९ मार्च १९५६ रोजी समितीने सत्यागृहाचे रणशिंग फुंकले या सत्यागृहाच्या मोहिमेला बेळगाव व आसपासच्या

मराठी भाषिक जनतेने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. श्री जयवंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या १० जणांच्या तुकडीने १४४ कलमांचा भंग करून सत्याग्रह केला म्हणून अटक केली. त्यानंतर वेगवेगळ्या पाच तुकडयांतील ५३ सत्याग्रहीना अटक केली.[१७१]

'तरूण भारत' ने या सत्याग्रहात सर्वाना सहभागी करून घेण्यासाठी २० मार्चला एक अग्रलेख दिला,"सत्यागृह आंदोलनासाठी बेळगांवची महाराष्ट्रास हाक"[१७२] तसेच महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी व पुढाऱ्यांनी बेळगांवने दिलेल्या सत्यागृहाच्या या हाकेचा विचार करावा, असे आवाहन केले आहे. सीमा प्रश्नाच्या सत्यागृहाची चळवळ दडपून टाकण्यासाठी हजारो सत्यागृहीना तुरूंगवासाच्या शिक्षा झाल्या. त्यावर "या शिक्षांची संगती लावावयाची कशी"[१७३] 'पोलिसांचे प्रक्षोभकारक वर्तन'[१७४] या अग्रलेखातून म्हैसूर पोलिसांची अरे रावी! व हुकूमशाही तीव्र शब्दात नोंदवली आहे.

"बेळगावातील राजकीय हवामान"[१७५] या अग्रलेखातून, सीमा प्रश्नाची चळवळ, सत्याग्रह, सत्याग्रहीवर होणारा पोलिसांचा अत्याचार यांचा उहापोह केला आहे. तर बाळू निलजकर या सत्यागृहीचे हृदयविकाराने हिंडलगा तुरूगात निधन झाले. त्यांचे निधन होण्याआधी व निधन झाल्यावर जेलच्या अधिकाऱ्याकडून झालेल्या बेफिकीरीवर,"सत्यागृही बाळू निजलकरचे दुःखद निधन ! अधिकाऱ्यांकडून अक्षम्य उपेक्षा व बेपर्वाई."[१७६] या अग्रलेखातून कार्य प्रणालीवर बोट ठेवले आहे.

बेळगांवातील गोळीबार संदर्भात सरकारने खोटा खुलासा करून लोकांशी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. त्यावर बेळगांवातील गोळीबाराबाबत सरकारचा धांदांत खोटा खुलासा[१७७] या लेखात तीव्र शब्दात निषेध नोंदवून हल्ला केला आहे. खोटेपणाची मखलाशी करण्यासाठी काही बुध्दी कौशल्य लागते. तेही या सरकारी खुलाशामध्ये आढळून येत नाही. त्यामुळे सरकार खोटेपणा अंगावर घेऊन उघडे पडले आहे. असा शेरा मारला आहे. यावरून 'सत्य' या तत्त्वांची बाबुरावांना किती बांधिलकी होती, हे दिसून येते.

३.३.८.८ म.ए.समितीचे शिष्टमंडळ दिल्लीत दाखल–

'दिल्लीवाशीयानो आम्हाला साथ दया' शेवटी राज्यपुनर्रचना बिल लोकसभेत चर्चेसाठी आले. त्यावेळी केंद्रीय गृहमंत्री गोविंद वल्लभपंत यानी सीमाप्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले.[१७८] त्यानंतर ११ ऑगस्ट १९५६ रोजी म.ए. समितीचे एक शिष्टमंडळ दिल्लीत दाखल झाले व

त्यांनी कॉग्रेस श्रेष्ठींची भेट घेतली. पंतप्रधान पंडित नेहरू व पं. गोविंदवल्लभ पंत यांच्या भेटी घेऊन बेळगांव–कारवारची बाजू सविस्तरपणे त्यांच्यासमोर मांडली या शिष्ट मंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि तुमची बाजू बळकट आहे. देशासमोर काही मोठे प्रश्न आहेत त्यांचा एकदा निकाल होऊ द्या मग आपल्या सीमा प्रश्नाचा शांततेच्या वातावरणात जरूर विचार करू असे आश्वासन दिले गेले.[१७९] पुढे केंद्र सरकारने सीमाप्रश्न झोनल कौन्सिलमार्फत सोडविला जाईल, असे आश्वासन दिल्यामुळे २७ ऑगस्ट १९५६ रोजी सत्याग्रह मागे घेण्यात आला.

"सत्याग्रहाने केलेले प्रभावी काम"[१८०] या लेखात ९ मार्च १९५६ पासून सुरू असलेला सत्याग्रह सीमा प्रश्नासंबंधी फेरविचार करण्याचे आश्वासन पंडित नेहरूनी दिल्यावर तूर्त स्थगित करण्यात आला असल्याचा उल्लेख आहे. तसेच या सत्यागृहाने मिळवलेल्या यशाची यशोगाथा गायली आहे. पुढे मराठी भाषिकांनी या काळात पुढे प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली तर तिला तोंड देण्यासाठी तयारी करण्याच्या कार्यास वाहून घेतले पाहिजे, असे आवाहन केले आहे. यावरून बाबुराव हे संपादक नेते कार्यकर्ते आणि विशेष म्हणजे कुशल संघटक होते. याची जाणीव होते.

३.३.८.९. मराठी भाषिकांचा काळा दिवस –

१ नोव्हेंबर १९५६ रोजी नवीन कर्नाटक राज्याची स्थापना झाली. बेळगाव, निपाणी, कारवार, बिदर, भालकी व सुपा हल्लाळ इ. १७ लाख मराठी भाषिकांचा प्रदेश या नविन राज्यात बळजबरीने घेतला. या निषेधार्थ प्रचंड मूक मिरवणूक, सत्याग्रह निषेध, मोर्चे ही सीमा लढयाची शस्त्रे बनली तेव्हापासून दरवर्षी १ नोव्हेंबर हा 'काळा दिन' म्हणून पाळण्यात येतो.[१८१]

३.३.८.१०. कर्नाटकचे मुख्यमंत्री एस. निजलिंगप्पाचे विधान सभेतील वक्तव्य–

२४ डिसेंबर १९५६ रोजी म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. एस. निजलिंगप्पा यांनी म्हैसूर विधान सभेच्या बंगळूर येथील अधिवेशनात घोषणा केली. 'काही मराठी प्रदेश या नव्या (म्हैसूर) राज्यात समाविष्ट झालेला आहे. असा प्रदेश मराठी राज्यात समाविष्ट होण्यास माझी मुळीच हरकत नाही, तथापि जो पर्यंत मराठी भाषिक म्हैसूर (आताचे कर्नाटक) राज्यात आहे. तो पर्यंत त्यांच्या हक्काचे, हिताचे रक्षण करणे ही माझ्या सरकारची जबाबदारी आहे'. त्यांच्या या वक्तव्यावरून सुरूवातीला सीमा प्रश्न गंभीर नव्हता. तसेच मराठी भाषिक जनतेवर हा

अन्याय आहे. या भूमिकेतून या प्रश्नाकडे पाहत असावेत याची जाणीव होते.

३.३.८.११. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूका –

सन १९५७ देशात सार्वत्रिक निवडणूकांची धामधूम सुरू झाली. सीमा भागात सीमा प्रश्नाच्या मुद्दयावर ही निवडणूक म.ए.समितीने लढविण्याचे ठरविले. ९ जानेवारी १९५७ रोजी बेळगांव येथे म.ए. समितीची कृती समितीची खास बैठक घेवून मराठा भाषिक प्रदेशातील विभागात सहा जागा विधानसभेच्या लढवण्याचे ठरले. यामध्ये बेळगाव तालुक्यातील दोन, बेळगाव शहरातील एक, खानापूर तालुक्यातील एक आणि निपाणी भागातील एक अशा म्हैसूर विधानसभेच्या पाच जागासाठी म.ए.समितीचे उमेदवार उभे करण्याचे ठरले. तसेच मध्यवर्ती संयुक्त महाराष्ट्र समिती आणि कोल्हापूर जिल्हा स.म.समिती यांच्या मदतीने चंदगड तालुका मतदान संघातून मुंबई विधान सभेसाठी म.ए.स.उमेदवार उभे करण्याचे ठरले. या जागासाठी उमेदवार निवडण्यासाठी एक शिष्टमंडळ ठरवण्यात आले. त्यामध्ये श्री. बा. र. सुंठणकर, डॉ. गो. शा. कोवाडकर, राम आपटे, कृष्णा मेणसे, बाबुराव ठाकूर, दाजीबा देसाई अशा अकरा जणांची निवड करण्यात आली.[१८२]

या बैठकीत झालेल्या एकूण चर्चेचा आढावा घेणारा संपादकीय लेख छापून इशारा! "अभेद्य एकजूटच यशाचा मार्ग दाखवील' जातीयता–पक्षभेद याने कार्यहानि होईल !" अशा या लेखात गटातटाच्या राजकारण्याना सुरूवातीलाच सावध करून भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न दिसतो.[१८३]

दि. २८ जानेवारीच्या बैठकीत बेळगाव विभागात म.ए.समितीचे सहा जागेसाठीचे उमेदवार निश्चित करण्यात आले. अशा आशयाचे म. ए. समितीचे पत्र २९ जानेवारीच्या अंकात छापले आहे.

बेळगाव शहर :– श्री. बा. र. सुंठणकर (म. ए. समिती)

बेळगांव ता. (द. भाग) १. श्री. व्ही एस. पाटील (म. ए. समिती)

बेळगांव ता. (उ. भाग) २. श्री. नागेंद्र सामजी (स्वतंत्र)

खानापूर तालुका – श्री बिर्जे गुरूजी (म. ए. समिती)

निपाणी तालुका – श्री. बी. डी. नाईक (म. ए. समिती)

मुंबई विधान सभेच्या चंदगड–आजरा मतदार संघासाठी श्री. बाबुराव ठाकुर यांचे नाव निश्चित करण्यात आले.[१८४] असे ठरले असतानाही म.ए. समितीत असलेल्या शे.का.पक्षाने आपला बडखोर उमेदवार श्री. बाबुराव ठाकुर यांचा प्रतिस्पर्धी म्हणून श्री. नरसिंगराव भुजंगराव पाटील (शिवनगे) यांना उभे करण्यात आले. या निवडणूकीत तरूण भारत या वृत्तपत्राचा प्रचार कार्यासाठी फार मोठा उपयोग झाला. शेवटी निवडणूकीत म.ए.समितीला भरघोस यश मिळाले. परंतु चंदगड मतदार संघात झालेल्या तिरंगी लढतीत श्री बाबुराव ठाकुर यांचा श्री. नरसिंगराव पाटील यांनी ९०१८ मतानी पराभव केला.[१८५] या निवडणूक निकालानंतर 'तरूण भारत' ने शेकापला जबाबदार धरून चंदगड मतदार संघातील निवडणूकीत,"शे. का. पक्षाने केलेला सं. महाराष्ट्र द्रोह ! श्री. नरसिंग पाटील यांच्या सहाय्यार्थ ब्राह्मणेत्तर पुढाऱ्यांची आघाडी ! हा शे. का. पक्षाचा विजय नव्हे तर दगा फटका, बेइमानी व जातीयतेचा हा विजय आहे." अशा प्रकारचा आरोप केला आहे.[१८६] पुढच्या अग्रलेखात,'दगलबाजी तुझे नाव शेका.पक्ष' या पक्षाच्या निद्यं कार्यावर प्रकाश टाकणारा लेख दिला आहे. हा पराभव बाबुराव ठाकुरांच्या वर झोंबलेला असल्याचे दिसते. श्री दाजीबा देसाई हेच या मागचे सुत्रधार असावेत असा तर्क करून पुढील लेखन झाल्याचे स्पष्ट होते.

दि. २२ मार्च रोजी बेळगावात युनियन जिमखान्यावरील विजयी उमेदवारांचा सत्कार – आचार्य अत्रे, शिवराम भोसले व केशवराव पवार यांची भाषणे बेळगांव ही संयुक्त महाराष्ट्राची गंगोत्री आहे ! संयुक्त महाराष्ट्र समिती ही जागृत जनतेची शक्ती ! या शक्तीने काँग्रेसच्या वतनदारीला हादरे दिले ! मराठा तोच की ज्याला प्राणाहूनही महाराष्ट्र प्रिय आहे ! हाच बाणेदार मराठा उद्याचा सं.महाराष्ट्र निर्माण करील! असे भाष्य अत्रेनी केले. व सर्व उपस्थित जनांची मने जिंकली.[१८७] हा सर्व वृत्तात लेखात दिला आहे.

३.३.८.१२. सीमा सत्याग्रहाचे दुसरे पर्व –

केंद्र सरकारने अभिवचन दिल्याप्रमाणे कोणताच निर्णय सीमा बांधवांच्यासाठी झाला नाही. त्याच बरोबर चर्चेतून सोडवणे म्हणजे दोन्ही मुख्यमंत्र्यांची या प्रश्नावर एकमत झाले नाही. परिणामी आपल्या न्याय हक्काकरीता म. ए. समितीने १ नोव्हेंबर १९५८ पासून दुसऱ्या सत्यागृही लढयाला सुरूवात करण्याचा निर्णय घेतला.[१८८] या दिवशी ठरल्या प्रमाणे बेळगाव येथील कलेक्टर कचेरीच्या आवारात भाई माधवराव बागल यांच्या नेतत्वाखाली पहिल्या

तुकडीने सत्यागृह केला. त्या सर्वांना अटक करण्यात आले. शहरामध्ये हरताळ व बंद पाळून हा सत्यागृह पुढे चालू ठेवला.[१८९] दि. २३ नोव्हेंबर या दिवशी सीमा आंदोलन शांततेच्या मार्गाने चाललेले असता हे आंदोलन मोडून काढण्यासाठी काही कन्नड शक्तीनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. "मराठी भाषिकांची चळवळ हाणून पाडण्यासाठी कन्नड पुढाऱ्यांचे कारस्थान"[१९०] या अग्रलेखाचा खुलासा बोलका आहे यावरून दि. २३ त्या दिवशी लिंगराज कॉलेजच्या आवारात बेळगाव–कारवार जिल्ह्यातील कन्नडीयांची परिषद जाणीवपूर्वक भरवण्यात आली. याच दिवशी संभाजी चौकात सत्याग्रह होणार असल्याने सकाळी ९ वाजल्या पासून मराठी भाषिक लोक मोठया संख्येने उपस्थित होते. सत्याग्रह पर्वातील एक भाग म्हणून सत्याग्रही शांततेने कचेरीकडे जात असताना समादेवी गल्लीच्या समोर मोर्चेकरी येताच लिंगराज कॉलेजच्या आवारात चालेल्या कन्नड परिषदेतील लोकांनी मोठ–मोठयाने घोषणा देत मराठी भाषिकाविषयी शिवराळ भाषेत भाषणे सुरू केली. त्यावेळी मोर्चेकरांचा घोळका अरनाळा हायस्कूल जवळ जमला असता त्यांच्यावर एकाएकी दगड फेक होऊ लागली. त्यामुळे मोर्चेकरांच्यात गोंधळ निर्माण झाला. यातच कर्नाटक पोलिसानी या जमावाला पांगविण्यासाठी लाठी हल्ला सुरू केला. तेव्हा सहाजिकच पळापळ सुरू झाली पोलिसांनी शेकडो सत्याग्रहीना जाणीवपूर्वक रक्तबंबाळ केले. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास 'तरूण भारत' कचेरीसमोर बाबुराव ठाकुर, श्री. बा. र. सुंठणकर हे उभे असताना एस. पी. लुईस सब इन्स्पेक्टर्स व पोलीस आले. तेव्हा ठाकुर त्यांना म्हणाले 'मराठी भाषिक लोकाचा सत्यागृह शांत मार्गाने चालू असताना कन्नड लोकांच्या मिरवणूकीस पोलीसानी परवानगी दिली नसती तर आजचा प्रसंग टळला असता' त्यावरून लुईस खवळला. त्या ठिकाणच्या उपस्थित असणाऱ्या मराठा भाषिक नेते मंडळीना अटक केली. किल्ल्यात नेऊन ठवेले व काही वेळानंतर या सर्वांची जामिनावर सुटका केली.[१९१] पोलीसांच्या संगनमताने कन्नड पुढाऱ्यांनी चालवलेला हा डाव 'तरूण भारत'ने हाणून पाडाला. तसेच पोलिसांची अरेरावी थांबवण्यासाठी १२ डिसेंबर १९५८ रोजीच्या लेखात म्हणतात "पोलीस अधिकाऱ्यांनी जबाबदारी ओळखावी व भान राखून नोकरी बजवावी."[१९२]

३.३.८.१३. दिल्ली मोर्चा –

बेळगाव सीमा भागात सत्याग्रह आंदोलन चालू असताना १८ डिसेंबर १९५८ रोजी सुमारे ३ हजार मराठी भाषिकांचा एक विराट मोर्चा दिल्ली येथील लोकसभेवर नेण्यात आला. या

मोर्च्यात सीमा भागातील जवळ जवळ ८०० लोक सहभागी होते. या सीमा भागातील लोकांचे नेतृत्व दाजीबा देसाई यानी केले होते. हा मोर्चा एक दिवसाचा होता पण हे मोर्चेकरी तीन दिवस कडाक्याच्या थंडीत ठाण मांडून बसले होते. या कालावधीत पंडित नेहरू किंवा गोविंद वल्लभपंत हे सत्याग्रहींचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आले नाहीत. त्यामुळे लांबून आलेल्या लोकांची घोर निराशा झाली. या केंद्र सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे शेवटी सीमा सत्याग्रहाने आंदोलन अधिक तीव्र करण्याच्या निश्चय करून मोर्चेकरी मंडळी परत फिरली.[१९३]

३.३.८.१४. साराबंदी लढा –

सीमा प्रश्नाबाबत मोर्चे झाले, सत्यागृह करून तुरूंग भरले दिल्ली दरबारासमोर धरणे आंदोलने झाली. पण प्रश्न सुटण्याच्या दिशेने प्रत्यक्ष हालचाली कांही होत नव्हती. म्हणून हा सीमा लढा अधिक तीव्र व व्यापक करण्यासाठी ३ जानेवारी १९५९ रोजी म.ए. समितीच्या बैठकीत सीमा भागातील १०० खेडयात सामुदायिक साराबंदीचे आंदोलन सुरू करण्याचे ठरले.[१९४] आमदार विमलाबाई बागल यांच्या अध्यक्षतेखाली १९ जानेवारीला हुतात्मा दिनी जाहीर सभा झाली, या सभेत सीमा भागातील बहुसंख्य जनता उपस्थित होती. सीमा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार करून वाटचालीचे टप्पे ठरवण्यात आले 'कर्नाटक व केंद्र सरकारला बेळगावची इच्छा जाणून घ्यावयाची असेल तर आजचा कडकडीत हरताळ पाळा ! म्हैसूर पोलीसांच्याकडून होत असलेली स्त्रीयांची विटंबना कशी सहन केली जाते ? मराठी मुलख महाराष्ट्राचा असे सांगण्याची हिंमत यशवंतरावांना का होत नाही ? असे प्रश्न करून सत्याग्रहीना मार्गदर्शन केले. यावेळी कृष्णा मेणसे, व्ही एस. पाटील, बाबुराव ठाकुर,दाजीबा देसाई यांची भाषणे झाली. साराबंदी बाबत चर्चा होऊन रूपरेषा ठरवली.[१९५]

समितीच्या आदेशानुसार सीमा भागातील नेत्यांची भाई दाजीबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ फेब्रुवारी १९५९ रोजी चंदगड तालुक्यातील शिनोळी या गावी साराबंदी आंदोलना बाबत चर्चा करण्यात आली.[१९६]

साराबंदी म्हणजे सामुदायिक सत्याग्रही प्रतिकाराचा लढा असे म्हटले आहे. समितीच्या निर्णयाप्रमाणे या लढयासाठी खेडी निवडताना दोन पथ्ये पाळावीत १. साराबंदीच्या लढयातून कानडी मराठी भाषिक जनतेत संघर्ष होता कामा नये. २. साराबदी करण्याचा निर्णय गावच्या जनतेने घेतला पाहिजे सरहद्दीचा प्रश्न सुटेपर्यंत शेतकरी वर्ग कर्नाटक सरकारला शेतसारा

भरणार नाही. म्हणजे सरकारच्या मुलभूत जमिनीच्या कायद्याला हे आव्हान होय.[१९७]

अशा प्रकारचा प्रयोग भारत स्वातंत्र चळवळीच्या काळात इंग्रजांच्या विरोधात म. गांधीच्या आदेशानुसार गुजरातमध्ये झाला होता. त्या लढयाचे नेतृत्व वल्लभभाई पटेल यांनी केले होते. बार्डोली या गावा भोवतालच्या ५०० खेडयातील शेतकऱ्यानी ब्रिटिश शासनाला सारा दिला नव्हता. 'तुमचे सरकार आम्ही मानीत नाही' असे सांगण्याचा हा अहिंसक प्रकार होता. या साराबंदी लढयाचे, यशस्वीरीत्या नेतृत्त्व केल्याबद्दल पटेलांना लोकानी 'सरदार' ही पदवी दिली.[१९८] अशा प्रकारची साराबंदी चळवळ 'तरूण भारतच्या व भाई दाजीबाच्या संघटन कौशल्याच्या जोरावर सीमाभागात ही चळवळ सुरू झाली, या चळवळीच्या काळात 'तरूण भारत' पूर्ण दक्ष राहून दररोजच्या घडामोडीचा वृत्तात अर्ध साप्ताहिकाच्या माध्यमातून छापून तळागळातील सत्याग्रहींना दिशा देण्याचे बहूमोल असे कार्य केले. 'तरूण भारत' या वृत्त पत्रातील बातम्यांच्या संकलनातून साराबंदीचा लढा मांडलेला आहे.

३.३.८.१५. साराबंदी समितीची स्थापना –

दि. १० फेब्रुवारी रोजी शिनाळी येथे झालेल्या बैठकीत कॉ. व्ही.डी. चितळे यांच्या नेतृत्वाखाली भाई दाजीबा देसाई, बाबुराव ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली सीमा भागातील कार्यकर्त्यांची साराबंदी समिती कार्यकारणी नियुक्त करण्यात आली. यावेळी श्रीमंती कमलाबाई भागवत, श्रीमती मालिनीबाई तुळपुळे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

या समितीचे अध्यक्ष आ.श्री.बा. र. सुंठणकर व चिटणीस म्हणून कॉ. कृष्णा मेणसे यांची नियुक्ती करण्यात आली.[१९९] सीमा लढा समितीची स्थापना झाल्या नंतर साराबंदी चळवळीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' ला मदतीला घेतले. सीमा भागातील दररोजच्या हकीकती मराठी माणसांना व महाराष्ट्राला पोहचण्याचे महान कार्य या वृत्तपत्राने केले. या लढयातील तरूण भारत हे वृत्तपत्र आघाडीचे व मराठी भाषिकांचे 'मुखपत्र' ठरले.

३.३.८.१६. कर्नाटक सरकारचे दडपशाही धोरण–

शेतसारा वसूल करण्यासाठी मामलेदार, कचेरीची माणसे, सर्कल, तलाठी गावात येत व हात हलवत परत जात, कांही दिवसातच कर्नाटक सरकारने आपले धोरण बदलले. सरकार या प्रश्नावर आक्रमक झाले, जे शेतकरी सारा भरण्यास विरोध करतील व सारा भरणार नाहीत

अशा शेतकऱ्यांच्या घरावर जप्ती आणण्यास सुरूवात केली. पोलीस बंदोबस्तात जप्ती सत्र सुरू झाले व त्यानंतर या लढयाला वेगळी कलाटनी मिळाली. त्यातूनच शेतकरी विरूध्द प्रशासन असा संघर्ष निर्माण झाला.[२००]

३.३.८.१७. साराबंदी सत्याग्रहातून संघर्ष –

साराबंदी सत्याग्रहातून पहिला जो संघर्षाचा प्रसंग घडला तो बेळगाव जिल्हयातील हंचनाळ या साराबंदी खेडे गावात या घटनेने सारा महाराष्ट्र खडबडून जागा झाला.[२०१] 'नाही नाही कधीही नाही, म्हैसूर सरकारला सारा देणार नाही' या गावकऱ्यांच्या निर्धारामुळे म्हैसूर पोलिसांनी गावातील रयतेवर अत्याचार केले. या सर्व घटनेचा खुलासा करणारा संपादकीय लेख 'तरूण भारत' ने दि. ८ जानेवारीला दिला आहे., "ब्रिटिश राजवटीत बार्डोली येथे जे अत्याचार घडले ते म्हैसूरच्या राजवटीत आज घडत आहेत ! स्त्रियांवर हात टाकण्यास या नरपशुंना शरम कशी वाटली नाही, आता या सत्तेला छाती ठोकपणे आव्हान देत मराठी शेतकरी उभा आहे!"

८ फेब्रुवारी १९६० रोजी बेळगाव पासून तीन मैलावरील अंतरावरील येळ्ळूर या गावी पहाटेच्या सुमाराला शेतसाऱ्याची वसूली करण्यासाठी मामलेदार श्री पट्टण हे पोलीस पार्टीसह गावात आले होते. सुरूवातीलाच या गावचे रहिवाशी श्री लक्ष्मण मेलगे यानी सारा देण्यास नाकारले. त्यावेळी पोलिसांनी बळजबरीने त्याच्या घरी शिरून तांदळाची व भाताची आठ पोती जप्त केली. तसेच श्री शट्टू मेणसे यांच्या घरातील धान्याची पोती त्याच पध्दतीने जप्त करण्यात आली. त्या ठिकाणी गावातील लोक जमा झाले. चाललेला पोलिसांचा प्रकार पाहून जमावाने पोलिसांच्या विरोधात घोषणा देण्यास सुरूवात केली.[२०२]

साराबंदी सत्याग्रह सीमा भागात ऐन भरात आला असताना येळळूर गावात मात्र पोलीस अत्याचार चाललेला होता. लुईस–शेषाद्री या पोलीस अधिकाऱ्यानी बेंगलोरहून जादा पोलीसांची कुमक मागवून घेऊन ११ मोटारीतून दि. ११ फेब्रुवारीला पूर्व तयारीसह पोलीस परत गावात आले. त्यावेळी भाई उध्दवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या सत्याग्रही तुकडीचे सत्याग्रह सत्र सुरू होते. श्री जयंतराव टिळक, श्री दत्ता देशमुख व श्री चितळे वगैरे नेते श्री दाजीबा देसाई इत्यादी मंडळी घटना स्थळी उपस्थित होती. याच्या समक्ष लुईस यांनी जप्ती सत्र सुरूच ठेवले. यावेळी या नेते मंडळीनी गावाच्या देवळात कार्यकर्त्यांची एक बैठक

घेतली व पुढील सत्याग्रहाची रणनिती ठरवली.[२०३]

३.३.८.१८. जप्त मालाचा लिलाव–

येळळूर व साराबंदी गावातून जप्त केलेल्या मालाचा लिलाव करण्यासाठी दि. २९ फेब्रुवारी १९६० रोजी बेळगाव येथे पोलिसामार्फत पत्र वाटण्यात आली.[२०४] या लिलावाच्या निषेधार्थ बेळगाव शहरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. तसेच सत्याग्रही सभा घेऊन बॅ. नाथ पै यांनी लोकाना मार्गदर्शन केले. ते म्हणाले,"जप्त केलेला माल लिलावात विकत घेणे याचा अर्थ पोलिसांनी केलेल्या अत्याचाराला पाठिंबा देणे आहे' तेव्हा अशा प्रकारचा माल लिलावात विकत घेणे हे पाप आहे." यानंतर एस. एम. जोशी म्हणाले, "खासदार बॅ. नाथ पै यांची आजच्या सत्यागृहासाठी मुद्दाम निवड केली आहे. कारण ते लोकसभेचे सदस्य आहेत. त्यांच्या या सत्यागृहाचे पडसाद लोकसभेत उठतील." या सभेनंतर जमावाबरोबर निषेधाच्या घोषणा देत समितीचे नेते मामलेदार कचेरीकडे गेले. कचेरीसमोर मोर्चा येताच समितीच्या सर्व नेत्याना अटक करण्यात आली व त्याच दिवशी संध्याकाळी सर्व सदस्यांची मुक्तता करण्यात आली. जप्ती मालाच्या लिलावाकडे कोणी फिरकले नाही.[२०५] या घटनेमुळे संत्याग्रही लोकांच्यामध्ये कर्नाटक सरकार बाबत असणारी तिरस्काराची भावना प्रकर्षाने पुढे येते.

३.३.८.१९. डी. एस. पी. लुईस यांच्या मोटारीवर गोळीबार –

सीमा भागातील साराबंदीचा लढा शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गाने चाललेला असताना १० मार्च १९६० रोजी खानापूर तालुक्यातील गणेबैल या साराबंदी खेडयातून जप्ती उरकून डी. एस. पी. लुईस व डेप्यू कमिशनर श्री शेषाद्री हे परत येत असताना बेळगावच्या वाटेवर गणेबैल गावाच्या टेकडीवरून या दोघांच्या जीपवर गोळया झाडल्या. या हल्यात जीपच्या काचा फुटल्या (हा लुईसचा बनाव होता. त्याना गोळी लागली नाही तशी ती कोणी झाडली याचा ही कधी तपास लागला नाही. असे लालजी पेंडसे आपल्या 'महाराष्ट्राचे महामंथन' या ग्रंथात नोंदवतात) हा बनाव पोलीस यंत्रणेने पुढे करून साराबंदी खेडयात जोराने पाशवी अत्याचाराला सुरूवात केली.[२०६]

३.३.८.२०. पोलिसांचे पाशवी अत्याचार –

गोळया झाडल्याचा बनाव करून लुईस यानी दुसऱ्या दिवशी १०० पोलीस ६ फौजदारांच्यासह इदलहोंड, हेब्बाळ, नावगे इत्यादी खेडयात रेव्हेन्यू अधिकाराच्यासह जप्ती सुरू

केली. एकाच दिवसात २५० पोती भात जप्त करण्यात आले. या वेळी कांही गावातील शेतकऱ्यानी पोलिसांना विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण पोलीस अत्याचारासमोर त्यांचा प्रतिकार फिका पडला.[२०७] गर्लगुंजीची वीरांगना धोंडूबाई पोलिसांच्यावर गरजली ! "चालव तुझी गोळी हिंमत असेल तर' बंदुकीत गोळी नाही की तुझे हात चालत नाहीत!" हे शब्द बाहेर येताच परेरानी पडता पाय माघारी घेतला व ते निघून गेले. दि. १८ मार्च दिवशी पोलीस फाटा घेऊन कुंद्रेमनी, कल्लेहोळ, चिरमुरी, उचगाव, गोजगे या भागातील शेतकऱ्यांचा शेतसारा वसूल करण्यासाठी घरातील प्रापंचिक वस्तू जप्त केल्या. शेकडो लोकाना बेदम मारहाण केली. बिजगर्णी गावात ही अशा प्रकारचे जप्ती सत्र सुरू होते.[२०८] या सुमाराला सत्याग्रही नेत्याच्यावर खटले चालविले. खासदार बॅ.नाथ पै, राम आपटे व सायनाक याना तीन महिने साधी कैदेची शिक्षा सुनावण्यात आली. तर येळळूर गावच्या सत्याग्रहाच्या वेळी अटक असणारे आमदार उध्दवराव पाटील आणि इतर पाच पुढाऱ्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली.[२०९] या घटनेचा 'तरूण भारत' ने जाहीर धिक्कार करून पोलीस यंत्रणेचे वाभाडे काढले आहेत.

सन १९५६ ते १९६० या चार वर्षाच्या काळात महाराष्ट्र एकीकरण समिती आणि संयुक्त महाराष्ट्र समिती यानी चालविलेल्या प्रभावी आंदोलनामुळे दिल्लीला खडबडून जाग आली. अखेर कॉंग्रेस नेत्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या या जनतेच्या मागणीला मान्यता दिली. दि. १ मे १९६० या दिवशी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या मंगल सोहळ्याचे उद्घाटन पंतप्रधान पं.नेहरूच्या हस्ते झाले.[२१०]

३.३.८.२१. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांचे आश्वासन –

नव्या महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सुत्रे श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हाती आली. काही दिवसातच सीमा भागातील मुख्य नेत्याना त्यांनी मुंबईला बोलावून घेतले. आणि कायदेभंग व साराबंदीची चळवळ तुम्ही मागे घ्या म्हणजे सीमा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ते हितकारक ठरेल. मी या प्रश्नाबाबत जातीने लक्ष घालतो, असा विश्वास दिला. शेवटी या आश्वासनाला विसंबून समितीच्या नेत्यानी करबंदीचे आंदोलन मागे घेतले.[२११]

३.३.८.२२. उभय राज्यांच्या मुख्यमंत्र्याच्यात करार –

केंद्रीय गृहमंत्री पं. पंत यांच्या मध्यस्थीने दि. ५ जून १९६० रोजी पुणे येथे एक बैठक घेऊन उभय राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व श्री जत्ती यांच्यात वाटाघाटी

घडून आल्या. महाराष्ट्र–कर्नाटक राज्याच्या सीमा विषयक तंटा सोडविण्यासाठी उभय राज्याचे प्रत्येकी दोन अशा चार सदस्यांची एक समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला.[२१२] शेवटी श्री जत्ती यानी सीमावाद संपलेला नाही हे मान्य करून चौसदस्य समितीची नेमणूक करण्याची तयारी दर्शविली. नियुक्त समितीने सीमा भागात दौरे करून अभ्यास केला. परंतू या समितीच्या सदस्यांचे कधीही एकमत होऊ शकले नाही. यामध्ये महाराष्ट्राकडून श्री हरिभाऊ पाटसकर व श्री एम. डी. भट हे होते. अखेर दोन वर्षानंतर या चौसदस्य समितीने आपले दोन वेगवेगळे अहवाल सादर केले. 'सीमाप्रश्न तोडगा न निघताच प्रश्न मात्र रेंगाळत राहिला'. या शब्दात तरूण भारतने खेद व्यक्त केला आहे. सीमा भागातील मराठी भाषिक जनतेमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या लढयासाठी व सीमा सत्याग्रहासाठी 'तरूण भारत' जनजागृती निर्माण करून लढयासाठी गटा मागून अनेक गट तयार करून सत्याग्रहासाठी पाठविले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सीमा भागातील मराठी भाषिक जनतेने अपार कष्ट उपसले, त्यामुळे शेवटी मुंबई (सीमा भाग सोडून) महाराष्ट्राचा मंगल कलश महाराष्ट्राला मिळाला. तो दिल्लीहून ज्यांनी आणला त्यांना जेवढे महत्व आहे. त्यापेक्षाही हा मंगल कलश महाराष्ट्राला द्यायला ज्यांनी केंद्राला भाग पाडले त्यांचे कार्य महान आहे. यामध्ये सीमावासीयांचा महत्वाचा सहभाग आहे हे विसरून चालणार नाही. महाराष्ट्र राज्य निर्माण झाले पण सीमा प्रश्न मात्र तसाच राहिला. परत त्यासाठी 'तरूण भारत' वृत्तपत्राला नव्या जोमाने रणशिंग फुंकावे लागले.

मध्यंतरीच्या काळात सीमाभागामध्ये विशेष बेळगाव येथे अनेक केंद्रीय मंत्री, नेते विविध प्रसंगाच्या निमित्याने येऊन गेले. यामध्ये, उपराष्ट्रपती, डॉ. राधाकृष्णन, श्रीमंती इंदिरा गांधी यांचेही आगमन झाले. हा सीमा प्रश्न त्वरीत सोडविला जाईल असे आश्वासान दिले होते, त्यामुळे सीमावासियांना आकाक्षा पल्लवीत झाल्या होत्या.[२१३]

३.३.८.२३. पंतप्रधान इंदिराजी व सीमा प्रश्न –

इंदिरा गांधी पंतप्रधान पदी आल्यानंतर सीमा प्रश्न सोडवण्यासाठी सेनापती बापट, बाबुराव ठाकूर, सुंठणकर, सायनाक, पुंडलीकजी कातगडे ही मंडळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.वसंतराव नाईक याच्या वर्षा बंगल्यावर उपोषणाला बसले. यावेळी सीमा प्रश्न सामोपचाराने सोडवण्यासाठी एक सदस्य समितीची घोषणा करण्यात आल्याने उपोषण समाप्त झाले. यावेळी बॅ.नाथ.पै यांनी महत्त्वाची भूमिका बजावून त्यांना उपोषणापासून परावृत्त केले.[२१४]

वृत्तपत्रे जनमत तयार करण्याचे काम करतात. याची प्रचिती 'तरूण भारत'च्या अग्रलेखातून येते "महाराष्ट्राची बाजू समर्थपणे मांडणारे खासदार पार्लमेंटसाठी निवडून द्या!"[२१५] या अग्रलेखातून सार्वत्रिक निवडणूकीच्या दृष्टीने जनमन निर्माण करण्याचे काम होत असल्याचे स्पष्ट होते.

सीमाप्रश्नाकडे महाराष्ट्र, महाराष्ट्राचे सत्ताधारी, विरोधी हे राजकीय पक्ष जाणीव पूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. याची जाणीव बाबुरावाना होताच "सीमाभागाचा ज्वलंत प्रश्न आणि महाराष्ट्राचे सत्ताधीश शिवाजीच्या तेजस्वी कर्तृत्वाचा त्याना विसर पडला का?"[२१६] या अग्रलेखातून संबधिताना शाब्दिक चपराक लगावली आहे. केंद्रसरकारने दिलेल्या आश्वासना प्रमाणे आयोगाची निर्मिती झाली.

३.३.८.२४. महाजन कमिशनची नियुक्ती (२५ ऑक्टोंबर १९६६)–

सीमा प्रश्नी सर्वमान्य तोडगा सुचविण्यासाठी केंद्र सरकारतर्फे न्या. महाजन आयोगाची नेमणूक केली गेली. या कमिशनने वादग्रस्त सीमा भागातील जनतेच्या प्रत्यक्षात भेटी घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून अडचणी जाणून घेतल्या. आयोग कार्यरत असताना सीमा भागातील काही गटाने, नेत्यानी या आयोगास आक्षेप घेतला "या आयोगाला कोणतीही तत्वे घालून दिली गेली नाहीत.'' असे असून ही शेवटी दि. २५ ऑगस्ट १९६७ रोजी महाजन आयोगाचा अंतिम अहवाल केंद्रीयमंत्री मंडळात सादर केला.[२१७] सीमाभागात लवकरच महाजन यांच्या अहवालावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या 'तरूण भारत' ने आपल्या लेखात 'महाजन अहवाल पूर्वतः विसंगत आणि अन्याय पूर्ण आहे."[२१८] या गोष्टींची नोंद घेऊन सविस्तर स्पष्टीकरणे दिली आहेत. शेवटी हा अहवाल स्वीकारू नये असे आवाहन केले.

मेहेरचंद महाजन यांनी बेळगाव शहर पूर्णपणे कर्नाटकला दिले. आणि ज्या खेडयामधून पंचावन्न टक्के मराठी भाषिक आहेत. ती खेडी महाराष्ट्राला दिली या निकालाने बाबुराव ठाकुर महाजन यांचे समर्थन करत होते. तेच तरूण भारत कार कांही दिवसातच महाजन अहवालाची जाहीरपणे होळी करण्यासाठी रस्त्यावर उतरले. बॅ. अ. र. अंतुले यांनी या अहवालाची चिरफाड करणारे ' Mahajan Commsission – Uncovered ' हे पुस्तक लिहून प्रसिध्द केले. तत्वहीन आणि अशास्त्रीय मुद्यावर आधारीत असा महाजन अहवाल पक्षपात करणारा ठरला आणि म्हणूनच महाराष्ट्राने तो फेटाळला, त्या फक्त शिफारशी

(Recommondations) होत्या. निवाडा (Award) नव्हता. अशा शब्दात अवेलना करत पुराव्यानिशी अवालाच्या एक एक तरतूद खोटया व मराठी जनतेवर अन्याय करणाऱ्या आहेत. हे तरूण भारत ने सर्व जनतेला पटवून दिले. आम्ही महाजन आयोग मानत नाही अशा बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत.[२१९]

३.३.८.२५. गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाणांची बेळगाव भेट–

दि. ३ ऑक्टोंबर १९६८ रोजी भारताचे गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाण हे ज्योती महाविद्यालयाच्या (दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ, बेळगाव) भाऊराव काकतकर विज्ञान महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभ प्रसंगी बेळगावात आले होते. या कार्यक्रमाला सीमाभागातील मराठी बहुजन समाज संख्येने जमला होता. सभेच्या वेळी काही मराठी भाषिक गटानी मा.चव्हाणांना काळे झेंडे दाखवून निषेधाच्या घोषणा दिल्या. तसेच महाजन आयोग बरखास्त करा या घोषणा देण्यात आल्या.

चव्हाण यांचे बेळगावात आगमन होण्याच्या दिवशी 'तरूण भारत' मध्ये संपादकीय लेख देऊन सीमा भागातील जनतेच्या भावना व्यक्त केल्या आहेत. "दिलेल्या आश्वासनाची तुम्ही तरी पूर्तता करा ! आम्हा सीमावासीयांचा अधिक अंत पाहू नका !" असे आशयाचे पत्र मा. चव्हाणांच्या नावे छापले आहे.[२२०] पुढील अंकात यशवंतराव चव्हाणांच्या विरोधात घोषणा बाजी करणाऱ्या गटाचे समर्थन केले आहे.[२२१]

३.३.८.२६. शिवसेनेची आंदोलने–

महाजन आयोगाचे पडसाद सर्व महाराष्ट्रात उमटत असताना दि. ६ फेब्रुवारी १९६९ पासून श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाजन अहवालाच्या विरोधात मुंबईत शिवसेनेचे तीव्र आंदोलन झाले. या आंदोलनात ६७ शिवसैनिकांचे बलिदान घडून आले. या घटनेच्या बाबत ९ फेब्रुवारीला तरूण भारत ने लेख देवून हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करून कॉग्रेस धोरणी सरकारावर कडक शब्दात आसूड ओढवले आहे.[२२२]

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सुरूवातीला शिवसेनेमार्फत दि. ३ फेब्रुवारीला मुंबई येथे शिवाजी पार्कवर मेळावा भरणार होता. या मेळाव्यासाठी बेळगावहून श्री बाबुराव ठाकुर यांच्या नेतृत्त्वाखाली कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ मुंबईला गेले होते.[२२३] या मेळाव्याला शे.का पक्षाचे बापूसाहेब लाड ही हजर होते. या मेळाव्याची सभा खूप गाजली. या वेळी बाळासाहेब ठाकरे

म्हणतात "जनतेने निवडून दिलेले महाराष्ट्राचे प्रतिनिधी सीमा प्रश्नासाठी दिंल्लीशी दोन हात करायला का धजत नाहीत?" पुढील लढयाचा कार्यक्रम ठरवताना म्हणतात 'पं. इंदिरा गांधी मुंबई येथे येणार तेव्हा त्यांची मोटार गाडी आडविणार नाही. मात्र शिवसैनिक सीमा प्रश्नाबाबत घोषणा देतील' त्यांचे कडून आश्वासने नको निश्चित मुदत हवी,'' जर १४४ कलम सरकारने पुकारले तर ते मोडून आम्ही शिवाजी पार्कवर जमून शांततेच्या मार्गाने निदर्शने करण्यात येतील.[२२४] या सभेच्या वेळी श्री बाबुराव ठाकुर यांनी सीमा लढयाची कुचंबणा कशी चालली आहे, जनतेची पिळवणूक कशा पध्दतीने कर्नाटक सरकार करत आहे, हे भावनिकतेने जाणून दिले. या सर्वांतून सुटका करून घेण्यासाठी सहकार्य करा. असे आवाहन शिवसैनिकाना करण्यात आले.[२२५]

६ फेब्रुवारी पासून मुंबईत निदर्शने सुरू झाली मुंबईतील पोलिसांच्याकडून निदर्शकावर लाठीमार व अश्रुधूर ! वापरून आंदोलन मोडण्याचा प्रयत्न चालू होता. याच वेळी उपपंतप्रधान ना. मुरारजी देसाई यांना सादर करण्यात येणारे निवेदन सेना प्रमुखांच्या मार्फत देण्यात येणार होते. पण ते निवेदन सादर करू दिले नाही. हे निवेदन १० फेब्रुवारीच्या तरूण भारत अंकात प्रसिध्द करण्यात आले. तसेच दि. ९ फेब्रुवारीला एक लेख देऊन मुंबईत घडणाऱ्या घडामोडीचा मागोवा घेतला आहे.

"सीमेचा लढा आता मुंबईत तापू लागला आहे. सीमा भागातील जनतेने आपली शक्ती एकवटली पाहिजे, मराठी माणूस अखेरपर्यंत अन्यायाशी प्राणपणे झटत राहिल," मोठे शीर्षक असणारा लेख दिला आहे.[२२६]

या आंदोलनानंतर मुंबईत उसळलेल्या दंगली या सर्व परिस्थितीत ६७ शिवसैनिकांचे बलिदान घडून आले या घटनेचा दिनक्रम २ फेब्रुवारी १९६९ पासून ते १० मार्च पर्यंतच्या दंगल पिडीत व पोलीसी अत्याचाराची माहिती देणाऱ्या अखंड बातम्या प्रसिध्द केल्या आहे.

३.३.८.२७. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये फुट–

संपादकीय 'तरूण भारत' च्या दि. १९ फेब्रुवारी १९७० च्या लेखात म. ए. समितीच्या पदाधिकारी कार्याचा आढावा घेऊन टिकाटिपणी दिली आहे. या लेखाचा सर्व अंगानी अभ्यास केल्यानंतर असे जाणवते, की बेळगाव या सीमा भागातच सुरूवातीपासून सीमा प्रश्नावर मराठा भाषिक मंडळीतच एक मत नसल्याचे स्पष्ट होते. आपापसातील हेवे दावे व

श्रेयवाद पुढे करून पक्षीय, जातीय राजकारण पुढे येत असल्याचे दिसते. या गंभीर प्रश्नात श्रेयवाद कोण कोणास देतो याकडे कांही राजकींय गटांचे लक्ष दिसते. या स्पर्धेची जाणीव होणारा लेख दिला आहे. 'दाजीबा देसाईचे जयंतराव टिळकांना शेला पागोटे ! हा आगाऊपणा खपवून घेतला जाणार नाही ! मर्दुमकीचा मार्ग कोणालाही मोकळा आहे ? सीमा भागात ज्यांनी दुहीची बीजे पेरली. तेच आज दुहीच्या चक्रात सापडले आहेत.' अशा प्रकारच्या टीका समितीत कार्यरत असणाऱ्या पदाधिकारी गटावर केल्याचे स्पष्ट होते.[२२७]

३.३.८.२८. सीमा परिषद –

दि. २२ एप्रिल १९७३ या दिवशी बेळगाव शहरात ऐतिहासिक सीमा परिषद भरवण्यात आली. महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती व रिपब्लिकन पक्षांचे नेते श्री. रा. सु. गवई यानी परिषदेचे अध्यक्षस्थान भुषविले केले होते. समाजवादी खासदार श्री ना. ग. गोरे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून बाबुराव ठाकुर हे होते. तसेच खासदार मधु दंडवते, आ. सी. आर. खानोलकर, आ. दत्ता ताम्हणे इत्यादी महाराष्ट्रातील नेते मंडळी उपस्थित होती. सीमा भागातून ३५०० प्रतिनिधी हजर होते व असंख्य जनसमुदाय जमलेला होता.[२२८]

या परिषदेच्या अगोदर 'तरूण भारत' ने बोलका लेख दिला आहे. यावरून आपापसातील असणारे हेवे–दावे बाजूला सारून या सीमा परिषदेत सर्वांनी सहभागी व्हा ! विरोधकांचा उघड समाचार घेताना "महाराष्ट्र एकीकरण समिती हीच लोक आदरास पात्र आहे, शिवसेनेने परिषदेचे यजमानपद पत्करले यात दाजीबांचे काय बिघडले? त्यांना आपले लढाऊ नेतृत्व दाखवावयाचे असेल त्यांना मैदान मोकळे आहे ! सीमेचा प्रश्न निकालात निघाला पाहिजे, हीच सर्वाची आकांक्षा ! परिषद यशस्वी करण्याकरीता हजारोचे हात लागणार."

असा मथळा देऊन सर्व गटाना या परिषदेच्या कार्यात सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे ही परिषद मोठया यशाने संपन्न झाली.

या परिषदेत संमत केलेल्या ठरावात केंद्र सरकारला गंभीर इशारा दिला आहे. दि. १ नोव्हेंबर १९७३ च्या काळया दिनापूर्वी हा सीमा प्रश्न भौगोलिक सल्लगता, खेडे हा घटक, भाषिक बहुसंख्या आणि लोकेच्छा या निश्चित तत्वाच्या आधारे सोडवण्यात आला पाहिजे. नाही तर पुन्हा एकदा तीव्र आंदोलन उभे करणे सीमा भागातील जनतेला भाग पडेल. आणि

त्यांच्या परिणामांची सर्व जबाबदारी सरकारवर राहील.[२२९] अशा प्रकारचा पूर्व ईशारा या लेखात दिला आहे.

३.३.८.२९. जनता पक्षाचे सरकार –

सन १९७७–७८ ला केंद्रात जनता पक्षाचे सरकार आले. केंद्रीय गृहमंत्री एच. एम. पटेल यांनी अन्याई महाजन अहवाल बाजूस सारला. १९७९ साली महाजन शिफारशी बंधनकारक नसल्याचे गृहमंत्र्यांचे पत्र प्रसिध्द झाले. सीमेचा प्रश्नमात्र सुटला नाही.

नंतरच्या काळात अनेकवेळा दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यानी एकत्र येऊन हा प्रश्न सोडवावा अशी भूमिका केंद्र सरकारने घेतली. अशा प्रकारच्या बैठकी शेवटी निरूपयोगी आणि असफल ठरल्या.[२३०]

३.३.८.३०. बेळगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष–

बेळगाव हे शहर महाजन आयोगाने कर्नाटकात घालण्याचा घाट घातला पण या शहरावर मराठी भाषिकांचे वर्चस्व कायम लोकप्रतिनिधी मराठी भाषिकच आहेत

अ.न	नगराध्यक्षाचे नाव	पासून	पर्यंत
१	व्ही. आर. नातू	१५/०६/१९०९	०४/०४/१९१०
२	आर. जी. खोत	०४/०४/१९१०	३१/०३/१९१३
३	ए. जी. मिलर	०१/०४/१९१३	१२/०५/१९१४
४	अदशीर नवरोज	१३/०५/१९१४	३०/०७/१९१६
५	डी. व्ही बेळवी	१८/१०/१९१६	३०/०९/१९१९
६	अदशीर नवरोज	१५/१०/१९१९	३०/०९/१९२२
७	ए. पी. चौगुले	१२/१०/१९२२	०१/०४/१९२६
८	बी. के. दळवी	१२/०४/१९२६	३०/०३/१९२८
९	बी. के. दळवी	३०/०३/१९२८	३१/०३/१९२९
१०	बी. के. दळवी	१०/०६/१९२९	०४/०६/१९३१
११	बी. बी. पोतदार	०५/०६/१९३१	१२/०८/१९३२
१२	बी. के. दळवी	१२/०८/१९३२	पासून १ वर्ष
१३	बी. बी. पोतदार	०५/१२/१९३३	बाकीची मुदत
१४	ए. ए. घीवाले	०१/११/१९३५	एक वर्षासाठी
१५	एन. जे.काळे	३१/१०/१९३६	एक वर्षासाठी
१६	एम्. एम. लाड	०१/११/१९३७	०४/११/१९३८
१७	बी. बी. पोतदार	०५/११/१९३८	०३/०४/१९३९
१८	बी. बी. पोतदार	०३/०४/१९३९	एक वर्षासाठी
१९	एम्. एम. लाड	२७/०४/१९३९	पासून बाकीची मुदत

अ.न	नगराध्यक्षाचे नाव	पासून	पर्यंत
२०	बी. बी. पोतदार	०६/०४/१९४२	एक वर्षासाठी
२१	आर. ए. धारवाडकर	१६/०५/१९४३	एक वर्षासाठी
२२	व्ही. एम. मिसाळ	२२/०५/१९४४	एक वर्षासाठी
२३	पी. डी. निळवे	०६/०६/१९४५	०१/०८/१९४६
२४	जी. एम. भातकांडे	०१/०८/१९४६	११/१२/१९४७
२५	बी. बी. पोतदार	११/१२/१९४७	२३/०७/१९४९
२६	एच. ए. सावंत	२३/०७/१९४९	११/०८/१९५२
२७	शांताबाई नरगुंदकर	११/०८/१९५२	२०/०८/१९५३
२८	एन. पी. साळुके	२०/०८/१९५३	१०/०९/१९५४
२९	के. एम. खन्नुकर	११/०९/१९५४	१३/१०/१९५६
३०	जी. एम. भातकांडे	१३/१०/१९५६	२३/०१/१९५८
३१	जी. एम. भातकांडे	२४/०१/१९५८	०६/०२/१९५९
३२	ए. जी. याळी	०६/०२/१९५९	२३/०२/१९६०
३३	जे. के. लगाडे	२३/०२/१९६०	१४/०३/१९६१
३४	शिवाजीराव कदम	१४/०३/१९६१	१२/१२/१९६४
३५	प्रशासक	१२/१२/१९६४	२८/०२/१९६९
३६	इंदिराबाई खोड	०१/०३/१९६९	२१/०४/१९७०
३७	शिवाजीराव काकतकर	२२/०४/१९७०	२८/०२/१९७४
३८	प्रशासक	०१/०३/१९७४	०९/०६/१९७६

हा सीमा भाग मराठी बहुसंख्य भाषिकांचा आहे. हे सिध्द करणारा हा लेख आहे. तसेच महाजन आयोजाने बेळगाव शहर कर्नाटक राज्याला जोडण्याच्या शिफारशी केल्या. त्या कोणत्या घटकाला अनुसरून हा निर्णय होता. या शहराचे लोकप्रतिनिधी हे बहुसंख कायम मराठा भाषिक आहेत. हे स्पष्ट करणारा लेख दिला आहे.

३.३.८.३१. बेळगाव शहराचे आमदार –

साल	आमदाराचे नाव	पक्ष	मिळालेली मत	टक्केवारी
१९५७	बार. र. सुंठणकर	म.ए.समिती	१७९२२	५८.२३
	एम. एन. काझी	कॉग्रेस	१५९१५	४१.७७
१९६२	बार. र. सुंठणकर	समिती	२७६४२	६७
	एस. बी. कणबर्गी	कॉग्रेस	१३६१४	३३
१९६७	बी. बी. सायनाक	समिती	२७८१८	५२.६४
	बी. बी. पाटील	कॉग्रेस	२४२२४	४५.८४
१९७२	बी. बी. सायनाक	समिती	२४८१४	४५.११
	रामभाऊ पोतदार	कॉग्रेस	१३७८३	२५.०६

साल	आमदाराचे नाव	पक्ष	मिळालेली मत	टक्केवारी
	कृष्णा मेणसे	कम्युनिस्ट	१२६४६	२२.९९
१९७८	बी. बी. सायनाक	समिती	३९७३३	५६.९६
	एम. एन. नागनूर	कॉग्रेस	२७७२०	३९.७४
१९८३	राजाभाऊ माने	समिती	४२७६३	५४.०६
	एस. आर. दोड्डण्णवर	कॉग्रेस	३०१५९	३८.१२

संपूर्ण सीमा भागाचे महाराष्ट्रामध्ये विलीनीकरण करण्यात यावे, या एकाच मुद्यावर या निवडणुका लढवून घवघवीत यश संपादन केले. याच मुदयावर 'तरूण भारत' ने आपली सर्व शक्ती या विजयी उमेदवारांच्या बाजूला उभा केल्याचे दिसते.[२३१]

महाराष्ट्र–म्हैसूर (कर्नाटक) सीमा आंदोलनाची 'तरूण भारत' च्या माध्यमातून धावती रूपरेखा मांडलेली आहे. सन १९५६ ते १९८० पर्यंतच्या सीमा प्रश्नाबाबतच्या अभ्यास अंतिम कालखंडात असे स्पष्ट होते. की, सीमा लढयात अशी एकही घटना दाखविता येणार नाही. जीच्याशी दै.'तरूण भारत'या वृत्तपत्राचा संबंध आलेला नाही. वृत्तपत्र या नात्याने चळवळीच्या प्रत्येक टप्प्यात या पत्राने दख्खल पात्र घेतली आहे. हा सीमा प्रश्न सतत जिवंत ठेवण्याचे काम केवळ 'तरूण भारत' ने केले असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

३.३.९ गोवा मुक्ती संग्राम–

सन १९४७ साली ब्रिटिश भारतातून निघून गेले तरी येथील पाश्चात्य साम्राज्यशाहीचा शेवट झाला नाही. फ्रेंच व पोर्तुगीज भारतातील आपल्या वसाहतीत घट्ट पाय रोऊन उभा होते. पोर्तुगीज तर गोवा, दमण आणि दीव यावर आपला ४०० वर्षाचा हक्क सांगू लागले होते. त्यांच्या मते भारत हे नव्याने जन्माला आलेले राष्ट्र होते. पोर्तुगीज अमेरिकेचा 'नाटो' संघटनेचे सभासद असल्याने पोर्तुगीज राज्यकर्त्याच्या वर्तनात मग्रुरी आली होती. त्यामुळे भारतातील पोर्तुगीज वसाहती मुक्त करण्यासाठी तेथील व देशातील जनतेला संग्राम द्यावा लागला. गोवा मुक्ती संग्रामाबद्दल वेळोवेळी 'तरूण भारत' ने स्वीकारलेल्या भूमिकेची येथे चर्चा करण्यात आली आहे.

३.३.९ .१. डॉ. लोहिया यांचा गोवा मुक्ती सत्याग्रह–

गोमंतकीय जनतेच्या अंतःकरणात स्वातंत्र्याची ज्योत डॉ. लोहिया यांनी प्रथम पेटविली अशा शब्दात लोहियाच्या कार्याचा आढावा घेताना बाबुराव ठाकुर यानी दि. १ ऑक्टोंबरच्या लेखात उद्‌गार काढले आहेत. सन १९४६ मध्ये डॉ. राममनोहर लोहिया यानी सत्याग्रहासाठी गोव्यात प्रवेश करण्यापूर्वी त्याचा बेळगाव येथे मुक्काम होता. संध्याकाळी ६ वा मार्केट मधील झेंडा चौकात डॉ. लोहिया यांची दे. केशवराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. उपस्थित लोकांच्या समोर बोलताना म्हणतात,"गोव्याच्या आंदोलनाकडे दुरून तमाशा म्हणून पाहू नका ! भावनेने व अंतः करणाने तिकडे पहा! हिदुस्थान व गोवा याना वेगळे करू शकणारी शक्ती नाही!" यावेळी श्री गंगाधरराव देशपांडे यांनी लोहियांची भेट घेतली व ते त्यांना म्हणाले 'गोव्याच्या चळवळीबाबतीत माझ्याकडून आपण जी काही अपेक्षा करीत असाल ती सांगा आपण सांगाल ते करण्यास मी तयार आहे' डॉ. लोहिया म्हणाले, "तुम्ही येथील लोकांना मार्गदर्शन व सहाय्य करा" 'तरूण भारत' च्या या अंकात भेटीचा व कार्याचा वृत्तांत दिला आहे.[२३२]

३.३.९.२. डॉ. लोहिया यांचा गोव्यात प्रवेश–

लोहिया यांनी गोवा हद्दीच्या कॉलेम स्टेशनावर सत्याग्रहींसह आंदोलन उभे केले. सत्याग्रही समोर बोलताना त्यांनी पोर्तुगीज सरकारला आव्हान दिले. त्यानंतर डॉ. लोहिया यांना अटक झाली. या सत्याग्रहाच्या वेळी तरूण भारतचे खास प्रतिनिधी पंडित यांनाही पकडले. १० दिवस त्याना आग्वाद तुरूंगात डांबल्यानंतर पोर्तुगीज सरकारच्या पोलिसांनी त्यांना भारतीय हद्दीत नेऊन मुक्त केले व त्यांना पाच वर्षे गोव्यात प्रवेश करण्यात मनाई करण्यात आली.[२३३] अशा प्रकारे डॉ. लोहिया यांनी पेटविलेला स्वातंत्र्याचा स्फुल्लिंग पुढे तसाच धगधगत राहिला. तेव्हापासून गोव्यामध्ये अशांतता भडकून अंतर्गत उठाव सुरू झाले. ८ ऑक्टोंबरच्या अंकात गंगाधररावांचा पोर्तुगाल सरकारला इशारा नागरिक स्वातंत्र्याचा लढा लवकर मिटवा ! लोकांचा संयम फार दिवस टिकणार नाही' अशा शीर्षकाचा लेख देऊन भारत व पोर्तुगीज सरकारला जागे करण्याचे कार्य केले आहे.[२३४]

दि. १८ जानेवारी १९५५ च्या अंकात गोवा–लढयातील मुक्त सत्याग्रहींचे बेळगावात प्रचंड स्वागत, श्री हेमंत सोमण, म्हस्के व क्रांतिकिरण यांनी सोसलेले तुरूंगातील हाल

अपेष्टांचे प्रसंग व श्रीमंती दिवकर यांची कारागृहांतील विटंबना व मंतेरोंची राक्षसी प्रवृत्ती ! यांचा भारतीयांनी एकमुखी जाब विचारला पाहिजे असे उद्‌गार श्री बाबुराव ठाकुर यानी 'बेळगाव नागरिकांतर्फे भारतीय जनसंघाच्या पुरस्कृत १६ जानेवारी रोजी टिळक चौकात गोव्याच्या तुरूंगातून नुकत्याच सुटून आलेल्या भारतीय सत्याग्रहीच्या सत्कार प्रसंगी काढले. या सत्याग्रहीनी तुरूंगवास भोगत असताना पणजीच्या तुरूंगात छळवाद कसा मांडला होता. याचे अनुभव समस्त लोकाना सांगितले. हेमंत सोमण यांनी १५ ऑगस्ट रोजी तिरंगा ध्वज फडकविला या अनुषंगाने कशा प्रकारे पोर्तुगीज पोलिस प्रशासनाने हाल हाल केले याची कबुली प्रत्यक्षात त्यानी कथन केली. शेवटी बेळगाव येथे झालेल्या सभेचा व या मुक्त झालेल्या सत्याग्रहींचा प्रश्न पुढे करून पे. नेहरूंना खलिता पाठवण्यात आला.[२३५]

ठळकवाडीच्या महिलांतर्फे दि. २६ जानेवारी रोजी गोव्याच्या स्वातंत्र्य लढयात अग्रेसर असलेल्या श्रीमंती सिंधूबाई देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्रीमती बनुताई अहो या होत्या. मंदाकिनी याळगी यांनी त्यांची ओळख करून दिली. दंशपांडे म्हणाल्या, "माझी स्त्रीवर्गास एवढीच विनंती आहे की, गोव्यातील लोकांच्या उध्वस्त झालेल्या संसाराची घडी नीट बसविण्यासाठी आम्हीही प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे. १९४६ पासून गोव्यातून हद्दपार केल गेलेल्या लोकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. या गोव्याच्या सत्याग्रही लोकांचे हाल कमी करण्यासाठी स्त्रियांनी अधिक संख्येने सत्याग्रहांत भाग घेण्यासाठी पुढे यावे." गोव्यात कैद्यांचे जे हाल चालले आहेत त्यापेक्षांही त्यांना जी अपमानाची वागणूक दिली जाते. त्याविषयी त्या म्हणतात,"तू कोण आहेस? असा प्रश्न विचारला जातो, मी भारतीय आहे असे उत्तर सत्याग्रहीने दिली, त्यांच्या तोंडावर पोर्तुगीज अधिकारी थुंकतात आणि त्यांना लाथा बुक्याचा प्रसाद देतात." आलेले अनुभव या मेळाव्या प्रसंगी बोलुन स्त्री वर्गाला या सत्याग्रहाकडे ओढण्याचा प्रयत्न करतात. आशा असल्याचा समग्र लेख दिला आहे.[२३६]

३.३.९ .३. श्री नानासाहेब गोरे व सेनापती बापट यांचा गोवाहद्दीत प्रवेश–

श्री नानासाहेब गोरे व सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली गोवा हद्दीत प्रवेश करण्यासाठी ६० सत्याग्रहाचे पथक बेळगाव येथे दाखल झाले. त्यांचे स्वागत करून श्री जीवनराव याळगी यांच्या नेतृत्वाखाली सभा झाली. (ता. १४ मे १९५५) यावेळी श्री. गोरे म्हणाले,"ज्या दिवशी गोमंतकाच्या भूमीवर हा सत्याग्रहींचा जथा पाऊल टाकील, या दिवशी

जगाला आम्ही जाहीर करू की, गोमंतकीय आणि भारतीय यांच्या दरम्यान असलेली कृत्रिम सरहद्द आज नष्ट झाली आहे." या सभेत सेनापती बापट यांचेही भाषण झाले.[२३७]

१८ मे १९५५ रोजी सकाळी ८ वा. सावंतवाडी जवळ दोडामार्गाच्या बाजूने गोवा हद्दीत सत्याग्रहीनी प्रवेश केला, 'छोडो गोवा' गोवा भारत एक है जयहिंद! अशा घोषणा देत सत्याग्रही पणजीच्या रोखाने चालले असता अचानक गोवा पोलिसानी सत्याग्रहीच्या सभोवार पाहिले व तुमच्या पैकी नानासाहेब गोरे कोण ? गोरे पुढे होताच त्यांना प्रथम ताब्यात घेऊन मारहाण केली व सर्व सत्याग्रहीना डिचोली येथील पोलीस स्टेशनवर नेण्यात येऊन सर्वांचे जबाब घेण्यात आले व शेवटी भारताच्या हद्दीत सोडून देण्यात आले. या सर्व घटनाची सविस्तर माहिती तरूण भारत ने आपला प्रतिनिधी पाठवून घेतली आहे.[२३८]

२६ जुलैच्या अकांत ऑगस्टमध्ये गोवा स्वातंत्र्य संग्रामासाठी जाणारे सत्याग्रही आणि बेळगांवकरांवरील जबाबदारी या बाबतचा मार्गदर्शक व कार्याचा लेख देऊन सत्याग्रहीना संपर्क साधन्याचे आवाहन केले आहे. तसेच बेळगाव भागातील लोकांनी या सत्याग्रहीना मदत करण्यासाठी अन्न, धान्य, रोख रक्कम, राहण्याची व्यवस्था सत्याग्रहीना उतरण्यासाठी जागा सत्याग्रहीची सोय पाहाण्यासाठी स्वयंसेवक, सत्याग्रहीना येथून सरहद्दीवर नेऊन पोहचविण्यासाठी आणि परत आणण्यासाठी वाहने (ट्रक्स) अशा प्रकारच्या सहाय्याची समितीने अपेक्षा व्यक्त करून आवाहन करणारा लेख दिला आहे.[२३९] दिवसेंदिवस सत्याग्रही तुकडयांचे जतेच्या जते भारत देशाच्या काना कोपऱ्यातून येऊन बेळगावात प्रथमत: दाखल होत होते. त्या सत्याग्रहींच्या जेवण–खाण्यापासून राहण्याची सोय पहाणे, गोव्याकडून येणाऱ्या जखमी सत्याग्रहीना वैद्यकिय मदत करणे, तसेच बेळगाव व बेळगावच्या सभोतालच्या भागातून सत्याग्रही पथके उभा करणे, तसेच प्रचार कार्य चालविणे, वगैरे विविध उद्देशांनी बेळगाव येथे 'गोवा विमोचन सहाय्य समिती' स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष श्री. चतूरदास शाह आणि या समितीमध्ये बॅ. नाथ.पै., श्री बाबुराव ठाकुर, अण्णू गुरूजी इत्यादी मंडळी कार्यरत होती.

३.३.९.४. १५ ऑगस्ट १९५५ चा व्यापक सत्याग्रह –

१५ ऑगस्ट १९५५ या दिवशीचा सत्याग्रह सर्वांत मोठा होता. त्या दिवशी ३६४८ सत्याग्रही गोव्यात दाखल झाले होते. पत्रादेवीहून गोव्यात प्रवेश करणारे ५४२ सत्याग्रहींचे नेते

कॉ. विष्णुपंत चितळे आणि वसंतराव ओक हे जखमी झाले. तसेच श्री रामन, बापूलाल आणि कांबळे यांचा मृत्यू झाला. १७ ऑगस्टला या तीन वीरांना बेळगावकरांनी वाहिलेली श्रंध्दाजली व हजारोंच्या जनसमुदायांच्या साक्षीने अत्यंदर्शन शहरांत सर्वत्र पाळलेला स्वयंस्फूर्त हरताळ! पोर्तुगीज सरकारचा धिक्कार![२४०]

१५ ऑगस्ट १९५५ रोजी सत्याग्रह आंदोलन शिगेला पोहचले असताना त्याच दिवशी दुपारी तीन वाजता सावंतवाडी येथे भरलेल्या जाहीर सभेत गोवा विमोचन सहायक समितीचे अध्यक्ष केशवराव जेधे यांनी सत्याग्रह स्थगित केल्याचे सांगितले. याबाबत जयवंतराव टिळक (सचिव) खुलासा करतात की, 'पोर्तुगीज सैनिकांनी सर्रास गोळीबार चालविल्याने अधिक जीवितहानी होऊ नये म्हणून सत्याग्रह काही दिवसापर्यंत स्थगित केला आहे'. ही बातमी मुद्रीत करून बेळगाव येथे जमलेल्या सत्याग्रहीच्या समोर सादर करण्यात आली. व जमलेल्या संत्याग्रहींना त्याच्या भागात परत पाठवून देण्याची व्यवस्था करण्यात आली.

गोवा मुक्ती सत्याग्रह चळवळीत 'तरूण भारत'चे व बाबुराव ठाकुर यांचे मोठे योगदान आहे. 'आझाद गोमंतक दल आणि गोवा नॅशनल कॉग्रेस या संघटनांच्या कार्यकर्त्यांना प्रसिध्दीसाठी व जागृतीसाठी 'तरूण भारत' हाच एकमेव आधार व आवाज होता. गोमंतकातील पोर्तुगीज राजवटीच्या अत्याचाराच्या कहाण्याना 'तरूण भारत' ने अग्रक्रम दिला आहे. या सर्व बातम्या विश्वसनीय देऊन संपूर्ण अत्याचारी तांडव त्यानी समाजाच्या चव्हाटयावर मांडला आहे. या सर्व घडामोडीचा वेध घेत भारतीय केंद्र सरकारच्या या प्रश्नाबाबतच्या हालचाली नोंदविल्या आहेत. अखेर गोमंतक १९ डिसेंबर १९६१ रोजी सव्वीस तासांच्या भारतीय लष्करी कारवाई नंतर पोर्तुगीजांच्या गुलामगिरीतून गोवा कायमचा मुक्त झाला.[२४१]

गोवा मुक्त झाल्या नंतर दयानंद बांदोडकर हे मराठी भाषेचे अभिमानी असून त्यांना गोवा महाराष्ट्रात विलीन व्हावा असे वाटत असल्याची बहुजन समाजाची खात्री होती. १९६२ साली त्यांनी महाराष्ट्र गोमंतक पक्षाची स्थापना केली. ते पक्षाध्यक्ष झाले या सुमाराला गोवा अंतर्गत काही वाद होते. या वादाचा धागा पकडून 'तरूण भारत' ने दि. १० एप्रिल १९६२ रोजी संपादकीय लेख दिला आहे, "गोवा हा महाराष्ट्राचा भाग आहे ही गोष्ट सुर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. त्यासाठी वेगळा आरसा लागावा आश्चर्य वाटते." कोकणी की मराठी– रोमन की देवनागरी हे नुसते वाद गोव्यात कोण उपस्थित करीत आहेत ! आणि अशी दुहीची बीजे

गोव्याच्या विकासास कितपत पोषक आहेत? हा गंभीर लेख देऊन पुढील वाटचालीस मार्गदर्शक ठरतो, यावरून त्याचा प्रयत्न स्पष्ट होता.[२४२]

२ फेब्रुवारी १९६४ रोजी बेळगांव येथील झेंडा चौकात स्वतंत्र गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांचे भव्य स्वागत व जाहीर सभा झाली,"पोर्तुगीज धार्जिण कंपू सत्ता कांबीज करण्यासाठी प्रयत्न करू लागला म्हणूनच मी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो! 'मी येथे जो आलो आहे तो गोमंतकाचा मुख्यमंत्री म्हणून आलो नसून महाराष्ट्रवादी गोमंतकाचा अध्यक्ष म्हणून आलो आहे." पुढील भाषणात त्यांनी बेळगाव वाशियांचे व खास करून दै. तरूण भारत,चे गोवा मुक्ती बाबत ऋण व्यक्त केले.[२४३]

१२ वे गोमंतक साहित्य संमेलन म्हापसे येथे भरले होत. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. दी. माडगुळकर हे होते. यांनी आपल्या भाषणात 'गोव्याचे महाराष्ट्रात विलिनीकरण झाले पाहिजे' असे उद्‌गार काढले.[२४४]

गोव्यात जनमत कौल घेण्यासाठी गृहखात्याचे उपमंत्री श्री. व्ही. सी. शुक्ला यांनी लोकसभेच्या चालू अधिवेशनात २१ नोव्हेंबर १९६६ रोजी गोवा, दीव दमण मधील जनतेच्या केंद्रशासित प्रदेशाच्या भावी दर्जाबद्दलच्या इच्छा अजमावण्यासाठी जनता कौल घेतला जाईल, असे आवाहन केले. तसेच गोव्यातील मतदारांना शेजारच्या महाराष्ट्र राज्यात गोवा विलीन व्हावा, की केंद्रशासित प्रदेश म्हणून राहावा यावर मतदान करावे लागेल.[२४५] या आदेशानुसार बांदोडकर मंत्रिमंडळाचे राजीनामे मंजूर झाले व गोवा विधानसभाही बरखास्त करण्यात आली.[२४६]

३.३.१० चीन–भारत युध्द–

१९६२ च्या चीनी आक्रमणासारख्या गंभीर राष्ट्रीय संकटाची 'तरूण भारत' ने आपल्या अग्रलेखात चर्चा केली आहे. आक्रमक चीनी सैन्यास भारतीय प्रदेशातून हाकलून लावणे आणि नेफा आघाडीच्या मजबुतीचे प्रयत्न करणे हे दोन महत्त्वाचे निर्णय भारत सरकारने घेतले आहेत. त्यामुळे चिनी सैनिकांच्या अचानक मुसंडी मारण्याच्या प्रयत्नांना या आघाडीवर यश लाभणार नाही. गंभीर राष्ट्रीय सकंटाची दखल पंतप्रधानानी सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिली आहे. चीनी आक्रमक सेना भारतीय हद्दीतून हाकलण्याची कारवाई भारत सरकारने त्वरीत करावी असे 'तरूण भारत' कारांना वाटत होते.[२४७]

२७ ऑक्टोंबर च्या लेखात "भारतावर कोसळलेल्या चिनी सकंटाचे गांभीर्य लक्षात घ्या आणि देश संरक्षणार्थ सिध्द व्हा.!"

चीनचे हे भारतावर नुसते आक्रमण नसून हा भारताच्या स्वातंत्र्यावर पूर्वनियोजित हल्ला आहे. या गोष्टीकडे सर्वांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे. म्हणून भारतीय लोकशाहीच्या संरक्षणासाठी साऱ्या राष्ट्रांने आपली एकवटलेली शक्ती यावेळी सरकाच्या मागे उभी केली पाहिजे. जे आमच्या स्वातंत्र्याच्या सरहद्दीवर आपले रक्त सांडत आहेत त्या जवानांना ज्या ज्या तऱ्हेचे सहाय्य लागेल ते देण्यासाठी साऱ्या जनतेने सिध्द झाले पाहिजे.

राष्ट्रावर कोसळलेल्या या सकंटाची बेळगांव म. ए. समितीने दखल घेऊन पूर्ण विचारांती १ नोव्हेंबरचा 'काळया दिना' चा हरताळ, उपोषणा विषयक कार्यक्रम जाहीर केला होता. तो कार्यक्रम थांबवण्यात आला. तर सैनिकाविषयीच्या आपल्या सद्भावनांचे प्रतिक म्हणून १ नोव्हेंबर रोजी निधी गोळा करण्याचा संकल्प समितीने ठरवला. याबाबत सर्व जनतेला आवाहन करणारा लेख आहे.[२४८]

अ) युध्दाचा वृत्तांत –

भारताच्या उत्तर सीमेवर लडाख पासून नेफा पर्यंतच्या दोन हजार मैलाच्या पट्टयावर चिन्यानी आक्रमण केले आहे. ईशान्य नेफामध्ये चिनी सैन्य घुसले असुन बॉलांग येथे झटापटीचे युध्द चालले आहे. तर वायव्येस लडाख येथे त्रिशुळ हे भारतीयांचे मोक्याचे ठाणे काबीज करण्याकरीता चिन्यांच्या फौजांवर फौजा पुढे सरकत आहेत. दोन्ही ठिकाणी चांगले रण गाजणार आहे. या लेखाला 'तरूण भारत' ने "शिवाजीची भवानी तलवार भारताच्या संरक्षणार्थ धावून गेल्याशिवाय राहाणार नाही!" असे शीर्षक दिले आहे. असा आत्मविश्वास मराठी माणसात निर्माण करणारा लेख आहे.[२४९]

चीनचा तिबेटवर हल्ला झाला त्या दिवशीच भारतावर आक्रमण सुरू झाले! तिबेटचा विश्वासघात आणि भारताचा आत्मघात याला आमचे नेतेच जबाबदार! पंधरा वर्षापूर्वी जागे झालो असतो तर आजचा प्रसंग आला नसता![२५०] अशा शब्दात बेळगांव येथील प्रचंड जाहीर सभेत श्री. जॉर्ज फर्नांडिस यांनी आपले मत नोंदविले.

चीनने एकतर्फी जाहीर केलेली युध्दबंदी आणि चीन बरोबरच्या संबंधाबाबत 'तरूण भारत' ने आपलया लेखात मत मांडले आहे. 'चीनने एकतर्फी जाहीर केलेली गोळीबार बंदी

आणि त्या सोबत भारत सरकारकडे पाठविलेल्या अटी या गुंतागुंतीत भारत सरकार सापडणार नाही. अशी घोषणा पंतप्रधान नेहरूंनी केली. बाबुराव ठाकुर यांनी आपले मत नोंदवले आहे.[२५१]

ब) भारत–चीन संबंधा बाबतचा संपादकीय अग्रलेख–

वृत्तपत्राच्या संपादकाची खरी कसोटी लागते ती याच्या अग्रलेखाच्या वेळीच राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनावर परिणाम करणाऱ्या नानाविध गोष्टींचा परामर्श अग्रलेखामधून घेणे संपादकाचे आद्य कर्तव्य ठरते. त्या दृष्टीने अग्रलेख हा जनमाणसाचा आरसाच म्हणावयास हरकत नाही. 'तरूण भारत' च्या अग्रलेखातून सीमा भागातील जनतेच्या सुख दु:खाचे प्रतिबिंब दिसते असे नाही. तर वेळोवेळी देशातंर्गत घटनावरील भाष्यही 'तरूण भारतने अग्रलेखातून प्रकट केले आहे.

चीनचे भारतावर आक्रमण (१९६२) याबाबत चीनच्या या वर्तनाची धोक्याची जाणीव करून देणारा एक वेगळ्या शैलीत बोलका असणारा लेख.[२५२]

"नगाधिराज हिमालया, तु आता जागा हो! तुझे दिव्य, भव्य सारे सामर्थ्य भारताच्या पाठीशी उभे कर!" या शीर्षकाखाली प्रदीर्घ असा बोधक लेख दिला आहे.

'भारतीयांच्या मनांत हिमालय हे फार प्राचीन काळापासून मोठे श्रध्दास्थान आहे. गंगा आणि यमुना यासारख्या जीवन समृध्द करणाऱ्या नद्यांचे ते उगमस्थान आहे. कैलासनाथ शंकराचे ते वस्तीस्थान आहे. म्हणूनच जणू हिमालय हा भारताचा मानदंड बनलेला आहे. प्राचीन ऋषिमुनिंच्या वस्तीस्थानाने पवित्र झालेल्या नगाधिराजाबद्दल कुणी अवाक्षर काढलेली भारतीय मन सहन करणार नाही. या श्रध्दास्थानाला तडा जाईल असे कोणतेही कृत्य भारतीयांना खपणार नाही.

नगाधिराज आज चिन्यांच्या वेढयात सापडला आहे. त्यामुळे भारताचे स्वातंत्र्यच नव्हे तर भारतीय अस्मिता, भारतीय संस्कृती धोक्यात आली आहे. त्या नगाधिराज हिमालयाची मुक्तता करण्याकरीता साऱ्या भारतीयानी आज आपली सर्व शक्ती पणला लावली पाहिजे. परकीय शत्रूला हिमालयाच्या पार पलीकडे लोटेतो पर्यंत तडजोडीची भाषा नाही. हाच एक भारतीय जनतेचा निर्धार यावेळी प्रकट झाला पाहिजे." अशा आशयाचा प्रदीर्घ लेख देऊन देशप्रेम, राष्ट्रभक्तीची खरी पेरणी मराठी माणसांच्या अंत:करणात रूजवण्याचा प्रयत्न स्पष्ट होता.

३.३.११ काश्मीर प्रश्न–

काश्मीर हा भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांतील एक गुंतागुंतीचा पण महत्त्वाचा प्रश्न होऊन राहिला आहे. काश्मीर प्रश्नावरून दोन्ही देशात सदैव तणावाचे, संघर्षाचे वातावरण कायम टिकून आहे. दोन्ही देशात अनेक वेळा युध्दे झाली. सुरूवातीच्या काळातील काश्मीर संस्थानामील राजकीय परिस्थिती नेत्यांचा दृष्टीकोन तसेच जागतिक स्तरावरील नेते मंडळींचा दृष्टीकोन किवा पाकची युध्दखोर नीती व धमकी, सुरक्षा मंडळातील काश्मीर प्रश्नावरील चर्चा बेमुदत तहकूब रशियाचे व अमेरिकेचे धोरण इ. बाबतीत 'तरूण भारत' ने वेळोवेळी बातम्या प्रसिध्द केल्या आहेत. तसेच या प्रश्नावर अभ्यास पूरक असे वेगवेगळया साहित्यिकांचे, संशोधकांचे, इतिहासकारांचे लेख प्रसिध्द केले आहेत.

'काश्मीर – हिंदूस्थानचे नंदनवन' हा लेख श्री. वि. बा. मराठे, यांचा दिला आहे. या लेखाचा सारांश संपादकांनी दिला आहे.[२५३]

१५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थानपासून काश्मीर अलग झाले. पण पाकिस्तानी आक्रमकांच्या हल्ल्यामुळे हिंदुस्थानपासून अलग झालेला काश्मीरचा पूर्ण भाग हिंदी संघराज्यांत परत दाखल झाला. काश्मीर नरेश हरीसिंग महाराजांनी २६ ऑक्टोंबर १९४७ रोजी काश्मीर संस्थानचे भारताबरोबर विलीनीकरण करून टाकले व लष्करी मदत मागितली. पाकिस्तानच्या आक्रमणा विरूध्द काश्मीरातील हिंदू, शीख व मुसलमान या जनतेने आपले लाडके नेते शेरे काश्मीर शेख अब्दुल्ला यांच्या नेतृत्त्वाखाली प्राणपणाने लढत आहेत. काश्मीरातील व पाकिस्तानातील आक्रमक गुंडानी तेथील निसर्गरम्य प्रदेश जाळपोळ, लुटमार, अत्याचार बलात्कार यांनी उजाड करून टाकण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. तेव्हा "भारताने या नंदनवनाच्या संरक्षणासाठी ताबडतोब लष्कर पाठवावे." असे सूचित करणारा लेख आहे.

'पाकिस्तानचे काश्मीरमधील आक्रमण' या प्रश्नाला सुरक्षा समितीकडून न्याय मिळेल याची पूर्ण खात्री स्पष्ट करणारा पुढील लेख.[२५४]

काश्मीर प्रश्नावर पं.नेहरूं यांच्या घेतलेल्या मुलाखतीत आम्ही सारासार पध्दतीने विवेक करून तडजोडीची शिकस्त इतर प्रश्नावर करू, काश्मीर बाबतीत ही लष्करी कारवाई करण्याचा आमचा मनोदय नाही. हा प्रश्न शांततेने मिटावा अशी आमची इच्छा आहे.[२५५] काश्मीर प्रश्नाबाबतची चर्चा भारत–पाकिस्तान संबंध या पढील मुद्दयामध्ये आलेली आहे.

३.३.१२ भारत–पाक युध्द (१९६५)–

'सीमा विवाद व पाणी वाटपाचा प्रश्न काही प्रमाणात भारताने सोडविण्याचा प्रयत्न केला. तरीही पाकिस्तान याबाबत नेहमीच चढाईखोर भूमिका घेऊन फायदा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु लष्करी चढाई करण्याचे धाडस नाही' इ.स.१९६२ च्या भारत चीन युध्दानंतर सिंध आणि गुजरात राज्याच्या सीमा कच्छच्या भागात पूर्वीच निश्चित झाल्या होत्या. पण मे १९६५ मध्ये पाकिस्तानने भारताच्या काश्मीर सरहद्दीवर आक्रमण करून भारत–पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.[२५६] या युध्दात भारताने पुरता पराभव केला. पण सुरक्षा मंडळाने युध्दविराम घडवून आणला. २२ दिवसांच्या या मोठया युध्दात दोन्ही बाजूंची प्रचंड हानी झाली. 'आपण जे युध्दात मिळवतो ते तहात घालवतो' असा जुना इतिहास आहे. या इतिहासाची पुनरावृत्ती म्हणजे ताश्कंदचा करार सोव्हिएट रशियाच्या मध्यस्थीने भारत पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार घडून आला. त्याप्रमाणे आपापल्या फौजा मागे घेतल्या.[२५७]

रशियन नेते कोसिजिन यांच्या प्रयत्नाने ताश्कंद येथे पाकिस्तानचे अध्यक्ष आयूबखान आणि भारताचे पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांनी परस्परांत करारावर १० जानेवारी १९६६ रोजी सहया केल्या. त्याच कराराला ताश्कंद करार म्हणून ओळखले जाते. या करारावरील स्वाक्षरीची शाई वाळण्याअगोदरच ११ जानेवारी पहाटे १.२० (ताश्कंद वेळ) वाजण्यांच्या सुमारास पंतप्रधान लालबहादुर शास्त्रीं यांचे निधन झाले. या निधनानंतरचा दि. १४ जानेवारीच्या समग्र लेखात 'भारताचा लाल हरपला'![२५८] यामध्ये लालबहादुर शास्त्री यांच्या संपूर्ण समर्पित जीवनाचा परिचय करून दिला आहे.

३.३.१३ भारत– पाकिस्तान युध्द (१९७०–१९७१)–

इ. स. १९७०–७१ मध्ये बांगला देशाचा प्रश्न निर्माण झाला. यातून भारत पाकिस्तान यांच्यात तणाव निर्माण होऊन युध्दाचा मार्ग मोकळा झाला. या सर्व प्रश्नांचा मागोवा 'तरूण भारत' च्या अंकात नमूद केला आहे.

३० जानेवारी १९७१ रोजी एअर इंडियन लाईन्सचे फॉक्कर फ्रेंडशिप हे विमान दुपारी जम्मूवरून पाकिस्तानकडे जबरदस्तीने पळवून नेण्यात आले. विमान अपहरण 'अल फताह' संघटनेचे असावे असे निरीक्षकांचे मत[२५९] पुढच्या अंकात ते विमान पळविण्यामागे काश्मीर मुक्तिसंघटनेचा हात ! विमान उध्दवस्त करण्यामागे पाकचा उघड हात! 'घातपाती कृत्यांना

प्रोत्साहन दिल्यास गंभीर परिणाम पंतप्रधान श्रीमंती इंदिरा गांधी यांचा पाकला कडक शब्दात हशारा![२६०]

संयुक्त राष्ट्रसंघाची प्रतिक्रिया 'पाकने भारताला नुकसान भरपाई दयावी.' या मागणीला पाकचे उर्मट उत्तर! भारतानेच उलट पाकला नुकसान भरपाई द्यावी![२६१] या परस्पर विरोधी मागण्यावरून प्रश्न गंभीर, पाकमधील भारतीय राजदुतास तातडीने बोलविले![२६२] 'भारतीय हद्दीत पाकने गोळीबार करता कामा नये ? नाहीतर गंभीर परिणामाला पाकच जबाबदार राहील.'

शेख मजिबूर (मुजिब) रेहमान यांच्या नेतृत्त्वाखाली पूर्व पाकिस्तानातील जनतेने लष्करी राजवटी विरूध्द आंदोलन उभारून स्वातंत्र्य संग्राम सुरू केला आहे. या संग्रामात सर्व थरातील जनता सामावलेली आहे. त्यामुळे जनतेचा विजय जरी निश्चित असला तरी लष्करी वरवंटयाखाली किती निष्पाप निरापराधी लोकांचा बळी जाणार आहे. त्यातून शेख मुजिबर रेहमान स्वातंत्र्य लढा कसा यशस्वी करणार आहेत. या विषयी सर्व जगात कुतूहल निर्माण झाले आहे. या संपूर्ण लढयाची पार्श्वभूमी वाटचाल सदर 'तरूण भारत' ने मांडली आहे.[२६३]

'शेख मजिबूर यांची बांगला देशाचे अध्यक्ष म्हणून घोषणा! सहा सदस्यांचे बांगला देश सरकार स्थापन.[२६४]

विश्वास घातकी पाकने व्हिएन्ना कराराचा ही भंग केला! भारतीय वकिलाती मधील लोक पाकच्या नजर कैदेत! 'कुत्र्यांची शेपूट वाकडी ते वाकडीच'[२६५]

भारतात येणाऱ्या निर्वासिताना सढळ हाताने मदत करा.! युनोचे सरचिटणीस ऊ.थांट यांनी भारताला विनंती केली.[२६६]

अमेरिका–रशिया यांनी युध्द थांबविण्यास पाकवर दबाव! युध्द चालू ठेवल्यास पाकला मिळणारी आर्थिक मदत बंध करण्याचा कडक निर्वाळा.[२६७] निर्वासितांच्या प्रश्नाबाबत गंभीर परिस्थिती, बंगालच्या आरोग्य खात्याचे मंत्री श्री जैनुल अबेदिन यांनी पत्रकराना माहिती दिली.[२६८]

'अमेरिकेने दुतर्फी धोरण सोडावे' भारताने अमेरिकेला तीव्र निषेध खलिता पाठविला! पाकिस्तानला अमेरिका सतत लष्करी मदत व शस्त्रास्त्रे देत असल्याच्या निषेधार्थ भारताने अमेरिकेला तीव्र लेखी निषेध खलिता दिला. याबाबतची माहिती परराष्ट्र मंत्री श्री स्वर्णसिंग यांनी

लोकसभेत सांगितले. याबाबतचा वृत्तांत देवून अमेरिकेची पाक बाबतची धरसोड वृत्तीवर प्रकाश ठाकणारा लेख आहे.[२६९]

'शस्त्र कपातीची निश्चित धोरणे ठरवा. जीवशास्त्रीय व रासायनिक शस्त्रे प्रामुख्याने कमी करावी' अशी मागणी जागतिक शस्त्रकपात परिषदेत भारताचे प्रतिनिधी राजदुत श्री. एन. कृष्णन यांनी ठामपणे प्रतिपादन केले.[२७०] पाकिस्तान निर्मितीनंतर काळाने उगवलेला सुड! एकाच धर्माचे लोक एकमेकांच्या नरडीला हात घालीत आहेत. निःशस्त्राचे एवढे भीषण हत्यांकाड चालूनही सारी पुढारलेली राष्ट्रे तटस्थ! 'हजरत बाल' प्रकरणी आकाश पाताळ एक करणारे मुसलमानही थंड का? 'इस्लाम खतरे मै है' अशी आरोळी ठोकून पाकिस्तान 'हिंदुस्थान मधून फुटून निघाले व त्यांनी आपला हिरवा झेंडा फडकविला. एका इस्लामिक राष्ट्राची अशी निर्मिती झाली. पण आज तेवीस वर्षानंतर त्याच धर्माचे प. पाकचे हुकूमशहा पूर्व पाकमधील आपल्याच धर्मांच्या लोकांची अमानुष कत्तल करीत आहेत! हा काळाने उगवलेला सुड नव्हे काय? असा प्रश्न करून बोलका लेख दिला आहे.[२७१] याच युध्दांच्या पार्श्वभूमीवरून भारत– सोव्हियत यांच्यात महत्त्वपूर्ण करार! तिसऱ्या देशाच्या आक्रमणा विरूध्द सहाय्याची हमी, हा करार २० वर्षासाठी असेल.[२७२]

पाकिस्तानची बिनशर्त शरणागती, आजपासून स्वतंत्र बागंला देशाला लष्करी नियंत्रण जन. अरोरा, १६ डिसेंबर सकाळी ९.०० वाजता ढाक्का–कलकत्ता रेडियो लिक अपवर पाकिस्तान लष्कर प्रमुख जन्. ए. ए. के. नियाझी यांनी हवाई हल्ल्याना स्थगिती देऊन शरणागती पत्करली! पाकने शस्त्र खाली ठेवले.[२७३] शेवटी लेफ्ट. जन्. नियाझीकडून शरण चिठ्ठी व इतर कागदपत्रे स्विकारण्यासाठी पूर्व विभागाचे लष्करी प्रमुख लेफ्ट जन. जगजीतसिंह अरोरा ढाक्याला गेले. व तेथे सा. ४.३१ वाजता शरणपत्रावर उभयतांच्या सहया झाल्या.

कोल्हापूरात ५ जानेवारी १९७२ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या मैदानात पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जाहीर सभा झाली. "बलाढय राष्ट्रांचे जोखंड आशियाई राष्ट्रानी झुगारून द्यावे?" असे सूचित केले.[२७४]

बांगला देशाचे अध्यक्ष शेख मुजिबुर रेहमान हे आपली सुटका करून घेऊन लंडनहून ते १० जानेवारीला दिल्ली दाखल झाले. त्यांच्या भेटीचा वृत्तांत व कृतज्ञता स्पष्ट करणारा लेख दिला आहे. आपल्या सुटकेसंबंधी बोलताना ते म्हणाले, "दोन दिवसापूर्वी मला माझ्या सुटकेची

खात्री वाटत नव्हती. परंतु पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रयत्नामुळे माझी सुटका झाली. म्हणूनच मी त्याची, भारत सरकार व भारतीय जनतेची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येथे आलो आहे." पुढे म्हणाले, "भारतीय जनता व सरकार यांनी ज्या सहानुभूतीने स्वार्थ त्यागाने आणि समजूतदारपणे बांगला देशाच्या स्वातंत्र्य युध्दाला मदत केली. त्यामुळे हे संबंध दृढ झाले आहेत."[२७५] यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी १७ मार्चला बांगलादेशाच्या भेटीला गेल्या या भेटीचा सविस्तर वृत्तांत 'तरूण भारत'ने दिला आहे. भेटी वेळी इंदिराजी म्हणतात 'भारत आणि बांगला देश यांची मैत्री उच्च तत्वावर आधारित असून कोणत्याही बाहय सत्तेला न जुमानता दोन्ही देश खांद्याला खांदा लावून सत्याच्या मार्गाने पुढे वाटचाल करतील', पुढे म्हणतात 'बांगला देशाच्या जनतेला भारताने जी मदत केली ती केवळ समानता आणि बंधुत्व भावनेने शेजारधर्म म्हणून केली. बांगला देश सामर्थ्यशाली व्हावा, अशी आमची इच्छा आहे. या इंदिराजीच्या भाषणावरून बांगला देशाबद्दलची इच्छा अपेक्षा व पुढील वाटचाली बाबतचा दृष्टीकोन जाणवतो.'[२७६] इंदिराजींच्या परराष्ट्रनीतीतील या त्यांच्या निर्णयाने मात्र सर्व जगाला भारताविषयीची भावना व प्रतिभा स्पष्ट झाली.

३.३.१४ शिखर परिषद व सिमला करार –

सिमला येथे भारत–पाक यांची शिखर परिषद भरून वाटाघाटी झाल्या या बाबतची पूर्व तयारी व चर्चेतील विषय याची संपूर्ण माहिती तरूण भारत या दैनिकानी सविस्तरपणे वाचकांच्या पर्यंत पोहचवली आहे.

बांगला देशाच्या निर्मितीनंतरच्या काळात झुल्फिकार भुत्तो हे पाकिस्तानचे पंतप्रधान बनले. २ जुलै, १९७२ रोजी झुल्फिकार भुत्तो आणि इंदिरा गांधी यांच्यात सिमला येथे वाटाघाटी होऊन 'सिमला करार' अस्तित्वात आला. या करारानुसार भारत– पाक संबंधात एक नवा अध्याय सुरू झाला. या करारातील अटी पुढील प्रमाणे ठरविण्यात आल्या.

१. या दोन राष्ट्रांतील प्रश्न परस्परांत वाटाघाटी करून शांततामय मार्गाने सोडविले जावेत.

२. शांततामय सहजीवन व वैज्ञानिक क्षेत्रात उभयतांनी सहकार्य करणे.

३. आर्थिक सांस्कृतिक व वैज्ञानिक क्षेत्रात उभयतांनी सहकार्य करणे.

४. दुसऱ्या देशांची प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्व याविशयी आदर राखणे.[२७७]

या अटी उभय देशांनी स्वीकारल्या सिमला करारानंतर दोन देशांतील संबंध सुरळीत होतील अशी अपेक्षा या लेखात व्यक्त केली होती. परंतु काही वर्षातच पाकिस्तानात पुन्हा सत्तांतर होऊन जनरल झिया हे सत्ताधारी बनले. त्यांनी भुत्तोंना फाशी देऊन पाकिस्तानात आपली सत्ता आधिक बळकट केली. पुढे काश्मीरचा प्रश्न उकरून काढून भारत–पाक संबंधात तणाव वाढत गेले.

भारत–पाक युध्दानंतर पाकिस्तानात बऱ्याच उलथापालथी झाल्या. पं. इंदिराजीनी राज्यसभेत मांडलेला नवा दृष्टीकोन ''भारताचा सर्वात मोठा शत्रू पाकिस्तान नसून आपले आर्थिक मागासलेपणा आहे, आणि त्यामुळे देशाच्या विकासाच्या मार्गात आलेले अडथळे परकीय शक्तीच्या हस्तक्षेपाविना केवळ शांतता काळातच दूर होतील. पण त्यासाठी अशी चिरशांतता व स्थैर्य यांची आवश्यकता आहे'' असे त्यांनी आवाहन केले.[२७८]

सन १९७१–७२ च्या भारत–पाक युध्दात प. इंदिरा गांधी यांनी गौरवशाली इतिहास घडवून भारताला विजय मिळवून दिला. व भारताविषयी जागतिक स्तरावर नवा दृष्टीकोन निर्माण केला. याबाबत २८ जानेवारी १९७२ च्या दै. तरूण भारत च्या संपादकीय लेखात "भारतरत्न इंदिराजी आणि बांगलादेश यांच्या विजयाचा पोवाडा" या शीर्षकाखाली सुविख्यात शाहीर पांडुरंग खाडिलकर यांनी ओजस्वी पोवाडा रचला आहे. तो सविस्तरपणे दिला आहे.[२७९]

३.४ समारोप–

'तरूण भारत'च्या कार्याचा विचार केल्यास केवळ बेळगावातील नव्हे तर समग्र सीमा भागातील लोकांची सुख–दुःखे आणि भाव–भावना यांचे दर्शन घडविणारे एकमेव पत्र म्हणून तरूण भारतचा उल्लेख करावा लागेल. तसेच वेळोवेळी देशांतर्गत घटनावरील भाष्यही अग्रलेखातून प्रकट केले आहे.

'तरूण भारत'चे संपादक बाबुराव ठाकुर यांच्या अनेक आंदोलनातील धडपडीचा इतिहास म्हणजे बेळगाव जिल्हयातील व विशेषतः बेळगाव शहरातील स्वातंत्र्य लढयाच्या कित्येक आंदोलनांचा इतिहास होय. देशाच्या स्वातंत्र्यासाठी १९२१ च्या असहकार आंदोलनापासून १९४२ च्या चलेजाव लढयापर्यंत ज्या चळवळी झाल्या त्यामध्ये बेळगावच्या अनेक नेत्यानी व कार्यकर्त्यांनी आपापल्या परीने कार्य केले आहे. तथापी श्री. बाबुराव ठाकुर व त्यांचे 'तरूण भारत' पत्र या भोवती विणले गेले होते आणि त्या चळवळींची सर्व सूत्रे 'तरूण

भारत कार्यालयातून हलविली जात. म्हणूनच १९१९ पासून ते १९४७ पर्यंत सर्व कानडी–मराठी कार्यकर्त्यांच्या तोंडी "काँग्रेस आमची संस्था, बाबुराव ठाकुर आमचे पुढारी व 'तरूण भारत' आमचे राजकीय कार्यालय!" ही ओळख होऊन बसली होती. या विभागातील बहुजनाना स्वातंत्र्य लढयात सहभागी करून घेण्यासाठी म्हणून वेगवेगळया अग्रलेखातून देशभक्तीचे व राष्ट्रप्रेमाचे संदेश दिले आहे. कॉग्रेस पक्ष व म. गाधीजीच्या बाबत असणारी भक्ती प्रत्येक लेखात जाणवते. सर्वसामान्य जनांचे कल्याण साधण्याबाबत त्यांनी सरकार विरोधी बऱ्याच वेळा लेखणीचा वापर केला आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींचा वेध घेऊन त्या घटकाचा हिंदुस्थानावर कोणता परिणाम होणार याची बऱ्याच लेखामध्ये खल केली आहे. उदा. पहिले महायुध्द, अमेरिका–रशिया संबंध, चीन–जपान संबंध, दुसरे जागतिक महायुध्द वाटचाल व समाप्ती इ. बाबत वेगवेगळया सदराखाली समाजाला समजेल व रूजेल या भाषेत बातम्या दिल्या आहेत. एकदरीत 'तरूण भारत' या वृत्तपत्राने हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढयामध्ये अग्रभागी राहून बेळगाव या विभागात स्वातंत्र्य चळवळीची, आंदोलनाची जागती ज्योत भारत स्वातंत्र्यापर्यंत तेवत ठेवली. याचे सर्व श्रेय 'तरूण भारत' या वृत्तपत्राला जाते म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भारत स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीजीच्या खुनाने महाराष्ट्र व बेळगाव परिसरात निर्माण झालेले जाळपोळ व लुटालुट तसेच संस्थानच्या विलिनीकरणापासून ते १९७९ पर्यंतच्या काळात दक्षिण महाराष्ट्र व बेळगांव परिसरात झालेल्या राजकीय चळवळी, घडामोडी यांचे स्पष्ट प्रतिबिंब आपणास 'तरूण भारत' या बातमी पत्रात व अग्रलेखात पहावयास मिळते. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न या बाबत यथार्थ आकलन होण्यास 'तरूण भारत' हे वृत्तपत्र अत्यंत उपयोगी ठरते. तरूण भारतच्या अग्रलेखातून व विविध रकान्यातून तत्कालीन जनमताचे अचूक दर्शन घडते. परखड मत प्रदर्शनामुळे 'तरूण भारत' चे अनेक अग्रलेख, बातम्या वैशिष्टयपूर्ण तसेच मार्गदर्शक ठरले आहेत 'तरूण भारत' कार श्री बाबुराव ठाकुर यांच्या समतोल राजकीय दृष्टीकोणामुळे 'तरूण भारत' चे लेख हे वास्तववादी म्हणूनच ऐतिहासिक दृष्टया अधिक उपयुक्त ठरले आहेत.

संदर्भ

१) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, नोव्हेंबर, १९२०, पृ.९

२) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, सप्टेंबर, १९२०, पृ.१५

३) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, सप्टेंबर, १९२० पृ. १८, पृ.१०

४) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, डिसेंबर, १९२३ पृ.११

५) प्रभू प्रिया, समरांगण हे जीवन त्यांचे, प्रकाशक, किरण बाबुराव ठाकुर, तरूण भारत प्रेस, बेळगाव, मे. १९७५, पृ.१५

६) 'तरूण भारत' अंक, सन १९१९ ते १९७९ पर्यंत.

७) साप्ताहिक 'तरूण भारत' ८ एप्रिल १९४१ पृ. ४

८) कुबेर वा. ना., भारताचा स्वातंत्र्यलढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. १२४, १२५

९) मासिक 'तरूण भारत' जानेवारी १९२१, पृ. २२

१०) साप्ताहिक 'तरूण भारत' ८ एप्रिल १९४१, पृ. ४

११) शुल्क आर एल, (संपा) आधुनिक भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय विदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, पुनर्मुद्रण २००२ (हिंदी), पृ. ५७८

१२) स्वातंत्र्यदिन विशेषांक 'तरूण भारत' बेळगाव १५ ऑगस्ट १९४७, पृ.१५

१३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १९ फेब्रुवारी १९३५, पृ. ५

१४) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, नोव्हेंबर १९२०, पृ. ८

१५) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, डिसेंबर १९२०, पृ. १, १५

१६) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, जानेवारी १९२१, पृ. ३२

१७) किता, पृ. ११२

१८) मासिक 'तरूण भारत' बेळगाव, एप्रिल १९२१

१९) प्रभू प्रिया, उपरोक्त, पृ. ५

२०) स्वातंत्र्यदिन विशेषांक 'तरूण भारत' बेळगाव १५ ऑगस्ट १९४७, पृ.१५

२१) कित्ता, पृ. १८

२२) फडके य. दि. 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' श्री विद्या प्रकाशन, पुणे, खंड ४, १९८३, पृ. ५३

२३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव २१ जानेवारी १९३०, पृ. २

२४) किता, पृ. ४

२५) कित्ता, पृ. ६

२६) साप्ताहिक, 'तरूण भारत', २८ जानेवारी १९३०, पृ.१

२७) साप्ताहिक, 'तरूण भारत', २५ फेब्रुवारी १९३०, पृ. ४,६

२८) साप्ताहिक, 'तरूण भारत', ३१ डिसेंबर १९२९, पृ. ११

२९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३ सप्टेंबर १९२९, पृ.४

३०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २५ मार्च १९३०, पृ. २

३१) कित्ता, पृ. ८

३२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २५ मार्च १९३०, पृ. २

३३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १८ मार्च १९३०, पृ.१

३४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २५ मार्च १९३०, पृ. ४

३५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २२ एप्रिल १९३०, पृ.५

३६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव ,८ एप्रिल १९३०,पृ. २

३७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २९ एप्रिल १९३०, पृ. ५

३८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १३ मे १९३०, पृ.७ , १३, २

३९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १७ जून, २४ जून १९३०, पृ. २

४०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २४ जून १९३०, पृ. ४

४१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव,८ जुलै १९३०, पृ.२

४२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १० जून १९३०, पृ.२

४३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १७ मे. १९३०, पृ. २

४४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३० जून १९३०, पृ.४

४५) साप्ताहिक, 'तरूण भारत', १९३० ते १९३२ चे अंक

४६) साप्ताहिक, 'तरूण भारत', २५ ऑगस्ट १९३१, पृ. ५

४७) कित्ता, पृ. ६

४८) साप्ताहिक, 'तरूण भारत', १ सप्टेंबर १९३१, पृ. ६

४९) साप्ताहिक, 'तरूण भारत', ८ सप्टेंबर १९३१, पृ. ५

५०) साप्ताहिक, 'तरूण भारत', ५ जानेवारी १९३२, पृ. ३

५१) कित्ता, पृ. ९

५२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ३१ ऑक्टोंबर १९३३, पृ.४

५३) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ३१ जानेवारी १९३३, पृ.४

५४) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २८ फेब्रुवारी १९३३, पृ.१

५५) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ७ मार्च १९३३, पृ.५

५६) कित्ता, पृ. २

५७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २३ मे १९३३, पृ. ४

५८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २ जानेवारी १९३४, पृ. २

५९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २० मार्च १९३४, पृ.१

६०) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २२ मे १९३४, पृ. १

६१) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ३० ऑगस्ट १९३६ पृ. २

६२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २३ नोव्हेंबर १९३४, पृ. ४

६३) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २३ ऑक्टोंबर १९३४, पृ. ४

६४) कित्ता, पृ. ६

६५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव १६ मे १९३९, पृ. ४

६६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २९ एप्रिल १९४१, पृ.१

६७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २३ सप्टेंबर १९४१, पृ. १

६८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३० सप्टेंबर १९४१, पृ. १ , ४

६९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३१ मार्च १९४२, पृ. ४

७०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २१ एप्रिल १९४२, पृ. २

७१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २६ मे १९४२, पृ. १

७२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ११ ऑगस्ट १९४२, पृ. १

७३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १ सप्टेंबर १९४२, पृ. १

७४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २२ सप्टेंबर १९४२,पृ. १

७५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १, १६ फेब्रुवारी १९४३, पृ. ४

७६) कित्ता, पृ. २

७७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ११९४२ ते ४४ फाईल.

७८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ११ मार्च १९४४, पृ. ४

७९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २५ एप्रिल १९४४, पृ. ४

८०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३० नोव्हेंबर १९४२ पृ. १

८१) साप्ताहिक 'तरूण भारत', १० डिसेंबर १९४६ ते १९५० फाईल

८२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १७ डिसेंबर १९४६, पृ. ९

८३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २८ जानेवारी १९४७, पृ. ४

८४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २५ मार्च १९४७, पृ. ४

८५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव,६ मे १९४७, पृ १

८६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १५ ऑगस्ट १९४७, पृ. २

८७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३० सप्टेंबर १९४७, पृ. ४

८८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३० सप्टेंबर १९४७, पृ. ४

८९) मासिक 'तरूण भारत बेळगाव, जानेवारी १९२४, पृ. २२

९०) देशपांडे बा.य., बेळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, उपरोक्त, पृ.४५

९१) प्रभु प्रिया, उपरोक्त, पृ. २३

९२) स्मृतिसुगंध, 'बाबुराव ठाकुर' तृतीय स्मृतिदिन विशेषांक, २३ एप्रिल १९८२, पृ.११

९३) देशपांडे बा.य., उपरोक्त, पृ. २८

९४) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ८ जानेवारी १९५४, पृ. ४

९५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३१ डिसेंबर १९२९, पृ.२

९६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ७ जानेवारी १९२९, पृ.४

९७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३१ डिसेंबर १९२९, पृ. ९

९८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ५ जानेवारी १९३७, पृ.४

९९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव,१८ फेब्रुवारी १९३८, पृ. २

१००) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २८ फेब्रुवारी १९३८, पृ. ४, ५, ९

१०१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १० जानेवारी १९३९, पृ.१

१०२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १४ मार्च १९३९, पृ. १२

१०३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव,१३ फेब्रुवारी १९४५, पृ.१

१०४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २० ऑगस्ट १९२९, पृ. ४

१०५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १७ सप्टेंबर, १९२९, पृ. ४

१०६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १४ ऑक्टोंबर १९३०, पृ. ४

१०७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २४ ऑक्टोंबर १९४४, पृ.१

१०८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १९ डिसेंबर १९४४, पृ. ३

१०९) कित्ता, पृ. ६

११०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३१ ऑक्टोंबर १९४४, पृ. ४

१११) प्रभु प्रिया, उपरोक्त, पृ. ५८

११२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २४ ऑक्टोंबर १९४४, पृ. १

११३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ८ जुलै १९३०, पृ. २

११४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ६ फेब्रुवारी १९३४, पृ.१

११५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २ सप्टेंबर १९४१, पृ. १

११६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १४ जानेवारी १९४१, पृ १

११७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १९४१ ते १९४७ फाईल.

११८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २ डिसेंबर १९४१, पृ.३

११९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ९ एप्रिल १९३९, पृ.४

१२०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १ ऑक्टोंबर १९४६, पृ. ४

१२१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ७ जानेवारी १९४१, पृ. १

१२२) कित्ता, पृ. ६

१२३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ५ सप्टेंबर १९३९ पृ. १

१२४) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १९ सप्टेंबर १९३९, पृ. ३

१२५) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३ ऑक्टोंबर १९३९, पृ. ९

१२६) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १८ जून १९४०, पृ. ३

१२७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २५ जून १९४०, पृ. ४

१२८) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २३ जुलै १९४०, पृ. ११

१२९) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १५ एप्रिल १९४१, पृ. ५

१३०) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३१ ऑगस्ट १९४३, पृ. २

१३१) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १५ मे १९४५, पृ. ५

१३२) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २१ ऑगस्ट १९४५, पृ. १

१३३) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ३१ जुलै १९४५, पृ. २

१३४) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, मौज प्रकाशन, मुंबई, खंड सहावा, २००७, पृ. ५५

१३५) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ फेब्रुवारी १९४८, पृ. ८

१३६) कित्ता, पृ. २

१३७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १० फेब्रुवारी १९४८, पृ. २

१३८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ फेब्रुवारी १९४८, पृ. ५

१३९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १७ फेब्रुवारी १९४८, पृ. ४

१४०) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ फेब्रुवारी १९४८, पृ. ४

१४१) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ९ मार्च १९४८, पृ. २

१४२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव ,१० फेब्रुवारी १९४८, पृ. २

१४३) कित्ता, पृ. २

१४४) प्रभू प्रिया, 'समरांगण हे जीवन ज्यांचे' प्रकाशक किरण बाबुराव ठाकूर, 'तरूण भारत प्रेस' समादेवी गल्ली, बेळगाव, १९७५, पृ. ८०

१४५) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १७ फेब्रुवारी १९४८, पृ. २

१४६) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १ जून १९४८, पृ. ४

१४७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १७ फेब्रुवारी १९४८, पृ. ४

१४८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ फेब्रुवारी १९४८, पृ. ४

१४९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १९४८ ते १९४९ या वर्षातील फाईल.

१५०) फडके य. दि, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' खंड सहावा, मौज प्रकाशन, मुंबई, २००७, पृ.१

१५१) प्रभू प्रिया, उपरोक्त, पृ. ८०

१५२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ७ ऑगस्ट १९४७, पृ. ४ व २३ ऑक्टोंबर १९४७, पृ. २

१५३) महाजनी ह. रा, 'संयुक्त महाराष्ट्राची समस्या' केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, १९८७, पृ. १७

१५४) पेंडसे लालजी, मोरेश्वर,महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, २०१०, पृ. ११,१२

१५५) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १८ऑक्टोबर १९४९, पृ. २

१५६) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १० जानेवारी १९५०, पृ. ३

१५७) साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २३ ऑक्टोंबर, १९४७ पृ. ४

१५८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २० जानेवारी १९४८ ,पृ. १

१५९) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३० डिसेंबर १९५२, पृ. २

१६०) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १ मे १९५२, पृ. २

१६१) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १५ जून १९५४, पृ. २

१६२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २२ जून १९५४, पृ. २

१६३) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २५ जून १९५४, पृ. १

१६४) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ११ऑक्टोंबर १९५५, पृ. ५

१६५) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १४ ऑक्टोंबर १९५२, पृ. २

१६६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २५ ऑक्टांबर १९५५, पृ. १

१६७) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १ नोव्हंबर १९५५, पृ. १

१६८) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १७ जानेवारी १९५६,पृ. १

१६९) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २० जानेवारी १९५६,पृ. १

१७०) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २८ फेब्रुवारी १९५६,पृ. ४

१७१) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २ मार्च १९५६, पृ. १

१७२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १३ मार्च १९५६, पृ. १

१७३) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २० मार्च १९५६, पृ. २

१७४) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २३ मार्च १९५६, पृ. ४

१७५) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ एप्रिल १९५६, पृ. १

१७६) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २७ एप्रिल १९५६, पृ. २

१७७) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १५ मे १९५६, पृ . १

१७८) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १८ मे १९५६, पृ . १

१७९) प्रभू प्रिया, उपरोक्त, पृ . ८८

१८०) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २४ ऑगस्ट १९५६, पृ . ४

१८१) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३१ ऑगस्ट १९५६, पृ . २

१८२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ५ नोव्हेंबर १९५६, पृ . १

१८३) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, २८डिसेंबा १९५६, पृ . १

१८४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, १५जानेवारी १९५७, पृ . २

१८५) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २९जानेवारी १९५७, पृ . १

१८६) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ५ मार्च १९५७, पृ . १

१८७) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ८ मार्च १९५७, पृ . १

१८८) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २६ मार्च १९५७, पृ . १

१८९) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २१ ऑक्टोंबर १९५८, पृ . १

१९०) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ४ नोव्हंबर १९५७, पृ . १

१९१) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २५ नोव्हंबर १९५८, पृ . १

१९२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २५ नोव्हेंबर १९५८, पृ .१,२

१९३) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १२ डिसेंबर १९५८, पृ . १

१९४) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २३ डिसेंबर १९५८, पृ . १

१९५) पेंडसे लालजी, 'महाराष्ट्राचे महामंथन' 'तिसरी आवृत्ती, लोकवाड;मय, मुंबई, २०१०, पृ .७

१९६) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २० जानेवारी १९५९, पृ . १

१९७) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १० फेब्रुवारी १९५९, पृ . ४

१९८) पेंडसे लालजी, उपरोक्त, पृ . ३९९

१९९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ सप्टेंबर १९२९, पृ . २

२००) मणेस कृष्णा, 'असा घडलो असा लढलो!' प्रकाशक विश्वासराव लोकवाडमय गृह, भूपेश गुप्ता भवन, . मुंबई, २००३, पृ . ९२

२०१) दै. 'केसरी' पुणे, २९जानेवारी १९६०, पृ . ३

२०२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ८ जानेवारी १९६०, पृ . १

२०३) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ९ जानेवारी १९६०, पृ . १

२०४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, ९ फेब्रुवारी १९६०, पृ . ५

२०५) दै. 'केसरी' पुणे, १४ फेब्रुवारी १९६०, पृ . १०

२०६) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगांव, १ मार्च १९६०, पृ . २

२०७) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १५ मार्च १९६०, पृ . १

२०८) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २५ मार्च १९६०, पृ . १

२०९) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ५ एप्रिल १९६०, पृ . २

२१०). अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ३ मे १९६०, पृ . २

२११) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १ जुलै १९६०, पृ . २

२१२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ७ जुन १९६०, पृ . १

२१३) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, १७ जुलै १९६०, पृ . २

२१४) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २४ मे १९६६, पृ . १

२१५) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ९ ऑगस्ट १९६६, पृ . ४

२१६) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ६ डिसेंबर १९६६, पृ . १

२१७) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २९ ऑगस्ट १९६७, पृ . १

२१८) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २५ ऑक्टोंबर १९६७, पृ . १

२१९) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १६ डिसेंबर १९६७, पृ . २

२२०) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ३ ऑक्टोंबर १९६८, पृ . १

२२१) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १० ऑक्टोंबर १९६८, पृ . ४

२२२) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १० फेब्रुवारी १९६९, पृ . १

२२३) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ३ फेब्रुवारी १९६९, पृ . १

२२४) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ४ फेब्रुवारी १९६९, पृ . २

२२५) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ५ फेब्रुवारी १९६९, पृ .२

२२६) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ९ फेब्रुवारी १९६९, पृ . १

२२७) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १९ फेब्रुवारी १९७०, पृ . १

२२८) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २३ एप्रिल १९७३, पृ . १

२२९) कित्ता, पृ . ४

२३०) कुंटे जगदीश(स. संपा.), तरूण भारत कार्यालय, बेळगांव, दु. २.०० वाजता , प्रकट मुलाखत, ११ जानेवारी २०१२,

२३१) इंटरनेट – विकिपीडीया 'तरूण भारत' बेळगाव, कारवार, निपाणीचा' सीमाप्रश्न काय आहे? १२ जानेवारी २०१२

२३२) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, १३ ऑक्टोंबर १९४६, पृ . २

२३३) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, १५ ऑक्टोंबर १९४६, पृ . २

२३४) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, ८ ऑक्टोंबर १९४६, पृ . २

२३५) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, १८ जानेवारी १९५५, पृ . २

२३६) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, १ फेब्रुवारी १९५५, पृ ३

२३७) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, १७ मे १९५५, पृ .२

२३८) साप्ताहिक भारत' बेळगाव, २० मे १९५५, पृ.४

२३९) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, २६ जुलै १९५५,पृ . २

२४०) साप्ताहिक,'तरूण भारत' बेळगाव, १९ ऑगस्ट १९५५, पृ . १

२४१) अर्ध साप्ताहिक,तरूण भारत' बेळगाव, २२ डिसेंबर १९६१,पृ . २

२४२) अर्ध साप्ताहिक,तरूण भारत' बेळगाव, १० एप्रिल १९६२, पृ . १

२४३) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ४ फेब्रुवारी १९६४, पृ .२

२४४) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ७ एप्रिल १९६५, पृ .४

२४५) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २३ नोव्हेंबर १९६६, पृ . २

२४६) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ४ डिसेंबर १९६४, पृ . १

२४७) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २२ऑक्टोंबर १९६२, पृ . २

२४८) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, २७ ऑक्टोंबर १९६२, पृ . २

२४९) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ९ नोव्हेंबर १९६२, पृ . ५

२५०) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १५ डिसेंबर १९६२, पृ . ३

२५१) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १८ डिसेंबर १९६२, पृ . ३

२५२) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ११ जानेवारी १९६३, पृ . २

२५३) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २५ नोव्हेंबर १९४७, पृ . २

२५४) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ११ जानेवारी १९४७, पृ . ४

२५५) अर्ध साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, १ सप्टेंबर १९५०,पृ . ३

२५६) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव १२ नोव्हेंबर १९६५, पृ . २

२५७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव १४ जानेवारी १९६६, पृ . ४

२५८) कित्ता, पृ .५

२५९) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ३१ जानेवारी १९७१, पृ .१

२६०) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ४ फेब्रुवारी १९७१, पृ .२

२६१) दै. 'तरूण भारत', बेळगाव १४ फेब्रुवारी १९७१, पृ .६

२६२) दै. 'तरूण भारत', बेळगाव, १७ फेब्रुवारी १९७१, पृ .१

२६३) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ८ एप्रिल १९७१, पृ .१

२६४) दै. 'तरूण भारत', बेळगाव, १० एप्रिल १९७१, पृ.४

२६५) कित्ता, पृ .१

२६६) दै. 'तरूण भारत', बेळगाव, २० मे १९७१, पृ .१

२६७) दै. 'तरूण भारत', बेळगाव, २८ मे १९७१, पृ .१

२६८) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ३० मे १९७१, पृ.१

२६९) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १३ जुलै १९७१, पृ. ४

२७०) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १६ जुलै १९७१, पृ.१

२७१) कित्ता, पृ .२

२७२) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १० ऑगस्ट १९७१, पृ.२

२७३) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १७ डिसेंबर १९७१, पृ.१

२७४) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ६ जानेवारी १९७२, पृ . ३

२७५) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ११ जानेवारी १९७२, पृ . १

२७६) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १८ मार्च १९७२, पृ.२

२७७) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ४ जुलै १९७२, पृ.६

२७८) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ३ ऑगस्ट १९७२, पृ.१

२७९) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २८ जानेवारी १९७२, पृ.३

प्रकरण चौथे

दै. 'तरूण भारत' चे शैक्षणिक कार्य

४.१ प्रास्ताविक–

बेळगांव परिसरातील समाजाच्या शिक्षणाचा प्रश्न हा स्वातंत्र्यपूर्व काळात एक अतिशय कठिण व अवघड अशी समस्या होती. कारण राज्यकर्ते परकीय, जनता अशिक्षीत, दरिद्री, अंधश्रध्दाळू व मागासलेली होती. लोकांमध्ये शैक्षणिक जागृती करणे, त्यांना शिक्षणाला उद्युक्त करणे व शिक्षण संस्थांची स्थापना करून ध्येयवादी शिक्षण–कार्यकर्ते मिळून शिक्षणाची केंद्रे गावोगावी, खेडोपाडी सुरू करणे अवघड गोष्ट होती. अशा वेळी दै. 'तरूण भारत' ने आपले शैक्षणिक कार्य डोंगर दऱ्यातील खेडया–पाडयात व झोपडीपर्यंत पोहचविले. बेळगाव भागातील शिक्षण प्रसाराच्या कार्यात बाबुराव ठाकुर व त्यांच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्राने मोठे योगदान दिले आहे.

४.२ सत्यशोधक चळवळ आणि शिक्षण प्रसार –

शिक्षणाचा ज्ञान दिवा डोंगर दऱ्यातील, खेडयापाडयातील दूरवरच्या झोपडीपर्यंत नेणे तसेच ज्ञानाचा हा प्रकाश सर्वत्र वितरित करणे; हे आपले आद्यकर्तव्य मानून गुरूवर्य शामराव देसाई व त्यांचे सत्यशोधक चळवळीचे साथीदार, अनुयायी, समाजसुधारक, कार्यकर्ते बहिर्जी शिरोळकर, भुजंगराव दळवी, व्ही. एस. पाटील, संत मेलगे व खाडे इत्यादी मंडळींनी सुरूवातीच्या काळात वाडया वस्तीवर जाऊन, डफ–तुणतुणे वाजवीत पहाडी आवाजात पोवाडे व भजने म्हणत, गावातील मध्यवर्ती देवालयासमोर, चावडीसमोर कार्यक्रम सुरू करत मनोरंजनातून उद्‌बोधन व 'शिका, शिकवा, तुमचा उद्‌धार तुम्हीच करा' या त्यांच्या घोषणा असत.[१] या त्यांच्या प्रयत्नातूनच बेळगाव भागात 'शेतकरी शिक्षण समिती, मराठा मंडळ, खेडूत शिक्षण मंडळ, शिक्षण प्रसारक मंडळ, विश्वभारम शिक्षण समिती, इत्यादी शिक्षण संस्थांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय केली.[२]

४.३ 'तरूण भारत'चे सुरूवातीचे शैक्षणिक कार्य (१९१९ ते १९२७)–

भारतीय स्वातंत्र्य लढयाचे मुख्य व मूलभूत उद्दिष्ट ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होणे हे होते. हे जरी खरे असले तरी स्वातंत्र्य लढयाचे स्वरूप व मर्यादा फक्त, राजकीय स्वातंत्र्याच्या संकल्पनेपर्यंत सीमीत नव्हत्या. भारतीयांचा स्वातंत्र्य संग्राम ज्या प्रमाणात राजकीय पातळीवर लढला गेला. त्याच प्रमाणात सामाजिक पातळीवर सुध्दा लढला गेला. कारण सामाजिक न्याय व समतेविना राजकीय स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने निरर्थक व कुचकामी आहे. याची जाणिव सुशिक्षित सुसंस्कृत युवा पिढीला होऊ लागली होती. स्वातंत्र्य चळवळ ही परकियांच्या गुलामगिरी विरूध्द होती. पण सामाजिक न्याय व समतेचे युध्द हे स्वकियातील पुराणमतवादी कर्मकांडी प्रवृत्ती विरूध्द होते. त्यामुळे बऱ्याच अंशी अवघड होते.

हिंदूच्या सामाजिक मागासलेपणाचे मूळ शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणात होते. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक सुधारणा या भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या अविभाज्य घटक बनल्या होत्या. महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य लढयाची व्याप्ती वाढली होती. ती या अनुशंगाने स्वातंत्र्याच्या मागणीबरोबर सामाजिक व शैक्षणिक सुधारणांचा कार्यक्रम मोठया प्रमाणात अंगीकृत करण्यात आला. बेळगाव भाग याला अपवाद नव्हता. या भागातील सामाजिक व शिक्षण प्रसाराच्या कार्यात बाबुराव ठाकुर व त्यांच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्राने मोठे योगदान दिले आहे.

धोंडी राजाराम ठाकुर यांनी स्वतःला स्वातंत्र्याच्या लढयात विद्यार्थीदशेत झोकून दिल्यामुळे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण राहिले. पण शिक्षणाबाबतचे महत्त्व त्यांनी दुर्लक्षिले नाही. आपल्याप्रमाणे आपला समाज शाळेच्या अभावी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. अशी आंतरीक तळमळ असणाऱ्या बाबुरावांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी बेळगाव शहरात शिक्षण प्रचाराचे कार्य हाती घेतले. या कामी 'तरूण भारत' या वृत्तपत्राचा उपयोग झाला. खेडोपाडी समाजाच्या तळागाळापर्यंत शिक्षणाचे बाळकडू देण्याचा प्रयत्न केला. तसेच बेळगाव भागातील मराठी भाषिक समाजाची शिक्षण विषयक असणारी उदासीनता दूर करण्यास मदत झाली. म्हणूनच सुशिक्षित वर्ग पुढे येऊन या भागात शाळा महाविद्यालय स्थापन करू लागला. उपलब्ध झालेल्या शिक्षणामुळे हा समाज सुशिक्षित व सुसंस्कृत बनला.

शिक्षणाचे महत्त्व विशद करताना जुलै १९१९ च्या 'तरूण भारत'च्या अंकात म्हणतात, "खेडयातील शेतकरी, कामगार व पद्दलित समाजाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही. या जनतेला अज्ञान व अंधकारातून बाहेर पडायचे असेल तर शिक्षणाची कास धरली पाहिजे, शिक्षणाशिवाय समाज व पर्यायाने देश प्रगती करू शकणार नाही. शिक्षणाअभावी बेळगाव परिसरातील समाज अज्ञान व अंधकारात खितपत पडला आहे. त्या मुळे आधुनिक युगाची चाहूल त्यास लागत नाही. शिक्षणाअभावी कामगार वर्गाचे मोठया प्रमाणात शोषण होत आहे." तसेच "या बहुसंख्य समाजाला राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात सहभागी करून घ्यावयाचे असेल व पर्यायाने स्वातंत्र्याचा लढा तीव्र करावयाचा असेल तर शिक्षण प्रसार अनिर्वाय आहे."[३] तसेच "आपल्या समाजात चारित्र्यवान व सुसंस्कारसंपन्न पिढी घडवावयाची असेल, समाजात स्वातंत्र्याची भावना जागृत करावयाची असेल, मिळालेले स्वातंत्र्य चिरकाल टिकवायचे असेल, समाजात देशी–विदेशी हालचालीत सहभागी व्हायचे असेल, तर दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे."[४] यावरुन त्यांच्या शिक्षणविषयक विचारांमुळे 'तरूण भारत' संपादकांच्यात शिक्षणविषयक असणारी तळमळ दिसून येते.

४.३.१ 'तरूण भारत' व शिक्षण प्रसार –

शिक्षण प्रसाराचा श्रीगणेशा बाबुराव ठाकुर यांनी विद्यार्थीदशेत केला. शिक्षणाचे महत्त्व ओळखून बाबुराव या कार्याची सुरूवात करताना म्हणतात, 'ज्या समाज वर्गात शिक्षण प्रथम पोहोचले, त्या समाजाची उन्नती झाली आहे. पण त्या वर्गाने शिक्षणापासून मिळणारे फायदे आपल्यापुरते मर्यादित ठेवले. या पदद्लित समाजाचा उद्धार करावयाचा असेल तर शिक्षण त्यांच्या झोपडीपर्यंत पोहचले पाहिजे; त्या अगोदर शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटवून दिले पाहिजे. व शिक्षणाबाबत सक्ती केली पाहिजे. तर देशाचे भले होईल' असा विश्वास जागवणारा विचार त्यानी दिला. शिक्षणाच्या प्रसारासाठी एक व्यक्ती पूरक नाही, त्यासाठी सहकार्याची व एकमताची गरज ओळखून बाबुराव ठाकुर यांनी २५ ऑक्टोबर १९१८ रोजी बेळगाव येथे आपल्या मित्र परिवारासह 'भारत वैभव समाज' या नावाची संस्था स्थापन केली.[५]

अ) 'भारत वैभव समाज' संस्थेची ठळक वैशिष्टये –

१. कामगार वर्गासाठी रात्रशाळा स्थापन करून त्यांना मोफत शिक्षण देणे.

२. समाजात शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे.

३. समाजात लोकजागृती निर्माण करणे व त्यासाठी अ) मोफत वाचनालय ब) पुस्तकालय, क) डिबेटींग सोसायटीची स्थापना करणे इत्यादी या संस्थेचे ब्रीद वाक्य 'एकी, निःस्वार्थ व बंधुभाव; ही तीन तत्त्वे अंगी राखण्याचे वचन दिले गेले. अशा प्रकारे संस्थेची स्थापना करून सामाजिक कार्याची वाटचाल सुरू केली.[६]

ब)'भारत वैभव समाज' स्वयंसेवक मंडळ –

'भारत वैभव समाजाचे' कार्य व्यवस्थितरीत्या चालावे आणि संस्थेने ठरवलेले उद्देश कृतीत आणण्यासाठी व एकूण कार्याला गती देण्यासाठी होतकरू कार्यकर्त्यांचे एक संचालक मंडळ नियुक्त केले.

संचालक मंडळ :–

अ.न.	संचालकांचे नाव	हुद्दा
१.	श्री. जी. एस. कुलकर्णी	जनरल सेक्रेटरी
२.	श्री. एस. एस. जायदे	मोफत शाळेचे सेक्रेटरी
३.	श्री. एस. एस. बिडीकर	पुस्तकालय व वाचनालय सेक्रेटरी
४.	श्री. पी. बी. सबनीस	डिबेटींग सोसायटी सेक्रेटरी
५.	श्री. एम. एच. पेडणेकर	मासिक, 'तरूण भारत' सेक्रेटरी
६.	श्री. डी. आर. ठाकुर	वृत्तपत्र सेक्रेटरी[७]

या संस्थेने बेळगाव व आजूबाजूच्या परिसरातील खेडयामध्ये जावून शेतकरी, कामगार व मजूर यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यास सुरूवात केली. याचा परिणाम इतका झाला की, कामगार वस्तीतही रात्रीच्या शाळा सुरू होऊन विद्यार्थी संख्या वाढू लागली व बेळगाव शहरात कामगार वर्गासाठी सुरू केलेल्या प्रौढ शाळांची संख्या अल्पकाळात सातवर गेली.

बेळगांव शहरात कामगारांची संख्या मोठी होती. परंतु बहुतांशी कामगार हे अशिक्षित होते. या कामगार वर्गासाठी 'भारत वैभव समाजा' ने कामगारांच्या सोयीनुसार वेगवेगळया विभागात रात्रीच्या शाळा सुरू केल्या. या कार्याला कामगार वर्गाकडून अपेक्षापेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला. शाळांची मागणी व संख्या झपाटयाने वाढली याबाबत 'तरूण भारत' च्या नोव्हेंबर १९२२ च्या अंकातील 'कामगार वर्गाच्या रात्रीच्या शाळा' या शीर्षकाखाली शाळांचा विस्तार, कार्य उद्देश, शाळेतील शिक्षक व मजुरांची (विद्यार्थी) संख्या दर्शवणारा तक्ता प्रसिध्द केला आहे.[८]

क) मजुरांच्या शाळा व विद्यार्थी संख्या –

अ.न.	शाळेचे ठिकाण	शिकत असणाऱ्या मजुरांची संख्या	शिक्षकांचे नाव
१	बेळगाव, बापट गल्ली	३५	१. श्री. एन. के. कुलकर्णी २. श्री. व्ही. के. कुलकर्णी
२	बेळगाव, तहसिलदार गल्ली	४४	१. श्री. एम.एस.सावंत २. श्री. आर.ए.शेलार ३. श्री. डी.ए.सावंत ४. श्री. एम. एन. चौगुले
३	बेळगाव, कंग्राळकर गल्ली	५९	१. श्री. जी. ए. खानोलकर २. श्री. के. पी. पाटील ३. श्री. ए. जी. कामतनूर
४	बेळगाव, कोडोलकर गल्ली	४४	१. श्री. हन्नरगीकर
५	बेळगाव, पाटील गल्ली	२२	१. श्री. कतरीकर
६	बेळगाव, चांभार गल्ली	१२	१. श्री. कुलकर्णी
७	बेळगाव, हरीजनवाडा	२५	१. श्री. शिंदे[९]

वरीलप्रमाणे वेगवेगळ्या कामगार वस्तीमध्ये जाऊन कामगारांच्या सोयीनुसार रात्र शाळा उपलब्ध करून दिल्या. कामगार, मजुरांच्यामध्ये वाचनाची व लेखनाची आवड निर्माण केली. त्यामुळे या शाळांच्यामध्ये दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या वाढत गेली अशा शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध करून देणे गरजेचे असे. यासाठी 'तरूण भारत'च्या जुलै १९१९ च्या अंकात सुशिक्षित तरूणांना आवाहन करणारी बातमी दिली आहे. 'सुशिक्षितांनी गरीब देश बांधवांची सेवा करण्यासाठी (अध्यापनाचे काम करण्यासाठी) पुढे यावे.'[१०]

या आवाहनाची दखल घेऊन मुंबई हायकोर्टाचे वकील श्री. एच. व्ही. शिरगावकर, बेळगाव को–ऑपरेटिव्ह संस्थेचे सचिव श्री. एम.एस. सावंत यांनी मोफत अध्यापनाचे काम करण्याचे मान्य केले.[११] अशा या व्यक्तींचा 'भारत वैभव' समाजामार्फत देश सेवा करणारे महान नेते म्हणून गौरव केला. या प्रेरणेतून बेळगावातील अनेक सुशिक्षित तरूण मोफत अध्यापनासाठी पुढे आले. त्यामुळे शिक्षकांचा मोठा प्रश्न मिटला.[१२] या त्यांच्या कार्यामुळे अशिक्षित असणारा कामगार वर्ग शिक्षण घेण्यासाठी पुढे आला. आपल्या कुटुंबातील मुलांना, सदस्यांना शाळेत घालण्यास सज्ज झाला. यामुळे अस्पृश्यांच्या वाडया वस्तीवर शिक्षणाचा दिवा तेवत ठेवणे सोपे झाले.

ड)मोफत वाचनालय–

'भारत वैभव समाज' या संस्थेने शिक्षणाविषयी जनतेत जागृती व आवड निर्माण करण्यासाठी व वाचन संस्कृती रुजवण्यासाठी म्हणून समादेवी गल्ली, घर नंबर ३४४७ बेळगाव येथे सन १९१९ पासून मोफत वाचनालय व पुस्तकालय आणि डिबेटींग सोसायटी सुरू केली.[१३]

मोफत वाचनालयात एकूण मासिके व वर्तमानपत्रांची संख्या ७० ते ८० होती. मराठी व इंग्रजी पुस्तकांची संख्या ६०० पेक्षा जास्त होती. हे वाचनालय संध्याकाळी ७.०० ते ९.०० वाजेपर्यंत सर्वांच्यासाठी खुले होते. त्याच बरोबर डिबेटींग सोसायटीमार्फत तरूण सुशिक्षित वर्गासाठी समाजातील वेगवेगळे विषय देऊन गटचर्चा व स्पर्धा परीक्षा घेतल्या जात असत.[१४] अशा प्रकारचे वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम राबवून, बहुजनांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन सकारात्मक करण्यासाठी हे प्रयत्न होते.

'भारत वैभव समाज' या संस्थेमार्फत सुरू केलेल्या सामाजिक, शैक्षणिक कार्याचा पसारा काही दिवसांत अपेक्षेपेक्षा वाढत गेला. या संस्थेत कार्यरत असणाऱ्या सदस्यांना आर्थिक अडचण सतावू लागली. यातून मार्ग काढण्यासाठी समाजातील दानशूर व समाजकर्त्यांना या कार्यासाठी आर्थिक हातभार लावण्यासाठी नोव्हेंबर १९२२ च्या अंकात सभासद वर्गणी जमा करण्याचे आवाहन केले.

१. **समाजाचे आश्रयदाते** – संस्थेस एकरकमी रु. १०० अथवा त्याहून जास्त देणगी देणारे

२. **समाजाचे कायम सभासद** – संस्थेस रु. ५० पासून १०० पर्यंत देणगी देणारे.

३. **समाजाचे सभासद** – संस्थेस प्रतिवर्षात केवळ रु. ३ वर्गणी देणारे संस्थेचे सभासद जाहीर करण्यात आले. याचबरोबर पुढच्या एका अंकात 'भारत वैभव समाजाचे' लोकशिक्षण, समाज जागृती व लोकसेवेचे कार्य पैशाअभावी थांबू नये म्हणून या संस्थेस सढळ हाताने देणगी देऊन राष्ट्रीय कार्य करावे असे जनतेला आवाहन केले. वरीलप्रमाणे 'भारत वैभव समाजाची' सभासद वर्गणी निश्चित करून संस्थेची आर्थिक अडचण दुर करण्याचा प्रयत्न केला होता. [१५]

बाबुराव ठाकुर यानी आपल्या मित्रांच्या सहकार्याने विद्यार्थीदशेत 'भारत वैभव समाज' नावाची संस्था स्थापन करून स्वातंत्र्यपूर्व काळात समाज जागृती, लोकशिक्षण व समाजसेवा करण्याचे बहुमोल कार्य हाती घेतले होते. बहुजन समाजासाठी ते झटत राहिले या कामी जी

मदत झाली ती 'तरूण भारत' या वृत्तपत्राची यातून जनजागृतीचे धडे देणे शक्य झाले. याची सत्यता त्यावेळचे 'तरूण भारत' चे अंक पाहिल्यानंतर स्पष्ट होते.

'भारत वैभव समाजा'च्या कार्याची दखल घेऊन त्या वेळच्या या देशातील महान व्यक्तींनी भेटी देऊन संस्थेच्या कार्याचा गौरव केला. त्यामध्ये महात्मा गांधींचे पट्टशिष्य पंडित तारानाथ रॉय, अमरावतीचे प्रसिध्द पुढारी श्री. वामनराव जोशी, अकोल्याचे श्री वासुदेवराव चिपळूणकर, नटवर्य श्री. केशवराव भोसले अशा अनेक मंडळी आहेत.[१६]

भारत वैभव समाजाचे निष्ठावान कार्यकर्त्यांनी पुढील काळात स्वातंत्र्याच्या चळवळीत पूर्णतः झोकून दिल्यामुळे नंतर काही वर्षे शिक्षणाच्या कार्याकडे लक्ष दिल्याचे दिसत नाही. तसेच 'तरूण भारत' चे ही कार्य १९२४ ते १९२८ पर्यंत थांबलेले होते.

४.४ 'तरूण भारत'चे शैक्षणिक कार्य (१९२८ ते १९४७)–

'तरूण भारत' ने बेळगाव परिसरात जे शैक्षणिक योगदान दिले, ते महत्त्वाचे आहे. मराठी व कन्नड भाषिक समाजाच्या शैक्षणिक जडण–घडणीत या वृत्तपत्राचाही मोलाचा वाटा आहे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारत स्वातंत्र्याची चळवळ ऐन भरात आली असताना, या चळवळीत शहरी समाजाबरोबर ग्रामीण बहुजन समाज सहभागी करून घेणे गरजेचे वाटले. यासाठी प्रथमतः ग्रामीण भागात जागृती निर्माण करून त्यांना देशकार्यात सहभागी करून घेण्याचा निर्णय घेतला. याचाच एक भाग म्हणून बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना झाली व खऱ्या अर्थाने शिक्षणाला व्यापक स्वरूप आले. तत्पूर्वी या विभागातील शिक्षणासाठी झालेल्या कार्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

४.४.१ राष्ट्रीय शिक्षण –

राष्ट्रीय शिक्षणावर विचार विनिमय करण्यासाठी महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथील नवभारत विद्यालयात २१ व २२ ऑक्टोबर १९३७ रोजी एक महत्त्वाची शैक्षणिक परिषद भरली होती.[१७] या परिषदेत भारतात अस्तित्त्वात असलेल्या शिक्षण पध्दतीचा आढावा घेण्यात आला होता. त्याचबरोबर मेकॉले प्रणीत ब्रिटिश शिक्षण पध्दतीचा त्याग करून भारतीयांनी राष्ट्रीय शिक्षण घ्यावे असे विचार मांडण्यात आले. 'तरूण भारत' या वृत्तपत्रात वर्धा शिक्षण परिषदेस अधिक प्रसिध्दी देण्यात आली होती. या सुमाराला बाळासाहेब खेर मंत्रिमंडळात (मुंबई राज्य १९३७) अर्थमंत्री म्हणून अण्णासाहेब लठ्ठे हे कार्यरत असताना त्यांचे स्नेही

बाबुराव ठाकुर यांना सरकारने सुरू केलेल्या लोककल्याण योजनांची माहिती सांगितली. त्याचबरोबर आपल्या समाजासाठी प्राथमिक शाळा काढून राष्ट्रीय कार्य करावे. पुढे अशा शाळाना सरकारकडून अनुदान दिले जाईल असे सूचित केले. या शासनाच्या निर्णयामुळे शिक्षणातील मुख्य आर्थिक अडचण बाजूला होण्यास मदत झाली. या पार्श्वभूमीवर बाबुराव ठाकुर यांनी शिक्षण प्रसारासाठी स्वतःला वाहून घेतले.[१८]

४.४.२ बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना –

२५ ऑक्टोबर १९३७ रोजी बेळगाव येथे चंदगड, खानापूर व बेळगाव तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची सभा बोलवण्यात आली. यामध्ये शिक्षण प्रसार करण्याचा प्रमुख कार्यक्रम ठरविण्यात आला. शिक्षण प्रसाराचे कार्य हे बेळगाव जिल्हयापुरते मर्यादित ठेवण्यात आले. बेळगाव जिल्हयातील प्राथमिक शिक्षण समितीची सेवा, कला, ज्ञान व उद्योग (तमसोमा ज्योतिर्गमय–अंधाराकडून प्रकाशाकडे जाणे) या ब्रीद वाक्याने शिक्षण समितीची स्थापना करण्यात आली.[१९]

४.४.३ बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती (हेतू, उद्देश व तत्त्वे)–

१. प्राथमिक शिक्षण व प्रौढ शिक्षणाचा बेळगाव जिल्हयात विशेषतः खेडयांत प्रसार करणे.

२. प्राथमिक शिक्षणासाठी दिवसाच्या व प्रौढ शिक्षणासाठी रात्रीच्या शाळा काढून त्या चालविणे.

३. साक्षरता टिकविण्यासाठी शाळा, ग्रंथालय सुरू करणे. व्याख्यानाद्वारे व इतर मार्गाने जनतेत शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे.

४. खेडयाच्या विकासासाठी मदत करणे.

५. खेडयाच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती, संघटना, स्थानिक मंडळ यांना मदत करणे.

६. हे ध्येय साध्य करण्यासाठी समितीतर्फे केंद्र शाखा सुरू करणे.

७. प्राथमिक शिक्षणाबरोबर शेती व शेतीपूरक उद्योग धंद्याचे ट्रेनिंग सेंटर्स आयोजित करून शेतकऱ्यांना माहिती देणे.

८. जिल्हा पातळीवर शिक्षण प्रसार करणे.

वरील उद्देशांनुसार सेवा व त्याग ही समितीची मार्गदर्शक तत्त्वे असतील, असे संमत करण्यात आले.[२०]

बाबुराव ठाकुर यांच्या पुढाकाराने समितीची २२ जानेवारी १९४० रोजी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदणी करून घेतली व संस्थेला कायदेशीरपणा मिळवून दिला. शिक्षण प्रसारासाठी व्हॉलंटरी शाळा (मदत शाळा) सुरू करण्याचे ठरले. व्हॉलंटरी स्कूलची मूळ कल्पना रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची होती व त्यांनीच ती मुंबई सरकारला सादर केली होती. या व्हॉलंटरी शाळा पूर्णतः स्वावलंबनाच्या तत्त्वावर सुरू करण्याचे जाहीर केले होते.[२१]

४.४.४ बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीचे संचालक मंडळ –

'तरूण भारत' चे संपादक बाबुराव ठाकुर यांचा शिक्षण समिती स्थापन करण्यात सिंहाचा वाटा असला, तरी या समितीचे अध्यक्षपद बेळगावचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गो. वा. हेरेकर यांना दिले व स्वतः सचिवपदी राहिले. समितीचे संचालक मंडळ दर तीन वर्षांनी समिती सभासदांच्या सर्वसाधारण (जनरल) सभेत निवडले जात होते.[२२]

प्राथमिक शिक्षण समिती संचालक मंडळ (सन १९३७)–

अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव	अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव
१.	अध्यक्ष	श्री. डॉ. गोविंद वामन हेरेकर	४.	खजिनदार	श्री. कृष्णाजी गोविंद याळगी
२.	उपाध्यक्ष	श्री. गोविंद विठ्ठल सराफ	५.	सल्लागार	श्री. बोधराव विष्णू नाईक
३.	सेक्रेटरी	श्री. धोंडी राजाराम ठाकुर	६.	सभासद	एकूण १३ सभासद होते.

सन १९४० चे संचालक मंडळ–

अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव	अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव
१.	अध्यक्ष	श्री. डॉ. गोविंद वामन हेरेकर	४.	खजिनदार	श्री. कृष्णाजी गोविंद याळगी
२.	उपाध्यक्ष	श्री. गोविंद विठ्ठल सराफ	५.	सल्लागार	श्री. बोधराव विष्णू नाईक
३.	सेक्रेटरी	श्री. धोंडी राजाराम ठाकुर	६.	सभासद	एकूण १३ सभासद होते.

सन १९४७ चे संचालक मंडळ–

अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव	अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव
१.	अध्यक्ष	श्री. डॉ. गोविंद वामन हेरेकर	४.	खजिनदार	श्री. कृष्णाजी गोविंद याळगी
२.	उपाध्यक्ष	श्री. गोविंद विठ्ठल सराफ	५.	सल्लागार	श्री. बोधराव विष्णू नाईक
३.	सेक्रेटरी	श्री. धोंडी राजाराम ठाकुर	६.	मानद संचालक	प्राचार्य एम्.ए.बिडीकर

सन १९५० चे संचालक मंडळ–

अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव	अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव
१.	अध्यक्ष	श्री. चतुरदार शहा	४.	सेक्रेटरी	श्री. बाबुराव राजाराम ठाकुर
२.	उपाध्यक्ष	श्री. गोविंद विठ्ठल सराफ	५.	एक्स ऑफिसीओ	श्री. पी. एच. वाळवेकर

सन १९५३ चे संचालक मंडळ–

अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव	अ.न.	पदाचे नाव	व्यक्तीचे नाव
१.	अध्यक्ष	श्री. चतुरदार शहा	४.	सदस्य	श्री. नारायण नाईक
२.	उपाध्यक्ष	श्री. गोविंद विठ्ठल सराफ	५.	सदस्य	श्री. रामकृष्णपंत जोशी
३.	सेक्रेटरी	श्री. बाबुराव राजाराम ठाकुर	६.	मानद सदस्य	कमिटीने दोन मानद सभासद निवडावयाचे होते.

४.४.५ समितीच्या शैक्षणिक कार्याला सुरूवात –

प्रथमत: शिक्षणाविषयी जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी प्रचार दौरे आयोजित करण्यात आले. २८ ते ३१ ऑक्टोबर १९३७ या कालावधीत खानापूर तालुक्यातील खेडोपाडी अभ्यास दौरे काढून या ग्रामीण भागातील गरजांची माहिती मिळविली. त्यानुसार गावच्या कार्याची रूपरेषा निश्चित करण्यात आली. या दौऱ्यासाठी श्री. बाबुराव ठाकुर, सुंठणकर, वामनराव देसाई इ. समितीच्या कार्यकर्त्यांनी तालुक्यातील ३५ गावांना भेटी देऊन सभा घेऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. ९ नोव्हेंबर १९३७ च्या तरूण भारतातील प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार खानापूर तालुक्यातील नंदगड या गावात घेतलेल्या शैक्षणिक सभेला आसपासच्या १० गावांचे १००० स्त्री–पुरूष जमले होते. या वेळी बाबुराव ठाकुर यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.[२३]

४.४.६ चंदगड महाल दौरा–

शैक्षणिक कार्यासाठी समितीची पुढच्या टप्याची बैठक व सभा चंदगड महाल येथे ५ नोव्हेंबर १९३७ रोजी झाली. या सभेला ४००० प्रतिनिधी हजर होते. या सभेचा सर्व वृत्तांत 'तरूण भारत' च्या अंकात दिला आहे. समितीची कार्यकारणी या सभेच्यावेळी उपस्थित होती. बाबुराव ठाकुर, गोविंदराव सराफ, बा.र. सुंठणकर, वामनराव देसाई, कृष्णराव याळगी इत्यादी मंडळींची मार्गदर्शनपर भाषणे झाली. जिल्हा समितीमार्फत ज्या गावात शाळा सुरू केल्या

जातील त्याच गावातील सुशिक्षित तरूणांना शिक्षक म्हणून नोकऱ्या दिल्या जातील. तसेच ज्या गावाला शाळा सुरू करायची असेल त्या गावाच्या मागणीनुसार समिती शाळा स्थापन करेल; असे जाहीर करण्यात आले.[२४]

४.४.७ 'तरूण भारत' वृत्तपत्रातून शिक्षणाबाबत जागृती –

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीच्या प्रचार दौऱ्याच्या वेळी 'तरूण भारत' या वृत्तपत्राने प्रचारक म्हणून महत्त्वाची भूमिका साकारली. २६ ऑक्टोबर १९३७ च्या अंकात ' एकही निरक्षर अंगठेवाला राहू देऊ नका!' असा संपादकीय लेख प्रसिध्द केला. पुढच्या लेखात 'साक्षरतेच्या प्रचंड मोहिमेस मदत करा. शिक्षणाशिवाय स्वतःचा व देशाचा विकास होणार नाही'.[२५] अशा वेगवेगळ्या मथळ्याखाली वैचारिक लेख देऊन जनतेत शैक्षणिक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व प्रयत्नामुळेच समितीच्या शाळा हया अल्पकाळात अनेक खेडेगावी सुरू झाल्या याचे श्रेय हे 'तरूण भारत' या वृत्तपत्रालाही जाते.

४.४.८ शाळा सुरू करण्याबाबतच्या अटी नियम –

२३ नोव्हेंबर १९३७ च्या अंकात ज्या गावाना शाळा सुरू करावयाच्या आहेत. अशा गावांसाठी काही नियम व रुपरेषा आखून दिल्या त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

१. बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीकडे मागणीचे अर्ज ३० मार्च पर्यंत ज्या ठिकाणी स्कूल बोर्डाची शाळा नाही अशा गावातील प्रमुख व्यक्तींच्या सहकार्याने व सहयानिशी करावे.
२. अर्जात गावची व सभोवतालच्या खेडेगावची माहिती देताना गावची लोकसंख्या, शाळेत येऊ शकतील अशा मुलांची संख्या नमूद करणे आवश्यक आहे.
३. शाळेसाठी गावातून धान्य व रोख पैशांच्या रूपाने किती मदत मिळू शकेल ते नमूद करावे.
४. शाळेसाठी जागा व इतर सोयी मिळू शकतील किंवा नाही याची सविस्तर माहिती पाठविणे आवश्यक आहे.
५. साक्षरता प्रसारासाठी प्रौढ मंडळी मिळू शकतील काय? मिळत असल्यास त्यांची अंदाजे संख्या दयावी.
६. शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षण प्रसारासाठी त्या गावाने प्रतिवर्षी कमीत कमी ५० रुपये अगर तेवढयाच किमतीचे धान्य देणगी म्हणून देणे आवश्यक राहिल.

७. शाळेसाठी व शिक्षकांना राहण्यासाठी जागेची मोफत सोय गावाने करावी लागेल.

८. शाळेत कायम ३० किंवा त्यापेक्षा जास्त मुले येण्याची हमी गावाने दिली पाहिजे.

इत्यादी अटी पूर्ण करणाऱ्या गावात शाळा सुरू केल्या जातील, असे जाहीर केले.

४.४.९ समितीचे शिक्षण विस्तार कार्य –

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची पहिली शाळा १० डिसेंबर १९३७ रोजी चंदगड महालातील नांदवडे या गावी स्थापन करण्यात आली. शिक्षक म्हणून श्री. भीमराव लक्ष्मण आचरेकर यांची नेमणूक करण्यात आली. या वेळी समितीचे सेक्रेटरी श्री. बाबुराव ठाकुर व गोविंदराव सराफ आणि कृष्णराव याळगी हे कार्यकर्ते उपस्थित होते.[२६]

समितीची दुसरी शाळा खानापूर तालुक्यातील गवाळी या गावी १६ डिसेंबर १९३७ रोजी सुरू करण्यात आली. रामचंद्र परशुराम गावडे यांची शिक्षक म्हणून नेमणूक केली.[२७]

४.४.१० स्कूल पंचांची नियुक्ती –

समितीने स्थापन केलेल्या शाळा व्यवस्थित चालाव्यात म्हणून शाळेच्या गावातील नागरिकांच्या विचाराने ५ ते ६ लोकांची एक 'स्कूल पंच कमिटी' नेमण्यात आली. गावातील जास्तीत जास्त मुले–मुली शाळेत आणणे, तसेच शिक्षकांची व शाळेची व्यवस्था पाहणे इत्यादी कामे या कमिटीला करावी लागत. या कार्याचा संपूर्ण अहवाल प्रति आठवडयास केंद्रीय समितीच्या मुख्य कार्यालयात पाठवावा लागत असे.[२८] अशा शाळा ज्या गावात आहेत त्या गावातील पंचकमिटीची नावासह यादी तरूण भारतच्या अंकात प्रसिध्द केली जात असे. त्यामुळे कार्यकर्त्यांना उत्साही व कार्यरत ठेवले जात होते.

४.४.११ समितीच्या शाळांचा विस्तार –

समितीने सुरू केलेल्या शिक्षण प्रसार कार्यास खेडोपाडी गती आली. याचे कारण म्हणजे या समितीचे कार्यकर्ते स्वतः गावात भेटी देऊन शिक्षणाचा प्रचार व प्रसार करत होते. गावातील जाणत्या व प्रतिष्ठित लोकांशी चर्चा करून शाळेसंबंधी निर्माण झालेले प्रश्न सोडवत असत. याच सुमाराला मुंबई राज्याच्या तत्कालीन सरकारने जून १९३८ मध्ये खाजगी शाळा काढून चालवणाऱ्याना, आर्थिक साहाय्य व उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे समितीच्या शाळेच्या संख्येत विलक्षण वाढ झाली.[२९]

अ. नं.	सन	शाळेची संख्या	मुलांची(विद्यार्थी) संख्या
१.	१९३७–३८	०६	१३०
२.	१९३८–३९	५३	१४००
३.	१९३९–४०	९१	२२८०
४.	१९४०–४१	१०६	३५००
५.	१९४१–४२	१२६	५०००

वरील १२६ शाळांपैकी उर्दु माध्यमाची एक शाळा, मराठी माध्यमाच्या ८७ व कानडी माध्यमाच्या ३८ शाळा पैकी ३ लमाणवस्तीवर व एक हरिजनवस्तीवर होती. सन १९४२ मध्ये समितीच्या शाळेत एकूण ५००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी ७०० मुली, ४०० हरिजन मुले व १५० मुस्लीम व ५० ख्रिश्चन मुले होती.[३०]

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीच्या शाळांचा तालुकानिहाय तक्ता –

अ.न.	तालुका	मराठी माध्यमाच्या शाळा	कानडी माध्यम	उर्दू माध्यम	एकूण
१	बेळगाव	७	४	–	११
२	खानापूर	४७	२०	–	६४
३	बैलहोंगल	–	१८	–	१८
४	गोकाक	–	२	–	२
५	सौंदत्ती	–	१५	१	१६
६	चिक्कोडी	२०	५	–	२५
७	हुक्केरी	१	१	–	२
८	अथणी	१	–	–	१
९	चंदगड	३०	–	–	३०
	९	१०३	६५	१	१६९[३१]

समितीच्या शाळा दिवसेंदिवस वाढत गेल्याने यावर कार्यकर्त्यांच्याकडून देखरेख होणे कठीण होते. यातून मार्ग काढण्यासाठी बाबुराव ठाकुर यांनी समितीच्या कार्यक्षत्राचे पाच विभाग पाडून त्या विभागावर सुपरवायझर्सनी नेमले होते. या सुपरव्हायझर्यने ठरवून दिलेल्या विभागांना भेटी देऊन शाळेच्या अडचणी, मुलांची उपस्थिती, गावकऱ्यांचा सहभाग तसेच शिक्षक ग्रामोध्दाराच्या कार्यात सहभागी होतात की नाही हे पाहावे लागत असे. सुपरवायझर्सनी आपला पाहणी व कार्याचा अहवाल प्रत्येक आठवडयास समितीकडे सादर करणे बंधनकारक होते. अशा या कार्यपध्दतीमुळे समितीचा शिक्षण प्रसार इतरांच्यापेक्षा अधिक कार्यक्षमतेने चालू लागला.[३२]

४.४.१२ शिक्षक नेमणुकीच्या अटी –

ज्यांना शिक्षकाच्या जागेसाठी अर्ज करावयाचा असेल त्यांचे शिक्षण निदान इयत्ता सातवीपर्यंत असावे. अशा व्यक्तींनी अर्ज कोऱ्या कागदावर करावा. त्यात अर्जदाराचे वय, शिक्षण, शिक्षकाच्या कामाचा अनुभव इत्यादी कागदपत्राच्या सत्य प्रती संस्थेकडे पाठविण्यात याव्यात. शिक्षकाची निवड करताना त्या त्या गावातील किंवा विभागातील सुशिक्षिताना प्राधान्य देण्यात येईल, असे १८ जानेवारी १९३८ च्या अंकात प्रसिध्द केले होते.

४.४.१३ शिक्षकांना मार्गदर्शन –

शाळेतून चांगला सुसंस्कृत विद्यार्थी घडावा याकरिता शिक्षकांना पुढील मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. १. व्यसनापासून अलिप्त ठेवणे, २. विद्यार्थ्यावर अहिंसेचा संस्कार करणे. ३. चांगल्या वाणीचा (भाषेचा) संस्कार करणे. ४. समितीच्या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी मनाने, विचाराने, कार्याने उच्च दर्जाचा निघाला पाहिजे; असा बाबुरावांचा दंडक होता.[३३]

४.४.१४ शिक्षण परिषद –

२९ नोव्हेंबर १९३८ च्या अंकात मोठया शीर्षकाखाली 'साक्षरतेसाठी प्रचंड आंदोलन धनिकाकडून उदार देणग्यांची अपेक्षा, मुंबईचे मुख्य प्रधान ना. बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली बेळगांव जिल्हा शिक्षण परिषदेची सभा राणीची बाग येथे ५ डिसेंबर १९३८ ला भरणार' अशी बातमी प्रसिध्द करून शिक्षकांसाठी मार्गदर्शन मिळणार असल्याचे स्पष्ट केले. ६ डिसेंबरच्या अग्रलेखात 'यशस्वी शिक्षण–परिषद' या शीर्षकाखाली लेख देऊन या परिषदेचे उद्देश व हेतू स्पष्ट केले आहेत.[३४]

१. शिक्षकांची शारीरिक व बौध्दीक पातळी उंचावणे

२. शिक्षकांचा शैक्षणिक, सामाजिक दर्जा उंचावणे.

३. शिक्षणाविषयी जनतेत जागृती व आवढ निर्माण करणे इत्यादी.

४.४.१५ प्रशिक्षण शिबीरे –

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीचे शिक्षक हे फक्त इयत्ता सातवी पास झालेले होते. अशा शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा उंचवावा व त्यांच्यामार्फत शैक्षणिक कार्य प्रभावीपणे होण्यासाठी म्हणून समितीने शिक्षकांच्यासाठी ठरावीक कालावधीचे शिबीर बोलविण्यात येत

असे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेरेकर व सचिन बाबुराव ठाकुर यांनी चंदगड तालुक्यातील नागनवाडी येथे १ ते १५ जून १९४१ अखेर तर हलकर्णी ता. चंदगड येथे २८ ते ६ जून १९४२ अखेर प्रशिक्षण शिबीरे घेतली.[३५] या शिबीरात तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करून शिक्षकांची शारीरिक व बौध्दीक गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला.[३६]

४.४.१६ शिक्षण समितीच्या उत्पन्नाची साधने –

अ. सरकारी अनुदान, ब. सभासद वर्गणी, क. देणगी इत्यादी.

अ. सरकारी अनुदान –

व्हॉलटरी स्कूल (मदत शाळा) यांना सरकारी अनुदान मिळत असे. परंतु हे अनुदान वेळेत मिळण्याचा भरोसा नव्हता. पहिले अनुदान हे १९४० मध्ये २३,७६२ मिळाल्याचा उल्लेख सापडतो. या सरकारी अनुदानावर विसंबून न राहता वेगवेगळ्या मार्गांनी पैसा उभा करावा लागत असे. [३७]

ब. संस्था सभासद वर्गणी –

१. संस्थेचे पेट्रन्स रु. ५०० रु किंवा अधिक वर्गणी देणारे

२. संस्थेचे फेलोज रु. २५० किंवा त्याहून अधिक वर्गणी देणारे

३. संस्थेचे लाईफ मेंबर (डोनर्स) रु. १०० किंवा त्याहून अधिक वर्गणी देणारे.

४. संस्थेचे सभासद ६ रु. दरसाल वर्गणी देणारे.

५. संस्थेचे सहाय्यक मेंबर वार्षिक रु. १.०० पेक्षा कमी देणगी देणारे.

वरीलप्रमाणे अनेक लोकांना या संस्थेत सभासद करून घेऊन पैसा उभा केला.

क. देणगी देणारे –

संस्थेच्या आर्थिक साहाय्यासाठी वेळोवेळी बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' च्या अंकात समाजाशी बांधिलकी असणाऱ्या दानशूर व्यक्तीना आवाहन केले होते. या त्यांच्या विधायक कार्याला समाजातून मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक लोकांनी देणगीच्या स्वरूपात संस्थेला आर्थिक साहय केले. अशा देणगीदारांची 'तरूण भारत'च्या अंकातून नाव व रकमेसह मजकूर देऊन ऋण व्यक्त केले आहे.[३८] एवढेच नाही तर या संस्थेचा वार्षिक जमाखर्च ताळेबंद पत्र 'तरूण भारत'च्या स्वतंत्र अंकात प्रसिध्द करून समाजाचा विश्वास दृढ केला आहे. अशा प्रकारचा संस्थेचा पहिला वार्षिक जमा–खर्चाचा एक नमुना पुढीलप्रमाणे–

प्राथमिक शिक्षण समिती जिल्हा बेळगाव –

१ जानेवारी १९३८ ते ३० जून १९३८ सहामाही जमाखर्च पत्रक–

अ. नं.	तपशील	जमा रक्कम	तपशील	खर्च रक्कम
१.	शाळा चालू असलेल्या ग्रामस्थांकडून वर्गणी	२२७–८–०	शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार	५३५–२–०
२.	देणग्या	५५१–०–०	शाळा साहित्य खर्च	६०–००–०
३.			मिटींग चार्जेस	०–१२–०
४.			किरकोळ खर्च	०–५–६
५.			डेड स्टॉक खर्च	१५५–६–३
	एकूण जमा	७७८–८–०	एकूण खर्च	७७८–८–०

१ जानेवारी १९३८ ते ता. ३० जून १९३९ अखेर जमाखर्च–

अ.न.	तपशील	जमा रक्कम	तपशील	खर्च रक्कम
१.			पगारापोटी खर्च	६०१७–१३–२
२.			डेड स्टॉक खर्च	२४४२–१४–६
३.			पुस्तके, वहया,पाटया खर्च	३१६–०–०
४.			शाळा इमारत खर्च	२५–००–०
५.			इतर खर्च	९४५–४–१०
	एकूण जमा	१८३८५–२–०	एकूण खर्च	१८३८५–२–०[३९]

अशा प्रकारे समितीने कारभाराचा पारदर्शकपणा समाजासमोर मांडून एक आदर्श घालून दिला होता. समितीच्या खर्चासाठी सन १९३८ नंतर सरकारी अनुदानाची भर पडली. जेवढा जमा तेवढाच खर्च सादर करून समितीच्या आर्थिक धोरणात काटकसरीचा मेळ घालून शाळा व्यवस्थीत चालविल्या.

शिक्षण प्रसारातील दुसरी अडचण म्हणजे विरोधकांची, बेळगाव जिल्हयात बऱ्याच ठिकाणी शाळा स्थापनेच्या निमित्ताने बाबुराव ठाकुर व कॉग्रेस विचारांच्या या मंडळीचा संबंध येऊ लागला. ही बाब कॉग्रेसविरोधी असणाऱ्या स्थानिक गटाला न सोसणारी होती. याच पार्श्वभूमितून विरोधकांचा विरोध हा दिवसेंदिवस वाढत राहिल. उदा. समितीच्या शिक्षण प्रसार कार्याचा प्रसार खेडोपाडी वाढला. त्याच वेळी महाराष्ट्रात आणि मराठी भाषिक प्रदेशात शेतकरी

कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांची फळी खेडोपाडी रूजत होती. हे शे.का.प.वाले काँग्रेसचे वैचारिक विरोधक असल्याने, काँग्रेस विचाराच्या धार्जिणे असणाऱ्या या समितीच्या कार्याला विरोधकांच्याकडून खीळ बसण्यास सुरूवात झाली. परंतु या विरोधकांच्या विरोधाला न जुमानता त्यांच्या या कृतीला 'तरूण भारत' च्या अंकातून हल्ले चढवून सडेतोड असे प्रत्युत्तर दिल्यामुळे विरोधकांचे विरोध कमी झाले. जनतेमध्ये शिक्षण प्रसाराचा आपला शुध्द हेतू असल्याचे या ग्रुपने व्यवस्थितरीत्या समाजावर बिंबवले. असे जरी असले तरी विरोधकांनी वेगवेगळ्या मार्गातून विरोध केला. उदा. चंदगड महालात मित्रमंडळ नावाच्या संस्थेने या ब्राह्मणांच्या शाळा आहेत, त्यात आपल्या मुलाना पाठवू नका, आम्ही तुम्हास नवीन शाळा देतो. त्याच शाळेमध्ये आपल्या मुलाना पाठवा. येथून पुढे समितीला कोणत्याही प्रकारची वर्गणी अगर देणगी देऊ नका. अशा प्रकारचा विरोधी गटाकडून प्रचार करण्यात येत असे. या विरोधी विकृत प्रचाराला समितीच्या सदस्यानी थंड डोक्याने 'तरूण भारत' च्या अंकातून उत्तरे देणारे लेखन केले आहे. याबाबतची आपली स्पष्ट भूमिका मांडून जनतेमध्ये विश्वासार्हता निर्माण केली. असे जरी असले तरी कांही गावातील शाळा बंद कराव्या लागल्या. काही शाळा गावातील स्थानिक मंडळाकडे दयाव्या लागल्या. परंतु समितीचा स्वच्छ उदात्त हेतू स्थानिक लोकांच्या लक्षात आल्यानंतर त्याच गावच्या पालकांनी आपल्या मुलाना समितीच्या शाळेतच घातले.

या समितीच्या प्राथमिक शिक्षण प्रचार व प्रसार या कार्यामुळे चंदगड तालुक्या सारख्या मागास भागात शाळेंचे जाळे खेडोपोडी विनले गेले. या शाळातून दर्जेदार शिक्षण सुरूवातीपासून मिळत गेले. शिक्षणाबाबत जागृती मोठया प्रमाणात झाल्याने याचा फायदा स्थानिकाना झाला व सुशिक्षितांचा वर्ग या भागात निर्माण झाला. यामुळे सामाजिक व आर्थिक क्षमता वाढल्याने लोकांचे राहणीमान सुधारले व समाज सुखी झाला. हे सुरूवातीच्या काळातील बाबुराव ठाकुर यांच्या शैक्षणिक धोरणामुळे व तरूण भारताच्या जागृतीमुळे शक्य झाले. हे मान्य करावे लागले.[४०]

१९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारली असली तरी या समितीच्या शाळा ताब्यात घेण्यास सरकारला पुढे १८ वर्षे लागली. या प्रदीर्घ काळामध्ये बेळगाव जि.प्रा.शि.समितीच्या शेकडो शिक्षकांनी अत्यंत अल्प वेतनावर शिक्षण प्रसाराचे काम खेडोपाडी चालू ठेवले.

सन १९६६ साली या शाळाची सरकारने जबाबदारी स्वीकारली. त्या वेळी समितीच्या सर्व शाळां या कार्यकर्त्यांनी सरकारच्या स्वाधीन केल्या. मात्र कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्यासह शाळा ताब्यात घेण्याचा आग्रह बाबुराव ठाकुर यांनी धरला. शेवटी त्यावेळचे म्हैसूर राज्याचे शिक्षण मंत्री श्री. कठी यांनी हे मान्य केले. त्या मुळे बेळगाव जिल्ह्यातील हजारो शिक्षकांचा फायदा झाला. बाबुरावांच्या कामगिरीबद्दल कानडी व मराठी शिक्षकांनी जाहीर सभा घेऊन त्यांचा सत्कार केला.[४१]

४.४.१७ मराठी ट्रेनिंग कॉलेज –

शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षक प्रशिक्षित असला पाहिजे. यासाठी शिक्षक प्रशिक्षण देणारे महाविद्यालय स्थापन करण्याचे ठरविले.[४२] या महाविद्यालयाची गरज व्यक्त करणारा २६ जून १९४२ चा तरूण भारतामध्ये लेख देऊन कांही मुद्दे मांडले आहेत.

१. शिक्षण व शिक्षकांचा दर्जा उंचावणे.

२. बेळगावच्या आसपास एकही अध्यापक महाविद्यालय नव्हते.

३. समितीच्या शिक्षकांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे दूर गावी राहून खर्च करणे अशक्य होते.

४. समितीच्या शिक्षकांना प्रशिक्षित करणे.

५. शिक्षण खात्याने मुंबई राज्यातील सर्व शिक्षकांना दहा वर्षांत प्रशिक्षित झाले पाहिजे असे १९४२ मध्ये जाहीर केले होते. पण बेळगाव जिल्ह्यात ४२० अप्रशिक्षित शिक्षक होते.

या पार्श्वभूमीवर १७ जून १९४२ रोजी बेळगाव शहरातील महिला विद्यालयात अध्यापक महाविद्यालयाची (मराठी ट्रेनिंग) स्थापना केली. त्याचे उद्घाटन त्या वेळचे मुंबई राज्याचे शिक्षण खात्याचे संचालक श्री. एस.एम. मुस यांच्या हस्ते करण्यात आले.[४३]

या महाविद्यालयाने स्थापनेपासून उत्कृष्ट निकालाची परंपरा जपली आहे. दर वर्षीचे निकालपत्र विद्यार्थ्यांच्या नाव गावासह वृत्तपत्रात प्रसिध्द केले जात असे. महाविद्यालयाच्या प्रगतीत व उत्कृष्ट निकाल परंपरेत शिक्षकांच्या बरोबर प्राचार्यांचे विशेष परिश्रम कारणीभूत ठरले. या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य श्री. एम. ए. बिडीकर (१९४२ ते १९४६) यांनी विनावेतन काम पाहिले. श्री. पी .एच वाळवेकर (१९४७ ते ५२) त्यानंतर १९५३ पासून १९७२ पर्यंत मराठीतील प्रतिभावंत कवयित्री व ख्यातनाम अध्यापिका श्रीमती इंदिराबाई संत

यांनी प्राचार्य पदाची जबाबदारी समर्थपणे पेलली. त्यांनतर श्री. मधुसूदन गोखले १९७६–१९८८ या काळात प्राचार्य म्हणून कार्यरत होते.[४४]

या महाविद्यालयाला वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन करणारे मान्यवर श्री. वामन पोतदार (इतिहासकार), वि. द. घाटे (लेखक), तर्कतिर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी (विचारवंत), श्री. सी. जी. देशमुख (अर्थमंत्री महा. सरकार), आचार्य अत्रे (टिकाकार) आदी राजकीय, सामाजिक, साहित्यिक मान्यवरांनी महाविद्यालयाला भेटी देऊन या महाविद्यालयाच्या कार्याचा गौरव केला.

४.४.१८ उच्च शिक्षणाची सोय –

बेळगाव हे मराठी भाषिकांचे प्रमुख केंद्र असून या ठिकाणी १९४८ पर्यंत लिंगायत एज्युकेशन सोसायटीने चालविलेले लिंगराज कॉलेज हे एक महाविद्यालय बेळगाव भागात होते. अशा वेळी समितीने मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याविषयक विचार चालू असतानाच सावंतवाडी येथे 'साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटी' तर्फे राणी पार्वतीदेवी महाविद्यालय सन १९४६ पासून सुरू झाले. पण कोकणातील मलेरिया या रोगाच्या साथीमुळे हे महाविद्यालय बंद पडण्याच्या वाटेवर होते. असे हे महाविद्यालय बाबुराव ठाकुर, डॉ. हेरेकर यांच्या प्रयत्नाने बेळगावात स्थलांतरित करून चालू ठेवण्याचे ठरले. त्यासाठीची बैठक अण्णासाहेब लठ्ठे यांच्या वाडयावर घेण्यात आली.[४५] कॉलेजच्या आर्थिक खर्चासाठी 'तरूण भारत' च्या अंकात जनतेला आर्थिक मदत करण्याची हाक देण्यात आली. याचा परिणाम म्हणजे एक महिन्यात अडीच लाख रुपयांवर निधी गोळा झाला.[४६]

या महाविद्यालयात पहिल्या वर्षी पुढील वर्ग सुरू केले होते. त्यामध्ये पुढीलप्रमाणे विद्यार्थी संख्या होती.

सन	विभाग	संख्या	विभाग	संख्या
१९४८–४९	एफ वाय (कला)	७५	एफ वाय (विज्ञान)	१००
	इंटर (कला)	४५	इंटर (विज्ञान)	७५
	बी.ए.(कला)	२८	एम. एस्सी	०६
			(सिनियर ज्युनियर)	
एकूण संख्या		१५१	एकूण संख्या	१८१[४७]

हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेले होते. ते तसेच राहावे ही समितीच्या पुढाऱ्यांची भूमिका होती. यासाठी जनआंदोलने झाली 'तरूण भारत' वृत्तपत्राने पाठपुरावा करूनही शेवटी कायद्याने हे कॉलेज कर्नाटक विद्यापीठाला जोडले गेले.[४८]

प्रस्तुत कॉलेज हे सीमा भागातील जनतेचे शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाचे एक आदर्श केंद्र बनावे, याकरिता बाबुराव ठाकुर, डॉ. हेरेकर, मा.लठ्ठे व सर्व समिती कार्यकर्ते, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग हे कार्यरत होते. त्यामुळे सुरूवातीपासून या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या व गुणवत्ता दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसते. १९६६ साली या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या एक हजार पेक्षा जास्त झाली. त्यामुळे नियमाप्रमाणे राणी पार्वती देवी (कला) व सक्सेरिया (विज्ञान) अशा दोन विभागात विभागणी करण्यात आली. या कॉलेजच्या भव्य इमारती, अद्ययावत प्रयोगशाळा सुसज्ज ग्रंथालय, लेडीज हॉस्टेलस, स्टुडंटस् हॉस्टेल, जिमखाना, व्यायामशाळा, प्राचार्य–प्राध्यापक–कर्मचाऱ्याच्यासाठी राहण्यासाठी क्वॉटर्स, युनिव्हर्सिटी व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरचे वर्कशॉप विस्तृत क्रिडांगण खुले नाटय गृह, कॉलेज भोवतालची निसर्गरमणीय आमराई व परिसर यामुळे राणी पार्वतीदेवी कॉलेज हे दक्षिण भागातील एक नावाजलेले व आदर्श कॉलेज म्हणून गणले जाते.

आज हे महाविद्यालय बेळगाव विभागाचे मुख्य शैक्षणिक केंद्र बनले आहे. या महाविद्यालयाचा शैक्षणिक विस्तार खूप वाढला आहे. व्यावसायिक कोर्सेस, कमी कालावधीची प्रशिक्षणे, मुल्याधिष्ठात शिक्षण, पारंपरीक कोर्सेस अशा विविध प्रकारचे व विषयाचे शिक्षण दिले जाते. आज सीमा भागातील हजारो विद्यार्थी या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. याचे सर्व श्रेय हे बाबुराव ठाकुर व त्यांच्या मित्र परिवाराला जाते. बेळगाव भागातील मराठी भाषिक जनतेच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी जो संघर्ष करावा लागला, ज्या अडचणी निर्माण झाल्या, त्या सर्वांवर जनतेच्या मदतीने मात करून ही संस्था बाबुराव ठाकुर व त्यांच्या मित्र परिवाराने नावारूपाला आणली.

एस. के. ई. सोसायटीच्या ध्येयवादी आणि शिक्षणप्रेमी अशा जाणकार संचालकांच्या प्रयत्नामुळे आज अनेक तांत्रिक शिक्षणाच्या सोयी करण्यात आल्या आहेत. बारावीनंतर व्यवसाय शिक्षणाचे (व्होकेशनल कोर्सेस) अनेक वर्ग सुरू करण्यात आले आहेत. बाबुराव ठाकुर मेमोरियल ही स्वतंत्र शाखा सुरू करण्यात आली आहे. जे शिक्षणापासून दूर आहेत, व्यवसाय

व काही अडचणीमुळे ज्यांना पदवीपर्यंतचे व नंतरचे शिक्षण घेता आले नाही, अशांसाठी 'इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ' ही शाखा सुरू करण्यात आली होती. शिवाय ठळकवाडी हायस्कूल, स्वाध्याय विद्यामंदिर या माध्यमिक शाळा संस्थेने आपल्या ताब्यात घेऊन आदर्श पध्दतीने चालवलेल्या आहेत.

४.४.१९ प्रौढ शिक्षण प्रसार –

प्राथमिक शाळांच्या उभारणीबरोबर प्रौढ शिक्षण प्रसार करण्याच्या कामी समितीने आपली क्रयशक्ती वापरली. या समाजातील प्रौढ व जाणत्या लोकांचा असणारा अज्ञानपणा व मागासलेपणा हा आपल्यातील असणारे अज्ञान आहे. हे अज्ञान हटवायचे असेल तर शिक्षण गरजेचे आहे. या निरक्षरतेच्या फेऱ्यातून समाजाची सुटका करण्यासाठी समितीच्या कार्यकर्त्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर साक्षरता प्रसाराची मोहीम हाती घेतली.

शैक्षणिक जागृती करण्यासाठी 'तरूण भारत' या वृत्तपत्राचा मोठया प्रमाणात वापर करून घेतला. या सुमारचे अनेक लेख हे शैक्षणिक प्रसाराबाबतचे आणि तेही शिक्षणतज्ज्ञ विचारवंत यांचे लेख प्रसिध्द केले आहेत. या लेखनामधून जनमाणसांत व सरकारात जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारच्या शैक्षणिक धोरणाविषयी व निर्णयाबाबत चर्चा करून शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचे कार्य या वृत्तपत्राने केले आहे.

प्राथमिक शाळा काढण्याबरोबर समितीने प्रौढासाठी रात्रशाळा काढण्याचे आपले ध्येय धोरण ठरविले. त्यासाठी 'तरूण भारत' च्या १६ जून १९३८ च्या अंकात जाहीर प्रसिध्दीची बातमी दिली आहे. ज्या गावात जास्त प्रौढ निरक्षर असतील, त्या गावातील ग्रामस्थांनी प्रौढ शिक्षणाच्या शाळेसाठी समितीकडे अर्ज करावा असे जाहीर केले. या आवाहनाला प्रतिसाद मिळाला व लगेचच काही गावांचे मागणी अर्ज समितीकडे दाखल झाले. अशा गावांना समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन प्रौढ शिक्षणाच्या शाळा पुढील गावांत सुरू केल्या

प्रौढ शिक्षणाच्या शाळा –

अ.नं.	गावाचे नाव	प्रौढ शिक्षण शाळा सुरू केल्याची तारीख
१	खोनेवाडी	५ ऑगस्ट १९३८
२	शिरगाव	१० ऑगस्ट १९३८
३	कोकरे	१ ऑक्टोबर १९३८
४	नागनवाडी	२१ नोव्हेंबर १९३८
५	चेंदुरटेक	१ फेब्रुवारी १९३९[४९]

या समितीच्या कार्याला समाजातून मोठा प्रतिसाद मिळाला. मागणीनुसार प्रौढ रात्र शाळांची संख्या वाढली. यासाठी नियोजन आखून देण्यात आले. कामगार, शेतकरी व मजूर अशा समाजातील घटकांसाठी या शाळा असतील जे प्रौढ या शाळेत प्रवेश घेऊ इच्छितात त्यांना कांही बंधने घालण्यात आली. त्याचबरोबर त्यांच्या सोयीनुसार प्रौढ रात्र शाळांची वेळ ठरवण्यात आली. रात्री ७.०० ते ९.०० अशी वेळ ठरवून दिली. शिक्षक म्हणून स्थानिक गावांतील सुशिक्षित व तरूण व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या करिता ठराविक मानधन ठरविण्यात आले.

प्रौढ रात्र शाळांबाबत जागृत राहून खेडयांतील अशिक्षित प्रौढांना शिक्षणाचे धडे देण्याचे काम समितीने केले. याबाबतचा दर आठवडयाचा अहवाल या शाळेतील शिक्षकानी आपल्या विभागवार जमा करण्याचे आदेश देऊन या शाळेच्यावर लक्ष केंद्रित केले. समितीचे हे कार्य महत्त्वाचे आहे.

४.४.२० शैक्षणिक बातम्या –

बाबुराव ठाकुर यांनी शिक्षण प्रसाराचे काम बेळगाव परिसरात मोठया प्रमाणात केल्याने आपल्या वृत्तपत्रात शिक्षणविषयक बातम्यांना अग्रस्थान दिले होते. 'तरूण भारत' या वृत्तपत्राची निर्मिती ही तरूण वर्गाला जागृत करून देश हिताला दिशा देण्यासाठी झाली होती. त्याचबरोबर खेडोपाडयांतून शिक्षण घेण्यासाठी बेळगावात येणाऱ्या विद्यार्थांच्यामध्ये लेखनाची, वाचनाची आवड निर्माण करून शिक्षणाची गोडी लागावी व आपल्याकडे असणाऱ्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी या वृत्तपत्राचा वापर होत असे. याबाबतच्या जनजागृतीसाठी बाबुराव ठाकुर यांनी आपल्या वृत्तपत्रात संशोधक व शिक्षणतज्ञ विचारवंताचे लेख प्रसिध्द करून आधुनिक शिक्षणाला गरजेची व पाश्चात्त्य विचारांची जोड देऊन समाजाबरोबर सरकारला शैक्षणिक सल्ला देण्याचे कार्य या वृत्तपत्राने केले आहे.

जानेवारी, फेब्रुवारी १९२१ च्या अंकात 'सध्याचे शिक्षण'[५०] हा संपादकीय लेख प्रसिध्द करून शिक्षणाबाबतची सरकारची उदासीनता स्पष्ट केली आहे. "शिक्षणाचा वास्तविक उद्देश देशातील लोकांची मने सुसंस्कृत करणे हा होय. ज्या शिक्षणाने देशातील लोकांचे उद्योगधंद्यांचे ज्ञान वाढेल, नीतिमत्ता व स्वदेश प्रीती ही वाढेल, एकी निर्माण होऊन एकजुटीने राष्ट्रकार्य

करण्याची पात्रता अंगी येईल. तसेच राजकीय संघटन करण्याचे सामर्थ्य व कळकळ मनात निर्माण होईल व देशहिताची जागृती होईल, एकंदरीत समाजाची स्थिती सुधारण्याची पत येईल, अशा शिक्षणाची आपल्या राष्ट्राला आज गरज आहे." स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा, चालीरीती या वाईट असून परकीय धर्म व भाषा ही उच्च आहे; अशी मनोवृत्ती आपली होत चालली आहे. नोकरशाही हेच मायबाप सरकार जे जे करते ते ते आपल्या हिताचे आहे, अशी बहुजन समाजाची खोटी समजूत होत चालली आहे. या शिक्षणाने खरे खोटे समजण्याइतकी मानसिक उन्नती आली पाहिजे. पण आजच्या या शिक्षणाने असे होत नाही. म्हणून आम्ही आज ब्रिटिश राजसत्तेचे शरीराने व विचारांचे गुलाम आहोत. आमच्यातील असणारा राजकीय देशप्रेमाचा व व्यक्तित्वाचा संबंध तुटलेला आहे. यातून देशाला व तरूण पिढीला बाहेर काढण्यासाठी स्व–अभिमानाचे व देशप्रेमाचे शिक्षण गरजेचे आहे. असे तळमळीने सांगून देशबांधवांच्या अंत:करणाला भिडणारा हा लेख आहे.

'राष्ट्रोन्नती व शिक्षण' या अग्रलेखातून राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षणाचा कसा उपयोग होऊ शकतो हे सांगितले आहे. "शिक्षण हे एक तीक्ष्ण शस्त्र आहे, ते चांगल्या मनुष्याच्या हाती पडले तर त्याचा चांगला उपयोग होतो. म्हणून हे शस्त्र हाती देण्यापूर्वी त्याचा चांगला उपयोग करण्याची वृत्ती सुशिक्षितांच्यात उत्पन्न झाली पाहिजे." असे विचार त्यांनी मांडले, यावरून शिक्षणाविषयीची त्यांची दूरदृष्टी समजते.[५१]

ब्रिटिश शिक्षण पध्दतीवर बाबुरावांनी २७ ऑक्टोबर १९२९ च्या अग्रलेखातून सडेतोड टिका केली. 'सुशिक्षितांची बेकारी' हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्यांचा एक हेतू असा की, 'इंग्रजी भाषेचे ज्ञान असणारा नोकरातील मजूर वर्ग तयार करून इंग्रज अधिकाऱ्यांना, नोकरशाहीला राज्यकारभार चालविता यावा. अशी इकडील शिक्षण पध्दती त्याच दृष्टीने आखल्यासारखी दिसते.' अशी टीका केली आहे. ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीला आवश्यक अशी लोकशाही तयार करण्यासाठी आवश्यक अशीच शिक्षणपध्दती इंग्रजानी अवलंबली होती. हे त्यांनी अचूकपणे हेरले होते, हे यावरून सिध्द होते.[५२]

स्त्रियांनी शिक्षण घेण्यास प्रारंभ केला –'चूल व मूल' हे कार्यक्षेत्र सोडून आजची स्त्री विविध चळवळींत भाग घेत आहे. त्याचे कौतुक 'स्त्रिया व राजकीय चळवळ' या अग्रलेखातून

केले आहे. त्याचबरोबर तत्कालीन समाजात स्त्रियांविषयी असलेल्या विविध मत प्रवाहाची माहिती करून दिली आहे.[५३]

बाबुरावांना शिक्षणाविषयी खूप तळमळ होती. आपल्या समाजातील लोकांनी शिक्षण घ्यावे. असे त्यांना कायम वाटत होते. कारण त्यांना शिक्षणाचे महत्व पटलेले होते. 'विद्यार्थ्यांपुढील कार्य'[५४] या अग्रलेखातून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व मांडलेले आहे. विद्यार्थ्यांनी शाळा सुट्टीचा सदुपयोग स्वतःसाठी न करता इतरानांही त्याचा फायदा मिळावा, यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केले आहे. अभ्यास व विद्यार्थी यांचे पक्के हाडवैर असते, याची जाणीव त्यांना असून 'खेडगावची पाहणी करण्याचा अभ्यास' विद्यार्थ्यांपुढे ठेवला आहे. त्यामुळे खेडेगावची बारीकसारीक माहिती मिळेल, त्याचबरोबर राष्ट्रीय सभेचा संदेश प्रत्येक घरोघरी पोहचविता येईल. त्यातून खेडेगावची संघटना बांधता येते. असे अनेक हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. हा अभ्यास कशा पध्दतीने राबवावा, याचीही माहिती देण्यात आली आहे. अशा प्रकारे वृत्तपत्र शिक्षणाचे जवळचे साधन होऊ शकते, हे बाबुरावांनी पटवून दिले आहे.[५५]

४.४.२१ सार्वजनिक वाचनालय बेळगाव–

शहापूर–जनरल लायब्ररीच्या नव्या इमारतीचे उद्घाटन श्रीमंत सौ. राणी सरकार सांगली यांच्या हस्ते २३ एप्रिल १९३४ रोजी झाले. त्या दिवशीच्या कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तान्त देऊन या वाचनालयाचा महत्त्वपूर्व इतिहास कथन करणारा समग्र लेख दि.२४ एप्रिल १९३४ च्या अंकात प्रसिध्द केला आहे.[५६]

इ.स १८७४ मध्ये बेळगावमध्ये सार्वजनिक वाचनालयाची स्थापना झाली. या वाचनालयाच्या स्थापनेसंबंधी बेळगाव जिल्हयाचे कलेक्टर 'इन्वीराईटी' यांचा प्रामुख्याने पुढाकार होता. वामन प्रभाकर सरंजामे यांचे प्रयत्न महत्त्वाचे होते. वाचनालयाची स्थापना केल्यानंतर त्याला 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' हे नाव प्रथम देण्यात आले. आरंभी या वाचनालयाचे ८५ वर्गणीदार होते. ग्रंथ विभाग एकूण १०३६ पुस्तके होती. वाचकांसाठी टेबलावर इंग्रजी ,मराठी व गुजराथी अशी एकूण तेरा नियतकालिके व वृत्तपत्रे होती.[५७]

४.४.२२ महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद–

२९ ते ३१ डिसेंबर १९३४ रोजी अकोला येथे महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे ६ वे अधिवेशन दे. भ. श्री. ल. ब. भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. वेगवेगळया

विभागांतून आलेल्या मान्यवरांची भाषणे झाली. श्री मामा जोगळेकर यांच्या भाषणाचा सविस्तर उलगडा या लेखात केला आहे. "तरूण वर्ग व भावी पिढी आरोग्यदायी व सक्षम तयार करायची असेल तर ज्ञांनाच्या भांडाराबरोबर निरोगी शरीरयष्टी असणे गरजेचे आहे. यासाठी आहार, विहाराबरोबर व्यायामाची व कसरतीची आवश्यकता आहे. खेडोपाडी अशा व्यायाम शाळा सुरू करून सुदृढ व आरोग्यदायी युवावर्ग निर्माण केला पाहिजे. हे शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तीची गरज आहे. त्याशिवाय व्यायामाचे प्रकार, आहारातील समतोलपणा, व्यायामाची शरीराला गरज व मर्यादा लक्षात घेऊन येईल वाटचाल करावी." अशा प्रकारे या परिषदेत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होऊन व्यायामाचे महत्त्व व पध्दती समजावून सांगण्यात आल्या. अशा लेखाना प्रसिध्दी देऊन समाजात वापरात असणारी जुनी बलोपासना व नवीन आधुनिक शास्त्रोक्त व्यायाम प्रकाराची सांगड घालून एक प्रकारे नवीन जाणीव स्वीकारण्यास समाजाला सज्ज केले असे दिसते.[५८] पुढच्या एका लेखात 'व्यायाम संस्थांची आवश्यकता' या विषयावर वैचारिक व शास्त्रोक्त पध्दतीचा लेख दिला आहे.

शारीरिक शिक्षणाला महत्त्व देवून प्रत्येक प्राथमिक शाळाना आपल्या शाळांचे स्वतंत्र क्रिंडागण निर्माण करावे. याच बरोबर खेळाचे साहित्य संग्रहीत करून मुलांना वेगवेगळ्या खेळाच्या माध्यमातून शारीरिक शिक्षण दयावे व आवड निर्माण करावी अशा प्रकारचे विचार या लेखात मांडले आहेत.[५९]

४.४.२३ वर्धा शिक्षण योजना (१९३७)–

वर्धा येथील मारवाडी हायस्कूलचा रजत जयंती समारंभ २२ व २३ ऑक्टोबर १९३७ रोजी आयोजित केलेला होता. या वेळी महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण संमेलन आयोजित केले होते. हे संमेलन वर्धा येथे भरलेले असल्यामुळे याचा 'वर्धा शिक्षण परिषद' असा उल्लेख केला जातो. या संमेलनासाठी विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, नरेंद्र देव, बा. ग. खेर, डॉ. झाकिर हुसेन, प्रा. के. टी. शहा इत्यादी शिक्षणतज्ञ, समाजसुधारक व राष्ट्रीय पुढारी उपस्थित होते. या परिषदेसंबंधी 'तरूण भारत'; ने सविस्तर विवेचन करून महात्मा गांधीचे प्राथमिक शिक्षण, व शिक्षणविषयक विचार मांडले आहेत.[६०]

महात्मा गांधीनी या परिषदेत आपली शिक्षण योजना मांडली. "साक्षरता हे शिक्षणाचे एक साधन आहे व त्याच्या साहाय्याने भारतीय समाजाला शिक्षित केले पाहिजे. केवळ साक्षरता

म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणातून शारीरिक, बौध्दिक आणि मानसिक अशा तिन्ही प्रकारचा विकास होणे अपेक्षित आहे शिक्षण हे स्वावलंबी झाले पाहिजे व शिक्षणातून व्यक्तीच्या शरीर, मन व आत्म्याचा विकास झाला पाहिजे. शिक्षणातून पोट भरण्याचे व जीवनातील समस्या सोडविण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी आले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासासाठीच्या पुस्तकी ज्ञानाबरोबर त्याला एखाद्या व्यवसायाचे ज्ञान दिले पाहिजे. शिक्षणातून दुसऱ्याचे दुःख जाणून घेण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे." हे महात्मा गांधींजीचे वास्तवाला धरून असणारे विचार 'तरूण भारत'च्या अंकात प्रसिध्द करून या परिषदेत मंजूर झालेल्या ठरावांच्यावर चर्चा केली आहे.

मंजूर झालेले ठराव –

१. राष्ट्रीय स्तरावर प्रत्येकाला ७ वर्षांचे सक्तीचे व मोफत शिक्षण दिले जावे.

२. मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे.

३. हे शिक्षण स्वावलंबी व्हावे जेणेकरून यातून मिळणाऱ्या पैशांतून शिक्षकांचा पगार भागवावा.

४. या कालावधीत मुलांना द्यावयाचे शिक्षण हे कोणत्यातरी एका हस्तकलेशी व शारीरिक श्रमाशी संबंधित असावे.

या परिषदेतून महात्मा गांधींनी शिक्षणाची एक नवीन योजना समाजापुढे ठेवली. ही योजना जीवनाभिमुख तसेच स्वावलंबी शिक्षणाला प्राधान्य देणारी होती. महात्मा गांधींनी ज्या ज्या वेळेला शिक्षणविषय विचार मांडले, तेव्हा तेव्हा या वृत्तपत्राने त्या विचाराला व तत्त्वज्ञानाला प्रसिध्दी देऊन समाजात शिक्षणविषयक नव्या जाणिवा करून दिल्या आहेत.

४.४.२४ प्राथमिक शिक्षणाची चळवळ –

देशाची सर्वांत महत्त्वाची समस्या म्हणजे शैक्षणिक पुनर्घटना होय. मुंबई प्रांतापुरते पाहावयाचे म्हणजे २१ हजार गावापैकी १२,६९३ खेडेगावांना प्राथमिक शिक्षणाची सोय नाही. या सर्व गावी एकाच वेळी शिक्षणप्रसार करावयाचा झाल्यास सरकारकडे पैसा नाही. त्यामुळे शैक्षणिक प्रसाराचे कार्य पुढे रेटण्यासाठी या देशातील सुशिक्षित वर्गाला या लेखातून हाक दिली आहे. आपल्या विभागात मुलकी किंवा मॅट्रिक परीक्षा पास झालेले तरूण आहेत. अशा बेकार असणाऱ्या तरूणांनी पुढे येऊन आपल्या गावात शाळा सुरू करावी. अशा शाळांना सरकारकडून ग्रँट स्वरूपात मदत मिळणार आहे. त्यामुळे आपल्यावर ओढवलेली बेकारी ही

कमी होईल व सर्व सामान्यांच्या मुलांना शिक्षणही मिळेल. अशा तरूणांना बेळगाव जि. प्राथमिक शिक्षण समिती सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहे. तेव्हा आमच्या समितीकडे मागणी अर्ज करून देशाच्या शैक्षणिक कार्यात आपला सहभाग नोंदवावा व समाजात खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार करावा, असे आवाहन अग्रलेखात केले आहे.[६१]

सन १९३८ पासून 'तरूण भारत' ने शिक्षण विभाग हे स्वतंत्र सदर सुरू करून शैक्षणिक विषयावर वेगवेगळ्या शिक्षणतज्ज्ञांचे व समाजकर्त्यांचे लेख प्रसिध्द करून या विभागातील शिक्षण विस्ताराचा व प्रगतीचा कानोसा घेतला आहे. 'दुय्यम शाळा आणि कॉलेज यातील शिक्षणाचे माध्यम' हे व्ही. बी. जोशी (सेवानिवृत्त एज्यू. इन्स्पेक्टर धारवाड) यांचे 'अभ्यासक्रमातील होऊ घातलेला बदल व गरजेचा अभ्यासक्रम' याबाबत विचार मांडले आहेत. या 'जुन्या अभ्यासक्रमाच्या कडीतून बाहेर येऊन प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाचा व अभ्यासक्रमाचा साचा बदलला पाहिजे.[६२]

'निरक्षरता निवारक दिन' म्हणून १५ जानेवारी १९३९ रोजी सरकार सर्व स्तरावर पाळतो व शिक्षणविषयक जनजागृतीची मोहीम हाती घेतो. या दिवसापुरते शिक्षणविषयक धडे देणे हिताचे नाही' समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण ग्रामीण भागात पोहचले पाहिजे. तेही सर्वासाठी मोफत व सक्तीचे याचबरोबर 'बौध्दीक शिक्षणाची गत काय?' हा आचार्य काका कालेकर यांचा वैचारिक लेख प्रसिध्द करण्यात आला.[६३] याच सदरात ७ फेब्रुवारी १९३९ रोजी संध्याकाळी ६ वाजता बेळगाव येथील क्रिडाभवनात मुंबई प्रांतिक 'प्रौढ शिक्षण समितीच्या सभासद गोंदुबाई गोखले यांचे 'प्रौढ शिक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. त्या प्रसंगी जे विचार मांडले ते प्रसिध्द करून 'प्रौढाना शिक्षण देणे काळाची गरज आहे.' आमच्या देशाचा मुख्य उत्पादकच अज्ञानी असेल तर आपली प्रगती होणार नाही. हा घटक ज्ञानी व सुसंस्कृत झाला पाहिजे, तर नवनवी तंत्रज्ञानाचे ज्ञान त्यांना अवगत होऊन प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी पुढे येथील असे विचार व्यक्त केले.[६४]

४.४.२५ सुशिक्षितांमधील बेकारी–

श्री. ना. त्रि. पंडीत यांचा लेख प्रसिध्द करून समाजातील सुशिक्षित वर्गातील बेकार असणाऱ्या तरूण पिढीला जागे करणारा व दिशा दाखवणारा लेख आहे. 'पदवी धारण केलेले सुशिक्षित लोक चांगल्या नोकरीच्या पाठीमागे लागले आहेत. म्हणून ते बेकार आहेत. अशा

सुशिक्षित तरूण पिढीने नोकरीच्या विचारातून बाहेर येऊन रोजगाराचा, धंद्याचा व आधुनिक शेती पध्दतीचा मार्ग शोधावा व आपले वैयक्तिक जीवन समृध्द करावे. आपल्यासारखा सुशिक्षित वर्ग शेतीकडे वळल्यास आपल्या देशात हरितक्रांती होण्यास वेळ लागणार नाही. आपला देश अन्न–धान्याने स्वंयपूर्ण बनेल. ज्याला काहीच जमत नाही, त्याने शेती करावी हा विचार बदलला पाहिजे. आपल्या शेती व्यवसायाला व श्रमाला समाजातून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे तरच आपल्या देशाचे तरूण शेतीकडे वळतील असा सल्ला दिला आहे.[६५]

४.४.२६ महिला विद्यालय –

११ जून १९४१ रोजी बेळगाव येथे महिला विद्यालयाच्या भव्य इमारतीचे उद्घाटन मि. मदन यांच्या हस्ते झाले या प्रसंगी दिलेला लेख पुढीलप्रमाणे.

बेळगाव स्त्री शिक्षणासाठी 'महिला विद्यालय' ही संस्था गुरूवर्य अण्णासाहेब कर्वे यांच्या नेतृत्वाखाली श्री. बनुबाई अहो यांनी १९२३ साली स्थापन केली. आरंभी या शाळेत फक्त पाच विद्यार्थिनी होत्या. यानंतर या शाळेत विद्यार्थी संख्येत झपाटयाने वाढ झाली. सन १९४१ या शैक्षणिक वर्षात शाळेत २०० विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. ही शाळा सुरूवातीला श्री नाथीबाई ठाकरसी, वुमेन्स युनिव्हर्सिटीला जोडलेली होती. पुढे १९३६ साली मुंबई युनिव्हर्सिटीला जोडण्यात आली. पुढे या संस्थेने मराठी, इंग्रजी आणि कानडी माध्यमाच्या शाळा सुरू करून शिक्षण कार्याचा विस्तार वाढवला.

महिला विद्यालय बेळगाव या शाळेची एक जाहिरात १९ मे १९४१ च्या अंकात प्रसिध्दी केली आहे. त्या जाहिरातीचा उद्देश व शिक्षणविषयक स्पर्धेत शाळेचा लौकिक आणि त्यांची वाटचाल समजून येते.[६६]

हवेशीर ठिकाणी हायस्कूलची नवीन भव्य इमारत सुसज्ज अशी सायन्स लॅबोरेटरी, खेळायचे मैदान व खेळाचे साहित्य, पुस्तकालय अशी सर्वांगीण व्यवस्था असल्याने पालकांनी आपल्या मुलींना या हायस्कूलमध्ये पाठवावे अशी विनंती आहे. शाळेत येणाऱ्या नवीन मुलींची नावे २० मे १९४२ पासून नोंदण्याची व्यवस्था केली आहे. बनुबाई अहो (लेडीज सुपरिटेंडेट)

अशा मजकुराची जाहिरात देऊन शैक्षणिक स्पर्धेत आपल्या शाळेच्या ठळक वैशिष्ट्यांची व वेगळेपणाची माहिती पालक वर्गाला करून दिली आहे.

महिला विद्यालय दिनादिवशी 'तरूण भारत' ने ही जाहिरात देऊन जनतेचे लक्ष वेधून प्रसिध्दी मिळवून दिली. अशा विद्यालयात माता–पालक मेळावा भरवून पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी चांगल्या वक्त्यांची भाषणे आयोजित करुन संवाद साधला जात असे.

४.४.२७ प्राथमिक शाळेचे क्रीडा संमेलन–

बेळगाव येथील 'सरदार्स हायस्कूल पटांगणात साजरे झालेले मुलामुर्लीचे तिसरे क्रिंडा संमेलन' या संमेलनाला बेळगावच्या आसपासच्या ४१ शाळातील विद्यार्थांनी भाग घेतला होता. रि.डी.जज्ज श्री दळवी यांच्या हस्ते बक्षीस समारंभ पार पडला. त्यावेळी त्यांनी खेळाबाबतचे महत्त्व व गरज व्यक्त करणारे भाषण केले. 'प्राथमिक स्तरावरील विद्यार्थांनी अभ्यासाइतकेच खेळाला महत्त्व दिले पाहिजे. खेळाने सामुदायिक शिस्त, एकी, नियमाचे पालन, वक्तशीरपणा आज्ञाधारकपणा, खिलाडूवृत्ती, देशाचे योग्य लायक नागरिक बनण्यास आवश्यक असलेल्या सर्व गुणांची वाढ होते. प्राथमिक शाळांना क्रीडांगणाची गरज आहे. प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्र क्रीडागण असलेच पाहिजे. यासाठी शासनाने लक्ष दिले पाहिजे. खेळाच्या बाबतीत आपल्या शासनकर्त्यांच्यात उदासीनता आहे. प्राथमिक स्तरावरच विद्यार्थांना शारीरिक शिक्षणाचे योग्य ते धडे मिळाले पाहिजे. यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची गरज आहे. असे विचार या लेखात मांडण्यात आले आहेत.[६७]

४.४.२८ स्नेहसंमेलने –

मराठी ट्रेनिंग कॉलेजचे स्नेहसंमेलन ११ फेब्रुवारी १९५१ रोजी श्री. टी. एम. चौधरी (आय.ए.एस) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. "आपण राजकीयदृष्टया स्वतंत्र झालो असलो तरी मानसिक व वैचारिकदृष्टया स्वतंत्र झालो नाही. आपल्या देशात प्रौढ मतदान पध्दत अंमलात आली आहे. मतदार हेच राज्याचे खरे मालक आहेत. आज आपल्या देशातील ८५ टक्के लोक खेडयात राहणारे असून ते अशिक्षित आहेत. राज्याचे मालकच अशिक्षित असतील तर राज्य नीट कसे चालणार? यासाठी आपली जनता सुशिक्षित व्हायला पाहिजे." नंतर शिक्षकांना उद्देशून ते म्हणतात, "हिंदुस्थानच्या भावी मालकांना शिकविण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. तुमचे हे कार्य थोर आहे याची जाणीव असू द्या. आपल्या हाताखाली शिकलेली मुले विद्वान व मोठी व्हावी अशी महत्त्वाकांक्षा बाळगा."[६८]

पार्वतीदेवी कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी व्यक्त केलेले विचार सन १९५४ च्या वार्षिक स्नेहसंमेलनचे प्रा. ना. सी. फडके यांचे अध्यक्षीय भाषण, "ललित साहित्याचे कार्य सौदर्यदर्शनाचे व आनंदनिर्मितीचे–समाजजागृतीचे नाही. स्थिर चरांतून सौदर्य हुडकून काढून ते प्रभावीपणे प्रकट करणारा तो कलावंत! साने गुरूजी मोठे होते, म्हणून त्यांचे साहित्य मोठे, ही विचारसरणी धोक्याची आहे." पुढे म्हणतात 'हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनी समाजजागृती केली हे म्हणणे चुकीचे आहे!' अशा विविध विषयाच्या उलगडयातून फडके यांनी मराठी साहित्याची वाटचाल स्पष्टपणे मांडली आहे.[६९]

कर्नाटक विश्वविद्यालय पदवीदान कार्यक्रमप्रसंगी ना. मोरारजीभाई देसाई यांचे विचार 'जी बंधनातून मुक्त करते तीच खरी विद्या होय', जीवनात फक्त ज्ञानरूपी संपत्ती असून त्याचा उपयोग नाही. सर्वांच्या कल्याणासाठी तिचा वापर झाला पाहिजे. आपण मिळविलेले ज्ञान हे साध्य नव्हे, साधन आहे. अशा वैचारीक व मार्गदर्शक विचाराला प्रसिध्दी देऊन समाजात शिक्षणा विषयी असणारी संकल्पना व त्यातून नवे आयाम जोंडल्याचा प्रयत्न संपादकाचा असल्याचे दिसते.[७०]

बाबुराव ठाकुर यांनी राणी पार्वतीदेवी कॉलेज आणि मराठी ट्रेनिंग कॉलेज या संस्थांच्या स्नेहसंमेलनाकरीता दरवर्षी विद्यार्थ्यांच्या मनोरंजन व खेळांच्या बरोबर चांगल्या विचारवंतांच्या, समाजकारण्यांच्या व कलाकारांच्या विचारांची मेजवानी दिली आहे. 'होतकरू तरूण पिढीच्या समोर थोर विचारवंताचे विचार ठेवले तर त्या विद्यार्थाना आपल्या जीवनाची वाटचाल करताना त्या शिदोरीचा उपयोग होईल.' असा बाबुराव ठाकुरांचा उद्देश होता. म्हणूनत चांगल्या विद्वांनांची व्याख्याने ठेवली जात असे.

४.४.२९ शिक्षक संमेलने–

२६ डिसेंबर १९५४ रोजी माणगाव, ता. चंदगड येथे बाबुराव ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली खाजगी शिक्षण संस्थांच्या जि. स्कू. बोर्डाच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे संमेलन भरवण्यात आले होते. या वेळी या शिक्षकाना मार्गदर्शन करताना ठाकुर म्हणतात, "शिक्षकांनी संघटना बांधुन समाजविकासाचे कार्य करावे! त्याचबरोबर जनता साक्षर बनवून खेडी जागृत करा, त्यांच्यात एकोपा निर्माण करा व बालकांना प्रेमाने शिकवून त्यांना भारताचे आदर्श नागरिक बनवा, त्याचबरोबर शिक्षणाचे पवित्र कार्य चोख रीतीने पार पाडा" असे उद्‌गार

त्यांनी काढले.[७१]

"महाविद्यालयांत नेमलेल्या प्राध्यापकांना त्यांच्या विषयांतील ज्ञानाबरोबर प्रशिक्षण देण्याची आवश्यकता! प्राध्यापक–विद्यार्थी संबंध वाढविण्याची जरूरी आहे. तर वर्गात स्नेहाचे आल्हाददायक वातावरण राहते त्यातूनच ज्ञानाची देवघेव चांगली राहते." असे विचार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी पार्वती कॉलेजच्या भेटी दरम्यान काढले.[७२]

राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे उद्घाटन प्रसंगी सुप्रसिध्द विचारवंत प्रा. गोवर्धनदास पारीख यांचे मौलिक विचार १० फेब्रुवारी १९७१ च्या अंकात दिले आहेत. "वाढत्या ज्ञानाशी सतत संपर्क ठेवणे हे महाविद्यालयीन शिक्षणाचे महत्त्वाचे अंग आहे! पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्यानी समाजात स्वतःचे स्थान निर्माण केले पाहिजे." या वेळी कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अडके हे उपस्थित होते.

४.४.३० प्राथमिक शिक्षणासमोरील आवाहने–

'पाश्चात्त्य देशांतील खेडयापाडयातून 'प्राथमिक शिक्षणाचा प्रसार कसा केला जातो?' याबाबत, बेळगाव मराठी ट्रेनिंग कॉलेजमध्ये व्यक्त केलेले श्री जे. पी. नाईक (शिक्षण तज्ज्ञ व मुंबईच्या रिसर्च इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी) यांचे विचार प्रसिध्द केले आहेत. 'आपल्या हिंदुस्थानात २६ हजार शहरे व ७ लाख खेडी असून ८७ टक्के लोक खेडयात राहतात. ६६ टक्के लोक शेतीवर उपजीविका करतात. खेडयामधून आता प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होणे कठीण आहे. पण अमेरिका, ऑस्ट्रिया या देशामध्ये सुध्दा खेडयांची संख्या जास्त असुन सुध्दा तेथे चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळते याचा विचार करून आपल्या देशाचा विचार करावा लागेल'. पुढे म्हणतात, "आपल्याकडील शिक्षकामध्ये कुतूहल व जिज्ञासा नाही. अमेरिकेसारख्या देशात मात्र चांगल्या प्रकारे चालवलेल्या शाळांना इतर शाळा भेट देऊन त्या शाळेचे अनुकरण करतात हे आपल्या देशात होत नाही. प्रदर्शन भरवणे, आदर्श शाळांचा, शिक्षकांचा गौरव करणे, ज्ञानाची देवघेव करणे, शिक्षकांच्या एक–एक दिवस भेटी देणे हे विचार मांडले."

एखाद्या शाळेतील शिक्षक रजेवर गेल्यानंतर त्या ठिकाणी केंद्रीय शाळेत असणारा जादा शिक्षक हजर होतो, हे आपल्याकडे होत नाही. त्यामुळे शिक्षणात गैरसोय होऊन विद्यार्थ्यांच्यात उदासीनता वाढते, पाश्चात्यांच्या शिक्षण पध्दतीचे अनुकरण करून आपल्या

शिक्षण व्यवस्थेत बदल केले तर चांगले व दर्जेदार शिक्षण देणे शक्य आहे.[७३] असे विचार मांडलेला लेख प्रसिध्द केला आहे. प्रा. सदाशिव अय्यर (रुपारेल कॉलेज,मुंबई) यांचे १४ ऑगस्ट रोजीचे पार्वतीदेवी कॉलेज येथे वादविवाद मंडळाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगीचे 'अभ्यासातील तांत्रिक मीमांसा' या विषयावर भाषण झाले. "अभ्यासाकडे पाहण्याचा आपला सध्याचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित आहे, त्यामध्ये राष्ट्रीय जीवनासारख्या आवश्यक असलेल्या सामान्य ज्ञानाचा अंतर्भाव होत नाही. आपले सामान्य ज्ञान वाढले पाहिजे तर शिक्षणाचा दर्जा उंचावेल." जगाचे ज्ञानभांडार आपल्याला उपलब्ध होण्यासाठी आपण इंग्रजी भाषेशी सलगी केली पाहिजे. आपल्या पुढाऱ्यांना इंग्रजी भाषेचे महत्त्व कळत नाही, निदान ते आपल्याला कळले पाहिजे' अशा प्रकारे इंग्रजी भाषेचे व सामान्य ज्ञानाबाबतचे महत्त्व पटवून देणारे भाषण प्रसिध्द करून नवीन ज्ञान माहितीची जाणीव करून दिली आहे.[७४]

४.४.३१ मराठी भाषिक विद्यार्थ्यांची गळचेपी –

बेळगाव येथील सरदार्स हायस्कूलमध्ये असलेल्या मराठीच्या गळचेपीच्या निषेधार्थ २०० हून अधिक मराठी भाषिक विद्यार्थी ५ वी ते १० वी चे विद्यार्थी संपावर गेले, याबाबतचे संबंधित विद्यार्थ्यांनी एक पत्र प्रसिध्द केले होते. ते पत्र २६ जानेवारी १९५४ च्या अंकात प्रसिध्द केले व त्या मुलांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत आवाज उठवला आहे. "या हायस्कूलचा हेड मास्तर कन्नड भाषिक आहे. तो या मुलांच्याशी पक्षपातीपणे वागतो. मराठी विषय शिकवणारा शिक्षक सेवानिवृत्त होऊन दोन महिने झाले, पण स्वतंत्र शिक्षकाची नियुक्ती नाही. अशा विविध मार्गांनी मराठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करून गळचेपी केली जाते." ही शाळा फार वर्षांपासून बहुसंख्य मराठी भाषिक विद्यार्थ्यांना घडवणारी आहे. मग या हेड मास्तराच्या काळात असे का? हा सवाल करण्यासाठी पालक वर्गाला व समाजातील घटकाना जागृत करून मराठी भाषिक विद्यार्थांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द उभा राहण्याचे काम या लेखाने केले आहे. हा प्रश्न विद्यार्थ्यांचा नाही, बेळगावच्या मराठी जनतेचा आहे. शिक्षणाधिकाऱ्यानी या प्रकरणाची चौकशी करावी व त्या जबाबदार घटकाला ताळ्यावर आणावे असे आवाहन केले होते.[७५]

३१ मे १९५५ मध्ये 'तरूण भारत' च्या अग्रलेखात 'एस. एस. सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपुढील एक निकडीचा प्रश्न' या लेखात मराठी विद्यार्थ्यांची समस्या व

उपाययोजना स्पष्ट केल्या आहेत 'भारत देशात उच्च शिक्षणासाठी त्या त्या राज्यात विद्यापीठांची स्थापना होऊन त्या प्रदेशाच्या भाषेची अभिवृध्दी व्हावी व त्यांच्यावर मातृभाषेतून शिक्षण मिळावे हा उद्देश आहे. त्यामुळे माध्यमिक शाळांच्यामध्ये दिले जाणारे इंग्रजी शिक्षण कमी करण्याचे धोरण सरकारनी स्वीकारले. याचा परिणाम उच्च माध्यमिक म्हणजे कॉलेज शिक्षणावर झाला आहे. एस. एस. सी. उत्तीर्ण होऊन विद्यार्थी हा पार्वतीदेवी कॉलेजमध्ये शिकायला येतो त्या वेळी विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाची भाषाही कन्नड किंवा मराठी असते तेव्हा अशा विद्यार्थ्यांना प्राध्यापकानी कोणत्या भाषेत संभाषण करावे हा प्रश्न आहे? हे महाविद्यालय मराठी भाषिकांच्यासाठी म्हणून स्थापन केले आहे. या महाविद्यालयाला मुंबई किंवा पुणे विद्यापीठाची मान्यता मिळावी हा आपला प्रयत्न असे पण शेवटी हे महाविद्यालय कन्नड धार्जिण्यांनी कायद्याचा बडगा उगारून कर्नाटक युनिव्हर्सिटीला जोडले. अशा निर्णयामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांची व शिक्षकांची मोठया प्रमाणात गळचेपी होते. मुक्त वातावरणात शिक्षण घेणे व देणे हे अडचणीचे होते आहे. असे तळमळीचे विचार व्यक्त करून कर्नाटक सरकारचे धोरण हे मराठयांना घातक ठरू पाहत आहे हे सुचवलेले आहे.

"म्हैसूर राज्यात मराठी भाषिकांची चाललेली ससेहोलपट! शिक्षणक्षेत्रात जातीयता नको! गुणांचे चीज करा!" आमदार बा. र. सुंठणकर यांचे म्हैसूर विधानसभेतील भाषण "गेल्या वार्षिक परीक्षेच्या वेळी टेक्निकल हायस्कूल संबंधीच्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिका ही कन्नड शिक्षकांनी काढली असल्याने त्या प्रश्नपत्रिकेत व्याकरणाच्या व लिंगभेदाच्या भरपूर चूका झाल्याने मराठी भाषिक विद्यार्थ्यांना गोंधळातच परीक्षा द्यावी लागली." या विषयावर लक्ष वेधून घेतले. पुढे म्हणतात, 'हुबळी येथील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्या विद्यार्थ्यांची जात धर्म पाहून प्रवेश दिला जातो. हा पक्षपातीपणा न करता शिक्षण संस्थातून गुणांना प्रथम स्थान मिळाले पाहिजे.'[७६]

अशा विविध विषयांच्यावर मराठी भाषिक जनतेवर या सीमाभागात अन्याय होतो. याबाबत सर्वांचे लक्ष वेधून घेतलेले भाषण व या भाषणाला प्रसिध्दी देऊन जनतेमध्ये मराठी भाषिकांचे स्थान स्पष्ट करणारे लेखन केले आहे.

पुढच्या विधानसभेतील भाषणात आ. सुंठणकर यांनी, 'प्राथमिक शाळांतून कानडीची सक्ती केल्यास परिणाम गंभीर होतील.' असा इशारा दिला होता त्या अनुषंगाने 'तरूण भारत' कारांनी नव्या अभ्यासक्रमामुळे मराठी विद्यार्थ्यांवर येणारे गंडातर! शिक्षक पालक व विद्यार्थ्यांनी गंभीरपणे विचार करण्याची वेळ![७७] नव्या अभ्यासक्रमानुसार मराठी भाषिक विद्यार्थांना आपल्या मातृभाषेबरोबर कन्नड, हिन्दी व इंग्रजी अशा तीन भाषा शिकाव्या लागणार आहेत या सरकारच्या धोरणामुळे विद्यार्थी वर्ग बिथरला जाणार व विद्यार्थ्यांच्यातील क्रयशक्ती वाया जाणार, तेव्हा अशा धोरणा विरूध्द समाजाच्या सर्व स्तरातून विरोध झाला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

१३ नोव्हेंबर १९५९ च्या संपादकीय लेखात 'राज्यपुनर्रचनेनंतर गेली तीन वर्षे सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी नियुक्त असलेले पुणे एस.एस.सी बोर्डाचे बेळगाव येथील परीक्षा केंद्र बंद करण्यात आले.' या निर्णयाबाबत बाबुराव ठाकुर हे राग व्यक्त करताना म्हणतात, 'कर्नाटक राज्यकर्त्यांच्या हलकट मनोवृत्तीचे प्रदर्शन! विद्यार्थ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहु नका!' असा इशारा दिला आहे.

इंदिरा गांधींच्या बेळगाव दौऱ्याच्या वेळी मराठी भाषिक समाजाला कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, याबाबत दाद मागणारे तक्रार पत्र सादर करून विद्यार्थ्यांच्या मोर्चाचे नियोजन केले, या मोर्चावर पोलीस लाठी हल्ला केला. त्या प्रवृत्तीचा धिक्कार करणारा लेख प्रसिध्द करून मराठी भाषिक विद्यार्थ्यांना त्यांचा हक्क द्या' अशी मागणी केली होती.

"म्हैसूरने मराठी भाषेवर उगवलेला सूड! मराठी पाठयपुस्तकांतील भयंकर चुकांमुळे मुलांची उडालेली त्रेधा! यावर एकच उपाय सीमाभागाची म्हैसूरमधून सुटका!"[७८]

"मराठी बालकांवर कानडी भाषेची सक्ती म्हैसूर सरकारचे कुटिल कारस्थान मराठीच्या काळजाला हात घालणारा हा आघात आहे! साऱ्या मराठी जनतेने त्याचा निषेध केला पाहिजे, व प्राणपणाने त्यासाठी लढा दिला पाहिजे!"[७९]

शासनाच्या पत्रकाचा धिक्कार करणारा लेख आहे, "स्कूल बोर्डाच्या हाती असलेल्या प्राथमिक शाळातून इंग्रजी शिक्षणाचे खोबरे होत आहे. शिक्षकाचे इंग्रजीचे अपुरे ज्ञान

आणि अनास्था हीच सर्वस्वी कारण ५ ते ७ वी चे वर्ग पुन्हा इंग्रजी शाळांनाच जोडणे योग्य आहे. या प्रश्नावर सरकारने फेरविचार करावा!"

'विद्यापीठाच्या चुकीच्या निर्णयाविरूध्द यलगार फी वाढ विरोधी जागर' सरकारच्या मनमानी फी वाढ धोरणाविरोधी विद्यार्थी पालक यांच्यात जागृती निर्माण करून शासनाच्या धोरणाचा धिक्कार करणाऱ्या बातम्या दिल्या आहेत.

कर्नाटक विद्यापीठांनी खाजगी महाविद्यालयात सरकारी महाविद्यालयापेक्षा फी वाढ केली. या फी वाढीच्या विरोधात बेळगांव विभागातील महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी गेले १५ दिवस संप पुकारून सरकारच्या धोरणांचा धिक्कार केला होता. या संबंधी 'तरूण भारत' कारानी विद्यार्थी पालक वर्गातील असंतोष नोंदवला आहे. "कर्नाटक विद्यापीठाच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील असंतोष आता भडकू लागला म्हैसूर सरकारने वेळीच जागे होऊन फी वाढीचा अन्याय दूर करावा!" असा इशारा दिला आहे.[८०]

'कर्नाटक विद्यापीठाचा तिस्मारखानी फतवा! ठरावीक वयाच्या खालील विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेस बसण्यास मज्जाव, परीक्षेच्यावेळी विद्यार्थ्यांची कोंडी, त्यांच्या उमेदीच्या मनावर झालेला आघात! सरकार आणि विद्यापीठ यांच्या टकरीत विद्यार्थ्यांचा बळी! कर्नाटक विद्यापीठाने अद्याप निर्णयाचा फेरविचार करावा'

'तरूण भारत' च्या दणक्याने शासनाला जाग आली विद्यापीठाच्या फी वाढ निर्णयाचा फेरविचार करून फी वाढ मागे घेतली. त्यांचबरोबर खाजगी महाविद्यालय व सरकारी महाविद्यालय यांच्यातील फी समान आकारणी करण्यात आली. ज्या ज्या वेळी प्रशासनाच्या चुकीच्या धोरणाचा सर्वसामान्य विद्यार्थ्यांना फटका बसत असे. त्या त्या वेळी 'तरूण भारत' ने विद्यार्थ्यांच्या हिताची बाजू घेऊन प्रशासन व्यवस्थेचे दार ठोठावले आहे.

सन १९७०-७१ या शैक्षणिक वर्षाचे युनिव्हर्सिटी परीक्षांचा निकाल तीनही शाखांचा सरासरी ३० टक्के असा सुमार लागला. महाराष्ट्रातील विद्यापीठांचा निकाल चांगला लागला आहे. याबाबत 'तरूण भारत'ने आवाज उठविला 'कर्नाटक युनिव्हर्सिटीच्या परीक्षेत हजारो विद्यार्थ्यांची बेसुमार कत्तल! परीक्षांच्या पेपर्सची फेरतपासणी झाली पाहिजे. तसे न होईल तर विद्यार्थ्यांतील वाढत्या असंतोषाला युनिव्हर्सिटीला तोंड द्यावे लागेल. हा विचार कुलगुरू डॉ. अडके यानी केला पाहिजे.' शेवटी म्हणतात, 'परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल अशी अपेक्षा

आहे.'[८१]

"बेळगाव जिल्हा पातळीवरील इयत्ता सातवीच्या परीक्षेच्या निकालात बजबजपुरी, शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात भाषिक द्वेषाने केलेला कहर! कोवळया विद्यार्थ्यांचा बळी घेणारे परीक्षक की खुनशी क्रूरकर्मे. या बाबतीत तीव्र आंदोलन वा कोर्टाचा मार्ग पत्करावा लागेल."

जिल्हा पातळीवर ७ वी च्या परीक्षेचा १९७४ चा निकाल जाहीर झाला. निपाणीच्या अनेक हुशार विद्याथ्याची नावे यशस्वी विद्यार्थ्यांच्या यादीत नाहीत. चौकशीअंती चिकोडी तालुक्यातील बहुसंख्य मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत गैरप्रकार आढळून आला. स्वतः प्रत्यक्षात बाबुराव ठाकुर यांनी निपाणीला भेट देऊन पालक विद्यार्थ्यांची भेट घेऊन प्रश्नाचे गांभीर्य समजून, जबाबदार अधिकाऱ्याना भेटून या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी भाग पाडले व विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला.[८२]

४.४.३२ तांत्रिक शिक्षणाची सोय –

१७ एप्रिल १९५९ मधील 'तरूण भारत' च्या अग्रलेखात तांत्रिक शिक्षणाच्या सोई बाबत खालील मत व्यक्त केले आहे. अ.भा. शिक्षण मंडळाची १२ वी वार्षिक बैठक दिल्ली येथे झाली. या बैठकीला शास्त्रीय संशोधन आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री. हुमायून कबीर यांनी जे भाषण केले त्यावरून देशातील तांत्रिक शिक्षणाची प्रगती कशी होत आहे याची कल्पना येते. नवीन इंजिनिअरिंग महाविद्यालय, तांत्रिक विद्यालय स्थापन झाल्याने विद्यार्थ्यांची संख्या झपाटयाने वाढत आहे. सन १९५६ मध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी २६३२ आणि डिप्लोमासाठी १०,२४२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. सन १९५८ मध्ये पदवीसाठी ११,१०० व डिप्लोमासाठी १९,५६० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला. सन १९६१ मध्ये पदवी व डिप्लोमासाठी अनुक्रमे १३,५०० व २५,००० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. अशी अपेक्षा असून सन १९६६ साली हाच आकडा अनुक्रमे २०,००० व ५०,००० हजार इतका होईल, याचा फायदा समाजाच्या सर्व थरातील विद्यार्थ्यांना कितपत मिळेल हा प्रश्न आहे. 'मागासलेल्या वर्गांना कोणत्याही स्वरूपात संरक्षण देणे आवश्यक आहे. हे खरे असले तरी किमान पात्रता विचारात घेतली पाहिजे. पात्रता न पाहता या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, तर ते कुशल इंजिनिअर होऊ शकणार नाहीत.' या लेखाचा रोख असा दिसतो की, 'सवलतीचा फायदा जितका हरिजनांना मिळतो, तितका तो इतर मागासलेल्या वर्गांना मिळत नाही. त्यामुळे याबाबतीतही मोठी विषमता

निर्माण होणार आहे; याचा विचार सरकारने केला पाहिजे. हा इशारा दिला आहे.

४.४.३३ सैनिकी शिक्षण–

आजच्या शिक्षण पध्दतीत 'सैनिकी शिक्षण' हेच अग्रस्थानी मानाचे ठरत आहे. माध्यमिक शाळा म्हणजे उच्च शिक्षणाचा पाया या स्तरावरच लष्करी शिक्षणाचे बीज पेरले गेले पाहिजे. महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात लष्करी शिक्षण व प्रचलित घडामोडींचे ज्ञान या गोष्टींचा समावेश जरूर झाला पाहिजे. अशा आशयाचे विचार या साप्ताहिकातून मांडले आहेत.

४.४.३४ नवा शैक्षणिक आकृतीबंध–

बेळगांव जिल्हयातील शाळा सुरू होऊन दोन महिने झाले. त्यानंतर शासनाने शाळांची वेळ ही सकाळी लवकर ठेवल्याचे शाळाना आदेश काढले. याबाबत 'तरूण भारत' च्या पुढाकाराने बेळगाव तालुक्यातील जवळ–जवळ सर्व ग्रामपंचायतींनी ठरावाद्वारे व शिक्षणाधिकाऱ्यांना भेटून शाळा या सकाळी ११ ते ५ वा. पर्यंत कराव्यात अशी तक्रार व निवेदन दिले. बेळगाव तालुक्यात सर्व शेतकरी समाज आहे. शेतकऱ्यांना सकाळी भरपूर कामे असतात. त्यामुळे ते आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत नाहीत. त्यामुळे शाळांची वेळ ही ११ ते ५ पर्यंत करावी व लोकशाहीमध्ये जनतेची सोय पाहावी. अशी मागणी केली आहे.[८३] २८ जानेवारी १९७६ च्या अंकात कर्नाटक सरकारच्या शिक्षण खात्यामार्फत 'शिक्षक कल्याण निधी' जमा केला जातो. या निधीचा उपयोग शिक्षक व त्यांच्या कुटुंबियांचे आजार, मुलांच्या शैक्षणिक गरजा व अडचणी असलेल्या शिक्षकांना या फंडातून मदत देण्याचा आहे. दरवर्षी आजारी शिक्षकांना लाभ मिळावा अशी 'तरूण भारत' ची मागणी होती.

४.४.३५ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर –

कोल्हापूरला विद्यापीठ स्थापन करावे, असे अनेकांना वाटत होते. त्या विद्यापीठास शिवाजी महाराज या महापुरूषाचे नाव द्यावे अशी कल्पना पुढे आली. हे विद्यापीठ थोडयाच दिवसात सत्यात आले. विद्यापीठ कोल्हापूरात स्थापन होण्यासाठी कोल्हापूरच्या जनतेने खूप परिश्रम घेतले व शेवटी त्यांच्या कार्याला यश मिळाले.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १८ नोव्हेंबर १९६२ विजयादशमीच्या दिवशी दुपारी १२.४५ वा. झाली. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यास प्रारंभ करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब गणपतराव पवार यांच्या हस्ते नामफलकाचे विधिपूर्वक पूजन

केले, शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत पाच जिल्हयातून गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या उद्‌बोधन अभ्यासक्रम वर्गाचे उद्‌घाटन करताना डॉ. आप्पासाहेब पवार (कुलगुरू शिवाजी विद्यापीठ) यांनी पुढील प्रमाणे मार्गदर्शन केले. "विद्यापीठ शिक्षणाचा दर्जा उच्च राखला जावा असे वाटत असेल तर माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक कार्य दर्जेदार कसे होईल याचाही विचार विद्यापीठांनी केला पाहिजे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने भारतात सर्वप्रथम अप्रशिक्षित माध्यमिक शिक्षकांसाठी सुट्टीतील उद्‌बोधन अभ्यासक्रम सुरू करण्याचा उपक्रम या वर्षापासून आरंभिला आहे. शिक्षकांच्या ज्ञानाचा व पर्यायाने त्याच्या अध्यापनाचा दर्जा त्यामुळे वाढावा, अशी अपेक्षा आहे." शिक्षणाने कर्तृत्वशक्ती जागी होऊन विकास साधला पाहिजे. मिळेल ते काम निष्ठापूर्वक, व्यवस्थित केले तर मनामध्ये निर्माण झालेला न्यूनगंड नाहीसा होऊन जीवन सुखावह होईल. असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी छ. शिवाजी विद्यालय, सातारा येथे संपन्न झालेल्या स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने काढले.[८४]

'गतकालाचे ज्ञान सद्यःस्थितीबद्दलची जाणीव व उज्ज्वल भविष्याचे भान हे इतिहासाचे कार्य होय, त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने काढलेल्या ऐतिहासिक ग्रंथमालेचे स्वागत करतो' असे उद्‌गार शिक्षणमंत्री ना. मधुकर चौधरी यांनी काढले. या वेळी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार हे इतिहास तज्ज्ञ यांनी इतिहासाच्या अभ्यासकांना व संशोधकाना नवा दृष्टिकोन दाखविला. इतिहासाचे लेखन करण्यासाठी वाङ्‌मयीन साहित्य महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले आहे.[८५]

४.४.३६ दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ–

'दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्था' या नावाने चालवलेली ही शिक्षण संस्था 'राष्ट्रवीर' ग्रुप म्हणून ओळखली जाई. ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर वादातून 'तरूण भारत' व 'राष्ट्रवीर' यांच्यात वैचारिक मतभेद होते. असे जरी असले तरी दोन्ही गटांचे कार्य हे मराठी भाषिक समाजाच्या हितासाठी झटणारे होते, हे विसरून चालणार नाही. ज्योती महाविद्यालयाच्या मान्यतेबाबत कर्नाटक सरकारच्या वादात 'तरूण भारत' ने मराठी भाषिकांची बाजू घेऊन कर्नाटक सरकारला ताळयावर आणण्याचे काम केले आहे.

भाई दाजिबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली २६ ऑक्टोबर १९६६ रोजी विजयादशमीच्या शुभदिनी, ज्योती महाविद्यालयाची स्थापना झाली. बेळगावसारख्या शहरात महाविद्यालय सुरू झाले पण मुख्य प्रश्न होता तो जागेचा ही अडचण सोडवण्यासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व शेकापचे राजकीय विरोधक त्या वेळचे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, तत्कालीन भारताचे संरक्षण मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण खात्याची बेळगाव हद्दीतील १७ एकर १८ गुंठे जागा लांब मुदतीच्या कराराने मंडळाच्या ताब्यात दिली.

इमारत बांधण्यासाठी निधी संकलन करण्यात आला. ३ ऑक्टोबर १९६८ रोजी विजयादशमीच्या दिवशी भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते भाऊराव काकतकर विज्ञान मंदिराची कोनशिला बसविण्यात आली. ज्योती महाविद्यालयाला शुभेच्छा व्यक्त करताना ते म्हणतात "हे कॉलेज माझे आहे, या कॉलेजच्या भरभराटीसाठी मी सारे प्रयत्न करणार आहे." या समारंभाच्या अध्यक्षस्थानी निपाणीचे देवचंद कॉलेजचे संस्थापक श्रीमान देवचंदजी शहा होते. गोव्याचे त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर हे उपस्थित होत.[८६] या कॉलेजला कर्नाटक सरकारने कायदयाच्या नावाखाली फार त्रास दिला. शेवटी कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अर्स यानी १९७३ ला कॉलेजला मान्यता दिली. आज हे कॉलेज सीमा भागातील मराठी माणसांचे अस्मितेचे केंद्र बनले आहे. आज या शिक्षण संस्थाच्या कार्यकर्तृत्वातून व श्रमातून शिक्षण क्षेत्रातील वेगवेगळे कोर्सेस व ४६ ठिकाणी शाखा कार्यरत आहेत.

निपाणी भागातील जनतेने महाराष्ट्राच्या हद्दीत अर्जुननगर येथे नव्या कॉलेजची स्थापना केली (जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, आमदार श्री. देवचंद शाह) या कॉलेजच्या उभारणीसाठी या विभागातील शिक्षणप्रेमी लोकानी फक्त चारच दिवसात चार लक्ष पाच हजार रुपयांच्या निधी जमा केला. याबाबत 'तरूण भारत' कार स्थानिक कार्यकारणी कमिटीचे कौतुक करतात. आमदार श्री देवचंद शाह यांनी ५१ हजार रु. ची उदार हस्ते देणगी दिली. कोल्हापूरचे श्रीमंत शहाजीराजे यांच्या हस्ते कोनशिला समारंभ २९ सप्टेंबर १९६० रोजी संपन्न झाला.[८७] संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला आहे. या महाविद्यालयाची मराठी भाषिक विद्यार्थ्यांना नितांत गरज आहे. ही गरज ओळखून शाह यांनी पुढाकार घेऊन एका निर्जन माळावर तेही महाराष्ट्र हद्दीत हे महाविद्यालय उभा करण्याचा मानस केला. ही दूरदृष्टी या विभागाच्या पथ्यावर पडेल ही

ग्वाही या लेखात देण्यात आली आहे.

४.४.३७ श्री मौनी विद्यापीठाची स्थापना–

१५ एप्रिल १९५२ च्या अंकात श्री मौनी विद्यापीठाच्या स्थापनेबाबतची माहिती दिली आहे. कोल्हापूरातील श्री. व्ही. टी. पाटील व श्री. जे. पी. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आघाडीची शिक्षण संस्था 'प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटी, आचार्य भागवत, श्री सहस्त्रबुध्दे, श्रीमती सुलभा पाणंदीकर, श्री. रामभाऊ परूळेकर, डॉ. चित्रा नाईक, श्री. पी. सी. पाटील, श्री नाना धर्माधिकारी इत्यादी शिक्षणतज्ज्ञाच्या नेतृत्वाखाली इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन बॉम्बे व शेठ गोविंदराव कोरगांवकर, धर्मादाय संस्था कोल्हापूर इत्यादीच्या सहकार्याने एक ग्रामोध्दारक जीवन शिक्षणाचा महान प्रयोग हाती घेतला आहे. या विद्यापीठाच्या अधिपत्याखाली बालमंदिर, प्राथमिक विद्यामंदिर, अध्यापन विद्यामंदिर, शेतमळा, ग्रामनेत्यांचे अभ्यास मंदिर, विशाल ग्रंथ भांडार, संशोधन केंद्र समाज शिक्षण, जनता महाविद्यालय, प्रकाशन विभाग इत्यादी विविध कार्यकारी संस्था सुरू होणार आहेत. अशा प्रकारचा प्रयोग देशात प्रथमच गारगोटी (महाराष्ट्र) येथे मौनी विद्यापीठाच्या संकल्पनेतून साकार होणार आहे. विशेषतः श्री. व्ही. टी. पाटील आणि जे.पी. नाईक (शिक्षणतज्ज्ञ) हे अभिनंदनास पात्र आहेत. असे मत वर्तवले आहे.[८८]

४.४.३८ शैक्षणिक सुधारणा–

'जीवनोपयोगी शिक्षण ही आजच्या काळाची गरज.'[८९] हा दिलीप हरळीकर यांचा लेख आहे. आज दिले जाणारे शिक्षण हे जीवनोपयोगी नसून निरुपयोगी आहे. शिक्षण घेतलेला तरूण नोकरीच्या मागे लागतो. नोकरी नाही मिळाली तर हताश होतो. निराशा पदरात पडते असा तरूण जीवनात यशस्वी होत नाही. त्याच्या ज्ञानाला गंज चढतो व शिक्षण निरुपयोगी होते. अशा तरूणाबाबत या लेखात सल्ला देताना लेखक म्हणतात, 'नोकरीच्या मागे न लागता प्रत्येकाने उद्योजक व्हायला शिकले पाहिजे. शिक्षण जीवनोपयोगी करावयाचे असेल तर शिक्षणाच्या व ज्ञानाच्या आजच्या व्याख्या बदलाव्या लागतील 'श्रमजीवींना प्रतिष्ठा' मिळवून द्यावी लागेल. शिक्षणाचा दर्जा उंचवावा लागेल. यासाठी आवश्यक तरीही निरूपयोगी असलेले देशाच्या व धर्माच्या परंपरचे, इतिहास, भुगोल व इतर काही विषयाचे शिक्षण प्राथमिक व माध्यमिक शाळापर्यंत द्यावे, हे शिक्षण पुन्हा महाविद्यालयात खिचडी पध्दतीचे असू नये

शिक्षणानंतर एखाद्या विषयाचे स्पेशलायझेशन करताना कोणत्याही एका जीवनोपयोगी धंद्याचे शिक्षण सक्तीचे करावे. असे शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांना दोन्ही अर्थाने शिक्षणाचा उपयोग होऊन विद्यार्थ्यांच्यावर बेकारीची समस्या उद्‌भवणार नाही असे विचार या लेखात दिले आहेत.

शिक्षणक्षेत्रात बोकाळलेली ठकबाजी' मुळात शाळाच नाहीत आणि त्यावर ग्रँटस मात्र उपटल्या! शिक्षणमंत्री बद्री नारायण यांनी केलेला गौरचोर ' या लेखात 'तरूण भारत' कार म्हणतात, 'कर्नाटक सरकार व प्रशासन यंत्रणा झोपा काढते का? काय जाणून बुजून अशा लबाडांना साथ देते, हाच चर्चेचा विषय आहे. अशा ठकबाजीवर कटाक्षपणे लक्ष देणे गरजेचे आहे. ''बेळगावातील उर्दू शाळा! ही शाळागृहे की मेंढरांचे कोंडवाडे? नागरिकांचा डि. कमिशनरच्या कचेरीवर मोर्चा जाणार!

बाबुराव ठाकुर हे फक्त मराठी भाषिकांचेच हित साधत होते असे नाही तर परधर्मीय परजातीय यांच्या अडीअडचणी वृत्तपत्राच्या रुपाने मांडून सरकारच्या व समाजाच्या निदर्शनाला आणून देऊन शेवटी पाठपुराव्यासाठी झगडत असत.

बेळगाव – शहापूर शहरातील मराठी शाळांची दूरवस्था! मोडकळीस आलेल्या, दुरूस्ती न झालेल्या इमारती! आणि शिक्षण खात्याने चालविलेली अक्षम्य हेळसांड! म्यु. पाल्टीकडे कराच्या रुपाने जमा होणाऱ्या हजारो रुपयांचा विनियोग कसा होतो? या बातमीकडे कर्नाटक शासनाचे लक्ष वेधून मराठी शाळांची होणारी हेळसांड समाजासमोर मांडली आहे.[९०]

४.५ समारोप–

बाबुराव ठाकुर व त्यांचा 'तरूण भारत' या अनुसंगी शैक्षणिक कार्याचा हा धावता आढावा आहे. या संपूर्ण शैक्षणिक कार्यावरून त्यांच्या ठिकाणी शिक्षण प्रसाराविषयी केवढी आस्था, केवढी तळमळ आणि केवढी आंतरीक ओढ होती हे दिसून येते. ज्या दुर्गम भागात जायला धड कच्चा रस्ताही नव्हता, अशा दूर डोंगराळ भागात बाबुरावानी शाळा काढून ग्रामीण मुलांच्या शिक्षणाची सोय केली. शाळा काढून फक्त थांबले नाहीत तर त्या शाळेचे शिक्षण विषयक काम व्यवस्थित चालले की नाही, हे पाहण्याकरिता व त्यांच्यासमोरील अडचणी दुर करण्याकरिता ते रात्रंदिवस दौऱ्यावर जात. त्याचा हा प्रवास रात्रीअपरात्री पायी दगड गोटयांतून, जंगल–डोंगरातून होत असे या त्यांच्या सुरूवातीच्या कष्टामुळेच चंदगड, खानापूर इत्यादी ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाला जोराची चालना मिळाली.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर त्यांनी बेळगाव शहर व ग्रामीण भागांत प्रौढ वर्ग चालविले, तसेच या सीमा भागातील मराठी जनतेची उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या विकासासाठी ते अविरत झटत राहीले. हजारो रुपयाच्या देणग्या त्यांनी कॉलेजला मिळवून दिल्या. देशातील कोणताही नामवंत पाहुणा बेळगाव शहरात कार्यक्रमासाठी किंवा समारंभासाठी आला की बाबुराव ठाकुर हे आवर्जुन या व्यक्तीची राणी पार्वतीदेवी व मराठी ट्रेनिंग कॉलेज या संस्थाना भेट घडवून आणत. विविध क्षेत्रातील अनेक ख्यातनाम व्यक्तीनी या दोन शिक्षण संस्थाना वेळोवेळी भेटी देऊन तेथे चाललेल्या शिक्षण कार्याबद्दल जे प्रशंसोद्‌गार काढले, अनेकांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारी उद्‌बोधक व्याख्याने दिली, त्यापाठीमागे बाबुराव ठाकुर यांचा डोळस प्रयत्न होता हे विसरून चालणार नाही.

आज मराठी ट्रेनिंग कॉलेज आणि राणी पार्वतीदेवी कॉलेज या संस्था सीमा भागातील जनतेची शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाची केंद्रे बनून राहिली आहेत. याचे फार मोठे श्रेय बाबुरावांच्या शिक्षणविषयक निष्ठेला, ध्येयप्रवणतेला आहे, यात शंका नाही.

बाबुरावांच्या कल्पकतेतून शिक्षण क्षेत्राच्या विकासाबद्दल त्यांच्या अनेक योजना होत्या. पण सीमा प्रश्न, त्याचबरोबर समाजातील विविध गंभीर प्रश्न व त्यांच्या कणखर भूमिकेमुळे त्यांना कर्नाटक सरकारकडून सोसावा लागलेला सारासार विरोध, बहुविध स्वरूपाचे सार्वजनिक कार्य व दैनिकाचा वाढता व्याप यामुळे त्या कल्पना व संकल्पना प्रत्यक्षात उतरू शकल्या नाहीत ही खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

शाळा कॉलेजांच्या निर्मितीनंतर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी धंदा उपलब्ध व्हावा यासाठी त्यांना व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून द्यावे हा विचार त्यांच्या मनात कायम घोळत होता. याबाबत उद्योजक शंकरराव किर्लोस्कर यांच्याशी त्यांचा विचार विनिमय होत असे. अशा प्रकारचे व्यवसायीक शिक्षणबाबतचे लेखही आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्द करून तांत्रिक व औद्योगीक, व्यावसायीक शिक्षणाचे धडे देऊन 'तरूण पिढीला उत्साह व उमेद वाढवण्याचे मार्गदर्शन करून मराठा समाजातील तरूणांना व्यवसायाकडे वळण्याचा संल्ला देत असत. या त्याच्या तळमळीतून त्यांच्या मृत्यूनंतर बेळगाव येथे किरण ठाकुर यांच्या प्रयत्नातून टेक्निकल कॉलेजीसच्या निर्मितीला स्थापत्य आणि तांत्रिक शाखांचे शिक्षण देणारी दर्जेदार तंत्रशिक्षणाची विद्यालये सुरू केली आहेत.

संदर्भ

१) वेणुनाद, ७३ वे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बेळगाव, २०००,पृ. ८८

२) शानभाग, आर.जी, मानाचा मुजरा, प्रकाशन बेळगाव, जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९३७–८८, ८ जानेवारी १९८९, पृ.६

३) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, जुलै १९१९, पृ. २०

४) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २९ ऑक्टोबर १९३७, पृ. ५

५) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, जुलै १९१९, पृ. २१

६) किता, पृ. २२

७) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, जून १९२२, पृ. २६

८) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, नोव्हेंबर १९२२, पृ. ३८

९) शानभाग आर. डी., उपरोक्त, पृ. २६

१०) मासिक. 'तरूण भारत' बेळगाव, जुलै १९१९, पृ. २३

११) मासिक. 'तरूण भारत' बेळगाव, ऑगस्ट १९१९, पृ. ३८

१२) राजाध्यक्ष ग. गो., बेळगाव जिल्हयातील ज्ञानगंगेचे उगमस्थान, दै. 'तरूण भारत' बेळगाव, ता. २५ ऑक्टोबर १९८८, पृ. २

१३) कित्ता, जुलै १९१९, पृ. २३

१४) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, एप्रिल १९२०, पृ. १०८

१५) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, मार्च–एप्रिल १९२०, पृ. १०६

१६) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, सप्टेंबर १९२३, पृ. १

१७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २६ ऑक्टोबर १९३७, पृ. ४,५

१८) सुंठणकर बा. र., स्मृतिसुगंध, 'बाबुराव ठाकूर' तृतीय स्मृतिदिन विशेषांक. २३ एप्रिल १९८२, पृ. २

१९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २६ ऑक्टोबर १९३७, पृ. ५

२०) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ३ मे १९३८, पृ. १४

२१) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १६ जून १९४२, पृ. ९

२२) कामत हरिभाऊ, 'स्मृतिगंध', बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, स्मरणिका, ता. २० फेब्रुवारी १९८२,पृ. २

२३) साप्ताहिक, 'तरूण भारत', बेळगाव, ९ नोव्हेंबर १९३७, पृ. १

२४) कित्ता, पृ. ४,५

२५) साप्ताहिक, 'तरूण भारत', बेळगाव, २६ ऑक्टोबर १९३७, पृ. २

२६) साप्ताहिक, 'तरूण भारत', बेळगाव, १५ डिसेंबर १९३७, पृ. २

२७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १८ जानेवारी, पृ. ४

२८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ८ फेब्रुवारी १९३८, पृ. १

२९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १६ जून १९३८, पृ. ९

३०) कित्ता, पृ. ९

३१) शानभाग आर.डी, उपरोक्त, पृ. १०८

३२) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १ फेब्रुवारी १९५३, पृ. ३

३३) स्मृतिगंध, उपरोक्त, पृ. ३१,३२

३४) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ६ डिसेंबर १९३८, पृ. १,४

३५) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १६ जून १९४१, पृ. ९

३६) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ८ जून १९४१, पृ. ८

३७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २० जानेवारी १९४१, पृ. २

३८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १६ ऑगस्ट १९३८, पृ. १२

३९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १६ ऑगस्ट १९३८, पृ.४

४०) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २६ जून १९४२, पृ.५

४१) पवार,एस.एन, 'बाबुराव ठाकुर यांचे राजकीय व रचनात्मक कार्य' 'स्मृतिसुगंध' 'तरूण भारत' बेळगाव, ११ फेब्रुवारी १६५४, पृ. ३

४२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २६ जून १९४२, पृ. २

४३) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव,२६ एप्रिल १९४२, पृ. २

४४) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, दि १ डिसेंबर १९५३, पृ.४

४५) प्रभू प्रिया,'समरांगण हे जीवन ज्यांचे' प्रकाशन किरण ठाकुर, 'तरुण भारत, प्रेस समादेवी गल्ली, बेळगाव. प्रथमावृत्ती, १९७५, पृ. ५३.

४६) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २० सप्टेंबर १९४८,पृ.४

४७) लेले एम. एच., प्रकाशक, आर. पी. कॉलेज, बेळगाव वार्षिक अहवाल, १९४८–४९, पृ.१०–११.

४८) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १९४८–१९५० च्या फाईल्स

४९) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १९ मे १९४१, पृ.३

५०) मासिक, 'तरूण भारत' जाने,फेब्रु १९२१ ,पृ.७८

५१) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २२ ऑक्टोंबर १९२९, पृ.४

५२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २९ ऑक्टोंबर १९२९, पृ. ६

५३) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ११ नोव्हेंबर १९३०, पृ.४

५४) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २८ एप्रिल १९३१ ,पृ.६

५५) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, ५ डिसेंबर १९३३, पृ.२

५६) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगांव, २४ एप्रिल १९३४, पृ.४

५७) वेणुनाद, ७३अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, २०००, पृ. ५७

५८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, दि.८ जानेवारी १९३५, पृ.७

५९) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ३० जुन १९३५, पृ. ५

६०) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव ,१६ नोव्हेंबर १९३७, पृ. ११

६१) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २१ जुन १९३८, पृ. ४

६२) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १० जानेवारी १९३९, पृ. ९

६३) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ७ फेब्रुवारी १९३९, पृ. २

६४) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव ,२१ फेब्रुवारी १९३९, पृ.४

६५) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव ,४ जुलै १९३९, पृ. २

६६) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव ,१९ मे १९४१, पृ. ५

६७) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ३ मे १९४९ पृ. २

६८) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव, १३ फेब्रुवारी १९५१, पृ. २

६९) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव,३ फेब्रुवारी १९५४, पृ. ४

७०) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव,८ ऑक्टोबर १९५४, पृ. २

७१) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव, १५ एप्रिल १९६४, पृ. २

७२) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १९ एप्रिल, १९६४, पृ.३

७३) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ९ नोव्हेंबर १९५१, पृ. २

७४) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव,१९ ऑगस्ट १९५२, पृ. १

७५) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव, २६ जानेवारी १९५४,पृ. ४

७६) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव, २ ऑगस्ट १९५७, पृ. २

७७) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव,३१ जानेवारी, १९५८, पृ. १

७८) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव, १२ ऑगस्ट १९६६, पृ. ४

७९) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २८ जुन १९६०, पृ. १

८०) दै 'तरूण भारत' बेळगाव, ७ ऑगस्ट १९६४, पृ. १

८१) दै 'तरूण भारत' बेळगाव, २५ जुन १९७१, पृ. २

८२) दै 'तरूण भारत' बेळगाव, २२ मे १९७४, पृ. २

८३) दै 'तरूण भारत' बेळगाव, २१ जुलै १९७६, पृ. २

८४) 'राष्ट्रवीर' बेळगाव, १७ फेब्रुवारी १९७१, पृ.५

८५) दै 'तरूण भारत' बेळगाव, २२ ऑगस्ट १९७१, पृ. २

८६) दै 'तरूण भारत' बेळगाव, ४ ऑक्टोंबर १९६८, पृ. १

८७) दै 'तरूण भारत' बेळगाव, २ ऑक्टोंबर १९६०, पृ. २

८८) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, १५ एप्रिल १९५२, पृ.४

८९) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ४ फेब्रुवारी १९७१, पृ. २

९०) दै 'तरूण भारत' बेळगाव, ४ जानेवारी १९७२, पृ.२

प्रकरण पाचवे

दै. 'तरूण भारत' चे सांस्कृतिक कार्य

५.१ प्रास्ताविक–

'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या रूपाने बाबुराव ठाकुर यांनी जिल्हा वृत्तपत्राचा एक आदर्श निर्माण करून ठेवला आहे. वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम कसे असू शकते याचा उत्तम नमूना, बाबुरावांनी जनते समोर ठेवला आहे. पत्रकारितेबाबत आपले विचार व्यक्त करताना बाबुराव ठाकुर म्हणतात, 'लोकांची न्याय गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, अन्याया विरूध्द झगडण्यासाठी व समाजातील चालिरिती, रूढी व परंपरा तसेच सांस्कृतिक दृष्टया समाजाला दक्ष ठेवण्यासाठी पत्रकारानी निर्भयपणे पुढे यायला पाहिजे, वृत्तपत्रांनी कंबर कसायला हवी, सामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्कावर गदा आली, तर यांच्या रक्षणासाठी पत्रकारांनी पुढे येऊन सत्य लेखन केले पाहिजे, तर समाजावर चांगले संस्कार होतील. हे विचार त्यांनी १९५० च्या बेळगाव येथील मराठी पत्रकार परिषदेत स्वागताध्यक्ष या नात्याने मांडले होते. ते त्यानी आपल्या संपूर्ण आयुष्यात एक पत्रकार म्हणून प्रत्यक्ष कृतित आणले होते.

पत्रकारिता हा धंदा म्हणून नव्हे, तर एक धर्म म्हणून ते अखेरपर्यंत करीत राहिले, मुळच्या मराठी पत्रकारितेच्या बाण्याला अनूसरून बाबुरावांनी आपले 'व्रत' म्हणून 'तरूण भारत' चालविले होते. आपला 'तरूण भारत' हे समाजाचे अंतरंग आशा–आकांशा तळमळ, दाखवणारा एक आरसा आहे. त्यातूनच ते दर्शन घडेल ते या समाजाचे खरे स्वरूप असेल, ही गोष्ट बाबुरावांनी आपल्या मनाशी सतत बाळगली होती. बाबुरावांच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्राने बेळगाव भागात ऐतिहासिक कार्य केले आहे. लोकजागृतीची ज्योत त्यांने सतत तेवत ठेवली. त्यासाठी त्यांनी आपली वाणी व लेखणी वापरली. त्यामुळे बाबुराव केवळ सामाजिक कार्यकर्ता म्हणून किंवा पत्रकार म्हणून नव्हे तर बेळगांवातील सार्वजनिक जीवनाचे ते एक अंग बनले होते. ते तेथील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे शिल्पकार होते.

५.२ संस्कृती म्हणजे काय ?

मनुष्य व्यक्तिशः किंवा समुदायाने जी जीवनपध्दती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वतःवर व बाहय विश्वावर संस्कार करून जे अविष्कार करतो, ती पध्दती किंवा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय. इरावती कर्वे यांच्या मते, 'मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तूरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टी म्हणजे संस्कृती होय.' संस्कृतीच्या आध्यात्मिक भागात धर्म, नीती, कायदा, विद्या, कला प्राविण्य वाङ्.मय हे सर्व प्रकारचे मानवी सदगुण आणि शिष्टाचार यांचा अंतर्भाव होतो. एडबर्ड बेर्नेट टायलर यांच्या मते'', विशालतर मानववंशीय भौगोलिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, ज्ञान, धर्म विश्वास, कला, नीती, कायदे, आचार आणि मानवाने समाजाचा सदस्य म्हणून जे संस्कार, समर्थता व सवयी आत्मसात केलेल्या असतात त्या सर्वांच्या समग्र व समिश्र परिपाक म्हणजे संस्कृती उर्फ सभ्यता होय.[१]

ओबडधोबड दगडावर छिन्नींने संस्कार करून त्यातून सुंदर मूर्ती आकाराला आणणे हा माणसाने निसर्ग निर्मिती वस्तूवर केलेला संस्कार होय, अशाच पध्दतीने सभ्यता आणि शिष्टाचार या गोष्टीचा संस्कृतीच्या आध्यात्मिक भागात अंतर्भाव होतो.

५.३ वाङ्मय विषयक सदरे व लेख–

'तरूण भारत' या वृत्तपत्रांमध्ये वाङ्मयाला प्राधान्य दिले आहे. त्यांनी 'पुस्तक परिचय', 'साहित्य परिचय' व 'भावडांची सृष्टी' नियतकालीकांची दिवाळी, मनेांरजक व बोधपर माहिती, देश सेवकांची चरित्र अशी सदरे सुरू केली,अनेक प्रासंगिक लेख लिहिले व साहित्याची सेवा केली.

'पुस्तक परिचय' या सदरातून अनेक पुस्तकांचा परिचय मराठी वाचकांना करून दिला. 'गोमंतक–शुध्दीचा इतिहास' (२४ जून १९३०) या श्री गणेश दामोदर सावरकर यांच्या पुस्तकाचा परिचय करून दिला आहे. 'हिंदुच्या खुळचट व भोळसट धर्म समजूतीचा फायदा घेऊन त्यांच्यावरच लादलेल्या ख्रिस्ती संस्कृतीचा फोलपणा आजच्या ख्रिस्ती असलेल्या हिंदी जनतेस पटवून देऊन, आपल्या आध्यात्मिक व विश्वनिर्मिती आर्य संस्कृतीचे यथायोग्य दिग्दर्शन करून त्यांना परत स्वःधर्मात घेणे या बाबतचे मार्गदर्शन केले आहे. अॅ. वा. वि. जोशी यांची 'पराधीन' ही कादंबरी, स्त्रियांच्या आर्थिक हक्कांची असलेली पराधीनता दाखविणारी

कादंबरी आहे. (२७ मे १९३०) 'मोटारवाला' (१२ फेब्रुवारी १९३५) फाटकशास्त्री यांच्या पुस्तकास प्रसिध्दी दिली. 'मराठी नाटय, कथा' (२६ जुन १९४८) या वि. द. घाटे यांच्या पुस्तकाचा परिचय करून दिला होता. श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर यांचे प्रस्तुत चरित्र मुंबईचे सॉलिसिटर श्री केशव रामचंद्र दिवेकर यांनी लिहीलेले पुस्तक परिचय 'तुकारामः भक्तीचा डांगोरा' लेखक व प्रकाशक श्री बाळासाहेब तुळपुळे यांचे पुस्तक आहे.[२] गो. चि. भाटे यांच्या,'आमची युरोपची यात्रा' (२६ फेब्रुवारी १९३५) या प्रवासवर्णनपर पुस्तकाचा आणि आमची पायगाडीची चक्करे' (१२ मार्च १९३५) चा कविता संग्रह वि.स. खांडेकर यांच्या 'ऊन पाऊस' (२९ जानेवारी १९३५) या पुस्तकाचा परिचय करून दिला आहे. 'रशियाची राज्यक्रांती' लेखक एस. एच. पेडणेकर, 'मार्क्सवाद व लोकशाही' लेखक या. वा. गाडगीळ 'मॅक्झिम गॉर्कीचे' साहित्यिक आत्मवृत्त लेखक श्री. वि. ग. देशपांडे यांचे हे पुस्तक परिचय करून दिला आहे. (२० नोव्हेंबर १९३४) 'निकोलाच लेनिन आणि मॅक्झिम गार्की' एक विख्यात क्रांतिकारक, आपल्या आचार साहित्य वृत्तीच्या जोरावर कोटयावधी दलित अपमानित व मृतप्राय जनतेत क्रांतीची संजीवनी देणारी व जागतिक साहित्यात क्रांती विचार अमर करणारा मुळ लेखक त्यांचे पुस्तक अनुवादीत केले आहे. 'साहित्य परिचय' या सदरातून अनेक लघुकथा व साहित्य विषयक लेखांना 'तरूण भारतात' स्थान दिले आहे. जून १९२० च्या 'तरूण भारत' च्या अंकात श्रीयुक्त, श्री. दा. सातवळेकर 'स्वाध्याय मंडळ' व 'तरूणांचे ब्रहमचर्य' या लेखातून 'तरूणांच्यावर देशप्रेमाचे संस्कार व मार्गदर्शन करणारा त्याच बरोबर इतर देशातील तरूणांप्रमाणे आपल्या देशातील तरूणांनी मोठमोठे पुरूषार्थ करण्याची स्फूर्ती निर्माण व्हावी.' अशा आकांक्षा निर्माण करणारा लेख प्रसिध्द केला आहे. 'माझ लग्न' रा. म. रेगे याचा लेख (१६ जानेवारी १९३४) 'सावकर' हा नि. पा. चिटणीस यांचा समाजाची सावकारी, पिळवणूक दर्शविणारे लेखन तर 'विलायतच्या प्रवासांतील आठवण' हा दि. ब. लठ्ठे यांचा लेख हे प्रवास वर्णन 'तरूण भारत' मध्ये क्रमशः ११ भागात प्रसिध्द करण्यात आले आहे. फ्रान्स, इंग्लड, जर्मनी व रशिया इ. देशांच्या भेटी व तेथील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक वाटचाल याबाबत मार्गदर्शन केले आहे.

'मार्क्स आणि त्यांचे सिध्दांत' या शीर्षकाखाली समग्र मार्क्सच्या समाजवादी विचारांची चर्चा केली आहे. त्याचबरोबर मार्क्सचे तत्त्वज्ञान सारांश रूपात मांडून तीन सिध्दांतांचा उलगडा केला आहे. इतिहासांतील जडवाद, भांडवलांच्या केंद्रीकरणाचा सिध्दांत व वर्गकलह या सिध्दांतांची चर्चा केली आहे.[३]

जोतिराव फुले आणि ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर वाद! ब्राहमणेकर चळवळीचा जनक, पहिला अस्पृश्योध्दारक, कळकळीचा समाज सुधारक 'दिनबंधु' साप्ताहिकांतील संपादकीय लेख 'तरूण भारत' च्या १८ नोव्हेंबरच्या अंकात जोतिराव फुले यांच्या ६० व्या पुण्यतिथीच्या निमिताने नवले यांचा लेख सारांश रुपाने प्रसिध्द करण्यात आला. 'श्री पंत महाराज व क्षेत्र बाळेकुंद्री' यांच्या जीवन कर्तृत्त्वाचा वेध घेणारा समग्र लेख श्री. नारायण किल्लेकर यांचा प्रसिध्द करण्यात आला आहे.

'संत तुकडोजींचा अल्प परिचय' संपादकीय लेखात दिले आहे. तर श्री संत गाडगे महाराज' यांच्या बाबतचा लेख प्रबोधनकार ठाकरे यांचे गाडगेबाबा विषयीचे विचार सांगणारा वैचारिक लेख,"आजवर मी पुष्कळ साधूसंत महाराज पाहिले आणि बुवा पाहिले अनेकांच्या भजनीही लागलो, प्राचीन, अर्वाचीन सगळ्या संतांची चरित्रे, त्यांची भजनावली, काव्ये अभ्यासली पंढरपूरसारख्या कांही क्षेत्राच्या वाऱ्या ही केल्या, भक्तिमार्गाची दीक्षा घेऊन टाळही कुटले, पण माझ्या चिकित्सेपुढे कोणीच टिकला नाही. अशा प्रवृत्तीच्या माणसाने श्री. संत गाडगेबाबा यांच्या विषयी आत्यंतिक आदराने कांही लिहावे, बोलावे हा पुष्कळांना चमत्कार वाटेल."[४] 'आई कुठं गेली' (११ नोव्हेंबर १९४१) ही माधव मंगसुळीकर यांची लघुकथा, आर. के. माळवदे यांची जगाची रित (७ जुलै १९३१) ही लघुकथा, वा. त्रि. भाटे यांची 'आत्महत्या' मनोरंजक लघुकथा, पापाचे प्रायश्चित' वि. वे. गुर्लेकर यांची कथा (११ ऑगस्ट १९३१) 'श्यामची आई' (२१ एप्रिल १९३१) साने गुरूजी यांची कादंबरी प्रसिध्दी केली आहे. १५ ऑगस्ट १९६५ च्या अंकातून पु. ल. देशपांडे यानी रेखाटलेले 'रावसाहेब' हे व्यक्तिचित्र प्रसिध्द केले आहे. तर २० जानेवारी १९६१ च्या अंकातून 'अमर' ही मो. स. साठे यांची लघुकथा व २१ फेब्रुवारी १९६१ रोजीच्या अंकातून प्रसन्नकुमार पाटील यांची 'प्रायश्चित' ही लघुकथा देण्यात आली आहे.

'जीवनावरील आगळे वेगळे नाटय रंगभूमीवर उभे करणारे समर्थ नाटककार विजय तेंडूलकर' हा ७ फेब्रुवारी १९७१ रोजीच्या अंकात प्रा. सुरेश जोशी यांचा लेख देण्यात आला होता. 'कुसूमाग्रजांची विशाखे' तील प्रेम कविता (२५ एप्रिल १९७१) हा श्री दिलीप हरळीकर यांचा लेख देण्यात आला होतो. ऐतिहासिक लेख 'देवगडची दौलत' हा लेख त्र्यंबक रामचंद्र पत्की (विजापूर) यांनी दौलताबादची माहिती दिली आहे. (मे, जुन १९२० अंक) लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर नोव्हेंबर १९२० च्या 'तरूण भारत' च्या स्वतंत्र अंकात लो. टिळकांच्या कार्याची महती सांगणारे वेगवेळया विचारवंताचे व इतिहासकारांचे लेख प्रसिध्द केले आहेत.

'समरांगण हे जीवन ज्यांचे' हा बाबुराव ठाकुर यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा चरित्र ग्रंथ त्यांची कन्या सौ. प्रिया अ. प्रभू हिने हा ग्रंथ लिहीला. प्रस्तुत चरित्र ग्रंथ १२ एप्रिल १९७६ रोजी श्री नानासाहेब गोरे यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा झाला. या प्रसंगी त्यांनी आपले विचार व्यक्त केले, "वृत्तपत्र व विचार स्वातंत्र्य असल्यामुळेच लोकमान्यांच्या 'केसरी' ने आणि महात्मा गांधींच्या 'यंग इंडिया' ने राष्ट्राची बांधणी केली व स्वातंत्र्याची प्रेरणा भारतीयांना दिली, परंतू आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या पत्रकारितेवर अनेक बंधने पडली. आज पत्रकारांची लेखनी मुक्त नाही. आजचा बाबुराव हा मर्यादीत लेखन करणारा व नियंत्रणाखाली असणारा आहे." असे विचार मांडून बाबुराव ठाकुर यांच्या पत्रकारितेबाबत आठणीचा इतिहास मांडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. बा. म. गोगटे हे होते, बेळगावातील कला मंदिरात हा सोहळा साजरा झाला.

छत्रपती शिवाजी महाराज व जयसिंग यांच्या भेटीचा प्रसंग नाटय रूपात वर्णनातून स्वतः संपादकानी, छत्रपती शिवाजी महाराज व जयसिंग यांच्यातील डावपेचाचे वर्णन करून शिवाजी महाराज बुध्दीचातुर्याने कसे श्रेष्ठ ठरले, हे दाखवलेले आहे.[५] 'इतिहासातील सत्यकथा' या शीर्षकाखाली 'तरूण भारत' च्या (२५ एप्रिल १९३९) अंकात सुरूवातीचा ऐतिहासिक घटनेची मिथके ही नंतरच्या संशोधनानंतर बदलतात व सत्य बाहेर येते. ते ऐतिहासिक सत्य वाचकांना इतिहास प्रेमीना माहित व्हावे, म्हणून सत्य घटना प्रसिध्द करून संशोधकाचा व ऐतिहासिक घटनेचा खुलासा दिला आहे.

आजच्या भारतीय चित्रपट सृष्टीचे स्वरूप चित्रपट व्यवसायात लायक लोकांना स्थान द्या! हिंदी व मराठी बोलपटांतील गुण-दोषांचे तुलनात्मक विवेचन करणारा लेख र. के.

तेंडूलकर यांचा आहे (१६ जानेवारी १९५६) 'कर्नाटकातील राष्ट्रीय चळवळीचे जनक' दे. भ. गंगाधरराव देशपांडे लेखक, शारदाचरण शहापूर यांचा समग्रलेख प्रसिध्द करून,'भारतीय चळवळीच्या सुरूवातीचे बेळगाव भागातील दिवस नोंदवले आहेत. यामध्ये लो. टिळक व महात्मा गांधी यांचा अंतर्भाव देऊन चळवळीना दिशा दर्शविणारा लेख आहे.

'भावंडाची सृष्टी' हे सदर विविध साप्ताहिके, मासिके वगैरे नियतकालिकांचा परिचय वाचकांना करून देण्याच्या उद्देशाने सुरू केले होते. त्या सदरातून अनेक नियतकालिकांचा परिचय करून दिला आहे. पुरूषार्थ, विद्यार्थी, शाळा–पत्रक स्फूर्ती, धंदेवाईक व मंनोरंजन या नियतकालिकांचा परिचय ७ जानेवारी १९३० च्या अंकातून तर विजयी भारत व खेळगडी या नियतकालिकांचा परिचय १४ जानेवारी १९३० च्या अंकातून करून दिला आहे.

साहित्य विषयक विविध लेख प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये 'काव्य समिक्षा व वाङ्मय चर्चा (३० जुन १९३१) हा लेख तरबाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेल्या 'शिवचरित्रावरील आचार्य' प्र. के. अत्रे यांचा 'दार उघड बया दार उघड!' (२८ नोव्हेंबर १९६८) हा लेख मडगांवच्या साहित्य संमेलनामधील(१३ मे १९३०) लेख प्रसिध्द केला आहे. अशा अनेक लेखावरून 'तरूण भारत' ने साहित्य व वाड्.मय या क्षेत्रात देखील मोठे प्राधान्य दिले होते हे स्पष्ट होते. वाड्.मय विषयक वाचन करणारा वर्ग समाजात असतो. याची जाणिव त्यांना असल्याने साहित्य विषयक विविध सदरे सुरू केली. आवश्यकतेनूसार लेखांना आपल्या वृत्तपत्रात प्राधान्य दिले.

५.४ माहिती पर सदरे –

बाबुराव ठाकुरांनी माहिती पर सदरांनाही आपल्या वृत्तपत्रांत महत्त्वाचे स्थान दिले होते. 'मनोरंजन व बोधपर माहिती' या सदरातून अनेक माहिती पर विषय या वृत्तपत्रांत हाताळले आहेत. अशा या विषयाची भाषा शैली साधी व सर्वसामान्य, तरूण व विद्यार्थ्यांना रूचणारी असल्याने ही सदरे फार गाजली. या सदरांतून मनोरंजन तर व्हायचेच शिवाय बोधही मिळत असे. मनोरंजक व बोधपर माहिती, या सदरात अनेक विषय हाताळलेले आहेत.

७ जानेवारी १९३० च्या अंकात 'समुद्रात पाणी किती आहे' 'शहरांपेक्षा खेडयात राहणे सुखाचे आहे काय?' 'लोखंड गंजते त्यावेळी त्याचे वजन जास्त असते काय?' पुढच्या १४ जानेवारी १९३० च्या अंकात 'प्राण्याची वयोमर्यादा' 'लाकडामध्ये गाठी कशा होतात', 'स्वप्ने

का पडतात?', 'विषारी सर्प विषबाधा करतातच काय?' चालताना आम्ही हात का हालवितो. २१ जानेवारी १९३० च्या अंकात 'माशा छता वरून चालतात कशा', 'चहापासुन होणारे तोटे' असे विषय देऊन चर्चा केली आहे.

'मात्रेचे वळसे' या सदरातून चालू घडामोंडीवर मार्मिक विनोदी शैलीतून लिखाण केले आहे. उदा. 'विद्येची मदती अगाध जगती.....' अशा प्रकारचा श्लोक एका कवीने रचला आहे. पण' मद्याची महती अगाध जगती ती कोण वर्णू शके.....? असा नवीन श्लोक एखाद्याने रचला तर तो मुळापेक्षा अधिक सुंदर व आकर्षक होईल, असे वाटू लागले आहे. कारण नगर जिल्हयातील पुणतांबे गांवाच्या आसपास दारूचा गुत्ता काढण्यास नुकतीच परवानगी देण्यात आली आहे ! चांगदेवाच्या समाधीसाठी सुप्रसिध्द असलेले पुणतांबे. आता दारू गुत्त्यासाठी कुप्रसिध्द होणार! 'जिथे वद्य एकादशीस भक्ती गंगा वहात होती. तिथे आता दररोज मद्यगंगा वाहू लागणार!' असे लेखन या सदरातून झाले आहे.[६] पुढच्या एका लेखात, 'वेडया पीरांचे पिक' हिंदुस्थानात आहे असे नाही! इंग्लडमध्ये वेडे पीर काही कमी नाहीत, असे म्हणावे लागले. कारण 'महात्माजींना शेळीचे दुध लागते अशी बातमी तिथे प्रसिध्द होता स्वागत मंडळाकडे आमचीच शेळी पसंत करा. अशा आशयाची शेकडो पत्रे येऊ लागली आहेत.'

बाबुराव ठाकुर यांनी आपल्या वृत्तपत्रात सर्वांगिण विकास करण्याचा प्रयत्न सातत्याने केल्याचे निदर्शनास येते. त्यांनी एक संपादक म्हणून समाजाला रुचेल, आवडेल असे अनेक विविध विषयांची हाताळणी केली व अनेक नवनवे प्रयोग करण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. 'तरूण भारत' हिंदी विभाग या नावाचे सदर सुरू करून हिंदी वाचक वर्गाची सोय करून दिली. या सदरातील लेखन हे हिंदी भाषेत केले जात असे. त्यावरून या विभागातील हिंदी भाषिक व वाचकानाही आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न त्यानी केल्याचे दिसते.

१८ फेब्रुवारी १९३६ च्या अंकातील हिंदी विभाग या सदराद्वारे 'भारत हे सहयोग कब मिलेगा' या मथळयाखाली लिखाण झाले आहे, २५ फेब्रुवारी १९३५ च्या अंकात 'बेळगाव जिल्हा काँग्रेस कमिटी की योग्य दृष्टी' या विषयावर लिखाण करण्यात आले आहे. १७ मार्च १९३६ च्या अंकातून 'साम्यवाद और महात्माजी' या विषयावर लिखाण झाले आहे. अशा प्रकारे विविध विषयांची हाताळणी 'हिंदी विभाग' या सदरातून होत असे.

बाबुरावांनी आपल्या देशातील नव्हे, तर परदेशातील थोर व्यक्तिमत्त्वांना आपल्या वृत्तत्रात उजाळा दिला आहे. उदा. 'स्टॅलिन–व्यक्ती व कार्य' या मथळ्याखाली बा. कृ. गलबली. २५ फेब्रुवारी १९३६ व ३ मार्च १९३६ च्या अंकातून अुनक्रमे पहिला व दुसऱ्या लेखांत 'थोर रशियन क्रांतिकारक स्टॅलिन' यांचा परिचय करून दिला आहे. त्याच बरोबर १ डिसेंबर १९३६ व ८ डिसेंबर १९३६ च्या अंकात लिऑन ट्रॉट्रस्की यांच्यावर दोन खास लेख श्री. बा. कृ. गलबली यांनी लिहीले आहेत. बाबुरावांचे महात्मा गांधीजीवर असिम प्रेम होते. त्यामुळेच स्वातंत्र्यपूर्वी व स्वातंत्र्योत्तर काळात गांधीजी संबंधीचे लिखाण त्यांनी मोठया प्रमाणावर केल्याचे आढळते. १, ६,११,१७ व २४ सप्टेंबर १९६८ या अंकातून 'असे होते गांधीजी' या मथळ्याखाली कृष्णा मुंचडी यांची लेखनमाला बाबुरावांनी चालवली होती. या लेखमालेतून महात्मा गांधीजीच्या चरित्रांतील ठळक हृदयस्पर्शी प्रसंग क्रमशः दिले आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूचे दर्शन वाचकांना अभ्यासकाना घडविले आहे.

'सामाजिक जीवन सुखी कसे होईल? समाजवादाचे उद्दिष्ट' या विषयावरील बा. र. सुंठणकर यांची लेखमाला ९ जून १९३६, १६ जून १९३६, २३ जुन १९३६ च्या अंकातून प्रसिध्द केले आहे. 'उज्ज्वल भविष्याकडे महाराष्ट्राची वाटचाल' हा लेख लिहून महाराष्ट्राच्या विकासाची माहिती दिली आहे.[७] 'जपान मधील टेलरिंग व्यवसाय' हा लेख श्री. शिंत्रे यांचा आहे. (२३ मे १९७१) 'भारतीय शिल्पकलेचा दैदिप्यमान विलास वेरूळची अमर लेणी' (२० ऑगस्ट १९७१) हा आप्पासाहेब पवार यांचा वैचारिक लेख 'खेळांचा राजा बुध्दीबळ (१० सप्टेंबर १९७१) हा नरहर पडसलगेकर यांचा बुध्दीबळ या खेळा विषयाचा लेख 'सरदार वल्लभभाई पटेल' (२१ नोव्हेंबर १९७१) हा मोहन धारिया यानी लिहीलेला लेख 'आजच्या प्रसंगी आवश्यक असलेले रक्तदान–एक श्रेष्ठदान' (११ डिसेंबर १९७१) हा डॉ. चारूशील गुप्ते यांचा लेख आहे.

५.५ वाङ्मय व नाटय विषयक बातम्या –

'तरूण भारत' ने वाङ्मय व नाटय क्षेत्राला अग्रस्थान देऊन मोठया प्रमाणावर प्रसिध्दी दिली आहे 'बेळगाव–मातृभूमिच्या पाया जोडून खालील शृंखला तोडण्याच्या एकाच आकांक्षेने भारलेली ती पिढी होती! स्वातंत्र्योत्तर काळात ती धगधगती ज्वाला दिसत नाही!' वि. स. खांडेकर यांचे बेळगाव मधील भाषण '३८ वे महाराष्ट्र नाटय संमेलन बेळगाव नाटककरानी

पतंगाप्रमाणे भराऱ्या माराव्या पण पतंगाची दोरी आपल्या हाती राहू द्यावी.' उद्घाटक काकासाहेब गाडगीळ यांचे भाषण (६ जानेवारी १९५६) 'मुंबई सरकारने तेहतीस टक्के जुलमी कर लादून नाटय व्यवसायाचे अक्षरशः वाटोळे केले!' 'नाटक हे श्रेष्ठ दर्जाचे साहित्य आहे! अत्रे यांचे नाटय संमेलनाचे समारोपाचे भाषण' (१० जानेवारी १९५६) 'तरूण भारत' च्या अंकात देण्यात आले आहे.[८]

'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप' प्रा. शेणोलीकर यांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ' (४ मार्च १९५६) लिंगराज कॉलेज बेळगांव येथे झालेल्या कार्यक्रमाची बातमी तर प्रा. फडके यांचे विचार वाङ्.मय जन्म आनंद साक्षेप असतो–पुनः प्रथम देणे हाच ललित कृतीचा हेतू–वाचकांची तपश्चर्या; कोणते वाङःमय टिकाऊ असते? वाङःमयाचा अभ्यास कसा करावा?' या शीर्षकाखाली लेख देण्यात आला आहे.[९] अशा प्रकारे साहित्य व नाटय विषयक बातम्यांना प्राधान्य देत असत.

५.६ व्याख्याने –

बेळगांव शहरात बऱ्याच वर्षांपासून, जाणकार व बुध्दीवादयांची खाण समजले जाते. हा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी सर्व सण, उत्सव, जयंत्या साजऱ्या केल्या जातात. बेळगाव या शहरात बरीचशी सामाजिक मंडळे स्त्री मंडळे, पुढे आली आहेत. त्यांच्याकडून समाज मान्य व समाजाच्या उन्नतीसाठी काही उपक्रम राबवले जात. त्याचाच एक भाग म्हणून वेगवेगळया विषयावर वैचारिक व्याख्याने ऐकण्यास मिळत असे. अशा भाषणांचा सारांश 'तरूण भारत' या वृत्तपत्राने घेतलेला वेध याची चर्चा या विभागात केली आहे.

बेळगाव स्ट्रडंटस युनियन तर्फे वनिता विद्यालयांच्या प्रांगणात २० सप्टेंबर १९३३ रोजी 'राजाराम मोहन रॉय' यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्त प्रा. श्रीनिवासाचारी यांचे व्याख्यान झाले 'समाज सुधारणा, हिंदुस्थाची विचारक्रांती, मुद्रण स्वातंत्र्य, शैक्षणिक सुधारणा यांची खरी सुरूवात ही राजाराममोहन रॉय यांच्या विचारातून उद्रेक झाला.' अशा शब्दात राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचा आढावा भाषणात घेतला आहे.

२६ वा गडकरी स्मृतिदिन साजरा करण्यात आला, यावेळी ना. सी. फडके यांनी कै. गडकरी यांचे वाङ्मयातील स्थान या विषयावर भाषण दिले. 'गडकऱ्यांचा अंघटिताचा हव्यास! गडकरी हे वास्तवादी नव्हते व ध्येयवादीही नव्हते!'[१०]

१७ जानेवारी १९६३ रोजी स्वामी विवेकानंद यांची जन्मशताब्दी निमित्त 'तरूण भारतात' लेख प्रकाशित केले. "अध्यात्म शक्तीच्या जोरावर जग जिंकण्यास निघालेला आणि भारतीय तरूणांत आत्मविश्वासाची ज्योत पेटविणारा संन्यासी स्वामी विवेकानंद (१५ जानेवारी १९६३)" 'दलित व पतित यांची सेवा हाच खरा धर्म, याची शिकवण देऊन भारतीय तरूणांना राष्ट्रसेवेची दिक्षा देणारा अलौकी पुरूष' अशा शब्दात विवेकानंदाचा उचित गौरव 'तरूण भारत' अंकाने सातत्याने केला आहे.

'छ. शिवाजी राजांनी अल्पकाळात स्वराज्याचे सुराज्य केले.' महाराष्ट्र ही जशी शिवरायांची भूमी आहे. तशीच ती संतांची भूमी आहे!' बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांचे बेळगांव येथील शिवजयंती उत्सवातील भाषण.[११]

'पानिपतची लढाई मराठे हरले नाहीत, त्यांनी ती जिंकली !' नानासाहेब कुंटे यांचे ३० एप्रिल १९५४ चे भाषण 'जीवन निष्ठा, वाढविली तरच प्रगति करणे शक्य आहे' 'तरूणांची मने घडविणे हे साहित्याचे उद्दिष्टे असावे' डॉ. आप्पासाहेब पवारांचे वाङ्मयीन मंडळामार्फत भाषण (१२ सप्टेंबर १९७०) श्री. सेतुमाधवराव पगडी हे वसंत व्याख्यान मालेत 'भारतीय मुसलमान,' या विषयावर बोलताना म्हणतात मुसलमानांचे भारतीयीकरण हे सुचूर आहे.!' (६ मे १९७१) 'भारतावर राज्य केले परक्यानी तुर्क, मोंगलानी! मुसलमानानी, भारतीय मुसलमान हे आमच्याच रक्ताचे व वंशाचे! ब्रिटिशांनी हिंदु-मुसलमानात पाडलेली फुट अद्यापि नडत आहे!' इतिहास संशोधक वेडा-अखंड वक्तृत्वचा झरा' हे उद्‌गार २२ ऑगष्ट १९७४ च्या व्याख्यानात काढले आहेत.

५.६.१ छ. शिवाजी महाराजांच्या संबधी लेख –

श्री. केशवराव गोखले यांनी 'शककर्ते राजर्षि शिवराय' लेखक या लेखात महाराजांच्या जन्मापासून मृत्युपर्यंतच्या घडामोडीचा शोध घेतलेला आहे. (२२ एप्रिल १९३३) 'शिवरायांची थोरवी' हा संपादकीय लेख' 'भारताला छ. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्त्वाची जोड दिल्यास

भारताला पारतंत्र्याच्या साखळ दंडातून मुक्त होता येणे शक्य आहे. मांडले आहेत. 'शिवाजी हा केवळ महाराष्ट्राचाच नव्हे तर साऱ्या भारताचा सुपूत्र आहे ! हे विचार ३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावर शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण करताना पंडित नेहरूनी व्यक्त केले.[१४] 'शिवजयंती आणि नवमहाराष्ट्र राज्यदिन विशेषांक' २७ एप्रिल १९६० ला प्रसिध्द केला. संपादकीय लेखात, "श्रेष्ठनितीचा व असामान्य कर्तृत्त्वाचा महान प्रतापी पुरूष" महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांचे ५ मे १९६२ रोजी पूणे येथे शिवजयंती उत्सव प्रसंगी भाषण, "आज ही शिवाजी महाराज भारतीय स्वातंत्र्याची व राष्ट्रीयत्वाची प्रेरक शक्ती आहे.", "उत्तरेकडून शाहिस्तेखान व दक्षिणेकडून सिद्दी जौहार यांच्याशी एकाच वेळी लढण्याचा शिवाजी महाराजांच्यावर प्रसंग बाजीप्रभू देशपांडे व फिरंगोजी नरसाळा यांनी केलेल्या पराक्रमाची शर्थ." शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवचरित्र व्याख्यानमालेतील भाषने, "महाराजानी अजिंक्य मनाची माणसे निर्माण केली, कारतलब खानाच्या सैन्याची शिवाजी महाराजानी उडविलेली दाणादाण, लाल महालात शिरून शाहिस्तेखानाची बोटे तोडली, हे महाराजांचे अचाट साहस आणि लष्करी प्रतिभेचा अविष्कार." अशा विषयावर सलग १३ व्याख्याने देऊन छ. शिवाजी महाराजांच्या कार्याचा इतिहास बेळगाव जनतेसमोर उलघडून दाखला, बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवचरित्र व्याख्यानातील बारकाव्याबाबत संपादकीय लेखात कौतूक केले आहे. 'महाभारत रामायण हया महाकाव्यातून आपल्या समाजाला स्फूर्ती व प्रेरणा मिळते, तशाच प्रकारचे हे शिवचरित्र महाकाव्य आहे. महाराष्ट्रालाच नाही तर सर्व देशाला प्रेरणा देणारे व ज्वाज्ज्वल इतिहास समोर ठेवणारे चरित्र आहे. या शिवचरित्र इतिहास संशोधन पध्दतीनुसार पुढे आला पाहिजे, हा इतिहास सर्व भाषेत रूपांतरीत होऊन सर्व देशात महाराजांची ख्याती व खरा इतिहास देशात पोहचला पाहिजे', पुढे म्हणतात. "भकलेल्या मनोवृत्तीला आळा घालण्याचे व आयुष्याला नवी कलाटणी देण्याचे सामर्थ्य शिवचरित्रात आहे. बालक–बालिका, स्त्री–पुरुष सर्वानीच मनन चिंतन करण्याजोगे हे आदर्श चरित्र आहे." अशा शब्दात महत्त्व पटऊन दिले आहे.[१३]

शिवचरित्र व्याख्यान मालेच्या तिसऱ्या सत्रातील पहिले पुष्प गुंफताना श्री बाबासाहेब पुरंदरे यांनी काढलेले उद्‌गार, "नेताजी पालकरवर मुसलमान होण्याची पाळी यावी! काय ही

दैना" "शिवाजी महाराजांचे समाज सुधारणेचे धाडस जितके मोलाचे तितकंच अवघड होते!'' (२४ जानेवारी १९७१) "अविवेकाच्या भरात प्रतापराव गुजर ४० हजार फौजेवर चालून गेला', वेडात मराठे वीर दौडले सात।"

"शिवाजी महाराजानी नुसतेच राज्य निर्माण केले नाही, तर महाराष्ट्राची चुरगळलेली, चिरडलेली अस्मिता जागृत केली." हे विचार शिवजयंती उत्सव मंडळातर्फे झालेल्या सभेत श्री. गो. नी. दांडेकर यांनी व्यक्त केले.[१४]

"स्वामी कार्यासाठी लाखो सामान्य जनतेच्या मनात बलिदानाची प्रेरणा निर्माण करणारा, पराभवाचे विजयात रूपांतर करण्याची किमया साधणारा असामान्य नेता राजा– शिवछत्रपती" हे उद्‌गार प्रा. नरहर कुरूंदकर यांनी बेळगावातील शिवप्रतिष्ठानच्या समोर महाराष्ट्र दिना दिवशी व्यक्त केले. (१ मे १९७४)

५.६.२ १८५७ चे स्वातंत्र्यसमर –

१८५७ च्या उठावाची शताब्दी साजरी करताना, या उठावात बेळगाव जिल्ह्यातील क्रांतिकारकांच्या कार्याचा आढावा घेणारा विषय १३ ऑगस्ट १९५७ च्या अंकात आला आहे.

'सत्तावनच्या स्वातंत्र्य समरांत बाबासाहेब नरगुंदकर यांचा आत्मयज्ञ।' या शीर्षकाखाली बाबासाहेब नरगुंदकर यांचे ब्रिटिश सत्तेविरूध्दचे कार्य १८५७ च्या स्वातंत्र्य समरांत भाग घेऊन ज्यांनी आपले बलिदान दिले. अशा वीर पुरूषापैकी दक्षिणेतील नरगुंदकर हे एक देश भक्त, बाबासाहेबांनी इंग्रजाविरूध्द केलेल्या उठावांत त्यांचा पाडाव झाल्यानंतर त्यांना इंग्रजांनी पकडून बेळगांव येथील कँप हद्दीत असलेल्या 'दे स्टॅक हिल' वर बाबासाहेबांना फाशी देण्यात आली. त्यांच्या पत्नी व मातोश्री यांनी ब्रिटिशांच्या हातून आपली विटंबना होऊ नये म्हणून, मलप्रभा नदीत जलसमाधी घेतली. कँप मधील 'हे स्टॅक हिल' वर बाबासाहेबांची कमल चिन्हांकित समाधी असून, त्यांना ज्या वडाच्या झाडाला फाशी दिले. ते झाड स्मारक म्हणून ओळखले जाते. शेजारी त्यांची पत्नी व मातोश्री यांचीही स्मारके आहेत.[१५]

५.६.३ तिर्थक्षेत्रे व मंदिरे व पर्यटन स्थळे–

१) कित्तुर चन्नमाचा इतिहास –

कित्तुर हे पुणे–बंगलोर या राष्ट्रीय महामार्गालगतचे बेळगाव व धारवाडच्या दरम्यान असणारे एक लहानसे संस्थानिक गाव होते. या ठिकाणची राणी चन्नमा ही बलिष्ठ ब्रिटिश साम्राज्याविरूध्द बंड पुकारणाऱ्या भारतातील संस्थानिकांमध्ये सर्वप्रथम होती. अदम्य धैर्य असलेली अशी ती देशप्रेमी स्त्री होती. राणी चन्नमाचा ब्रिटिशांच्या विरोधाचा लढा भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा प्रारंभ होता. म्हणूनच तिला 'भारतीय स्वातंत्र्य समराचा पहाटतारा' असे अन्वर्थकपणे म्हटले आहे.

ब्रिटिश साम्राज्याविरूध्द उठाव करणारी १८५७ स्वातंत्र्य संग्रामाच्या अगोदरची स्वातंत्र्यासाठी बंड पुकारणारी पहिली स्त्री होती. ब्रिटिश साम्राज्याविरूध्द झालेल्या भारतीय स्वातंत्र्य समरातील २३ ऑक्टोंबर १८२४ ची लढाई ब्रिटिशांच्या सैन्यावर निर्णायक विजय मिळविणारी होती. या लढाईचे नेतृत्त्व खुद्द राणी चन्नमा ने स्वतः तलवार घेऊन घोडयावर मांड टाकून केले होते. या लढाईत इग्रंजांच्या सैन्याची मोठी दाणादाण झाली. बरेचसे ब्रिटिश अधिकारी कामी आले व ब्रिटिशांनी या लढाईतून माघार घेतली. त्यावेळी क्रांतिकारकांनी कित्तूरच्या किल्लयासमोर आनंद उत्सव साजरा केला. हा इंग्रजांच्या विरोधातील हिंदुस्थानातील स्वातंत्र्य संग्रामातील मोठा विजय होता. परंतू ५ डिसेंबर १८२४ रोजी झालेल्या लढाईत, कित्तूरच्या किल्यातील विस्तृत पटांगणावर स्वातंत्र्य योध्दयांच्या प्रेतांचा खच पडला. शेवटी इंग्रजांच्या ताब्यात कित्तूर संस्थानचा किल्ला आला. राणी चन्नमा व त्यांच्या कुटुंबाला जेरबंद करुन कित्तूर संस्थान इंग्रजानी खालसा केले.

राणी चन्नमा व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना इंग्रजानी बैलहोंगलच्या किल्ल्यात नेऊन राजबंदी म्हणून कोंडून ठेवले. शेवटी इंग्रजांच्या छळापुढे व स्वातंत्र्याच्या विचारापुढे राणी चन्नमाचा कैदेत पाच वर्षाच्या कारावासानंतर दि. ३ फेब्रुवारी १८२९ रोजी तिचा अंत झाला. राणी चन्नमाचा गौरवशाली इतिहास सांगणारा सदाशिव शिवदेव वोडेयर (कर्नाटक विश्वविद्यालयाचे कुलगुरू) यांनी लिहीलेले कन्नड भाषेतील हे पुस्तक, श्री. पंडित आवळीकर यांनी मराठी भाषेत अनुवाद केला आहे. या पुस्तकाचा परिचय करून देणारा लेख 'तरूण भारत'ने प्रसिध्द करून मराठी भाषिक वाचकाना चन्नमाचा इतिहास माहिती दिली आहे.[१६]

'सत्यवादी' वृत्तपत्रकार श्री. बाळासाहेब पाटील यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या जन्मशताब्दी निमित्त शाहू महाराजांच्या कार्याचे अभ्यासक या नात्याने 'सत्यवादी' या वृत्तपत्रात (२२ जून १९७४) खास अंक प्रसिध्द केला. या अंकात पाटील यांनी स्वतःचे लेख प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये शाहू महाराजांच्या आठवणी,' या सदराखाली महाराजांच्या कार्य कर्तृत्त्वाचा आढावा घेतला आहे. अशा लेखांचे चिकित्सक दृष्टीने 'तरूण भारत' च्या संपादकीय लेखात समालोचन केले आहे.

२२ जूनच्या खास अंकात 'राजर्षी शाहू महाराज जसे होते तसेच दिसले पाहिजे' या शीर्षकाखाली लिहीलेल्या लेखात 'सत्यवादीकार' शाहू महाराजांविषयी सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत होते. शाहू महाराजानी मद्रासपासून दिल्लीपर्यंत सर्व भारतात सामाजिक क्रांतीची सूत्र रुजविण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे गौरवोद्‌गार या लेखात काढले आहेत.[१७]

खेडेगावातील शेतकरी कष्टकरी समाजाला शेती व्यवसायासाठी प्रेरित करण्यासाठी व शेतात जास्तीत जास्त धान्य पिकवण्यासाठी प्रोत्साहीत केले जाई. एखादया गावात चांगल्या दर्जाचे व जास्त उत्पन्नाचे पिक शेतकऱ्याने घेतले. यांचा गौरव होण्यासाठी व त्या शेतकऱ्याची शेती करण्याची पध्दत समाजाला समजण्यासाठी ती बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाई. त्याच बरोबर चांगल्या जनावरांची पैदास जास्त दूध देणाऱ्या गायी म्हैसी याचे मालक यांचाही उल्लेख करून गौरविले आहे. उदा. २४ डिसेंबर १९३५ रोजीची घटना 'गवत कापण्याचे रेकॉर्ड' या मथळ्याखाली बातमी देऊन शेतकऱ्यांना प्रसिध्दी मिळऊन दिली आहे. श्री रामचंद्र सखाजी पाटील कालकुंद्री या शेतकऱ्याने करवीनकोपच्या सरकारी कुरणातील गवत ६० तास सतत कापून रेकॉर्ड ब्रेक केले. त्याबद्दल बेळगाव येथील सुप्रसिध्द गवताचे व्यापारी श्री गणपतराव खन्नुकर यांनी त्याला रोख १५ रु व १० रु चा जरीफेटा बक्षिस देऊन श्री. पाटील यांचा सन्मान केला. पाटील यांनी ६० तासाच्या कालावधीत ६ हजार गवताच्या पेंढया कापल्या. दोन तांबे पाणी व ताक फक्त त्याने घेतले होते. अशा बातम्या देऊन खेडेगावात चर्चेचा विषय होत असे.[१८]

२. श्री पंत महाराज, क्षेत्र बाळेकंद्री –

श्री पंत महाराज बाळेकुंद्री हे एक सात्विक आध्यात्मिक व्यक्तिमत्व 'श्री दत्तप्रेमलहरी' आदि त्यांचे काव्यलेखन अभ्यासून दोघांनी पीएच. डी. संपादन केली आहे. त्यांच्या जीवन

कर्तृत्त्वाचा हा आलेख आहे. असे संपादक सुरूवातीला म्हणतात. पुढील लेख श्री नारायण रा. किल्लेकर बेळगाव यांचा आहे.

श्री पंत महाराज बाळेकुंद्री हे अवधूत संप्रदायाचे योगी होते. अतिप्राचीन अशा दत्त संप्रदाय आणि इतर संप्रदायांवर या अवधूत संप्रदायाचा अधिक प्रमाणात छाप पडलेली दिसून येते. बाळेकुंद्री हे गाव बेळगाव शहराच्या पूर्वेस १४ कि. मी. अंतरावर आहे. श्रीपंत महाराजांच्या पुण्य निवासामुळे या गावाला 'श्री पंत महाराज बाळेकुंद्री' हे नामाभिधान प्राप्त झाले आहे.

श्री पंत महाराजांचा जन्म त्यांच्या आजोळी, दड्डी, जि. बेळगांव या गावी सोमवार दि ३ सप्टेंबर १८५५ रोजी झाला. त्यांच्या माता पित्यांचे नाव अनुक्रमे गोदाक्का उर्फ सिताबाई वडील श्री रामचंद्रपंत, बाळेकुंद्रीचा दत्तू या नावाने ओळखत, पुढे श्रीपंत महाराज बाळेकुंद्री या नावाने प्रसिध्द झाले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण दड्डी येथे झाले व माध्यमिक शिक्षण बेळगाव येथील 'मिशन हायस्कूल'मध्ये झाले याच सुमारास अध्यात्माच्या विषयाकडे ते वळले, श्रीपंत बाळाप्पा यानी दत्तूला दृढ योग, कुंडलिनी जागृती योग, आसन तारकयोग, स्वरसाधना इत्यादी योगांचा अभ्यास करून घेतला, मिशन हायस्कूलमधून मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याच शाळेत त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली. पुढे मॅट्रीक झाले. तेथेच बढती मिळाली. या शाळेत त्यानी बावीस वर्षे शिक्षकाची नोकरी केली. त्यानंतर बालावधूता या गुरूने दत्तूला सद्गुरू पदावर बसविले. याच सुमाराला १८८२ साली श्रीपंताचा विवाह दड्डीच्या श्रीपाद मामांची कन्या यमुनाक्का हिजबरोबर झाला. श्रीपंताची लेखणी म्हणजे अद्वैत वाङ्मयाचे हुंकार होय. यांची सुमारे तीन हजार पदे (भक्तिगीते) उपलब्ध आहेत. कडकडीत वैराग्य, अंतरंगाची असंगत इत्यादी विषयावर लेखन झाले आहे.

श्रीपंतांचा शिष्य परिवार जसजसा वाढता होता, तसतसा त्यांच्या अंतःकरणातील बोधलहरी व प्रेमलहरी छोटया मोठया लेखातून प्रकट झाल्या होत्या. भक्तीलाप, प्रेमतरंग, बालबोधा, प्रतसार परमानुभव प्रकाश, ब्रह्मोपदेश अनुभववल्ली आत्मज्योती बोधानंद गूरिका, भक्तोद्गार अधिक स्फूटलेख असे विपुल ग्रंथ लेखन इ.स. १८८२ ते १८८५ या काळात झाले आहेत. हे त्यांचे सर्व गद्य लेख श्रीपंत वाङ्मय प्रकाशन मंडळाने श्रीपंत निधनानंतर पुस्तक रूपाने प्रसिध्द केले आहे. इ.स. १९०३ साली त्यांची प्रकृती ढासळू लागली, म्हणून त्यांनी

शिक्षकी पेशाचा राजीनामा दिला. सोमवार १६ ऑक्टोंबर १९०५ रोजी श्रीपंतही अवधूत स्वरूपी लीन झाले.

श्रीपंत निर्वाणानंतर श्रीपत बंधू व भक्तांनी एकत्र येऊन सर्वानुमते २७ डिसेंबर १९०५ रोजी 'श्री दत्त संस्थान बाळेकुंद्री या संस्थेची स्थापना केली. बाळेकुंद्रीच्या आमरहित श्रीपंतांच्या पार्थिव देहावर जेथे अग्निसंस्कार झाला जो औदुंबर कट्टा, त्यांच्या पादुकांवर उभारलेले श्रीपंत मंदिर, अशी अनेक मंदिरे आज उभी आहेत.

भक्तजनांचा प्रेमसागर खरा उचंबळून येतो. तो श्रीपंत पुण्यतिथी उत्सवाच्या वेळी, या यात्रेला महाराष्ट्र व कर्नाटकातून व इतर राज्यांतूनही भक्तगण मोठया संख्येने येतात. हे एक बेळगाव जवळील महत्त्वाचे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. याबाबतच्या बातम्या, लेख कायम 'तरूण भारतात' प्रसिध्द केले आहेत. परंतु कोणत्याही लेखात चमत्काराला थारा न देता सत्य बातम्या पुढे आणून आधात्मिक उन्नतीसाठी व समाजाच्या कल्याणासाठी या घटकांचा वापर केल्याचे दिसते.

३. श्री बसवेश्वर –

लिंगायत धर्माचे संस्थापक 'श्री बसवेश्वर' या लेखाचे लेखक श्री. भास्करराव गोखले हे होय. बसवेश्वराचा जन्म इ.स. ११३२ साली विजापूर जिल्हयातील बागेवाडी येथे झाला. ते शैव ब्राहमण या जातीत जन्माला आले. वीरशैव धर्म म्हणजे हिंदू, जैन व इस्लाम धर्माप्रमाणे हा धर्म एकेश्वरवादी आहे. हिंदु धर्माप्रमाणे मूर्तिपूजक आहे. तर जैन धर्माप्रमाणे उच्च–निच्च व जतिभेद माननारा नाही. या त्यांच्या तत्वज्ञानावरून बसवेश्वराच्या क्रांतिकारक धर्मस्थापनेची कल्पना येते. 'सत्य बोलणे हेच स्वर्गलोक, खोटे बोलणे हाच मृत्यलोक, चोरी नको हिंसा नको, टोचून बोलू नको, रागावू नको, दुसऱ्यांचा मत्सर नको स्वतःची स्तुती नको, कोणाचाही पाणउतारा करू नको.' हीच अंतरंग शुध्दी बहिरंग शुध्दी, कुंडल संगम देवाला प्रसन्न करून घेण्याची युक्ती व सोपा मार्ग आहे. मानव समाजातील समता, माणुसकीची वागणूक आणि धर्माची प्रतिष्ठा ही त्यांची तीन जीवन तत्त्व होय.[१९]

४. श्री कलावती देवी –

बेळगांव येथील अनगोळ या गावातील श्री हरिमंदिर व या मंदिरातील माताजी श्री कलावती देवी या सिध्दारूढ स्वामीच्या शिष्य, या मातेचा महिमा कर्नाटक, महाराष्ट्र गोवा इ.

राज्यात वाढलेला आहे'. भक्तगण मोठया संख्येने दर्शनाला बेळगाव येथे येतात. अशा मातांच्या चरित्राची ओळख सर्वसामान्य माणसाला व्हावी या हेतूने अनेक लेख व जत्राच्या वेळच्या बातम्या प्रसिध्द केल्या आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या भागातील थोर तपस्वि, आधात्मिकतेचा आधार घेऊन समाजातील अंधश्रध्दा, रूढी, पंरपरा वर आघात करणारी माता, भक्ती मार्गाचा सोपा व सरळ मार्ग सांगून भजन, कीर्तनच्या माध्यमातून देवाचा नामस्मरण गाणारा मार्ग दिला आहे. अशा विषयाचा लेख प्रसिध्द केला आहे (५ एप्रिल १९७२)

५) गोकाक धबधबा –

बेळगावपासून ८० कि.मी.वर गोकाकचा प्रसिद्ध धबधबा आहे. तेथे घटप्रभा नदीचा उसळता प्रवाह १७० फूट खाली खडकाळ भागात कोसळत असतो. या नदीच्या काठी प्राचीन महादेवाच्या मंदिरांचे अवशेष आढळतात. या पर्यटन स्थळाला, जनमाणसांनी भेटी द्याव्यात म्हणून वृत्तपत्रात प्रसिद्धी मिळवून दिली आहे.

६) मंगसुळी –

बेळगाव जवळील अथणी तालुक्यातील मगसुळी येथे प्रसिद्ध खंडोबाचे मंदिर आहे. तसेच बेळगावच्या पश्चिमेला २० कि.मी. वर चंदगड तालुक्यात(महाराष्ट्र) वैजनाथ शिव मंदिर आहे. प्राचीन गुहा आहे. त्याचबरोबर महिपालगड हा लगत किल्ला आहे. या तिर्थक्षेत्राचा पर्यटनाच्या दृष्टीने नावारूपाला आणण्याचे माध्यम म्हणजे हे वृत्तपत्र होय.

७) श्री क्षेत्र सिद्धेश्वर–

बेळगावपासून ५ कि.मी. अंतरावर कणबर्गीच्या डोंगरावर सिद्धेश्वराचे विशाल मंदिर आहे.

८) संकेश्वर–

संकेश्वर येथे शंकराचार्याचा मठ आहे. शृंगेरीचा शंकराचार्य नरसिंहभारती यांचा शिष्य शंखरभारती याने १६ व्या शतकात मठ स्थपला. शृंगेरीच्या पीठाचीच ही एक शाखा आहे. जवळच सोगल येथे श्री शंकराचे मंदीर आहे. (सोगल सोमनाथ) जवळच डोंगरावरून पडणारे धबधब्यांच्या रूपात पाणी, पर्यटकांचे आकर्षण आहे.

९) सौंदत्ती(रेणुका मंदिर)–

सौंदत्ती येथील गिरिशिरावर रेणुका देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे. या रेणुकेला कर्नाटकातील लोक यल्लम्मा देवी म्हणतात. यल्लमामातेला अनेक स्त्रिया वाहून घेतात व मुरलीचे जीवन जगतात. प्रत्येक पौर्णिमेला येथे मोठी यात्रा बरते. कार्तिक व आश्विन नवरात्रात महाराष्ट्रातून आणि कर्नाटकातून लाखो लोक यात्रेसाठी येथे येतात. या रेणूका मातेच्या पौराणिक कथेबाबत या वृत्तपत्रात श्री विष्णूच्या आतारापैकी श्री भार्गावराय तथा परशुराम हा ६ वा अवतार होय. इतिहास प्रसिद्ध कोपिष्ट ऋषी जमदग्नीपासून रेणुका मातेच्या पोटी परशुराम जन्मास आला. परशुराम मोठा झाल्यावर एकदा रेणुकामातेच्या हातून काही चूक आली व पतीच्या आज्ञेची अवज्ञा झाली. त्यामुळे ऋषीवरास कोप येऊन त्याचे पुत्र परशुरामाकरवी तिचा वध केला. परंतु मातृवधदोष निरसनाथ परशुरामाने दिल्याचे प्रार्थना केल्यावर जमदग्नी ऋषीला पुन्हा रेणुकामातेला जीवित करावे लागते. परंतू कोपिष्ट ऋषिने तिचा पुन्हा अंगिकार केला म्हणून या शिखरावर या मातापितापुत्र या तिन्ही महान देवतांची स्माते आहेत.

बेळगाव जिल्हयातील मुख्य मंदिर, तिर्थक्षेत्रे व पर्यटन स्थळांची प्रसिद्धी मिळवून देऊन त्या ठिकाणाची संस्कृती व परंपरेचा व इतिहासाचा खुलासा करून जनतेला माहिती करून देण्याचा प्रयत्न या वृत्तपत्राने केला आहे. असे जरी असले तरी ज्या चालिरिती प्रथा व परंपरा समाजाच्या दृष्टीने घातक व मरक आहेत. त्याविरूद्ध कायम दक्ष राहून लेखन केले आहे.

पर्यटन स्थळे–

सहयाद्रीच्या पर्वत रांगावर व पश्चिम घाटाच्या उतरणीवर थंड हवेची ठिकाने भरपूर आहेत. सरकारचा प्रयत्न असल्यास अशी पर्यटकांच्या दृष्टीने उत्तम हवेची ठिकाणे बनविता येण्यासारखी आहेत. यापैकी आंबोली हे सावंतवाडी संस्थानातील पर्यटन स्थळे आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे २३०० फुट उंच आहे. बेळगाव ते वेंगुर्ले या रस्त्यावर हे स्थळे येते. तेव्हा सरकारने पोस्टल मोटर सर्व्हिस ची व्यवस्था नियमित करावी.

आंबोलीसारखी ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टिने विकास झाला पाहिजे.अशी भूमिका या वृत्तपत्रानी घेतली होती.[२०]

५.७ सिनेमा थिएटरची निर्मिती–

बेळगांव शहर हे संस्कृती प्रधान शहर आणि कलेचे माहेर घर म्हणून सुरूवातीपासूनच प्रसिध्द आहे. अशा या शहरात १८ नवे व जुने असे सिनेमा गृह आहेत. त्यावेळी करमणुकीचे साधन म्हणून बोलपटांना महत्त्वाचे स्थान होते. हे बोलपट प्रभावीपणे बघण्यात यावेत. म्हणून वेगवेगळ्या सिनेमा थिएटरमध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला दिसून येतो. अशी काही थिएटर स्थापन होत असताना त्याची वाटचाल 'तरूण भारत' या वृत्तपत्रात बातमी स्वरूपात प्रसिध्द केली जात होती.

५.७.१. 'हंस' थिएटर–

बेळगावमध्ये आरंभापासून प्रामुख्याने मराठी चित्रपट प्रदर्शित करून, मराठी रसिक प्रेक्षकांची गरज भागविणारे थिएटर म्हणजे 'हंस' बेळगावातील हे जुन्या चित्रपट गृहापैकी एक अनेक गाजलेले मराठी व हिंदी चित्रपट येथे १०० दिवस चाललेचा इतिहास आहे. आजही हे चित्रपटगृह आपली परंपरा टिकवून आहेत.

शहरातील जुन्या चित्रपट गृहापैकी 'हंस' यांची सुरूवात १७ डिसेंबर १९४४ मध्ये झाली. त्यानंतर सुधारणांचे टप्पे ओलांडत हे चित्रमंदिर आपली लोकप्रियता टिकवून आहे. 'माझं बाळ' या चित्रपटाने या चित्रपटगृहात प्रथम प्रदर्शित होण्याचा मान मिळविला. दादा कोंडके यांचा 'सोंगाडया' हा चित्रपट या चित्रगृहात २८ आठवडे चालला, श्री. बी. जी. उर्फ रावसाहेब कुलकर्णी यांनी या चित्रमंदिराचे व्यवस्थापक म्हणून काम केले.

५.७.२. रेडिओ टॉकीज–

वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या करमणुकीची खास सोय करण्याच्या हेतूने बेळगाव येथील 'रीझ' थिएटरच्या मालकांनी एका नव्या 'रेडिओ' टॉकीजची निर्मिती केली. श्री करंदीकर सारख्या थिएटर तज्ञाच्या देखरेखीखाली इमारत बाधली. हिंदुस्थानची प्राचीन संस्कृती निदर्शक अशी चित्रे श्री. बापट आर्टिस्ट यांनी मोठया कुशलतेने काढली प्रथमच 'आपली मर्जी' या सुदाम प्रॉडक्शनच्या चित्रपटाने या टॉकिजचे उद्घाटन झाले.[२१]

५.७.३. कपील टॉकीज–

बेळगांवच्या चित्रपट रसिकांची आवड व गरज लक्षात घेऊन श्री. केशवराव नेर्लेकर व श्री प्रमोद नेर्लेकर या बंधूनी बेळगावातील रामलिंग खिंड येथे सर्व सोयीनीयुक्त अद्यावत

पध्दतीचे अलिशान थिएटर उभे केले या थिएटर मध्ये एकाच वेळी सुमारे १०६० प्रेक्षक बसू शकतील असे १० लाख रु खर्चून थिएटर बांधले. थिएटर रचनाकार श्री. आनंद करंदीकर हे होते. बेळगावच्या सौंदर्यात भर घालणारे अद्यावत भव्य सिनेमा थिएटर 'कपील' याचे उद्घाटन ११ जुलै १९७४ रोजी झाले.[२२]

चित्रपट रसिकांची आवड लक्षात घेऊन शहरात अनेक थिएटरची निर्मिती झाली. या थिएटर मध्ये बऱ्याच वेळा मराठी चित्रपटाना प्रथम प्राधान्य दिले जात असे. कारण बेळगाव शहराच्या सभोवतालची बरीचशी खेडी ही मराठी भाषिक होती व त्यांच्या मागणीनुसार मराठी चित्रपट जास्त काळ चालत असत.

कोणत्या टॉकिजवर कोणता चित्रपट आहे. याची जाहिरात तरूण भारतच्या अंकात प्रसिध्द होत असे. त्यामुळे चित्रपट रसिकाना 'तरूण भारत' या वृत्तपत्राचा उपयोग होत असे.

५.८ बेळगांवातील संगिताची परंपरा–

'तरूण भारत' या वृत्तपत्राने बेळगाव विभागातील संगित परंपरेचा मागोवा आपल्या वृत्तपत्रात नेहमी घेतला आहे. या बातमी स्वरूपात असणाऱ्या मथळ्यावरून बेळगाव शहराने संगित कलेला दिलेले योगदान पुढे येते.

दक्षिण भारतात हिंदुस्थानी संगिताची पहिली मुहूर्तमेढ रोऊन बळकट करणारे भगीरथ म्हणजे संगितातील भीष्माचार्य प. बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर, निळकंठ बुवा यांच्या गायनी प्रवाहाचे ओघ बेळगावमध्ये पोहचले. अब्दुल करीम खान साहेबांचे 'आर्य संगीत विद्यालय' बेळगावात १९१० च्या सुमाराला सुरू झाले. त्याच वेळी मराठी संगीत रंगभूमीचे सम्राट अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी बेळगाव शहराचे नाव उच्च केले. त्यांनी शास्त्रीय संगीताचा पाया रचला. पुढे पं. रामकृष्ण बुवा वझे हे नाटय संगीताचे थोर पुरस्कर्ते बनले. शिवराम बुवा लक्ष्मणराव, तानुबाई साखळकर, गंगाबाई घोसरवाडकर, गोंदुबाई कुर्डीकर, आघाडीचे गवई विलायत खाँ, श्रीमती अक्कुबाई–बाळाबाई त्याचबरोबर प. रामभाऊ कुंदगोळकर अर्थात सवाई गंधर्व हे सुध्दा दोन वर्षे बेळगावात होते. तबला वादक उ. मेहबुब खाँ, पे. नारायणराव चिकोडीनी, बाजीराव सोनवणे, बंडोपंत कुलकर्णी, विनायक नाईक, शांताराम पावसकर अशा प्रकारचे ख्यातनाम तबला वादक या मातीत जन्माला आले.

नृत्य कलेच्या बाबत नावारूपास आलेले कलाकार म्हणजे मेनका शिरोडकर, प्रो. नागराज धर्माधिकारी, हरजाल रघुनाथ मुळीक, चंपाताई वामनाचार्य, संध्या होसमनी, रविंद्र शर्मा इ. हार्मोनियम वादक पं. रामभाऊ विजापुरे, दत्तापंत चिकोडी इ. व्यक्तीनी बेळगावचे नाव रोशन केले. या कलेचा अविष्कार सर्व जनतेला पाहायला मिळाला. तो अपूर्व संगीत सोहळा! ख्यातनाम कलाकारांच्या सुरेल गायनाचा, २१, २२, २३ डिसेंबर १९५७ रोजी राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या खुल्या नाटयगृहात विविध रागदारीच्या ढंगदार गायकीने आणि वाद्यवृदांच्या मधुर लहरीनी चार दिवस बेळगाव परिसर भरुन गेला होता.[२३]

"भारतातील निरनिराळ्या भागातून या कार्यक्रमासाठी आलेल्या श्रेष्ठ कलाकारांचे ते संमेलन म्हणजे एक प्रकारे विविध घराण्यांच्या गायकीचे स्वर संमेलनच होते." हा कार्यक्रम बेळगावात संपन्न झाला. या कार्यक्रमाची सर्व हकिकत तरूण भारतच्या अंकात दिली आहे.

५.९ मराठा लाईट इन्फन्ट्री बेळगांव –

२,३ व ४ मार्च १९५९ या दिवशी बेळगाव येथील मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेन्टल सेंटरमधील आजी व माजी सैनिकांचा मेळावा घेण्यात येणार होता. या निमित्त 'तरूण भारत' या दैनिकात २० फेब्रुवारी १९५९ रोजी मराठा लाईट इन्फन्ट्रीचा इतिहास वर्तवणारा समग्रलेख दिला आहे.[२४]

भारतीय भू–सेना दलातील 'द मराठा लाईट इन्फन्ट्री' या रेजिमेंटला दोनशे पंचवीस वर्षाहून अधिक ऐतिहासिक व वैभवशाली परंपरा लाभली आहे. या रेजिमेंटची पहिली बटालियन 'जंगी पलटण या नावाने ओळखली जात होती. तिची स्थापना ऑगस्ट १७६८ मध्ये केलेली होती. पुढे त्याचे नामकरण 'सेकंड बटालियन बॉम्बे सिपाईज' असे करण्यात आले. या तुकडीकडे ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात मुंबई बेटाच्या रक्षणाचे काम देण्यात आले. इ. स. १७६९ मध्ये 'सेकंड बटालियन' ही 'काला पांचवी' या नावाने ओळखली जात होती. 'तिला थर्ड बटालियन बॉम्बे सिपाइंज' असे नाव दिले गेले. पुढील काळात या बटालियन्सची संख्या वाढत गेली. अठराव्या शतकात या बटालियने पश्चिम किनारपट्टीवर महत्त्वाची भूमिका पार पाडली, लॉर्ड वेलस्ली या बाबत म्हणतात, "या बटालियने वेळोवेळी यश संपादन करून जे पराक्रम केले, त्यांची तुलना इतर बटालियन्सशी करता येणार नाही."

'द मराठा लाइफ इन्फेन्ट्री – रेजिमेंन्टल सेंटर' या बटालियने ६ मार्च १८३२ रोजी लेफ्ट ई. एम. वुड यांच्या नेतृत्त्वाखाली अंबोली जवळचा महादेवगड जिंकण्यासाठी जे शौर्य दाखविले होते. त्यामुळे सावंतवाडीच्या खेमसावंताच्याकडून किल्ला इंग्रजाना ताब्यात घेणे शक्य झाले. अशा अनेक पराक्रमाची गाथा या लेखात दिलेली आहे. पुढे बेळगांव शहर हे डोंगर प्रदेश व मराठी भाषिक जनतेच्या सहवासात विकसित झालेले शहर या सर्व गोष्टींचा विचार करून बेळगाव येथे 'मराठा लाईट इन्फन्ट्रीचे रजिमेंटल' सेंटर कायमचे स्थापन करण्यात आले. मराठा बटालियचे सैन्य हे चपळ, काटक व जलदगतीच्या हालचाली बाबत देशात प्रसिध्द आहे. या बटालियनने पुढील काळात आपला नावलौकिक राखून ठेवला. उदा. १९७१ च्या भारत–पाक युध्दात सहाव्या मराठा लाईट इन्फन्ट्रीच्या शुट सैनिकांनी पाकिस्तान पंजाबमधील नैनाकोट या ठिकाणाचा कब्जा घेतला, त्यावेळी मेजर सदानंद बळवंत साळुंखे याचे कार्य उल्लेखनीय होते. त्यानंतर ॲडमिटल भारतीय सोमण हे नौदल अधिकारी त्याच बरोबर बेळगावची भारतीय नौसेनेत सेकंड लेफ्टनंट या पदावर असणारी मिनल मधुकर पाटील इत्यादी शूर विरांचा गाथा गाणारा लेख 'तरूण भारत' च्या अंकात दिला आहे.

५.१० वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव –

सांस्कृतिक केंद्र म्हणजे शहराचा आत्मा असतो. बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळाने अनेक साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे प्रेरक मार्गदर्शक केंद्र म्हणून भरीव स्वरूपाची कामगिरी बजावली आहे. या मंडळाच्या तेजस्वी कार्याचा आढावा 'तरूण भारत' या बातमी पत्रातून घेतलेला आहे.

वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्य अविरत करणारी 'वाङ्मय चर्चा मंडळ' ही बेळगांवातील ज्येष्ठ संख्या आहे. या संख्येचा बाबुराव ठाकुर यांच्याशी निकटचा संबंध होता. या संस्थेच्या वाटचालीत त्यांचे मोलाचे योगदान आहे.

मराठी भाषा मराठी संस्कृती यांना परिपोषक होणारी अभिरूची निर्माण करणे. मराठीच्या अभिवृध्दीसाठी भाषिक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक स्वरूपाचे विविध कार्यक्रम आयोजित करणे अणि महाराष्ट्रीयन लोकांसाठी एक साहित्य व सांस्कृतिक केंद्र निर्माण करणे हेच वाङ्मय चर्चा मंडळाने प्रमाणभूत मानलेली तत्त्वे होय. ग्रंथवाचन आणि साहित्य चर्चा करण्यासाठी डॉ. केशवराव साठे यांच्या पुढाकाराने एका व्यासपीठावर आलेली मंडळी १९२७

साली वाङ्मय चर्चा मंडळाची स्थापना केली. श्री. भु. के. दळवर, वि.आ. मुजुमदार, य. ना. लेले, बी. ए. पवार, गो. र. केतकर आणि या मंडळाचे पहिले अध्यक्ष श. वी. जोगळेकर आणि त्यांचे सहकारी या सर्वांच्या बहुमोल परिश्रमाने व वि. स. खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली १९२९ साली १४ वे भरविण्यात आले. बेळगावातील पहिले महाराष्ट्र साहित्य संमेलन 'काळ' कर्ते शि. म. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी पार पडले. या संमेलनाचे कार्याध्यक्ष नामदार दत्तोपंत बेळवी व अण्णासाहेब लठ्ठे हे स्वागताध्यक्ष होते. सुरूवातीला कन्नड–मराठी वादाचे सावट या संमेलनावर पडले होते. तरीही यशस्वीपणे हे संमेलन पार पडले.[२५]

संमेलनाचे अध्यक्ष शि. म. परांजपे यांचे संमेलनानंतर तीन महिन्यानी निधन झाले. त्यांच्या निधनाचा चटका बेळगाव वाशीयाना झोंबणारा ठरला. म्हणूनच वाङ्मय चर्चा मंडळाच्या सदस्यानी पुढील वर्षापासून या बहुपैलू प्रतिभावंताची पुण्यतिथी निष्ठेने साजरी केली जाऊ लागली. या निमित्ताने दरवर्षी वक्तृत्त्व स्पर्धा ठेवण्याचा उपक्रम हाती घेतला. संपूर्ण महाराष्ट्रातून या स्पर्धेला स्पर्धक येऊ लागले. त्यांच्या भाषणाचा सार 'तरूण भारत' ने वेळोवेळी प्रसिध्द करून मंडळाचे कार्य समाजापर्यंत पोहचविले.

इ. स. १९३३ पासून या मंडळामार्फत शारदीय व्याख्यानमाला घेण्यात आली. या व्याख्यानाचे पहिले पुष्प ३ नोव्हेंबर १९३३ रोजी सुरू झाले. या व्याख्यान मालेचा हेतू स्पष्ट करताना श्री अभ्यंकर वकिल यांनी 'नागरिकत्व–हक्क व कर्तव्ये' या विषयाचा उलगडा करून दिला. श्री. बेळवी व्याख्यान मालेबाबत बोलताना म्हणतात, "बेळगावात विद्वान, सुशिक्षित लोक असूनही गेल्या ४० वर्षात अशा प्रकारची व्याख्यानमाला झाल्या नाहीत." ही खंत त्यांनी बोलून दाखवली. या व्याख्यान मालेतील पहिल्या व्याख्यानाच्या प्रस्तावनेत ब. लठ्ठे हे 'नागरिक–हक्क व कर्तव्य' या विषयाची संकल्पना स्पष्ट केली. या व्याख्यानमालेच्या साहयाने बेळगाव वाशियांना समाजातील अनेक थोर व्यक्तींची साहित्यिकांची, वैचारिक मेजवानी उपलब्ध करून दिली. या कार्यामुळे बेळगावच्या सांस्कृतिक व सामाजिक जडघडणीत मंडळाचे योगदान उल्लेखनीय आहे.[२६]

५.११ वसंत व्याख्यानमाला–

इ. स. १९३४ पासुन वसंत व्याख्यानमाला सुरू करण्यात आली त्याच वर्षी लोकप्रियतेचा उच्चांक गाठलेले नटसम्राट बालगंधर्व यांचा मंडळाने मानपत्र देऊन सत्कार केला.

अण्णासाहेब किर्लोस्करांचा पन्नासावा स्मृतिदिन १९३५ मध्ये त्यांच्या गुर्लहोसूर या जन्मगावी साजरा करण्यात आला. तसेच बेळगाव येथे सुप्रसिध्द नाटककार भा. वि. वरेकर यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसांचा आनंद सोहळा आयोजित करून 'नाटय, काव्य व संगित आणि वक्तृत्त्व यांचा मिलाफ हृदय संगम झाला. १९३६ मध्ये बेळगांवातील नाटककार श्री भाऊसाहेब सोमण तथा 'कीरात' व श्री. कृ. ह. दीक्षित तसेच आखिल भारतीय किर्तीचे गायक श्री रामकृष्णबुवा वझे यांचा सत्कार डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आला. २६ एप्रिल १९३८ च्या वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटक गु. अण्णासाहेब कर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी अध्यक्ष श्री गंगाधरराव देशपांडे हे होते. 'खेडे गावातील शिक्षण योजना' हा विषय कर्वेना देण्यात आला होता. तसेच ३० एप्रिल १९३८ रोजी कॉ. लालजी पेंडसे यांचे 'अधुनिक वाङ्.मयामधील विचार–प्रवाह' या विषयावर व्याख्यान झाले.

अशा प्रकारे विद्वतापूर्ण व्यक्तीची भाषणे वसंत व्याख्यानमालेमार्फत आयोजित करून बेळगाव नागरिकांना ज्ञान विज्ञान व वाङ्मयाची भूक भागवली. जे विषय व्याख्यानांमार्फत मांडले जात. त्या विषयाचा सारांश दुसऱ्या दिवशी 'तरूण भारत' च्या अंकात दिला जात असे.

इ. स. १९४४ पासून काही नविन उत्साही मंडळी आणि जुने कार्यकर्ते यांच्या संगनमतातून काही नविन उपक्रम या मंडळाने हाती घेतले व बंद पडलेली वसंत व्याख्यानमाला परत नव्या जोमाने सुरू करण्यात आली. इ. स. १९४५ मध्ये मंडळाने नाटय शताब्दी महोत्सव साजरा केला. सतत आठ दिवस चालू असलेल्या नाटय महोत्सवात बेळगाव व बेळगाव बाहेरील अनेक नाटय मंडळीनी नाटके सादर केली. त्याचबरोबर नृत्य, गायन व वादन असे अनेक कार्यक्रमाची रेलचेल या दिवशी आयोजित केली. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष रावबहादूर वामनराव तथा आबासाहेब देसाई, उद्घाटक नटसम्राट बालगंधर्व आणि अध्यक्ष सांगलीचे राजेसाहेब श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन इ. मान्यवरांचा सहभाग होता. महोत्सवाचे चिटणीस श्री. रा. स्वा. नाईक, र. कृ. वझे हे होते.[२७]

इ. स. १९४६ मध्ये बेळगावातील दुसरे महाराष्ट्र साहित्य संमेलन मंडळाच्या पुढाकाराने भरले. म. सा. प. चे त्यावेळचे अध्यक्ष म. म.दत्तो वामन पोतदार आणि संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्य. माडखोलकर यांच्या समर्थ नेतृत्वाखाली हे संमेलन यशस्वी झाले. 'संयुक्त महाराष्ट्राचा पहिला ठराव' या संमेलनात मंजूर झाला. त्यामुळे हे संमेलन सर्वत्र गाजले, या संमेलनाचे

कार्याध्यक्ष श्री. द. ल. मांजरेकर प्रा. स.रा. भट, श्री. खेमाजीराव गोडसे, श्री. बा. म. गोगटे, श्री लिमये यशवंत लेले, कोवाडकर, बाबुराव ठाकुर व साठे अशा बऱ्याच कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन हे संमेलन बेळगावकरांच्या चिरकाळ स्मरणात राहील असे यशस्वी केले.

१ मे १९५० रोजी सकाळी ९ वाजता प्रा.ना. सी. फडके यांच्या हस्ते वसंत व्याख्यानमालेचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यावेळी फडके यांनी 'ललित साहित्याचे प्रयोजन' या विषयावर व्याख्यान दिले. "सहृदयी माणसे असतील तरच साहित्याचा विकास होईल", 'भावना उचंबळून येणाऱ्या आनंदावर जगले पाहिजे', "प्रचार हे ललित साहित्याचे उपांग असून रस हा त्याचा गाभा आहे.", "कवी अगर कादंबरीकार क्रांतीचा कारक होत नाही; तर क्रांतिचा उपकारक होतो." "कादंबऱ्या प्रचारावर जगत नसून, प्रसादावर जगतात." दुसऱ्या दिवशी नाशिकचे प्राध्यापक व्ही. बी. आठवले यांचे 'श्रीकृष्णाची द्वारका' या विषयावर व्याख्यान झाले. 'सत्यम शिव सुंदरम' याचे समीकरण म्हणजे कला होय. साने गुरूजी यांचे सातवे व्याख्यान झाले.[२८]

१९५४ मध्ये मंडळाचा रौप्यमहोत्सव हा मंडळाच्या नव्या इमारतीमधील सभागृहात साजरा झाला. या महोत्सवाचे प्रमुख पाहुणे आचार्य प्र. के. अत्रे होते. यावेळी मामा वरेकरांचे 'सारस्वत' नाटक स्थानिक कलाकारांनी सादर केले. १९६८ मध्ये गोगटे ढालीचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. या समारंभाचे उद्‌घाटक प्रसिध्द कादंबरीकर वि. स. खांडेकर होते. तीन दिवसांच्या या समारंभात नामवंत टिकाकार प्रा. वा. ल. कुलकर्णी प्रतिभावंत कवी प्रा. पु. शि. रेगे आणि नाटयभिनय कुशल सौ. सुहासिनी मुळगावकर या वक्त्यांची व्याख्याने झाली. या प्रसंगी 'प्रेमा तुझा रंग कसा' हा नाटय प्रयोग स्थानिक मंडळाने सादर केला. तसेच हे मंडळ साहित्यिकांचे जन्मशताब्दी महोत्सव ज्या ज्या वेळी साजरे करीत असे. त्यावेळी सुप्रसिध्द साहित्यिकांच्या व्याख्यानाची मेजवानी बेळगाव वाशियाना मिळत असे. अशा भाषणाचा सार 'तरूण भारत' दुसऱ्या दिवशीच्या अंकात प्रसिध्द करून वैचारिक व सांस्कृतिक बैठकीची पेरणी ते या भागात करत तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'तुकाराम व रामदास' या संताची थोरवी कशात आहे?' हे भाषण तर १५ जुलै १९६८ नटसम्राट बालगंधर्व यांची पहिली पुण्यतिथी साजरी केली. यावेळी अध्यक्षस्थानी कोल्हापूरचे सुप्रसिध्द संगीत समीक्षक श्री. बाबुराव जोशी हे होते. या प्रसंगी प्रा. वसंत कानेटकर, रणजित देसाई, बाबुराव

जोशी यांची भाषणे झाली. "बालगंधर्वानी मराठी रंगभूमीवर कलेचा स्वर्ग उभा केला. त्यांनी नाटय सृष्टीला दिलेल्या अभिजात संगीताची जोपासना झाली पाहिजे. आजच्या कलावंतानी बालगंधर्वाचे कलेविषयीचे इमान डोळयापुढे ठेवणे अवश्य आहे." अशा शब्दात मान्यवरानी बालगंधर्वांच्या स्मृतिदिनी उद्‌गार काढले.[२९]

"स्त्री हा भारताचा मानबिंदू आहे. कारण पावित्र्य व मातृत्त्व हे स्त्रीचे दोन गुण महत्त्वाचे आहेत. आणि पवित्र शील ही भारतीय स्त्रीची अत्यंत मोठी ठेव आहे. कारण स्त्री ही क्षणाची पत्नी असली तरी अनंत काळाची माता आहे. भारतीय नारी ही मातृत्त्वासाठी जगते. तेव्हा आपली पवित्र अशी सुसंस्कृती, स्वधर्म टिकवून व जोपासून स्वराष्ट्राचे उत्तम घटक, अशी आपली संतती बनविते हे प्रत्येक भारतीय स्त्रीचे श्रेष्ठ व आद्य कर्तव्य आहे." असे उद्‌गार श्रीमती लक्ष्मीबाई केळकर (संस्थापिका राष्ट्र सेविका समिती) यानी ३० मार्च १९७५ रोजी वाङ्‌मय चर्चा मंडळाच्या हॉलमध्ये काढले.

१९७६ साली मंडळाने आपला सुवर्ण महोत्सव थाटात साजरा केला. तसेच १९७८ मध्ये 'रमाबाई जोशी' सभागृहाचा विस्तार करण्यात आला. इ.स. १९७७ पासुन याच सभागृहात 'गोगटे ज्ञान सत्र' व्याख्यानमाला सुरू करण्यात आली. या वर्षीची पहिली तीन व्याख्याने सुप्रसिध्द विचारवंत व साहित्य समीक्षक प्रा. गं. बा. सरदार यांनी दिली.

वाङ्‌मय चर्चा मंडळाचे कार्य ग्रंथालय, वाचनालय व वक्तृत्त्व, काव्य गायन, नाटय, निबंध, गीता पठण अशा स्पर्धा, साहित्यिकांची विविध विषयावरील व्याख्याने साहित्य पुरस्कार अशी प्रसिध्द साहित्यिकांचा गौरव या सर्व कार्यात मंडळाचे सभासद बेळगावचे नागरिक व पत्रकार यांच्याच बळावर मंडळाचे कार्य यशस्वी पुढे चालू आहे. या मंडळाच्या कार्यामुळे बेळगावच्या सांस्कृतिक जडण घडणीत फार मोलाचा वाटा आहे हे विसरून चालणार नाही. या मंडळाचे कार्य खेडोपाडी तळागळापर्यंत पोहचवण्याचे महान कार्य 'तरूण भारत' या वृत्तपत्राने केले हे त्यांच्या बातमी पत्रातून स्पष्ट होते.

५.१२ मराठी पत्रकार परिषदेचे १० वे अधिवेशन–

मराठी परिषदेचे १० वे अधिवेशन बेळगाव येथे १०, ११ फेब्रुवारी १९५० रोजी राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या प्रांगणात भरले होते. परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून बाबुराव ठाकुर हे होते. तर आचार्य अत्रे हे परिषदेच्या अध्यक्षपदी होते. या अधिवेशनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील

अनेक ख्यातनाम पत्रकारांचे बेळगावात आगमन झाले होते.

अधिवेशनाला १० फेब्रुवारी या दिवशी प्रारंभ झाला. स्वागताध्यक्ष या नात्याने बाबुराव ठाकुर यांचे भाषण झाले. त्यामध्ये त्यांनी बेळगावच्या प्राचीन इतिहासाचे समालोचन केले, त्यानंतर बेळगावातील गेल्या पाऊण शतकातील वृत्तपत्रीय व साहित्यिक परंपरेचा आढावा घेतला. त्याच बरोबर बेळगाव व मराठी परिसर हा महाराष्ट्राचा भाग असल्याचे विविध पुराव्याच्या अधारे श्रोत्याना पटवून देऊन वृत्तपत्र व्यवसाया बद्दलची आपली स्वतःची भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली. ही भूमिका मांडताना ते म्हणतात "पत्रकार हे जनतेचे मार्गदर्शक आहेत आणि वृत्तपत्रे ही लोकमत बनविण्याची प्रभावी साधने आहेत. लोकांची न्याय गाऱ्हाणी वेशीवर टांगून ती दूर करण्याचे काम वृत्तपत्रांना करावे लागते. जेथे सामाजिक, आर्थिक व धार्मिक अन्याय होत असेल, तेथे या अन्यायाविरूध्द निर्भयपणे झगडा देण्यासाठी वृत्तपत्रांना कंबर कसावी लागते. राज्यकर्ते आपल्या कर्तव्यापासून दूर होत असतील, तर त्यांना मार्गावर आणण्याचे काम वृत्तपत्रांना करावे लागते. त्याचप्रमाणे सामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्कावर जेव्हा गदा येते, तेव्हा त्यांचे रक्षण करण्यासाठी पत्रकारालाच पुढे सरसावे लागते." पुढे म्हणतात "वृत्तपत्र व्यवसाय पाश्चात्य देशाप्रमाणे येथेही भांडवलदारांच्या हातातील एक मोठा धंदा होऊ लागला आहे. त्यामुळे पत्रकारांना दिवसेंदिवस आपली स्वतःचे ध्येय बाजूला ठेऊन भांडवलदाराच्या हातातील कळसूत्री बाहुली बनणे भाग पडू लागले आहे. परिणामी या व्यवसायाला दिवसेदिवस धंदवाईक कंपनीचे स्वरूप येऊ लागले आहे. अशा अवघड परिस्थितीतही पत्रकाराने आपल्या व्यवसायाचे पावित्र्य अबाधित राखणे जरूर आहे."

परिषदेचे उद्घाटक या नात्याने दे. भ. गंगाधररावजी देशपांडे यांचे भाषण झाले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष आचार्य अत्रे यांनी आपले अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले. "वृत्तपत्र हे जनजागृतीचे आणि क्रांतीचे एक बलाढय साधन आहे. हीच गोष्ट आजपर्यंतच्या मराठी वृत्तपत्रानी दाखवून दिलेली आहे. त्यागाची पराक्रमाची तेजस्वी पंरपरा पुढे चालविण्यासाठी कडव्या ध्येयवादी पत्रकाराची आज महाराष्ट्राला अतिशय जरूरी आहे. पत्र व्यवसाय हा जरी धंदा असला तरी पत्रकाराची वृत्ती हा मात्र एक महान धर्म आहे. धंद्याला धर्माचे स्वरूप द्यावे पण धर्माचा मात्र धंदा करू नये. क्रांतीचा जयजयकार करणे हाच पत्रकाराचा खरा धर्म आहे," या अधिवेशनात अत्रे व बाबुराव ठाकुर यांची भाषणे फार प्रभावी ठरली.[३०]

हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी बाबुराव ठाकुर डॉ. गोशी कोवाडकर, शंकरराव गोंगळेकर, श्री. बा. रं. सुंठणकर इ. अनेकानी परिश्रम घेतले. या परिषदेचे स्वागताध्यक्ष एक पत्रकार आणि एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून बाबुराव विषयी आचार्य अत्रे यानी काढलेले उद्‌गार, "स्वागताध्यक्ष श्री. बाबुराव ठाकुर हे बेळगावचे एक निष्ठावंत कार्यकर्ते असून स्वतःचा गाजावाजा न करता सतत काहीना काही तरी समाजाचे कार्य करीत रहावयाचे हा त्यांचा बाणा आहे."

कोल्हापूर येथे मराठी पत्रकार परिषदेचे १२ वे अधिवेशन २९ मार्च १९५२ रोजी भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून मुंबईच्या नवशक्ती दैनिकाचे संपादक श्री. प्रभाकर पाध्ये हे होते 'वैचारिक विकास हेच वृत्तपत्र व्यवसायाचे वैभव व यश! पत्र व्यवसायास ध्येय वाढाचे अधिष्ठात हवे?'[३१]

५.१३ जळगावच्या पत्रकार परिषदेचे अध्यक्ष बाबुराव ठाकुर –

१९५० साली भरलेल्या बेळगांव पत्रकार परिषदेचे स्वागताध्यक्षपद मिळाले परंतु १९६५ च्या जळगावच्या मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष म्हणून बाबुराव ठाकुरांची निवड होऊन फार मोठा गौरव करणारी घटना म्हणून पाहिले जाते. मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल बेळगावातील पत्रकार व हितचिंतकांनी २१ फेब्रवारी १९६५ रोजी बाबुरावांचा सत्कार केला. यावेळी बाबुरावानी बोलताना म्हणतात, "ज्या ज्या वेळी माझा सत्कार करण्याची कल्पना पुढे आली, त्यावेळी नकार दिलेला आहे. सत्कार करून घेण्यास फक्त असामान्य मोठी माणसेच पात्र असतात. मी स्वतःला तसा मोठा समजत नाही. सामान्यात मिसळावे व सामान्यातच रहावे यातच मला आनंद आहे. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अशा विविध क्षेत्रात कार्य करीत असतांना ज्या टिकाणी जुलूम अत्याचार वाटला, तेथे ती साधन म्हणून वृत्तपत्राचा उपयोग केला आहे."

मराठी पत्रकार परिषदेचे अठरावे अधिवेशन जळगाव येथे १३ व १४ मार्च १९६५ असे दोन दिवस चालले होते. या अधिवेशनाच्या उद्‌घाटनासाठी त्यावेळच्या केंद्रीय नभोवाणी व माहिती खात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी या उपस्थित होत्या. स्वागताध्यक्षपदी जळगावचे पत्रकार श्री ब्रिजलाल पाटील हे होते. परिषदेच्या व्यासपीठावरून बोलणाऱ्या प्रत्येक वक्त्याच्या भाषणात महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख येत होता. ज्यावेळी श्रीमती इंदिरा गांधीजी

भाषण करण्यासाठी उभ्या राहतात. बेळगाव–कारवार गोमंतकाचे महाराष्ट्र विलिनीकरण झाले पाहिजे. अशा घोषणानी वातावरण दुमदुमून गेले त्या म्हणाल्या, "महाराष्ट्राने मागितलेल्या सर्व गोष्टी त्याला मिळत गेल्या असा इतिहास आहे. तुमच्या भावना मला समजल्या." या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर बाबुराव ठाकुर यांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणांत मुख्यत्वे करून सीमा भागावर झालेल्या अन्यायाचा कडाडून निषेध केला. तसेच पत्रकारासंबंधी बोलतांना 'स्वतंत्र बाण्याचे नैष्ठिक पत्रकार ही महाराष्ट्राची परंपरा असून ती पत्रकारानी कटाक्षाने जपली पाहिजे असे त्यांनी सांगितले.' शासनाचे उपेक्षेचे धोरण व त्यांच्या वरील वाढती बंधने यांचाही परामर्ष या भाषणात घेतला.[३२]

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे २६ वे अधिवेशन बेळगाव येथील आचार्य अत्रे नगरातील बाबुराव ठाकुर सभागृहात ९ जुन १९७९ रोजी भरले अधिवेशनाचे उद्घाटन त्यावेळचे केंद्रीय रसायन आणि पेट्रोलियम मंत्री श्री. एच. एन बहुगुणा यांच्या हस्ते झाले. त्यावेळी बाबुराव ठाकुर यांच्या आठवणीचा परिणाम प्रत्येकानी आपल्या भाषणातून व्यक्त केला होता. अशा प्रकारे बेळगांवच्या पत्रकारितेच्या क्षेत्रात बाबुरावांचे महत्त्वाचे योगदान होते

५.१४ वृत्तपत्र क्षेत्रातील गौरव –

१९५० च्या मराठी पत्रकार परिषदेत स्वागताध्यक्ष हे पद देऊन बाबुरावांचा सन्मान केला. त्यानंतर २६ ऑक्टोंबर १९५५ रोजी सांगली येथे 'दक्षिण महाराष्ट्र' या साप्ताहिकाचा रौप्य महोत्सव साजरा झाला. त्यावेळी बाबुराव ठाकुर हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी त्यांनी आपल्या भाषणात वृत्तपत्र व्यवसाया संबंधीचे मौलिक विचार मांडले. "जिल्हापत्रे हा जिल्हयांतील घडामोडींचा आरसा आहे. वृत्तपत्राचे संपादकत्व हा एक उदात्त व्यवसाय आहे, एक पवित्र पेशा आहे. परंतु अलीकडे या व्यसायाला बाजारी स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. हा एक मोठा धोका आहे." अशा शब्दात पत्रकारांचा धर्म व व्यवसाय यात चूक न करता पत्रकारितेचे महत्त्व सर्वाना पटऊन दिले. १ जानेवारी १९५७ रोजी पुणे येथे 'दै. सकाळ' चा रौप्यमहोत्सव समारंभ साजरा झाला. त्यावेळी बाबुराव ठाकुरच्या यशस्वी पत्रकारिता कार्याचा गौरव करून येथोचीत सन्मान केला. मुबंई मराठी पत्रकार बहुमान बाबुरावांना बहाल करून त्यांच्या या कार्याचे कौतुक केले. त्यावेळचे मुंबई पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. चं. वि. बावडेकर

हे म्हणतात,"बेळगाव–निपाणी–कारवारच्या सीमा प्रदेशाचा लढा जिवंत ठेवण्याचे फार मोठे श्रेय बाबुरावाना दिले पाहिजे." या सत्काराला उत्तर देताना बाबुराव ठाकुर यांनी वृत्तपत्र व्यवसायातील अडचणी व सरकारची धोरणे याबाबत चर्चा केली. यानंतर भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत 'तरूण भारता'ने केलेल्या कार्याचा आढावा घेतला.

बाबुरावाची पत्रकारिता व संपादक कार्याची खरी पोच मिळाली. ती जळगावच्या पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडीने व त्यांच्या कार्याचे सार्थक झाले. या त्यांना मिळालेल्या समाजाच्या उर्जेतूनच दिवसेंदिवस त्यांनी 'तरूण भारत'ची सचोटीने प्रगती साधली बऱ्याचशा चढ उतारानंतर ५ जुलै १९६६ रोजी 'तरूण भारत' अर्ध साप्ताहिक होता. त्याचे दैनिकात रुपांतर झाले.[३३]

५.१५ तरूण भारताचा रौप्यमहोत्सव –

'तरूण भारत' च्या आणि पर्यायाने बाबुराव ठाकुर यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा दिवस म्हणजे ८ जानेवारी १९५४ रोजी साजरा झालेला 'तरूण भारताचा' रौप्यमहोत्सवी होय. पंचवीस वर्षापूर्वीच्या आपल्या ध्येय धोरणांना आणि विचाराना उजाळा मिळावा. तसेच त्यावेळच्या विचारांचे सिंहावलोकन कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले. अशा या समारंभाला प्रमुख पाहुणे व अध्यक्ष म्हणून काकासाहेब गाडगीळ हे लाभले होते. हा कार्यक्रम वनिता विद्यालयाच्या प्रशस्त हॉलमध्ये झाला, यावेळी बेळगाव नागरिकांच्या वतीने व व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे बाबुरावांचा गौरव करण्यात आला. तसेच तरूण भारताशी संबंधित असलेल्या अनेकांची यावेळी भाषणेही झाली. श्री. जयदेवराव कुलकर्णी म्हणाले, "१९२८ ते १९५४ या काळात तरूण भारताचा उत्कर्ष कसा होत गेला हे मी स्वतः पाहिले आहे. या उत्कर्षाला इतर अनेक गोष्टी बरोबरच श्री. बाबुरावांचा क्रियाशील स्वभाव कारणीभूत आहे. पत्र लेखनाचे पहिले धडे मी तरूण भारतातच गिरविले आहेत." श्री. बा. कृ. गलगली यांनी सहसंपादक या नात्याने कार्याचा आढावा घेतला. श्री. पुंडलीकजी म्हणाले, "१९२८ पासूनच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या सर्व फाईल्स चाळल्या नंतर असे दिसते की, सर्व राष्ट्रीय चळवळीत 'तरूण भारतने' हिरीरीने भाग घेतला आहे." श्री. जीवनराव याळगी श्री. बा. रं. सुंठणकर, श्री. गो. म. वाटवे, गंगाधरराव देशपांडेनी यावेळी भाषण करून तरूण भारताच्या कार्याचा आढावा घेतला.

श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'श्री. ठाकुर हे एक धडाडीचे, लढाऊ वृत्तीचे पत्रकार आहेत.' असे गौरवोद्‌गार काढले. बाबुराव ठाकुर यांनी कृतज्ञता व्यक्त करणारे व आभार प्रदर्शनाचे जे छोटेसे भाषण केले. त्यामुळे भावनेने भारावले होते. 'या प्रेमाच्या ओझ्याखाली मी इतका दबून गेलो आहे की मला अधिक कांही बोलवतच नाही. हा गौरव व्यक्तिशः माझा नसून 'तरूण भारत' चा आहे. तसेच ज्या अनेक ज्ञात व अज्ञात कार्यकर्त्यांचे श्रम याकामी मला सहाय्यभूत झाले. याचाही या गौरवात महत्त्वाचा भाग आहे.'

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर 'तरूण भारत' या वृत्तपत्राला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अभिनंदन पर संदेशावरून वृत्तपत्राची माहिती स्पष्ट होते. बेळगावच्या वृत्तपत्रीय क्षेत्रात 'तरूण भारत' चा मान व महत्त्व लोकांच्या प्रतिसादामुळे समजून येते.[३४]

५.१६ दिवंगतांच्या आठवणीचा वेध–

बेळगावच्या जडण–घडणीमध्ये ज्या थोर व्यक्तीनी योगदान दिले. त्यांच्या महान कर्तृत्वाने जनमानसात स्थान मिळविले अशा व्यक्तीच्या मृत्युनंतर श्रध्दांजलीच्या रूपाने तिचे पुनर्मुल्यमापन करण्यातून समोरच्या पिढीला त्या व्यक्तीच्या कार्याचा आदर्श समोर ठेवण्यासाठी म्हणून कांही व्यक्तीचे समग्र लेख देऊन बेळगावच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय बदलात व्यक्तीचे योगदान सांगणारे लेख 'तरूण भारत' या वृत्तपत्रात प्रसिध्द केले आहेत.

५.१६.१ रमाबाई ठाकुर –

मंगळवार १६ नोव्हेंबर १९३७ रोजी रात्री ८ वाजता रक्त दाबाच्या विकाराने निधन झाले. निधनानंतर बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' मध्ये निधन लेख दिला आहे. "मातोश्री अक्का हिच्या निधनांने परमावधीचे दुःख होत आहे. गरीबाच्या दुःखाशी समरस होण्यात तिला आनंद वाटत असे. आपल्या साध्या वृत्तीमुळे व मन मोकळेपणामुळे तिने अनेक कुटुंबाना आपलेसे केले होते. तिच्या निधनाने जुन्या पिढीतील प्रेमळ व अत्यंत श्रध्दाळू अंत:करणास आम्ही अंतरलो आहोत. स्वतःच्या मनाचे सांत्वन व्हावे, म्हणून दुःखी अंतःकरणाने मी हे चार शब्द लिहिले आहे." अशा शब्दात त्यांनी आपल्या मातेविषयी भावना व्यक्त केल्या आहेत.

५.१६.२ राजाराम गोपाळ ठाकुर–

२ जानेवारी १९४७ रोजी रात्री ९ वाजता बाबुराव ठाकुर यांच्या वडीलांचा मृत्यू झाला. त्यांनी आपल्या वडीलांच्या स्मृति जागवणारा लेख दिला आहे. "प्रत्येकाच्या आयुष्यात माता व पिता यांचा वियोग होणे, ही एक मोठी दैवी आपत्ती असते. ही हानी कशानेही भरून न येण्यासारखी असते. आई गेली की ममता जाते व पिता गेला की आधार जातो. माझ्या वडिलांच्या सहानुभूतीमुळे त्यांच्या आधारामुळेच मला सार्वजनिक कामात निश्चितपणे भाग घेता आला."[३५]

५.१६.३ यशवंत राजाराम ठाकुर –

बाबुराव ठाकुरचे लहान बंधू यशवंत यांचा सोमवार १९ जानेवारी १९४८ रोजी मिरज येथे निधन झाले. मृत्यूसमयी ते ४६ वर्षाचे होते. सार्वजनिक कार्य करीत असताना ज्या ज्यावेळी संकटाशी तोंड देण्याचा प्रसंग माझ्यावर आला त्यावेळी माझा बंधू माझा खरा पाठीराखा होता. आपल्या वकीलीच्या धंद्यात लोकांकडून पैसे उकळण्याकडे याची कधीच प्रवृत्ती नव्हती.

५.१६.४ डॉक्टरांच्या प्रेमळ स्मृतीस माझे अश्रुसिंचन!–

डॉ. हेरेकर यांचे आकस्मित निधन २७ जानेवारी १९४९ रोजी बेळगाव येथे झाले.[३६] राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या आवारात अग्नी संस्कार करण्यात आले. त्यांच्या प्रेत यात्रेला प्रचंड जनसमुदाय होता. यावरून त्यांची लोकप्रियता किती होती कल्पना येते. उपस्थित मान्यवरांची भाषणे झाली. त्या भाषणांचा आढावा दुसऱ्या दिवशीच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्रात दिला आहे. गंगाधराव देशपांडे, बाबुराव ठाकुर, शामराव देसाई श्री बी. के. दळवी इत्यादी अनेक व्यक्तीनी डॉक्टरांच्या कार्याचा गौरव केला. बेळगावातील सार्वजनिक हितासाठी कायम आघाडीवर असणारे बेळगावचे आधुनिक शिल्पकार या नात्याने त्यांच्या बद्दल गौरव उद्‌गार काढले.

बाबुराव ठाकुर म्हणतात, "नामांकित डॉक्टर, राणी पार्वतीदेवी कॉलेज स्थापनेत महत्त्वाचा वाटा असणारे त्याच बरोबर बेळगावातील प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालये, अनेक सार्वजनिक संस्था, शाळाना सढळ हातानी हजारो रुपयाची मदत करणारा सामाजिक कार्याला वाहून घेऊन कार्य करणारा बेळगाव शहराचा आश्रयदाता हरपला." अशा भावनिक वातावरणात

जवळच्या स्नेही मित्राच्या कार्याचा उलगडा बाबुरावानी करून दिला.

५.१६.५ गोविंदराव याळगी स्मृतिदिन–

२६ सप्टेंबर १९३३ च्या अकांत श्री. दामोदर विश्वनाथ गोखले (पुणे) यांचा गोविंदराव याळगी यांच्या स्मृतिदिनी लेख प्रसिध्द करून बेळगाव विभागातील पहिले स्वातंत्र्य सैनिक असा उल्लेख केला आहे. प्रत्येक लोक कल्याणाच्या चळवळीत अग्रेसर असणारे, सतत वीस वर्षे जनतेची निरलस सेवा करणाऱ्या निःस्वार्थी धाडसी व प्रेमळ लोक सेवकांचा दशवार्षिक स्मृति दिनांच्या निमित्त त्यांच्या कार्याचा गौरव, या लेखात केला आहे.

महाराष्ट्र साहित्याचे एकनिष्ठ उपासक, मराठी नाटय वाङ्मयातील युग प्रवर्तक, विनोदी लेखाचे प्रणेते, मार्मिक टीकाकार आणि चतु:रस्त्र कल्पनावादी लेखक श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे १ जुन १९३४ रोजी एरंडवणे येथे वयाच्या ६३ वर्षी निधन झाले. त्यांच्या कार्याचा मागोवा घेणारा लेख प्रसिध्दी केला आहे. 'त्यांच्या निधनाने मराठीचे नुकसान किती अपरिमित झाले हे होतकरू लेखक जाणतील आणि त्यांच्या स्मृति समाधीवर अखंड अश्रुचा अंजली समर्पण करतील' अशा शब्दात श्रध्दांजली लेख दिला आहे.[३७]

५.१६.६ दे. भ. शिवराम कोप्पल –

१० फेब्रुवारी १९३५ रोजी हल्ल्याळ येथे त्यांचे आकस्मिकपणे निधन झाले. त्यांच्या मृत्युने बेळगाव जिल्हयातील एकनिष्ठ असा काँग्रेसचा सेवक व 'तरूण भारत' चा जिवलग स्नेही नाहीसा झाला. लोकमान्यांची होमरूल चळवळ किंवा म. गांधींच्या असहकारात असो या राष्ट्रीय चळवळीत पुढाकार घेऊन या भागाचे नेतृत्त्व केले. त्यांना चार वेळा तुरूंगवास पत्करावा लागला. त्याचबरोबर काँग्रेस रोड खटल्यात ते आघाडीवर होते. बेळगांवच्या सर्व नागरिकांनी त्यांच्या विषयी दोन अश्रु ढाळावेत, इतकी त्यांची योग्यता होती हे आम्ही जाणतो!''[३८]

५.१६.७ सौ. गीताबाई हेरेकर यांचे शोचनीय निधन! –

सुप्रसिध्द डॉक्टर गोविंद वामन हेरेकर यांच्या पत्नी गीताबाई यांचे २३ ऑगस्ट १९३६ रोजी सकाळी ९.३० वाजता निधन झाले. बेळगावच्या सार्वजनिक जीवनात गीताबाई यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. 'कोणत्याही राजकीय व्यासपीठावर न जाता समाजाचे हित साधणाऱ्या नि:स्वार्थी समाजकर्त्या होत्या. बेळगाव येथील महिला विद्यालय, जि.

प्राथमिक शिक्षण समिती मराठी ट्रेनिंग कॉलेज, चिंतामणराव हायस्कूल, लिंगराज कॉलेज, सरस्वती वाचन मंदिर इ. शैक्षणिक संस्थाच्या विकासात व वाटचालीत महत्त्वाचा सहभाग होता. सढळ हाताने मोठया देणग्या कांही संस्थाना त्यांनी बहाल केल्या आहेत.' अशा मातेच्या आश्रयाला संस्था पोरक्या झाल्या.[३९]

५.१६.८ श्री अण्णासाहेब लठ्ठे यांच्या प्रेमळ स्मृतीस–

श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन मंगळवार १६ मे १९५० रोजी सकाळी साडेसात वाजता झाले. 'त्यांच्या निधनाने मुंबई राज्यातील एक मोठा विद्वान व कर्तबगार पुढारी नाहीसा झाला.' या शब्दात बाबुराव ठाकुर यांनी श्रध्दाजली वाहिली आहे. १९ मे १९५० रोजीच्या 'तरूण भारत'च्या अग्रलेखात श्री अण्णासाहेब यांच्या प्रेमळ स्मृतीस माझे अश्रू सिंचन!' या शीर्षकाखाली लेख दिला आहे.[४०] डॉ. हेरेकर यांच्या निधनानंतर अवघ्या सोळा महिन्याच्या आत अण्णासाहेबांचा परलोकवास व्हावा. हा बेळगावच्या सार्वजनिक जीवनास बसलेला जबरदस्त धक्का आहे. श्री अण्णासाहेबांशी बाबुरावांचा निकटचा संबंध होता. सन १९३३ साली त्यांची प्रथम ओळख झाली. त्यानंतर अनेक बऱ्या वाईट गोष्टीवर त्यांच्या सखोल चर्चा होत राहील्या, अण्णासाहेबाना न्या. म. रानडे यांच्या विषयी नितांत आदर होता तसेच त्यांना टिळक व गांधीचे राजकारण पसंत नव्हते.

'श्री. गंगाधरराव देशपांडे व श्री अण्णासाहेब लठ्ठे हे राजकारणातील एके काळचे कट्टे विरोधक परंतु असेंब्लीच्या निवडणूकीमध्ये दोघांचे संबंध जवळचे आले व गैरसमज व पूर्वग्रह दुर झाले व दोघे निकटचे स्नेही बनले.' पुढे १९३६ च्या ऑगस्टच्या पहिल्या तारखेला लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीच्या दिवशी श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बेळगांव येथील जाहीर सभेत श्री अण्णासाहेब यांनी काँग्रेसच्या ध्येय धोरणास मान्यता देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यानंतर १९३७ साली मुंबई विधिमंडळाच्या झालेल्या निवडणूकीत अण्णासाहेब प्रचंड बहुमताने निवडून आले आणि मुंबई विधिमंडळात त्यांच्याकडे फडणविशी सोपविण्यात आली. त्यावेळी पुर्वानुभवामुळे कारभार सुरळीत केला. त्यानी लिहिलेले 'शाहु चरित्र' संस्थानी राजकारणातील ग्रंथ व 'माझ्या विलायतच्या प्रवासाच्या आठवणी' ही पुस्तके लोकांच्या परिचयाची झाली. संस्थानी राजकारणाचा अभ्यास व अनुभव यांना मोठा होता. अनेक संस्थानिक त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांच्याकडे वारंवार येत. ते बुध्दिवादी होते.

भावनावश होऊन कोणतीही गोष्ट करणे त्यांना पसंत नसे. लोकमताचा कल ओळखून वागण्याची मुत्सद्देगिरी त्यांच्यात नव्हती त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. कोल्हापूरचा संबंध सुटल्यानंतर ते बेळगावात आले. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग असे. राणी पार्वती देवी कॉलेजची जबाबदारी शेवटपर्यंत सांभाळली.

शेवटी या लेखात बाबुराव म्हणतात,"श्री. अण्णासाहेबांच्या अलिकडील जीवनामधील अनेक चढउतार पहाण्याचे प्रसंग मजवर आले. त्यामुळे त्यांच्या अंतर्बाहय जीवनाचा मला चांगलाच परिचय घडला. अण्णासाहेब तुमच्या अनेक वर्षाच्या प्रेमळ शेजाराला सुख-दुःखाच्या संवादाला, मित्रत्त्वाच्या सल्ल्याला आता मी पोरका ठरलो. तुमच्यातील तो साधेपणा ती निगर्वी वृत्ती आणि मजविषयी तुमच्या अंतःकरणात बसत असलेली स्निग्धता आता मला कोठे दिसणार? माता-पितांच्या वियोगाचे दुःख मजवर कोसळले, त्यावेळी तुमच्या प्रेमळ सहानुभूतीचा मला कितीतरी आधार वाटला. डॉ. हेरेकरांच्या निधनानंतर आपला परलोकवास इतक्या लवकर व्हावा ही घटना किती दुःखद आहे! आण्णासाहेब, तुमच्या पवित्र स्मृतीस माझे वंदन असो!" बाबुरावांनी भावनिक आंतरीचा लेख देऊन अण्णासाहेबांविषयी असणारा स्नेह जिव्हाळा स्पष्ट होतो.[४१]

५.१६.९ श्री गंगाधरराव देशपांडे –

भारताच्या स्वातत्र्य युध्दातील लोकमान्य टिळक व म. गांधी यांचे निष्ठावंत अनुयायी, कर्नाटकाचे सिंह काँग्रेसचे वयोवृध्द नेते दे. भ.गंगाधरराव देशपांडे यांचे शनिवार ३० जुलै १९६० रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास अकस्मित निधन झाले.[४२]

बाबुराव ठाकुरांचे स्नेही निकटवर्तीचा दुःखद अंत हा बेळगाव जनतेला चटका लाऊन जाणारा ठरला. त्यांच्या मृत्युनंतर पं. नेहरू डॉ. राजेंद्र प्रसाद, ना. चव्हाण, राज्यपाल श्री. प्रकाश आदि नेत्यांनी वाहिली आदरांजली त्यांच्या मृत्यूनंतर 'तरूण भारत' मध्ये संपादकीय लेख प्रसिध्द करून त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाच्या इतिहासाला उजाळा दिला आहे.

गंगाधर देशपांडे यांनी १९०५ च्या वंगभंग चळवळीपासून ते भारतास स्वातंत्र्य मिळेपर्यत जेव्हा राष्ट्रीय आंदोलने झाली. त्यावेळी काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ सेवक म्हणून सक्रिय सहभागी होते. लोकमान्य टिळकांनी गणपती व शिवजयंती उत्सव सार्वजनिक रितीने साजरे करून त्या निमित्ताने आपल्या जनतेला राष्ट्रीय चळवळीत ओढून घेण्याचा प्रयत्न केला. १९०६ मध्ये

लोकमान्य टिळकांच्या उपस्थितीत देशपांडे यांनी रविवार पेठेतील आणि शहापूर येथील सार्वजनिक गणपती उत्सवाची सुरूवात करून लोकमान्य टिळकांचे भाषण ठेवले व बेळगाव जनतेला राजकीय विचार करण्यास प्रवृत्त केले.

सुरत काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी टिळकांना राष्ट्रीय चतुःसुत्रीच्या ठरावाचे समर्थन करावयाचे होते. परंतु नेमस्ताने हे घडू दिले नाही. टिळक ज्यावेळी व्यासपीठावर बोलण्यास उभे राहीले त्यावेळी त्यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या व टिळकांना बोलू दिले नाही. हा प्रतिपक्षाचा डाव हाणून पाडण्यासाठी म्हणून काँग्रेसचे अधिवेशन बंद पाडले. या सर्व प्रकरणात टिळकांच्या बाजूने देशपांडे हे उभा राहीले. तेव्हापासून देशपांडे हे काँग्रेस पक्षात चर्चेला आले. ज्यावेळी लोकमान्य टिळकांना तुरूंगात जाणे भाग पडले तेव्हा केसरीतील लेखन थांबले त्यावेळी स्वतः गंगाधररावानी खास 'केसरी' साठी लेखन केले. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय जागृतिसाठी 'राष्ट्रमत' दैनिक नावाचे वृत्तपत्र काढून इग्रंजांच्या कार्यपद्धतीवर विरोध दर्शविला आहे. असा राष्ट्रीय कार्याचा चढता आलेख वाढत असताना कालकुंद्री खुन खटल्यात त्यांना गुंतवले व ७ महिन्याचा तुरूंगवास भोगावा लागला. पुढे ते निर्दोष सुटले.

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर काही वर्षाने महात्मा गांधीनी राष्ट्रीय चळवळीची सुत्रे हाती घेतली. गंगाधररावाना महात्मा गांधी मार्ग आवढला व ताबडतोब त्यांनी महात्मा गांधीजीचे नेतत्त्व स्वीकारले. १९२१ ते १९२४ हा काळ राजकीय दृष्टया अत्यंत धामधुमीचा होता. महात्मा गांधीजींचे असहकार आंदोलन सर्व देशभर पसरले. त्यावेळी कर्नाटक इलाख्याचे नेतृत्त्व गंगाधरराव देशपांडे यांच्याकडे होते. १९२४ साली बेळगांव येथे महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन गंगाधर देशपांडेच्या पुढाकाराखाली भरले. यावेळी देशातील अनेक काँग्रेसपुढारी बेळगावात काँग्रेस कमिटीने केली होती. यावेळी बाबुराव ठाकुर यांचाही सहभाग महत्त्वाचा होता. १९३४ मध्ये बेळगांव जिल्हयातील हरिजनोद्धाराच्या चळवळी उभा करुन गंगाधरराव कर्नाटकाच्या खेडोपाडी संचारले. सन १९३२ ने १९४२ पर्यंतच्या सार्वजनिक आंदोलनात देशपांडे यांनी स्वतःच्या नेतृत्त्वाखाली कर्नाटकाचे नेतृत्त्व केले. महात्मा गांधीजीनी तर बेळगावपासून म्हैसूरपर्यंत आपल्या चळवळीचे लोण पोहोचविण्याची जबाबदारी गंगाधररावांच्यावर सोपविली होती.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर गंगाधररावानी राजकारणातून अंग काढून घेतले. अशा या महान राष्ट्रवीरांची मात्र उपेक्षा झाली. स्वांतत्र्योतर काळामध्ये अनेक थोर पुढाऱ्यांचा गौरव झाला. पण ज्याने आपल्या हयातीतील पन्नासाहून अधिक वर्षे केवळ राष्ट्रीय राजकारणासाठी दिली. अशा गंगाधररावाची काँग्रेसने उपेक्षा केली. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांचा राजकीय संदेश खेडोपाडी पोहचवून गंगाधररावाविषयी जी कृतज्ञता दाखवावयास पाहिजे होती ती दाखविली नाही. गंगाधररावांचा ८१ वा वाढदिवस बेळगाव, पुणे मुंबई येथे ५१ साली मोठया थाटात साजरा झाला. पुणे येथे पक्षातर्फे त्यांचा गौरव करण्यात आला.

गंगाधररावांचे राजकीय जीवन सफल झाले असले तरी भाषिक वादामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा परिणाम त्यांच्या मनावर अखेरच्या दिवसात झाल्याशिवाय राहिला नाही. या वादातील त्यांच्या भूमिकेमुळे सीमा भागातील मराठी भाषिक त्यांच्यावर रुष्ट होते. हे जरी खरे असले तरी भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास पालटताना गंगाधरराव देशपांडेच्या कार्याचा आढावा घेतल्या शिवाय इतिहास पूर्ण होणार नाही.[४३]

५.१६.१० राजमाता राणी पार्वतीदेवी भोसले यांचे निधन–

सावंतवाडीच्या राजमाता राणी पार्वतीदेवी भोसले यांचे ६ ऑगस्ट १९६१ रोजी सकाळी ६ वाजता हिडलगा येथे हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने वयाच्या ५८ व्या वर्षी निधन झाले. राणीसाहेबांचा विवाह सन १९२१ साली बापूसाहेब खेमसावंत भोसले यांच्याशी झाला होता. त्या मुळच्या बडोदा गायकवाड घराण्यातील होत्या. बापुसाहेब भोसले यांचे १९३६ मध्ये निधन झाले. तेव्हापासून १९४७ पर्यंत राणी पार्वतीदेवी हीने रीजंट म्हणून सावंतवाडी संस्थानाचा राजकारभार चालविला. १९४७ मध्ये श्री. शिवरामराजे गादीवर आले. पुढे १९४८ मध्ये संस्थानाचे विलिनीकरण झाले. विलिनीकरणानंतर राणी बेळगांव येथेच वास्तव करून होत्या. १९५९ च्या सावंतवाडी मतदार संघातून मुंबई विधान सभेवर निवडून आल्या होत्या. या राणीसाहेबानी बेळगावचा सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी फार मोठे मोलाचे योगदान दिले आहे. हे 'तरूण भारत' च्या बातम्या वरून स्पष्ट होते.[४४]

५.१६.१२ आचार्य अत्रे यांचे निधन –

विख्यात मराठा नाटककार आणि दै. 'मराठा' चे संपादक प्र. के अत्रे यांचे १३ जून १९६९ रोजी रात्री ११.३० वाजता निधन झाले त्यांच्या मृत्युनंतर बेळगाव शोक सभा व तेथील

भाषण व दुसऱ्या दिवशीच्या अंकात अल्प परिचय करून देणारा लेख दिला आहे. तर १५ जूनच्या संपादकीय लेखात 'सीमा भागासाठी अखंड झुंज देणारा प्रभावी नेता हरपला' या लेखात त्यांचे बेळगाव व सीमा भाग यासाठीचे योगदान व त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत या साहित्यिकांचा महत्वपूर्ण सहभाग होता. या बाबतची चर्चा केली आहे. आपल्या आठवणीतील अत्रे' या लेखात अत्रेच्या सहवासातील आठवणी बाबुरावानी नोंदवल्या आहेत.

बेळगाव–निपाणी–कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. या मराठी जनतेच्या मागणीसाठी ज्यांनी आपली वाणी व लेखणी एखाद्या तळपत्या तलवारी सारखी वापरली. त्या 'मराठीकार' अत्र्याचे निधन ही सीमा भागाच्या चळवळीची मोठी हाती झाली. 'आचार्याच्या निधनांने संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा जणू बुरूजच ढासळला.' अशा शब्दात बाबुरावांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अत्र्याचे व बाबुराव ठाकुरांच्या आणि 'तरूण भारत' च संबध जिव्हाळ्याचे होते.[४५]

५.१६.१३ बॅ. नाथ पै यांचे निधन –

१७ जानेवारी १९७१ या दिवशी बेळगांव येथील युनियन जिमखान्यावरील हुतात्मा दिनाच्या सभेतील प्रमुख पाहुणे या नात्याने बॅ. नाथ पै यांचे सांयकाळी जाहीर भाषण झाले. बाबुराव ठाकुर हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. त्या भाषणांत त्यांनी आपल्या मनातील सीमा प्रश्नाबाबतच्या व्यथा मोकळेपणाने व्यक्त केली. हे त्यांचे भाषण अखेरचे ठरले. कारण त्याच रात्री डॉ. याळगी यांच्या निवासस्थानी बॅं. नाथ पै यांचे हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. "नाथांच्या निधनाने सीमा भागाला तारणहार हरपला. सीमा भाग पोरका झाला!" सीमेचा प्रश्न सोडविण्यासाठी व्यक्तिशः बॅं. नाथ पै यानी जेवढे प्रयत्न केले. तेवढे अन्य कोणीही केले नाही, असे बाबुराव ठाकुर हे मान्य करतात.[४६]

बेळगावच्या विकासाच्या प्रक्रियेत अनेक व्यक्तीनी सहभाग घेतला. सांस्कृतिक दृष्ट्या शहराची ओळख निर्माण करून देणारेही भरपूर कलाप्रेमी व्यासंगी नावारूपाला आले. त्याच बरोबर सामाजिक सुधारणेच्या व जनजागृतीच्या सर्व अंगाना स्पर्श करणारी व राजकीय, सामाजिक धार्मिक व शैक्षणिक आणि सांस्कृतिक समतेचा संदेश देऊन सर्वांगीण समतेचा विचार करणारी मंडळी बेळगाव शहराच्या सानिध्यात वाढली. अशा कांही विभूतिंच्या कार्याची

थोडक्यात चर्चा केली आहे.

५.१७ सुभाष फोटो स्टुडिओ–

बेळगाव या शहरात बऱ्याच वर्षापूर्वीपासुन नावारूपाला असलेला बेळगावच्या वैभवात भर घालणारा एक कलेचा आविष्कार म्हणजे सुभाष फोटो स्टुडिओ होय. ३१ जानेवारी १९७५ हा प्रथमवर्धापन दिनी दिलेला लेख.[४७]

ओऊळकर बंधुंचा 'सुभाष फोटो स्टुडिओ' यामुळे कांही महत्त्वाच्या शहरात बेळगावचा समावेश होतो ते नाव घेतले जाते ते सुभाष फोटो स्टुडिओ, शंकराव ओऊळकर यांनी १९३५ साली या स्टुडिओची स्थापना केली. पण स्टुडिओची भरभराट झाली. ते श्री बहिर्जी ओऊळकर यांच्या काळात गोवा मुक्तीच्या वेळी धोका पत्करून भारत सरकारांपर्यत चित्रफिती पुरवण्याचे काम या स्टोडिओने केले आहे. त्यांच्या कार्याबाबत भारत सरकार व गोवा राज्याने त्यांचा येतोचीत गौरव केला आहे. पहिल्या वर्धापन दिनानिमित्त शिवसृष्टी प्रदर्शनातील 'वेडात मराठे वीर दौडले सात' या चित्राची भव्य प्रतिकृती मांडण्यात आली होती. सर्वांना जाहीर निमंत्रण देण्यात आले. या लेखात या स्टुडिओच्या निर्मितीपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा वेध घेतलेला आहे. या फोटो स्टुडिओचा भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती चळवळ व संयुक्त महाराष्ट्राच्या वाटचलीत असणारा सहभाग वर्णन केला आहे.

५.१८ महाराष्ट्राचे साहित्य संमेलन–

१७ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन कोल्हापूरात उत्सवात भरले. श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे अध्यक्ष व श्री राजाराम महाराज स्वागताध्यक्ष होते. असे या लेखात संपादक म्हणतात. 'या एकूण लेखामध्ये कोल्हापुरच्या साहित्य संमेलनाबाबत संपादकांचा नाराजीचा सूर पुढे येतो. 'टिकाऊ साहित्यसेवा ही द्रव्य लेकांने कधी होत नाही. तीला अंतरीचा उजाळा लागतो.'[४८]

श्री. दत्तो वामन पोतदार हे अहमदनगरच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून भाषण केले या भाषणाचा सविस्तर वृत्तात १ एप्रिल १९३९ अंकात आले आहे. 'मराठी भाषा विकसीत करण्यासाठी चांगल्या विचारांची व विद्वतेची जोड पाहिजे, साहित्य हे नेहमी दोन प्रवांहानी वाहत असते. एक लौकिक व दुसरा शास्त्रीय शास्त्र एकदम कधी निर्माण होत नाही. शेकडो निरीक्षण व अनुभवातून लागते तरच संत्यात उतरते.' उच्च शिक्षणातून

साहित्य संपदेच्या अभ्यासाठी वृद्धी होणे गरजेची आहे. यासाठी विद्यापीठांची निर्मिती होणे आवश्यक आहे.[४९]

मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन ३, ४ व ५ मे १९५२ रोजी मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये बेळगावच्या श्रींमती इंदिरा संत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्यावेळी श्रीमंती संत यांनी केलेल्या भाषणात म्हणतात, 'कविता लेखनाला परिस्थिती आड येत नाही, मनाला ओढ असली तर कविता लिहावीशी वाटते.'

५.१९ बेळगांवची साहित्य पंरपरा –

बेळगाव नगरीचे साहित्यिक सास्कृतिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कर्तृत्त्व फार मोठे आहे. मराठी वाड्.मयाच्या आणि भाषेच्या घडणीमध्ये बेळगावने आरंभापासून भरीव असे योगदान आहे. अशा काही साहित्यिकांनी आपल्या साहित्य कृतीतून बेळगाव शहराला जो लौकिक मिळऊन दिला. अशा मोजक्याच साहित्यिकांची दखल 'तरूण भारत' या वृत्तपत्राने घेऊन त्या साहित्यिक योगदानाची आणि कार्याची चर्चा करून बातमी व लेख रूपात जनमानसात पोहचविण्याचे कार्य केले आहे. अशा काही साहित्यिकांच्या साहित्याचा थोडक्यात वेध घेतला आहे.

५.१९.१. बाबा पद्मनजी –

मराठी साहित्यात प्रथम उल्लेख करावे असे नाव म्हणजे बाबा पद्मनजी होत. मराठी साहित्यात सामाजिक विचार मंथनात, ख्रिस्ती धर्मोपदेश आणि ग्रंथनिर्मिती करण्यात विविध अंगानी कार्य करणारे होते. त्यांचा जन्म १८३१ मध्ये बेळगाव येथे झाला. बेळगांवच्या मिशन स्कूलमध्ये ते शिकले. तेथील शिक्षणातून त्यांच्या मनावर ख्रिस्ती धर्माचा पगडा बसला. पुढे त्यांनी ख्रिस्त धर्म स्विकारला.

बाबा पद्मनजी यानी लिहिलेल्या प्रमुख ग्रंथाचा उल्लेख स्त्री विद्याभ्यास–निबंध, व्यक्ति निषेधक बोध, यमुना पर्यटन कादंबरी ही मराठीतील स्वतंत्र सामाजिक कादंबरी आहे. शब्द रत्नावली, महाराष्ट्र देशाचा इतिहास, अरूणोदय या आत्मचरित्रातून आपल्या तत्कालीन बेळगाव सहवासाचे दर्शन घडवले आहे. याच बरोबर उदयप्रभा कुटुंबमित्र इ. नियतकालिके त्यांनी चालविली. अशा महान साहित्यिकाचा मृत्यू मुंबई येथे १८९२ झाला.

५.१९.२ रामचंद्र भिकाजी गुंजीकर –

बेळगावचे जुन्या काळातील नामवंत आणि विद्वान लेखक म्हणून ज्यांचा मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील लेखक रामचंद्र भिकाजी गुंजीकर होत. त्यांचा जन्म बेळगावपासून जवळच जांबोटी गावी ३० एप्रिल १८४३ रोजी झाला. त्यांनी लेखन केलेली ग्रंथ–संपदा 'विविधज्ञान विस्तार' हे मासिक सुरू करून त्यांनी भाषा विषयक संशोधन, व्याकरणाची रचना आणि ललित वाङ्मयाची जोडणी त्यांनी केली. मराठी व्याकरण विषयक चौफेर विचार मांडले. 'मोचनगड' ही ऐतिहासिक स्वरूपाची कादंबरी लिहून शिवकालातील सामाजिक पार्श्वभूमी रंगविली आहे. बऱ्याच इंग्रजी व कन्नड, संस्कृत भाषेतील साहित्याचे मराठीत भाषांतर केले आहे.[५०]

'कन्नड परिज्ञान' हे कानडी भाषा शिकविणारे पुस्तक लिहून कानडी भाषा मराठीमधून शिकवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. १८ जून १९०१ रोजी त्यांचे निधन झाले. रामचंद्र गुंजीकर हे भाषाशास्त्रज्ञ, व्याकरणकार, जाणकार संपादक, ललित लेखक, ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून मराठीत वाङ्.मयाच्या इतिहासात प्रसिध्द आहे.

५.१९.३ आण्णासाहेब किर्लोस्कर –

मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म बेळगावपासून जवळच गुर्लहोसूर येथे ३१ मार्च १८४३ साली झाला. 'शांकर दिग्विजय' हे गद्य नाटक त्यांनी लिहीले. तसेच कालिदासांच्या 'अभिज्ञान शाकुंतला' या नाटकाचे भाषांतर केले. तसेच त्यांनी 'किर्लोस्कर' नाटक मंडळीची स्थापना केली. 'संगीत सौभद्र' हे नाटक लिहिले 'रामराज्यवियोग' हे नाटक फार लोकप्रिय ठरले. अशा नाटककारांचा मृत्य गुर्लहोसूर गावी २ नोव्हेंबर १८८५ रोजी झाला.[५१]

५.१९.४ आचार्य काकासाहेब कालेलकर –

बेळगावपासून १० किलोमीटर अंतरावरील बेळगुंदी या गावचे असून ते महात्मा गांधीचे कट्टर अनुयायी होते. १९१७ साली गुजरातमधील गांधीजीच्या साबरमती आश्रमात राहून गुजराथीतच त्यांनी विपूल लेखन केले. गांधीवादी गुजराथी साहित्यिक म्हणूनच ते ओळखले जाते. त्यानी शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य केले. गुजराथी भाषेत बऱ्याच देशांची प्रवास वर्णन लिहिली आहेत. मराठीतही अशी खास काही पुस्तके आहेत. 'हिंडलग्याचा प्रसाद', 'वनशोभा'

'खेळकर पाने' इ. काकासाहेबांची राष्ट्रपतीनी राज्यसभेवर नियुक्ती केली होती. (१९५२–१९५८) त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून केंद्र सरकारने त्यांना १९६४ साली पद्मविभूषण हा किताब दिला. तर १९६६ मध्ये 'जीवन व्यवस्था' या निबंध संग्रहास साहित्य अकादमीच्या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले.

बेळगावात मध्यंतरीच्या काळात महत्त्वाचे लेखक म्हणून दत्तोपंत सडेकर, पुंडलीकलजी कातगडे, स. र. सुंठणकर तर बा. रं. सुंठणकर, यांचे मराठी संत मंडळांचे ऐतिहासिक कार्य हे पुस्तक कॉ. नारायणराव सोहोनी यांचे 'बंदिवान' 'जीवन छाया', 'हिंदवी क्रांतीचा संदेश' अशी पुस्तके त्यानी लिहिली.

५.१९.५ इंदिरा संत –

इंदिरा संत या मराठी साहित्यातील एक श्रेष्ठ भाव कवयित्री म्हणून प्रसिध्द होत्या. सहवास शेला, मेंदी, गर्भ रेशीम, रंग बावरी, चित्रकला इ. काव्यसंग्रहानी समृध्द असलेले त्यांचे हे काव्यभांडार बेळगावच्या सांस्कृतिक ठेवाव्यात भूषण आहे.

५.१९.६ कृ. बा. मराठे –

हे बेळगावचे एक अभ्यास संशोधक लेखक होते. त्यांच्या 'बालकवी' या चरित्रपर आणि समीक्षणात्मक ग्रंथाला महाराष्ट्र सरकारचे पारितोषिक मिळाले आहे. महाराष्ट्राचे लाडके साहित्यिक पु. ल. देशपांडे हे बेळगाव येथे काही वर्षे राणी पार्वतीदेवी कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक होते. 'व्यक्ती आणि वल्ली' मधील 'रावसाहेब' आणि 'वाऱ्यावरची वरात' मधील कानडी मिश्रित हेलपूर्वक मराठी बोलणारे लोक अशा बेळगावी वातावरणाचे पु. ल. च्या साहित्यात येणारे चित्रण हे पु. ल. च्या बेळगावातील वास्तवाचे लाभलेले रंग होते. पु. ल. चे मुळ गाव बेळगाव जवळील चंदगड तालुक्यातील जंगमहट्टी हे होय.

बेळगांवच्या साहित्य क्षितिजावर आपल्या लेखन कार्याने प्रसिध्दीला आलेले नव्या पिढीतील तारे यामध्ये शंकर रामाणी, श्री अनंत मनोहर हे मराठी वाङ्मय प्रांतातील आघाडीचे साहित्यिक त्यांची कर्मभूमी बेळगाव त्यांनी एकूण ३५ कादंबऱ्या प्रसिध्द केल्या होत्या. त्यांनी 'तरूण भारत' या वृत्तपत्रात सदर लेखन केले. 'राब' य कादंबरीला महाराष्ट्र राज्य पुरस्कार भारतीय नभोनाटय लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. नामवंत साहित्यिकांच्या रांगेत झळकणारे ही व्यक्ती आहे.

५.१९.७ कॉ. कृष्णा मेणसे –

एक व्यासंगी लेखक, पत्रकार आणि प्रभावी वक्ता हे मराठी साहित्य जगतातील कम्युनिष्ट चळवळीतील नेते कृष्णा मेणसे परिक्रमा गोठलेली धरती, पेटलेली मने, तोडल्या बेडया, हो–ची–मिन्ह यांचे चरित्र, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे चरित्र (कन्नड), बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, श्री. बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर, गुरूवर्य शामराव देसाई व्यक्ती आणि कार्य, इराक–अमेरिका युध्द कशासाठी? असा आहे गोवा, असे अनेक ग्रंथ व पुस्तके त्यांनी लिहिली त्यांच्या अनेक पुस्तकाला कर्नाटक, महाराष्ट्र शासनाने पुरस्कार दिले आहेत. अशा हा नामवंत साहित्यिक व चरित्रकार यांची 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सविस्तर समिक्षक म्हणून दखल घेतली आहे. मेणसेंचे अनेक लेख 'तरूण भारत' मध्ये प्रसिध्दी झाले आहेत.

५.१९.८ श्री. मो. ग. कुंटे –

बेळगावचा प्रसिध्द साहित्यिक, नाटककार, इतिहासकार व प्रवचनकार म्हणून श्री कुंटे परिचित आहेत.

५.१९.९ रणजित देसाई –

२० मे १९६९ रोजी 'स्वामी' कार श्री रणजित देसाई यांच्या बेळगाव येथील प्रकाश टॉकीज येथे नागरिकांच्या तर्फे सत्कार आयेजित करण्यात आला. त्या निमित्ताने प्रसिध्द साहित्यिकांचा परिचय करून देणार लेख १८ मे १९६९ रोजीच्या अंकात छापलेली आहे.

चंदगड तालुक्यातील कोवाड हे त्यांचे मुळगाव त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ मध्ये झाला. त्याचे बालपण व शिक्षण हे कोल्हापूर येथे झाले. विद्यार्थी दशेतच असताना किर्लोस्कर यांच्या मासिकात प्रसिध्द झाल्या. पहिल्या लघुकथेचे नाव होते 'भैरव' त्यानंतर मधुमती, कणव, जाण, कातळ, मेघ, आषाढ, संकेत असे एकूण सोळा कथासंग्रह प्रसिध्द झाले. त्याच बरोबर 'बारी' ही पहिली कादंबरी माझा गाव, समिधा, राधेय इ. कादंबऱ्यानी जनमाणसात अधिराज गाजवले. त्यानंतर त्यांनी 'स्वामी', 'श्रीमानयोगी', राधेय' पावनखिंड, लक्ष्यवेध तर नाटय प्रकारामध्ये हे बंध रेशमाचे, गरूड झेप, कांचनमृग, वारसा, पंख झाले वैरी' लोकनायक तानसेन, रामशास्त्री, तुझी वाट वेगळी, श्रीमान योगी व पांगुळगाडा अशी चौदा नाटके प्रसिध्द झाली. 'स्वामी' या कांदबरीला १८६४ चे ॲकॅडमी अवॉर्ड मिळाले. राष्ट्रपतीच्या हस्ते

सुवर्णपदक बहाल करण्यात आले. अशा प्रसिध्द साहित्यिकाचा बेळगाव नगरीमार्फत सत्कार ठेवण्यात आला होता. या सत्काराला उत्तर देताना त्यांचे भाषणही झाले. ते म्हणतात "रामदासांना गालबोट लावण्याने शिवाजीचा मोठेपणा वाढणार नाही! कोठे हे आकाशातील दैदिप्यमान तारे आणि कोठे त्यांची उंची मोजणारे हे क्षुद्र जीव."[५२] रणजित देसाई यांची साहित्य क्षेत्रातील थोरवी सांगणारा लेख दिला आहे 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सुरूवातीपासूनची अशा साहित्यिकाना प्रसिध्दी मिळवून देण्यासाठी व समाजात त्यांची साहित्य उंची पोहचवण्यासाठी प्रयत्न केले.

५.१९.१० श्रीमती माधवी देसाई –

'नाच ग घुमा' या पुस्तकाने एक वेगळी दिशा देणाऱ्या थोर लेखिका तर सायली, चकवा आणि घर माणसांचे हे त्यांचे तीन कवितासंग्रह मंजिरी, प्रार्थना, हरवलेल्या वाटा या प्रसिध्द कादंबऱ्या सागर, कथा सावलीची इत्यादी कथासंग्रह अशा प्रसिध्द झाले होते. या लेखिका रणजित देसाई यांच्या पत्नी होत्या.

श्री. गो. मे. दळवी, डॉ. बा. पु. गिंडे, प्रा. सुभाष सुंठणकर प्रा. मधुसुदन गोखले, प्रा. एल. आर. चोगुले, डॉ. भिमराव गस्ती, प्रा. माधुरी शानभाग, प्रा. सध्या देशंपाडे, डॉ. रमा मराठे असे अनेक प्रसिध्द साहित्यिक बेळगावच्या मातीत रुजले. यांच्या कला साहित्य अविष्कारातून या विभागातील जनमाणसावर चांगले संस्कार झाले. या विभूतिंच्या चिकित्सक संशोधक, परखड वक्ते आणि श्रेष्ठ चरित्रकार या सर्व मिलाफातून समाजावर चांगले सुसंस्कृत संस्कार लाभले, म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

समारोप–

बेळगावच्या विकासाच्या प्रक्रियेत अनेक व्यक्तीनी सहभाग घेतला. सांस्कृतिक दृष्ट्या शहराची ओळख निर्माण करून देणारेही भरपूर कलाप्रेमी व्यासंगी नावारूपाला आले. त्याचबरोबर सामाजिक सुधारणेच्या व जनजागृतीच्या सर्व अंगाना स्पर्श करणारी व राजकीय, सामाजिक धार्मिक व शैक्षणिक आणि सांस्कृतिक समतेचा संदेश देऊन सर्वांगीण समतेचा विचार करणारी सुध्दा बेळगाव शहराच्या सानिध्यात वाढली. अशा कांही विभूतिंच्या कार्याची चर्चा केली आहे. बेळगाव या नगरीचे साहित्यिक सास्कृतिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कर्तृत्त्व फार मोठे आहे. मराठी वाङ्मयाच्या आणि भाषेच्या घडणीमध्ये बेळगावने आरंभापासून

भरीव असे योगदान दिलेले आहे. अशा काही साहित्यिकांनी आपल्या साहित्य कृतीतून बेळगाव शहराला जो लौकिक मिळवून दिला. अशा कांही मोजक्याच साहित्यिकांचे दखल 'तरूण भारत' या वृत्तपत्राने घेऊन त्या साहित्यिक योगदानाची आणि त्याच्या कार्याची चर्चा करून बातमी व लेख रूपात जनमानसात त्याच्या साहित्याचा गाभा पोहाचण्याचे कार्य या वृत्तपत्राने केले आहे. अशा थोर साहित्यिकांचा गुणगौरव करणारे लेख देऊन आपल्या मातीतील लेखन शैलीला पुढे आणले आहे.

सांस्कृतिक केंद्र म्हणजे शहराचा आत्मा असतो. बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळाने अनेक साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे प्रेरक मार्गदर्शक केंद्र म्हणून आजपर्यत भरीव स्वरूपाची कामगिरी बजावली आहे. या मंडळाच्या तेजस्वी कार्याचा आढावा 'तरूण भारत' या बातमी पत्रातून घेतलेला आहे. वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्य अविरत करणारी 'वाङ्मय चर्चा मंडळ' बेळगांवातील ज्येष्ठ संख्या आहे. या संख्येचा बाबुराव ठाकुर यांच्याशी निकटचा संबंध होता. या संस्थेच्या वाटचालीत त्यांचे मोलाचे योगदान आहे.

वाङ्मय चर्चा मंडळाचे कार्य ग्रंथालय, वाचनालय व वक्तृत्त्व, काव्य गायन, नाटय, खेळ, निबंध, गीता पठण अशा स्पर्धा, साहित्यिकांची विविध विषयावरील व्याख्याने साहित्य पुरस्कार अशी प्रसिध्द साहित्यिकांचा गौरव या सर्व कार्यात मंडळाचे सभासद बेळगावचे नागरिक व पत्रकार यांच्याच बळावर मंडळाचे कार्य यशस्वी पुढे चालू आहे. या मंडळाच्या कार्यामुळे बेळगावच्या सांस्कृतिक जडण घडणीत फार मोलाचा वाटा आहे हे विसरून चालणार नाही. या मंडळाचे कार्य खेडोपाडी तळागळापर्यंत पोहचवण्याचे महान कार्य 'तरूण भारत' या वृत्तपत्राने केले हे त्यांच्या बातमी पत्रातून स्पष्ट होते.

बाबुरावानी समाजाच्या उन्नतीसाठी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जडणघडणीत सांस्कृतिक दृष्टीकोन ठेवून समाजाचे हित साध्य करण्याचे प्रयत्न केले व आपल्या वृत्तपत्रात अशा बातम्याना अग्रस्थान दिले आहे.

संदर्भ

१) डॉ. वाड विजया (संपादक), मराठी विश्वकोश, खंड १८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई, २००९, पृ.५४४

२) अर्ध साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ८ जुलै १९५२, पृ. २

३) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, २५ जुन १९३५,पृ. २

४) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत' बेळगाव, १२ जोनवारी १९५१, पृ. २

५) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, एप्रिल १९२१, पृ. १०८

६) मासिक, 'तरूण भारत' बेळगाव, जुलै १९२१, पृ. ३२

७) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत'बेळगाव, २६ जानेवारी १९६१, पृ. २

८) दै. 'तरूण भारत' बेळगाव, २८ सप्टेंबर १९६८, पृ. २

९) साप्ताहिक, 'तरूण भारत' ११ फेब्रुवारी १९३६ ,पृ. २

१०) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' २० मे १९४५, पृ. २

११) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' २९ एप्रिल १९५२, पृ. २

१२) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' ३ डिसेंबर १९५७, पृ. ३

१३) दै. 'तरूण भारत' ३ जानेवारी १९७०, पृ. १

१४) दै. 'तरूण भारत' २९ एप्रिल १९७१, पृ. २

१५) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १३ ऑगस्ट १९५७, पृ.२

१६) दै. 'तरूण भारत' २३ ऑक्टोंबर १९८०, पृ. २

१७) दै. 'तरूण भारत' १४ जुलै १९७४, पृ. २

१८) साप्ताहिक, 'तरूण भारत' २४ डिसेंबर १९३५, पृ. २

१९) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १५ मे १९५१, पृ. २

२०) साप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, दि.२८.२.१९३२, पृ.३

२१) साप्ताहिक, 'तरूण भारत' २३ जानेवारी १९४७, पृ. २

२२) दै.'तरूण भारत', २२ ऑक्टोंबर १९७६, पृ.२

२३) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' २७ डिसंबर १९५७, पृ. १,२

२४) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' २० फेब्रूवारी १९५९, पृ. ४

२५) साप्ताहिक, 'तरूण भारत' ७ नोव्हेंबर १९३३, पृ. २

२६) साप्ताहिक, 'तरूण भारत' कित्ता, पृ. ३

२७) साप्ताहिक, 'तरूण भारत' ३० जानेवारी १९४५, पृ. ५

२८) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १६ मे १९५०,पृ. ३

२९) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १७ जुलै १९६८, पृ. २

३०) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' बेळगाव, ११ फेब्रुवारी १९५०, पृ. २

३१) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत' १ एप्रिल १९५२, पृ. २

३२) दै. 'तरूण भारत' बेळगाव, १७ मार्च १९६५, पृ. २,४

३३) दै. 'तरूण भारत' बेळगाव, ५ जुलै १९६६, पृ. १

३४) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', १२ जानेवारी १९५४, पृ. २

३५) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', ७ जानेवारी १९४९, पृ. १

३६) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', २८ जानेवारी १९४९, पृ. १,४

३७) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', ५ जून १९३४, पृ. ४

३८) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', १९ फेब्रुवारी १९३५, पृ. ५

३९) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', २६ जानेवारी १९५०, पृ. २, ४

४०) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', १९ मे १९५०, पृ. २

४१) कित्ता, पृ.४

४२) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', २ आगस्ट १९६०, पृ. १

४३) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', २ ऑगस्ट १९६०, पृ. २

४४) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', ८ ऑगस्ट १९६१, पृ. १

४५) दै. 'तरूण भारत', बेळगाव, १४ जुन १९६९, पृ. ११

४६) दै. 'तरूण भारत', बेळगाव, १९ जानेवारी १९७१, पृ. १

४७) दै. 'तरूण भारत', बेळगाव, ३१ जानेवारी १९७५, पृ. ११

४८) साप्ताहिक, 'तरूण भारत', बेळगाव, ३ जानेवारी १९३३, पृ. ४

४९) साप्ताहिक, 'तरूण भारत', बेळगाव, ११ एप्रिल १९३९, पृ. १२

५०) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', १८ जुन १९५१, पृ. ४

५१) अर्धसाप्ताहिक, 'तरूण भारत', २ नोव्हेंबर १९४३, पृ. २

५२) दै 'तरूण भारत', बेळगांव, २२ मे १९६९, पृ. ४

प्रकरण सहावे

उपसंहार

आजचे युग माहितीचे युग आहे. प्रत्येकाला दैनंदिन जीवनात माहितीची गरज असते. ही माहिती मौखिक किंवा लिखीत स्वरूपात एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला मिळत असते. प्राप्त माहितीचा उपयोग केल्यानंतर जे ज्ञान प्राप्त होते. ते नवीन माहितीच्या स्वरूपात असते.

माहितीच्या युगात प्रसार माध्यमांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. जगभरातील महत्त्वाच्या घटना या माध्यमातून कांही मिनिटातच जगातील कानाकोपऱ्यापर्यंत पाहोचविल्या जातात. जलद माहिती पोहोचवण्याचे काम इलेक्ट्रॉनिक माध्यमे करीत असली तरी लोकांचे विश्वासू माध्यम म्हणून प्रिंट मिडियाचे महत्त्व सर्वाधिक आहे. प्रिंट मिडियामध्ये वृत्तपत्रांचे स्थान महत्त्वाचे आहे.

जॉर्ज बर्नाड शॉ यांनी वृत्तपत्रांना 'गरिबांचे विद्यापीठ' म्हटले आहे. ज्येष्ठ विधीतज्ञ नानी पालखीवाला यांनी तर वृत्तपत्रांना 'लोकशाहीतील चौथा स्तंभ' म्हटले आहे. वृत्तपत्रांच्या माध्यमातून रोजच्या ताज्या घडामोंडीच्या वार्ता देणे, लोकमत घडवणे व प्रभावित करणे तसेच लोकमताचे नेतृत्त्व करणे, शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे. अशा विविध उद्दिष्टांनी आधुनिक नागरी संस्कृतित विकसित झालेली संस्था, असे वृत्तपत्र माध्यमांचे वर्णन केले जाते.

भारतामध्ये समाज सुधारणाची चळवळ, स्वातंत्र्य आंदोलनातील लोकसंग्राम, नवभारताची पुनर्रचना या तीनही पर्वात भारतीय वृत्तपत्रांनी बजावलेली भूमिका महत्त्वाची आहे. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय व्यवस्था यांच्यावर भारतीय वृत्तपत्रांनी चांगले नियंत्रण ठेऊन देशाची लोकशाही अधिक निकोप व मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा एखाद्या वृत्तपत्राच्या वाटचालीचा अभ्यास केल्याने तत्कालीन समाजातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घडामोडीचा अभ्यास अपरिहार्य ठरतो. वृत्तपत्रे ही समाज जीवनाच्या वाटचालीतील घटना व घडामोडींचा साक्षीदार असतात. त्या अनुषंगाने 'तरूण भारत' बेळगाव या वृत्तपत्राच्या कार्याचा मागोवा इतिहास विषयाच्या दृष्टिकोनातून घेतला आहे.

जेहान गटेनबर्ग याने १४५५ मध्ये मुद्रणकलेचा शोध लावला. यामुळेच वृत्तपत्रांचा उदय होण्यास मदत झाली. जेम्स ऑगस्टस हिकी याने २९ जानेवारी १७८० रोजी 'बेंगाल गॅझेट'

नावाचे इंग्रजी साप्ताहिक सुरू करून भारतात वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांच्या या वृत्तपत्रास कलकत्ता जनरल ॲडव्हायझर अथवा 'हिकीज गॅझेट' या नावानेही ओळखले जाते.[२] कलकत्त्यानंतर भारताच्या अनेक भागात इंग्रजी वृत्तपत्रे प्रसिद्ध होत होती. या वृत्तपत्रांचे महत्त्व भारतीय लोकांना समजू लागले. याच विचारातून सन १८१६ मध्ये गंगाधर भट्टाचार्य यांनी 'बंगाल गॅझेट' हे सुरू करून भारतीयांच्यात पहिल्या वृत्तपत्र वृत्तपत्र प्रकाशनाचा मान मिळविला. त्यानंतर समाचार, दर्पण, संवाद कौमुदी अशी अनेक वृत्तपत्र वेगवेगळ्या भाषेत प्रकाशित झाली.

महाराष्ट्रातील जनतेला वृत्तपत्रांचे महत्त्व पटल्याने 'मुंबापूर वर्तमान' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू झाले. पण या वृत्तपत्राचा इतिहास अस्पष्ट आहे. त्यामुळे मराठीतील पहिले वृत्तपत्र म्हणून 'दर्पण' या बाळशास्त्री जांभेकर यांच्या वृत्तपत्राचा उल्लेख केला जातो. ते वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू झाले होते. मात्र संपूर्ण मराठी वृत्तपत्र म्हणून 'मुंबई अखबार' हे पत्र सूर्याजी कृष्णाजी यांनी ४ जुलै १८४० रोजी सुरू केले.[3] जनजागृती व प्रबोधनाबरोबर लोकरंजन व्हावे, या विचारातून महाराष्ट्रात सामाजिक आणि वैचारिक परिवर्तनाला गती मिळाली. अनेक भाषेत वृत्तपत्रे निर्माण होऊन हिंदुस्थानी लोकांना भक्कम अशी व्यासपीठ उपलब्ध झाली.

'तरूण भारत' या वृत्तपत्राचा उदय व विस्तार हा आजच्या कर्नाटकातील बेळगाव या शहरातून जिल्हापत्र म्हणून झाला. या पत्राच्या अगोदर व नंतर ही बेळगाव मधून कन्नड भाषिक काही वृत्तपत्रे कार्यरत होती. त्यामध्ये सन १८५२ साली जर्मन मिशनरी लोकांनी 'कन्नड समाचार' हे पहिले वृत्तपत्र बेल्लारी येथून प्रसिद्ध केले. सन १८८० ते १९१९ या काळात म्हैसूर संस्थानातून इंग्रजी आणि कन्नड वृत्तपत्र प्रसिद्ध होत होती. उदा. मेल, हिरो व म्हैसूर टाइम्स इत्यादी पुढे सन १८८० नंतर सीमा भागातील कन्नड वृत्तपत्रांचा दृष्टीकोन बदलला. कानडी लोकांवरील मराठी भाषेचा प्रभाव रोखण्याच्या उद्देश्याने कन्नड केसरी, सचित्र भारत, कर्नाटक वैभव व संयुक्त कर्नाटक अशी कन्नड अभिमानी वृत्तपत्र प्रसिद्ध होत होती. या वृत्तपत्राच्या मराठी भाषिक विरोधी कारवाया रोखण्यासाठी व मराठी भाषिकांना सीमा भागात सन्मानाने जगण्यासाठी सीमा विभागात अनेक मराठी भाषेतील वृत्तपत्रे उदयाला आली.

बेळगांव हे सुरूवातीपासून मराठी वृत्तपत्राचे एक प्रमुख केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. बेळगाव शहरातील पहिले मराठी भाषेतील वृत्तपत्र 'बेळगाव समाचार' हे भिकाजीपंत सामंत यांनी ४ जुलै १८६४ रोजी सुरू केले. त्यानंतर 'धारवाड वृत्त' हे अंताजी रामचंद्र जोगळेकर यांनी सन १८७३ मध्ये सुरू केले. सन्मानदर्शक, मुधोळ समाचार, कर्नाटक मित्र, छावा, चिकित्सक अशी अनेक मराठी वृत्तपत्रे वेगवेगळ्या भागातून प्रसिद्ध होत होती. या वृत्तपत्रांची संख्या दुसऱ्या महायुद्धा दरम्यान अधिकच वाढली. सीमा भागातील मराठी वृत्तपत्रामध्ये दै. 'तरूण भारत'चे स्थान आणि महत्त्व वेगळे आहे. महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागात पत्रकारिता करून बाबुराव ठाकुर यांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीच्या जडणघडणीत वेगळा आदर्श निर्माण केला.

धोंडू उर्फ बाबुरावांचा जन्म २६ डिसेंबर १८९९ रोजी चंदगड तालुक्यातील श्रीपादवाडी येथे त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे मुळ गाव आजरा तालुक्यातील कोरीवडे होते. पण बाबुरावांचे वडील राजारामपंत हे शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने बेळगांव येथे येऊन स्थायिक झाले. बाबुरावांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बेळगावमध्ये पूर्ण झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण सांगलीतील विलिग्टंन महाविद्यालयात झाले. उच्च शिक्षणात ते फार काळ रमले नाहीत. स्वातंत्र्य प्रेमाचे वेड त्यांना विद्यार्थी दशेपासून लागले होते. महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या असहकार चळवळीत सहभागी झाले.[५] आपण समाजासाठी काहीतरी करावे, या हेतूने सहकाऱ्यांच्या मदतीने बेळगाव येथे सन १९१८ मध्ये 'भारत वैभव' समाजाची स्थापना केली. या संस्थेने अल्पकाळात वाचनालय व ग्रंथालय सुरू केले. शिवाय साक्षरता प्रसारासाठी, कामगार वर्गासाठी रात्रीच्या शाळा काढल्या. भारताला तरूण नेतृत्त्वाची गरज आहे. हे तरूण देशाचे आधारस्तंभ आहेत. या गोष्टीचा विवेकपूर्ण विचार करून स्वतः तरूण असलेल्या बाबुराव ठाकुर व त्यांच्या सहकाऱ्यांनी संस्थेमार्फत जुलै १९१९ मध्ये 'तरूण भारत' या मासिकाची स्थापना केली. या मासिकातून स्वातंत्र्य चळवळ, शैक्षणिक आणि रचनात्मक कार्याचा प्रचार करून जनजागृती केली. जून १९२१ मध्ये बाबुराव ठाकुर यांनी स्वतःचा छापखाना सुरू केला. सन १९२३ पासून १९२८ पर्यंतच्या काळात या मासिकाच्या प्रकाशनात खंड पडला. ऑगस्ट १९२८ मध्ये लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी दिवशी 'तरूण भारत' अर्धसाप्ताहिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले. ८ जानेवारी १९५४ रोजी रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. या वृत्तपत्राचा विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे ५ जुलै १९६६ रोजी हे पत्र दैनिकात रूपांतरित

झाले. बाबुरावांचे वृत्तपत्रांविषयीचे विचार हे आदर्श निर्माण करणारे आहेत. वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम कसे असू शकते. याचा उत्तम नमूना त्यांनी समोर ठेवला आहे. एखाद्या कठीण प्रसंगी पत्रकार जनतेचे नेतृत्त्व करू शकतो. ही भारतीय वृत्तपत्रांची परंपरा त्यांनी जोपासली. लोकांची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी सामाजिक, आर्थिक व धार्मिक अन्यायाविरूद्ध लढा देण्यासाठी निर्भयपणे पत्रकारांनी पुढे यायला हवे, सामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्कावर गदा आली तर त्यांच्या रक्षणासाठी पत्रकारांनी आपली लेखणी चालवायला हवी. हे बाबुरावांनी सन १९५० च्या बेळगांव येथील मराठी पत्रकार परिषदेत स्वागताध्यक्ष या नात्याने मांडले होते. त्यांनी ते आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष कृतीत आणले. बाबुरावांनी पत्रकारिता हा धंदा म्हणून नव्हे तर एक धर्म व ध्येय म्हणून जोपासले. यावरून त्यांच्या ध्येयनिष्ठ पत्रकारितेचा प्रत्यय येतो.

२३ एप्रिल १९७९ रोजी बाबुराव ठाकुर यांचे निधन झाले. आपले वृत्तपत्र प्रबोधन व लोकशिक्षणाचे साधन म्हणून त्यांनी चालविलेले होते. बाबुराव ठाकुरनंतर त्यांचे पुत्र किरण ठाकुर हे 'तरूण भारत' चे संपादक आहेत. त्यांनी वृत्तपत्राचा अधिक विस्तार केला आहे. आज बेळगाव खेरीज 'तरूण भारत' सिंधुदुर्ग, गोवा, सातारा, रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर व मुंबई आवृत्तींच्या रुपाने प्रकाशित होतो. अद्ययावत सुविधांनी सुसज्ज अशा मुद्रणालयातून यांची छपाई केली जाते.

'तरूण भारत' वृत्तपत्राचा जन्म हा सामाजिक कल्याणासाठी झाला. आपल्या समाजाची अधोगती अंधश्रद्धा, जातीयता, उच्च–निच भेदभाव, शैक्षणिक मागासलेपणामुळे झाले आहे. उदासिनता व अडाणीपणा इत्यादी कारणाने झाली आहे. या समाजाची प्रगती साधावयाची असेल तर शिक्षणाबरोबर समाजातील अनिष्ट चालीरिती, प्रथा व परंपरा, अंधश्रद्धा आणि जातीयता यांचा कायमचा नायनाट झाला पाहिजे. यासाठी समाज प्रबोधनाची व जागृतीची गरज आहे. हे ओळखून बाबुरावांनी 'तरूण भारत' च्या माध्यमातून समाजातील अनिष्ट परंपरेवर प्रहार केला, दलितांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या बांधवांसाठी केलेल्या कार्याचा समग्रपणे आढावा घेतला. सामाजिक प्रगतीच्या मार्गातील अस्पृश्यता हा अडथळा असल्यामुळे तो नाहीसा करण्यासाठी जातीव्यवस्थेचा त्याग करा, इतरांनाही मनुष्य म्हणून जगु द्या. असे संपादकीय लेख लिहून अस्पृश्यतेविरूद्ध जनगागृती

करून सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार केला. तसेच चंदगड व बेळगाव विभागातील मंदिरातून हरिजनांना प्रवेश मिळवून देऊन सामाजिक समतेची कृतीशील क्रांती घडवून आणली. साने गुरूजींच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या हरिजन मंदिर प्रवेश सत्याग्रहाला आपल्या वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन समाजात अस्पृश्यांच्याविषयी आस्था निर्माण केली.

२० वे शतक हे स्त्री उद्धाराचे शतक मानले जाते. समाजात स्त्रियांच्या प्रश्नाकडे या वृत्तपत्राने गांभीर्याने लक्ष दिले आहे. स्त्रीयांचे हक्क व अधिकार यासाठी विश्लेषणात्मक लेखन केले आहे. विशेष म्हणजे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला पाहिजे, व त्यांना बटिक बनवणाऱ्या अनेक जुलमी पध्दतीवर हल्ले चढविले. यासाठी अनेक विद्वानांचे लेख प्रसिद्ध करून स्त्रीयांना जागृत केले. महिलांनी स्थापन केलेल्या संघटना व स्त्री परिषदांच्या मदतीने त्यांचे प्रश्न सुटण्यास कशी मदत होईल. याकडे विशेष लक्ष दिले आहे. वृत्तपत्राच्या मदतीने समाजातील ज्या जुन्या चालीरिती आहेत. उदा. यात्रा, सण, सोवळे–ओवळे, पाप–पुण्य या विरोधात समाजाचे लक्ष वेधले आहे. होळीच्या सणातील बिभत्स प्रकार, यात्रेत होणारी प्राण्यांची हत्या इत्यादीबाबत परखड लेखन करून समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. धर्माच्या नावाखाली. समाजाची ठराविक वर्गाकडून कशी पिळवणूक केली जाते. यासाठी समाजात घडणाऱ्या घटनांची स्पष्टीकरणे देऊन लोकांच्यात जागृती निर्माण केली. उदा. चंदगड तालुक्यातील हेरे या गावी यात्रेच्या वेळी चालत आलेली अमानुष परंपरा म्हणजे प्राण्यांचा छळ करून केली जाणरी हत्या. या चालीबाबत बाबुरावांनी समाजाचा रोष पत्करून विरोध दर्शविला. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वृत्तपत्रांनी काम केले.

बाबुरावांचे नागरी कार्य फार मोलाचे ठरते. त्यावेळची बेळगाव पासून लांबवर डोंगर दऱ्यात वसलेली खेडी, नागरी संस्कृतीपासून अलिप्त होती. अशा खेडयात साधा कच्चा रस्ता देखील नव्हाता. या अडचणी लक्षात घेऊन ग्रामीण भागातील लोकांना बाबुरावांनी प्रथम स्वतःच्या आरोग्याबाबत जागृत राहण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर चंदगड व आजरा तालुक्यातील लहान मोठी १२५ खेडी गावकऱ्यांच्या श्रमदानातून कच्च्या रस्त्यांनी मुख्य रस्त्याला जोडली. त्यांचे हे कार्य सामाजिकतेच्या दृष्टीने कौतुकास्पद आहे. अशा प्रकारे ग्रामीण भागातील दूरवरची खेडी शहरी भागाला जोडून ग्रामीण जीवनाचा संबंध शहरी जीवनाशी आणला. त्यामुळे या खेडयातील जनता नंतरच्या काळात स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाली.

शेतकरी वर्ग हा भारतीय समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्राच्या उभारणीत व उन्नतीत सर्वात महत्त्वाचा वाटा शेतकऱ्याचा आहे. शिवाय अनेकांना रोजगार प्राप्त करून देण्यात शेती व्यवसाय महत्त्वाचा ठरतो. भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशात मोठया प्रमाणात औद्योगिक क्षेत्रात प्रगती झाली असली तरी शेतीच्या क्षेत्रात होणारे उत्पादन निश्चितच मोठे आहे. या वृत्तपत्राने सीमा भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न कायमच पोटतिडकीने मांडले आहेत. त्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या आंदोलनाचा वृत्तपत्राच्या माध्यमातून आढावा घेतला आहे. शेतकऱ्यांना आपली प्रगती करून घेण्यासाठी शेतकी प्रदर्शनासारखे पर्याय कसे उपयुक्त ठरतात. याबाबत ११ फेब्रुवारी १९३४ रोजी स्वतंत्र अंक काढून माहिती पुरविलेली आहे. शेतकरी संघ व त्यांच्या संघटना त्यांचे प्रश्न सोडविण्यात निश्चित यशस्वी होतील. असा आशावाद व्यक्त केला असला तरी, ते पुढे म्हणतात, शेतकरी वर्गाची संघटना बांधून फक्त मतदाना पुरतीच वापरून चालणार नाही. तर त्यांना नवनवीन ज्ञान स्वीकारण्यास भाग पाडले पाहिजे. शेतीच्या उत्पादनाबरोबर निर्माण होणारी शेतकऱ्यांची पुढची पिढी सुशिक्षित व जाणकार तयार झाली पाहिजे. तरच शेतकऱ्यांचे कष्टाचे व गरिबीचे दिवस मागे पडतील. असे मत मांडले आहे. काँग्रेसच्या झेंडयाखाली बेळगांव जिल्हयातील जांबोटी, कुणकुंबी, तुडये व कुदनूर या ठिकाणी भरविलेल्या शेतकरी परिषदा तसेच शेकापक्षाची पहिली परिषद चंदगड महालातील कोवाड या गावी २४ मे १९४८ रोजी भरविण्यात आली होती. या परिषदेला लोकनेते केशवराव जेधे व शंकरराव मोरे यांनी मार्गदर्शन केले. या संपूर्ण परिषदेचा आढावा जरी 'तरूण भारत'ने घेतला असला तरी काँग्रेसनिष्ठ असणाऱ्या वृत्तपत्राला या परिषदेत झालेली भाषणे झोंबल्याची दिसतात. या परिषदेची जास्त दखल न घेता फक्त टिका टिपणे देऊन झालेल्या ठरावाची चर्चा केली आहे. शेतकरी वर्गाच्या हिताबाबत या परिषदेत ठराव संमत झाले. याची चिकित्सक चर्चा केली आहे. आधुनिक शेती पद्धतीतील वेगवेगळे प्रयोग, यातून मिळणारे यश, देशी विदेशी शेतीपद्धती बद्दलची माहिती तसेच शेतीमालाच्या बाजारी किमंती, वेगवेगळया विचारवंताचे संशोधकांचे शेती विषयक खास लेख, सदरे, शेतकऱ्यासाठीचे कायदे, शेतकरी आणि सरकारचे धोरण, पशुपालन व संगोपन इत्यादी विषयावर लेखन करून शेतकरी वर्गाला दिलासा देणारे व त्या वर्गाच्या विकासाचा आधार असलेले वृत्तपत्र म्हणून सीमा भागात 'तरूण भारत' कडे पाहिले जाते.

म्हणूनच या विभागात शेतकरी आजही वृत्तपत्राची आवर्जून मागणी करतो.

शेतकऱ्यांच्या प्रश्नाप्रमाणेच कामगारांच्या प्रश्नाकडे 'तरूण भारत' वृत्तपत्राने अधिक लक्ष दिले आहे. देशाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी कामगार वर्गाचे हित महत्त्वाचे आहे. कामगाराचे कर्तव्य त्यांचे अधिकार व हक्क याबाबत कामगार वर्गात जागृती निर्माण करून त्यांची भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक सर्वाच्या समोर मांडली. कामगार वर्गाला सन्मानपूर्वक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच या विभागातील कामगारांचे प्रश्न मांडणारे व कारखानदार, भांडवलदारांच्यामध्ये धडकी निर्माण करणारे हे मुखपत्र म्हणून ओळखले जाते. सुरूवातीच्या अनेक अंकात मुंबई गिरणी कामगारविषयी सविस्तर माहिती दिली आहे. गिरणी कामगार संप का करतात ? त्यांच्या रास्त मागण्या कोणत्या आहेत. अभ्यासपूर्ण मांडले आहे. काम्गारांनी पगार वाढीसाठी संघर्ष न करता सर्व घटकांचा उत्कर्ष कसा होईल, हे पाहिले पाहिजे. तसेच १ मे कामगार दिनाचे महत्त्व संपादकीय लेखात चर्चा केली आहे. सर्वसामान्य जनाचे कल्याण साधण्यासाठी त्यांनी सरकारविरोधी बऱ्याच वेळा लेखणीचा वापर केला आहे. एवढेच नाही तर ग्रामीण भागात संख्येने जास्त असणारा समाज म्हणजे शेतकरी वर्ग यांच्यात आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सुधारणा झाल्या पाहिजे. म्हणून स्वतः पुढाकार घेऊन विभागवार शेती उत्पादक महालाचे प्रदर्शन भरवले व शेती मालाला प्रसिद्धी मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यासाठी स्वतंत्र पुरवणी अंकात रंगीत फोटो देऊन शेती करण्याची आधुनिक पद्धत, वेगवेगळे बि–बियाणे, खते, शेती मालाच्या बाजारी किमती व किफायतशीर शेती व्यवस्थापन या सदराखाली कृषि तज्ञांचे अभ्यास पुरक लेख प्रसिद्ध करून शेतकरी वर्गाला आधुनिक ज्ञानाची माहिती पुरवलेली आहे. शेतकऱ्यांच्या विषयी भूमिका स्पष्ट करताना संपादक एका लेखात म्हणतात, "भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरच आपले जीवन अवलंबून असते. शेतकरी आनंदी तर समाज पर्यायाने देश आनंदी होतो. तेव्हा या शेतकरी वर्गाबाबत सरकारनेही सकारात्मक असे धोरण स्वीकारले पाहिजे." अशा प्रकारची भूमिका मांडलेल्या आहेत. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जाती वर्गाला समतेच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची समाजासमोर चर्चा करून न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने 'तरूण भारत'ने लेखन अधिकार वापरले आहेत. आरोग्य, शेती, शिक्षण, अंधश्रद्धा, रुढी परपंरा, समाजातील वाईट चालीरिती, गुन्हेगारी, बाजारपेठा,

दुष्काळ, स्त्रीयांचे प्रश्न, भ्रष्टाचार, बेकारी, शेतकरी परिषदा, व्यापारी लोकांची अधिवेशने, लमाणी समाजाचा मेळावा, मराठी समाजाची परिषद, धनगर लोकांचे प्रश्न, महिला मंडळाची स्थापना व संघटना अशा समाजातील विखुरलेल्या घटकांच्या संघटना उभ्या केल्या. अशा प्रकारचे विषय अग्रलेखातून हाताळलेले आहेत. त्यामुळे तळागाळाचा समाज 'तरूण भारत' या वृत्तपत्राकडे अत्यंत जिव्हाळ्याने पाहत असे. महागाई आणि दरवाढीविषयी म्हणतात, "महागाईने गती घेतल्यास देशापुढे कठीण प्रसंग उद्‌भवेल. महागाई भ्रष्टाचार व लाचलुचपत थांबली नाही, तर देशात क्रांती होईल. सार्वजनिक कारभारात काटकसर व उत्पादनासाठी झंझावती चळवळ हा महागाईला आळा घालण्याचा एकमेव मार्ग आहे. जनतेनेच या कार्याचा उठाव केला पाहिजे." पुढे म्हणतात, "देशाचे आर्थिक उत्पादन वाढविण्यासाठी 'केवळ घोषणांनी समाजवाद येत नाही. किंवा व्यासपीठावरील भाषणांनी धान्य पिकत नाही. त्यासाठी तळमळीच्या कार्यकर्त्यांची देशव्यापी संघटनाच हवी. या महागाईवर सर्वांनी राजकीय पक्षांची लेबले विसरून कार्यास वाहून घेतले पाहिजे. तरच सुव्यवस्थेचे व लोकशाहीचे वातावरण तयार होईल." असा सरकारला गंभीर इशार दिला आहे. विनोबा भावे यांची 'भूदान चळवळ' आणि यातून साकार झालेली 'ग्रामदान चळवळ' सविस्तरपणे वर्णन करून या विभागात विनोबांचा प्रवेश आणि त्यांचे मार्गदर्शन याचा झालेला परिणाम म्हणून 'बिजूर' सारख्या गावाने ग्रामदानाचा चार वर्षे केलेला प्रयोग हाच एक पत्रकार म्हणून केलेले कार्य आदर्श आहे. त्याच बरोबर सहकाराची चळवळ या विभागात चांगली रूजली पाहिजे म्हणून 'तरूण भारत' हे वृत्तपत्र कायम दक्ष होते. चंदगड सारख्या दुर्गम भागात फार मोठया कष्टाने व शेतकऱ्यांच्या सहकार्याने उभा राहिलेला दौलत सहकारी साखर कारखाना एकेकाळी तालुक्याला वरदान ठरला होता. पण चूकीच्या नियोजनामुळे व राजकारणाच्या आडयामुळे शेतकऱ्यांची दौलत शेवटची घरघर मोजत आहे. अशा या सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून ते आजपर्यत सातत्याने कारखान्याच्या व शेतकऱ्यांच्या भल्यासाठी 'तरूण भारत' ने लेखन केले आहे. कारखान्याबाबत जनजागृतीचे कार्य करीत असताना या वृत्तपत्राने कोणत्याही व्यक्तीची भिडभाड न ठेवता कडक शब्दात जाब सुनावण्याचे काम आजपर्यत केले आहे.

नागरिकांची दैनंदिन गाऱ्हाणी चव्हाटयावर मांडून ती दूर करण्याच्या कामी तळमळीने प्रयत्न केले. जनतेवर होणारे कोणत्याही प्रकारच्या जुलूमाविरूद्ध सडेतोड मत मांडण्यात व पाठपुरावा करण्यात 'तरूण भारत' कायम आघाडीवर राहिला. म्युनिसिपालिटी, लोकलबोर्ड, ग्रामपंचायती व सहकार इत्यादी स्वरूपाच्या स्थानिक संस्थातील भ्रष्टाचार व पक्षपातीपणा याबाबत प्रसंग पडेल. तेव्हा लेखणी उचलली आहे. तसेच देशात लोकशाही शुद्ध स्वरूपाची राहावी. म्हणून जागरूकतेने विचार मांडले आहेत.

वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबुराव ठाकुर यांनी सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याची ताकद दाखऊन दिली. निपाणी जवळील पांगीरे येथील काशिबाई हणबंर प्रकरण उचलून धरून अन्यायाला वाचा फोडली. या प्रकरणावर खास अंक देखील प्रकाशित केला. परिणामी गुन्हेगाराला शिक्षा झाली. ज्योती रामा राजगीरे व शामराव देशमुख अशी अनेक प्रकरणे त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून गाजवली. सर्व सामान्यांना लहान कुटुंबाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कुटुंब नियोजन या विषयावरील स्वतंत्र पुरवणी काढली. वेगवेगळ्या तत्कालिन घटनावर व विषयावर अग्रलेख लिहिले. या त्यांच्या कार्यातून एक उत्तम आदर्श पत्रकार संपादक कसा असावा हा आदर्श तरूण पत्रकारांना व संपादकांना घालून दिला आहे.

'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या सामाजिक कार्याबरोबर राजकीय योगदानही महत्त्वाचे आहे. भारताचा २० व्या शतकातील पूर्वार्धांचा इतिहास म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास होय. मुख्यतः या चळवळीचे नेतृत्त्व काँग्रेस पक्षाने केले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली या चळवळीने व्यापक टप्पे ओलांडले. ही चळवळ खऱ्या अर्थाने देशव्यापी झाली. हिंदुस्थानच्या विविध प्रांतातून स्थानिक नेतृत्त्व उदयास आले. बेळगाव भागात गंगाधर देशपांडे, गोविंदराव याळगी, बाबुराव ठाकुर अशी मंडळी महात्मा गांधीजींच्या विचारांना प्रेरीत होऊन जनआंदोलनात उतरली याच मंडळींनी विशिष्ट विचाराने मे व जून १९१९ पासून बेळगाव शहरात 'तरूण भारत' या मराठी मासिकाची सुरूवात झाली. पुढे या मासिकाने देशांतर्गत घडामोडी, स्वातंत्र्य चळवळीची दिशा, राष्ट्रप्रेम अशा प्रकारच्या वेगवेगळ्या वैचारिक लेखांच्या माध्यमातून समाजात जागृती केली. भारतीय असंतोषाचा जनक लोकमान्य टिळक यांचे १ ऑगस्ट १९२० रोजी निधन झाले. सप्टेंबर च्या तरूण भारत या वृत्तपत्राच्या अंकात लोकमान्यांच्या कार्याची साक्ष देणारी स्वतंत्र पुरवणी प्रसिद्ध केली. या पुरवणीच्या मलपृष्ठावर

लोकमान्य टिळकांच्या मृतदेहाचे छायाचित्र देऊन देवमान्य बाळ गंगाधर टिळक असे शीर्षक दिले होते. यावरून बाबुराव ठाकुर यांची टिळकांच्या विषयीची श्रद्धा स्पष्ट होते. सुरुवातीपासून लोकमान्य टिळकांचे बेळगाव भागासी ऋणानुबंध होते. या पुरवणीत लोकमान्य टिळकांची राष्ट्रप्रेमाची संकल्पना व स्वदेश अभिमानाचे मजकूर दिले आहे. या वृत्तपत्रात लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी व जयंती निमित्ताने वेगवेगळ्या विषयावर लोकमान्य टिळकांची प्रेरणा व कार्याची आठवण समाजात बिंबवण्याचा प्रयत्न केला होता. टिळकांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे महात्मा गांधी यांच्याकडे आली. त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारे लेख प्रसिद्ध केले आहेत. महात्मा गांधीचे विचार या विभागात लवकर रूजविण्यास मदत झाली आणि म्हणून हा बेळगाव परिसर स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर राहिला.

असहकार चळवळीत तरूणांना सहभागी करून घेताना 'हे तरूण हिंदुस्थाना या मथळ्याखाली 'तरूण हो, स्वदेश भूमीवर प्रेम करा ! तरूण पिढीच्या आत्मिक बलावर महात्म्यांची सर्वस्वी भिस्त आहे. सर्वांनी अंतःकरणाने त्यांना सहाय्य करून एका वर्षात स्वातंत्र्याचा आमचा जन्मसिद्ध हक्क आम्ही मिळवू' असा विश्वास निर्माण करणारा लेख दिला आहे. 'तरूणांनो ! तुम्हाला स्वदेशाची चाड असेल स्वराज्याची उत्कट भावना जागृत झाली असेल तर राष्ट्राला जागून सरकारी व सरकारशी संबंध असणाऱ्या शाळा आणि कॉलेज ओस पाडून केवळ स्वराज्यासाठी अनात्याचारी असहकारिता स्वीकारावी. अशा प्रकारचे आवाहन करून तरूण वर्गाच्या अंतःकरणात हात घालणारा लेख दिला आहे. असहकार चळवळीच्या पार्श्वभूमीवर ऑक्टोबर १९२० मध्ये महात्मा गांधी व शौकत अली हे बेळगावात आले असता. किल्ला मैदानावर एक सभा घेतली. त्यावेळी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे असहकार चळवळ अधिक तीव्र बनत गेली. या चळवळीत बेळगाव व बेळगाव परिसरातील स्त्रीयांनी सुद्धा भाग घेतला. असहकार आंदोलनात अनेकांना शिक्षा झाल्या. यामध्ये बाबुराव ठाकुर यांचाही समावेश होता. सविनय कायदेभंग चळवळीच्यावेळी २६ जानेवारी १९३० हा दिवस 'पहिला स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले. त्यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटी बेळगावच्या वतीने 'तरूण भारत' या साप्ताहिकात 'स्वातंत्र्य दिन साजरा करा ! मथळ्याखाली लेख देऊन जनतेपुढील कार्यक्रम आखून देण्यात आला. त्यानुसार बेळगावच्या रस्त्यावर रांगोळ्या व प्रत्येकाने गुढी उभी करून हा दिवस साजरा केला. १४ सप्टेबर १९२९ रोजी असहकाराचा

संदेश घेऊन सरदार वल्लभभाई पटेल बेळगावला आले. त्यावेळी झालेल्या व्याख्यानाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात लढा कसा दिला. त्यांना यश काय साध्य झाले. याबाबतचा इतिवृत्तांत या लेखात 'तरूण भारत' ने सविस्तरपणे छापलेला आहे. या स्वातंत्र्याच्या चळवळीत बहुजन समाज सहभागी झाला पाहिजे तरच या लढयाला व्यापकतेचे स्वरूप येईल. बार्डोली सत्याग्रहाच्या कार्यातून पुढे धडा घेऊन बेळगाव वासीयांनी स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्नांच्या वेळी साराबंदीची चळवळ कर्नाटक सरकारच्या विरोधात पुकारून सरकाला जेरीस आणले होते. बेळगाव नगरपालिकेने सरदार वल्लभभाई पटेल यांना दिर्घ विवेचनाचे मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. हे मानपत्र विस्तृतरित्या 'तरूण भारत' ने प्रसिद्ध केले आहे.

महात्मा गांधीजीनी साबरमती आश्रमातून मिठाचा कायदा मोडण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे देशभर खळबळ उडाली. मिठाच्या प्रश्नावर राष्ट्रीय लढा सुरू करण्याच्या या निर्णयामुळे काँग्रेसचे बरेचसे नेते बुचकळ्यात पडले होते. या बाबतचा खुलासा करणारा लेख तरूण भारतने प्रसिद्ध केला होता. कायदेभंगाच्या चळवळीत बेळगाव परिसरात फार मोठी प्रचार मोहिम राबवून 'तरूण भारत' ने मोठी जनसमुदायाची व कार्यकर्त्यांची फळी उभी केली. या प्रेरणेतून बेळगाव जिल्हयातील सत्याग्रहींची संख्या ७२५ झाली होती. बाबुराव ठाकुर यांनी हिंडलगा जेलसमोर १८ एप्रिल १९३० रोजी सभा घेऊन प्रक्षोभक भाषण केल्या प्रकरणी अटक करण्यात आले व सहा महिन्याची शिक्षा ठोठावण्यात आली. सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील बेळगाव जिल्हयात मीठाचा कायदा मोडणाऱ्या सत्याग्रहींना शिक्षा झाल्या होत्या. त्यांच्या नावाची यादी 'तरूण भारत' या वृत्तपत्राने १३ मे १९३० च्या अंकात प्रसिद्ध करून सत्याग्रहींना समाज प्रसिद्धी मिळवून दिली आहे. त्यामुळे या चळवळी सर्वसामान्य जनतेत भिनल्या होत्या. याचे सर्व श्रेय 'तरूण भारत' या वृत्तपत्रास जाते.

मिठाचा सत्याग्रह चालू असताना महात्मा गांधी तुरूंगात होते. त्यावेळी 'सोनाराने कान टोचले' या शीर्षकाखाली या वृत्तपत्राने महात्मा गांधी खेरीज गोलमेज परिषदेला काही अर्थ नाही. अशा आशयाची तार 'विलायतेतील मजूर पक्षाचे मुखपत्र 'डेली हेराल्ड' प्रसिद्ध झाली होती. ती तशीच जगासमोर छापून ब्रिटिशाच्या अंतर्गत महात्मा गांधी बाबतचे राजकारण सर्वांच्या समोर आणले होते.

सायमन कमिशनचा रिपोर्ट १० जून रोजी प्रसिद्ध झाला. त्या रिपोर्टमधील मजकूर 'तरूण भारत' या वृत्तपत्राने दोन भागात मुद्रित केला. हा रिपोर्ट फसवा आहे. 'नंदी बैलाचा निवाडा नको' 'आधी कळस मग पाया रे' सायमन कमिशनचा रिपोर्ट म्हणजे 'डोंगर पोखरून उंदीर बाहेर काढण्यासारखा प्रकार आहे.' अशा शीर्षकाखाली सायमन कमिशनवर तीव्र शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

पहिली गोलमेज परिषद ही महात्मा गांधीजींच्या शिवाय भरविली गेली. म्हणजे 'हॅम्लेटच्या पात्राखेरीज हॅम्लेट नाटक व्हावे' तशी त्या परिषदेची स्थिती झाली. पण दुसऱ्या परिषदेला जाण्यास महात्मा गांधी तयार झाले. महात्मा गांधीजींचे गोलमेज परिषदेला जाणे, या बाबत पुण्याच्या 'केसरी' वृत्तपत्रातून १ ऑगस्ट च्या अंकात महात्मा गांधीजींच्या कार्य प्रणालीवर टिका करुन महात्मा गांधीजींची चळवळ म्हणजे एखाद्या लहान पोराने बापाच्या मिशा उपटाव्या त्याप्रमाणे इंग्रजांना वाटते.' असे म्हणून गांधीजींची टवाळी केली आहे. या लेखाचा समाचार घेण्यासाठी म्हणून बेळगाव येथील मारूती मंदिरात सभा घेऊन निषेध नोंदविल व दुसऱ्या दिवशीच्या 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या अंकातून केसरीला 'सडेतोड उत्तर देताना म्हणतात, 'देशाचे हित फक्त महात्मा गांधीजींना माहीत आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली आपण यश मिळवू. असा विश्वास देणारा लेख प्रसिदध केला आहे. अस्पृश्यता निवारण व मंदिर प्रवेश याबाबर असेंब्लि पुढे आलेल्या बिलास व्हाईसरॉयनी संमती देऊ नये. अशी विनंती करणारे पत्रक काढण्यासाठी मारुती मंदिरात २९ जानेवारीला श्री शंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा घेण्यात आली. या सभेत महात्मा गांधीजींचा निषेध करण्यात आला. या सभेला दुसऱ्या दिवशीच 'तरूण भारत' कडून बाबुराव ठाकुर उत्तरा दाखल स्पष्ट करणारा लेख दिला. देशातील ७ कोटी अस्पृश्य समाजाला किती दिवस पशुहीन वागवणार, आता त्यांचा आंबेडकर हा नेता रक्षणासाठी पुढे आहे. अस्पृश्य हे आपल्या देशाचे महत्त्वाचे भागीदार आहेत. तेव्हा त्यांची उन्नती करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. तसेच महत्मा गांधी हेच खरे जगदगुरू आहेत. बेळगाव जिल्हा हरिजन सेवक संघाचे प्रचार कार्य करत असताना बाबुराव ठाकुर यांनी हा परिसर पिंजून काढून हरिजन उद्धाराच्या कार्याबाबत लोकांच्यात जनजागृती केली.

सन १९२४ साली बेळगाव येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष महात्मा गांधी व स्वागताध्यक्ष कर्नाटक सिंह गंगाधरराव देशपांडे होते. त्यावेळी बाबुराव ठाकुर व शिवराम कोप्पल यांच्यावर स्वयंसेवक संघटनेचे काम सोपविण्यात आले होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षाने अनेक वर्षे बेळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीचे चिटणीस या पदावर बाबुरावांना कार्यरत ठेवले होते. काँग्रेसच्या अनेक अधिवेशनाला स्वतः किंवा आपले प्रतिनिधी पाठऊन पक्षाची बांधिलकी जपली. अधिवेशनामध्ये झालेले ठराव व चर्चा दुसऱ्या दिवशीच्या अंकात प्रसिद्ध करून सर्वसामान्य जनतेपर्यंत विचार पोहचवले व काँग्रेस विचारांची कार्यकर्त्यांची फळी उभी केली.

ब्रिटीश धार्जिण्या राजनिष्ठांचा बेळगाव ते ठळकवाडी या रस्त्याला ब्रॅबोर्न रोड असे नामकरण करण्याचा कुटील डाव बाबुरावांनी उधळून लावून त्या रस्त्याला 'काँग्रेस रोड' असे नामकरण करण्यात पुढाकार घेतला होता.

त्रिपुरा अधिवेशनानंतरच्या महात्मा गांधी व सुभाषबाबू यांचे मतभेद विकोपाला गेले याचे पर्यावसन श्री सुभाषबाबूंच्या काँग्रेस अध्यक्षपदाच्या राजीनाम्यात झाले. त्यानंतर सुभाषचंद्र बोसनी 'आखिल भारतीय फॉर्वर्ड ब्लॉक' या काँग्रेस अंतर्गत पक्षाची स्थापना केली. १३ जुलै १९३९ रोजी सुभाष बाबू बेळगाव येथे आले. त्या दिवशी 'तरूण भारत' या वृत्तपत्रा तर्फे त्यांना एक पत्र देण्यात आले. या पत्राच्या मजकुरावरून काँग्रेस विषयीची भक्ती व महात्मा गांधीजी यांच्यावरील प्रेम स्पष्ट होते. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सुभाष बाबूंच्या बाबतची कटुतेची भूमिका मांडून त्यांच्या निर्णयाबाबत लोकांच्यात तिरस्काराची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

'क्रिप्स योजना म्हणजे बुडत्या बँकेचा दिलेला चेक आहे.' अशी प्रतिक्रिया नोंदविली आहे. मुंबई येथील ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक ७ ऑगस्ट १९४२ रोजी गवालिया टँक मैदानावर भरलेली होती. यावेळी जवाहरलाल नेहरूनी 'चले जाव'चा ठराव मांडला. त्या अधिवेशनात महात्मा गांधीजींनी भाषण करून 'ईश्वराने आपल्याला लढयाची अखेरची संधी दिली असल्याचे सांगितले व 'करेंगे या मरेंगे' असा मंत्र ८ ऑगस्टच्या समारोपाच्या वेळी उच्चारला व १९४२ च्या क्रांतीला सुरूवात झाली.

९ ऑगस्टला बेळगाव विभागातील बऱ्याचशा देशभक्तांना अटक झाली. पण मोजक्याच लोकांची नावे या वृत्तपत्राने प्रसिद्ध केल्याचे दिसते. या लढ्यामध्ये बेळगाव काँग्रेस आघाडीच्या पुढाऱ्यांना बंदी बनवले. परिणामी बेळगाव व बेळगाव परिसर त्यावेळी 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे कार्यालय हे चळवळीचा मुख्य ठिकाण बनले आहे. अशी समजूत करून पोलिसांनी कार्यालयाची अनेक वेळा झडती घेतली. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे संपादक या आंदोलनाच्यावेळी बाबुराव ठाकुर यांना अटक केली. यावेळी दिड वर्षे कारावासाची शिक्षा झाली. बाबुरावांना झालेल्या कारावासाबाबत त्यांच्या राजकीय कार्याची खरी प्रचिती पुढे येते.

बेळगाव भागातील क्रांतिकारक व विद्यार्थ्यांच्यावर वेगवेगळ्या आरोपाखाली चालविले जाणारे खटले संबधित व्यक्तीची नावे देऊन त्यांच्या कार्याची दखल अंकात घेतली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळत असताना भारतीय जनतेला आनंद होणे सहाजिकच होते. त्यावेळी 'चालू राजकीय घडामोडी' या अग्रलेखातून भारत स्वतंत्र होण्याच्या जरा आधी भारतात सुरू असलेल्या घडामोडींचे वर्णन केलेले आहे. त्यामध्ये भारत व पाकिस्तान यांच्या स्वातंत्र्य दिनाचा उल्लेख आहे. तसेच भारतीय राष्ट्र ध्वजाचे वर्णन केले आहे. यावरून वृत्तपत्र हे जनसामान्याना माहिती देण्याचे महत्त्वपूर्ण साधन आहे. हे या अग्रलेखातून पाहावयास मिळते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हुतात्म्याच्या स्मरणार्थ बेळगाव येथील बारा गडगडयाच्या विहीरीजवळ स्मारक स्तंभ उभा करण्याच्या कामी संपादकाचे योगदान महत्त्वाचे आहे.

पाकिस्तान निर्मितीबाबत हिंदुस्थान जनतेलाही शांततेचा सल्ला देणारा लेख 'गुंडराज्य नको असेल तर लोकांनी कायद्याप्रमाणे वागले पाहिजे.' 'सयंमाने आणि शिस्तीने वागण्यास जोपर्यत आम्ही शिकत नाही.तोपर्यंत आम्हाला स्वातंत्र्य मिळाले, असे म्हणता येणार नाही.

'हिंडलगा तुरूंगातील राजकीय कैद्यांचे हाल' या शीर्षकाखाली तुरूंग प्रशासनाचा सावळा गोंधळ उजेडात आणणारे अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत. 'राजकीय कैद्यांना सन्मान पूर्वक वागवावे. नाहीतर जनआंदोलन उभे करू' अशी धमकी देणारी बातमी प्रसिद्ध केली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडणाऱ्या ठळक घडामोडी थोडक्यात पण वेचकपणे मांडण्यात येत असत. उदा.दुसऱ्या माहयुद्धाचा इतिवृत्तांत रंजक स्वरूपाचा देऊन सर्वसामान्य वाचकांचे लक्ष या घटनेकडे आकर्षित करून घेत असत.

'तरूण भारत' या वृत्तपत्राचे संपादक बाबुराव ठाकुर यांच्या अनेक आंदोलनातील धडपडीचा इतिहास म्हणजे बेळगाव जिल्हयातील व विशेषतः बेळगाव शहरातील स्वातंत्र्य लढयाच्या कित्येक आंदोलनाचा इतिहास होय. देशाच्या स्वातंत्र्यासाठी १९२१ च्या असहकार आंदोलनापासून सन १९४२ च्या 'चले जाव' लढयापर्यंत ज्या चळवळी झाल्या त्यामध्ये बेळगावच्या अनेक नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी आपापल्या परीने कार्य केले आहे. तथापि श्री बाबुराव ठाकुर व त्यांचे 'तरूण भारत' या वृत्तपत्र या भोवती विणले गेले होते. त्या चळवळीची सर्व सुत्रे 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या कार्यालयातून हलविली जात होती. म्हणूनच सन १९१९ ते १९४७ पर्यत सर्व कानडी मराठी कार्यकर्त्यांच्या नोंदी, काँग्रेस आमची संस्था, बाबुराव ठाकुर आमचे पुढारी व 'तरूण भारत' आमचे राजकीय कार्यालय ! ही ओळख होऊन बसली होती. या विभागातील बहुजनांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी म्हणून वेगवेगळ्या अग्रलेखातून देशभक्ती व राष्ट्रप्रेमाचे संदेश दिले आहेत. काँग्रेस पक्ष व महात्मा गांधीजींच्या बाबत असणारी भक्ती प्रत्येक लेखात जाणवते. सर्वसामान्य जनतेचे कल्याण साधण्याबाबत त्यांनी सरकार विरोधी बऱ्याच वेळा लेखणीचा वापर केला आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंदोत्सव देशात साजरा होत असताना अवघ्या सहा महिन्यात दि.३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधीजींची दिल्ली येथील बिर्ला हाऊसच्या मैदानावर सायंकाळी प्रार्थनेस येत असताना गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्रभर जाळपोळ, लुटालुट, हत्या याचे सत्र सुरू झाले. त्याचा मोठा फटका बेळगाव जवळील चंदगड, आजरा, गडहिंग्लज तालुक्यांना बसला. कारण या भागात सुरूवातीपासूनच ब्राह्मणेत्तर चळवळ गावोगावी मोठया प्रमाणात रूजली होती. या विभागातील जमीनदार वर्ग बहुधा ब्राह्मण जातीतील व जमीन कसणारी कुळे ही ब्राह्मणेत्तर होती. ज्या गावात जमीनदारांनी सावकारी करून रयतेला छळले होते. किंवा कुळांच्या जमिनी बळकावल्या होत्या. अशा कुटुंबावर या बहुजनांचा राग होता. ब्राह्मण समाजाविरूद्ध जुने गाऱ्हाणे आहे त्यात भर पडली. महात्मा गांधीजींच्या खुनाने त्यांना एक संधी मिळाली. या दंगलीमागे जातीय विद्वेष फार अंशाने होता. अशा वर्गाने जमीनदारांवर राग काढला, असे स्पष्ट होते. अशा या बिकट परिस्थितीत 'तरूण भारत' या वृत्तपत्राने निर्णायक अशी भूमिका निभावली. या भागातील भयभीत अल्पसख्यांक ब्राह्मण कुटुंबाना आधार देणारे महत्त्वाचे काम केले. या वृत्तपत्राने 'या लुट व जाळपोळीमागे पद्धतशीर

कट आहे.' या मथळ्याचा अग्रलेख देऊन कारस्थानींचा उद्देश सर्वांच्यासमोर आणला. या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाळपोळीच्या वार्तानी व त्यावर लिहिलेल्या लेखांनी मुंबई सरकारचे व केंद्र सरकारचे लक्ष या प्रकरणाकडे वेधण्याच्या कामी सहाय्य झाले.

संस्थान विलीनीकरणाच्या प्रक्रियेमध्ये 'तरूण भारत' या वृत्तपत्राने प्रजाजनाच्या बाजूने बातम्या देऊन देशात एकजूट राहण्यासाठी प्रयत्न केला. मुंबई प्रांतात दख्खन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात १८ संस्थाने होती. ही संस्थाने विलीन झाली. 'आता संस्थानाचा दरारा संपला.' संस्थान प्रजेत लोकशाही अवतरली. या शब्दात भावना व्यक्त केल्या आहेत. कोल्हापूर संस्थान विलीनीकरणाच्या प्रक्रियेवर व एकूण हालचालीवर बारकाईने लक्ष ठेऊन सर्वसामान्य वाचक वर्गाला बातम्या पुरवलेल्या आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तेव्हापासून ते १ मे १९६० पर्यंत द्विभाषिक मुंबई राज्य मोडून महाराष्ट्र व गुजरात ही दोन घटकराज्ये होईपर्यतच्या जवळजवळ १३ वर्षाच्या काळात जुन्या मुंबई प्रांताच्या सीमा बदलल्या. १ नोव्हेंबर १९५६ रोजी करण्यात आलेल्या राज्यपुनर्रचनेमुळे मुंबई राज्यातील विजापूर, हुबळी, धारवाड व कारवार हे चार कन्नड भाषिकांचे जिल्हे नव्याने अस्तित्त्वात आलेल्या कर्नाटक राज्याचे भाग बनले. १७ लाख मराठा भाषिक प्रदेश नवीन कर्नाटक राज्यात अडकला. हा प्रश्न सुटावा म्हणून गेली ५५ वर्षाहून अधिक काळ महाराष्ट्र कर्नाटक प्रश्न गाजत आहे. या प्रश्नावर जिद्दीने आंदोलन चालविणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना सन १९४६ मध्ये झाली. या सुरूवातीच्या काळात 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे संपादक बाबुराव ठाकुर म.ए.समितीचे सदस्य नव्हते आणि या संस्थेचा पुरस्कारही त्यांनी त्यावेळी केला नव्हता. भाषावार प्रांतरचना करण्याच्या मुळातच विरूद्ध होते. त्यामुळे देशात फुटीरतेच्या प्रवृत्ती निर्माण होतील. व पर्यायाने देशाचे नुकसान होईल. अशी त्यांची भावना होती. म्हणून 'तरूण भारत' या वृत्तपत्रात सुरूवातीच्या काळात भाषावार राज्यरचनेच्या विरोधी लेखन केले आहे. परंतु पुढे श्रीरामलुयांच्या बलिदानामुळे भाषावार राज्यरचना ही मान्यता पावली आणि त्या दिशेने देशात वारे वाहू लागले. भाषावार प्रांतरचना एकदा अपरिहार्य ठरल्यानंतर तिचा पाया शुद्ध व तात्त्विक भूमिकेवर आधारलेला असावा. असा आग्रह धरून 'तरूण भारत' या वृत्तपत्राने तेव्हापासून महाराष्ट्र एकीकरण समितीचे कट्टर पुरस्कर्ते बनले व सीमा भागातील मराठी वाचकांचे मुखपत्र बनले. सीमा

प्रश्नासंदर्भातील प्रत्येक अग्रलेख बाबुराव तन्मयतेने, आत्मिक तळमळीने लिहीत. सीमा वासीयांवर झालेल्या अन्यायाची आग लेखणीच्या माध्यमातून प्रकट करीत. तीव्र शब्दात टिका करीत. आयुष्याच्या शेवटीपर्यंत त्यांनी या प्रश्नाचा उहापोह केला. या प्रश्नांचा पाठपुरावा करताना ते कधीही थांबले नाहीत. यावरून त्यांना 'सीमा प्रश्नाची न्याय मार्गाने सोडवणूक' हे ध्येय मानले. सीमा प्रश्नाकरीता सन १९५६ ते आजवर ज्या ज्या सभा परिषदा झाल्या, सत्याग्रह घडून आले, मोर्चे निघाले, शिष्टमंडळे दिल्लीला गेली. त्या सर्वाचे नेतृत्त्व व प्रचाराच्या कार्यात हे वृत्तपत्र नेहमीच आघाडीवर राहिले आहे. सीमा प्रश्न सुटावा म्हणून सीमा भागातील १०० गावांनी केलेले साराबंदीचे आंदोलन ते सरदार पटेल यांनी केलेल्या बार्डोली आंदोलनापेक्षा प्रभावी होते. सीमा भागातील शेतकऱ्यांनी एक वर्ष सारा भरला नाही. दुसऱ्या वर्षी कर्नाटक सरकारने बळाचा वापर करून, जबरदस्तीने घरात घुसून धान्य व वस्तू जप्त करुन शेतसारा वसूल करण्याचा प्रयत्न केला. पण एकाही शेतकऱ्याने स्वतः होऊन शेतसारा भरला नाही. या काळात कर्नाटक सरकारने अत्याचार केले. गोळीबार लाठी हल्ले केले. काहींना तुरूंगात डांबले. सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलाव पुकारून सारा वसूल करण्याचा प्रयत्न केला. पण शेतकरी वर्गाने एकजुटीने ऐतिहासिक साराबंदीचा लढा दिला. याचे श्रेय 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या मार्गदर्शनाला आणि नेतृत्त्वाला दिले पाहिजे. या लढयाची सांगोपांग माहिती जनतेला व सहभागी सत्याग्रहींना देण्याचे काम 'तरूण भारत' या वृत्तपत्राने केले आहे. सीमा प्रश्न सतत जिवंत ठेवण्याचे काम 'तरूण भारत' ने केले. सीमा प्रश्नाबाबत संपादक म्हणतात, "भारताने केवळ काही काळ आणीबाणी भोगली पण आम्ही, सीमा भागातील जनता सतत आणीबाणी भोगत आहोत."

वृत्तपत्राचे आजचे संपादक श्री किरण ठाकुर सीमा प्रश्नावर आपल्या भावना व्यक्त करताना म्हणतात, वडीलांच्या मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यत सीमा प्रश्नाची सुटू न शकलेली खंत वडिलांच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होती. फार घुसमट होत होती. शेवटी त्यांच्या हयातीत स्वप्न साकार झाले नाही. हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेला आहे. कन्नड भाषेची सक्ती केली जात आहे. तसेच मराठी माणसाला जाणिवपूर्वक दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात आहे. त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती खुटंत आहे.

गोवा मुक्ती सत्याग्रह चळवळीत 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे मोठे योगदान आहे. 'आझाद गोमंतक दल आणि गोवा नॅशनल काँग्रेस या संघटनांच्या कार्यकत्यांना प्रसिद्धीसाठी व जागृतीसाठी 'तरूण भारत' हे वृत्तपत्र एकमेव आधार होते. गोमंतकातील पोर्तुगीज राजवटीच्या अत्याचारांच्या कहाण्यांना 'तरूण भारत' या वृत्तपत्राने अग्रक्रम दिला आहे. या सर्व बातम्या विश्वसनीय देऊन संपूर्ण अत्याचारी तांडव त्यांनी समाजाच्या चव्हाटयावर मांडला आहे. या सर्व घडामोडीचा वेध घेत भारतीय केंद्र सरकारच्या या प्रश्नाबाबतच्या हालचाली नोंदविल्या आहेत. तसेच गोवा मुक्तीसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून सत्याग्रहीच्या तुकडया गोव्यात उतरत असताना त्यांच्या निवास, जेवण व आरोग्य यांची व्यवस्था बाबुरावांच्या नेतृत्त्वाखाली पाहिली जात असे. सत्याग्रहींच्या तुकडयाच्या तुकडया या भागातून गोव्याला पाठविण्याचे काम 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून केले गेले. अखेर गोमंतक १९ डिसेंबर १९६१ रोजी सव्वीस तासांच्या भारतीय लष्करी कारवाईनंतर गुलामगिरीतून गोवा कायमचा मुक्त झाला.

चीनने भारताचा विश्वासघात करून २० ऑक्टोबर १९६२ रोजी भारत चीन युद्धास सुरूवात झाली. चीन आक्रमणाने निर्माण झालेल्या राष्ट्रीय संकटाबाबत 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या नेतृत्त्वाखाली युद्धनिधी जमविण्यासाठी जनसमुदायाला आवाहन केले. "नगाधिराज हिमालया, तू आता जागा हो ! तुझे दिव्य, भव्य सारे सामर्थ्य भारताच्या पाठीशी उभे कर !" या शीर्षकाखाली प्रदिर्घ असा बोधक लेख दिला आहे. "शिवाजीची भवानी तलवार भारताच्या संरक्षणार्थ धाऊन गेल्याशिवाय राहणार नाही !" असे शीर्षक देऊन मराठी माणसात आत्मविश्वास निर्माण करणारा लेख आहे.

भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये काश्मिरचा प्रश्न हा सर्वात गुंतागुंतीचा प्रश्न झाला आहे. भारत व पाकिस्तान संबंध हा विषय केवळ या दोन देशातील परस्पर संबंधाचा राहिलेला नाही. तो आंतरराष्ट्रीय दृष्टया महत्त्वाचा बनलेला आहे. गेल्या साठ पेक्षा जास्त वर्षात भारत व पाकिस्तान संबंध नेहमीच ताणतणावाचे झाले आहेत. पाकिस्तान हे मुलतः धर्माधिष्ठित राष्ट्र असून हिंदू व मुस्लिम धर्मीय संघर्ष कायम ठेवणे हे पाकिस्तानी राष्ट्राचे एक उद्दिष्ट आहे. असे मत बाबुराव ठाकुर यांचे होते. ज्या ज्या वेळी भारत पाकिस्तान यांच्यात ताणतणावाचे प्रसंग आले होते. त्या त्या वेळी या वृत्तपत्राने अभ्यास पूर्वक आपले मत मांडले आहे. उदा.१९६५, १९७०–७१ भारत पाक युद्धप्रसंगाचे वर्णन करून पाकिस्तानी राज्यकर्त्यांची अविश्वासू घातकी

वृत्ती याबाबत भारतीय नेतृत्त्वाला सावधतेचा इशारा देणारे लेखन केले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बारकावे स्पष्ट करताना 'तरूण भारत' या वृत्तपत्रात विश्वसंचार या सदराखाली जागतिक घडामोडीचा बारकाईने वेध घेतला आहे. 'आपण जे युद्धात मिळवितो ते तहात घालवतो.' असा जुना इतिहास आहे. या इतिहासाची पुनरावृत्ती म्हणजे ताश्कंदचा करार होय. अशा शब्दात ताश्कंद कराराचा उल्लेख केला आहे. या कराराची शाई वाळण्या अगोदरच दि.११ जानेवारी १९६६ पंतप्रधान लालबहाद्दुर शास्त्रींचे निधन झाले. १४ जानेवारीच्या समग्र लेखात 'भारताचा लाल हरपला !' या शीर्षकाखाली जीवन कार्याचा आढावा घेतला आहे.

भारत व पाकिस्तान युद्ध १९७०–७१ युद्धाच्यावेळी 'अमेरिकेने दुतर्फा धोरण सोडावे.' भारताने अमेरिकेला तीव्र निषेधाचा खलिता पाठवावा असे स्पष्ट मत दिले आहे !

सन १९७०–७१ च्या भारत व पाकिस्तान युद्धात इंदिरा गांधी यांनी गौरवशाली इतिहास घडवून भारताला विजय मिळवून दिला व भारताविषयी जागतिक स्तरावर नवा दृष्टिकोन निर्माण केला. याबाबत २८ जानेवारी १९७२ च्या संपादकीय लेखात, भारतरत्न इंदिराजी आणि बांगलादेश यांच्या विजयाचा पोवाडा या शीर्षकाखाली सविस्तर लेख देऊन इंदिरा गांधीचे व भारतीय लष्कराचे कौतुक केले आहे.

महात्मा गांधीजीच्या खुनाने महाराष्ट्र व बेळगाव परिसरात निर्माण झालेले जाळपोळ व लुटालुट तसेच संस्थानच्या विलीनीकरणापासून ते १९७९ पर्यतच्या काळात दक्षिण महाराष्ट्र व बेळगाव परिसरात झालेल्या राजकीय चळवळी, घडामोडी यांचे स्पष्ट प्रतिबिंब आपणास या वृत्तपत्राच्या अग्रलेखात पाहावयास मिळते. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती महाराष्ट्र व कर्नाटक सीमा प्रश्न याबाबत यथार्थ आकलन होण्यास 'तरूण भारत' या वृत्तपत्र अत्यंत उपयोगी ठरते. अग्रलेखातून व विविध रकान्यातून तत्कालीन जनमताचे अचूक दर्शन घडते. परखड मत प्रदर्शनामुळे अनेक अग्रलेख, बातम्या वैशिष्टयपूर्ण तसेच मार्गदर्शक ठरले आहेत. श्री बाबुराव ठाकुर यांच्या समतोल राजकीय दृष्टिकोनामुळे 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे लेख हे वास्तववादी म्हणूनच ऐतिहासिक दृष्टया अधिक उपयुक्त ठरले आहेत.

धोंडी राजाराम ठाकुर यांनी स्वतःला स्वातंत्र्याच्या लढयात विद्यार्थी दशेतच झोकून दिल्यामुळे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण राहिले. पण शिक्षणाबाबतचे महत्त्व त्यांनी दुर्लक्षिले नाही. आपल्या प्रमाणेच आपला समाज शाळेच्या अभावी शिक्षणापासून वंचित राहता

कामा नये. अशी आंतरिक तळमळ असणाऱ्या बाबुरावांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी बेळगांव शहरात शिक्षण प्रचाराचे कार्य हाती घेतले. याकामी 'तरूण भारत'चा मोठा उपयोग झाला. खेडोपाडी समाजाच्या तळगाळापर्यत शिक्षणाचे बाळकडू देण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या सुरूवातीच्या प्रयत्नामुळे बेळगाव भागातील मराठा समाजाची शिक्षणविषयक असणारी उदासीनता दूर होण्यास मदत झाली. म्हणूनच सुशिक्षित वर्ग पूढे येऊन या भागात शाळा महाविद्यालय स्थापन करू लागला. उपलब्ध झालेल्या शिक्षणामुळे हा समाज सुशिक्षित व सुसंस्कृत बनला. शिक्षणविषयक दृष्टीकोन स्पष्ट करताना म्हणतात, 'आपला समाज चारित्र्यवान व सुसंस्कार संपन्न पिढी घडवावयाची असेल, समाजात स्वातंत्र्याची भावना जागृत करावयाची असेल, मिळालेले स्वातंत्र्य चिरकाल टिकवायचे असेल, समाजात देशी विदेशी हालचालीत सहभागी व्हायचे असेल तर दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे. यासाठी शिक्षणाचा प्रसार होऊन शाळा उघडल्या गेल्या पाहिजेत. म्हणून त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या प्रोत्साहनाने सन १९३७ मध्ये 'बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती' ही शिक्षण संस्था स्थापन करुन प्राथमिक शाळा काढल्या. त्याचबरोबर समितीने प्रौढासाठी रात्रशाळा काढण्याचे आपले ध्येय धोरण ठरविले. याकरिताची दि.१६ जून १९३८ च्या अंकात जाहीर प्रसिद्धीची बातमी दिली आहे.

शिक्षण प्रसार दौऱ्याच्यावेळी 'तरूण भारत' या वृत्तपत्राने प्रचारक म्हणून महत्त्वाची भूमिका साकारली. दि.२६ ऑक्टोबर १९३७ च्या अंकात 'एकही निरक्षर अंगठेवाला राहू देऊ नका ! असा संपादकीय लेख प्रसिद्ध केला.पुढच्या लेखात 'साक्षरतेच्या प्रचंड मोहिमेस मदत करा. शिक्षणाशिवाय स्वतःचा व देशाचा विकास होणार नाही.' बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षक समितीची पहिली शाळा दि.१० डिसेंबर १९३७ रोजी चंदगड महालातील नांदवडे या गावी स्थापना करण्यात आली. चंदगड, खानापूर, चिकोडी, बैंलहोगल, बेळगांव व सौंदत्ती या भागातील खेडयात १०३ मराठी, ६५ कन्नड व १ उर्दू अशी १६९ प्राथमिक शाळांचे जाळे पसरविले. या शाळा चालवण्यासाठी धनिक व शिक्षणप्रेमी मंडळीच्याकडून देणग्याच्या स्वरूपात पैसे उभा करून वाटचाल केली. पुढे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने पत्करली. तरीही या शाळा ताब्यात घेण्यास सरकारला १८ वर्षे लागली. या दिर्घ काळात शेकडो शिक्षकांनी अल्प वेतनात शिक्षण प्रसाराचे कार्य खेडोपाडी केले.

जानेवारी, फेब्रुवारी १९२१ च्या अंकात 'सध्याचे शिक्षण' हा संपादकीय लेख प्रसिध्द करून शिक्षणाबाबतची सरकारची उदासीनता स्पष्ट केली आहे. "शिक्षणाचा वास्तविक उद्देश म्हणजे देशातील लोकांची मने सुसंस्कृत करणे हा होय. ज्या शिक्षणाने देशातील लोकांचे उद्योगधंद्यांचे ज्ञान वाढले, नितिमत्ता व स्वदेश प्रिती ही वाढतील, एकी निर्माण होऊन एक जूटीने राष्ट्र कार्य करण्याची पात्रता अंगी येईल. तसेच राजकीय संघटन करण्याचे सामर्थ्य व कळकळ मनात निर्माण होईल व देश हिताची जागृती होईल, एकंदरीत समाजाची स्थिती सुधारण्याची पत येईल, अशा तऱ्हेच्या शिक्षणाची आपल्या राष्ट्राला आज गरज आहे." पण सध्या सुरू असलेल्या शिक्षणापासून मानसिक प्रवृत्ती जागृत होत, नसून दास्यत्व उपभोगण्याची पात्रता मात्र आपल्यात पूर्ण भिनत चालली आहे.

स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा, चालीरिती या वाईट असून परकीय धर्म व भाषा ही उच्च आहे. अशी मनोवृत्ती आपली होत चालली आहे. नोकरशाही हेच मायबाप सरकार जे जे करते ते ते आपल्या हिताचे आहे. अशी बहुजन समाजाची खोटी समजूत होत चालली आहे. या शिक्षणाने खरे–खोटे समजण्याइतकी मानसिक उन्नती आली पाहिजे. पण आताच्या या शिक्षणाने असे होत नाही. म्हणून आम्ही आज ब्रिटिश राजसत्तेचे शरीराने आणि विचारांचे गुलाम आहोत. आमच्यातील असणारा राजकीय देशप्रेमाचा व व्यक्तीत्वाचा संबंध तुटलेला आहे. यातून देशाला व तरूण पिढीला बाहेर काढण्यासाठी स्वअभिमानाचे व देशप्रेमाचे शिक्षण गरजेचे आहे. असे तळमळीने सांगून देशबांधवांच्या अंतकरणात भिडणारा हा लेख आहे.

स्त्रियानी शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. 'चूल व मूल' हे कार्यक्षेत्र सोडून आजची स्त्री विविध चळवळीत भाग घेत आहे. त्याचे कौतुक 'स्त्रिया व राजकीय चळवळ'[५३] या अग्रलेखातून केले आहे. त्याच बरोबर तत्कालीन समाजात स्त्रीया विषयी असलेल्या विविध मत प्रवाहाची माहिती करून दिली आहे.

सन १९३८ पासून 'तरूण भारत' ने शिक्षण–विभाग हे स्वतंत्र सदर सुरू करून शैक्षणिक विषयावर वेगवेगळ्या शिक्षण तज्ञांचे व समाजकर्त्यांचे लेख प्रसिध्द करून या विभागातील शिक्षण विस्ताराचा व प्रगतीचा कानोसा घेतला आहे. 'निरक्षरता निवारक दिन' म्हणून १५ जानेवारी १९३९ रोजी, सरकार सर्व स्तरावर पाळतो व शिक्षण विषयक जनजागृतीची मोहीम हाती घेतो या दिवसापुरते शिक्षण विषयक धडे देणे हिताचे नाही'

खेळाने सामुदायिक शिस्त, एकी, नियमाचे पालन, वक्तशीरपणा आज्ञाधारकपणा, खिलाडूवृत्ती, देशाचे योग्य लायक नागरिक बनण्यास आवश्यक असलेल्या सर्व गुणांची वाढ होते. प्राथमिक शाळाना क्रिंडागणाची गरज आहे. प्रत्येक शाळेसाठी स्वतत्र क्रीडांगण असलेच पाहिजे. यासाठी शासनाने लक्ष दिले पाहिजे. खेळाच्या बाबतीत आपल्या शासन कर्ताच्यात उदासीनता आहे. सरासरी आणि टक्केवारी यामुळे शिक्षण व्यवसायाला बाजारी स्वरूप आले आहे ! शिक्षणाला लागलेले राजकरणाचे ग्रहण सुटले पाहिजे ! शिक्षण संस्था बकाल शहर वस्तीपासून दूर गेल्या पाहिजेत ! वाढत्या ज्ञानाशी सतत संपर्क ठेवणे हे महाविद्यालयीन शिक्षणाचे महत्त्वाचे अंग आहे. पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्यानी समाजात स्वतःचे स्थान निर्माण केले पहिजे. "म्हैसूरने मराठी भाषेवर उगवलेला सुड! मराठी पाठय पुस्तकांतील भयंकर चुकांमुळे मुलांची उडालेली त्रेधा! यावर एकच उपाय सीमाभागाची म्हैसूर मधून सुटका!" शिक्षण क्षेत्रात बोकाळलेली ठकबाजी' मूळात शाळाच नाहीत आणि त्यावर ग्रँटस मात्र उपटल्या! शिक्षणमंत्री बद्री नारायण यांनी केलेला गौरचोर ' या लेखात 'तरूण भारत' कार म्हणतात 'कर्नाटक सरकार व प्रशासन यंत्रणा झोपा काढते का? काय जाणुनबूजुन अशा लबाडयाना साथ देते. हाच चर्चेचा विषय आहे. अशा ठकबाजीवर कटाक्षपणे लक्ष देणे गरजेचे आहे.

बाबुराव ठाकुर हे फक्त मराठी भाषिकांचेच हित साधत होते, असे नाही तर परधर्मीय परजातीय यांच्या अडीअडचणी वृत्तपत्राच्या रुपाने मांडून सरकारच्या व समाजाच्या निदर्शनाला आणून देऊन शेवटी पाठपुराव्यासाठी झगडत असत.

बाबुराव ठाकुर व त्यांचा 'तरूण भारत' या अनुषंगाने शैक्षणिक कार्याचा हा धावता आढावा आहे. या संपूर्ण शैक्षणिक कार्यावरून त्यांच्या ठिकाणी शिक्षण प्रसाराविषयी केवढी आस्था केवढी तळमळ आणि केवढी आंतरिक ओढ होती, हे दिसून येते. ज्या दुर्गम भागात जायला धड कच्चा रस्ताही नव्हता अशा दूर डोंगराळ भागात बाबुरावानी शाळा काढून ग्रामीण मुलांच्या शिक्षणांची सोय केली. शाळा काढून फक्त थांबले नाहीत, तर त्या शाळेचे शिक्षण विषयक काम व्यवस्थित चालले की नाही. हे पाहण्याकरीता व त्यांच्या समोरील अडचणी दुर करण्याकरीता ते रात्र दिवस दौऱ्यावर जात. त्याचा हा प्रवास रात्री अपरात्री पायी दगड गोटयातून, जंगल डोंगरातून होत असे या त्यांच्या सुरूवातीच्या कष्टामुळेच चंदगड, खानापूर इ.

ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाला जोराची चालना मिळाली.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर त्यांनी बेळगाव शहर व ग्रामीण भागात प्रौढ वर्ग चालविले, तसेच या सीमा भागातील मराठी जनतेची उच्च शिक्षणाची सोय व्हावी, म्हणून राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या विकासासाठी ते अविरत झटत राहीले. हजारो रुपयाच्या देणग्या त्यांनी कॉलेजला मिळवून दिल्या. देशातील कोणताही नामवंत पाहुणा बेळगाव शहरात कार्यक्रमासाठी किंवा समारंभासाठी आला की बाबुराव ठाकुर हे आवर्जुन या व्यक्तीची राणी पार्वतीदेवी व मराठी ट्रेनिंग कॉलेज या संस्थाना भेट घडऊन आणत. विविध क्षेत्रातील अनेक ख्यातनाम व्यक्तीनी या दोन शिक्षण संस्थाना वेळोवेळी भेटी देऊन तेथे चाललेल्या शिक्षण कार्याबद्दल जे प्रशंसोद्‌गार काढले, अनेकांनी विद्यार्थांच्या ज्ञानात भर घालणारी उद्‌बोधक व्याख्याने दिली, त्यापाठीमागे बाबुराव ठाकुर यांचा डोळस प्रयत्न होता हे विसरून चालणार नाही.

आज मराठी ट्रेनिंग कॉलेज आणि राणी पार्वतीदेवी कॉलेज या संस्था सीमा भागातील जनतेची शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाची केंद्र बनून राहिली आहेत. याचे फार मोठे श्रेय बाबुरावांच्या शिक्षण विषयक निष्ठेला ध्येय प्रवणतेला आहे, यात शंका नाही.

बाबुरावांच्या कल्पकतेतून शिक्षण क्षेत्राच्या विकासाबद्दल त्यांच्या अनेक योजना होत्या. पण सीमा प्रश्न त्याचबरोबर समाजातील विविध गंभीर प्रश्न व त्यांच्या कणखर भूमिकेमुळे त्यांना कर्नाटक सरकाराकडून सोसावा लागलेला सारासार विरोध बहुविध स्वरूपाचे सार्वजनिक कार्य व दैनिकाचा वाढता व्याप यामुळे त्या कल्पना व संकल्पना प्रत्यक्षात उतरू शकल्या नाहीत, ही खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

शाळा कॉलेजांच्या निर्मितीनंतर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी धंदा उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांना व्यवसायिक शिक्षण उपलब्ध करून द्यावे हा विचार त्यांच्या मनात कायम घोळत होता. याबाबत उद्योजक शंकरराव किर्लोस्कर यांच्याशी त्यांचा विचार विनिमय होत असे. अशा प्रकारचे व्यवसायिक शिक्षणबाबतचे लेख ही आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्द करून तांत्रिक व औद्योगीक, व्यवसायिक शिक्षणाचे धडे देऊन तरूण पिढीला उत्साह व उमेद वाढवण्याचे मार्गदर्शन करून मराठा समाजातील तरूणांना व्यवसायाकडे वळण्याचा संल्ला देत असत. या त्याच्या तळमळीतून त्यांच्या मृत्युनंतर बेळगांव येथे किरण ठाकुर यांच्या प्रयत्नातून टेक्निकल कॉलेजच्या निर्मितीला स्थापत्य आणि तांत्रिक शाखांचे शिक्षण देणारी दर्जेदार तंत्रशिक्षणाची

विद्यालये सुरू केली आहेत.

'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या रूपाने बाबुराव ठाकुर यांनी जिल्हा वृत्तपत्राचा एक आदर्श निर्माण करून ठेवला आहे. वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम कसे असू शकते याचा उत्तम नमुना, बाबुरावानी जनतेसमोर ठेवला आहे. एखाद्या कठीण प्रसंगी पत्रकार दिर्घकाळ जनतेचे नेतृत्व करू शकतो. ही भारतीय वृत्तपत्रांची पंरपरा त्यांनी अबाधित ठेवली. पत्रकारीतेबाबत आपले विचार व्यक्त करताना बाबुराव म्हणतात 'लोकांची न्याय गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठी, सामाजिक आर्थिक धार्मिक अन्याय विरूध्द झगडा देण्यासाठी व समाजातील चालिरिती, रूढीपरंपरा त्याच बरोबर सांस्कृतिक दृष्टया समाजाला दक्ष ठेवण्यासाठी पत्रकारानी निर्भयपणे पुढे यायला पाहिजे, वृत्तपत्रानी कंबर कसायला हवी सामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्कावर गदा आली, तर यांच्या रक्षणासाठी पत्रकारानी पुढे येवून सत्य लेखन केले पाहिजे, तरच समाजावर चांगले संस्कार होतील याकडेही लक्ष दिले पाहिजे' हे विचार त्यांनी १९५० च्या बेळगाव येथील मराठी पत्रकार परिषदेत स्वागताध्यक्ष या नात्याने मांडले होते. ते त्यानी आपल्या संपूर्ण आयुष्यात एक पत्रकार म्हणून प्रत्यक्ष कृतीने आणले होते.

पत्रकारिता हा धंदा म्हणून नव्हे, तर एक धर्म म्हणून ते अखेर पर्यंत करीत राहिले, मुळच्या मराठी पत्रकारितेच्या बाण्याला अनुसरून बाबुरावांनी आपले 'व्रत' म्हणून 'तरूण भारत' चालविले.

'तरूण भारत' या वृत्तपत्रामध्ये वाङ्मयाला प्राधान्य दिले आहे. त्यांनी 'पुस्तक परिचय', 'साहित्य परिचय', 'भावडांची सृष्टी', 'नियतकालीकांची दिवाळी', 'मनोंरजक व बोधपर माहिती', 'देश सेवकांची चरित्र' अशी सदरे सुरू करुन अनेक प्रासंगिक लेख लिहिले व साहित्याची सेवा केली.

बाबुराव ठाकुरांनी माहितीपर सदरांनाही आपल्या वृत्तपत्रात महत्वाचे स्थान दिले होते. 'मनोरंजन व बोधपर माहिती या सदरातून अनेक विषय हाताळले आहेत. अशा या विषयाची भाषाशैली साधी व सर्वसामान्य, तरूण व विद्यार्थ्यांना रूचणारी असल्याने ही सदरे फार गाजली, या सदरांतून मनोरंजन तर व्हायचेच शिवाय बोधही मिळत असे.

बाबुराव ठाकुर यांनी आपल्या वृत्तपत्रात सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न सातत्याने केल्याचे निदर्शनास येते. त्यानी एक संपादक म्हणून समाजाला सुचेल, आवडेल असे अनेक विविध विषयांची हाताळणी केली व अनेक नवनवे प्रयोग करण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. 'तरूण भारतात हिंदी विभाग' या नावाचे सदर सुरू करून हिंदी वाचक वर्गाची सोय करून दिली. या सदरातील लेखन हे हिंदी भाषेत केले जात असे. त्यावरून या विभागातील हिंदी भाषिक व वाचकानाही आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न त्यानी केल्याचे दिसते.

बेळगांव शहर हे जाणकार व बुध्दीवादयांची खाण म्हणून ओळखले जाते. हा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी सर्व सण, उत्सव, जयंत्या साजऱ्या केल्या जातात. या कार्यासाठी बरीचशी सामाजिक मंडळे व स्त्री मंडळे पुढे आली आहेत. त्यांच्याकडून समाजमान्य व समाजाच्या उन्नतीसाठी काही उपक्रम राबवले जात त्याचाच एक भाग म्हणून वेगवेगळया विषयावर वैचारिक व्याख्याने ऐकण्यास मिळत. अशा भाषणांचा सारांश रूपात 'तरूण भारत' या वृत्तपत्राने वेध घेतला आहे.

बेळगांव शहर हे संस्कृती प्रधान शहर आणि कलेचे माहेर घर म्हणून सुरूवातीपासूनच प्रसिध्द आहे. अशा या शहरात १८ नवी व जुनी असे सिनेमागृहे आहेत. त्यावेळी करमणुकीचे साधन म्हणून बोलपटांना महत्त्वाचे स्थान होते. हे बोलपट प्रभावीपणे बघण्यात यावेत म्हणून वेगवेगळया सिनेमा थिएटरमध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला दिसून येतो. अशी काही थिएटर स्थापन होत असताना त्याची वाटचाल 'तरूण भारत' या वृत्तपत्रात बातमी स्वरूपात प्रसिध्द केली जात होती.

बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळाने अनेक साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे प्रेरक मार्गदर्शक केंद्र म्हणून आजपर्यत भरीव स्वरूपाची कामगिरी बजावली आहे. या मंडळाच्या तेजस्वी कार्याचा आढावा 'तरूण भारत' या बातमी पत्रातून घेतलेला आहे.

वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्य अविरत करणारी 'वाङ्मय चर्चा मंडळ' ही बेळगांवातील मोठी संस्था आहे. या संस्थेचा बाबुराव ठाकुर यांच्याशी निकटचा संबंध होता. या संस्थेच्या वाटचालीत त्यांचे मोलाचे योगदान आहे.

विद्वतापूर्ण व्यक्तीची भाषणे वसंत व्याख्यानमालेमार्फत आयोजित करून येथील नागरिकांची ज्ञान, विज्ञान त्याबरोबर वाङ्मयाची भूक भागवली जे विषय व्याख्यानांमार्फत मांडले जात त्या विषयाचा सारांश दुसऱ्या दिवशी 'तरूण भारत' च्या अंकात दिला जात असे.

बाबुरावांची पत्रकारिता व संपादक कार्याची खरी पोच मिळाली, ती जळगावच्या पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडीने त्यांच्या कार्याचे सार्थक झाले. त्यांना मिळालेल्या समाजाच्या उर्जेतूनच दिवसेंदिवस त्यांनी आपल्या 'तरूण भारत'ची सचोटीने प्रगती साधली.

बेळगावच्या विकासाच्या प्रक्रियेत अनेक व्यक्तीनी सहभाग घेतला. सांस्कृतिक दृष्ट्या शहराची ओळख निर्माण करून देणारेही भरपूर कलाप्रेमी व्यासंगी नावा रूपाला आले. त्याचबरोबर सामाजिक सुधारणेच्या व जनजागृतीच्या सर्व अंगाना स्पर्श करणारी व राजकीय, सामाजिक धार्मिक व शैक्षणिक आणि सांस्कृतिक समतेचा संदेश देऊन सर्वांगीण समतेचा विचार करणारी ध्येयवादी मंड्ळी बेळगाव शहराच्या सानिध्यात वाढली. अशा काही विभूतीनी बेळगाव या नगरीचे साहित्यिक, सास्कृतिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कर्तृत्त्व फार मोलाचे कर्तव्य बजावले आहे. बेळगाव शहराला लौकिक मिळवून दिला आहे. अशा कांही साहित्यिकांची दखल घेऊ गुणगौरव केला आहे. आपल्या मातीत निर्माण होणाऱ्या लेखन शैलीला पुढे आतून प्रसिद्धी मिळवून दिली आहे. अशा काही साहित्यिकांच्या साहित्याची चर्चा लेख व बातमी रूपाने केली आहे

बेळगावच्या वाङ्मय चर्चा मंडळाने अनेक साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे प्रेरक मार्गदर्शक केंद्र म्हणून भरीव स्वरूपाची कामगिरी बजावली आहे. या मंडळाच्या तेजस्वी कार्याचा आढावा या बातमी पत्रातून घेतलेला आहे.

वाङ्मय चर्चा मंडळाचे कार्य ग्रंथालय, वाचनालय व वक्तृत्त्व, काव्य गायन, नाटय, निबंध, गीता पठण अशा स्पर्धा, साहित्यिकांची विविध विषयावरील व्याख्याने साहित्य पुरस्कार प्रसिध्द साहित्यिकांचा गौरव या सर्व कार्यात मंडळाचे सभासदाबरोबर नागरिक व पत्रकार यांचा सह भाग महत्त्वाचा आहे. या मंडळाच्या कार्यामुळे बेळगावच्या सांस्कृतिक जडण घडणीत फार मोलाचा वाटा आहे हे विसरून चालणार नाही. मंडळाचे कार्य खेडोपाडी तळागळापर्यंत पोहचवण्याचे महान कार्य 'तरूण भारत' या वृत्तपत्राने केल. बाबुरावांनी समाजाच्या उन्नतीसाठी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जडणघडणीत सांस्कृतिक आणि विधायक दृष्टीकोन ठेऊन

समाजाचे हित साध्य करण्याचे प्रयत्न केले.

समाजातील वाचक वर्ग डोळ्यासमोर ठेवून ते अत्यंत साधी, सोपी, विनोदी व मार्मिक भाषा वापरून सर्वसामान्याना कळतील असे दाखले देऊन विवेचन करीत. नेहमी सत्य मांडण्यावर त्यांचा विश्वास होता. त्याचबरोबर त्यांची पत्रकारिता ही संयमी होती.

आपले वृत्तपत्रे सर्व विषयांनी परिपूर्ण असावे असाच बाबुरावांचा प्रयत्न असे म्हणून त्यांनी वाङ्मय या विषयाला मोठया प्रमाणात प्राधान्य दिले. त्यामध्ये पुस्तक परिचय, साहित्य परिचय, कथा, कांदबरी, काव्य व वाङ्मय चर्चा समीक्षा इत्यादी कार्याचा समावेश होतो. आपला 'तरूण भारत' हे समाजाचे अंतरंग, आशा, आकांक्षाची तळमळ दाखवणारा एक आरसा आहे. त्यातूनच ते दर्शन घडेल तेच या समाजाचे खरे स्वरूप असेल ही गोष्ट बाबुरावांनी आपल्या मनाशी बाळगली होती. त्यामुळे बाबुराव केवळ सामाजिक कार्यकर्ता म्हणून किंवा पत्रकार म्हणून नव्हेतर बेळगावातील सार्वजनिक जीवनाचे एक अंगच बनले होते. ते तेथील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे शिल्पकार होते.

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक सीमा भागात दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने केलेल्या कार्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन केले आहे. आजच्या व्यावसायिक वृत्तपत्र युगात तरूण पत्रकारितेच्या क्षेत्रात या वृत्तपत्राचे स्थान आणि महत्त्वपूर्ण आहे. या विषयाच्या अभ्यासामुळे नव्या पिढीला, वृत्तपत्र व्यावसायिकांना, शिक्षण सम्राटाना, राजकीय पक्ष नेतृत्त्वांना, सामाजिक कार्यकर्त्याना दिशा निर्देशन ठरणारे आहे.

मराठीतील आद्य पत्रकार आचार्य जांभेकर, लोकमान्य टिळक, आगरकरांच्या पत्रकारितेचा आदर्श घेऊन बाबुरावांनी मराठी वृत्तपत्रांची परंपरा कर्नाटक सीमाभागात चालविली.

संदर्भ ग्रंथसूची

अ) प्राथमिक साधने

१) मासिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९१९ ते १९२४

२) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९२८ ते १९४४

३) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९४४ ते १९६६

४) दैनिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९६६ ते १९८०

५) दैनिक, तरूण भारत, बेळगाव, २५ ऑक्टोबर १९८८

६) दैनिक, 'केसरी', पुणे, २४ एप्रिल १९७९

७) दैनिक, 'पुढारी', कोल्हापूर आवृत्ती, १ नाव्हेंबर १९८२

८) कुंटे जगदीश, तरूण भारत, एक गौरवशाली परंपरा(माहितीपट) तरूण भारत वृत्तपत्रास ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दि.३० मार्च १९९९ रोजी तयार करण्यात आलेला माहितीपट.

९) पाटील अनंतराव, तरूण भारतचे बाबुराव ठाकुर, विशाल सहयाद्री, दि.२९ एप्रिल १९७९

१०) ठाकुर बाबुराव, जळगाव पत्रकार परिषदेतील छापील अध्यक्षीय भाषणे, १३ जून १९६५

११) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

१२) मुचंडी कृष्णा, बेळगावातील मराठी समाज, मराठा युवक संघ स्मरणिका, बेळगांव, १९७६.

१३) राजाध्यक्ष ग.गो., बाबुराव ठाकुरांची पत्रकारिता, दैनिक तरूण भारत, अक्षरयात्रा, पुरवणी, २६ डिसेंबर १९९९

१४) साप्ताहिक, 'राष्ट्रवीर', बेळगाव, फाईल १९२१ ते १९७९ चे अंक

१५) साप्ताहिक, 'वीरवाणी', बेळगाव, फाईल १९८० ते १९८३ चे अंक

१६) साप्ताहिक, 'बेळगाव समाचार', फाईल १९९९ ते १९५५ चे अंक

१७) सुंठणकर बा.र., पुढारी संपादक परंपरेतील अखेरचा लढवय्या बाबुराव ठाकुर, दै. महाराष्ट्र टाईम्स, ४ मे.१९७९

ब)विशेषांक

१) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव स्वातंत्र्य दिन, विशेषांक, १५ ऑगस्ट १९४७

२) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, रौप्यमहोत्सवी अंक, ८ जानेवारी १९५४

३) प्रभू प्रिया, 'समरांगण हे जीवन ज्यांचे' प्रकाशक किरण बाबुराव ठाकुर,'तरूण भारत प्रेस' समादेवी गल्ली, बेळगाव, १९७५

४) मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती सुवर्ण महोत्सवी विशेषांक, दि.८ जानेवारी १९८९

५) मासिक, तरूण भारत, बेळगाव, लोकमान्य टिळक, विशेषांक , नोव्हेंबर १९२०

६) लेले एम.एच.(प्रकाशक), आर.पी.कॉलेज, बेळगाव वार्षिक अहवाल, १९४८–४९

७) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, पांगिरे प्रकरण, विशेषांक , दि.१० एप्रिल १९४५

८) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, काँग्रेसचा सुवर्ण महोत्सवी विशेषांक , दि.१८ डिसेंबर १९३५

९) स्मरणिका, स्मृतिगंध, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, २० फेब्रुवारी १९८२

१०) वेणुनाद, ७३ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, प्रकाशक कृष्णा शहापूरकर, बेळगाव २८ एप्रिल २०००

क) स्मरणिका (स्मृतिदिन विशेषांक)

१) कुंटे मो.ग., एक आनंदयात्री, स्मृतिग्रंथ, ५ डिसेंबर, २०१३, प्रकाशन श्री सरस्वती वाचनालय कोरे गल्ली, शहापूर बेळगांव

२) केळकर गोविंद, ज्ञानदीप, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, मराठी ट्रेनिंग कॉलेज, टिळकवाडी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९४२ ते १९९२, ८ जानेवारी, १९८९

३) पाटील न.भू, नरसिंगराव भुजंगराव पाटील गौरवांक बेळगांव, समाज सुधारणा मंडळ, १९८१

४) ठाकुर बाबुराव, प्रथम स्मृतिदिन विशेषांक, २४ एप्रिल १९८०

५) ठाकुर माई बाबुराव, ते अखेरचे दिवस, स्मृतिसुगंध बाबुराव ठाकुर, तृतीय स्मृतिदिन विशेषांक, बेळगाव, २३ एप्रिल १९८२

६) स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकुर तृतीय स्मृतिदिन विशेषांक, २३ एप्रिल १९८२

७) शानभाग आर.डी., मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९३७ ते १९८८, ८ जानेवारी, १९८९

ड) दुय्यम साधने (इंग्रजी)

1) Apte Ram, Maharashtra- Karnataka Border Dispute, Kiran Thakur working President, M.E.S., Belgaum city unit, Belgaum, 20 October 2010

2) Barns, Margarita ; The India Press George Allen and Unwin, London, 1940 (Intranet www. Barns)

3) Bhandare Vasant R., Maharashtra- Karnataka Border Dispute Politics of Municipalation, Kirti Prakashan, Sion Bombay-1979

4) Chaudhary S.C., History of Modern India, Edition Surjeet Publication, Kamala Nagar Dehli 2004.

5) Gupta D.G., 'Indian National Movement and Constitutional Development Vikas Publishing House PVT. Ltd., New Dehi, Third Edition, 1976

6) Gupte R.S., The History Of Modern China, Nationaliz And Communism in India Stirling, Publication, 1974

7) Joshi P. S, and gholkars .v history of modern india (1800 to 1964) S. chand & Co., Ltd, New Delhi, 1983.

8) Kamat Surynath U.(ed.), Belgaum Gazetteer, Bengalore Government Of Karnataka, 1987.

9) Kamath Suryanath U. Gazzetter of India. Karnataka state, Belgaum, Districts, Government of Karnataka Publishing, 1987.

10) Nalawade Viji N., Keshavrao Jedhe a non Brahmana Nationalist Political Leader.(Unpublished Thesis) 1984.

11) Shaik Ali B., History its theory and method] published by S.G.wasani for Macmillan india limited and printed by T.K. Sengufta at india press madras, 1978.

दुय्यम साधने (मराठी)

१) अकलुजकर प्रसन्नकुमार, मराठी वृत्तपत्र सृष्टीचे अंतरंग, श्री विद्या प्रकाशन, पुणे, सप्टेबर २०००

२) अकलुजकर प्रसन्नकुमार, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, २००७

३) अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड ३, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, २००७

४) कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, शशिकांत पिंपळपुरे विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जून २००९

५) कानडे रा.गो., मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिसिंग हाऊस, पुणे १९३८

६) कायंदे–पाटील, गंगाधर वि., संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, चतुर्थ आवृत्ती, २५ डिसेंबर २००८.

७) काळे वि.र., आचार्य अत्रे, महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व, वसंत बुक स्टॉल, मुंबई, पहिली आवृत्ती, २५ जानेवारी २००९

८) किर धनंजय, महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७५

९) किर धनंजय, राजर्षी शाहू महाराज, प्रकाशक रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००५

१०) कुलकर्णी व.दि., मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास खंड १, पुणे, १९८७

११) कुलकर्णी एस.के., पत्रकारिता मार्गदर्शक, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, जानेवारी २००९.

१२) कुंबेर वा.ना., भारताचा स्वातंत्र्य लढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

१३) केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०१०

१४) गव्हाणे सुधीर, प्रस्तावना पत्रकारिता रूप आणि स्वरूप, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन पुणे, ऑगस्ट २००९

१५) गोखले किरण, पत्रकारिता विद्या, वृत्तसंकलन(लेख) भट गो.आ. मॅजिस्टेक प्रकाशन प्रथमावृत्ती, २००३

१६) गोगटे भा.वी., बेळगाव दर्शन, लोकप्रिय प्रेस, बेळगाव, १९७०

१७) चव्हाण किशोर, माहिती संप्रेषण आणि शैक्षणिक मुल्यमापन, प्रज्ञा प्रकाशन नाशिक, २००३

१८) चौगुले एल.आर., भाई दाजीबा देसाई नेतृत्त्व आणि कर्तृत्त्व, भाई दाजीबा देसाई कॉलनी, बेळगाव, १९८८

१९) चौगुले एल.आर., भली माणस, राज्ञी प्रकाशन बेळगाव, पहिली आवृत्ती, २००३

२०) जोशी एस.एम., सीमा सत्याग्रह आणि राष्ट्रीय एकात्मता, साधना प्रकासन, पुणे, पहिली आवृत्ती, १९८६

२१) टिळक दिपक जयवंत, लोकदिन जपणारा राष्ट्रीय ठेवा केसरी, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र वृत्तपत्र गौरव ग्रंथ, संपादक रविंद्र बेडकिहाळ, फलटण, महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी, २०१०

२२) तोरो अ.रा.(संपा.), महाराष्ट्रकर्नाटक सांस्कृतिक अनुबंध, अरूण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ ऑक्टोबर २००१

२३) देसाई दाजिबा (संपा.), राष्ट्रवीर, सुवर्ण महोत्सवी विशेषांक १९२१ ते १९७१

२४) देसाई बाबुराव, सगे सोयरे, बेळगाव, सौ.सीमा रविकिरण इनामदार, रविराज प्रकाशन, बेळगाव, १९८५

२५) देशपांडे मीना, हुतात्मा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे ४ प्रथमावृत्ती १ मे २०१०

२६) देशपांडे अ.वा., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १, व्हिनस प्रकाशन पुणे, १९७४

२७) देशपांडे बा.य., बेळगांवातील स्वातंत्र्य संग्राम, (बेळगाव : बेळगाव जिल्हा खादी ग्रामोद्योग संघ) जे कॉय प्रिटींग प्रेस, बेळगांव, १९७८

२८) देशपांडे वसंत वासुदेव, महाराष्ट्राची सुवर्णगाथा, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती, २८ फेब्रुवारी २०११

२९) दिघे पी.डी., महाराष्ट्रातील सामाजिक सांस्कृतिक चळवळ, अक्षर प्रकाशन, मुंबई, १९९५

३०) धारवाडे बाबुराव, पुढारीकार ग.गो. जाधव, गौरव ग्रंथ, अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, १९७७

३१) नांदूरकर राम, गुरूवर्य शामराव देसाई व्यक्ती व कार्य, गुरूवर्य शामराव देसाई गौरव समिती, बेळगाव, २०००

३२) पटवर्धन वि.अ., दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानच्या विलिनीकरणाच्या कथा, वि.अ. पटवर्धन, १२२६/५, शिवाजी नगर, पुणे ६६

३३) पंत एन.सी., पत्रकारिता का इतिहास, तक्षशिला प्रकाशन दिल्ली, २००२

३४) पानसे भाऊ, महाराष्ट्रात विनोबा, ग्राम सेवा मंडळ, परधाम विद्यापीठ, पो.पवनार, जि.वर्धा, १९५८

३५) पाटणे संभाजीराव, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे एक धगधगीत व्यक्तिमत्त्व, पुणे, १९७६

३६) पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय प्रकाशन मुंबई, तिसरी आवृती, २०१०

३७) पै.नाथ, लोकशाहीची आराधना, साधना प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १८ जानेवारी १९९६.

३८) प्रधान ग.प्र., स्वातंत्र्याचे महाभारत, साधना प्रेस आणि साधना प्रकाशन, पुणे, १९८९

३९) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ४ ते ७, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८३

४०) महाजनी ह.रा., संयुक्त महाराष्ट्राची समस्या, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, १९८७

४१) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र म्हैसूर केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र म्हैसूर सीमावाद विषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई.

४२) मठकर दयानंद, महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ.नाथ पै, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, सप्टेबर २००८.

४३) महाराव ज्ञानेश, उठाव महाराष्ट्र देश, पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथ्मावृत्ती, १ नोव्हेंबर २००१

४४) माजगावकर ग., ग्रामदानाची प्रयोगभूमी, ब.ओ.पुरंदरे प्रकाशन पुणे, १९५८

४५) माळी पी.जी., रणजित देसाई जीवन आणि साहित्य, शब्दवेल प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००१

४६) मेणसे कृष्णा, असा घडलो असा लढलो !, प्रकाशन लोकवाङ्मय गृह भूपेश गुप्ता भवन, मुंबई, २००३

४७) राऊत गणेश व राऊत ज्योती, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स.१८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती, डिसेंबर २००९

४८) लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, तृतीयावृत्ती, २००९

४९) लोहार र.म., आधुनिक भारताचा इतिहास, पुणे विद्यापीठ गृहप्रकाशन पुणे, १९९१

५०) वाड विजया (संपा.), मराठी विश्वकोश खंड १८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई, २००९

५१) शुक्ल आर.एल.(संपा.), आधुनिक भारत का इतिहास, दिल्ली विश्वविद्यालय, पुनर्मुद्रण १९९८

५२) सरकार चंचल, कहानी वर्तमानपत्राची, (अनुवाद दिनकर मांगल), नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली, १९८९

५३) सरदेसाई मनोहर हिरबा, गोवा, दमण, दीव, स्वातंत्र्य लढयाचा इतिहास खंड १ व २, प्रकाशक क्रिडा व सांस्कृतिक संचालनालय गोवा, पणजी गोवा, १९८६.

५४) संग्राम, सीमा भागात ब्रिटीशराज सीमा लढा विशेष, असा आहे सीमा प्रश्न, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, २०१२

५५) सोनवणे मनोहर, कात्रीतल बेळगाव, www.uniauesfeatures.com.in

.इ) वृत्तपत्रे

१) दैनिक 'तरूण भारत', बेळगाव

२) दै. 'सकाळ', बेळगाव (आवृत्ती)

३) दै. 'पुढारी' कोल्हापूर

४) दै. 'केसरी', पुणे

५) दै. 'लोकमत', कोल्हापूर (आवृत्ती)

६) दै. 'लोकसत्ता', मुंबई

७) दै. 'पुण्यनगरी', कोल्हापूर

८) साप्ताहिक, 'राष्ट्रवीर', बेळगांव

९) साप्ताहिक 'बेळगाव समाचार', बेळगाव

१०) साप्ताहिक, 'वीरवाणी' बेळगाव

ई) नियतकालिक

१) प्रबोधन प्रकाशन ज्योती(मासिक)

२) संग्राम (मासिक)

३) लोकराज्य (मासिक)

४) साधना (साप्ताहिक)

ऊ) अप्रकाशित एम्.फिल. व पीएच.डी. प्रबंध

१) Dhapake (Pralad) N.J., 'Baburao Thakur (1899-1979) Freedom Fighter and Journaist Of Belgaon', Shivaji University, Kolhapur, M.Phil, 1990.

२) Shinde S. P., 'Contribution of Pudhari to the socio, political movements in Southern Maharashtra up to 1972', M.phil thesis, shivaji university Kolhapur, 1993.

३) कोळसेकर मनोहर सुबराव, 'दाजीबा देसाई व्यक्ती व कार्य' अप्रकाशित एम्.फिल्. शोधप्रबंध, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २०१२

४) साळुंखे संजय गुंडाप्पा, 'बाबुराव ठाकुर यांची पत्रकारिता', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मास्टर ऑफ जर्न्यालिझम अँड कम्युनिकेशन सायन्स (एम.जे.सी.) या पदवीसाठी सादर केलेला लघुप्रबंध, मे २०००

५) निर्मळे हरिचंद्र सिद्राम, 'दलितांची मराठीतील नियतकालिके एक विवेचन अभ्यास' (इ.स.१८८७ ते १९५०) पीएच.डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९८१

६) पाटील वि.रा., 'राष्ट्रवीर वृत्तपत्राचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्य', सन १९२१ ते १९७७) पीएच.डी.(इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०११

७) पाटील तुकाराम शंकर, 'समाजवादी पक्षाचे महाराष्ट्रतील कार्य' (इ.स.१९३४ ते १९७७) पीएच. डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००९

८) रणखांबे नंदिनी रविंद्र, शंकरराव मोरे जीवन व कार्य पीएच. डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००६

९) शिंदे एस.पी., सावंतवाडी संस्थानचा इतिहास, पीएच. डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००४

उ) मुलाखत

१) कुंटे जगदीश(सहा.संपादक), दैनिक तरूण भारत, बेळगाव, २२ मे, २०१२, दैनिक तरूण भारत मुख्य कार्यालय बेळगाव, मुलाखत, दु. १२.०० वाजता.

२) कोलेकर तुकाराम कृष्णाजी, मा.आमदार, गडहिंग्लज, दि.२२ ऑगस्ट २०११, नेसरी, सकाळी ११ वाजता मुलाखत.

३) पाटील धनाजी राघोबा, बिजूर ग्रामस्थ, वय वर्षे ७८, राहत्या घरी मुलाखत, ०६ मे, २०१३, दु. ३.०० वाजता.

४) ठाकुर किरण(संपादक), दैनिक तरूण भारत, बेळगाव, १२ मे, २०१२, दैनिक तरूण भारत मुख्य कार्यालय बेळगाव, मुलाखत, सकाळी ११.०० वाजता.

५) शिंदे रानाप्पा गुंडू, बिजूर ग्रामस्थ, वय वर्षे ७५, राहत्या घरी मुलाखत, २२ ऑगस्ट २०१३, दु. ३.०० वाजता.

ए) संकेतस्थळ

1) Website – divyamarathi.com

2) Website – minority group – wilkpedia, the frpm.encyclopedio, Date- 12 Jan. 2012

3) www.belgaum.nic.in

4) www.belgaum.wikipedia

5) www.population, belgaum, Date 3/3/12


6) http:samyukta Maharashtra.org/

7) दै. 'तरूण भारत' सीमा प्रश्न संपादकीय लेख, इंटरनेट


http :/mr.wikipedia; org/wiki, Date, 25 Jan 2012



'तरूण भारत'चा पहिला अंक



दै. तरूण भारतचे संस्थापक संपादक, बाबुराव ठाकुर यांचे हस्ताक्षर



॥ श्री ॥

परमपूज्य देशभक्त सरदार वल्लभभाई पटेल महाशय,

आपल्या आगमनाने आह्मा बेळगांव जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांना आज अत्यंत आनंद होत आहे. राष्ट्रीय सभेच्या कार्यक्षेत्रांतील आपली कामगिरी अत्यंत भरीव व उज्वल आहे. नागपूरच्या कॉंग्रेसमध्ये असहकारितेचा ठराव पास होऊन राष्ट्रीय महासभेच्या राजकारणास स्वावलंबी वळण लागोंत तेव्हांपासून आपण राष्ट्रीय सभेच्या क्षेत्रांत विशेष आस्थेने काम करीत आहां. अहमदाबाद कॉंग्रेसच्या स्वागतमंडळाचे अध्यक्षस्थान स्वीकारून आपण बहुमोल कामगिरी केली व पुढील अधिवेशनांना साधेपणाचे उदाहरण घालून दिले. अहिंसामय असहकारितेचा स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग म० गांधीनी महासभेच्या राजकारणांत रूढ करून ठेविल्यानंतर त्या मार्गाची शक्यता व उपयुक्तता लोकांना पटवून देण्यामध्ये आपण पुढाकार घेतला.

अहमदाबाद म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष या नात्याने केलेली आपली कामगिरी म्हणजे अनेक अडचणी व निर्बंध असतांनासुद्धां एखाद्या कार्यक्रम व कर्तबगारीच्या अध्यक्षाला म्युनिसिपालिटीचे काम उत्तम तऱ्हेने कसे करतां येते याचे एक उदाहरणच होय.

आह्मा सर्वांना अत्यंत प्रिय व वंद्य अशा तिरंगी राष्ट्रीय निशाणाच्या मिरवणूकीला नागपूर शहराच्या विवक्षित भागांत बंदी करून मध्यप्रांत सरकारने जेव्हां आपल्या मनाचा क्रूरतेपणा व्यक्त केला त्यावेळीं राष्ट्रीय निशाणाची अब्रू राखण्यासाठी व व्यक्ति स्वातंत्र्याचे तत्त्व सिद्ध करण्यासाठी आपण नागपूरला धाव घेतलीत व त्या निशाणाच्या सत्याग्रहाच्या यज्ञांत आपण मुख्य भागीदार झालात.

सुरत म्हणून प्रसिद्ध असलेला व हिंदुस्थानच्या इतर प्रांतांशी तुलना करतां साधारणपणें सुधिवंतांत असलेला गुजराथ प्रांत अतिवृष्टीमुळे संकटांत सांपडल्यावेळीं आपण परोपकाराचें ब्रीद स्वीकारून पुढे झालांत व आपल्या कर्तव्यगारीने मुंबई सरकारलासुद्धां डोळे उघडण्यास लावलेत. आपणासारखे एकनिष्ठ लोकसेवक ज्या प्रान्तांत उत्पन्न होतात तो प्रांत नशीबवान होय.

'वाडोलीचा वैर फुकट गेला' म्हणून असहकाराच्या चळवळीची हेटाळणी करणाऱ्या लोकांना, वाडोलीचा सत्याग्रह यशस्वी करून, सुसंघटित कार्य केल्यास गरीब रयतेचे हातूनसुद्धां महत्कार्ये होतात, हें आपण सिद्ध करून दाखविलेत. बलाढ्य पाशवी शक्तीच्या सरकारपासून आपले जन्मसिद्धहक्क मिळविण्याची खटपट करणे व्यर्थ होईल अशा निराशेमुळे उत्पन्न होणारी निष्क्रियता व पारतंत्र्याचे पाश हल्ली त्या मार्गानी तोडून टाकण्यासाठी उत्सुक झालेल्या लोकांच्या मनांत घुमसणारा अत्याचार या दोहोंचा फोलपणा सिद्ध करण्याचे महत्कार्य, विधायक कार्यक्रमाच्या पायांवर उभारलेल्या अहिंसामय असहकारानें वाडोलीमध्ये आपण केले आहे. व जगांत नैतिक व आत्मिक शक्तीपुढें पाशवी शक्तीला केव्हांहि मान खालींच घालावी लागणार हें आपण सिद्ध केले आहे.


अहिंसामय असहकाराच्या युद्धांत निःशस्त्र व अनाथ अशा वाडोलीच्या रयतेचे नेतृत्व स्वीकारून त्यांना यश संपादन करून दिल्यामुळे अखिल हिंदी राष्ट्राने आपणास सरदार अशी योग्य व सार्थ पदवी दिली आहे.

अखिल हिंदुस्थानांत रयतेवर अनेक तऱ्हेचे अन्याय होत असले तरी चिरकालच्या पारतंत्र्यामुळे दिङ्मूढ झालेल्या हिंदी राष्ट्रामध्ये आपण पुढाकार घेतलेल्या वाडोलीच्या यशस्वी सत्याग्रहामुळे आशेचा नवीन अंकूर उत्पन्न झाला आहे व त्याचेच द्राक्षफल म्हणजे मुंबई प्रांतिक जमीनदार संघाची स्थापना होय; या संघाचे अध्यक्षपद व नेतृत्व मंबई इलाख्याने आपणाकडे दिले ते योग्यच झाले आहे. दारिद्र्यांत व पारतंत्र्यांत पडून कष्ट सोसणाऱ्या हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी ऐहिक संपत्ति व सुखोपभोग प्राप्त करून घेण्याचा सोपा व शोर्टकार्टी सोडून, परंपरी सचेती अहर्निश झगडण्यांत व सामान्य जनसमूहामध्ये सत्य व स्वाभिमान यांची ज्योत प्रज्वलित करण्यांत आपण सदैव तत्पर आहात. आपल्या उज्वल उदाहरणाचे अनुकरण करण्याची सद्बुद्धि हिंदी तरुणांत उत्पन्न होवो व हिंदी राष्ट्राचा स्वातंत्र्यदिन पाहण्यासाठी परमात्मा आपणास दीर्घ आयुरारोग्य देवो हीच त्या जगन्नियंत्याच्या जवळ प्रार्थना आहे.

आपले नम्र सहकारी.
बेळगांव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सभासद व उपाध्यक्ष.

ता० १५/९/१९२९.

सरदार वल्लभभाई पटेल याना बेळगांव जिल्हा कॉंग्रेस कमिटी व बेळगांव नगरपालिकेने दिलेले मानपत्र दि. १४ सप्टेंबर १९२९



तरुण भारत बेळगांव, तारीख ४।२।१९४१ ३

चंदगड महाल ग्रामसुधारणा सप्ताहानिमित्त-

गांवांचे गट व स्थानिक कमिट्यांची योजना.

ग्रामसुधारणा सप्ताहानिमित्त स्वावलंबनाच्या जोरावर चंदगड महालातील गांवोगावचे ले गटारे वगैरे तयार करण्याचे काम ९० खेड्यांतून सध्या चालू असून कामाच्या सोईच्या दृष्टीने कार्यांची अंमलबजावणी लौकर व्हावी या उद्देशाने खालील योजना तयार केली आहे. चंदगड ालाचे एकूण दहा गट पाडण्यांत आले असून त्या त्या गटाकरितां प्रातिनिधिक स्वरूपाच्या मिट्या स्थापन करण्यांत आल्या आहेत.

बहुतेक सर्वच खेड्यांतून रस्ते तयार करण्याचे काम चालूं आहें. कांहीं ठिकाणी रस्ते यार झाले आहेत; व अद्याप कांहीं ठिकाणचे रस्ते तयार व्हावयाचे आहेत. तरी अपुरे राहिलेले ते व इतर कामे चालू आठवड्यांत पूर्ण करून घेण्याची कृपा करावी. लोकांच्या सहकार्यावरच अवलंबून आहे.

आपल्या गांवातील रस्त्यांचे व गटारांचे काम पूर्ण होतांच तेथील कार्यकर्त्यांनीं आपण केलेल्या स्त्यांची व गटारांची लांबी रुंदी मोजून व त्या कामाकारितां किती लोक, किती दिवस खपले ची पूर्ण माहिती पाठवावी.

टीप:—खालील कमिट्यामध्ये आणखी जास्त कार्यकर्ते सामील करून घेण्याचा अधिकार या सर्व कमीट्याना आहे.

खेडोपाडीं तूर्त हातीं घेतलेलीं कामें.

१ रस्ते व गटारें.
सर्व गांवातून गटारें मारणें व मुरूम घालून रस्ते तयार करणें.

२ स्वच्छता.
गांवातील सर्व ठिकाणीं पूर्ण स्वच्छता ठेवणें.

३ पाणवठे.
मनुष्याकरितां व जनावराकरितां निरनिराळे पाणवठे करून ते स्वच्छ ठेवणें.

१ अडकूर गट.

१ अडकूर, २ विंझणें, ३ अलवादेवी, ४ उत्साळी, ५ आमरोळी, ६ बोंजुर्डी, ७ शिरोली, ८ केंचेवाडी, ९ सातवणें, १० मुगळी, ११ पोरेवाडी, १२ सोनारवाडी, १३ आसगोळी, १४ मोरेवाडी.

१	श्री. अडकूरकर इनामदार	अडकूर
२	,, नारायणराव पाटणेकर	,,
३	,, नारायण सुबराव देसाई	,,
४	,, निलकंठ कृष्णाजी सोहोनी	,,
५	,, इराप्पा कोट	,,
६	,, दौलतराव देसाई	उच्चाळी
७	,, तातोबा ,,	,,
८	,, आप्पाजीराव दत्ताजीराव देसाई	शिरोली
९	,, गणपतराव गोविंदराव ,,	,,
१०	,, मंगू बाळा तलवेकर	सत्तेवाडी
११	,, वामन दत्तात्रय शिरोळकर	शिरोली
१२	,, विठू संतू गावडा	केंचेवाडी
१३	,, सटू भोंदू पाटणे	सातवणे
१४	,, सुबराव सटू गावडा	,,
१५	,, शांताराम भैरोबा तेरगांवकर	मुगळी
१६	,, लक्ष्मण हरी देशपांडे	,,
१७	,, व्यंकोजी निंगोजी पाटील	बोंजुर्डी
१८	,, भागोजी गंगाजी कोले	अलवादेवी
१९	,, सावंत गणू पोवार	,,
२०	,, शंकरराव विंझणेकर इनामदार	विंझणे
२१	,, सताजीराव गोपाळराव देसाई	आसगोळी
२२	,, तात्यासाहेब पाटील	,,
२३	,, बाबू मंडलीक	आमरोळी

२ तांबुळवाडी गट.

१ तांबुळवाडी २ हुकरवाडी ३ माणगांव ४ तरगांव ५ गुंडेवाडी ६ जटेवाडी ७ दाटे ८ लाकुडवाडी ९ नरेवाडी १० मलगड ११ शिवनगे १२ लकीकटे.

१	श्री. सदाशिव जयवंत देशपांडे	तांबुळवाडी
२	,, गंगाधर रामचंद्र देशपांडे	,,
३	,, रवळू गावडोजी पाटील	,,
४	,, धोंडी धनाजी पाटील	,,
५	,, हणमंत सुबराव देसाई	बागिलगे
६	,, कल्लापा भरमाणा गावडा	हुकरवाडी
७	,, निलकंठ लाडोबा हवालदार	,,
८	,, मल्लू बाळा पिटूक	माणगांव
९	,, दऱ्याप्पा शिवापा पाटील	,,
१०	,, शिवरुद्र चन्नापा कोटिवाले	,,
११	,, मसाणा बाळू निटूरकर	लाकूडवाडी
१२	,, रोंम्या विठोबा जाधव	मलगड
१३	,, बापू लक्ष्मण गावडा	वरगांव
१४	,, भागाणा विठोबा गावडा	गुडेवाडी
१५	,, जैनू रवळोजी गावडा	जटेवाडी
१६	,, बाळा लक्ष्मण गुरव	दाटे
१७	,, कृष्णाजी विष्णु देशपांडे	,,
१८	,, गावडू लक्ष्मण गावडा	नरेवाडी
१९	,, खेमाणा बाबाजी पाटील	,,
२०	,, कृष्णराव सडेकर	लकीकटे

३ हलकर्णी गट.

१ हलकर्णी, २ हल्लारवाडी, ३ करंजगांव, ४ आंबेवाडी, ५ तुर्केवाडी, ६ जंगमहट्टी, ७ कलिवडे, ८ माडवळे, ९ किटवडे.

१	श्री. भिकाजी श्रीपाद नाडगौडा	हलकर्णी
२	,, गोपाळ दत्तात्रय नाडगौडा	,,
३	,, विष्णू यशवंत सबनीस	तुर्केवाडी
४	,, आत्माराम भैरव सबनीस	,,
५	,, शांताराम नारायण सबनीस	,,
६	,, अमृत गोविंद सबनीस	,,
७	,, जानबा रेमजी पाटील	,,
८	श्री. नारायण आपाजी गावडा	हल्लारवाडी
९	,, रामा कुमाण्णा गावडा	करंजगांव
१०	,, अण्णा रामाण्णा गोरल	आंबेवाडी
११	,, लक्ष्मण यल्लापा गावडा	कलिवडे
१२	,, भावकू भिकू गावडा	जंगमहट्टी
१३	,, अच्युत सदाशिव देशपांडे	माडवळे
१४	,, निंगा रामगावडा	,,

४ कानूर गट.

१ कानूरखुर्द २ सडेगुडवळे ३ पिळणी ४ पुंदरे ५ भोगोली ६ कानूरबुद्रुक ७ बिजूर ८ कुर्णी ९ बुजवडे १० धामापूर.

१	श्री. केशव गणेशेट तेली	कानूर
२	,, गुंडो शेकर उसपकर	पुंदरे
३	,, दामोधर सहदेव नेरूरकर	,,
४	,, ज्ञानोबा पांडुरंग गावडा	,,
५	,, हरी कृष्ण गावडा	भोगोली
६	,, आपा लक्ष्मण गावडा	,,
७	,, झिलू चौगुला	,,
८	,, आपा देसाई सनदी	कानूरबुद्रुक
९	,, माधवराव वेशवंतराव भोसले	बिजूर
१०	,, सतबा गावडा	कुर्णी
११	,, रवळू नारू गावडा	,,
१२	,, बाबू विठोबा गावडा	पिळणी
१३	,, मडशा आनगावडा	,,
१४	,, हिरू बेसगावडा	सडेगुडवळे
१५	,, भाऊराव दळवी	बुजवडे


५ हिंडगांव गट.

१ हिंडगांव २ गवसे ३ ह्यावळगे ४ काजिर्णे ५ इब्राहिमपूर ६ सावर्डे ७ कानडी ८ पोवाचीवाडी.

१	श्री. पांडुरंग रवळनाथ चिटणीस	हिंडगांव
२	,, आपा सोनापा फाटक	,,

(पान ४ पहा)

बाबुराव ठाकुर यांच्या नेतृत्त्वाखाली श्रमशक्तीसाठी चंदगड महालात तयार केलेले गाववार गट



तरुण भारत बेळगांव, तारीख १३।१।१९४१

चंदगड महालातील—

स्वावलंबनाचे नमुनेदार उदाहरण !

७२ खेड्यांच्या लोकांनीं आपले रस्ते तयार केले !!

सामुदायिक सहाय्यातूंन चंदगड महालातील सर्व खेड्यां-रस्ते, पाणी-पुरवठा व सार्वजनिक स्वच्छता काम हाती घेण्यात आले. खेड्यातील जनता, कामगार, समितीचे शिक्षक व सरकारी अधि-यां या सर्वांच्या सहाय्याने तेथे जी कामगिरी झाली हवाल वाजूस देण्यात आला आहे. लोकानी हे काम स्वावलंबनाच्या जोरावर पार पाडले आहे. बोर्ड अगर सरकार यांच्या मदतीशिवायसुद्धा केवळ स्वतःच्या श्रमाने काय करू शकतात याचे नमुनेदार उदाहरण आहे !

अशाच तऱ्हेचे काम खानापूर तालुक्यातही नुकतेच काण्यात आले आहे.

Appreciation of the Village - Work

by the D. L. B. Belgaum.

The village road ,work done by the people of the following villages in Chandgad Mahal, was inspected by me and the Engineer, D. L. B. during our recent inspection in that part of the District:—

1. Kanur Budruk
2. Hindgaon
3. Shirgaon
4. Naganwadi
5. Koraj
6. Belebhat
7. Date
8. Tambulawadi
9. Motanvadi
10. Jangamhattt
11. Kurtanvadi

The Engineer expressed satisfaction at the work already done and gave instructions for its improvements and future maintenance.


It was a great pleasure to see the very useful work done by the village people. The results obtained,are a standing instance to show how, concerted and willing labour contributed by the villagers can be utilized for the welfare of the villages, by proper guidance. I hope the work done by the Chandgad Mahal people will be a source of inspiration, for similar work to the village people in other parts of the District.

District Local Board Office
Belgaum 5 May 1940.

V. M. Sukhatankar,

अ. नं.	गट व गांवचे नांव.	गांव लीळ रस्ते.		गांवापासून बाहेर गेलेले रस्ते.		किती लोक राबले.
		लांबी फूट.	रुंदी फूट.	लांबी फूट.	रुंदी फूट	
	१ अडकूर गट.					
१	विंझणे	२२१०	९	३९०	१३	२४०
२	मुगळी	२६००	९	...	...	२००
३	सोनारवाडी	१२००	८	...	...	१५०
४	शिरोली	८२५	८	...	...	६०
५	सरंबवाडी	५७५	१३	...	...	१६०
६	पोरेवाडी	२३००	९	...	...	२७५
७	सातवणे	१४२५	१०	१२१०	१४	४००
८	आसगोळी	८८५	११	...	...	१७५
९	उत्साळी	१३४४	१०	...	...	१०५
१०	आमरोळी	१८१०	९	...	...	२००
११	अस्वादंवी	१३५०	९	...	...	८०
१२	बोंजुर्डी	९४०	८	...	...	१००
१३	मोरेवाडी	३७५	९	...	...	१५०
	२ तांबुळवाडी गट.					
१४	तांबुळवाडी	३७८८	१२	...	...	२२५
१५	डुकरवाडी	३२३८	९	...	...	२००
१६	दाटे	५००	११	५५०	१४	४००
१७	बेळेभाट (दाटे)	७७६	१०	२९४	१४	२१०
१८	नरेवाडी	२०२२	११	...	...	१३५
१९	गुडेवाडी	१०२०	१०	...	...	१२०
२०	जटेवाडी	५००	१०	...	...	५०
२१	मलगड	६५०	१०	...	...	१५०
२२	लाकुडगडी	८६४	११	...	...	२००
२३	बागिलगे (डुकरवाडी)	७७५	११	...	...	२००
२४	शिवणगे	...	...	...	...	...
२७	लकीकट्टे					
	३ हलकर्णी गट.					
२८	माडवळे	१८२५	१२	१०२०	१०	६६२
२९	जंगमहट्टी	११९२	१२	१३००	२२	५६०
३१	आंबेवाडी	८८५	९	...	...	१००
३२	कलिवडे	९०२	११	...	...	१००
३३	तुर्केवाडी	...	...	...	...	...
	४ कानूरगट.					
३४	कानूर खुर्द	३८५५	१२	...	...	४००
३५	बुजवडे	२३७८	९	...	...	१८८
३६	कुर्जी	१२०१	९	...	...	१८३
३७	भोगोली	१२६०	१९	...	...	१४८
३८	धामापूर	१६१४	९	...	...	६०
३९	सडेगुडवळे	७४४	७	...	...	७०

चंदगड महालातील ७२ खेडयातील लोकांनी बाबुराव ठाकुर यांच्या नेतृत्त्वाखाली श्रमदानाने तयार केलेले रस्ते .



६ तरुण भारत बेळगांव, तारीख १८।७।१९३९

'तरुण भारता' तर्फे:—

दे. भ. सुभाषचंद्र बोस

यांचे स्वागत असो !

सन्मान्य सुभाषबाबू यांचे सेवेशीं—

आपण आमच्या या बेळगांव शहरास प्रथमच भेट देत आहांत याबद्दल आह्मांस अत्यंत आनंद होत आहे. 'तरुण भारता' तर्फे आह्मी आपले हार्दिक स्वागत करीत आहोंत. आपल्या प्रिय मातृभूमीच्या सेवे-प्रीत्यर्थ आजपर्यंत आपण ज्या हालअपेष्टा सोसल्या, जो खडतर व दीर्घ मुदतीचा कारावास भोगला, याची आठवण आमच्या अंतःकरणांत सदैव जागृत आहे. आपलें बुद्धिवैभव व आपला स्वार्थत्याग केल्हांही दृष्टिआड होणें शक्य नाहीं. कै. देशबंधु दास यांचे एकनिष्ठ अनुयायी या नात्यानें आपण राष्ट्रास परिचित आहांत. आणि त्यांच्याच जीवनाचा आदर्श आपल्यासमोर आहे या दृष्टीनेंच आह्मी आपल्याकडे अत्यंत कृतज्ञता बुद्धीनें पहात आहोंत.

तथापि अलीकडील आपले धोरण राष्ट्रास विघातक होत चालले आहे, असें अत्यंत विनयपूर्वक आपणांसमोर मांडण्याचें धाडस आह्मी करीत आहोंत याबद्दल राग नसावा. कॉंग्रेसचें नम्र सेवक या नात्याने आमची अशी तीव्र इच्छा आहे कीं आपण पं. जवाहरलाल व महात्माजी यांच्याशीं मिळते घेऊन कॉंग्रेसमधील ऐक्य अभेद्य राखावें. कॉंग्रेसचें ऐक्य अभेद्य राखण्यानेंच आपल्या जहाल नेतृत्वाचा उपयोग होणार आहे. भारताचा भाग्यविधाता आपल्यास योग्य ती सत्प्रेरणा करो एवढीच आमची विनम्र प्रार्थना!


बेळगांव.
ता. १३-७-१९३९

आपले नम्र सेवक,
डी. आर. ठाकूर,
रामकृष्ण प्रभू.

सुभाषबाबूजींनी जी तार क
आपल्या निर्णयाचा फेरविच
असे सूचनिले होते. मी
नारायण यांनाहि तार क
दिन पाळण्यास माझी सं
असे कळवून माझ्या मता
पुष्टी मिळेल अशी माझी
डाव्यांच्या एकीकरण
आमच्या बहकाव्यानीं या प्र
दरम्यान निर्णय केला होता
पाऊल मागे घेणे त्यावेळी
अभावी शक्य झाले नाही.
प्रकरणाचा शेवट काँग्रे
फायदेशीर होणार नाहीं.
आणि अपरिणामकारक कृत्यां
त्यांचा या गोष्टीशी संबंध आ
तोडाच होणार आहे यावद
नाही.

The Can
Banking S
(INCORPORATED
SHARE
ESTD
UDIP
Season Deposi

दैनिक 'तरूण भारत' तर्फे सुभाषचंद्र बोस हे बेळगाव दौऱ्याच्यावेळी देण्यात आलेले पत्र
(१३ जून १९३९)



६ 'तरुण भारत' अर्ध-साप्ताहिक बेळगांव, सोमवार तारीख १५।८।१९४९

शिक्षण समितीचे कार्य.

खेड्यापाड्यांतून साक्षरता प्रसार करण्याच्या हेतूनें 'बेळगांव जिल्हा प्रा. शिक्षण समिति' ही संस्था १९३७ साली स्थापन झाली. आज या संस्थेनें चालविलेल्या कानडी व मराठी मिळून १४७ शाळा आहेत. यामध्ये लमाणी लोकांच्या ३, कानडी मुलींची १ अशा शाळा आहेत. शिवाय कांहीं ठिकाणीं प्रौढांचे साक्षरतेचे वर्गहि चालविलेले आहेत व छोटी छोटी वाचनालये सुरु-केलेली आहेत. शिक्षण प्रसारा बरोबर खेड्यापाड्यांतील आरोग्य व ग्रामसुधारणा वगैरेकडेहि समिति लक्ष देत असते.

सरस्वती मंदीर

टळकवाडी येथें मुलांमुलीं-करितां मराठी प्राथमिक शाळा चालविली जात असून या शाळे-मध्यें ट्रेनिंग कॉलेजच्या विद्या-र्थ्यांकडून पाठ देण्यांत येतात. शाळेंतील मुलांची संख्या सुमारे १७० असून सध्यांची जागा अपुरी पडत आहे.

मराठी ट्रेनिंग कॉलेज

या समितीने १९४२ पासून मराठी ट्रेनिंग कॉलेज सुरू केले असून यंदाचे नववें वर्ष चालू आहे. सध्यां पहिल्या व दुसऱ्या वर्गामध्यें विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून १५० ची संख्या आहे. संस्थेचे प्रिन्सिपाल श्री. पी.एच्.डी. बाळसेकर एम्.ए. हे आहेत. शिवाय श्रीमती अविरा संत, श्री. गोडबोले वगैरे शिक्षण-तज्ञ प्राध्यापक वर्गात आहेत.

सरस्वती मंदीर व ट्रेनिंग कॉलेज या दोन्ही संस्थासाठी स्वतःच्या मालकीच्या इमारतीची गरज भासत आहे. धनिकांच्या सहाय्यानें ती लवकरच दूर होईल अशी आमची अपेक्षा आहे. या संस्थेचे जमाखर्च बाजूस दिले आहेत. (यामध्यें मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या जमाखर्चाचा समावेश नाहीं.) कार्याचा वाढता व्याप लक्षांत घेऊन लोकांनी शिक्षणाच्या या कार्यास सढळ हाताने मदत करावी ही विनंति आहे.

बाबूराव ठाकूर.

बेळगांव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिति.

ता. १-४-१९४८ पासून ता. ३१-३-१९४९ पर्यंतचा ताळेबंद

जमा

ता. १-४-१९४८ रोजी शिल्लक

रोख	१२०	
बँकेत	३४,६२१०	३४,६६३ ३०

सरकारी ग्रँट्स

मेंटेनन्स (१४७ शाळा)	३६,८९४ ००	
म. भत्ता	२९,७८५ १०	
बँड क्लायमेट	४८० ००	
ओव्हर हेड् चार्जेस्	३,३२४ ००	
अलिवियमेंट	४५० ००	
		७०,९३३ १०
डि. स्कू. बोर्ड ग्रँटस		६७६ ००
देणग्या		१५१ ००
वर्गणी		१४,७०२ ६०
सरस्वती विद्या मंदिर ठळकवाडी वर्गणी		५२० ६-०

इतर

डिपॉझिट	६०९ ००	
अनामत	१७२६ १३०	
व्याज	३८१ ७०	
किरकोळ	२४ ००	२,७४१ ४०

एकूण रु. १,२४,३८७ ४०

बेळगांव ,तारीख ५।८।१९४९

Examined & Found Correct

D. B. Kulkarni & Co.,

Chartered Accountants.

खर्च

पगार (शिक्षक)

पगार	२८,९४५ ९६	
म. भत्ता	४४,६७७ ९६	
बँड क्लायमेट	४८० ००	
		७४,१०३

ओव्हरहेड चार्जेस

पगार (सुपरवायझर, क्लार्क व पट्यून)	३६८० ००	
प्रवास खर्च	६७६ ९६	
ऑफिसखर्च		
स्टेशनरी २५२ ३०		
पोस्टेज ५८ ८०	३१० ११०	
ऑडिट फी	४० ००	
		४,०१०

इतर

अॅडव्हान्स	९९०४ ७९	
अमानत	१३८३ ०६	
डिपॉझिट	३३६ ००	
प्रचारकार्य	२४९ ००	
किरकोळ	३० ००	
		११,९०२

इमारत खर्च प्लॉट खरेदी (म्यु.) वगैरे ३४

सरस्वती विद्या मंदिर पगार	१७१५ ४०	
भाडे	३६० ००	
डेड स्टॉक	९३ ५०	
पुस्तके	३३ ११९	
स्टेशनरी	२८ ०६	
किरकोळ	३६ ६३	
		२,२९९

शिल्लक (ता. ३१-३-४९ रोजी) बँकेत ३१,३०१

एकूण १,२४,३८७ ४

राजिष्टर ॥ ॐ ॥ नं. २४ ची

B.No. 263


भिकुसाछाप सिन्नरविडी

FOR SALE

Westinghouse ... erators in good ... order. Please ... at the Electric ... Belgaum.

Belgaum, 10-8-49.

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती मार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळेचा जमाखर्च दरवर्षी दै. 'तरूण भारत' प्रसिद्ध केला जाणारा हा दि. ०१.०४.१९४८ ते ३१.०३.१९४९ या वर्षातील जमाखर्चाचा तपशील.



तरुण भारत–बेळगांव मंगळवार तारीख १३ माहे मे सन १९३० इसवी. ११

सरकारचा पाहुणचार घेत असलेले कर्नाटकांतील सत्याग्रही.

धारवाड.

१ दे. म. प्रो. रंगराव दिवाकर ६ महिने साधी ३०० रु. दंड.
२ ,, विठू माधव कुर्सी १ वर्ष सक्त मजुरी.

हुबळी.

३ श्री. लक्ष्मण १४ महिने स. मजुरी.

अंकोला.

४ श्री. एम. पी. नाडकर्णी ६ महिने साधी.
५ ,, स्वामी विद्यानंद १ वर्ष स. मजुरी.
६ ,, रामराव हणाय १८ महिने ,,
७ ,, श्री. ए. अंकोला १ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
८ ,, ए. के. कामत १ ,, ,,
९ ,, ए. एन. महाले १ ,, ,,
१० ,, लक्ष्मीराम माजी देवळे ,, ,,
११ ,, जी. व्ही. गोकर्ण ,, ,,
१२ ,, ए. डी. शेरी ,, ,,
१३ ,, आय. एस. नाईक ,, ,,
१४ ,, डी. एन महाले ,, ,,
१५ ,, एम. आर. बाप ,, ,,
१६ ,, एम. के. अथणी ,, ,,
१७ ,, एल. व्ही. कामत ,, ,,
१८ ,, एस. जी. कुलेनूर (धारवाड) ,,
१९ ,, जी. आर गुडू ,, ,,
२० ,, ए. के. पै. ,, ,,
२१ ,, एम. एस. होन्नावर ,, ,,
२२ ,, एस. जी. महाले ,, ,,
२३ ,, एन. एम. शेट्टी ,, ,,
२४ ,, एस व्ही. हेणाय १० रु. दंड अगर १ आठवडा साधी
२५ ,, मारुराम महाब ,, ,,
२६ ,, एस. एन. नाईक ,, ,,
२७ ,, वीरभद्रप्पा शिवळिंगी ४ म. स. मजुरी
२८ ,, जी. जी. कारखानीस ३ ,, ,, १०० रु. दंड अगर ३ आठवडे साधी
२९ ,, डी. एस. नाईक ,, ,,
३० ,, जी. एम. नाडकर्णी १ वर्ष स. म. २०० रु. दंड अगर आणखी ३ म. स. म.
३१ ,, रामण्णा नाईक (मंडगी) ४ म. स. म. ५० रु. दंड अगर १ म.
३२ ,, वीरण्णा बोमय्या नाईक ,, ,,
३३ ,, नारायण होमाप्पा नाईक ,, ,,
३४ ,, बोमय्या राचा नाईक ,, ,,
३५ ,, जोगी वीरण्णा नाईक ६ म. ,, ,, १०० रु. दंड अगर २ म.

कारवार.

३६ श्री. एस. आर. हजदीपूरकर १ व. स. म.
३७ ,, गानू मास्तर ,, ,,
३८ ,, मिसे ,, ,,
३९ ,, रामोदर शानभोग ,, ,,
४० ,, दुकरसीदर (बेळगांव.) ७ म. स. म.
४१ ,, गोखले (चिकोडी) ,, ,,
४२ ,, स्वार ७ म. स. म.
४३ ,, भुजले ,, ,,
४४ ,, पी. एन हेणवाय १ व. स. म. २०० रु. दंड अगर २ म.
४५ ,, माधव मांजरेकर ,, ,,
४६ ,, ए. व्ही. पालेकर ,, ,,
४७ ,, शंकर नीलकंठ देशपांडे (देसूर) ४ म. स. म.

मंगळूर.

४८ श्री. उमेशराव मंगळूर ६ म. साधी
४९ ,, आर के. प्रभू ,, ,,
५० ,, परमेश्वरय्यण्णवर १ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
५१ ,, उल्हाल तुकण्णवर ४ म. साधी
५२ ,, के. शंकरराव ,, ,,
५३ ,, हेणाय वासुदेवराव ,, ,,
५४ ,, हुसेनसाहेब ,, ,,
५५ ,, रामय्या मल्या ६ म. साधी
५६ ,, कृष्णभट खांडिगे ५ म. साधी
५७ ,, मंजुनाथ नाईक ,, ,,
५८ ,, आण्णाप्पा कामत ,, ,,
५९ ,, वेंकटराव नाईक ४ ,,
६० ,, नारायण पै ,, ,,
६१ ,, गंगाधर नाईक १ वर्ष स. म. ५०० रु. दंड ६ म साधी
६२ ,, श्रीनिवास शानभोग १० म. स.म. २०० रु. अगर २ म. सा.
६३ ,, डी परमेश्वरय्या
६४ ,, मैदेश्वर उमेशराव
६५ ,, कमलाक्षी किणी

बिसनल.

६६ श्री. बाबुराव गानी १०० रु. दंड.
६७ ,, जोशी. ५० रु. दंड
६८ ,, वामन एम्. ,,
६९ ,, लिंगापूर ३ म. सा.
७० ,, काथवटे ५० रु. दंड

कुमठा.

७१ श्री. जी. व्ही. शानभाग ९ म. स. म. १०० रु. अगर १ म.

कुंदापूर.

७२ श्री. आण्णाप्पा कामत

बिळगी.

७३ रामाचार्य आलंडकी ६ म. स. म.

बागलकोट.

७४ मंगळवेढे श्रीनिवासराव ४ म. साधी
७५ कृष्णाजी नाईक २५ रु. दंड
७६ भीमाजी लिंगापूर १५ रु. दंड

हल्याळ.

७७ श्री. पडणीस आण्णाराव ६ म. स. म.
७८ श्री. गणेश हरी जोशी (लिंगापी) १९ म. स. म.

बेळगांव.

७९ दे. म. नेमाचरराव देशपांडे १म. साधी. हुबळी.

व पुन्हां रत्नागिरीच्या वॉरंटवरुन ११७ व ४७ जलमान्यचे अटक आणि ५ म. साधी शिक्षा.
८० श्री. नारायणराव जोशी वकील २ आठवडे साधी
८१ ,, अनंतराव दाभडे २ आठवडे साधी मुकता, व पुन्हां अथणी येथे अटक
८२ श्री. जिवणराव याळगी २ आठवडे साधी
८३ ,, वसंत आप्पाण्णवर पाटील (कुडची) ६ आठवडे साधी
८४ ,, केशवराव गोखले वकील ६ आठवडे साधी
८५ ,, चळवेतराव दातार वकील सेवादक ' संयुक्त कर्नाटक ' ७ म. स. म.
८६ ,, डी. कोचाडकर ,, ,,
८७ ,, पुंडलिकजी कातगडे ,, ,,
८८ ,, विनायकराव करगुपी १ म. साधी
८९ ,, जयदेव कुलकर्णी ,, ,,
९० ,, गोविंदराव बांदेकर (चंदगड) ,, ,,
९१ ,, विष्णु चव्हाळ ,, २ आ. ,,
९२ ,, कृष्णा सुतार ,, ,, ,,
९३ ,, मल्लाचार्य डोणपी (निपाणी) १ म. ,,
९४ ,, डी. आर. ठाकूर सं. ' तरुण भारत ,, ६ म. स. म.
९५ ,, वामनराव देसाई (हुबळी) ,, ,,
९६ ,, गळाखेव तेरणीकर (यमकनमर्डी),, ,,
९७ ,, श्री. अ. कट्टी ,, ,, ,,
९८ ,, डॉ. कृष्ण आमोणपे (चिकोडी),, ,,
९९ ,, रामभाऊ कागवाडे (निपाणी) ,, ,,
१००,, मारुतराव रावण ,, ,, ,,
१०१,, हणमंतराव कौजलगी (अंकोला) ३ म. स. म. १०० रु. दंड अगर ३ आ. साधी
१०२,, विठू श्रीनिवास नाईक (अंकोला) ६ म. स. म.
१०३,, हणमंत नाईक मंदगड १ वर्ष स. म.
१०४,, बी. पी. हल्ली ,, कोर्ट उठेपर्यंत
१०५,, शांता जांबोटकर ,, ,,
१०६,, विष्णुपंत बेंद्रे ,, १ व. स. म.
१०७,, बसाप्पा अरसांची ,, ,, ,,
१०८,, नरसिंहभट बरेकर ,, ६ म. ,,
१०९,, श्री. व. कुलकर्णी मुरगोड १ व. ,,
११०,, दत्तानंद अरळीकट्टी सौदत्ती ,, ,,
१११,, गुरुनाथराव जेरे अथणी ८ म. ,,
११२,, एम. आर. जोशी ,, ५ म. ,,
११३,, डॉ. कुलहल्ली अथणी १ म स. म. ५० रु. दंड अगर २ आठवडे
११४,, सिद्धोती ,, ,,
११५,, चांदोरकर (बेळगांव) ,, ४ म. स. म.
११६,, आण्णाराव कोकटनूर ,, २०० रु. दंड
११७,, गुरुनाथ वामनाचार्य पाध्ये पूर ८ म. स. म. २०० रु. दंड
११८,, जे. बी. मुतालीक हुबळी ६ म. स. म. २०० रु. दंड.
११९,, बापू गोखले (हुबळी) यमकनमर्डी १०० रु. दंड पुन्हां यमकनमर्डी येथे अटक
१२०,, विनायक मुतालीक हुबळी ६ म. स. म.
१२१,, सोमप्पा पद्मशेट्टी संकेश्वर २ म. ,,
१२२,, डॉ. जोशी पाध्यापूर ६॥ म. स. म.
१२३,, शिवाप्पा अलसंडी अथणी ८ ,, ,,
१२४,, व्ही. एस. पंडीत सं. ' आर्यमत ' बेळगांव ६ आ. साधी

पान १३ वर पहा.

महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी गेलेल्या कर्नाटकातील सत्याग्रहींना शिक्षा झाल्यानंतर त्यांच्यावर चालविलेले खटले . (१३ मे १९३० चा अंक)

दै. 'तरुण भारत' या अंकात प्रसिद्ध झालेली कर्नाटकातील सत्याग्रहींची काही नावे

अ क्र.	नाव	शिक्षेचा कालावधी
	धारवाड	
१.	दे. भ. प्रो. रंगराव दिवाकर	६ महिने साधी कैद ३०० रू दंड
२.	बिंदू माधव बुर्ली	१ वर्ष सक्त मजूरी
	हुबळी	
३.	श्री लक्किमरद	१४ महिने स. मजूरी
	अकोला	
४	श्री. एस. पी. नाडकर्णी	६ महिने साधी कैद
५	श्री. स्वामी विद्यानंद	१ वर्षे स. मजूरी
६	शामराव शणाय	१८ महिने स. मजूरी
७	श्री. व्ही. ए. अंकोला	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
८	श्री. ए. एन महाले	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
९	श्री. ए. के.कामत	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१०	श्री. शांताराम भाजी देवळे	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
११	श्री. जी. व्ही. गोकर्ण	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१२	श्री. ए. डी. शेरी	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१३	श्री. आय. एस. नाईक	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१४	श्री. डी. एन. महाले	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१५	श्री. एम. आर. वाघ	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१६	श्री. एन. के. अथणी	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१७	श्री. एल. व्ही. कामत	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१८	श्री. एस. जी. कुलेनूर (धारवाड)	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
१९	श्री. जी. आर. गुडू	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
२०	श्री. ए. के. पै.	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
२१	श्री. एम. एस. होन्नावर	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
२२	श्री. एन. एम. शेट्टी	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
२३	श्री. एस. जी. महाले	१ दिवस (कोर्ट उठेपर्यंत)
२४	श्री. एस. व्ही. शेणाय	१० रू. दंड अगर १ आठवडा साधी कैद
२५	श्री. भाकूराम महाव	१० रू. दंड अगर १ आठवडा साधी कैद
२६	श्री. एस. एन. नाईक	१० रू. दंड अगर १ आठवडा साधी कैद
२७	श्री. वीरभद्रप्पा शिवशिंपी	४ म.स. मजूरी
२८	श्री. जी. जी. कारखानीस	३ महिने स.मजूरी १००रू.दंड अगर ३ आठवडे कैद
२९	श्री. टी. एस. नाईक	३ महिने स.मजूरी १००रू.दंड अगर ३ आठवडे कैद
३०	श्री. जी. एम. नाडकर्णी	१ वर्ष स.म. २०० रू दंड अ.३ आठवडे कैद
३१	श्री. रामण्णा नाईक (बंडगी)	४ म. स. ग. ५० रू अ. १ म. कैद
३२	श्री. वीरण्णा बोमश्या नाईक	४ म. स. ग. ५० रू अ. १ म. कैद
३३	श्री. नारायण होनाप्पा नाईक	४ म. स. ग. ५० रू अ. १ म. कैद
३४	श्री. भोमय्या रामा नाईक	४ म. स. ग. ५० रू अ. १ म. कैद
३५	श्री. जोगी वीरण्णा नाईक	६ म. स. म. १०० रू. दंड अगर २ महिने शिक्षा
	कारवार	
३६	श्री. एस. आर. हळदीपूरकर	१ वर्ष स.म.
३७	श्री. गानू मास्तर	१ वर्ष स.म.
३८	श्री. रिंगे मास्तर	१ वर्ष स.म.
३९	श्री. दामोदर शामभोग	१ वर्ष स.म.
४०	श्री. हुन्नरगीकर (बेळगाव)	७ म. स. म
४१	श्री. गोखले (चिकोडी)	७ म. स. म
४२	श्री. स्वार	७ म. स. म
४३	श्री. भुजले	७ म. स. म
४४	श्री. पी. एन. शेणवाय	१ वर्ष स.म. २०० दंड अगर २ महिने शिक्षा
४५	श्री.माधव मांजरेकर	१ वर्ष स.म. २०० दंड अगर २ महिने शिक्षा
४६	श्री. ए.व्ही. पालेकर	१ वर्ष स.म. २०० दंड अगर २ महिने शिक्षा
४७	श्री. शंकर नीळकंठ देशपांडे (देसूर)	४ म.स.म

	मंगळूर	
४८	श्री. उमेशराव मंगळूर	६ म. साधी कैद
४९	श्री. आर. के. प्रभू	६ म. साधी कैद
५०	श्री. परमेश्वर च्यण्णेवर	१ महिने (कोर्ट उठेपर्यंत)
५१	श्री. उल्लल तुक्रण्णवर	४ महिने साधी
५२	श्री. के. शंकरराव	४ महिने साधी
५३	श्री. शेणाय वासुदेवराव	४ महिने साधी
५४	श्री. हुसेन साहेब	४ महिने साधी
५५	श्री. रामच्या मल्या	६ म. साधी
५६	श्री. कृष्णभर खांडिगे	५ म. साधी
५७	श्री. मंजूनाथ नाईक	५ म. साधी
५८	श्री. आण्णाप्पा कामत	४ म. साधी
५९	श्री. वेंकटराव नाईक	४ म. साधी
६०	श्री. नारायण पंत	४ म. साधी कैद
६१	श्री. गंगाधर नाईक	१ वर्ष स. म. ५०० रू. दंड द.म.
६२	श्री. श्रीनिवास शानभोग	१० म. स.म. २०० रू. दंड र.म.
६३	श्री. टी. परमेश्वरच्या	१० म. स.म. २०० रू. दंड र.म.
६४	श्री मडेश्वर उमेशराव	१० म. स.म. २०० रू. दंड र.म.
६५	श्री. कलमश्री किणी	१० म. स.म. २०० रू. दंड र.म.
	बिसवल	
६६	श्री. बाबुराव गाणी	१०० रू दंड
६७	श्री. जोशी	५० रू दंड
६८	श्री वामन हब्बु	५० रू दंड
६९	श्री. लिंगापूर	३ महिने सा. कैद
७०	श्री. काथवटे	५० रू दंड
७१	श्री. जी.व्ही शानभाग (कुमठा)	९ म.स.म.१०० रू दंड अ. १ म. शिक्षा
	कुंदापूर	
७२	श्री. आण्णाप्पा कामत	९ म.स.म.१०० रू दंड अ. १ म. शिक्षा
७३	श्री रामाचार्य आखंडकी (बिळगी)	६ म. स. म.
७४	श्री. मंगळवेढे श्रीनिवासराव	४ म. साधी कैद
७५	श्री. कृष्णाजी नाईक	२५ रू. दंड
७६	श्री. भीमाजी लिंगापूर	१५ रू दंड
७७	श्री. फडणीस आप्पाराव	द.म.स.म
७८	श्री. गणेश हरी जोशी (निपाणी)	१० म.स.म.
	बेळगाव	
७९	श्री. दे. भ. गंगाधरराव देशपांडे	१ म. साधी शिक्षा व पुन्हा रत्नागिरीच्या वॉरंटवरून ११७ व ४७ कलमान्वये अटक व ५ म. सा. कैद
८०	श्री. नारायणराव जोशी (वकील)	२ आठवडे साधी कैद
८१	श्री. आनंदराव दाभाडे	२ आठवडे साधी कैद व पुन्हा अथणी येथे अटक
८२	श्री. जिवणराव याळगी	२ आठवडे साधी कैद
८३	श्री. बसवत आप्पाण्णावर पाटील (कुडची)	६ आठवडे साधी कैद
८४	श्री. केशवराव गोखले (वकील)	६ आठवडे साधी कैद
८५	श्री. बळवंतराव दातार (वकील)	संपादक संयुक्त कर्नाटक
८६	श्री. डॉ. कोवाडकर	७ म. स. कैद
८७	श्री. पुंडलिकजी कातगडे	७ म. स. कैद
८८	श्री. विनायकराव करगुप्पी	१ म. साधी कैद
८९	श्री. जयदेव कुलकर्णी	१ म. साधी कैद
९०	श्री. गोविंदराव बांदेकर (चंदगड)	१ म. साधी कैद
९१	श्री. विष्णू बल्लाळ (चंदगड)	२ आठवडे साधी कैद
९२	श्री. कृष्णा सुतार (चंदगड)	२ आठवडे साधी कैद
९३	श्री. मध्याचार्य टोपणी (निपाणी)	१ म. सा. कैद
९४	श्री.डी.आर. ठाकुर (सा. तरूण भारत)	६ म. स. म
९५	श्री. वामनराव देसाई (हुदली)	६ म. स. म

९६	श्री. बाळासाहेब तेरणीकर (यमकनमर्डी)	६ म. स. म
९७	श्री. अ. कट्टी	६ म. स. म
९८	श्री. श. कृष्ण ग्रामोपाध्ये (चिक्कोडी)	६ म. स. म
९९	श्री. रामभाऊ कागवाडे (निपाणी)	६ म. स. म
१००	श्री मारूतराव रावण	६ म. स. म
१०१	श्री हणमंतराव कोनलगी (अकोला)	३ म. स. म १००रू दंड अ.३ आ. साधी
१०२	श्री. बिंदू श्रीनिवास नाईक (अकोला)	६ म.स.म
१०३	श्री हणमंत नाईक (नंदगड)	१ वर्ष स.म.स
१०४	श्री. बी.बी. हलशी (नंदगड)	१ दिवस कोर्ट उठेपर्यंत
१०५	श्री शांबा जांबोटकर (नंदगड)	१ दिवस कोर्ट उठेपर्यंत
१०६	श्री विष्णूपंत बोंद्रे (नंदगड)	१ दिवस कोर्ट उठेपर्यंत
१०७	श्री बसाप्पा अरंगावी (नंदगड)	१ दिवस कोर्ट उठेपर्यंत
१०८	श्री नरसिंहभट बरेकर (नंदगड)	६ म.स.म
१०९	श्री धो.य. कुलकर्णी(मुरगोड)	१ वर्ष स.म.
११०	श्री दयानंद अरळीकट्टी (सौंदत्ती)	१ वर्ष स.म.
१११	श्री गुरूनाथराव जेरे (अथणी)	८ म.स.म
११२	श्री एन.आर.जोशी (अथणी)	५ म.स.म
११३	श्री डॉ कुलहळळी (अथणी)	३ म.स.., ५० दंड अगर २ आठवडे कैद
११४	श्री सिद्दांती (अथणी)	३ म.स.., ५० दंड अगर २ आठवडे कैद
११५	श्री चांदौरकर (बेळगाव)	४ म.स.म
११६	श्री आण्णाराव कोकडनूर	४.मस.म. २०० रू दंड
११७	श्री गुरूनाथ वामनाचार्य पाच्छांपूर	८ म.स.म २०० रू. दंड
११८	श्री. जे.बी.मुतालीक हुक्केरी	६ म. स.म., २०० रू दंड
११९	श्री बापू गोखले (हुंदली) यमकरमडी	१०० रू दंड पुन्हा अटक
१२०	श्री विनायक मुतालीक (हुक्केरी)	६ म. स.म.
१२१	श्री सांबाप्पा पट्टणशेट्टी (संकेश्वर)	२ म.स.म
१२२	श्री. जोशी पाच्छापूर (संकेश्वर)	६ ।।, म.स.म
१२३	श्री शिवाप्पा जमखंडी (अथणी)	६ म.स.म
१२४	श्री व्ही. एम. पंडीत (साप्ताहिक प्रार्थना) बेळगाव	६ म.स.म
१२५	श्री. पटवर्धन (निपाणी)	६ म.स.म
१२६	श्री नगर पार्थवाड	१४ म.स.म
१२७	श्री गलगली स्वामी शुध्दानंद (नंदगड)	८ म.स.म
१२८	श्री. कृष्णाजी पांडूरंग नाईक (नंदगड)	५०० रू दंड
१२९	श्री बाळकृष्णप्पा उप्पाट (यमकनमर्डी)	६ म.स.म
१३०	श्री. अनंत आण्णाजी (चिक्कोडी) (यमकतमर्डी)	६ म.स.म
१३१	श्री वैद्य (बेळगाव)	६ म.स.म
१३२	श्री डी. डी. जोशी (बेळगाव)	६ म.स.म
१३३	श्री आर के कुराडे (बेळगाव)	६ म.स.म
१३४	श्री एस. व्ही कुलकर्णी (बेळगाव)	६ म.स.म
१३५	श्री जी.व्ही कुलकर्णी (बेळगाव)	६ म.स.म
१३६	श्री भरमाण्णा बाळप्पा भीमदत्ती	६ म.स.म
१३७	श्री लक्ष्मण गोविंद पंतोजी (बेळगाव)	६ म.स.म
१३८	श्री रामकृष्ण दामोदर प्रभू (बेळगाव) (तरूण भारत सह संपादक)	६ म.स.म
१३९	श्री शिवराम कोप्पल (बेळगाव) से. जि. कॉ. क बेळगाव,	६ म.स.म
१४०	श्री श्रीपतराव कित्तूर (बेळगाव)	६ म.स.म
१४१	श्री बाळकृष्ण यमाजी देशपांडे(पाच्छापूर)	६ म.स.म[३८]

संदर्भ –३८. साप्ताहिक 'तरूण भारत' बेळगाव, ११ मार्च ते ८ एप्रिल १९३०

१९४२ च्या चले जाव आंदोलनातील सत्याग्रहींच्यावरील प्रमुख खटले

१. व्हॉक्सेनपेडो पंपिग स्टेशन नासधुस

२. वैताकवाडी दारूगुत्ता – १ ला हल्ला

३. वैताकवाडी दारूगुत्ता – २ रा हल्ला

४. वैताकवाडी दारूगुत्ता – ३ रा हल्ला

५. ठळकवाडी इलेक्ट्रिक सब – स्टेशन नासधुस

६. ठळकवाडी पोलिस चौकी, नासधुस

७. रेल्वे लाइन्मनकडून रेल्वे लँप हिसकावून घेतल्याबद्दल – १ ला खटला

८. रेल्वे लाइनमनकडून रेल्वे लँप हिसकावून घेतल्याबद्दल – २ रा खटला

९. ठळकवाडी मेल बँगलुर

१०. अंबाभुवन समोर पोलिसवर हल्ला

खालील आरोपी कच्चे कैदी हे ६–७ महिने तुरूंगात होते.

अ.क्र	आरोपी नावे	एकूण खटले	पैकी सुटले	अद्यापी चालू	आरोपी नंबर
१	श्री. गजानन कृष्णा याळगी	१०	१	९	२ ते १०
२	श्री अब्बाप्पा देशपांडे	६	१	५	२,३,४,५,६
३	श्री अरविंद याळगी	४	१	३	२,३,६
४	श्री. भाऊ पै.	२	१	१	२
५	श्री. महादेव मठद	१	–	१	१
६	श्री. गोविंद कारेकर	६	१	५	२,३,५,६,८
७	श्री. केशव बेळवाड	४	–	४	२,३,४,६
८	श्री. जोती पाटील	३	–	३	२,३,४
९	श्री. श्रीपद गुमास्ते	१	–	१	२,३,५
१०	श्री. मधु कुलकर्णी	१	–	१	६
११	श्री. देवाप्पा बेकवाड	१	–	१	२
१२	श्री. मर्कट्टी	१	–	१	२
१३	श्री.नरसू पर्वत	१	–	१	२
१४	श्री. नरहरी दिवेकर	१	–	१	५
१५	श्री. गोविंद वालावलकर	२	–	२	२
१६	श्री. भालचंद देशपांडे	४	१	३	१,२,३
१७	श्री. नाथ पै.	१	–	१	६
१८	श्री. गोविंद जोशी	२	–	२	४,६
१९	श्री. दिवाकर वालावलकर	१	–	१	६
२०	श्री. डॉ. याळगी	२	–	२	६,९
२१	श्री. शिंदे	३	१	२	४,८[८१]


(ठळकवाडीच्या(बेळगाव) विद्यार्थी वर्गावरील खटले, आरोप २१/१०/१९४३ च्या अंकात दिलेले आहेत.)


BELGAUM DISTRICT
Scale 1: 750,000 (1Cm = 7.5 Km)
MAHARASHTRA
KOLLAPUR
Pune
Sangli
Miraj
Hatkalgada
Shirol
Athani
Khiroda
Anahtapur
Doni
Kottalagi
Aralihatti
Shirur
Kakamari
Balligeri
Bannuru
Wishnuwadi
Madabhavi
Gundewadi
Abbihal
Talasanga
Mangasooli
Kinagedi
Adahalli
Gote
Badagi
Shedbal
Mole
Sankanahatti
Badachi
Mahakapur
Krishna
Ugarbujruka
Inapur
Kokatanuru
Halyal
Nandgao
Savalagi
Kagal
Khanchanal
Boargao
Shiraguppi
Kudachi
Shankatti
Naganuru
Todalabhag
Yaduru
Molawad
Satti
Mangurn
Konganolli
Benadi
Sadalga
Ankalin
Yarabatti
Galatga
Exambe
Moraba
Raybag
Harugeri
Jamkhandi
Appachiwadi
Sowndalga
Nagarai
Alagawadi
Rabakavi
Kersiru
Chikkodi
Khandal
Sultanpur
Mekhali
Bagalkote
Navlihal
Judakulni
Inalam
Nippani
Nagaramanoli
Chikkodi Road
Mahalingapur
Tavadi
Hatarvat
Gurlapur
Shenduri
Kabbur
Moodalagi
Avaradi
Mudhol
Ghataprabha
Gargoti
Matiwade
Naganur
Dharmatti
Yadagudda
Bagewadi
Yaragudri
Sankeshwari
Vederhatti
Kaliguddi
Yadawad
Hukkeri
Ghataprabha
Tigadi
Gandhin Ghlaz
Gokak Road
Balobal
Kowjalagi
Gokak
Maldinni
Betageri
Hulkund
Kunpal
Lokapur
Bastawad
Ingali
Chikkoppa
Bijaguppi
Yamakana Maradi
Benchin Maradi
Hirekoppa
Shahapur
Dondgatti
Kanavin Hatti
Sacchapur
Chikkanandi
Tavalgeri
Daddi
Hagedal
Itanalu
Batakurki
Linganahatti
Chikkalidinni
Shivapur
Sattigeri
Rasabachandragi
Hanumapur
Bambarage
Suldhal
Ankalgi
Yaragatti
Godachi
Mudakavi
Hirebidanur
Katakol
Toragal
Agasage
Kakati
Koravi
Deshnur
Chachadi
Chunchanuru
Ramadurga
Uchagao
Kanabargi
Nesaragi
Muragod
Muliuru
Sureban
Sambre
Inchala
Madalur
Arattagallu
BELGAUM
Manoli
Chikkoppa
Mandoli
Mastamaradi
Hosur
Kallapur
Matte
Halage
Bailahongala
Matoli Katrala
Hulkatte
Bagewadi
Malaprabha
Chigoli
Kiniye
Desur
Sampagao
Koradkoppa
Savadatti
GADAG
Kokate
Kanavikaravinkoppa
Ugaragola
Mari
Ranakurte
Nittur
Oastikoppa
Belavadi
Lingadhalli
Betarnuru
Naragund
Kanakumbi
Badasa
Handirnal
Jamboti
Baragao
Kalbhavi
Dodawad
Hirulligeri
Chorla
Itagi
Kiravale
Khanapur
Honngala
Nerase
Mallapur
Gudkatte
Gavali
Kitturu
Nandagad
Navalgund
Walpay
Shiroli
Talawade
Beedi
Gunji
Surpur Kerwad
Ambewadi
Halasi
Kumbapur
Kapoli
Ramapur
DHARWAD
Annigeri
GOA
Anmoda
Devarayi
Londa
Tinganimath
Nagargali
Dasapura
Doodh Sagar
Hubbli
NORTH KANARA
Haliyal
DHARWAD
Sankwem
Supa
Kali River
Dandeli
Kundgol

बेळगांव जिल्हा


KARNATAKA
DISTRICTS
N
MAHARASHTRA
Bidar
BIDAR
Gulbarga
GULBARGA
Bijapur
BIJAPUR
Bagalkot
BAGALKOT
Raichur
RAICHUR
BELGAUM
Belgaum
Dharwar
DHARWAR
Gadag
GADAG
KOPPAL
Koppal
Bellary
BELLARY
GOA
ANDHRA PRADESH
Karwar
UTTAR KANNAD
HAVERI
Haveri
DAVANGERE
Davangere
Chitradurga
CHITRADURGA
SHIMOGA
Shimoga
Udupi
UDUPI
CHIKMAGALUR
Chikmagalur
TUMKUR
Tumkur
KOLAR
Kolar
BANGALORE
BANGALORE (URBAN)
BANGALORE (RURAL)
Hassan
HASSAN
ARABIAN SEA
Mangalore
DAKSHIN KANNAD
MANDYA
Mandya
Madikeri
KODAGU
Mysore
MYSORE
CHAMRAJNAGAR
Chamrajnagar
TAMIL NADU
KERALA

कर्नाटक जिल्हा




कर्नाटक राज्याची सीमा




बेळगाव जिल्हा




महाराष्ट्र व कर्नाटक सीमारेषेतील मराठी व कानडी भाषिक विभाग



सीमा भागातील भौगोलिक प्रदेश दर्शविणारा नकाशा(महाजन आयोग)




बेळगाव शहर व सीमा भागातील भाग दर्शविणारा नकाशा



दै. तरूण भारतचे संस्थापक संपादक कै. बाबुराव ठाकुर


(जन्म : २६ डिसेंबर १८९९, मृत्यू : २३ एप्रिल १९७९)

बाबुराव ठाकुर यांचा परिवार





सिनेस्टार दादा कोंडके यांचा सन्मान करताना बाबुराव ठाकुर



आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली बेळगाव येथील मराठी पत्रकार परिषद स्वागताध्यक्ष बाबुराव ठाकुर, १९५०



मराठी पत्रकार परि"ाद जळगांव अधिवेश १३ मार्च १९६७, व्यासपीठावर श्रीमती इंदिरा गांधी श्री. बाबुराव ठाकुर



६ तरुण भारत ' अर्ध-साप्ताहिक बेळगांव मंगळवार ता

कुदनूरच्या ग्रामसेवक दलाचें शौर्य

सप्टेंबर १९५४ मध्यें कुदनूर (ता. चंदगड) येथील ग्रामसरक्षक दलाच्या लोकानीं दरोडेखोरांशी जो सामना दला, त्यांत त्यानीं बजावलेल्या शौर्याबद्दल त्यांना मुंबईचे मुख्य मंत्री ना. मुरारजीभाई देसाई यांच्या हस्तें तरवारी बहाल करण्याचा समारंभ येथील पोलिस परेड ग्राउंडवर ता. १२-१२-५४ रोजी साजरा झाला. त्याप्रसगीं घेण्यांत आलेले छायाचित्र.



दै. तरूण भारत नुतन प्रेस(इमारत) हिंडलगा, बेळगाव



दै. तरूण भारतच्या जुन्या संग्रहीत फाईल, विभाग



दै.'तरूण भारत' प्रेस बेळगांव, फाईल व्यवस्थापक श्री. कारेकर आणि श्री. परेरा (कर्मचारी वर्ग)



येळळूरचा हाच फलक सीमाभागाचा अभिमानाचा ठरला आहे. तर कर्नाटकाच्या डोळ्यात तो खुपत आहे.

येळळूर(कर्नाटक)मधील महाराष्ट्र राज्याचा फलक


१९५६ च्या पहिल्या आंदोलनातील येळळूरची तुकडी.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनातील सन १९५६ ची येळळूरची सत्याग्रही तुकडी



महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नातील मराठी भाषिक हुतात्मे



लोकमान्य टिळक यांचा मृत्यू (१ ऑगस्ट १९२०)

"दै. 'तरूण भारत'(बेळगाव)चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान" (१९१९ ते १९८०)

प्रस्तावना

आधुनिक सामाजिक जीवनाचे एक प्रभावी अंग म्हणून वृत्तपत्रांना महत्व प्राप्त झाले. वृत्त म्हणजे वार्ता किंवा बातमी तिचा प्रसार करण्याचे हे प्रभावी साधन आहे. लोकशाहीमध्ये सार्वजनिक जीवनात वृत्तपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्रे लोकशाहीत समाजाचे परिवर्तन आणि लोकमताची जडण–घडण करतात.

'तरूण भारत' वृत्तपत्राचा उदय व विस्तार हा कर्नाटकातील बेळगाव या शहरामध्ये झाला. वृत्तपत्र हे समाजाचे दर्पण असते. प्रचलित सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय विषयांच्या संदर्भात उपयुक्त, बोधप्रद आणि विचार प्रवर्तक लेखन प्रकाशित करून सामाजिक प्रबोधन करणे, ज्ञानाचा प्रसार करणे व त्या द्वारा देश हिताचे विचार जागृत करणे हे वृत्तपत्रांचे महत्वूपर्ण कार्य आहे. वृत्तपत्रांमुळे सामाजिक जागृती होऊन महाराष्ट्र हा पुरोगामी विचाराकडे वळलेला आहे. वृत्तपत्रांच्या या कार्यामुळेच स्वातंत्र्योतर काळात लोकशाही दृढ व बळकट करून ग्रामीण व शहरी भागातील लोकांना जागृत व कार्यरत ठेवले आहे. समाजाची सर्वांगिण प्रगती साधण्याचा प्रयत्न या वृत्तपत्राच्या कार्यातून झाल्याचे स्पष्ट होते.

दैनंदिन व्यवहारातील घटना दररोज बातम्यांच्या स्वरूपात प्रसिध्द करणाऱ्या पत्राला 'वर्तमानपत्र' किंवा 'बातमीपत्र' असे संबोधण्यात येते. या सर्व पत्र प्रकारांना उद्देशून 'दैनिक' हा शब्द प्रयोग रूढ झालेला असावा. बाबुराव ठाकुर यांच्या वृत्तपत्र कार्याचा आढावा घेण्यापूर्वी वृत्तपत्राचा उदय, भारतीय वृत्तपत्राच्या प्रगतीची वाटचाल, तसेच सीमा भागातील मराठी वृत्तपत्रांचा उदय, विकास 'बेळगाव शहरातील मराठी वृत्तपत्रे', 'तरूण भारत'या वृत्तपत्रांची स्थापना संपादक बाबुराव ठाकुर यांचे पूर्वायुष्य व त्याच्या व्यक्तिमत्वाची जडण– घडण इत्यादी मुद्यांची चर्चा या प्रकरणात केली आहे.

विषय प्रवेश

सामाजिक जडणघडणीमध्ये वृत्तपत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. वृत्तपत्र हे समाजाचे दर्शन असते. समाजातील आंतरक्रियांचे यथार्थ प्रतिबिंब वृत्तपत्रामध्ये उमटते. जॉर्ज बर्नाड शॉ यांनी वृत्तपत्रांना 'गरिबांचे विद्यापीठ' म्हटले आहे. भारतीय सामाजिक सुधारणांची चळवळ, स्वातंत्र्य आंदोलन व भारताची पुनर्रचना या तिन्ही पर्वात भारतीय वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय

लोकशाही मजबूत करण्यासाठी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायव्यवस्था यांच्यावर भारतातील वृत्तपत्रांनी नियंत्रण ठेवलेले आहे. अशा एखाद्या वृत्तपत्राच्या वाटचालीचा अभ्यास केल्याने तात्कालीन समाजातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घडामोडींचा परिचय होतो. वृत्तपत्र हे समाज जीवनाच्या वाटचालीतील घटना व घडामोडींचा साक्षीदार असते. किंबहुना समाजाला मार्गदर्शन करून दिशा देण्याचे काम वृत्तपत्र करत असते. त्या अनुषंगाने 'तरूण भारत' बेळगांव या वृत्तपत्राच्या कार्याचा मागोवा घ्यावा, या दृष्टिकोनातून हा अभ्यास केला आहे.

संशोधन विषयाचे नांव

"दै. 'तरूण भारत'(बेळगाव)चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान" (१९१९ ते १९८०)

विषयाची निवड

आधुनिक सामाजिक जीवनाचे एक प्रभावी अंग म्हणून वृत्तपत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्र हे रोजच्या बातम्या, लोकमत घडवणे, प्रबोधन करणे व समाजाचे नेतृत्त्व करणे. समाजाचे प्रबोधन करणे व शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे. अशी विविध प्रकारच्या भूमिका वृत्तपत्र सांभाळत असते. दै. 'तरूण भारत' हे सुरूवातीपासून जिल्हा पत्र होते. या वृत्तपत्राचे संस्थापक संपादक बाबुराव ठाकुर यांनी स्वातंत्र्य प्राप्तीच्या लढयात सहभागी होऊन ब्रिटीशांच्या विरोधात लढा दिला. त्यांना अनेक वेळा तुरूंगवास सहन करावा लागला. दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने बेळगाव भागात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. तसेच या वृत्तपत्राने काँग्रेस पक्षाचे मुखपत्र म्हणून सुरूवातीपासून कार्य केले आहे. सीमा भागात या वृत्तपत्रांने मराठी वृत्तपत्र सृष्टीच्या जडणघडणीत वेगळा आदर्श निर्माण केला आहे. संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढयांच्या चळवळीत या वृत्तपत्रांने फार मोठे योगदान दिले आहे. आजही हे वृत्तपत्र मराठी माणसाच्या व्यथा मोठया पोट तिडकीने मांडताना दिसत आहे. सीमा प्रश्न जीवंत ठेवण्याचे कार्य या वृत्तपत्राने केले आहे. दै.'तरूण भारत'ने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घडामोडींमध्ये सहभागी घेऊन या विभागाच्या विकासाला दिशा देण्याचे कार्य केले. तसेच या वृत्तपत्राने महाराष्ट्र–कर्नाटक सीमेवर मराठी वृत्तपत्र सृष्टीची नवीन परंपरा निर्माण केली. येथील मराठी जनतेचा विकास व वाटचालीमध्ये दै. 'तरूण भारत' चे महत्त्वपूर्ण योगदान आहे. याचा परिचय जनतेला व्हावी, या हेतूने या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा व वाटचालीचा आढावा घेणे.

२. दै. 'तरूण भारत' चे संस्थापक, संपादक बाबुराव ठाकुर यांच्या पत्रकारितेचा व कार्याचा आढावा घेणे.

३. दै. 'तरूण भारत' चे कार्य समाजातील कोणत्या घटकासाठी होते याचा शोध घेणे.

४. दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने स्वातंत्र्यपूर्व व स्वांतत्र्योत्तर चळवळीतील भूमिका अभ्यासणे.

५. दै. 'तरूण भारत' च्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेणे.

६. महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यातील सीमा भागातील जनतेच्या विकासातील दै. 'तरूण भारत' चे योगदान अभ्यासणे.

संशोधनाची व्याप्ती–

सदर प्रबंध विषयाची व्याप्ती ही बेळगाव जिल्हा (कर्नाटक) पुरतीच मर्यादीत आहे. या वृत्तपत्रांने सन १९१९ ते १९८० या कालावधीत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य केले आहे. त्याचा आढावा या प्रबंधातून घेतलेला आहे. हा आढावा घेत असताना वरील कालखंडातील दै. 'तरूण भारत' च्या अंकांचा चिकित्सक अभ्यास करून त्याच्या कार्याच्या विविध पैलूंवर व वाटचालीवर प्रकाश टाकणे, तसेच संपादक ठाकुर यांच्या जीवन कार्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

संशोधनाच्या मर्यादा

संशोधन विषय हा बेळगाव व परिसरापुरताच मर्यादित असला तरी संपूर्ण भारत देशात घडणाऱ्या घडामोडीचा परिणाम या वृत्तपत्रातून मांडलेला आहे. त्यामुळे या विषयाची मर्यादा केवळ बेळगाव पुरतीच मर्यादित असली, तरी त्याचा संबंध ज्या ज्या प्रदेशांशी तसेच जिल्हयाशी आलेला आहे. त्याचाही उल्लेख यामध्ये करणे गरजेचे आहे. जसे की राजकीय परिस्थिती पाहत असताना देशाच्या राजकारणाचा बेळगाव व परिसरावर काय परिणाम होत होता. याची माहिती यामध्ये प्रामुख्याने घेतल्याशिवाय या वृत्तपत्राचे कार्य पूर्ण होणार नाही. त्याचप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टिने माहिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणूनच या विषयाच्या व्याप्ती जरी वाढत असली तरी जास्तीत जास्त बेळगाव व परिसरावर होणाऱ्या घटनांचा तपशिल या विषयांतून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या वृत्तपत्राचे संस्थापक, संपादक बाबुराव ठाकुर यांच्या काळात(सन १९१९ ते

१९७९) घडलेल्या घटनांचा दैनिक 'तरूण भारत' यामधून जो उहापोह केलेला आहे. त्या काळातील निवडक अंकाचा चिकित्सक वाचनातून संशोधकाला जो अर्थ समजला तो प्रमाण मानून दैनिक 'तरूण भारत' या वृत्तपत्रांचा अन्वयार्थ या प्रबंधात मांडलेला आहे.

संशोधनाची गृहितके

प्रा.गुड व हॅट यांनी म्हटले आहे की, गृहितकृत्य म्हणजे असे अनुमान की, जे तंत्र निरीक्षणावर आधारलेले असून त्यामुळे भावी संशोधनाला चालना मिळते.

१) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक परिवर्तनास निश्चित स्वरूपाचे योगदान दिले आहे.

२) शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी व सामान्य जनता ही वृत्तपत्राची केंद्रबिंदू होती.

३) दै. 'तरूण भारत'चे संस्थापक व संपादक बाबुराव ठाकुर हे लढवय्ये संपादक असून त्यांचे लिखाण तर्कशुद्ध स्वरूपाचे होते.

४) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश प्रशासनाच्या विरोधात प्रचार करून प्रबोधनाचे फार मोठे कार्य केले आहे.

५) सीमा भागातील मराठी भाषिकावरील अन्यायाविरूद्ध लढा देणारे हे महत्त्वाचे वृत्तपत्र आहे.

६) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने महाराष्ट्र व कर्नाटक सीमा प्रश्न जिवंत ठेवण्याचे कार्य केले.

७) दै. 'तरूण भारत' हे केवळ एक वृत्तपत्र म्हणून नव्हे, तर प्रबोधनाचे व लोकशिक्षणाचे एक साधन आहे.

८) महाराष्ट्र व कर्नाटक या सीमा भागात मराठी वृत्तपत्र सृष्टीची परंपरा उत्तम प्रकारे चालविण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.

सिंद्धात कल्पना

१) दैनिक 'तरूण भारत' वृत्तपत्रांने सीमा भागातील मराठा भाषिकांसाठी आणि बेळगाव जिल्हा व परिसरासाठी फार मोठे योगदान दिले होते.

२) दैनिक 'तरूण भारत' वृत्तपत्रांने स्वातंत्र्य चळवळ व सीमा लढा अशासारख्या राजकीय कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका मांडल्या होत्या.

३) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले.

४) दै. 'तरूण भारत' वृत्तपत्राच्या कार्यास जनतेने पाठिंबा दिलेला असल्यानेच सर्वच क्षेत्रात त्यास यश मिळाले.

५) दै. 'तरूण भारत' वृत्तपत्र हे प्रबोधन व लोकशिक्षणाचे प्रभावी साधन होते. या वृत्तपत्राने सीमा प्रश्न जीवंत ठेवण्याचे महत्त्वाचे काम केले.

संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन

तरूण भारत या विषयावर संशोधकांनी मांडलेल्या भूमिका व झालेला अभ्यास त्यातून जाणवलेल्या त्रुटी व आवश्यकता पुढीलप्रमाणे सांगता येईल. बाबुराव ठाकुर यांची कन्या प्रभु प्रिया यांनी समरांगण हे जीवन ज्यांचे, प्रकाशन किरण ठाकुर, तरूण भारत प्रेस, समादेवी गल्ली, बेळगाव, प्रथमावृत्ती, १९७५, हे बाबुराव ठाकुर यांचे चरित्र असून विशेष म्हणजे ते बाबुराव ठाकुर यांच्या हयातीतच लिहिले आहे. त्यामध्ये त्यांच्या जीवन चरित्रावर भर दिलेला आहे. त्याचबरोबर Dapake N. J "Baburao Thakur (1919-1980) Freedom Fighter And Journalist Of Belgaum (Karnataka)" हा प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सादर करून सन १९९० मध्ये इतिहास विषयातून एम. फिल. ही पदवी मिळविलेली आहे. या प्रबंधामध्ये बाबुराव ठाकुर यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यामुळे हे संशोधनाचे कार्य बाबुराव ठाकुर या व्यक्तीपुरतेच मर्यादित आहे, साळुंखे संजय गुंडाप्पा यांनी बाबुराव ठाकुर यांची पत्रकारिता या विषयावर संशोधन करून शिवाजी विद्यापीठाच्या मास्टर ऑफ जर्न्यालिझम अँड कम्युनिकेशन सायन्स (एम.जे.सी.)या पदवीसाठी लघुशोध प्रबंध सादर केलेला आहे. या प्रबंधात संशोधकाने पत्रकारितेच्या चौकटीत हा विषय हाताळलेला आहे. बाबुराव ठाकुर यांच्या पत्रकारितेचा अभ्यास करून त्यांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीस दिलेल्या योगदान व त्याची पत्रकारिता, नवीन पत्रकार व वृत्तपत्र व्यावसायिकाला मार्गदर्शक व आदर्श कशी ठरू शकेल. याची मांडणी केली आहे. काही मोजक्याच अग्रलेखांचा ऊहापोह या प्रबंधात केलेला आहे. या प्रबंधामध्ये स्वातंत्र्य पूर्वकाळातील भूमिका व स्वातंत्र्य चळवळीतील निर्णायक भूमिका आणि वाटचालीचा वेध घेतलेला नाही. याशिवाय महात्मा गांधीजीची हत्या, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वाद, गोवा मुक्ती आंदोलन, स्थानिक प्रशासन, नगरपालिका, लोकसभा, विधानसभा, सहकार जनआंदोलन, शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक चाली–रिती, प्रथा अशा अनेक प्रश्न या प्रबंधात मांडलेले नाहीत.

प्रा.पाटील विष्णू यांनी 'राष्ट्रवीर वृत्तपत्रांचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्य(सन १९२१ ते १९७७)' हा शोधप्रबंध पीएच.डी.साठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन

२०११ मध्ये सादर केलेला आहे. या प्रबंधामध्ये राष्ट्रवीर वृत्तपत्राने समाजाच्या हितासाठी केलेल्या कार्याची माहिती दिलेली आहे. कोल्हापूर जिल्हयाचे शेकाप खासदार भाई दाजीबा देसाई, व्यक्ती व कार्य या विषयावर संशोधकाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र, मुक्त विद्यापीठ नाशिक येथे सन २०११ मध्ये एम.फिल. पदवीसाठी सादर केला आहे. या विषयाच्या अनुषंगाने मला बेळगाव विभागातील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक घडामोडीचा बोध झाला. डॉ.शिंदे एस.पी. यांनी, "Contribution of 'Pudhari' to the Socio-Political Movements In Southern Maharashtra up to 1972" हा विषय घेऊन इतिहास विषयातील एम.फिल पदवी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन १९९३ मध्ये संपादन केली आहे. यामध्ये पुढारी वृत्तपत्राने केलेल्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. तर माझ्या प्रबंधातून तरूण भारत या वृत्तपत्राचे कार्य सविस्तरपणे दिले गेले आहे. तसेच श्री.जाधव शिवाजी गजेंद्र, 'पद्मश्री, कै. डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता : एक विश्लेषणात्मक अभ्यास' इतिहास विषय, शिवाजी विद्यापीठ, २००७, पीएच.डी.साठी सादर केलेला आहे. अशाप्रकारे वृत्तपत्रावर संशोधन झाले असले तरी, दै. 'तरूण भारत'(बेळगाव)चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान(१९१९ ते १९८०) या विषयातून या वृत्तपत्राच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे.

संशोधन पद्धती

इतिहास संशोधन पद्धतीनुसार सदर विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विषयाची निवड, कागदपत्राचे संघटन, वर्गीकरण, मूल्यमापन व स्पष्टीकरण या सर्व प्रक्रियेतून हे संशोधन पूर्ण झाले आहे. प्राथमिक साधनांचा पुरेपूर वापर करून संशोधन केले आहे. परंतु ज्या घटनांचा उलगडा करताना जेथे प्राथमिक साधने उपलब्ध नाहीत. तेथे दुय्यम साधनांचा आधार घेऊन संशोधनात सत्यता व वस्तूनिष्ठता राखण्याचा पुरेपुर प्रयत्न केला आहे.

दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदानाबाबतचा अभ्यास करताना सन १९१९ ते १९८० या काळातील दै. 'तरूण भारत' चे अंक अभ्यासून एकंदरीत या वृत्तपत्रांनी वेगवेगळया परिस्थितीत बजावलेल्या भूमिकेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यावरून स्वातंत्र्य चळवळीच्या काळात बेळगाव विभागातील नव्याने प्राप्त झालेली माहिती यांची सुसंगत मांडणी करून नवा आशय व अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. व्यावहारिक जीवना संबंधित विषय आणि समस्याबाबत यथार्थ ज्ञान मिळविण्यासाठी व्यावहारिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व

वृत्तपत्रे ही मोठी सामाजिक शक्ती आहे. जनहित आणि जनतेचे स्वातंत्र्य यांची जणू ती रखवालदारच असतात. अशा या वृत्तपत्रात राजकारण, समाजकारण व अर्थकारण इत्यादी क्षेत्रात घडलेल्या घटकांची नोंद असते. लोकमताचे नेतृत्त्व करणे, प्रबोधन करणे, शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टासाठी कार्यरत असणारी ही वृत्तपत्र संस्था असते. अशा विविध उद्देश्याने स्थापन झालेले जिल्हापत्र 'तरूण भारत' बेळगाव हे वृत्तपत्र होय. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या उभारणीमध्ये बाबुराव ठाकुर यांचे योगदान लक्षात घेण्यासाठी त्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासणे महत्त्वाचे ठरले. या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबुराव ठाकुर यांनी दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक सीमा भागात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात पत्रकारितेच्या माध्यमातून प्रवेश केला. सर्व स्तरातील जनतेचे प्रश्न मांडले व सोडविण्याचा प्रयत्न केला. पत्रकारिता करत असताना कोणत्या भूमिकेतून त्यांनी वृत्तपत्र चालवले. संपादक म्हणून त्यांनी केलेले कार्य तपासून पहाणे महत्त्वाचे ठरले आहे. सीमा भागातील मराठी वृत्तपत्रामध्ये दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचे आजचे स्थान महत्त्वाचे आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य या वृत्तपत्रांनी केले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढा, सीमा प्रश्न, गोवा मुक्ती चळवळ, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यासाठी दै. 'तरूण भारत' कुशलतेने वापर केला आहे. सीमा प्रश्न बाबुराव ठाकुर यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक बाजू होती. ते धडाडीचे पत्रकार संपादक होते. सामाजिक उपक्रमामध्ये त्यांचा सहभाग होता. सर्वसामान्यांचे प्रश्नांना भिडणारे बातमीपत्र म्हणून वृत्तपत्र प्रसिद्धीला आणले.

दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या कार्यामुळे दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक सीमा भागात पत्रकारितेच्या क्षेत्रात या वृत्तपत्राचे स्थान आणि महत्त्व हे वेगळे आहे. आजच्या व्यावसायिक वृत्तपत्र युगात तरूण पत्रकारितेच्या क्षेत्रात या वृत्तपत्राचे स्थान आणि महत्त्व वेगळे आहे. नव्या पिढीला, वृत्तपत्र व्यावसायिकांना, शिक्षण सम्राटाना, राजकीय पक्ष नेतृत्त्वांना, सामाजिक कार्यकर्त्यांना दिशा निर्देशन ठरणारे आहे.

प्रस्तुत प्रंबधाचे प्रकरणानुसार स्वरूप

"दै. 'तरूण भारत' (बेळगाव) चे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान (१९१९ ते १९८०)" या विषयावरील संशोधन हे सहा प्रकरणात विभागलेले आहे.

प्रकरण पहिले- दै. 'तरूण भारत' ची पार्श्वभूमी

या प्रकरणात विषय प्रवेश, संशोधन विषयाचे नांव, विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाची गृहितके, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, सिंद्धात कल्पना, संशोधन पद्धती, संदर्भ साधने, प्रस्तुत अभ्यासाचे महत्त्व व प्रस्तुत प्रंबधाचे प्रकरणानुसार स्वरूप इत्यादी संशोधन वाटचालीचे मुद्दे दिलेले आहेत.

याशिवाय याच प्रकरणात बाबुराव ठाकुर यांच्या वृत्तपत्रीय कार्याचा आढावा घेण्यापूर्वी वृत्तपत्राचा उदय, भारतीय वृत्तपत्रांच्या विकासाची वाटचाल, मराठी वृत्तपत्रांचा विकास, सीमा भागातील वृत्तपत्रांचा उदय व विकास, बेळगाव शहरातील मराठी वृत्तपत्रांचा इतिहास व वाटचाल, बेळगाव येथे 'तरूण भारत' वृत्तपत्राची स्थापना, उद्देश, विकासाचे टप्पे तसेच संस्थापक संपादक बाबुराव ठाकुर यांचे पुर्वायुष्य व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण इत्यादी बाबीची चर्चा या प्रकरणात केली आहे.

प्रकरण दुसरे- दै. 'तरूण भारत' चे सामाजिक कार्य

दै. 'तरूण भारत' वृत्तपत्र हे सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी झगडणारे आहे. स्वातंत्र्य पूर्वकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य जनता व त्यांचे प्रश्न केंद्रबिंदू मानून त्याच्या उचित न्याय हक्कासाठी या वृत्तपत्रांने विपूल प्रमाणात लेखन केले आहे. वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून प्रशासनाच्या विरोधात मोर्चे बांधणी करुन सरकार, व प्रशासनाला ताळ्यावर आणले आहे. या वृत्तपत्राच्या सामाजिक कार्याचे अभ्यासाच्या सोयीसाठी दोन भाग पाडले आहेत. ते म्हणजे नागरी कार्य व सामाजिक कार्य हे होत. नागरी कार्यात आरोग्य, स्वच्छता, पाण्याचा प्रश्न, रस्ते, दिवाबत्ती, सांडपाणी व्यवस्थापन, शहर व ग्रामीण भागातील अंतर्गत सुधारणा, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ, शेतीपरिषदा व प्रदर्शने, पशुसवंर्धन, सामाजिक चळवळी, कामगार प्रश्न व चळवळी, संप हरताळ, सहकार, स्थानिक प्रशासन इत्यादींची माहिती घेतलेली आहे.

सामाजिक कार्यात अंधश्रद्धा, अस्पृश्यता निर्मूलन, जातीय सलोखा, मंदिर प्रवेश चळवळ, त्याचबरोबर यात्रा, सण व उत्सव यातील समाज विघातक चाली–रिती, स्त्री विषयक भूमिका, महागाई, भ्रष्टाचार, बेकारी, मद्यपान निषेध, कोर्ट कचेरी, पोलिस यंत्रणा इत्यादी सामाजिक प्रश्नाबाबत या वृत्तपत्राची भूमिका स्पष्ट केलेली आहे.

प्रकरण तिसरे- दै. 'तरूण भारत' चे राजकीय कार्य

या प्रकरणात दोन भाग पाडले आहेत. ते म्हणजे दै. 'तरूण भारत' वृत्तपत्राचे सन १९१९ ते १९४७ या काळातील राजकीय कार्य व दुसऱ्या विभागात सन १९४८ ते १९८० या काळातील कार्य.

पहिल्या विभागात सन १९१९ ते १९४७ या दरम्यानच्या काळातील कार्यामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळ तीव्र होत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिले महायुद्ध ओसरले होते. अशा वेळी जून १९१९ मध्ये बेळगाव शहरात मराठी भाषिकांचे 'तरूण भारत' मासिक सुरू झाले. विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करणे व देश विधायक कार्यात सहभागी करून घेणे. या मासिकाचा मुख्य उद्देश असले तरी महात्मा गांधीजींच्या विचार प्रेरणेचा प्रभाव बाबुराव ठाकुर यांच्यावर झाला. पुढील राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात हे मासिक काँग्रेसचे या भागातील प्रचार पत्रक म्हणून पुढे आले.

दुसऱ्या विभागात सन १९४८ ते १९८० या काळातील कार्यामध्ये महात्मा गांधीजींच्या हत्येमुळे निर्माण झालेला बेळगाव परिसरातील सामाजिक उद्रेक, यावेळी तरूण भारत वृत्तपत्राने निभावलेली महत्त्वपूर्ण भूमिका, राज्य पुनर्रचनेमुळे निर्माण झालेला महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद व त्या संदर्भात करावी लागणारी जन आंदोलने याबाबत घेतलेली भूमिका, सयुंक्त महाराष्ट्र एकीकरण चळवळ, गोवा मुक्ती लढा, सार्वजनिक निवडणूका, स्थानिक व नगरपालिका प्रशासन व निवडणूका, भारत देशाचे आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादी घटकांच्याबाबत 'तरूण भारत' वृत्तपत्रांने स्वीकारलेली भूमिका या प्रकरणात मांडलेली आहे.

प्रकरण चौथे- दै. 'तरूण भारत' चे शैक्षणिक कार्य

या प्रकरणात शैक्षणिक विकासाच्या दृष्टिकोनातून तरूण भारत या वृत्तपत्राचे बेळगाव विभागासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे. तरूण भारतचे संपादक बाबुराव ठाकुर यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून खेडया–पाडयातील बहुजन जनतेला शिक्षणाबाबत जागृत केले. या कामासाठी वृत्तपत्राचा उपयोग महत्त्वपूर्ण ठरला. प्रौढशिक्षण, प्राथमिक, माध्यमिक, उच्चशिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षण या शिक्षण व्यवस्थेसाठी बाबुराव ठाकुर यांनी सुरूवातीपासूनच हे कार्य सुरू केले होते. या त्यांच्या उल्लेखनिय कामगिरीमुळे या भागात शिक्षणाचा प्रसार झाला. अनेक अडचणीवर मात करून हे शिक्षण खेडोपाडी, डोंगर वस्त्यावर पोहचविणे शक्य झाले. बेळगाव परिसरातील बहुजन मराठा समाजाला शिक्षणविषयक योग्य दिशा देण्याचा जो प्रयत्न 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून केला आहे. याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

प्रकरण पाचवे- दै. 'तरूण भारत' चे सांस्कृतिक कार्य

या प्रकरणात बाबुराव ठाकुर यांनी 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून या विभागातील लोकांची न्याय गाऱ्हाणी सर्वासमोर मांडली. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक अन्यायाविरूद्ध

झगडा दिला. समाजातील सांस्कृतिक देवाणघेवाण त्याचबरोबर धर्म, रिती–रिवाज, आध्यात्मिक भाव, नीती, कायदा, विद्या, कला प्राविण्य, व्याख्याने, लेखन, वाङ्मय इत्यादी मानवी सद्‌गुण विवेकी घटकांचा या विभागावर चांगला संस्कार व्हावा या विचाराने तरूण भारत वृत्तपत्राने प्रसिद्धी दिली आहे. अशा व्यक्तिच्या कार्याचा या प्रकरणात आढावा घेतलेला आहे.

प्रकरण पाचवे

उपसंहार

या प्रकरणात सर्व प्रकरणाचा निष्कर्ष मांडलेला आहे. यामध्ये भारतीय स्वातंत्र्य युद्धात भारतीय वृत्तपत्रांनी गौरवशाली भूमिका बजावली आहे. जनमत निर्माण करण्याचे अत्यंत प्रभावी अस्त्र, वृत्तपत्रांच्या रूपाने भारतीय नेत्यांच्या हाती मिळाले यामुळे राष्ट्रीय भावना तीव्र करण्यास उपयोग झाला. मुळातच दै. 'तरूण भारत' वृत्तपत्रांची स्थापना झाली. ती तरूण वर्गाला मार्गदर्शन करणे, समाज सुधारणेच्या वाटचालीची दिशा दाखविणे हा हेतू सामाजिक जागृती व शिक्षण प्रसाराशिवाय देशाचा उद्धार होणार नाही, हे जाणून घेऊन बाबुराव ठाकुर यांनी समाजाच्या निकोप वाढीसाठी व राष्ट्राच्या उन्नतीसाठी 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या माध्यमातून तरूण पिढीला प्रवृत्त केले. या आदर्शवादी ध्येयवादी विचारातून मासिकाने सुरूवातीच्या काळात तरूण विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन केले. देश विधायक कार्यात त्यांना सहभागी करून घेतले. देशातंर्गत घडामोडी, स्वातंत्र्य चळवळीची दिशा, राष्ट्रप्रेम (भक्ति) अशा प्रकारच्या वेगवेगळया वैचारिक लेखांच्या माध्यमातून 'तरूण भारत' या मासिकाने समाजात जागृती निर्माण केली. राज्य पुनर्रचनेमुळे निर्माण झालेल्या महाराष्ट्र व कर्नाटक सीमावादाचा आणि त्या संदर्भात कराव्या लागलेल्या आंदोलनाचा, संस्थाने विलीनीकरण, गोवा मुक्तीचा लढा, सार्वजनिक निवडणूका, बेळगाव नगरपालिका कारभार इ. प्रश्नासाठी हे वृत्तपत्र अग्रस्थानी होते. या विभागातील बहुजनांना स्वातंत्र्य लढयात सहभागी करून घेण्यासाठी म्हणून वेगवेगळया अग्रलेखातून देशभक्तीची व राष्ट्रप्रेमाचे संदेश दिले. काँग्रेस पक्ष व महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य लढयात या पत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महात्मा गांधीजींच्याबाबत असणारी आदरयुक्त भक्ती प्रत्येक लेखात जाणवते. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जाती व वर्गाला समतेच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची समाजासमोर चर्चा करून न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने 'तरूण भारत' ने लेखन अधिकार वापरले आहेत. शेतकरी परिषदा, व्यापारी लोकांची अधिवेशने, लमाणी समाजाचा मेळावा, मराठी समाजाची परिषद, धनगर लोकांचे प्रश्न, महिला मंडळांची स्थापना व संघटना अशा समाजातील विखुरलेल्या व असंघटीत घटकांची संघटना उभी करून

त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची चर्चा करून दाद मागण्यासाठी कायम प्रयत्न केले. त्यामुळे तळागाळाचा समाज 'तरूण भारत' या वृत्तपत्राकडे अत्यंत जिव्हाळ्याने पाहत असे. 'तरूण भारत' चे संस्थापक व संपादक बाबुराव ठाकुर यांच्या समतोल राजकीय दृष्टिकोनामुळे या वृत्तपत्राचे लेख हे वास्तववादी म्हणूनच ऐतिहासिक दृष्टया अधिक उपयुक्त ठरले आहेत. या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबुराव ठाकुर यांनी सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून दिले व पत्रकारितेची ताकद दाखवून दिली.

संशोधनाचा निष्कर्ष व शिफारसी

संशोधन विषयाचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

१) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक परिवर्तनात फार मोठे कार्य केले आहे.

२) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्रास शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी व सामान्य जनता यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे सर्वच क्षेत्रात यश मिळाले.

३) दै. 'तरूण भारत'चे संस्थापक व संपादक बाबुराव ठाकुर हे लढवय्ये संपादक असल्याने त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश प्रशासनाच्या विरोधात प्रचार करून सत्याग्रही तयार करण्याचे कार्य केले.

४) दै. 'तरूण भारत'ने सीमा भागातील मराठी भाषिकावरील अन्यायाविरूद्ध लढा देऊन महाराष्ट्र व कर्नाटक सीमा प्रश्न जिवंत ठेवण्याचे कार्य केले.

५) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने आंतरराष्ट्रीय घडामोडीबाबतचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रखर विचार मांडले आहेत.

६) दै. 'तरूण भारत' वृत्तपत्र हे प्रबोधन व लोकशिक्षणाचे प्रभावी साधन आहे.

७) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने सीमा भागातील जनतेसाठी शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टिने केलेले कार्य फार मोलाचे आहे.

८) समाज व्यवस्थेला घातक ठरणाऱ्या अनेक बाबींचा तीव्र शब्दात विरोध केला आहे.

९) सदर वृत्तपत्राने स्त्रियांच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष देऊन त्यांचे प्रश्न कसे सोडिविता येतील याचे मार्गदर्शन केले आहे.

१0) समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण महत्त्वाचे यासाठी वृत्तपत्राने जाणीवपूर्वक लक्ष देऊन खेडेवारी प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला व सरकारने ही त्वरीत यावर उपाय योजना करावी अशी विनंती केली आहे.

११) लोकसंख्येला आळा घालण्यासाठी या वृत्तपत्राने लहान कुटुंबाचे महत्त्व समाजाला कायम पटवून दिले आहे.

१२) छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेऊन वाटचाल केली ाहे.

१३) समाजातील सांस्कृतिक बाबींकडे या वृत्तपत्राने सुरूवातीपासून लक्ष वेधले आहे.

१४) ज्या संशोधकांचे संशोधन, शेतकरी चळवळी, स्त्री चळवळ, कामगार भारत स्वातंत्र्य चळवळ, महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न, गोवा मुक्ती, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, इत्यादी बाबतीत चालू आहे. त्यांना दै.'तरूण भारत' वृत्तपत्रीय माहिती उपयुक्त ठरणारी अअहे. असे ठाम नमूद करावेसे वाटते.

१५) आण्णासाहेब लट्ठे, शिवराम कोप्पळ, आचार्य अत्रे, बा.रं.सुठणकर, गंगाधरराव देशपांडे, गोविंदराव याळगी, अनंत भालेराव, दि.वि.गोखले, शं.वि.सोहनी, एस.एन.पोवार इ.चे अभ्यसपूर्ण लेख सदर वृत्तपत्रात आढळून येतात.

शिफारसी

१) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राचा आदर्श समोर ठेऊन आज कार्यरत असणाऱ्या सर्व वृत्तपत्रांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य केले पाहिजे.

२) दै. 'तरूण भारत' वृत्तपत्रास कर्नाटक सरकारने द्वेषभावनेची वागणूक न देता इतर वृत्तपत्राप्रमाणेच वागणूक द्यावी.

३) सीमा भागातील असणाऱ्या मराठी वृत्तपत्रांनीही तरूण भारत सारखेच मराठी भाषिक लोकांचे प्रश्न सोडवावेत.

४) दै. 'तरूण भारत' या वृत्तपत्राने समाजात चालविलेला चाली-रिती रूढी परंपरा व अस्पृश्यता यांच्या विरूद्ध आवाज उठविला आहे तेव्हा त्यामध्ये यश मिळविण्यासाठी समाजाने या वृत्तपत्रास सहकार्य करणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथसूची

अ) प्राथमिक साधने

१) मासिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९१९ ते १९२४

२) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९२८ ते १९४४

३) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९४४ ते १९६६

४) दैनिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल १९६६ ते १९८०

५) दैनिक, तरूण भारत, बेळगाव, २५ ऑक्टोबर १९८८

६) दैनिक, 'केसरी', पुणे, २४ एप्रिल १९७९

७) दैनिक, 'पुढारी', कोल्हापूर आवृत्ती, १ नाव्हेंबर १९८२

८) कुंटे जगदीश, तरूण भारत, एक गौरवशाली परंपरा(माहितीपट) तरूण भारत वृत्तपत्रास ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दि.३० मार्च १९९९ रोजी तयार करण्यात आलेला माहितीपट.

९) पाटील अनंतराव, तरूण भारतचे बाबुराव ठाकुर, विशाल सहयाद्री, दि.२९ एप्रिल १९७९

१०) ठाकुर बाबुराव, जळगाव पत्रकार परिषदेतील छापील अध्यक्षीय भाषणे, १३ जून १९६५

११) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र–म्हैसूर–केरळ सीमावाद आयोगास सादर केलेले महाराष्ट्र म्हैसूर सीमावादविषयक निवेदन, १९६७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

१२) मुचंडी कृष्णा, बेळगावातील मराठी समाज, मराठा युवक संघ स्मरणिका, बेळगांव, १९७६.

१३) राजाध्यक्ष ग.गो., बाबुराव ठाकुरांची पत्रकारिता, दैनिक तरूण भारत, अक्षरयात्रा, पुरवणी, २६ डिसेंबर १९९९

१४) साप्ताहिक, 'राष्ट्रवीर', बेळगाव, फाईल १९२१ ते १९७९ चे अंक

१५) साप्ताहिक, 'वीरवाणी', बेळगाव, फाईल १९८० ते १९८३ चे अंक

१६) साप्ताहिक, 'बेळगाव समाचार', फाईल १९९९ ते १९५५ चे अंक

१७) सुंठणकर बा.र., पुढारी संपादक परंपरेतील अखेरचा लढवय्या बाबुराव ठाकुर, दै. महाराष्ट्र टाईम्स, ४ मे.१९७९

ब)विशेषांक

१) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव स्वातंत्र्य दिन, विशेषांक, १५ ऑगस्ट १९४७

२) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, रौप्यमहोत्सवी अंक, ८ जानेवारी १९५४

३) प्रभू प्रिया, 'समरांगण हे जीवन ज्यांचे' प्रकाशक किरण बाबुराव ठाकुर,'तरूण भारत प्रेस' समादेवी गल्ली, बेळगाव, १९७५

४) मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती सुवर्ण महोत्सवी विशेषांक, दि.८ जानेवारी १९८९

५) मासिक, तरूण भारत, बेळगाव, लोकमान्य टिळक, विशेषांक , नोव्हेंबर १९२०

६) लेले एम.एच.(प्रकाशक), आर.पी.कॉलेज, बेळगाव वार्षिक अहवाल, १९४८–४९

७) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, पांगिरे प्रकरण, विशेषांक , दि.१० एप्रिल १९४५

८) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, काँग्रेसचा सुवर्ण महोत्सवी विशेषांक , दि.१८ डिसेंबर १९३५

९) स्मरणिका, स्मृतिगंध, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, २० फेब्रुवारी १९८२

१०) वेणुनाद, ७३ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, प्रकाशक कृष्णा शहापूरकर, बेळगाव २८ एप्रिल २०००

क) स्मरणिका (स्मृतिदिन विशेषांक)

१) कुंटे मो.ग., एक आनंदयात्री, स्मृतिग्रंथ, ५ डिसेंबर, २०१३, प्रकाशन श्री सरस्वती वाचनालय कोरे गल्ली, शहापूर बेळगांव

२) केळकर गोविंद, ज्ञानदीप, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, मराठी ट्रेनिंग कॉलेज, टिळकवाडी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९४२ ते १९९२, ८ जानेवारी, १९८९

३) पाटील न.भू, नरसिंगराव भुजंगराव पाटील गौरवांक बेळगांव, समाज सुधारणा मंडळ, १९८१

४) ठाकुर बाबुराव, प्रथम स्मृतिदिन विशेषांक, २४ एप्रिल १९८०

५) ठाकुर माई बाबुराव, ते अखेरचे दिवस, स्मृतिसुगंध बाबुराव ठाकुर, तृतीय स्मृतिदिन विशेषांक, बेळगाव, २३ एप्रिल १९८२

६) स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकुर तृतीय स्मृतिदिन विशेषांक, २३ एप्रिल १९८२

७) शानभाग आर.डी., मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, १९३७ ते १९८८, ८ जानेवारी, १९८९

ड) दुय्यम साधने (इंग्रजी)

1) Apte Ram, Maharashtra- Karnataka Border Dispute, Kiran Thakur working President, M.E.S., Belgaum city unit, Belgaum, 20 October 2010

2) Barns, Margarita ; The India Press George Allen and Unwin, London, 1940 (Intranet www. Barns)

3) Bhandare Vasant R., Maharashtra- Karnataka Border Dispute Politics of Municipalation, Kirti Prakashan, Sion Bombay-1979

4) Chaudhary S.C., History of Modern India, Edition Surjeet Publication, Kamala Nagar Dehli 2004.

5) Gupta D.G., 'Indian National Movement and Constitutional Development Vikas Publishing House PVT. Ltd., New Dehi, Third Edition, 1976

6) Gupte R.S., The History Of Modern China, Nationaliz And Communism in India Stirling, Publication, 1974

7) Joshi P. S, and gholkars .v history of modern india (1800 to 1964) S. chand & Co., Ltd, New Delhi, 1983.

8) Kamat Surynath U.(ed.), Belgaum Gazetteer, Bengalore Government Of Karnataka, 1987.

9) Kamath Suryanath U. Gazzetter of India. Karnataka state, Belgaum, Districts, Government of Karnataka Publishing, 1987.

10) Nalawade Viji N., Keshavrao Jedhe a non Brahmana Nationalist Political Leader.(Unpublished Thesis) 1984.

11) Shaik Ali B., History its theory and method] published by S.G.wasani for Macmillan india limited and printed by T.K. Sengufta at india press madras, 1978.

दुय्यम साधने (मराठी)

१) अकलुजकर प्रसन्नकुमार, मराठी वृत्तपत्र सृष्टीचे अंतरंग, श्री विद्या प्रकाशन, पुणे, सप्टेबर २०००

२) अकलुजकर प्रसन्नकुमार, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, २००७

३) अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड ३, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, २००७

४) कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, शशिकांत पिंपळपुरे विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जून २००९

५) कायंदे–पाटील, गंगाधर वि., संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, चतुर्थ आवृत्ती, २५ डिसेंबर २००८.

६) काळे वि.र., आचार्य अत्रे, महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व, वसंत बुक स्टॉल, मुंबई, पहिली आवृत्ती, २५ जानेवारी २००९

७) गव्हाणे सुधीर, प्रस्तावना पत्रकारिता रूप आणि स्वरूप, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन पुणे, ऑगस्ट २००९

८) गोखले किरण, पत्रकारिता विद्या, वृत्तसंकलन(लेख) भट गो.आ. मॅजिस्टेक प्रकाशन प्रथमावृत्ती, २००३

९) गोगटे भा.वी., बेळगाव दर्शन, लोकप्रिय प्रेस, बेळगाव, १९७०

१०) चव्हाण किशोर, माहिती संप्रेषण आणि शैक्षणिक मुल्यमापन, प्रज्ञा प्रकाशन नाशिक, २००३

११) चौगुले एल.आर., भाई दाजीबा देसाई नेतृत्त्व आणि कर्तृत्त्व, भाई दाजीबा देसाई कॉलनी, बेळगाव, १९८८

१२) चौगुले एल.आर., भली माणस, राज्ञी प्रकाशन बेळगाव, पहिली आवृत्ती, २००३

१३) जोशी एस.एम., सीमा सत्याग्रह आणि राष्ट्रीय एकात्मता, साधना प्रकासन, पुणे, पहिली आवृत्ती, १९८६

१४) टिळक दिपक जयवंत, लोकदिन जपणारा राष्ट्रीय ठेवा केसरी, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र वृत्तपत्र गौरव ग्रंथ, संपादक रविंद्र बेडकिहाळ, फलटण, महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी, २०१०

१५) तोरो अ.रा.(संपा.), महाराष्ट्रकर्नाटक सांस्कृतिक अनुबंध, अरूण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ ऑक्टोबर २००१

१६) देसाई दाजिबा (संपा.), राष्ट्रवीर, सुवर्ण महोत्सवी विशेषांक १९२१ ते १९७१

१७) देसाई बाबुराव, सगे सोयरे, बेळगाव, सौ.सीमा रविकिरण इनामदार, रविराज प्रकाशन, बेळगाव, १९८५

१८) देशपांडे मीना, हुतात्मा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे ४ प्रथमावृत्ती १ मे २०१०

१९) देशपांडे अ.वा., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १, व्हिनस प्रकाशन पुणे, १९७४

२०) देशपांडे बा.य., बेळगांवातील स्वातंत्र्य संग्राम, (बेळगाव : बेळगाव जिल्हा खादी ग्रामोद्योग संघ) जे कॉय प्रिटींग प्रेस, बेळगांव, १९७८

२१) देशपांडे वसंत वासुदेव, महाराष्ट्राची सुवर्णगाथा, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती, २८ फेब्रुवारी २०११

२२) दिघे पी.डी., महाराष्ट्रातील सामाजिक सांस्कृतिक चळवळ, अक्षर प्रकाशन, मुंबई, १९९५

२३) धारवाडे बाबुराव, पुढारीकार ग.गो. जाधव, गौरव ग्रंथ, अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, १९७७

२४) नांदूरकर राम, गुरूवर्य शामराव देसाई व्यक्ती व कार्य, गुरूवर्य शामराव देसाई गौरव समिती, बेळगाव, २०००

२५) पंत एन.सी., पत्रकारिता का इतिहास, तक्षशिला प्रकाशन दिल्ली, २००२

२६) पानसे भाऊ, महाराष्ट्रात विनोबा, ग्राम सेवा मंडळ, परधाम विद्यापीठ, पो.पवनार, जि.वर्धा, १९५८

२७) पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय प्रकाशन मुंबई, तिसरी आवृती, २०१०

२८) पै.नाथ, लोकशाहीची आराधना, साधना प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १८ जानेवारी १९९६.

२९) प्रधान ग.प्र., स्वातंत्र्याचे महाभारत, साधना प्रेस आणि साधना प्रकाशन, पुणे, १९८९

३०) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ४ ते ७, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८३

३१) महाजनी ह.रा., संयुक्त महाराष्ट्राची समस्या, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, १९८७

३२) मठकर दयानंद, महाराष्ट्राचे शिल्पकार बॅ.नाथ पै, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, सप्टेबर २००८.

३३) महाराव ज्ञानेश, उठाव महाराष्ट्र देश, पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथ्मावृत्ती, १ नोव्हेंबर २००१

३४) माजगावकर ग., ग्रामदानाची प्रयोगभूमी, ब.ओ.पुरंदरे प्रकाशन पुणे, १९५८

३५) माळी पी.जी., रणजित देसाई जीवन आणि साहित्य, शब्दवेल प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००१

३६) मेणसे कृष्णा, असा घडलो असा लढलो !, प्रकाशन लोकवाङ्मय गृह भूपेश गुप्ता भवन, मुंबई, २००३

३७) राऊत गणेश व राऊत ज्योती, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स.१८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, चौथी आवृत्ती, डिसेंबर २००९

३८) लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, तृतीयावृत्ती, २००९

३९) लोहार र.म., आधुनिक भारताचा इतिहास, पुणे विद्यापीठ गृहप्रकाशन पुणे, १९९१

४०) वाड विजया (संपा.), मराठी विश्वकोश खंड १८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई, २००९

४१) शुक्ल आर.एल.(संपा.), आधुनिक भारत का इतिहास, दिल्ली विश्वविद्यालय, पुनर्मुद्रण १९९८

४२) सरकार चंचल, कहानी वर्तमानपत्राची, (अनुवाद दिनकर मांगल), नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली, १९८९

४३) सरदेसाई मनोहर हिरबा, गोवा, दमण, दीव, स्वातंत्र्य लढयाचा इतिहास खंड १ व २, प्रकाशक क्रिडा व सांस्कृतिक संचालनालय गोवा, पणजी गोवा, १९८६.

४४) संग्राम, सीमा भागात ब्रिटीशराज सीमा लढा विशेष, असा आहे सीमा प्रश्न, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, २०१२

४५) सोनवणे मनोहर, कात्रीतल बेळगाव, www.uniauesfeatures.com.in

.इ) वृत्तपत्रे

१) दैनिक 'तरूण भारत', बेळगाव

२) दै. 'सकाळ', बेळगाव (आवृत्ती)

३) दै. 'पुढारी' कोल्हापूर

४) दै. 'केसरी', पुणे

५) दै. 'लोकमत', कोल्हापूर (आवृत्ती)

६) दै. 'लोकसत्ता', मुंबई

७) दै. 'पुण्यनगरी', कोल्हापूर

८) साप्ताहिक, 'राष्ट्रवीर', बेळगांव

९) साप्ताहिक 'बेळगाव समाचार', बेळगाव

१०) साप्ताहिक, 'वीरवाणी' बेळगाव

ई) नियतकालिक

१) प्रबोधन प्रकाशन ज्योती(मासिक)

२) संग्राम (मासिक)

३) लोकराज्य (मासिक)

४) साधना (साप्ताहिक)

ऊ) अप्रकाशित एम्.फिल. व पीएच.डी. प्रबंध

१) Dhapake (Pralad) N.J., 'Baburao Thakur (1899-1979) Freedom Fighter and Journaist Of Belgaon', Shivaji University, Kolhapur, M.Phil, 1990.

२) Shinde S. P., 'Contribution of Pudhari to the socio, political movements in Southern Maharashtra up to 1972', M.phil thesis, shivaji university Kolhapur, 1993.

३) कोळसेकर मनोहर सुबराव, 'दाजीबा देसाई व्यक्ती व कार्य' अप्रकाशित एम्.फिल्. शोधप्रबंध, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २०१२

४) साळुंखे संजय गुंडाप्पा, 'बाबुराव ठाकुर यांची पत्रकारिता', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मास्टर ऑफ जर्न्यालिझम अँड कम्युनिकेशन सायन्स (एम.जे.सी.) या पदवीसाठी सादर केलेला लघुप्रबंध, मे २०००

५) निर्मळे हरिचंद्र सिद्राम, 'दलितांची मराठीतील नियतकालिके एक विवेचन अभ्यास' (इ.स.१८८७ ते १९५०) पीएच.डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९८१

६) पाटील वि.रा., 'राष्ट्रवीर वृत्तपत्राचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्य', सन १९२१ ते १९७७) पीएच.डी.(इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०११

७) पाटील तुकाराम शंकर, 'समाजवादी पक्षाचे महाराष्ट्रातील कार्य' (इ.स.१९३४ ते १९७७) पीएच. डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००९

८) रणखांबे नंदिनी रविंद्र, शंकरराव मोरे जीवन व कार्य पीएच. डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००६

९) शिंदे एस.पी., सावंतवाडी संस्थानचा इतिहास, पीएच. डी. (इतिहास) शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २००४

उ) मुलाखत

१) कुंटे जगदीश(सहा.संपादक), दैनिक तरूण भारत, बेळगाव, २२ मे, २०१२, दैनिक तरूण भारत मुख्य कार्यालय बेळगाव, मुलाखत, दु. १२.०० वाजता.

२) कोलेकर तुकाराम कृष्णाजी, मा.आमदार, गडहिंग्लज, दि.२२ ऑगस्ट २०११, नेसरी, सकाळी ११ वाजता मुलाखत.

३) पाटील धनाजी राघोबा, बिजूर ग्रामस्थ, वय वर्षे ७८, राहत्या घरी मुलाखत, ०६ मे, २०१३, दु. ३.०० वाजता.

४) ठाकुर किरण(संपादक), दैनिक तरूण भारत, बेळगाव, १२ मे, २०१२, दैनिक तरूण भारत मुख्य कार्यालय बेळगाव, मुलाखत, सकाळी ११.०० वाजता.

५) शिंदे रानाप्पा गुंडू, बिजूर ग्रामस्थ, वय वर्षे ७५, राहत्या घरी मुलाखत, २२ ऑगस्ट २०१३, दु. ३.०० वाजता.

ए) संकेतस्थळ

1) Website – divyamarathi.com

2) Website – minority group – wilkpedia, the frpm.encyclopedio, Date- 12 Jan. 2012

3) www.belgaum.nic.in

4) www.belgaum.wikipedia

5) www.population, belgaum, Date 3/3/12

6) http:samyukta Maharashtra.org/

7) दै. 'तरूण भारत' सीमा प्रश्न संपादकीय लेख, इंटरनेट

http :/mr.wikipedia; org/wiki, Date, 25 Jan 2012

संशोधक	मार्गदर्शक
श्री. मनोहर सुबराव कोळसेकर	प्रा. डॉ.एस.पी. शिंदे